म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध.
सं. क्र. १९९९



REFBK-0017735

# शिक्षणाचे शिल्पकार

सूचना
तसे न वे
जादा व

# चिरंजीव ग्रंथ प्रकाशन

# शिक्षणाचे शिल्पकार

भारतीय

---

पाश्चिमात्य

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९५५३५
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत
अनुक्रम ७४४२९ वि: निबंध
9293 नों. दि. 99/3/६७

का. ह. बोकील
बी. ए ... एम्. एड्.

...ा बापट
... एम्. एड्.

REFBK-0017735

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०

चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पुणे ३०.

मूल्य आठ रुपये

प्रथमावृत्ती

दि. ७ एप्रिल १९७० (गुढीपाडवा)

मुद्रक : शां. दे. जोशी – वि. द. लोखंडे
प्रतिभा मुद्रणालय,
टिळक रस्ता, पुणे ३०.

प्रकाशक : सु. दे. जोशी – म. द. लोखंडे
चिरंजीव ग्रंथ प्रकाशन,
टिळक रस्ता, पुणे ३०.

# मनोगत

शिक्षण समाजाच्या गरजा, आशा, आकांक्षा व उद्दिष्टे यांच्याशी सुसंबद्ध असल्यामुळे गेल्या अनेक शतकांत झालेल्या सामाजिक, राजकीय, धार्मिक व आर्थिक परिवर्तनांबरोबरच शिक्षणाचे स्वरूपही सतत बदलत गेले आहे. शिक्षणाचे आज जे स्वरूप आपण पहातो ते त्याला प्राप्त होण्यासाठी अनेक थोर शिक्षणतज्ज्ञांचे प्रयत्न कारणीभूत झाले आहेत; म्हणून शिक्षणाची **सद्यःस्थिती** समजून घ्यावयाची असल्यास पुरातन कालापासून अनेक थोर विचारवंतांनी जे शिक्षणविषयक विचार मांडले, त्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. शिक्षण ही एक विकसनशील प्रक्रिया आहे. सामाजिक परिस्थितीचा ज्याप्रमाणे शिक्षणावर परिणाम होतो, त्याप्रमाणे शिक्षणाचाही सामाजिक संस्कृतीवर परिणाम घडून येत असल्याचे दिसून येते. यासाठी शिक्षणाचा विकास कसकसा होत गेला हे जाणणे जितके उद्‌बोधक तितकेच मनोरंजकही आहे. सद्यःस्थितीचे आकलन करुन घेण्यासाठी ज्याप्रमाणे गतेतिहासातील घटनांचा अभ्यास करावा लागतो, त्याचप्रमाणे भविष्यकाळातील शिक्षणाचे चित्र समजून घेण्यासाठी भूत आणि वर्तमान परिस्थितीचे योग्य प्रकारे परिशीलन करावे लागते. शिक्षणाचे ध्येय, अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, अध्यापनपद्धती, शिक्षक–प्रशिक्षण, शैक्षणिक साधने, विद्यार्थी व शिक्षक यांसारख्या शिक्षणाच्या निरनिराळ्या घटकांमध्ये अनेक वर्षे बदल होत जाऊन त्यांना आजचे स्वरूप प्राप्त झाले आहे. हे बदल घडवून आणण्यासाठी ज्यांनी प्रयत्न केले, ते कोणत्या परिस्थितीत केले ह्याचा अभ्यास करणे हे शिक्षणासंबंधी आस्था व जिव्हाळा बाळगणाऱ्या सर्व व्यक्तींना आवश्यक आहे.

शिक्षणाचा विकास घडवून आणण्यास निरनिराळ्या देशांतील शिक्षण-तज्ज्ञांचे कार्य व त्यांनी प्रतिपादलेले शैक्षणिक विचार कारणीभूत आहेत. ह्या शिल्पकारांनी शिक्षणाची आजची मूर्ती घडविली आहे. त्यांचा परिचय आपणांस करून द्यावा, हा या ग्रंथलेखनामागील प्रमुख उद्देश आहे.

पुस्तकाचे दोन विभाग पाडण्यात आले आहेत. पहिल्या विभागात भारतीय शिक्षण-तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे, तर दुसऱ्या विभागात पाश्चिमात्य शिक्षण-तज्ज्ञांचा अंतर्भाव केलेला दिसून येईल. ह्यात समाविष्ट केलेले तेवढेच जागतिक कीर्तीचे शिक्षण-तज्ज्ञ होत असा, अर्थात, आमचा दावा नाही. काही शिक्षण-तज्ज्ञांची विचारप्रणाली जिज्ञासू वाचकांना समजावी व शैक्षणिक विकासाचे विहंगम दर्शन त्यांना घडावे एवढाच अल्पसा हेतू पुस्तक लिहिण्यामागे आहे.

प्रत्येक शिक्षणतज्ज्ञाचे शैक्षणिक विचार देण्यापूर्वी त्या शैक्षणिक विचारांना पोषक असणाऱ्या त्यांच्या जीवनातील घटना प्रथम नमूद केल्या आहेत. त्यानंतर त्यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान व त्यांनी केलेले शैक्षणिक कार्य थोडक्यात वर्णिले आहे. शैक्षणिक तत्त्वज्ञानात शिक्षण-शिल्पकारांचे शिक्षणाचे ध्येय, अभ्यासक्रम, शैक्षणिक साहित्य, शिक्षक, विद्यार्थी इत्यादींसंबंधीचे विचार ग्रथित केले आहेत. यावरून शिक्षणविषयक कल्पनांमध्ये निरनिराळ्या थोर शिक्षणतज्ज्ञांनी आपल्या विचारांनी व प्रत्यक्ष शैक्षणिक प्रयोगांनी कशी मोलाची भर घातली हे वाचकांना समजून येईल. उदाहरणादाखल बोलावयाचे झाल्यास शिक्षण प्रथम विषयकेंद्रित होते. त्यानंतर ते बालकेंद्रित झाले असल्याचे आपणांस दिसून येईल. आधुनिक काळामध्ये ते समाजकेंद्रित असल्याचे आपण पहातो. जीवशास्त्र, मानसशास्त्र व समाजशास्त्र यांनी प्रतिपादिलेल्या नवनवीन विचारांचा हा प्रभाव शिक्षणावर पडल्याचे आपणांस दिसून येईल.

प्रा. वि. पां. बोकील यांनी या पुस्तकाची हस्तलिखिते वाचून बहुमोल अशा सूचना केल्या; याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. त्याचप्रमाणे हे पुस्तक लिहिण्यास सहाय्यभूत ठरलेल्या अनेक शैक्षणिक ग्रंथांच्या लेखकांबद्दल ऋणनिर्देश करणे आमचे कर्तव्यच आहे. शेवटी प्रकाशक, चिरंजीव ग्रंथ प्रकाशन व प्रतिभा मुद्रणालय यांनी ज्या तत्परतेने व कौशल्याने छपाईचे काम केले, त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

अध्यापनाचे कार्य करणाऱ्या सर्व स्तरांवरील शिक्षकांना, त्याचप्रमाणे शिक्षणाशी संबंधित व्यक्तींना व जिज्ञासू पालकांना शिक्षणाची प्रक्रिया समजून घेण्यास या पुस्तकाचा उपयोग होईल, असा आम्हांस विश्वास वाटतो. अध्यापक विद्यालयातील व महाविद्यालयातील विद्यार्थी-शिक्षकांना तर शिक्षणाचा इतिहास व शैक्षणिक विचारप्रवाह समजून घेण्यास याचा विशेष उपयोग होईल. अभ्यासूंनी यातील उणीवांबद्दल योग्य त्या सूचना केल्यास आम्ही त्यांचे आभारी होऊ.

का. द. बोकील

शकुन्तला बापट

# अनुक्रम

## भारतीय


मनोगत

प्रास्ताविक / १

स्वामी दयानंद / १५

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर / २४

स्वामी विवेकानंद / ४७

महात्मा ज्योतिबा फुले / ७०

महात्मा गांधी / ८१

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे / १२०

महर्षी कर्वे / १२४


## पाश्चिमात्य


प्रास्ताविक

प्लेटो / १

कोमिनिअस / १२

रूसो / २२

पेस्टॅलॉझी / ३६

हर्बार्ट / ४७

फ्रोबेल / ५७

ड्यूयी / ६७

मॅंटिसोरी / ९२

टॉलस्टॉय / १०७

। । । । । । । । शिक्षणाचे शिल्पकार ः । ।

भारतीय

# प्रास्ताविक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम
अनुक्रम ........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................

प्रचलित शिक्षणाचे आपण जे स्वरूप पाहतो, ते घडविण्यासाठी अनेक शिक्षणतज्ज्ञांचे परिश्रम कारणीभूत झाले आहेत. शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांच्या कृतिप्रियतेला दिलेले महत्त्व किंवा विद्यार्थ्यांच्या ज्ञानेंद्रिय-विकासावर देण्यात येत असलेला भर, आधुनिक शिक्षणातील बाल-शिक्षणाची कल्पना किंवा शैक्षणिक साहित्याचा अध्यापन व अध्ययनामध्ये होत असलेला वाढता उपयोग इत्यादी शिक्षणाच्या विविध अंगोपांगांकडे आपण पाहिल्यास आपणांस असे दिसून येईल की, अनेक शतकांच्या परिश्रमानंतर व प्रयोगानंतर त्यांना आजची स्थिती प्राप्त झाली आहे. शिक्षणाचे ध्येय, शिक्षणाचा अभ्यासक्रम, अध्यापनाच्या पद्धती, शिक्षणाचे सार्वत्रिक स्वरूप यांमध्ये अनेक शतकांपासून परिवर्तन घडवून येत आहे. समाज हा परिवर्तनशील असल्यामुळे समाजाच्या आशाआकांक्षा व गरजांची पूर्ती करणाऱ्या शिक्षणामध्ये सतत बदल घडून येणे अपरिहार्य आहे. शिक्षणाच्या विविध अंगोपांगांमध्ये योग्य तो बदल घडवून आणणारे शिक्षणशास्त्रज्ञ गेल्या काही शतकांमध्ये अनेक देशांमध्ये झाले. भारतामध्ये कविवर्य रवींद्रनाथ टागोर, स्वामी विवेकानंद, स्वामी दयानंदसरस्वती, म. गांधी, म. ज्योतिबा फुले, महर्षी

अण्णासाहेब कर्वे यांनी आपल्या जीवनामध्ये विशिष्ट ध्येयपूर्तीसाठी अविश्रांत श्रम करून शिक्षणामध्ये व शिक्षणाच्या कल्पनेमध्ये मोलाची भर घातली. पाश्चिमात्य देशांमध्ये प्लेटो, पेस्टॅलॉझी, कोमिनिअस, फ्रोबेल, मॉंटेसरी, ड्यूयी यांसारख्या शिक्षणतज्ज्ञांनी शिक्षणाच्या कल्पनेला नवा आकार प्राप्त करून दिला. यांसारख्या थोर शिक्षणतज्ज्ञांची चरित्रे आपण अभ्यासल्यास शिक्षणाचा आज आपणांस दिसत असलेला गंगौघ कोणकोणत्या कडेकपारीतून गेला व मानवी जीवनाचे कार्यक्षेत्र सुजलाम्, सुफलाम् करण्याचे दिव्य कार्य तो कसा करीत राहिला आहे, याचे मनोहारी दृश्य आपणांस दिसू शकेल.

प्रत्येक व्यक्तीचें व्यक्तिमत्त्व हे त्या त्या वेळच्या परिस्थितीनुसार घडत असते. मानसशास्त्रीय परिभाषेत बोलावयाचे झाल्यास प्रत्येक व्यक्ती ही काही आनुवंशिक शक्ती बरोबर घेऊन जन्मास येत असते. त्या शक्ती व परिस्थिती यांचा एकमेकांवर आघात व प्रत्याघात होऊन व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आकार घेत असते. आनुवंशिकता × परिस्थिती = व्यक्ती असे समीकरण मांडल्यास फारसे वावगे होणार नाही. ज्याप्रमाणे व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व घडविण्यास सभोवतालची सामाजिक, राजकीय, धार्मिक व आर्थिक परिस्थिती कारणीभूत असते, त्याचप्रमाणे अलौकिक व लोकोत्तर व्यक्ती आपल्या द्रष्टेपणाच्या जोरावर व कार्यकुशलतेच्या प्रभावाने प्रतिकूल परिस्थितीतही परिवर्तन घडवून आणू शकतात. म्हणून लोकोत्तर व्यक्तींच्या जीवनकार्याचा अभ्यास करीत असताना त्यांना लाभलेल्या भौतिक व सामाजिक परिस्थितीचे परिशीलन करणे आवश्यक असते. अनेक व्यक्तींना जरी एकसारखी परिस्थिती निसर्गतः प्राप्त झाली असली, तरी त्या परिस्थितीच्या अनुषंगाने प्रत्येक व्यक्तीची कोणती प्रतिक्रिया होईल, हे त्या व्यक्तीच्या विशिष्ट गुणावगुणांवर अवलंबून असते. पारतंत्र्यात खितपत पडलेल्या भारतीयांच्या यातना पाहून लोकमान्य टिळकांची युयुत्सु प्रवृत्ती जागृत होऊन " 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळवीनच ' अशी त्यांनी सिंहगर्जना केली, तर त्याच परिस्थितीत जन्माला आलेले कित्येक सुशिक्षित महाभाग, भाकरीच्या तुकड्यासाठी इंग्रजांचे लांगूलचालन करण्यात स्वतःच्या जीवनाची इतिकर्तव्यता मानू लागले. भारतीय संस्कृतीची व वैदिक धर्माची कुचेष्टा करून, जे जे भारतीय, ते ते अत्यंत हीन मानून भारतीय संस्कृतीचा निःपात करण्यास सज्ज झालेल्या मिशनऱ्यांना तोंड देण्यासाठी स्वामी विवेकानंदांनी शिकागोच्या धर्मपरिषदेमध्ये जोराचा प्रतिहल्ला करून वैदिक धर्माच्या उज्ज्वल परंपरेचे पुनरुज्जीवन केले. महात्मा गांधींच्या परमकारुणिक स्वभावामुळे व आत्यंतिक सत्त्वशील व साधुवृत्तीमुळे अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी अहिंसात्मक मार्गांचा उपयोग करावा असे त्यांना वाटू लागले. थोडक्यात सांगायचे तर प्रत्येक व्यक्तीचे कार्य व कार्यपद्धती ही त्या व्यक्तीच्या अंतःस्थ सुप्त शक्तीवर व

परिसरातून मिळणाऱ्या प्रतिक्रियेवर अवलंबून असते. यासाठीच व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व व व्यक्तीने जीवनामध्ये केलेले कार्य यांचा चिकित्सक बुद्धीने अभ्यास करावयाचा असल्यास त्या वेळची सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थिती जाणून घेणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे भौगोलिक परिस्थितीचा मानवी जीवनावर परिणाम होत असतो व ज्याप्रमाणे मानवी जीवनामुळे भौगोलिक परिस्थितीतही परिवर्तन घडून येत असते, त्याचप्रमाणे सामाजिक राजकीय व आर्थिक परिस्थितीमुळे व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व घडत असते व अलौकिक कर्तृत्वाच्या व्यक्ती आपल्या सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीलाही कलाटणी देत असतात. सुरेल गायनाला पार्श्वसंगीताची साथ मिळाल्यास ज्याप्रमाणे ते अतिशय मनोहारी वाटते, किंवा एखाद्या विलोभनीय चित्राला आकर्षक पार्श्वभूमी मिळाल्यास ज्याप्रमाणे ते आल्हाददायक वाटते, त्याचप्रमाणे व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व व कार्य अभ्यासण्यासाठी त्याची भौतिक पार्श्वभूमी लक्षात घेणे अत्यंत आवश्यक असते.

इंग्रजांनी भारतीयांचा प्लासीच्या लढाईमध्ये पराभव केल्यानंतर, किंवा वास्को-डि-गामाने झामोरिन राजाच्या श्रीमुखात भडकावल्यावर किंवा शेवटच्या बाजीरावाने इंग्रजांच्या हातावर मराठी राज्याचे उदक सोडल्यानंतर, भारतीय राजकीय परिस्थितीला नवीन कलाटणी मिळाली. राजकीय क्षेत्रापुरते बोलावयाचे झाल्यास भारतीयांची मुत्सद्देगिरी, त्यांचे राजकारणपटुत्व, त्यांची शस्त्रास्त्रे ही कुचकामी ठरली. इंग्रज भारतामध्ये आले त्या वेळी त्यांचा हेतू प्रामुख्याने भारताची अलोट संपत्ती लुटून नेणे एवढाच होता. इंग्रजांपूर्वी ग्रीक, अरब, तुर्क, मोगल, डच, पोर्तुगीज, शक, हूण यांनीही भारतावर आक्रमण केले होते. परंतु या परचक्रांत ज्या अनेक लढाया लढल्या गेल्या त्यामुळे भारताची पुष्कळशी भूमी पादाक्रांत केली गेली. तरीही त्या वेळचे विजेते भारताशी व भारतीय संस्कृतीशी समरस झाल्याचेच दृश्य दिसते. मात्र इंग्रज भारतामध्ये आले ते जेत्यांचा दिमाख मिरवीतच. ते भारतीय संस्कृतीशी किंवा येथील जीवनाशी कधीच समरस होऊ शकले नाहीत. दोन संस्कृती ज्या वेळी समोरासमोर येतात, त्या वेळी दोन नद्यांच्या प्रवाहांप्रमाणे त्यांचा एकमेकांवर आघात-प्रत्याघात होतो. दोन्ही संस्कृती तुल्यबल असल्यास त्यांच्यातील संघर्ष प्रचंड स्वरूप धारण करतो. मात्र त्यांपैकी एखादी संस्कृती कमकुवत असल्यास राजकीय दृष्ट्या वरचढ असणारी संस्कृती दुसऱ्या संस्कृतीला नष्ट करू पाहते. इंग्रजांच्या आगमनामुळे भारतामध्ये अशाच प्रकारचे दृश्य प्रथम आपणांस दिसू लागले. भारतीयांचे राजकीय स्वातंत्र्य नष्ट झाल्याबरोबर पारतंत्र्याच्या वैराण वाळवंटामध्ये भारतीय संस्कृती लोप पावते की काय असे काही काळ वाटू लागले. परकीय जेते लोक भारतीय संस्कृतीची निंदा-नालस्ती करू लागले. मिस् मेयो, कुलोकी, हेगेल यांसारख्या लेखकांनी भारतीय संस्कृती विकृत स्वरूपात जगापुढे

ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. संस्कृतीच्या सर्व क्षेत्रांमध्ये भारतीय लोक अत्यंत मागासलेले, इतकेच नव्हे तर रानटी आहेत, हे ठसविण्याचा या पाश्चिमात्य पंडितांनी जणू विडाच उचलला होता. व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेचा लवलेशही भारतीयांना नाही असे हेगेलने म्हटले, तर भारतीय पुरुष वयाच्या तिसाव्या वर्षीच पौरुषत्व गमावून बसतो व भारतीय स्त्री वयाच्या आठव्या वर्षीच मातृपद भूषविते असे विषारी फुत्कार मिस् मेयोने काढले. शिक्षणशास्त्रज्ञ ग्रेव्हज् म्हणतो, "भारतीय म्हणजे वैशिष्ट्यपूर्ण रानटी लोक. आत्म्याच्या उन्नतीवर जरी ते भर देत असले तरी व्यवहाराला मात्र पारखे आहेत." भारतीय वाङ्मयाबद्दल लॉर्ड मेकॉलेने काढलेले उद्‌गार सुप्रसिद्धच आहेत. तो म्हणतो की, "भारतीय ग्रंथांची किंमत ते लिहिण्या-साठी खर्च पडलेल्या कागदाइतकीही नाही. भारतीय भाषा व भारतीय वाङ्मय हे कवडीमोलाचे आहे. इंग्रजी वाङ्मयाचे एक शेल्फ व भारतातील सर्व ग्रंथसंभार यांची तुलना केल्यास इंग्रजी वाङ्मयाचे ग्रंथच अधिक तोलामोलाचे ठरतील." इतर ज्ञान-शाखांसंबंधी पाश्चिमात्यांनी असेच निंदोद्गार काढले आहेत. भारतीय वैद्यकशास्त्र, ज्योतिषशास्त्र, चित्रकला, वेदान्त, नीतिमत्तेसंबंधीच्या कल्पना वगैरे सर्व बाबतींत भारतीयांची निंदानालस्ती करण्यामध्ये त्या काळी पाश्चिमात्य पंडितांमध्ये अहम-हमिका लागलेली होती. परंतु कालांतराने भारतीय वाङ्मयाचा अभ्यास इंग्रजां-बरोबर जर्मन व इतर पाश्चिमात्यांनी करावयास सुरवात केली व त्यांना भारतीय संस्कृतीची विलक्षण चमक दिसून आली. त्यामुळे भारतीयांना हीन लेखण्यासाठी पाश्चिमात्यांना आणखी एक क्लृप्ती शोधावी लागली. यापुढे, भारतीयांचे सर्व संस्कृति-विशेष हे उसने आहेत, त्यांचे स्वतःचे असे काही नाही, अशी हाकाटी सुरू झाली. भारतीय नाट्यवाङ्मयातील विदूषक ही इंग्रजी नाटकातील चोरून घेतलेली प्रतिकृती होय किंवा रामायण हे होमरच्या इलियडवरून रचलेले काव्य होय. भगवद्‌गीता ही बायबलच्या कल्पनेवर आधारलेली आहे, वगैरे विधाने करण्यात येऊ लागली. पुढे भारतीय वाङ्मयाचा सखोल अभ्यास केल्यानंतर काही लोकांना त्याचे पुरातनत्व व त्याची मौलिकता स्पष्ट दिसू लागली. त्यामुळे भारतीयांची संस्कृती हीन ठरविण्यासाठी आणखी कोणतातरी उपाय पाश्चिमात्यांना शोधावा लागला. या वेळी त्यांचे काही तथाकथित पंडित, भारतीय वाङ्मय व शास्त्रे कपोलकल्पित आहेत असे म्हणू लागले. राम, कृष्ण, व्यास, बुद्ध आणि चाणक्य या व्यक्ती प्रत्यक्षात झाल्याच नाहीत, त्या कपोलकल्पित आहेत असा बकवा त्यांनी सुरू ठेवला. भारतीय संस्कृतीला हीन लेखण्याचा प्रयत्न ज्याप्रमाणे पाश्चिमात्य पंडित त्या वेळी करीत होते, त्याचप्रमाणे स्वकीयांपैकीही काही लोक आपल्या संस्कृतीला कमी लेखण्याचा प्रयत्न करीत होते. इंग्रजी राज्याची पकड प्रथम बंगालमध्ये दृढ झाली. इंग्रजी संस्कृतीच्या प्रथम दर्शनाने आपणांपैकी काही लोक अक्षरशः दिपून गेले.

परकीय संस्कृतीचे गोडवे गाण्यात व स्वसंस्कृतीची निंदानालस्ती करण्यात ते स्वतःला धन्य मानू लागले. इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासाने चिकित्सक दृष्टी प्राप्त झाल्यानंतर भारतीयांपैकी काही विचारवंत स्वतःच्या दुःस्थितीची कारणे शोधू लागले. त्यात त्यांना असे दिसून आले की, राजकीय परचक्रापेक्षा आपण आपले स्वत्व व संस्कृती गमावून बसलो आहोत, हीच सर्वांत मोठी हानी आहे. काही ठिकाणी निराळी प्रतिक्रिया व्यक्त झाली. जे जे भारतीय ते ते चांगले व जे जे पाश्चिमात्य ते ते हीन दर्जाचे असे काही भारतीय विद्वान प्रतिपादू लागले. पाश्चिमात्य लोक अंगाला रंग फासून ज्या वेळी उघडेवाघडे हिंडत होते, त्या वेळी आम्ही भारतीय ज्ञानविज्ञानाच्या सुधारणेच्या शिखरावर विराजमान होतो असे म्हणू लागले. याचा परिणाम असा झाला की, प्राचीन भारतीय वाङ्मयाचा, शास्त्रांचा निरनिराळ्या देशांतून तसेच भारतामध्येही सखोल अभ्यास होऊ लागला. सर्व शास्त्रांमध्ये भारतीयांचे अग्रेसरत्व दाखविण्याचा प्रयत्न होऊ लागला. याच वेळी पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये, विशेषतः जर्मनीमध्ये भारतीय संस्कृतीबद्दल व वाङ्मयाबद्दल नितान्त आदराची भावना वाढीला लागली. जर्मन कवी गटे, कालिदासाचे शाकुंतल वाचून इतका प्रभावित झाला की, हे नाटक डोक्यावर घेऊन तो अक्षरशः नाचू लागला. शोपेनहॉऊर उपनिषदे वाचून म्हणू लागला की, या संसारामध्ये माझ्या मनाला चिरशांती कशाने मिळाली असेल तर ती उपनिषदांनीच व शेवटी मरणकाळी जर कशाने शांती मिळणार असेल तर भारतीय उपनिषदांनीच. सुप्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञ नित्से हा भारतीय वाङ्मयाने इतका मोहित होऊन गेला की, पाश्चिमात्य वाङ्मयात दिसून येणारी तत्त्वे हा भारतीय वाङ्मयाच्या अभ्यासाचाच परिणाम आहे असे तो म्हणू लागला. प्लेटो हा मनुस्मृती अभ्यासणाऱ्या एखाद्या ब्राह्मणाचा चेला असे त्याला वाटू लागले. भारतीय वाङ्मयाची केवळ स्तुती करूनच तो थांबला नाही, तर ख्रिस्ती धर्माची व पाश्चिमात्य वाङ्मयातील उणिवांची तो निंदाही करू लागला. ख्रिस्तीधर्म म्हणजे मानवी संस्कृतीवरील कलंक होय असे त्याला वाटू लागले. या सर्वांचा परिणाम असा झाला की, भारतीय संस्कृतीची निंदानालस्ती करण्यासाठी म्हणून जे जे आले तेच तिचे पोवाडे गाऊ लागले.

पाश्चिमात्य संस्कृती ही जेते लोकांची संस्कृती म्हणून भारतामध्ये आल्याकारणाने तिच्यासंबंधी वरीलप्रमाणे विविध प्रतिक्रिया निर्माण झाल्या. काही पाश्चिमात्य लोक भारतीय संस्कृतीची निंदानालस्ती करू लागले, तर कालांतराने काही पाश्चिमात्य पंडित तिचे गोडवे गाऊ लागले. भारतीय विद्वानांमध्येही अशाच प्रकारच्या उलटसुलट प्रतिक्रिया निर्माण झाल्या. आपल्या संस्कृतीचे पुनरुज्जीवन करण्याची एक मोहीम भारतीयांमध्ये सुरू झाल्यावर आपणांतील काही उणीवा त्यांना स्पष्टपणे दिसू लागल्या. प्रचलित धर्मातील काही आचारविचार व समाजातील

काही रूढी कालबाह्य व अन्याय्य असल्याचे त्यांना दिसून आले. सामाजिक विषमता, धार्मिक रूढींचा जुलूम, आर्थिक शोषण यांमुळे बहुजन समाज सत्त्वहीन व निस्तेज झाला होता. त्यामुळे धार्मिक क्षेत्रामध्ये क्रांतिकारक बदल घडवून आणून त्या द्वारा सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे प्रयत्न याच वेळी होऊ लागले. राजा राममोहन रॉय यांनी बंगालमध्ये ब्राह्मो समाजाची स्थापना केली, तर स्वामी दयानंदसरस्वतींनी आर्यसमाजाची स्थापना केली. याच वेळी प्रार्थनासमाज व थिऑसॉफिकल संप्रदायाचा उदयही झाला. याचे प्रमुख कारण म्हणजे मिशनऱ्यांकडून हिंदुधर्मावर होत असलेले प्राश्चिमात्य संस्कृतीचे आक्रमण थोपवून धरणे हेच होते असे वाटते. आपल्या धर्मातील उणीवा दूर करून तो अधिक संपन्न व बलशाली करण्याचा तो एक प्रयत्न होय.

## आर्थिक परिस्थिती

ब्रिटिशांच्या राजकीय आक्रमणाचा परिणाम ज्याप्रमाणे भारतीयांच्या सांस्कृतिक जीवनावर झाला, त्याचप्रमाणे तो अत्यंत गंभीर स्वरूपात आर्थिक क्षेत्रातही झाला.-ब्रिटिशांच्या आगमनापर्यंत भारतीय अर्थव्यवस्था समाजातील घटकांच्या परस्परसहकार्यावर, जीवनावश्यक गरजांवर व विकेंद्रित पद्धतीच्या बळकट पायावर उभी होती. परंतु ब्रिटिशांच्या परचक्रामुळे या अर्थव्यवस्थेला जोराचा धक्का बसला. ब्रिटिशांनी भारताचा उपयोग आपल्या पक्क्या मालाच्या बाजारपेठेसाठी व कच्च्या मालाच्या खरेदीसाठी केला. ब्रिटिशांनी आपल्या उद्योग-धंद्याला तंत्रज्ञान व विज्ञान यांची जोड दिल्याकारणाने सर्व जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन त्यांच्या देशामध्ये फार मोठया प्रमाणात होऊ लागले. त्यामुळे उत्पादन-वस्तूंसाठी बाजारपेठा मुक्रर करणे त्यांना आवश्यक वाटू लागले. जगातील निर-निराळ्या वाहतुकीच्या साधनांत व मार्गातही नवनवीन शोध लागू लागले. भारताच्या बाजारपेठेत परकीय मालाची रेलचेल झाल्याकारणाने व तो माल कमी किमतीत व चांगल्या प्रतीचा मिळू लागल्याकारणाने भारतीय मालाचा उठाव होईना. त्यामुळे भारतातील कसबी कारागीर बेकार बनू लागले. त्यांना पोटा-पाण्याची विवंचना भासू लागली. उदरनिर्वाहासाठी त्यांनी खेड्याची वाट सुधारली. परिणामी शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली. उद्योगधंदे नसल्यामुळे व शेतीचेही उत्पन्न अपुरे पडू लागल्याकारणाने बहुसंख्य जनतेची उपासमार होऊ लागली. अशा परिस्थितीमध्ये ब्रिटिशांची लाचारीने हांजीहांजी करणे व मिळाल्यास चाकरी करणे ऐवढाच मार्ग आपल्यापुढे शिलक राहिला.

## शासनव्यवस्थेचे परिणाम

ब्रिटिशांची राजवट येण्यापूर्वी प्रत्येक छोटे गाव स्वतंत्र व स्वयंपूर्ण असे. भारतावर अनेक परचक्रे आली आणि गेली, तरी छोटी छोटी ग्रामराज्ये अबाधित राहिली. त्यांच्या दैनंदिन जीवनावर त्यामुळे कोणताही चिरकाल टिकणारा परिणाम झाला नाही. मात्र ब्रिटिश राज्यकर्त्यांनी आणलेल्या शासनव्यवस्थेमुळे भारतीय जीवन तळापासून ढवळून निघाले. ग्रामपंचायतीचे अधिकार अत्यंत मर्यादित झाल्यामुळे आणि वसुली व न्यायदान यांची सत्ताकेंद्रे गावाबाहेर निर्माण झाल्यामुळे पंचायती निष्प्रभ झाल्या. बलुतेदारीची परंपरागत पद्धती नष्ट झाली. गावात परस्परांवर अवलंबून रहाण्याचे कारण उरले नाही. त्यामुळे सहकार्याची भावना नष्टप्राय झाली. सामाजिक विघटनाला ही परिस्थिती कारणीभूत झाली. भावनात्मक ऐक्याला तडे गेले, भावाभावाप्रमाणे गुण्यागोविंदाने एकत्र रहाणारे समाजातील घटक परस्परांकडे शत्रुत्वाच्या दृष्टीने पाहू लागले.

## शैक्षणिक व्यवस्था

भारतामध्ये अस्तित्वात असलेली शिक्षणपद्धती व व्यवस्था ब्रिटिशांच्या आगमनानंतर हळूहळू मागे पडू लागली. भारतीयांपैकी काही निवड लोकांना पाश्चिमात्य वाङ्मय, विज्ञान व तत्त्वज्ञान यांचे ज्ञान इंग्रजी माध्यमातून देण्यास त्यांनी सुरुवात केली. त्यामुळे समाजामध्ये दोन नव्या वर्गांची भर पडली. हे शिक्षण देण्यापाठीमागचा ब्रिटिशांचा हेतू स्पष्ट होता. शरीराने भारतीय पण मनाने इंग्रजी असा एक नोकरवर्ग निर्माण करणे हा प्रमुख हेतू डोळ्यांपुढे ठेवूनच त्यांनी एकंदर शिक्षणपद्धतीची आखणी केली होती. काही लोकांना दिलेले शिक्षण आपोआप समाजाच्या खालच्या थरापर्यंत पाझरत जाईल असे त्यांना प्रथम वाटत होते. पण भारतीय समाजाच्या विशिष्ट रचनेमुळे ही अपेक्षा फोल ठरली. ज्या कोणा मूठभर लोकांना इंग्रजी विद्येचा परिचय झाला, ते पाश्चिमात्य संस्कृतीच्या दिमाखाने दिपून गेले. त्यांच्यापैकी काही स्वत्व विसरले पण काहींनी मात्र अंतर्मुख होऊन भारतीय संस्कृतीची ओळख करून घेण्याचा प्रयत्न केला. यातूनच स्वसंस्कृतीकडे पाहण्याची नवी दृष्टी प्राप्त झाली.

ब्रिटिशांच्या आक्रमणामुळे भारताच्या राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रांमध्ये क्रांतिकारक बदल घडून आले. काही बाबतीत येथील परिस्थिती इतकी दुःसह व अन्यायकारक वाटू लागली की, त्याविरुद्ध बंड करणे कोणाही विचारवंताला क्रमप्राप्त वाटू लागले. अशा परिस्थितीत स्वामी विवेकानंद, कविवर्य रवींद्रनाथ टागोर, म० गांधी यांसारखे द्रष्टे व कर्मयोगी

महात्मे निर्माण झाले व त्यांनी प्रतिकूल परिस्थितीचे आव्हान स्वीकारून भारतीय जीवन ब्रिटिशांच्या जोखडातून मुक्त करण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटिश सत्ता भारतात दृढ झाल्यानंतर भारतीय जनतेच्या शिक्षणाची व्यवस्था लावण्याची गरज राजकर्त्यांना वाटू लागली. म्हणून सन १८५४ साली ईस्ट इंडिया कंपनीचे एक अधिकारी सर चार्लस वुड यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय शिक्षणाचा विचार करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली. समितीने एक अहवाल सादर केला. त्यालाच 'वुडचा खलिता (वुड्स डिस्पॅच)' असे सुप्रसिद्ध नामाभिधान आहे. वुडने भारतीय शिक्षणासाठी खालील सूचना केल्या होत्या—

१. भारतीय जनतेला पाश्चिमात्य ज्ञानाचा लाभ करून द्यावा.

२. प्रत्येक प्रांतामध्ये शिक्षणखात्याची निर्मिती करावी व त्यावर डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन या हुद्द्याचा अधिकारी नेमावा.

३. सुशिक्षितांचा नैतिक दर्जा सुधारावा.

४. सुशिक्षितांतून कंपनी सरकारला विश्वासू नोकरवर्ग मिळावा.

५. इंग्रजीचे शिक्षण मोठ्या प्रमाणावर सुरू करावे. देशी भाषिक व प्राथमिक शाळांना आर्थिक साहाय्य द्यावे.

६. मुलींच्या शिक्षणाला उत्तेजन द्यावे.

७. भारतातील पाच प्रमुख प्रांतांमध्ये लंडन युनिव्हर्सिटीच्या धर्तीवर पाच विश्वविद्यालये स्थापन करावीत.

८. शिक्षकांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करावी.

वुडच्या खलित्यामध्ये भारतीय शिक्षणाचा भरभक्कम पाया घालणारी उत्तमोत्तम तत्त्वे ग्रथित केली असली तरी त्यांची कार्यवाही नियमाने व योग्यप्रकारे न झाल्याकारणाने भारतीय शिक्षणावर त्यांचा फारसा प्रभाव दिसून आला नाही. तत्कालीन मिशनऱ्यांना वुडचा खलिता म्हणजे आपल्या धर्मप्रसाराच्या कार्यावर प्रचंड आघात वाटू लागला. प्राथमिक शिक्षणाला किंवा मुलींच्या शिक्षणालाही ज्या प्रकारे चालना मिळावयास हवी होती ती मिळू शकली नाही. असे असले तरीही भारतीय शिक्षणाच्या इतिहासामध्ये वुडच्या खलित्याला एक अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

पुढे इ. स. १८५७ साली ब्रिटिशांविरुद्ध प्रचंड असंतोष निर्माण होऊन पहिले स्वातंत्र्ययुद्ध लढले गेले. त्यांत भारतीयांचा दुर्दैवाने पराभव झाला तरी ब्रिटिश शासनपद्धतीवर त्याचा परिणाम फारच प्रकर्षाने घडून आला. भारताचा राज्यकारभार कंपनीकडून काढला जाऊन तो ब्रिटिश सरकारने स्वतःकडे घेतला. ब्रिटिशसत्तेचे प्रतिनिधी म्हणून शासनाची परमोच्च सत्ता व्हॉइसरॉयकडे सोपविण्यात आली. न्याय, शिक्षण, व्यवसाय व धर्मस्वातंत्र्य यासंबंधीची भरघोस आश्वासने भारतीयांना मिळाली. भारतीयांच्या सामाजिक चालीरीतींमध्ये व धर्माच्या आचारविचारांमध्ये ढवळाढवळ न करण्याचे धोरण जाहीर करण्यात आले. त्यामुळे शिक्षणाकडे अधिक लक्ष पुरविण्यात आले. दर दहा वर्षांनी भारतीय जनतेच्या एकंदर परिस्थितीविषयी अहवाल तयार होऊ लागले. पुढे भारतीय जनतेमध्ये आपल्या हक्कांसंबंधी व निरनिराळ्या सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रांतील समस्यांसंबंधी जाणीव निर्माण झाल्याकारणाने व भारतीयांच्या दुःस्थितीला ब्रिटिशांची राजवट जबाबदार असल्याचे मत प्रसृत होत चालल्याकारणाने पुन्हा एकदा शिक्षणाच्या स्थितीचा विचार करण्याची जरुरी राज्यकर्त्यांना वाटू लागली. म्हणून सन १८८३ साली हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमण्यात आले. या कमिशनने शिक्षणविषयक अनेक उपयुक्त सूचना केल्या आहेत.

१. प्राथमिक शिक्षणासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्वतंत्र निधीची सोय करण्यात आली. त्या निधीचा विनियोग केवळ प्राथमिक शिक्षणासाठीच करण्याचे ठरले.

२. त्याशिवाय प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी सरकारने मदत द्यावी असेही सुचविण्यात आले.

३. माध्यमिक शिक्षणातून सरकारने आपला हात काढून घेऊन खाजगी संस्थांना हे कार्य चालविण्यासाठी भरपूर अनुदान द्यावे. मात्र प्रत्येक जिल्ह्यामध्ये किंवा ज्या ठिकाणी स्थानिक लोक पुढाकार घेणार नाहीत तेथे, शासनामार्फत एक आदर्श शाळा चालवावी.

४. उच्च माध्यमिक शाळांत व्यावसायिक शिक्षणाची सोय करावी.

५. मुलींच्या शिक्षणासाठी उत्तेजन मिळावे म्हणून मोफत शिक्षणाची सोय करावी.

६. हुशार व मागासलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या व उत्तेजन देण्यात यावे.

याच सुमारास निरनिराळ्या स्तरांवर अभ्यासक्रमही आखण्यात आले. त्याचप्रमाणे प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी अनुदानाचे नियमही ठरविण्यात आले. याचा परिणाम असा झाला की, शिक्षणामध्ये खाजगी संस्थांची फार मोठ्या प्रमाणामध्ये निर्मिती झाली. माध्यमिक व विश्वविद्यालयीन क्षेत्रांतून सरकारने आपले अंग पुष्कळ अंशी काढून घेतले. भारतातील सामाजिक व राजकीय पुढाऱ्यांनी शिक्षणाकडे मोठ्या प्रमाणावर लक्ष पुरविले. बंगालमध्ये राजा राममोहन रॉय, पंजाबात दयानंदसरस्वती, महाराष्ट्रात न्या. रानडे, डॉ भांडारकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर, प्रिं. आगरकर, लोकमान्य टिळक यांसारख्या लोकाग्रणींनी भारतीय शिक्षणाच्या कार्यास जोराने चालना दिली. सन १९०६ मध्ये कलकत्ता काँग्रेसमध्ये राष्ट्रीय शिक्षणावर भर देण्यात आला. स्वराज्यप्राप्तीच्या चतुःसूत्रीमध्ये राष्ट्रीय शिक्षणाचा समावेश करण्याइतके महत्त्व शिक्षणाला दिले पाहिजे हा विचार त्या वेळच्या नामवंत पुढाऱ्यांना पटू लागला. सन १९१५ साली पंडित मदनमोहन मालवीय यांनी बनारस येथे हिंदू विश्वविद्यालयाची स्थापना केली. मुस्लिम उच्च शिक्षणासाठी अलिगड येथे सर सय्यद अहमद यांनी विश्वविद्यालयाची स्थापना केली. स्त्रीशिक्षण व मागासलेल्या वर्गांच्या शिक्षणासाठी म. ज्योतिबा फुले, धोंडो केशव कर्वे यांनी पुढाकार घेतला. नामदार गोखले यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे, सार्वत्रिक व मोफत करण्यासाठी फार मोठे प्रयत्न केले. वरिष्ठ विधिमंडळात त्यांचा ठराव मंजूर होऊ शकला नाही, तरी सार्वत्रिक शिक्षणाची जरुरी जनतेला पटू लागली. काही खाजगी संस्थानांमध्ये शिक्षण सार्वत्रिक व मोफत करण्यात आले. सन १८३७ साली म. गांधींनी बेसिक एज्युकेशन किंवा मूलोद्योगी शिक्षणपद्धती जनतेपुढे प्रतिपादिली. त्यानुसार प्राथमिक शिक्षण ७ ते १४ वर्षे वयापर्यंतच्या मुलामुलींना सक्तीचे, सार्वत्रिक व मोफत असावे असे सुचविण्यात आले. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा करण्यात आली. प्राथमिक शिक्षण कोणत्यातरी व्यवसायद्वारा देण्यात यावे असे ठरविण्यात आले. शिक्षणाच्या आर्थिक बाजूवर कटाक्षाने लक्ष देण्यासाठी शिक्षणातून काही उत्पादन व्हावे अशीही दृष्टी ठेवण्यात आली.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले व सर्व राज्यांमध्ये लोकनियुक्त सरकारांची स्थापना झाली. महात्माजींनी पुरस्कारिलेल्या जीवनशिक्षण पद्धतीचा शासनाच्या शिक्षणविषयक धोरणामध्ये समावेश झाला. २६ जानेवारी १९५० ला भारताची घटना तयार होऊन भारताची शासनव्यवस्था लोकशाही समाजवादाच्या तत्त्वावर अधिष्ठित झाली. सामाजिक, राजकीय व आर्थिक न्याय, समता, बंधुता व व्यक्तिस्वातंत्र्य या चार तत्त्वांचा शासनव्यवस्थेत अंगीकार करण्यात आला. त्यामुळे प्रत्येक नागरिकाला व्यवसायाच्या हक्काबरोबरच शिक्षणाचीही समान संधी मिळवून देण्याचे आश्वासन देण्यात आले. भारताच्या

राज्यघटनेनुसार ४५ व्या कलमान्वये वयाच्या १४ व्या वर्षापर्यंतचे शिक्षण मोफत, सार्वत्रिक व सक्तीचे करण्यात आले. शिक्षणामध्ये धर्माचा अंतर्भाव कटाक्षाने टाळण्यात आला.

विश्वविद्यालयीन शिक्षणाची पुनर्घटना करण्यासाठी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या अध्यक्षतेखाली सन १९४८ साली विश्वविद्यालयीन शिक्षणमहामंडळाची नियुक्ती करण्यात आली. या मंडळाने उच्च शिक्षणाचा सर्वांगीण अभ्यास करून काही महत्त्वाच्या सूचना केल्या.

१. उच्च शिक्षणामुळे व्यापार, उद्योगधंदे, शासन, राजकारण व समाजकारण इत्यादी समाजोपयोगी व्यवसायांमध्ये नेतृत्व निर्माण करणारे नागरिक निर्माण व्हावेत.

२. उच्च शिक्षणामध्ये ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवसाय इत्यादी विविध प्रकार असावेत.

३. भारत हा शेतीप्रधान देश असल्यामुळे शेतीच्या उच्च शिक्षणाला अग्रक्रम मिळावा.

४. उच्च शिक्षणाच्या विकासासाठी युनिव्हर्सिटी ग्रँट कमिशनची नियुक्ती करावी.

## मुदलियार कमिशन

पुढे माध्यमिक शिक्षणाचा आढावा घेण्यासाठी व त्यामध्ये योग्य त्या दुरुस्त्या सुचविण्यासाठी २३ सप्टेंबर १९५२ रोजी डॉ. लक्ष्मणस्वामी मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली माध्यमिक शिक्षण महामंडळ नेमण्यात आले. या महामंडळाने देशातील माध्यमिक शिक्षणाचा सर्वंकष विचार करून काही मूलगामी स्वरूपाच्या सुधारणा सुचविल्या.

१. चार किंवा पाच वर्षांच्या प्राथमिक शिक्षणानंतर माध्यमिक शिक्षण सुरू व्हावे. त्यात निम्न माध्यमिक ३ वर्षे व उच्च माध्यमिक ४ वर्षांचे असावे.

२. माध्यमिक शिक्षणाचा दर्जा उच्च माध्यमिकपर्यंत वाढवावा. उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला ३ वर्षांच्या सघन विश्वविद्यालयीन अभ्यासक्रमात प्रवेश मिळावा.

३. माध्यमिक शिक्षणामध्ये तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाची सोय करून ते बहूद्देशीय व्हावे.

४. देशामध्ये स्वतंत्र तांत्रिक शिक्षणाच्या शाळा उघडण्यात येऊन तेथील शिक्षणाचा समन्वय उद्योगधंद्यांशी साधावा.

५. माध्यमिक शिक्षणामध्ये मातृभाषा हेच शिक्षणाचे माध्यम असावे.

६. निम्न माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्याला मातृभाषा व इंग्लिश अगर हिंदी अशा दोन भाषा शिकवाव्यात. उच्च माध्यमिक शिक्षणामध्येही दोन भाषांमध्ये मातृभाषेचा समावेश असावा.

७. अभ्यासक्रमामध्ये भाषा, सामाजिक अध्ययन, सामान्यविज्ञान, गणित, कला, हस्तोद्योग व शारीरिक शिक्षण या विषयांचा समावेश असावा. या शिक्षणमंडळाने परीक्षा-पद्धतीतही काही मूलगामी बदल सुचविले. प्रचलित परीक्षापद्धती वस्तुनिष्ठ कशी होईल व त्यातील व्यक्तिनिष्ठता कशी जाईल, याचाही विचार करण्यात आला. शिक्षकांच्या सेवांतर्गत व अन्य प्रकारच्या शिक्षणावरही विशेष भर देण्याचे सुचविण्यात आले. शिक्षकांच्या प्रशिक्षणाशिवाय शिक्षणाची गुणवत्ता सुधारणार नाही असे आग्रहाने प्रतिपादण्यात आले. मंडळाने केलेल्या शिफारशींचा भारतातील माध्यमिक शिक्षणावर फार दूरगामी परिणाम झाला.

मध्यंतरीच्या काळामध्ये विशेषतः स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारतातील सर्व स्तरांवरील शिक्षणाचा प्रसार फारच झपाट्याने होत होता. तथापि या शिक्षणामध्ये ग्रामीण समस्यांचा व ग्रामविकास योजनांचा विचार करण्यात आला नव्हता. भारताची बहुसंख्य जनता ग्रामीण विभागात रहात असल्याकारणाने तिच्या विकासास योग्य असे शिक्षण देणे इष्ट वाटल्यावरून ग्रामीण शिक्षणाचा विचार करण्यासाठी सन १९५४ साली एक महामंडळ नेमण्यात आले. त्या मंडळाने ग्रामीण शिक्षणाची व्यवस्था, अभ्यासक्रम व पद्धती यांसारख्या प्रश्नांचा विचार केला. मंडळाने केलेल्या सूचनांमध्ये खालील सूचनांचा समावेश आहे.

१. उच्च ग्रामीण शिक्षणामध्ये तीन वर्षांचा पदविका अभ्यासक्रम व दोन वर्षांच्या प्रशस्तिपत्र अभ्यासक्रमांचा समावेश असावा.

२. ग्रामभारतीच्या अभ्यासक्रमात ग्रामीण विभागाच्या समस्यांचा विशेष विचार व्हावा.

३. अभ्यासक्रमामध्ये शेती, समाजशिक्षण, गृहव्यवस्था, आरोग्य या विषयांचा समावेश असावा.

४. ग्रामीण प्रश्नांच्या संशोधनावर व सेवाकार्यावर विशेष भर देण्यात यावा.

५. शासनाला सल्ला देण्यासाठी राष्ट्रीय ग्रामशिक्षण समितीची नियुक्ती करावी. ग्रामभारतीचा विकास होऊन त्यांची परिणती स्वतंत्र विद्यापीठात व्हावी.

विद्यार्थ्यांच्या चारित्र्यसंवर्धनासाठी नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाचा विचार करण्यासाठी डॉ. श्रीप्रकाश यांच्या अध्यक्षतेखाली सन १९५९ साली नीति-शिक्षण मंडळ नेमण्यात आले. त्या मंडळाने देशातील शिक्षणाच्या निरनिराळ्या स्तरांवर देण्यात येणाऱ्या नीतिशिक्षणाचा अभ्यास करून अशा प्रकारचे शिक्षण परिणामकारक होण्याच्या दृष्टीने काही सूचना केल्या. शिक्षणामध्ये सर्व धर्मांतील समान तत्त्वांचा अभ्यास करण्यावर त्यांनी भर दिला.

याच सुमारास मे १९५८ ला स्त्रीशिक्षणाचा विचार करण्यासाठी सौ. दुर्गाबाई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. या समितीने स्त्रीशिक्षणाच्या समस्यांचा विचार करून आपला अहवाल जानेवारी १९५९ रोजी केंद्रसरकारला सादर केला. अहवालात केलेल्या सूचनांच्या आधारे केंद्रपातळीवर राष्ट्रीय स्त्री-शिक्षणमंडळाची नियुक्ती करण्यात आली. या मंडळाने मध्यवर्ती शिक्षण-मंत्रालयास स्त्रीशिक्षणविषयक प्रश्नांवर सल्ला द्यावा अशी अपेक्षा आहे. निरनिराळ्या राज्यांमध्येही स्त्री-शिक्षणमंडळाची स्थापना करण्यात आली. काही राज्यांत स्त्री-शिक्षणाचा विशेष विचार करण्यासाठी शिक्षण-उपसंचालकाच्या जागेवर स्त्री-शिक्षण-अधिकाऱ्याची खास नियुक्ती करण्यात आली. पंचवार्षिक योजनांमध्ये स्त्रीशिक्षणा-करिता विशेष निधी राखून ठेवण्याचे ठरले.

आतापर्यंत शिक्षणाचा विचार करण्यासाठी ज्या समित्या किंवा मंडळे नेमण्यात आली, त्यांनी शिक्षणाच्या काही विशेष अंगांचाच विचार केला होता. म्हणून शिक्षणाचा सर्वंकष व सर्वांगीण विचार करण्यासाठी सन १९६४ साली डॉ. डी. एस्. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण-महामंडळाची नियुक्ती करण्यात आली. या महामंडळात अमेरिका, इंग्लंड, रशिया, जपान यांसारख्या प्रगत राष्ट्रांतील शिक्षणतज्ज्ञांचाही समावेश करण्यात आला होता. त्यांनी सुचविलेल्या शिफारशी भारताच्या शैक्षणिक इतिहासात अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जातात.

भारताचे भवितव्य शिक्षणसंस्थांच्या वर्गांमधून घडत आहे आणि यासाठीच शिक्षणाला अत्यंत महत्त्व आहे असे त्यांनी प्रतिपादिले आहे. महामंडळाने भारताच्या वैशिष्ट्यपूर्ण समस्यांचा अभ्यास करून शिक्षणाची उद्दिष्टे निश्चित केली आहेत. त्यामध्ये— ( १ ) शिक्षण व उत्पादनक्षमता यांचा समन्वय साधणे, ( २ ) भावनात्मक एकात्मता निर्माण करणे. ( ३ ) जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये आधुनिकीकरण करणे व ( ४ ) भारतीय नैतिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक मूल्यांची जोपासना करणे यावर भर देण्यात आला आहे. या शिक्षणमहामंडळाने शिक्षणाच्या विविध स्तरांवरील अभ्यासक्रम, शिक्षणपद्धती, शिक्षक-प्रशिक्षण, शैक्षणिक शासनव्यवस्था, शैक्षणिक गुणवत्ता यासंबंधी अनेक मूलगामी स्वरूपाच्या सूचना केल्या आहेत. शिक्षणाचे माध्यम, भाषेचा प्रश्न, विद्यार्थ्यांतील गुणवत्तेचा शोध, बुद्धिमान मुलांची निवड व त्यांच्या शिक्षणाची खास सोय, मूल्यमापन, परीक्षापद्धतीतील सुधारणा, शिक्षकांचे वेतन यासंबंधी महत्त्वाचा विचार मांडला आहे. शिक्षण हा घटनेप्रमाणे राज्याचा विषय असल्याकारणाने निरनिराळ्या राज्यांमधील शिक्षणात भिन्नता दिसून येते. त्यात एकसूत्रीपणा आणून राष्ट्रीय एकता निर्माण करण्यास या मंडळाने मोलाचे साहाय्य केले आहे. या सूचनांचा प्रभाव भावी शिक्षणपद्धतीवर पडणे अपरिहार्य आहे. सर्व देशाचा विचार करून व शैक्षणिक प्रश्नांच्या सर्वांगीण अभ्यासावर आधारलेली शिक्षणाच्या इतिहासातील ही पहिलीच राष्ट्रीय शिक्षण-योजना होय.

◆ ◆ ◆

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्रं. नं. ८४३

# स्वामी दयानंद

| | |
|---|---|
| जन्म | १८२४ |
| मृत्यू | १८८३ |

स्वामी दयानंदांचा जन्म १८२४ मध्ये गुजराथेतील काठेवाड संस्थानातील मोरवी येथे झाला. त्यांचे नाव मूलजी असे होते. त्यांना मूळशंकर असेही म्हणत असत. त्यांचे वडील कृष्णाजी हे अत्यंत कर्मठ ब्राह्मण असून शिवाचे परम उपासक होते. मूळशंकर यांची मुंज त्यांच्या वयाच्या आठव्या वर्षी झाली. मात्र त्यांच्या संस्कृत अध्ययनाची सुरुवात वयाच्या पाचव्या वर्षीच झाली. त्यांची स्मरणशक्ती अत्यंत तीव्र होती. वेदामधील कित्येक भाग आणि पाणिनीचे संस्कृत व्याकरण वयाच्या चौदाव्या वर्षीच त्यांनी पाठ केले होते. मूळशंकर चौदा वर्षांचे असताना त्यांच्या आयुष्याला संपूर्णपणे कलाटणी देणारा एक प्रसंग घडून आला. एके दिवशी शिवमंदिरात ते गेले असता शिवाच्या लिंगावर उंदीर खेळत असल्याचे दृश्य त्यांनी पाहिले. त्या दृश्याचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला. सर्वशक्तिमान शिवलिंगास उंदीर स्पर्श तरी कसे करू शकतात, हे त्यांना समजेना. त्यांनी येऊन वडिलांना यासंबंधी प्रश्न विचारले. पण वडीलही त्या घटनेचे यथोचित स्पष्टीकरण करू शकले नाहीत. मूळशंकरने परमेश्वरस्वरूपाविषयी मनामध्ये जोपासलेल्या कल्पनांना या घटनेमुळे जबर धक्का मिळाला. ते मूर्तिपूजेचे कट्टर

विरोधक बनले. त्यांनी स्थापन केलेल्या आर्य समाज पंथाच्याद्वारा आजपर्यंत हिंदू समाजाने पवित्र म्हणून अंधश्रद्धेने जपलेल्या कितीतरी भावनांना आणि आचारांना आव्हान मिळाले.

मूळशंकराच्या बालपणीच त्यांच्या आवडत्या भगिनीचे आणि चुलत्यांचे निधन झाले. ही घटना त्यांच्या मनास फारच लागली. दुःखातून पार पडण्यासाठी त्यांचे मन योगाभ्यासाकडे वळले. त्यांनी या साधनेत कमालीचे यश मिळवून प्रत्यक्ष मृत्यूवरही मात केली. मूळशंकरांचा स्वाभाविक कल पाहून त्यांच्या आई-वडिलांना काहीशी चिंता वाटू लागली. त्यांचे मन संसाराकडे वळविण्याचा एक उपाय म्हणून त्यांनी त्यांचे लग्न लावून द्यावयाचे ठरविले आणि त्याप्रमाणे सर्व तयारीही केली. पण समर्थ रामदासस्वामींप्रमाणेच मूळशंकर लग्नाआधी घरातून पळून गेले आणि त्यांनी संन्यासाची दीक्षा घेतली. संन्यासी मूळशंकर स्वामी दयानंद बनले !

स्वामी दयानंदांना सत्याचा ध्यास लागला होता. त्याचा शोध घेण्यात ते १५ वर्षांपेक्षाही अधिक काळपर्यंत ठिकठिकाणी भटकत राहिले. या कालामध्ये योगाचा आणि वेदांताचा त्यांनी कसून आणि अत्यंत तळमळीने अभ्यास केला. पण त्यांचे अंतःकरण अतृप्तच राहिले. खऱ्या परमेश्वराचे दर्शन झाले आहे असा काही केल्या मनास अनुभव येईना. शेवटी मथुरा येथील विराजनंद येथे त्यांची एका समर्थ गुरूंशी गाठ पडली. यांनी स्वामी दयानंदांना जन्माचे कारण काय आणि कोणते कार्य अंगीकृत केले पाहिजे, यासंबंधी दिव्य उपदेश दिला. स्वामी दयानंदांचे चित्त त्यामुळे शांत झाले. त्यांना आपल्या आयुष्याचे उद्दिष्ट आणि ते गाठण्याचा मार्ग स्वच्छ दिसू लागला. पुराणकाळात हिंदुधर्मात घुसडविण्यात आलेल्या अनेक भाकड कल्पना, रूढी व श्रद्धा यांचा उच्छेद करून समाजाचे मन पुन्हा सनातन, शुद्ध वैदिक धर्माकडे वळविणे हेच आपले जीवनकार्य याबद्दल त्यांच्या मनात शंका राहिली नाही.

१८६३ साली आपल्या गुरूंचा आशीर्वाद घेऊन ते उत्तरेकडे निघाले. तेथील विविध ठिकाणांना भेटी देऊन ते बंगाल्यात येऊन पोहोचले. या ठिकाणी त्यांची ब्राह्मोसमाजवादी विद्वानांशी ओळख झाली. महर्षी देवेंद्रनाथ टागोर आणि केशवचंद्र सेन यांच्याबरोबर त्यांनी खूप चर्चा केली. पण त्यांच्या मनावर ब्राह्मो-समाजाच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडला नाही. पुढे त्यांनी आपला मोर्चा मुंबईकडे वळविला. केशवचंद्रांच्या सल्ल्यानुसार आता त्यांनी आपले विचार लोकांपुढे मांडण्यासाठी, संस्कृतऐवजी हिंदी भाषेचा वापर करण्यास सुरुवात केली. त्याचा एक दृश्य फायदा असा झाला की, बहुसंख्य सामान्य लोकांपर्यंत त्यांना आपले

विचार पोहोचविता आले. थोड्या अवधीतच दयानंदांच्या विचारांनी जनमानसाची पकड घेतली. १० एप्रिल १८७५ रोजी मुंबई येथे दयानंदांनी आर्यसमाज या पंथाची स्थापना करून आपल्या कार्याला आणि तत्त्वप्रणालीला निश्चित स्वरूप दिले. यापुढील सर्व काळ त्यांनी आपल्या पंथाच्या विविध शाखा ठिकठिकाणी उघडण्यात आणि आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रचार करण्यात घालविला. या कार्या-बरोबरच वेदांचे हिंदीमध्ये भाषांतर करण्याचे आणि ऋग्वेदावर हिंदीमध्ये टीका लिहिण्याचे महान् कार्यही या काळातच त्यांनी पुरे केले.

कर्नल ऑलकॉट आणि मादाम ब्लावाटस्की यांनी १८७८ मध्ये थिऑ-सॉफिस्ट सोसायटी आणि आर्यसमाज या दोघांचे एकत्रीकरण व्हावे असा एक प्रस्ताव मांडला. या पंथांच्या पुढाऱ्यांनी अनेक वेळा एकत्र येऊन चर्चा केली, समन्वयाचा मार्ग निघू शकतो का यावर विचार केला. पण शेवटी १८८१ मध्ये दोघांनीही स्वतंत्र राहण्याचाच मार्ग निश्चित केला. ३० आक्टोबर १८८३ साली स्वामी दयानंद अजमीर येथे वयाच्या एकोणसाठाव्या वर्षी स्वर्गवासी झाले.

## जीवनाचे तत्त्वज्ञान

परमेश्वर हा सर्व विश्वात भरून राहिलेला असून सच्चिदानंद हे त्याचे स्वरूप आहे. तो निर्गुण, निराकार आणि अमर्याद आहे. या विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि लय यांस तोच कारणीभूत आहे.

"He gives to all souls the fruit of their deeds according to absolute justice."

आत्मा हा अमर असून सनातन आहे. ज्ञानप्राप्तीची त्याची शक्ती मर्यादित स्वरूपाची आहे. सुखदुःखाच्या भावनेचा अनुभव घेण्याची जाणीव त्याला असते.

परमेश्वर आणि आत्मा या दोन भिन्न गोष्टी आहेत. त्यांच्यामध्ये समान आणि असमान असे गुणधर्म दिसून येतात. त्या दोघांना परस्परांपासून स्वतंत्र करता येणे शक्य नाही. कारण त्यांचे नाते (Pervader and Pervaded) व्यापक व व्याप्त याप्रमाणे आहे. (Prakriti is the material cause of the universe.) विश्वाच्या भौतिक पसाऱ्याचे मूळ कारण प्रकृती हे आहे.

"According to the yoga philosophy, Swami Dayananda believes that God, the Soul and Prakriti are Anadi–beginning–less. They and their attributes are eternal. The creation of the

universe is the natural exercise of the creative energy of God. Due to ignorance the Soul is in bondage in this world."

सर्व पापांचे मूळ या अज्ञानातच आहे. या अज्ञानामुळेच व्यक्तीचे मन सत्यापासून ढळते आणि त्याच्या हातून पुष्कळशा अयोग्य कृती होतात. प्रत्यक्ष परमेश्वराची पूजा करावयाचे सोडून तो निर्जीव अशा मूर्तिपूजेत रमतो.

" Salvation lies in the imancipation of the Soul from pain and suffering, and the enjoyment of extreme happiness. To him the enjoyment of material happiness is Svarga ( Heaven ) and Naraka ( Hell ) is the undergoing of sufferings."

स्वामी दयानंदांच्या मते स्वर्ग आणि नरक हे पुराणात वर्णन केल्याप्रमाणे स्वतंत्र लोक नसून ते पृथ्वीवरच आहेत.

स्वामी दयानंदांचे तत्त्वज्ञान पवित्र अशा चार वेदांवरच उभारलेले आहे. वेद हे अपौरुषेय आहेत असे स्वामींचे मन होते. वेदांशिवाय इतर कोणत्याही दुय्यम स्वरूपाच्या तत्त्वज्ञानास प्रमाण मानण्यास ते तयार नाहीत. षड्दर्शने, उपनिषदें, अकराशे सत्तावीस शास्त्रे यांना ते दुय्यम स्वरूपाचे समजतात.

आचार, विचार व कर्म यांमध्ये सत्यनिष्ठा बाणवतो तोच धर्म. परमेश्वर-पूजा, सत्कर्म, ब्रह्मचर्य यांचे व्रत आचरून ज्ञानोपासना आणि सत्संग, हे मुक्ती मिळविण्याचे विविध मार्ग आहेत. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात एकंदर सोळा संस्कार झाले पाहिजेत. त्यांतूनच व्यक्तीचा शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक विकास होतो. मृत व्यक्तींसाठी कोणतेही संस्कार करण्याची गरज नाही.

## शिक्षणविषयक तत्त्वज्ञान

स्वामी दयानंदांचे तत्त्वज्ञान हे वैदिक तत्त्वज्ञानापेक्षा भिन्न नाही. मात्र चालू परिस्थितीच्या संदर्भात त्या सनातन तत्त्वज्ञानाचा अर्थ कसा लावता येईल याचा मात्र त्यांनी स्वतःच्या प्रज्ञेनुसार विचार केलेला आहे. साहजिकच समाजामध्ये अपेक्षित बदल घडवून आणण्यासाठी त्याला त्यानुसार शिक्षण देणे आवश्यक आहे, असे त्यांना वाटणे स्वाभाविकच होते. त्यांच्या शिक्षणविषयक कल्पनांवर तपोवनातील गुरुगृहवास, गुरुसान्निध्य इत्यादी कल्पनांचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

व्यक्तीला अगदी बालवयापासून शिक्षण मिळाले पाहिजे असे त्यांचे मत होते. मुलाच्या शिक्षणाची सुरवात त्याच्या मातेकडूनच झाली पाहिजे. मुलाला

कोणतीही वाईट सवय लागणार नाही याविषयी तिनेच संतत जागृत राहिले पाहिजे. बाळाच्या बोबड्या बोलातून त्याला योग्य उच्चार शिकविण्याची जबाबदारी तिच्यावर आहे. आवाजातील मार्दवता, स्निग्धता, आर्जव, आदर या गोष्टी तिनेच त्याच्यात विकसित केल्या पाहिजेत. आपल्यापेक्षा वडिलधाऱ्या मंडळींना मान देण्यास तिनेच शिकविले पाहिजे. ज्ञानासक्ती, सहजीवन व संयमन या गोष्टींचे धडे पालकांनी लहानपणापासूनच देण्यास नेहमी दक्ष राहिले पाहिजे.

अकारण हसणे, खिदळणे, दंगा-धुडगूस घालणे, मुसमुसून रडणे या गोष्टींपासून मुलांना परावृत्त करावे. सुखदुःखाने बेहोश करणारे प्रसंग शक्यतो टाळावेत. सत्यनिष्ठा, शौर्य, सहिष्णुता, प्रसन्नता इत्यादी गुण लहानपणापासूनच विकसित झाले पाहिजेत. वयाच्या पाचव्या वर्षापासून संस्कृत व मातृभाषा या-व्यतिरिक्त दुसऱ्या भाषांचाही परिचय करून देण्यास सुरुवात करावी. वेदांतील गद्य आणि पद्य भाग पाठ करण्यासाठी या वयात प्रोत्साहन द्यावे. मात्र उतारे निवडताना त्यांतून मुलांच्या अंगी सद्‌गुणांची जोपासना सहजच होईल अशी दृष्टी ठेवावी. मुलांच्या मनामध्ये अंधश्रद्धा निर्माण होणार नाहीत, याबद्दल दक्ष असावे.

ज्या ठिकाणी निष्कलंक चारित्र्यविभूषित असलेली विद्वान मंडळी, शिक्षक म्हणून नेमलेली असतील अशा ठिकाणी मुलांना वयाच्या आठव्या वर्षी विद्यार्जना-साठी पाठवावे. मुलामुलींना एकत्रपणे शिक्षण देण्याच्या मताशी स्वामीजी बिलकूल सहमत नाहीत. मुलांची शाळा मुलींच्या शाळेपासून कमीत कमी सहा मैल तरी दूर असावी असे ते म्हणतात. मुलांच्या शाळेतील शिक्षकमंडळी व इतर सेवकवर्ग हे पुरुष असावेत व मुलींच्या शाळेत यासाठी स्त्रिया असाव्यात. विद्यार्थिदशेत मुलां-मुलींनी कडक ब्रह्मचर्य पाळले पाहिजे. इतकेच नव्हे तर शिक्षकांनीही त्याचे पालन केले पाहिजे. कारण त्याशिवाय जरूर ते ज्ञान संपादन करणे व आदर्श शिक्षक बनणे या गोष्टी त्यांना जमणार नाहीत. कपडे, अन्न वगैरेंच्या बाबतींत सर्व विद्यार्थ्यांना समान वागणूक मिळाली पाहिजे. साधी रहाणी आणि उच्च विचारसरणी हेच त्यांचे ध्येयवाक्य असले पाहिजे. शारीरिक ऐशआरामाच्या पाठीमागे न लागता ज्ञानाचा आणि संस्कृतीचा अभ्यास करण्यात त्यांनी धन्यता मानली पाहिजे. विद्यार्थिकाळामध्ये मुलांना आपल्या आई-वडिलांची भेट घेण्याची परवानगी असू नये. भौतिक काळज्या आणि विवंचना यांपासून त्यांनी या काळात मुक्त असावे.

स्वामी दयानंदांच्या मते मुलाचा पहिला मौंजीबंधनसंस्कार घरी व्हावा आणि दुसरा शाळेत. पालक आणि शिक्षक यांनी मुलांना गायत्रीमंत्र शिकवावा.

मंत्र शिकल्यानंतर संध्योपासना शिकवावी. त्यासाठी आचमन, प्राणायाम याही गोष्टींची माहिती द्यावी. मनाची एकाग्रता होण्यासाठी संध्योपासना ही एकान्तस्थलीच केली पाहिजे.

आपला आहार, पोशाख इत्यादींबद्दलची सर्व माहिती शिक्षकांनीच विद्यार्थ्यांना दिली पाहिजे. शिवाय आपल्यापेक्षा मोठ्या आणि आपल्यापेक्षा छोट्या मंडळींशी कसे वागावे याची शिकवणही शिक्षकांनीच त्यांना दिली पाहिजे.

मुलांनी रोज 'देवयजन' म्हणजेच अग्नीला साजूक तुपाची म्हणजे आज्याची आहुती देऊन शुद्धता निर्माण केली पाहिजे.

खऱ्या धर्माचे ज्ञान होण्यासाठी संपत्तिपराङ्मुख राहून प्रसन्नचित्त राहण्याची वृत्ती शिक्षकांनी मुलांमध्ये निर्माण केली पाहिजे. शिक्षण हे केवळ ब्राह्मण जमातीपुरते मर्यादित न ठेवता ते सर्व जमातीसाठी मुक्त ठेवले पाहिजे.

दिलेले शिक्षण योग्य आहे किंवा नाही हे पडताळून पहाण्यासाठी खालील निकषांवर ते घासून पहावे.

१. वेदप्रामाण्य

२. प्रकृतीचे नियम ( Laws of Nature ) निसर्गनियमानुबंधी.

३. The practice and teaching of Aptas i. e. the pious and learned men. आप्तवाक्यप्रामाण्य.

४. आत्मशुद्धी, आत्मौपम्य.

जे आपल्याला चांगले ते जगालाही चांगले; जे आपल्याला दुःखदायक ते दुसऱ्यांनाही दुःखदायक अशी आपल्या विचारांची धारणा हवी व त्यानुसार इतरांशी वागतानाची वर्तणूक हवी.

५. [ १ ] प्रत्यक्ष, [ २ ] अनुमान, [ ३ ] उपमा, [ ४ ] अनुभव, [ ५ ] ऐतिहासिक, [ ६ ] तर्क, [ ७ ] शक्यता, [ ८ ] असत्.

आपण मुलांना जे शिकवितो ते सर्व वरील निकषांवर शिक्षकांनी काळजीपूर्वक तपासून पहावे. त्याप्रमाणे कोणत्याही ज्ञानाचा स्वीकार करताना विद्यार्थ्यांनीही हे पाच निकष लावून पहावेत. एरवी शिक्षण म्हणजे केवळ घोकंपट्टी ठरेल.

## अभ्यासक्रमाची रूपरेखा

१. विद्यार्थ्यांना सर्वप्रथम पाणिनीचे उच्चारण शिकवावे. अक्षरांचा योग्य उच्चार कसा करावा, हे शिकविण्याची जबाबदारी पालक व शिक्षक या दोघांचीही आहे.

२. उच्चारानंतर ( Phonetics ) अष्टाध्यायी, धातुपाठ, उणादिकोष ( Book of Prefixes and Tuffixes ) महाभाष्य हा व्याकरणाचा भाग शिकवावा. व्याकरणाचा भाग तीन वर्षांत पूर्ण करावा.

३. यास्काचे निघंटू आणि निरुक्त हे ग्रंथ शिकवावेत. यासाठी सहा ते आठ महिन्यांपेक्षा अधिक काळ लागू नये.

४. छंदःशास्त्र ( Prosody ) हा पिंगलांचा ग्रंथ शिकवावा. यामुळे काव्य शिकण्यासाठीचे नियम माहीत होतील. या ग्रंथाचा अभ्यास चार महिन्यांत पूर्ण करावा.

५. मुलांना मनुस्मृती, वाल्मीकी रामायण, विदुरनीती, महाभारतातील वेचे हा भाग शिकवावा. त्यामुळे मुलांच्या वाईट सवयी नाहीशा होऊन ती अधिक सुसंस्कृत होतील. हा अभ्यासक्रम एका वर्षात पूर्ण करावा.

६. विद्यार्थ्यांना सहा शास्त्रे शिकवावीत. मात्र वेदान्तशास्त्राचा अभ्यास करण्यापूर्वी दहा उपनिषदांचा अभ्यास होणे जरूर आहे. हा सर्व अभ्यास दोन वर्षांत पूर्ण करावयाचा आहे.

७. विद्यार्थ्यांनी चारी वेदांचा चारी ब्राह्मणांसहित अभ्यास करायचा आहे. उच्चार आणि अर्थ यांकडे विशेष लक्ष पुरविले गेले पाहिजे. वेदांचा तात्त्विक अर्थ आणि त्याचा व्यावहारिक अर्थ यांवर सखोल चर्चा झाली पाहिजे. हा अभ्यासक्रम सहा वर्षांत पूर्ण करावयाचा आहे.

८. यानंतर विद्यार्थ्यांनी चार उपवेदांचा अभ्यास करायचा आहे. आयुर्वेद, धनुर्वेद, गंधर्ववेद, अथर्ववेद असे ते चार उपवेद आहेत.

वर सुचविलेल्या अभ्यासक्रमातून बाहेर पडणारा विद्यार्थी हा पूर्ण विकसित असेल व आपल्या देशाचे वैभव व प्रतिष्ठा वाढविण्यास तो निश्चितपणे हातभार लावू शकेल अशी स्वामी दयानंदांची श्रद्धा होती.

## स्त्रीशिक्षण

पुरुषाप्रमाणेच स्त्रियांनाही शिक्षण दिले पाहिजे असे स्वामी दयानंदांचे ठाम मत होते. वैदिक धर्मातील कोणत्याही पवित्र ग्रंथात स्त्रियांना शिक्षण देऊ नये

असा उल्लेख नाही. उलट वेदकाळी स्त्रिया या विद्याविभूषित असल्याचा उल्लेख वेदांमधून ठिकठिकाणी आढळतो. दयानंदांच्या मते स्त्री-पुरुषांना शिक्षण घेण्याचा सारखाच अधिकार आहे. मात्र त्यासाठी दोघांनीही ब्रह्मचर्यव्रताचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. राजकारण, न्यायदान वगैरे गोष्टींसाठीच नव्हे, तर गृहस्थधर्माची कर्तव्ये चोख तऱ्हेने पार पाडण्यासाठीही शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. सर्व स्त्रियांनी सारख्याच तऱ्हेचे शिक्षण घेण्याऐवजी ब्राह्मण व क्षत्रिय स्त्रियांनी सर्व प्रकारचे ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करावा. मात्र वैश्य स्त्रियांनी व्यापारउदीम व यंत्रशास्त्रात प्रावीण्य मिळवावे, आणि शूद्र स्त्रियांनी स्वयंपाककलेत प्रभुत्व संपादन करावे असे त्यांचे मत होते. आपल्या कौटुंबिक गरजा पार पाडता येण्यासाठी प्रत्येक स्त्रीस काही कमीत कमी ज्ञानाची व कौशल्याची गरज आहे. आपला पती आणि कुटुंबातील इतर मंडळी यांच्याशी कसे वागावे, मुलांचे संगोपन कसे करावे, किरकोळ दुखण्यांवर कोणते औषधोपचार करावेत, कौटुंबिक समस्यांतून मार्ग कसा काढावा इत्यादी गोष्टींचे ज्ञान प्रत्येक स्त्रीस असणे आवश्यक आहे.

स्वामी दयानंदांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा अंगीकार करून शैक्षणिक कार्य करीत असलेल्या काही शैक्षणिक संस्था—

## हरिद्वार आणि वृंदावन गुरुकुल

हरिद्वारजवळील कांगरी गुरुकुल आणि मथुरेजवळील वृंदावन गुरुकुल या भारतामधील अत्यंत सुप्रसिद्ध अशा शैक्षणिक संस्था आहेत. स्वामी दयानंदांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान प्रत्यक्षात आणण्याचे कार्य या संस्थांमार्फत गेली कित्येक वर्षे सुरू आहे. वैदिक धर्माला अभिप्रेत असलेल्या ब्रह्मचर्याचे पालन करून वैदिक तत्त्वज्ञानाचा व संस्कृतीचा अभ्यास अत्यंत निष्ठापूर्वक करण्याचा प्रयत्न येथे केला जातो. या संस्थांची उभारणी आश्रमपद्धतीवर करण्यात आलेली आहे. सर्व विद्यार्थी गुरूंच्या समवेत वसतिगृहात रहातात. गुरुकुलाची जागा अत्यंत रमणीय व निसर्गसौंदर्याने समृद्ध अशीच आहे. नागरी जीवनापासून दूर असलेल्या या निसर्गरम्य परिसरात नीरव शांतता, पावित्र्य आणि उल्हसित जीवन यांचा अनुभव नेहमीच येतो. मात्र डोळ्यांपुढे ठेवलेले उद्दिष्ट कितपत साध्य होत असेल याची शंका डोकावून जाते.

या संस्थांमधून वय वर्षे सहा ते आठ या वयोगटातील मुलांना प्रवेश देण्यात येतो. त्यांना एकंदर १४ वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो. अभ्यासक्रमाच्या विविध शाखा असून विद्यार्थी आपल्या आवडीप्रमाणे कोणतीही

शाखा निवडू शकतो. शिक्षणाचे माध्यम हिंदी भाषा आहे. भारतीय संस्कृती आणि संस्कृत हे विषय शिकविण्याकडे विशेष लक्ष पुरविले जाते. या संस्था सह-शिक्षणाला कसून विरोध करतात. प्रत्येक विद्यार्थ्याला कमीत कमी चोवीस वर्षे वयापर्यंत ब्रह्मचर्यव्रताचे पालन करीन अशी शपथ घ्यावी लागते. विद्यार्थ्यांना मांसाहार वर्ज्य मानला आहे.

बदलत्या परिस्थितीनुरूप गुरुकुलांमध्ये आता बरेच आधुनिकीकरण करण्याचा प्रयत्न होत आहे. शास्त्रांचे व कलांचे विविध अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. मात्र स्वामी दयानंदांच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव या संस्थांच्या इतका रोमरोमी भरून राहिला आहे की, तेथे प्रवेश करणाऱ्या कोणाही व्यक्तीला त्याचा प्रत्यय आल्यावाचून रहात नाही. ही गुरुकुले स्वतःला विश्वविद्यालयाच्या दर्जाची मानतात व त्यानुसार त्यांचा कारभार चालू असतो.

## डेहराडून, बडोदा आणि सासनी कन्या-गुरुकुल

डेहराडून येथील कन्या-गुरुकुल, बडोद्याचे आर्यकन्या महाविद्यालय आणि सासनी ( अलिगड ) येथील कन्या-महाविद्यालय या केवळ मुलींसाठी असलेल्या गुरुकुलांचा उल्लेख करणेही आवश्यक आहे. स्वामी दयानंदांच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव या तीनही संस्थांवर स्पष्ट जाणवतो. या संस्थांत शिक्षण घेणाऱ्या मुलींना ब्रह्मचर्याचे काटेकोर पालन करावे लागते, आणि वयाच्या सोळाव्या वर्षापर्यंत त्यांना लग्न करता येत नाही. स्त्रियांच्या गरजा लक्षात घेऊन येथे मुलींना शिक्षण दिले जाते. बडोद्याच्या आर्यकन्या महाविद्यालयात शारीरिक शिक्षणावर विशेष भर दिला जातो.

## इतर संस्था

उत्तर हिंदुस्थानामध्ये दयानंदांचे नाव धारण करून बऱ्याच शैक्षणिक संस्था उच्च व दुय्यम स्तरांवरील शिक्षणदानाचे कार्य करीत आहेत. या सर्व संस्थांमधून दयानंदांना अभिप्रेत असलेल्या सर्व शैक्षणिक तत्त्वांचे पालन केले जात आहे असे म्हणता येणार नाही. मात्र आपण स्वामी दयानंदांची काही तत्त्वे आचरणात आणतो, असा या संस्थांचा दावा असतो. शाळेची व विद्यालयाच्या कार्याची सुरवात होताना प्रार्थना म्हणणे, काही विशेष प्रसंगी धार्मिक वाचन करणे, सांस्कृतिक कार्यक्रम घडवून आणणे इत्यादी गोष्टींचा अवलंब या संस्थांमधून झाल्याचा दिसतो. मात्र एकंदर कार्यावर व अभ्यासक्रमावर पाश्चिमात्य शिक्षण-पद्धतीची छापच अधिक जाणवते.

# गुरुदेव रवींद्रनाथ टागोर

| | |
|---|---|
| जन्म | १८६२ |
| मृत्यू | १९४१ |

भारतामध्ये जे थोडे जागतिक कीर्तीचे लोकोत्तर पुरुष होऊन गेले त्यांमध्ये गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांचे नाव अग्रगण्य मानण्यात येते. पारतंत्र्यामध्ये भारताची सर्व बाजूंनी अधोगती होत असताना आपल्या देशाची अस्मिता कायम राखण्यासाठी व भारतीयांची प्रतिष्ठा जगामध्ये उंचावण्यासाठी गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांचे प्रयत्न पुष्कळ अंशी कारणीभूत झाले. गुरुदेवांचे वाङ्मय, त्यांचे तत्त्वज्ञान व शिक्षणविषयक विचार यामुळे जगातील विचारवंतांना एक अलौकिक शांतीचा व ऐक्याचा संदेश मिळाला. त्यांच्या गीतांजली या काव्यसंग्रहाला जागतिक कीर्तीचे नोबेल पारितोषिक मिळाल्याकारणाने भारतीय तत्त्वज्ञानाची पताका पुन्हा एकवार विद्वत्तेच्या जागतिक प्रासादावर डौलाने फडकू लागली. भारत हा एक पददलित गुलामांचा व निकृष्ट संस्कृतीचा देश नसून त्याच्याजवळही जागतिक संस्कृतीमध्ये भर घालण्याजोगे काही अमौलिक तत्त्वज्ञान आहे, याची जाणीव जगातील विद्वानांना होऊ लागली. जगामध्ये दिसून येणाऱ्या विविधतेमध्ये एकता प्रस्थापित करून जगाच्या संस्कृतीचे नाश करणारे संघर्ष शक्य तितके टाळून, ऐक्याचे व शांतीचे, सहकार्याचे व प्रेमाचे अधिराज्य निर्माण करणे शक्य आहे,

अनुक्रम ७८८२५ वि: निबंध
9293 22/3/67


अशी गुरुदेवांची अमृतवाणी ऐकल्यानंतर पाश्चिमात्यांच्या चिंताग्रस्त व भयाकुल मनाला एकप्रकारे समाधानाचा व विश्वासाचा दिलासा मिळाला असेल, तर त्यांत नवल नाही. जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये गुरुदेव रवींद्रनाथांनी मनसोक्त विहार केला आणि प्रत्येक ठिकाणी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटविला. मानवतेचे उपासक, भारतीय तत्त्वज्ञानाचे अध्वर्यू, जीवनाच्या विविध पैलूंचा आविष्कार करणारे नाटककार, मानवी मनाच्या नाजूक व तरल भावना हळूवारपणे व्यक्त करणारे आणि समृद्ध जीवनाचे संपूर्ण दर्शन आत्मप्रत्ययाने घडविणारे प्रतिभासंपन्न महाकवी, जागतिक भाषा बोलणारे चित्रकार, भोग व त्याग यांचा समन्वय घालणारे कर्मयोगी म्हणून जगामध्ये रवींद्रनाथांनी अद्वितीय लौकिक मिळविला. परंतु या सर्व क्षेत्रांपेक्षा त्यांनी शिक्षणक्षेत्रात बजाविलेली कामगिरी ही वैशिष्ट्यपूर्ण व चिरकाल टिकविणारी अशीच आहे.

रवींद्रनाथांचा जन्म ६ मे १८६१ रोजी कलकत्ता येथे झाला. त्यांचे वडील महर्षी देवेंद्रनाथ टागोर हे आधुनिक विचारांचे अभिमानी होते. त्या वेळी काही सुधारकांनी नुकतीच ब्राह्मोसमाजाची स्थापना केली होती. त्या समाजाचे पुढारीपण देवेंद्रनाथ यांच्याकडे होते. देवेंद्रनाथ हे विरक्तवृत्तीने आपले जीवन औपनिषदिक तत्त्वज्ञानावर चिंतन व मनन करण्यात व्यतीत करीत असत. रवींद्रनाथांच्या जन्मानंतर दोनच वर्षांनी त्यांनी बोलपूर येथे शांतिनिकेतन नावाचा आश्रम स्थापन केला होता. शालवृक्षांच्या पर्णराजीमध्ये आश्रमाचे वातावरण निसर्गरमणीय व शांततापूर्ण असे बनले होते. रवींद्रनाथांच्या घरामध्ये धार्मिक, सुसंस्कृत व पुरोगामी विचारांचे वातावरण असल्यामुळे त्यांच्या मनावर चांगले संस्कार होण्यास मदत झाली. त्यांना बालपणापासूनच निसर्गाचे विलक्षण प्रेम होते. कित्येक वेळा आपल्या घराच्या तिसऱ्या मजल्याच्या गच्चीवर एका बाजूला स्वतःशीच आकाशकुसुमांची माळ ओवीत किंवा गाजीपूरच्या जुनाट निंबवृक्षाखाली बसून विहिरीच्या मोटेचा करुण ध्वनी ऐकता ऐकता आपली कल्पना-नौका अस्फुट आंतरिक संवेदनांनी भरून तिला समीपच्या गंगौघामध्ये दूर लोटीत ते कालक्रमण करीत असत.

इतर मुलांप्रमाणे रवींद्रनाथांनाही शाळांतूनच निरनिराळ्या औपचारिक पद्धतीने शिक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात आला; परंतु त्यांचे व्यक्तिमत्त्व इतरांच्यापेक्षा वेगळे असल्याकारणाने व मनाची संस्कारक्षमता अधिक तरल असल्याकारणाने ते प्रचलित शिक्षणप्रवाहामध्ये प्रवाहपतिताप्रमाणे वाहून गेले नाहीत. त्यांनी स्वतःचे वैशिष्ट्य टिकवून धरले, एवढेच नव्हे तर परिस्थितीच्या महापुराला एक अनुकूल अशी कलाटणी देण्यात सुयश मिळविले. असामान्य लोकांचे असामान्यत्व याच गोष्टीमध्ये प्रकर्षाने दिसून येते. त्यांची भूमिका द्रष्ट्याची असते. त्यांना प्रचलित गोष्टीतील दोष, उणीवा, चांगल्या बाबी यांची सुस्पष्ट जाणीव चटकन होते. त्याचप्रमाणे भावी

काळाला योग्य असे त्यामध्ये कोणते बदल जरूर आहेत, कोणत्या नवीन गोष्टींचा अंगीकार करणे जरूर आहे, कोणत्या जुन्यापुराण्या गोष्टींचा त्याग करावा याची यथायोग्य कल्पना त्यांना अचूकपणे येत असते व अशा रीतीने परिस्थितीला कलाटणी देण्याचे मनोधैर्य, चिकाटी, प्रयत्नशीलता त्यांच्या अंगी भरपूर प्रमाणात असल्या-कारणाने ते आपल्या स्वीकृत कार्यामध्ये यशस्वी होतात. लौकिक दृष्टीने रवींद्रनाथ हे शालेय जीवनात यशस्वी होणार नाहीत, हे भविष्य त्यांच्या बालपणीच एका शिक्षकाने वर्तविले होते. आपल्या थोरल्या भावाबरोबर शाळेत जाण्याचा त्यांनी जेव्हा अगदी लहान वयात हट्ट धरला, तेव्हा त्या शिक्षकाने त्यांना बजाविले "आता शाळेत जाण्यासाठी रडत आहेस, पण पुढे शाळेतून सुटण्यासाठी याहून अधिक रडशील." आणि हे भविष्य त्यांच्या जीवनात तंतोतंत खरे ठरले.

रवींद्रनाथांना त्या वेळच्या परंपरेनुसार कलकत्ता येथील ओरिएंटल सेमिनार, नॉर्मल स्कूल व बेंगॉल ॲकॅडमी या शाळांतून शिक्षणासाठी दाखल करण्यात आले. परंतु त्या वेळच्या अशास्त्रीय शिक्षणपद्धतीमुळे त्यांच्या मनामध्ये शिक्षणाबद्दल आपुलकी अगर प्रेम निर्माण न होता एक प्रकारची घृणाच निर्माण झाली. याचे कारण असे की त्या वेळी शाळेमध्ये अत्यंत कृत्रिम, औपचारिक व काहीसे भीतीचे वातावरण असे. शिक्षक म्हणजे पोलिसाचीच प्रतिकृती वाटत असे. प्रेमापेक्षा भीतीचे, आदरापेक्षा द्वेषाचे वातावरण शाळेमध्ये असल्याकारणाने साध्या साध्या गोष्टीबद्दल विद्यार्थ्यांना फार मोठ्या शिक्षा करण्यात येत असत. विद्यार्थ्यांवर दहशत बसावी म्हणून त्यांना बाकावर उभे करून त्यांच्या दोन्ही हातांवर पाट्यांचा ढीग रचण्यात येत असे व अशा स्थितीत त्यांना तासन्तास ठेवण्यात येत असे. याचा परिणाम म्हणून शाळा म्हणजे विद्यादेवीचे पवित्र व आदरणीय मंदिर न वाटता त्याला गुरांच्या कोंडवाड्याचे स्वरूप येत असे. शाळेच्या उंच उंच भिंती इतक्या उदास व भयाण वाटत असत की, त्यामुळे तुरुंगाच्या कोठडीची अवकळा शाळेला प्राप्त होत असे. अशा शाळेमध्ये रवींद्रनाथ टागोर कधीच समरस होऊ शकले नाहीत यात नवल ते काय ? अत्यंत उद्विग्न व एकाकी मनःस्थितीत ते आपले दिवस कसेतरी व्यतीत करीत. दोन तासांमध्ये किंवा सुट्टीच्या फुरसदीच्या वेळी ते शालागृहाच्या बाहेर समाजाचे किंवा निसर्गाचे निरीक्षण करण्यात आपले मन रमविण्याचा प्रयत्न करीत असत. पुढे वयाच्या तेराव्या वर्षी त्यांना वडिलाबरोबर हिमालयात जाण्याचा सुयोग लाभला. हिमालयातील वास्तव्याचा, तेथील वातावरणाचा व निसर्गरमणीयतेचा त्यांच्या मनावर फारच उदात्त व अनुकूल परिणाम घडून आला. शाळेच्या चार भिंतींत कोंडलेले त्यांचे मन पुन्हा एकदा स्वैर भराऱ्या मारू लागले. नाजूक संवेदनाक्षम भावना पुन्हा एकदा काव्यरूपाने उमलू लागल्या. अगदी बालवयामध्ये कविमनाचे नाजूक भाव त्यांच्या मनामध्ये अंकुरित होऊ लागल्याचे दिसून येते. हिमालयातून

परत आल्यावर कलकत्त्याच्या सेंट झेवियर कॉलेजमध्ये त्यांचे नाव दाखल करण्यात आले. तेथील शिक्षणपद्धतीशीही ते समरस होऊ शकले नाहीत. शिकणे हे एक कष्टदायक काम आहे असे त्यांना वाटू लागले. सतारीच्या तारा प्रमाणाबाहेर ताणल्यास ज्याप्रमाणे त्यातून सुरेल संगीताचे स्वर कधीच उमटू शकत नाहीत, त्याचप्रमाणे लहान मुलांच्या शिक्षणप्रक्रियेमध्ये त्यांच्या नैसर्गिक प्रवृत्तींच्या विरुद्ध कृत्रिम व औपचारिक परिस्थितीमध्ये अतिशय मानसिक ताण दिल्यास त्यांचे शिक्षण कधीच यशस्वी होऊ शकणार नाही. अशा रीतीने रवींद्रनाथांच्या असामान्य व्यक्तिमत्त्वामुळे सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे त्यांचे शिक्षण होऊ शकले नाही. त्यांना शिकविण्यासाठी घरीच काही शिक्षकांची योजना करण्यात आली होती. या प्रकारच्या शिक्षणामध्येही त्यांनी फारसा रस घेतला नाही. उच्च शिक्षण घेण्यासाठी १८८० साली त्यांना इंग्लंडला पाठविण्यात आले. तेथील वातावरणाचा व आधुनिक शिक्षणपद्धतीचा त्यांच्या मनावर काहीसा अनकूल परिणाम घडून आला. त्या ठिकाणी प्रो. मोर्ले यासारख्या थोर विद्वान मंडळींचा सहवास त्यांना लाभला. त्यामुळे ग्रंथांच्या अभ्यासापेक्षाही विद्वानांच्या सहवासातूनच त्यांना अनेक गोष्टी शिकता आल्या. लंडन विश्वविद्यालयात असताना तेथील प्राध्यापकांच्या अध्यापनकौशल्यामुळे त्यांना इंग्रजी वाङ्मयाबद्दल व त्यांतील विचाराबद्दल आपुलकी निर्माण झाली. इंग्रजी भाषा, विचार, संस्कृती व युरोपियन संगीत यांचा त्यांच्या मनावर पुष्कळच चांगला परिणाम झाला. त्यामुळे त्यांच्या विचारांचे क्षितिज पुष्कळ उंचावले गेले. इंग्लंडमध्ये राहून आपल्या मुलाने बॅरिस्टर होऊन हिंदुस्थानात परत यावे व एक उत्तम वकील म्हणून नावलौकिक मिळवावा अशी त्यांच्या नातलगांची इच्छा होती. परंतु तेथील संस्कारांचा परिणाम म्हणून एक थोर तत्त्वज्ञ व शिक्षणशास्त्रज्ञ तसेच एक प्रतिभावंत श्रेष्ठ कवी निर्माण करण्यामध्ये नियतीने यश मिळविले होते. आपल्या कविमनाचा प्रत्यय रवींद्रनाथांना साध्यासुध्या गोष्टीत, दैनंदिन निसर्गचमत्कारातही अभावितपणे येत होता. इंग्लंडहून आल्यावर १८८२ साली एकदा आपल्या घराच्या गच्चीत उभे राहून त्यांनी झाडाच्या पानांमधून सूर्योदयाचे अपूर्व दृश्य पाहिले. एकाएकी आपल्या मनावरील पटल दूर होऊन सर्व जग आनंदाने व सौंदर्याने भरून गेले आहे, विषादाचे तिमिर दूर होऊन अंतःकरणात विश्वाचा प्रकाश प्रस्फुरित झाला आहे असे त्यांना वाटले. असे आत्मप्रत्ययाचे व आनंदानुभूतीचे प्रसंग त्यांच्या जीवनात अनेक आले. त्यातच त्यांच्या कविमनाची साक्ष पटते.

## कौटुंबिक जीवन

टागोर घराणे सुधारकांचे होते. त्यामुळे सामाजिक व धार्मिक परंपरांनी ते फारसे जखडलेले नव्हते. त्यांचे वडील संन्यस्त वृत्तीने औपनिषदिक जीवन

जगण्याचा प्रयत्न करीत असले, तरी त्यांचे आपल्या कुटुंबीयांवर कोठल्याही तऱ्हेचे दडपण नव्हते. रवींद्रनाथांची आई त्यांच्या वयाच्या १३ व्या वर्षीच निधन पावली. तथापि, त्यांना मातेच्या सुखाची उणीव इतर नातलग मंडळींनी कधीच भासू दिली नाही. टागोर कुटुंब म्हणजे पौर्वात्य व पाश्चिमात्य संस्कृतींच्या मधुर मीलनाचे फळच होते. त्यांच्या घरामध्ये संगीत, नाट्य यांसारख्या कलांची साधना होत असे. त्यांचे बंधू ज्योतिरिंद्र व त्यांच्या पत्नी कादंबिनीदेवी यांनी त्यांना इंग्रजी वाङ्मयाची व काव्यलेखनाची गोडी लावली. ९ डिसेंबर १८८४ मध्ये वेणिमाधव चौधरी या मध्यमवर्गीय गृहस्थांच्या कन्येशी त्यांचा विवाह झाला. तिचे पहिले नाव भवतारिणी होते. विवाहानंतर ते बदलून मृणालिनीदेवी असे ठेवण्यात आले. त्या प्रथम निरक्षर होत्या. परंतु रवींद्रनाथांच्या साहचर्यामुळे त्यांनी बंगाली वाङ्मयाच्या अभ्यासामध्ये पुढे पुष्कळच प्रगती केली. त्याग, कष्ट व निर्लोभीपणा या गुणांमुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व पुष्कळच खुलून दिसे. अत्यंत प्रतिकूल परिस्थिती-तही रवींद्रनाथांना अनुकूल साथ देण्यामध्ये त्यांनी स्वतःच्या परिश्रमांची, संपत्तीची व दागदागिन्यांचीही कधी पर्वा केली नाही. शांतिनिकेतनाच्या आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी सन १९०२ साली त्यांनी आपले सर्व अलंकार विकून टाकले होते. कौटुंबिक जीवनात रवींद्रनाथ तसे सुखी नव्हते. प्रियजनांच्या अकाली निधनामुळे त्यांना अनेक वेळा तीव्र दुःखाचे चटके सहन करावे लागले. प्रिय पत्नी व तीन अपत्ये यांच्या अकाली मृत्यूचे दुःख सहन करण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला. परंतु ते प्रापंचिक आपत्तीत फार काळ गुरफटून राहिले नाहीत. स्वतःच्या संसारापेक्षा शांतिनिकेतनाचा संसार त्यांनी अधिक जवळचा मानला.

**वाङ्मय**

रवींद्रांनी वाङ्मयाचे सर्व प्रकार हाताळले आहेत. श्लोक, छोट्या व दीर्घ कविता, लघुकथा तसेच दीर्घकथा, कहाण्या, कादंबऱ्या, कथा, नाटके, प्रहसने, कीर्तने या सर्वांत त्यांनी प्रगती केली होती. आधुनिक बंगाली वाङ्मयाच्या व भाषेच्या विकासाच्या बाबतीत तर रवींद्रनाथांची कामगिरी अविस्मरणीय आहे. ज्याला वाङ्मयातील सुवर्णयुग म्हणता येईल ते रवींद्रनाथांनी बंगाली वाङ्मयात आणले.

त्यांना मिळालेल्या नोबेल पारितोषिकाने तर बंगाली वाङ्मयाच्या मंदिरावर सोन्याचा कळस चढविला आणि इतर भारतीय भाषांहून बंगाली भाषेला जागतिक वाङ्मयामध्ये एक वेगळे अनन्यसाधारण व मानाचे स्थान प्राप्त करून दिले. वयाच्या आठव्या वर्षी त्यांनी मॅक्बेथचे भाषांतर बंगालीमध्ये केले होते. वयाच्या १६ व्या

वर्षी कविकाहिनी हे खंडकाव्य त्यांनी लिहिले. त्यानंतर लवकरच ' क्षुधित पाषाण ' ही त्यांची लघुकथा फारच गाजली. ' भानुसिंग ' या टोपण नावानेही त्यांनी काही वाङ्मयनिर्मिती केली आहे. इंग्लंडहून परत आल्यावर ' वाल्मीकि-प्रतिभा ' नावाचे एक नाटक त्यांनी रचले. १८९० ते १८९५ पर्यंत त्यांनी साधना साप्ताहिकाचे संपादक म्हणून काम केले. १८९८ साली एका भारतीय वर्तमानपत्राचे काही दिवस ते संपादक होते. १९०७ साली ' गोरा ' नावाची अलौकिक कादंबरी त्यांनी प्रसिद्ध केली. भारतीय गणराज्याचे राष्ट्रगीत बनलेले ' जनगणमन ' याच सुमारास त्यांनी लिहिले. आपल्या जमीनदारीची व्यवस्था पाहण्यासाठी त्यांना आसाम व पूर्व बंगाल या ठिकाणी नेहमी जा-ये करावी लागत असे. त्या वेळी पद्मा नदीतून नौकेतून प्रवास करीत असताना मानवी जीवन व निसर्ग त्यांना अत्यंत जवळून पहावयास मिळाला. त्या अनुभूतीतून त्यांनी निरनिराळी गीते रचली व पुढे त्यांचा ' गीतांजली ' म्हणून संग्रह करण्यात आला. १९१२ साली प्रकृतिस्वास्थ्यासाठी पुन्हा एकवार ते इंग्लंडला गेले असताना त्यांच्या गीतांजलीमुळे डब्ल्यू. बी. यीस्ट यांसारखे प्रतिभावंत कवी रोमहर्षित होऊन गेले. त्यांनी त्यांच्या बंगाली गीतांचे इंग्रजी काव्यात भाषांतर केले. त्याचे प्रकाशन इंडिया सोसायटीतर्फे करण्यात आले होते. गीतांजलीचा प्रभाव पाश्चिमात्य विद्वानांवर एवढा मोठ्या प्रमाणात पडला की, १३ नोव्हेंबर १९१३ रोजी या गीतसंग्रहाबद्दल त्यांना अत्यंत मानाचे नोबेल पारितोषिक देण्यात आले. या वेळच्या त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांमध्ये थॉमस हार्डी, ॲनातोल फ्रांस यासारखे सुप्रसिद्ध लेखक व कवी होते. त्यांना बाजूला सारून रवींद्रनाथांना हे वाङ्मयाचे पारितोषिक मिळाल्याकारणाने संमिश्र भावनांची लाट पौर्वात्य व पाश्चिमात्य जगात उसळली. इंग्लंडमध्ये त्याची प्रतिक्रिया फारच कडवट झाली. इंग्लंडच्या द्वेषामुळेच स्विझ लोकांनी एका यःकिश्चित भारतीय कवीला हे बक्षीस दिले असा इंग्लंडच्या लोकांचा ग्रह झाला. परंतु इतर युरोपीय देशांमध्ये टागोरांच्या या अपूर्व व अलौकिक यशाचे कौतुक व अभिनंदन झाले. गीतांजलीची अनेक प्रगत भाषांमध्ये भाषांतरे करण्यात आली. एकट्या जर्मन भाषेतील गीतांजलीच्या ५० लाख प्रती केवळ तीन महिन्यांत खपल्या. रवींद्रनाथांची प्रतिक्रिया मात्र फारच निःस्पृहतेची दिसून आली. पारितोषिकांची १ लाख २५ हजारांची रक्कम त्यांनी शांतिनिकेतनाच्या अभ्युदयासाठी खर्च केली. हिंदुस्थान सरकारनेही त्यांना ' सर ' ही पदवी देऊन गौरविले. परंतु १९१९ च्या जालियनवाला-बाग हत्याकांडानंतर अत्यंत उद्वेगाने त्यांनी ही पदवी सरकारला परत केली.

भारताच्या राजकीय जीवनाच्या स्रोतापासूनही रवींद्रनाथ फारसे बाजूला राहू शकले नाहीत. सन १८९८ मध्ये लोकमान्य टिळकांना अटकेत ठेवल्याबद्दल त्यांनी संताप व्यक्त केला होता. त्यांच्या बचावासाठी फंड जमा करण्यातही त्यांनी

पुढाकार घेतला होता. लोकमान्यांनी सुरू केलेला शिवजयंतीचा उत्सव त्यांना संपूर्णपणे मान्य होता. या संदर्भात शिवाजीउत्सव या नावाची एक कविताही त्यांनी रचली. रवींद्रनाथांच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक कार्याबद्दल टिळकांना अत्यंत आपुलकी होती. त्यांच्या कार्यासाठी व त्याचा प्रचार करण्यासाठी लोकमान्यांनी रवींद्रनाथांना ५० हजार रुपये देऊ केले होते. सन १९०२ साली भारतीय संस्कृतीच्या पुनरुत्थानासाठी वाहिलेली ' बंगदर्शन ' पत्रिका त्यांनी सुरू केली होती. १९०५ च्या वंगभंग चळवळीत त्यांनी प्रथम पुढाकार घेतला होता. परंतु राजकीय धकाधकीच्या जीवनामध्ये आपणांस समरस होता येत नाही, असे दिसताच ते त्यापासून काहीसे दूर झाले. १९२१ साली म. गांधींनी त्यांना असहकारितेच्या चळवळीमध्ये सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु वैचारिक मतभेदामुळे ते या चळवळीशी समरस होऊ शकले नाहीत. सत्य, अहिंसा व प्रेम ही विशाल आत्मिक उन्नतीची साधने आहेत, त्यांचा वापर संकुचित राजकीय उद्दिष्टे साधण्यासाठी करणे त्यांना मान्य नव्हते. पाश्चिमात्य राष्ट्रांबद्दल द्वेषाची भावना पेटविणे त्यांना संमत नव्हते.

### प्रवास

त्यांनी अनेक वेळा जगपर्यटन केले. नोबेल पारितोषिक मिळाल्यानंतर त्यांचे तत्त्वज्ञान जाणून घेण्याची जिज्ञासा जागतिक जनमानसामध्ये मोठ्या प्रमाणात निर्माण झाली. निरनिराळ्या देशांतून भेटीची व व्याख्याने देण्यासाठी आग्रहाची निमंत्रणे त्यांना येऊ लागली. त्यांच्या अनुषंगाने त्यांनी जपान ( १९१६ ), युरोप ( १९२० ), चीन, पेरू ( १९२४ ), इटली ( १९२६ ), बाली ( १९२७ ), कॅनडा ( १९२९ ), झेकोस्लोव्हाकिया व रशिया ( १९३० ) या देशांना भेटी दिल्या. त्यांनी आपल्या व्याख्यानांतून आपले निर्भीड व स्वतंत्र बाण्याचे विचार कोणाचाही मुलाहिजा न ठेवता व्यक्त केले. संकुचित राष्ट्रवादावर त्यांनी ओढलेले कोरडे इटली, रशिया यांसारख्या राष्ट्रांत रुचले नाहीत. परंतु त्याची फिकीर त्यांना होती कुठे ?

रवींद्रनाथांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर आणि महर्षी देवेंद्रनाथ टागोर या तीन पुरुषांच्या धीरोदात्त चारित्र्याचा फार मोठा वाटा आहे. शतकानुशतकांच्या धर्मभोळ्या रूढींच्या शृंखलांनी जखडलेल्या व नवविचारांकडे पाठ फिरविणाऱ्या भारतीय जड मनाला प्रचंड धक्का देऊन जीवनाचा सर्वांगीण विचार करण्याची नवी दृष्टी दिली राजा राममोहन रॉय यांनी ! सामाजिक सुधारणेला आवश्यक असलेली बुद्धिप्रामाण्याची निर्भयता

शिकविली ईश्वरचंद्रांनी ! आणि नवविचारांना प्राचीन उपनिषदांच्या आध्यात्मिक कोंदणात बसविले महर्षी देवेंद्रांनी ! अध्यात्म, निसर्ग व साहित्य यांच्या उपासनेत रवींद्रनाथांचे जीवन विकसित झाले. स्वतंत्र वातावरणात ते परिपुष्ट झाले. सामाजिक व वैचारिक बंधनांनी कधीही बद्ध न झाल्यामुळे रवींद्रनाथ टागोर सदैव स्वतःच्या अनुभूतीशी प्रामाणिकच राहिले. रवींद्रनाथांचे सारे सामर्थ्य, सारे सौंदर्य या संस्कारातच साठविलेले आहे.

## तत्त्वज्ञान

रवींद्रनाथांची प्रकृती मूळची कवीची. त्यांचे सर्व तत्त्वज्ञान त्यांच्या काव्यात ओतप्रोत भरलेले आहे. त्यांच्या काव्यात कवी व तत्त्वज्ञ एकरूप झालेले दिसतात. तत्त्वज्ञानामध्ये जीवनाचे कोडे उलगडण्याचा प्रयत्न दिसतो. मात्र रवींद्रनाथांच्या तत्त्वज्ञानामध्ये त्यांना गवसलेले तत्त्वज्ञान हे त्यांना विश्वाच्या अनुभवांतून गवसलेले दिसते. हे तत्त्वज्ञान खरोखर विचारापलीकडे व इंद्रियातीत आहे. या तत्त्वज्ञानाचा त्यांना साक्षात्कार घडला असेच म्हणणे सयुक्तिक ठरेल. म्हणून तत्त्वज्ञानाच्या बाबतीत त्यांची भूमिका दार्शनिकाची वाटते. विश्वाच्या व व्यक्तीच्या जीवनाचे मूलभूत तत्त्व आनंद होय. सर्व विश्वामध्ये व विश्वाच्या रस, रूप, गंध, स्पर्श, शब्द आदी अनेकत्वामध्ये आनंदाचाच साक्षात्कार रवींद्रनाथांना झाला. आनंद हा सुखदुःख, जन्म-मरण या सर्व द्वंद्वांवर मात करून विश्वामध्ये पुरेपूर भरलेला आहे. या आनंदानेच अनेक रूपे घेतली आहेत. वेद, उपनिषदे, महाकाव्ये व संतभक्त यांची गीते यामध्ये या विश्वाच्या आनंदाचाच साक्षात्कार पहावयास मिळतो. "आनंदात् एव खलु इमानि भूतानि जायन्ति। आनंदेन जातानि जीवन्ति। आनंदं प्रयान्ति अभिसंविशन्ति।" असली उपनिषदातील वचने त्यांच्या आत्मप्रत्ययाला साथ देऊ लागली. द्वैत-अद्वैतामध्येही त्यांना अविट गोडी वाटू लागली. द्वैतातील गोडी अद्वैताला न विसरताही चाखता येते, असे त्यांना दर्शन घडले. कबिराच्या वाङ्मयाचा अभ्यास केल्यावर त्यांना आपल्या विचाराशी सहमत असलेला एक थोर समानधर्मा भेटल्याचा आनंद झाला. विश्वात व्यापून राहिलेल्या या आनंदाचा आविष्कार त्यांच्या ' निर्झरेर स्वप्नभंग ' या काव्यात पहावयास मिळतो.

सर्व चराचरांतील जीवन हे गतिमान व चैतन्यमय आहे. या जीवनाला विलासावाचून चैन पडत नाही. आत्माविष्कार ही त्याची सहजसुंदर प्रकृती आहे. आकाश आणि धरटे, समुद्र आणि लाटा, प्रियकर आणि प्रेयसी हा चैतन्याचाच विलास आहे. हा विलास आनंदमय आहे. हेच आखिल विश्वाचे एक सुरेल संगीत आहे. ते ऋतुचक्रात, चंद्रसूर्यादि ग्रहांच्या भ्रमणात, तारकांच्या लुकलुकण्यात, प्राणिमात्राच्या

हृदयस्पंदनात आणि निसर्गाच्या विविध आविष्कारांत दिसून येते. मानवी जीवनाचे कार्य या विश्वसंगीताशी एकतानता साधणे हेच आहे. विश्वातील नाना घटना, नाना कृती, नाना आविष्कार या सर्वांमध्ये विशिष्ट ताल व लय आहे. गीतांजलीच्या पहिल्याच गीतामध्ये आपल्या स्वतःच्या हृदयवीणेने विश्वसंगीताची साथ करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. "ही छोटीशी वेळूची बासरी तू गिरिकंदरावर नेलीस आणि तिच्यातून नित्य नवीन सूर काढलेस." विश्वाच्या संगीताशी एकरूप होण्याची त्यांना अत्यंत ओढ लागलेली होती. त्यांची ही व्याकुळता खालील कवनात दिसून येते.

'प्रकाश, कुठे आहे प्रकाश ?
माझ्या हृदयात
दीप आहे पण ज्योत नाही
हेच का तुझे नशीब ?
अरेरे ! याहून मरण फार बरे
आकाश मेघांनी व्यापून गेले आहे
पावसाची झिमझिम अखंड चालू आहे
अशा वेळी माझ्या हृदयात कसली अनामिक हुरहूर
मला बेचैन करीत आहे ?'

व्यक्तीचे जीवन व विश्वाचे जीवन हा सारा चैतन्याचा विलास आहे. त्यामध्ये प्रत्येकालाच आत्माविष्कार करावा लागतो. जीवनसमुद्र एकीकडे अनंत आहे, तर दुसरीकडे प्राणिमात्राचे जीवन नदीप्रमाणे अनंताच्या दिशेने प्रवास करीत आहे. म्हणून प्रत्येक व्यक्तीने हा आनंदतत्त्वाचा किंवा विश्वसंगीताचा आस्वाद घ्यावयाचा आहे. मात्र हा आस्वाद घेत असताना कोठेही आसक्ती ठेवावयाची नाही. कारण मी आस्वाद घेत आहे, भोग भोगत आहे, मी सुखी आहे, या जाणिवेचीही या आनंदाला दृष्ट लागते. वासनेच्या आहारी जाणे म्हणजे सत्याशी द्रोह करणे होय. तुकारामाप्रमाणे किंवा भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे अनासक्ती कर्मयोग हेच जीवनाचे तत्त्वज्ञान रवींद्रनाथांनी प्रतिपादिले आहे. कोणाही जीवमात्राला कर्म करणे हे अटळच आहे, कर्मत्याग केवळ अशक्य. तेव्हा कर्म करीत असताना ते विशिष्ट कौशल्याने करणे हाच खरा कर्मयोग होय. ( योगः कर्मसु कौशलम् ) ज्याच्या योगाने कर्माच्या बाबतीत आसक्ती निर्माण होणार नाही, निरपेक्ष बुद्धीने व स्वधर्म म्हणून जे कर्म केले जाते, तेच विशिष्ट कर्म होय. हे त्यांचे तत्त्वज्ञान गीतेच्या तत्त्वज्ञानाशी फारच मिळतेजुळते वाटते. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।' किंवा गीतेच्या शिकवणुकीप्रमाणे, 'संन्यासःकर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ । तयोस्तु कर्मसंन्यासात् कर्मयोगो विशिष्यते ॥'

रवींद्रनाथांना कर्मसंन्यास मान्य नाही. ते म्हणतात, इंद्रियांची द्वारे मी मुळीच लावणार नाही. मात्र मनुष्य स्वार्थरहित दृष्टीने जेव्हा वस्तूंकडे बघावयाला शिकेल, इंद्रियांच्या अनावर भोगेच्छांपासून पूर्णपणे दूर होऊन जेव्हा प्रत्येक वस्तूकडे पाहील त्या वेळेसच फक्त त्याला चराचरांत भरून राहिलेल्या सौंदर्याचे दर्शन घडेल. विश्वातील सुखोपभोगात पाप नाही. त्या सौंदर्याचा रसास्वाद घेताना आपली दृष्टी शुद्ध व वृत्ती स्वार्थरहित असली म्हणजे पुरे. रवींद्रनाथांचे कविमन हे विश्वसौंदर्याच्या रसास्वादात पूर्णपणे न्हाऊन निघाले आहे. ते म्हणतात. "मी कधीच संन्यासी होणार नाही. जेथे रमणीच्या पदराची फडफड ऐकू येते, जेथे तरुण-तरुणींची सलज्ज कुजबूज चालते, जेथे नवविवाहित प्रणयी जनांचे हितगुज चालते तेथे रममाण होणारा हा कवी आहे."

भारतीय तत्त्वज्ञानात वर्णन केलेला मायावाद रवींद्रनाथांना मान्य नाही. हे सारे विश्व, हा संसार खोटा आहे, केवळ माया आहे, ही विचारसरणी रवींद्र-नाथांच्या तत्त्वज्ञानात बसू शकत नाही. विश्वाला आभास मानावयास ते मुळीच तयार नाहीत. विश्व हे कदाचित सापेक्ष सत्य असेल, मात्र असत्य खास नाही. वेद व उपनिषदांत सांगितल्याप्रमाणे, 'ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत्' म्हणजेच हे सर्व विश्व सत्य आहे. म्हणूनच खोट्या वेदांताच्या मायेच्या आधारावर संसारापासून पळून जाऊ पाहणाऱ्या निष्क्रिय कल्पनावाद्यांचा रवींद्रांनी धिक्कारच केला आहे. परमेश्वर जर खरा तर त्याचा विलास तरी खोटा असे कसे म्हणता येईल ? समुद्र खरा व लाटा मात्र खोट्या असे कोणी म्हणू शकेल का ? म्हणून ऐहिक जीवनाचा सानंद स्वीकार करून परिपूर्ण जीवन जगणे हे मानवाचे कर्तव्य ठरते. असे कर्म आनंदाचा आविष्कार बनते. भरलेल्या घटातून पाणी सांडते तसा आनंद कर्मातून ओसंडू लागतो. योग्य रीतीने कर्माचरण केल्याने मानवाला विश्वात्मक जीवन ( Univarsal Life ) जगता येते.

रवींद्रनाथांच्या तत्त्वज्ञानामध्ये विश्वातील सर्व द्वंद्वात समन्वय साधण्याची प्रवृत्ती दिसून येते. चेतन-अचेतन, व्यक्ती-समष्टी, ज्ञान, कर्म, विज्ञान, अध्यात्म यांचा समन्वय घालण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. आणि हीच उपनिषदांची शिकवण आहे असे त्यांचे प्रांजल मत आहे.

'तेन त्यक्तेन भुञ्जीथाः ।' ही उपनिषदांची शिकवण त्यांनी पुरेपूर स्वीकारली. एवढेच नव्हे तर आपल्या प्रदीर्घ जीवनात आचारणात आणली होती. थोडक्यात सांगावयाचे तर रवींद्रनाथ हे साक्षात्कारवादी तर खरेच, मात्र त्यांचा

साक्षात्कारवाद हा सौंदर्यनिष्ठ व विश्वाच्या आनंदाची उपासना करणारा होता, असेच म्हणावे लागेल.

उपनिषदांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणेच त्यांच्या तत्त्वज्ञानाला बौद्ध विचारांची बैठक मिळाली आहे. बुद्धाचा मानवतावाद त्यांनी पूर्णपणे स्वीकारला असून सेवावृत्ती व त्याग या तत्त्वांचाही त्यांनी अंगीकार केला आहे. त्यांच्या श्रेष्ठ गणल्या जाणाऱ्या कितीतरी काव्यांना व लघुकथांना बुद्धजीवन व बौद्ध वाङ्मय प्रेरक ठरले आहे. नटीर पूजा, अभिसार, पूजारिन, चांडालिका, श्यामा या कथावस्तूंतलि विषय त्यांचा बौद्ध वाङ्ययाचा प्रगाढ अभ्यास व त्यांच्यावर बौद्ध तत्त्वज्ञानाचा पडलेला प्रभाव दर्शवितात.

**शैक्षणिक तत्त्वज्ञान**

सन १९०१ साली हेमंत ऋतूमध्ये रवींद्रनाथांनी शांतिनिकेतनच्या शाल-वृक्षांच्या वनराजीमध्ये एक अभिनव शिक्षणसंस्था सुरू केली. वयाच्या ४० वर्षांपर्यंत ज्यांनी काव्यामध्ये विहार केला व कवी म्हणून भरपूर लौकिक मिळविला, त्या रवींद्रनाथांनी शिक्षणाच्या रुक्ष क्षेत्राकडे वळावे याचे पुष्कळांना आश्चर्य वाटले. त्यांचा शिक्षणक्षेत्रामधील अनुभव फारसा उत्साहजनक नव्हता. शिक्षणशास्त्रासंबंधी किंवा शिक्षणाच्या कोणत्याही अंगासंबंधी त्यांनी कोणताही ग्रंथ लिहिला नव्हता. मग त्यांनी या शिक्षणाच्या अभिनव प्रयोगाला सुरुवात का करावी ? रवींद्रनाथांची मूळची प्रकृती कवीची; त्यामुळे त्यांचे मन अत्यंत संवेदनाक्षम व मानवाच्या हळुवार भावनांशी समरस होणारे होते. लहान बालबालिकांबद्दल त्यांना संपूर्ण सहानुभूती व प्रगाढ प्रेम होते. शांतिनिकेतन येथील आपली शिक्षणसंस्था सुरू करताना ते म्हणाले होते की, 'मी जी ही एक शिक्षणसंस्था सुरू करीत आहे, ते सुद्धा एक काव्यच आहे. त्याला कदाचित शब्दांचे माध्यम नसेल, ते निर्जीव रूक्ष कागदावरही लिहिलेले नसेल, परंतु ते एक जीवनाचे काव्य असल्याकारणाने जीवनाच्या माध्यमातून व संपूर्ण जीवनासाठी लिहिलेले असेल.'

रवींद्रनाथांना स्वतःच्या औपचारिक शिक्षणाचा अनुभव चांगला नव्हता. त्यामुळे शाळा कशी असावी किंवा लहान मुलांना कोणते शिक्षण द्यावे व कोणत्या पद्धतीने द्यावे, या ज्ञानापेक्षा शाळा कशी असू नये याचेच त्यांना संपूर्ण ज्ञान होते. त्यांच्या वेळच्या शाळा अत्यंत कृत्रिम वातावरणात चालविल्या जात असत. शाळेच्या चार भिंती म्हणजे तुरुंग किंवा कोंडवाडा याचीच साक्ष देत. त्यांमध्ये विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक प्रवृत्तीला वाव नसे. शिक्षक वेळापत्रकाप्रमाणे निरनिराळ्या विषयांचे ज्ञान, विद्यार्थ्यांना जरूर भासो अगर न भासो, त्यांच्यावर

लादीत असत. ते म्हणतात, ' नाजूक फुलावर उंचावरून होणाऱ्या जोरदार गारांच्या वर्षावाप्रमाणे आमच्यावर पाठांचा मारा होत असे आणि वस्तुसंग्रहालयातील निर्जीव चित्रांप्रमाणे आम्हांला तो शांत बसून सहन करावा लागे. त्या वेळच्या शाळा निसर्ग किंवा वास्तव जीवन यांपासून फार दूर असत. वर्गातील साहित्य, अध्यापनपद्धती आणि सर्व वातावरण बालकाच्या नैसर्गिक प्रवृत्तींच्या विरुद्ध असे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक शक्तीवर व उत्साहावर विरजण घातले जात असे. अशा या शिक्षणपद्धतीविरुद्ध रवींद्रनाथांनी उघडपणे आपल्या संस्थेत नवीन शिक्षणपद्धतीची सुरुवात केली होती. त्यांना आपली शिक्षणसंस्था म्हणजे चैतन्यमय व नैसर्गिक प्रवृत्तीनुसार बालकांना शैक्षणिक अनुभव देणारे एक संस्कारक्षम केंद्र बनवावयाचे होते. त्यांचे बालमानसशास्त्र लहान मुलांबद्दलच्या त्यांच्या उत्कट प्रेमावर व सहानुभूतीपूर्ण वात्सल्यावर आधारलेले होते. ते म्हणत, बालके म्हणजे मानवी जीवनाच्या वेलीवर उमलणारी फुलेच होत. त्यांना जितका मोकळेपणा व स्वातंत्र्य मिळेल तितकी ती प्रफुल्लित व सतेज बनतात. त्यामुळे त्यांना आनंदाचा व सौंदर्याचा रसास्वाद घेता येतो. लहान मुलांचे मन सभोवतालच्या वातावरणातून उपयुक्त संस्कार ग्रहण करण्यासाठी सतत जागरूक असते. त्यांची ज्ञानेंद्रिये अतिसूक्ष्म संवेदनाही अचूकपणे टिपून घेतात. ही त्यांची ग्रहणशक्ती प्रौढांच्या ग्रहणशक्तीहून पुष्कळच तीव्र असते. त्यांच्या बोधमनापेक्षा अबोधमनाचे कार्य अतिशय वेगाने चालते. यासाठी त्यांना संगीत, नाट्य, कला यांची जरुरी असते. विद्यार्थ्यांना, प्रौढांनी किंवा शिक्षकांनी ज्ञान देण्यापेक्षा ते त्यांनी स्वतःच्या धडपडीतून मिळविणे, हे रवींद्रनाथांना अधिक उपयुक्त वाटत असे. निसर्ग हा एक फार मोठा शिक्षक आहे. त्याच्या सान्निध्यात मूल जितके रममाण होईल तितके त्याला अधिक ज्ञान मिळू शकेल. या दृष्टीने विचार करता डयूयीचा उपयुक्ततावाद रवींद्रनाथांना मान्य नाही. शिकणे म्हणजे सत्याच्या संशोधनातील एक प्रक्रियाच होय. त्यामध्ये स्वतःच्या कृतीला, स्वतःच्या साहसाला व धडपडीला अधिक महत्त्व आहे. रॉबिनसन क्रूसोप्रमाणे निसर्गाच्या सान्निध्यात राहून विद्यार्थ्यांनी स्वप्रयत्नाने ज्ञान ग्रहण करावे असे रवींद्रनाथांना वाटत असे. या दृष्टीने विचार करता रवींद्रनाथ टागोर हे रूसोप्रमाणेच निसर्गवादी होते. आपल्या मुलांची विद्यार्थीदशा अधिक सफल व सुफल करावयाची असेल तर त्यांना निसर्गाच्या सान्निध्यात मनसोक्त वावरू दिले पाहिजे. प्राचीन कालापासून भारतीय मनं निसर्गाकडेच सारखे धाव घेत आलेले आहे. प्रकृतिमातेच्या अंकावर सुखावूनच त्याचा आतापर्यंत विकास झालेला आहे. विश्वामध्ये मानवाचीच केवळ एकमात्र सृष्टी नसून प्राणिसृष्टी व वनस्पतिसृष्टी यांचेही अस्तित्व असल्याकारणाने त्यांच्याशी एकरूप होणे हा शिक्षणाचा अविभाज्य भाग मानला पाहिजे. स्तनपान करणाऱ्या

नवजात अर्भकाला जीवनरस व प्रेमाची पाखर ही दोन्ही आईकडून एकाच वेळी मिळत असतात. त्याचे शरीर व मन ही दोन्ही एकाच वेळी तृप्त होतात. म्हणून निसर्गमातेकडून बालपणी मिळावयाचा हा जीवनरसाचा घुटका विद्यार्थ्यांना भरपूर प्रमाणात मिळावयास हवा. त्यांचे जीवन व सभोवतालचे विश्व यांचा मधुर मिलाफ घडवून आणणारे शिक्षण हेच खरे शिक्षण होय. निसर्गापासून दूर, कृत्रिम वातावरणात बालकांना शिक्षण देण्याचा प्रयत्न करणे म्हणजे भूमातेच्या अंकावरून नवजात अर्भकाला ओढून काढणे होय.

त्यांचे शिक्षणासंबंधीचे आणखी एक महत्त्वाचे तत्त्व म्हणजे बालस्वातंत्र्य होय. लहान मुलांना आपल्या कलांप्रमाणे व प्रवृत्तीनुसार विविध अनुभव घेण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य त्यांच्या शाळेमध्ये देण्यात येते. विद्यार्थ्यांवर रवींद्रनाथ प्रथमपासून संपूर्ण विश्वास ठेवीत. त्या विश्वासाचे प्रत्यंतर म्हणजे मुलेही त्यांच्यावर संपूर्णपणे विश्वास ठेवीत. लहान मुले अजिबात पूर्वग्रहदूषित नसतात. त्यांच्यावर प्रौढांनी किंवा शिक्षकांनी आपले ग्रह, समजूती किंवा भावना लादण्याचा प्रयत्न करू नये. शाळेमध्ये इतिहास, भूगोल यांच्याद्वारे आपण निरनिराळ्या देशांतील लोकांबद्दल, जाती-जमातींबद्दल तिरस्कार व द्वेषाच्या भावना फैलावण्याचा प्रयत्न करीत असतो. रवींद्रनाथ हे या संकुचित भावनांच्या विरुद्ध आहेत. जगामध्ये धर्म, वर्ण, जात, भाषा, देश, वेष, श्रीमंती यांच्यावर आधारलेले अनेक भेद दिसून येत असतात. त्यामुळे एकमेकांच्या जीवनामध्ये निरनिराळ्या प्रकारची कटुता निर्माण होते. या कटुतेतूनच संघर्ष निर्माण होतात व मानवाची संस्कृती व मानवता विलयास जाते. हे सर्व भेद कृत्रिम असून अत्यंत वरवरचे आहेत. मानवता ही सर्व जगामध्ये एकच आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना लहानपणापासून असली पाहिजे. त्यांची नैसर्गिक प्रवृत्तीही सर्व मानवजातीत अध्यात्मिक एकता मानणारीच असते. त्यांच्यामध्ये द्वैत किंवा द्वेष शिक्षक किंवा प्रौढ व्यक्तीच आपल्या संकुचित विचार-सरणीने निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. इंद्रधनुष्यामध्ये जरी निरनिराळ्या प्रकारचे रंग दिसून येतात, तरी सूर्यकिरणात मात्र एकताच असते. त्या सर्व रंगांचे मीलन सूर्यकिरणांमध्ये जसे दिसून येते, तसेच विभिन्न जाती, धर्म, पंथ, भाषा असणाऱ्या लोकांचे मीलन संपूर्ण मानवतेमध्ये प्रत्ययास येते. रवींद्रनाथांना अशा प्रकारचे स्वातंत्र्य शाळेमध्ये नांदावे व आपल्या शिक्षणसंस्थांतून विश्वातील मानवाची एकात्मता प्रत्ययास यावी असे वाटत असे. त्यासाठी प्रत्येकाने एक-मेकांची संस्कृती, जीवनपद्धती, धर्मांचे आचारविचार समजून घेतले पाहिजेत. तरच मानवी संस्कृतीचे संवर्धन होईल. असे न झाल्यास जगामध्ये वैचारिक व प्रत्यक्षात संघर्ष निर्माण होऊन त्यातून अनेक शतके, अत्यंत कष्टाने वाढविलेल्या संस्कृतीचा सर्वनाश होण्यास विलंब लागणार नाही. रवींद्रनाथांचा विज्ञानाकडे

पाहण्याचा दृष्टिकोनही अध्यात्मिक आहे. विज्ञानाच्या नवनवीन शोधांमुळे जग अतिशय लहान झाले असून ते सर्व नाशाच्या कड्यावर उभे आहे. त्याला जर वाचवावयाचे असेल तर विज्ञानाने उत्पन्न केलेली शक्ती पेलणारे मानवी मन अध्यात्मिकच असावयास हवे. या अध्यात्मिकतेच्या भूमिकेशिवाय विज्ञानाचा उपयोग मानवी कल्याणासाठी कसा करावा याचे ज्ञान मानवाला येऊ शकणार नाही.

शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषाच असले पाहिजे यावर रवींद्रनाथांचा भर होता. मातृभाषेतून विद्यार्थ्यांना आपले विचार जितक्या सुलभतेने मांडता येतील, तितक्या सुलभतेने ते परकीय भाषेच्या माध्यमातून प्रकट करता येणार नाहीत. शिक्षणाच्या काळामध्ये विशेषतः बालवयामध्ये परकीय माध्यमांच्या द्वारे शिकविणे म्हणजे विद्यार्थ्यांपुढे अनेक अडचणी निर्माण करणे होय. मातेप्रमाणे मातृभाषा हीच बालकांना अत्यंत आपुलकीची व जवळची असते. त्याच माध्यमातून ती ज्ञानग्रहण करतात व आत्मप्रकटीकरणही करू शकतात. म्हणून अध्ययन–अध्यापनामध्ये परकीय भाषेचा अडसर आणू नये.

### शिक्षणाचे ध्येय

रवींद्रनाथांनी सर्व बंधनांतून मुक्ती हे शिक्षणाचे ध्येय मानले आहे. त्या सर्व बंधनांमध्ये अज्ञान हे सर्वांत मोठे बंधन होय. निरनिराळ्या प्रकारच्या अज्ञानाने मनुष्यप्राणी बांधला गेला आहे. त्याला खरे ज्ञान प्राप्त झाल्यास, विश्वाचे व मानवतेचे सत्य स्वरूप कळून आल्यास त्याच्या मनातील द्वैत नाहीसे होऊन खऱ्या आनंदाची व सौंदर्याची प्राप्ती त्याला होऊ शकेल. ' सा विद्या या विमुक्तये । ' तेच खरे शिक्षण की, ज्याच्यामुळे मानवाची कृत्रिम, असत्य, अशाश्वत बंधनांतून मुक्ती होते, या मताशी ते संपूर्णपणे सहमत आहेत. इतर अनेक थोर शिक्षणतज्ज्ञांनी मानलेले ' व्यक्तीचा सर्वांगीण विकास ' हे ध्येयसुद्धा रवींद्रनाथांनी स्वीकारलेले दिसते. परंतु इतर शिक्षणशास्त्रज्ञांनी व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक व नैतिक विकासांवरच विशेष भर दिलेला आहे. या त्रिविध विकासाबरोबरच रवींद्रनाथांनी अध्यात्मिक विकासावर अधिक जोर दिला आहे. शरीरमनाबरोबरच आत्म्याचा विकास घडवून आणणे, विश्वातील सत्यम्-शिवम्-सुंदरम् या चिरंतन मूल्यांची जपणूक करणे हेच शिक्षणाचे खरे ध्येय आहे असे ते मानतात. ब्रिटिशांनी तयार केलेल्या शिक्षणाने आपण केवळ त्यांच्याच संस्कृतीचे अंधानुकरण करीत आहोत. आपली संस्कृती, आपले तत्त्वज्ञान व आपली मूल्ये यांचे ज्ञान मिळवून ती प्रथम आत्मसात केली पाहिजेत. पाश्चिमात्यांनी विज्ञानाच्या क्षेत्रामध्ये अपूर्व प्रगती साधलेली आहे. त्यांचा स्वीकार आपण जरूर केला पाहिजे. मात्र तो स्वीकार

करीत असताना आपण स्वतःला विसरून जाता कामा नये. पाश्चिमात्यांना देण्यासारखी चिरंतन मूल्ये व मानवतेची संस्कृती आपणांजवळ आहे, असा विश्वास शिक्षणामुळे प्रत्येकाच्या मनामध्ये निर्माण झाला पाहिजे.

### शिक्षक

शिक्षकाने स्वतः विद्यार्थी असले पाहिजे. मनही अत्यंत संस्कारक्षम व नवनवीन अनुभव व ज्ञान ग्रहण करावयास तत्पर असले पाहिजे. आपल्या दिव्यांनी दुसरे दिवे पेटावेत असे वाटत असल्यास आपल्या दिव्यातील ज्योत सतत पेटत असली पाहिजे. शिक्षकांच्या बाबतीत लक्षात ठेवण्यासारखी आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी मुलांच्या बौद्धिक पातळीशी समरस होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पोहऱ्याने विहिरीतून पाणी काढावयाचे असल्यास त्याला जसे खाली जावे लागते, तसेच विद्यार्थ्यांच्या सहजप्रवृत्ती व नैसर्गिक शक्ती विकसित करावयाच्या असल्यास शिक्षकांनी त्यांच्यांशी समरस झाले पाहिजे. यासाठी रवींद्रनाथांनी आपल्या शाळेत विद्यार्थी व शिक्षक यांचे सहजीवन अंगीकारले आहे. त्यामुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांबद्दल प्रेम, सहानुभूती व विश्वास वाटू लागेल. विद्यार्थ्यांच्या नाजूक भावनांशी हळुवारपणे वागण्याचे तंत्र त्यांना जमेल. प्राचीन ऋषिमुनींच्या आश्रमशाळेप्रमाणेच रवींद्रनाथांच्या शाळेतील शिक्षकाची भूमिका ही केवळ पित्याचीच नव्हे, तर मातेचीही असणे अगत्याचे होते.

### अध्यापन-पद्धती

त्यांच्या शाळेमध्ये संपूर्ण बालस्वातंत्र्य असल्याकारणाने विद्यार्थी स्वानुभवाने शिकत. कृतियुक्त शिक्षणपद्धती हा अध्ययन-अध्यापन-प्रक्रियेचा आत्मा असे. विद्यार्थी निरनिराळ्या प्रकारचे ज्ञान स्वानुभवाने मिळवीत असत. त्यांच्या ज्ञानेंद्रियांचा विकास होण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न शिक्षक करीत असत. संगीत, चित्रकला, नाट्य, रंगकाम, हस्तोद्योग यांना अभ्यासक्रमामध्ये भरपूर प्रमाणात वाव दिलेला असे. विद्यार्थ्यांचे निसर्गाशी साहचर्य घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जात असत. निसर्ग हे परमेश्वराचे हस्तालिखित आहे असे रवींद्रनाथ म्हणत. " We should have the gift to be natural with nature and human with human society." बौद्धिक व भावनिक शिक्षणाबरोबरच शारीरिक व कर्मेंद्रियाच्या विकासासाठी श्रमाच्या विविध उद्योगांना अभ्यासक्रमामध्ये स्थान दिलेले असे. श्रमिक उद्योगामुळे सभोवतालच्या मानवी व सामाजिक परिसराशी आपण एकरूप होऊ शकतो व सहानुभूती, प्रेम, विश्वास

आपणांमध्ये निर्माण होऊ शकतात अशी रवींद्रनाथाची धारणा होती. मन सचेतन करण्यासाठी उद्योग म्हणजे एक यक्षिणीची कांडीच होय. रवींद्रनाथांच्या शाळेमध्ये जुन्या-नव्यांचा सुरेख संगम झालेला दिसून येतो. तेथील वातावरण ऋषिमुनींच्या अश्रमाप्रमाणे असे, तर फ्रोबेल, मॉंटेसरी, ड्यूई यांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे कृतियुक्त शिक्षणपद्धतीचाही अंगीकार केलेला दिसे. भाषेच्या अध्यापनासाठी Direct Method चा अंगीकार करणारे रवींद्रनाथ हे पहिले शिक्षक असावेत. विज्ञानाचे महत्त्व जाणून व त्याच्या अध्ययनाला योग्य दिशा मिळावी म्हणून रवींद्रनाथांनी एक सुसज्ज प्रयोगशाळा आपल्या संस्थेत निर्माण केली होती. या सर्व गोष्टींवरून रवींद्रनाथांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानात पौर्वात्य, पाश्चिमात्य, आधुनिक व पुरातन शैक्षणिक मूल्यांचा सुरेख संगम झाल्याचे आपणांस दिसून येते.

## शांतिनिकेतन

'शांतिनिकेतन'ची स्थापना करण्याची प्रेरणा रवींद्रनाथांना लहान मुलांबद्दल वाटणाऱ्या आत्यंतिक प्रेमातून झाली. त्याचप्रमाणे त्यांना स्वतःच्या बालपणी औपचारिक शिक्षणपद्धतीचे जे कटु अनुभव आले व त्यांतून ज्या यातना सहन कराव्या लागल्या, त्या भावी पिढीतील बालबालिकांना सहन कराव्या लागू नयेत म्हणून त्यांच्याबद्दल वाटणाऱ्या अपार करुणेतूनही शांतिनिकेतनची कल्पना त्यांना सुचली असणे पुष्कळ अंशी शक्य आहे. शिक्षणाच्या कार्यास वाहून घेण्याचे त्यांनी जे व्रत स्वीकारले त्याला त्यांनी केलेला वेद व उपनिषदांचा प्रगाढ अभ्यासही कारणीभूत झाला असावा. प्राचीन काळच्या आश्रम-शाळेतील साधेपणाबद्दल व अकृत्रिम, वैभवसंपन्न व समृद्ध जीवनाबद्दल त्यांना विलक्षण ओढ वाटत असे. त्याचेच प्रत्यंतर त्यांनी स्थापन केलेल्या शांतिनिकेतन येथील संस्थेमध्ये पाहावयास मिळते. बोलपूर येथे त्यांच्या जन्मानंतर दोन वर्षांनी देवेंद्रांनी आपल्या शांतिसाधनेसाठी एक आश्रम स्थापन केला होता. त्याच ठिकाणी चाळीस वर्षांनंतर रवींद्रनाथांनी शिक्षक म्हणून आपल्या कार्याची सुरवात केली. या शाळेमध्ये प्रथम चार-पाच मुलेच दाखल झाली होती. यांतील एक मुलगा तर त्यांचा स्वतःचाच होता व उरलेली चार मुले उनाड व समाजाकडून तिरस्कृत मानलेली अशीच होती. पुढील काही वर्षांमध्ये विद्यार्थि-संख्या १५० ते २०० पर्यंत वाढली. शाळा स्थापन करताना ज्या कल्पना रवींद्रनाथांनी उराशी बाळगल्या होत्या, त्यांना साकार करण्याचा प्रयत्न रवींद्रनाथांनी येथे केला. येथील वातावरण अत्यंत शांत व निसर्गरम्य ठेवण्यात आले होते. शहरी जीवनाच्या कृत्रिमतेचा कोठल्याही प्रकारे संपर्क येथे लागू दिला जात नसे. शांतिनिकेतन म्हणजे एक रम्य उद्यान होते. तेथील वर्ग उघड्यावर, मोकळ्या हवेत, वृक्षांच्या घनदाट सावलीत भरत. प्रत्येक विद्यार्थी स्वतःचे आसन,

लेखनसाहित्य बरोबर घेऊन येत असे. एका कवीच्या प्रतिभेतून या शाळेची निर्मिती झालेली असल्यामुळे काव्य आणि काव्यमय वातावरण या दोन्ही गोष्टींची विपुलता येथे प्रत्ययास येत असे. शांतिनिकेतनची उभारणी प्राचीन ऋषिमुनींच्या आश्रमवासी जीवनावर झाली असली तरी आधुनिक काळाच्या गरजा पुरविणारी व आधुनिक पुरोगामी शैक्षणिक तत्त्वांचा स्वीकार करणारी अशी ही संस्था बनावी अशी रवींद्रनाथांची प्रबळ इच्छा होती. शिक्षक व विद्यार्थी यांनी आपल्यापुढे 'साधी राहणी व उच्च विचारसरणी' हे ध्येय सतत ठेवावे अशी त्यांची मनीषा होती. बाह्य उपचारांमधील साधेपणा व शाश्वत मूल्यांबद्दलची प्रखर आंतरिक निष्ठा या दोन गोष्टी भारतीयांनी केवळ पाश्चिमात्यांनाच नव्हे तर संपूर्ण जगाला शिकवाव्यात असे त्यांना वाटे.

शांतिनिकेतनमधील विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त स्वातंत्र्य व आनंदप्राप्ती देण्याचा रवींद्रनाथांचा प्रयत्न असे. अमुक एक गोष्ट करा असे ते मुलांना कधीच सांगत नसत. आपण कोणता उद्योग करावा हे ठरविण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना असे. ते विद्यार्थ्यांच्यावर संपूर्ण विश्वास ठेवीत; व विद्यार्थीही त्यांच्या विश्वासाला नेहमीच पात्र ठरत. शिस्तीचे प्रश्न सोडविण्यासाठी मुलांचेच एक न्यायमंडळ असे. स्वतः टागोरांनी मुलांना कधीही शिक्षा केली नाही. एकदा काही विद्यार्थी वर्गातील नेहमीच्या तासाला हजर नव्हते. त्यांचे विरुद्ध शिक्षकांनी तक्रार करताच रवींद्रनाथांनी त्या विद्यार्थ्यांना शालेय वातावरणात समरस करून घेण्यासाठी एका नाटकाच्या प्रयोगात त्यांना सहभागी करून घेतले. आणि विद्यार्थी तेथील वातावरणात इतके रममाण झाले की, पुढे कधी गैरशिस्तीचा प्रश्नच निर्माण झाला नाही. शिस्तीचे प्रश्न किंवा शालेय समस्या सोडविण्याचे रवींद्रनाथांचे मार्ग असामान्य असत. त्यामुळे सर्व अध्यापकवर्गापुढे टागोरांनी एक फार मोठा नवीन आदर्श ठेवला आहे, यात शंका नाही.

शांतिनिकेतन येथील दिवसाची सुरवात आणि शेवट संगीताच्या मधुर आलापात होत असे. बहुतेक सर्व गीतांची रचना रवींद्रनाथांनीच केलेली होती. पहाटेस भूपाळीच्या सुमधुर गायनाने विद्यार्थी जागे होत. काव्याचे विषय सूर्योदय, सूर्यास्त, वसंतागम, पुष्पवाटिका, पिकांची काढणी, वर्षाऋतू, चंद्रिका, दवबिंदू अशांसारखे असत. या काव्यामध्ये विद्यार्थ्यांना आत्मिक आनंद व मानसिक समाधान मिळत असे. शालेय कार्यक्रमांमध्ये प्रसंगोपात्त वसंत, वर्षा, शिशिर इत्यादी ऋतूंचे मोठे कल्पकतापूर्ण समारंभ साजरे केले जात असत. संगीत, नृत्य, नाट्य यांनी सर्व वातावरण चैतन्यमय होत असे. अध्यापनपद्धती आधुनिक कृतियुक्त शिक्षणास अनुकूल अशीच असे. शिक्षण ही एक आनंददायी साहसाची

प्रक्रिया आहे अशी त्यांची श्रद्धा असे. याकरिता विद्यार्थ्यांनी स्वप्रयत्नाने ज्ञान मिळविणे हेच अधिक हितकारक आहे असे ते म्हणत. परिश्रम न करता मिळालेले ज्ञान हे जीवनास कधीच उपयोगी पडणार नाही. या बाबतीत त्यांच्यापुढे आदर्श रॉबिन्सन रूसोचा होता. रूसोप्रमाणेच तेही निसर्गवादी होते. ज्ञानासाठी विद्यार्थ्यांनी धडपड करावी. चुकतमाकत शिकावे. हीच शिक्षणपद्धती नवनवीन अनुभव घेण्यासाठी उपयुक्त आहे अशी त्यांची श्रद्धा होती. सन १९०१ साली शांतिनिकेतनचे बीजारोपण झाले. त्या वेळी त्यांच्यापुढे विशिष्ट अशी कोणतीही योजना नव्हती. परंतु पुढील २० वर्षांमध्ये ते बीज नुसतेच अंकुरित झाले किंवा त्याला पानेफुले आली एवढेच नव्हे, तर त्यांच्या जीवनाच्या विकासाबरोबरच या महावृक्षाला संस्कृतीची, शैक्षणिक मूल्यांची व नवविचारांची सुमधुर फळेही लागली.

## दैनंदिन कार्यक्रम

शांतिनिकेतनमधील दैनंदिन कार्यक्रम खालीलप्रमाणे असे.

पहाटे ४–३०—जागृती–एक गट भूपाळी म्हणत असे. वैयक्तिक कामे–सफाई, व्यायाम, आंघोळ, प्रार्थना. अल्पोपाहार, उपनिषदांचे वाचन.

सकाळी ८ ते ११—बौद्धिक विषय.

दुपारी १२–००—भोजन.

दुपारी ४ ते ६—उद्योग—स्वाध्याय, गटचर्चा, खेळ, गाणी, गोष्टी, नास्त्य.

रात्री ८–००—भोजन.

रात्री ९–३०—झोप.–एका गटाचे गीतगायन.

## विश्वभारती

शांतिनिकेतनच्या स्थापनेनंतर २० वर्षांनी, २२ डिसेंबर १९२१ या दिवशी विश्वभारती या अद्वितीय संस्थेचे औपचारिक उद्घाटन झाले. आणि रवींद्रनाथांचे एक स्वप्न साकार झाले. मानवामानवांमध्ये भेद नसून त्यांमध्ये मूळची एकताच आहे आणि ही एकता जाणून घेण्यासाठी अशा संस्थेची अत्यंत आवश्यकता आहे, असे रवींद्रनाथांना कित्येक दिवस वाटत असे. पाश्चिमात्य राष्ट्रे आपली संस्कृती आपल्या शिक्षणसंस्थांतून विद्यार्थ्यांना शिकवीत असत. पौर्वात्य राष्ट्रांच्या शिक्षणात पाश्चिमात्य राष्ट्रांच्याच संस्कृतीचा, चालीरीतींचा व आचार-विचारांचा पगडा असे. भारतातील शिक्षणाचे चित्रही यापेक्षा निराळे नव्हते.

त्यामुळे भारतीयांना संस्कृतीच नाही की काय, असा संभ्रम उत्पन्न होऊ लागला होता. रुडियार्ड किपलिंगसारखे श्रेष्ठ कवी, The East is East and the West is West. The Two shall never meet ' असे तुणतुणे वाजवू लागले होते. अशा वेळी पाश्चिमात्य राष्ट्रांना देण्यासारखे ओजस्वी तत्त्वज्ञान भारतीयांच्या जवळही आहे, याचा आत्मप्रत्यय तरुणांना आणून देण्यासाठी विश्वभारतीची अत्यंत आवश्यकता होती. गेल्या कित्येक वर्षांमध्ये भारताने परक्यांची सर्व बाबतींत उसनवारी व अंधानुकरण चालविले होते. हा आपल्या संस्कृतीवरील हल्ला हा राजकीय पारतंत्र्यापेक्षाही अतिशय भयानक असाच होता. त्याला प्रतिकार करण्यासाठी व समानतेच्या भूमिकेवरून पाश्चिमात्यांशी एकता निर्माण करण्यासाठी विश्वभारतीचा जन्म झाला. पूर्व आणि पश्चिम देशांतील विद्वानांना विश्वभारतीमध्ये मानाने आमंत्रण दिले जात असे. ते आपल्या संस्कृतीची ओळख परस्परांना करून देत असत. येथील विद्यार्थिवर्गही सर्व जगातील राष्ट्रांतून येत असे. पाश्चिमात्यांचे विज्ञान व पौर्वात्यांचे तत्त्वज्ञान यांचा सुरेख संगम विश्वभारतीमध्ये घडावा अशी रवींद्रनाथांची इच्छा होती. विश्वभारतीचे बोधवाक्य ' यत्र विश्वं भवति एकनीडम् । ' असे होते. म्हणजे सर्व विश्व म्हणजे एक घरकुलच होय. आधुनिक विज्ञानाच्या नवनवीन शोधांनी, वाहतुकीच्या जलद साधनांमुळे, जग फार लहान होत चालले होते. परंतु निरनिराळ्या लोकांची हृदये एका विचाराने, एका संस्कृतीने व समान मूल्यांनी भारावून गेल्याशिवाय त्यांच्यामध्ये आपुलकी व शांतता प्रस्थापित होणे अशक्य होते. रवींद्रनाथांनी पहिल्या महायुद्धाचे दारुण परिणाम अनुभवले होते. संकुचित राष्ट्रवाद हा मानवतेला विनाशाच्या खाईत कसा निष्ठुरपणे लोटू शकतो हे त्यांनी आपल्या प्रदीर्घ प्रवासात अनुभवले होते. त्यावर उत्तम उपाय म्हणजे एकमेकांनी एकमेकांची संस्कृती, विचार समजून घेणे हाच होता. आणि त्याचसाठी विश्वभारतीची निर्मिती झाली होती. समजुतदारपणा, सहिष्णुता व सहकार्य या तत्त्वांच्या आधारावर विविधतेने नटलेल्या, मानवतेमध्ये सुसंवाद व सुरेल संगीत निर्माण करता येईल अशी त्यांना आशा होती. धर्मांच्या बाबतीतही त्यांचा दृष्टिकोन उदार होता. प्रत्येक धर्मामध्ये काही चांगली तत्त्वे आहेत अशी त्यांची धारणा होती. त्यांचा अभ्यास करून त्यांचा स्वीकार करावा असा त्यांचा आग्रह असे. स्त्री-पुरुषांमध्येही समानता असावी या मताचे ते होते. मात्र त्यांच्या नैसर्गिक वैशिष्ट्यानुसार शिशुसंगोपन, रुग्णसेवा, आरोग्य, शिक्षण, गृहव्यवस्था यांसारखी कामे स्त्रिया अधिक कुशलतेने करू शकतात असे त्यांचे मत होते.

सर्व मानवजातीमध्ये सुसंवाद निर्माण करण्यासाठी प्रथम प्रत्येक राष्ट्राने आपले अंतर्गत भेद मिटविले पाहिजेत. भारतातील प्रत्येक विद्यार्थ्याने देशाच्या

विविध भागांतील व भाषेतील विविध वाङ्मय, कला, संगीत, नृत्य, सामाजिक परंपरा, आचार-विचार समजून घेतले पाहिजेत. देशाच्या विविधतेमध्ये सुसंवाद निर्माण केला पाहिजे. केवळ एकसारखेपणा निर्माण करण्यावर त्यांचा विश्वास नव्हता. मात्र भिन्नतेतून सुसंवाद निर्माण करणे शक्य आहे असे त्यांना वाटत असे. आपल्या शिक्षणामध्ये पाश्चात्य संस्कृतीचा पगडा फार मोठ्या प्रमाणावर पडलेला असल्याचे दिसून येते. पाश्चात्य संस्कृतीतील व ज्ञान-विज्ञानातील नवनवीन उपयुक्त गोष्टी स्वीकारण्यास रवींद्रनाथांचा विरोध नाही. परंतु त्याचबरोबर केवळ पाश्चिमात्य राष्ट्रांची उसनवारी करणे व स्वतःची संस्कृती, तत्त्वज्ञान व जीवनमूल्ये विसरणे हे रवींद्रनाथांना मान्य नाही. वाङ्मय, कला, संगीत, नृत्य-नाट्य, शिल्प, सामाजिक परंपरा यांचा अमोल ठेवा भारतीयांच्या जवळ असताना त्यांनी स्वत्वाला विसरून दुसऱ्याची केवळ सांस्कृतिक लाचारी पत्करणे म्हणजे स्वाभिमान-शून्यतेचेच गमक होय. भारत हा एक महान देश आहे. त्यामध्ये अनेक शतकापासून नृत्य, गायन, शिल्प, भाषा यांचा विकास आपणांस पहावयास मिळतो. त्यांचे संपूर्ण ज्ञान भारतीयांना व्हावे म्हणून रवींद्रनाथांनी भारतातील विविध भागांत राहणाऱ्या विद्यार्थ्यांना विश्वभारतीत येण्याचे व आपली कला व संस्कृती समजून घेण्याचे आवाहन केले. स्वतःची संस्कृती समजून घेतल्यानंतर आपल्या शेजारील राष्ट्राची संस्कृती समजून घेण्यासाठी त्यांनी इराण, सीलोन, ब्रह्मदेश, मलाया, तिबेट, चीन आणि जपान या राष्ट्रांतील विद्यार्थ्यांना विश्वभारतीमध्ये प्रवेश देण्याचा प्रयत्न केला. कोणत्याही राष्ट्राची संस्कृती ही एकाकी किंवा आत्मनिर्भर असू शकत नाही. इतर देशांच्या संस्कृतीशी मिळते-जुळते किंवा देवाण-घेवाण करण्यासारखे प्रत्येक राष्ट्राजवळ काहीना काही असतेच. या विविधतेमध्ये समानता किंवा एकता जाणणे हाच विश्वभारतीच्या शिकवणुकीचा गाभा आहे. आपल्या शेजारच्या राष्ट्राची संस्कृती समजून घेतल्यानंतर आशिया खंडातील विद्वानांना पाश्चिमात्य राष्ट्रांतील संस्कृतीचा समतेच्या भूमिकेवरून अभ्यास करता येईल. यासाठी पाश्चिमात्य राष्ट्रांतील विद्यार्थी व शिक्षक यांना विश्वभारतीमध्ये येण्याचे व आशियायी राष्ट्रांतील विद्यार्थ्यांच्या बरोबर सहजीवन जगण्याचे आवाहन करण्यात आले होते.

विश्वभारतीतील वातावरण प्रेमाचे व कौटुंबिक रहावे यासाठी शिक्षक-दांपत्यांना येथेच येऊन राहण्यास प्रोत्साहन देण्यात येत असे. अशा शिक्षक-दंपतींच्या ताब्यात विद्यार्थ्यांचा एक एक गट सोपवून देण्यात येत असे. हे कुलपिता किंवा या कुलमाता विद्यार्थि–विद्यार्थिनींच्या जीवनातील सर्व प्रकारच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यांचे निवारण करण्यासाठी अत्यंत जिव्हाळ्याने प्रयत्न करीत असत. मुलींच्यासाठी स्वतंत्र वसतिगृहाची सोय करण्यात आली होती.

विश्वभारतीच्या साह्याने आपले ' वसुधैव कुटुंबकम् ' चे स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न रवींद्रनाथांनी केला. त्यामध्ये मानवतेसंबंधी त्यांचा विशाल दृष्टिकोन प्रत्ययास येतो.

### श्रीनिकेतन

आपली शैक्षणिक व्यवस्था जीवनाच्या सर्व अंगोपांगांना स्पर्श करणारी असली पाहिजे असे रवींद्रनाथांचे मत होते. केवळ बौद्धिक विकास करून भारतीयांचे प्रश्न सोडविता येणार नाहीत अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. भारताचा राष्ट्रपुरुष अज्ञान, दारिद्र्य व अनारोग्य या व्याधींनी पीडलेला असल्याकारणाने तो अत्यंत निस्तेज व निःसत्त्व बनला आहे असे त्यांना वाटे. यामध्ये सर्वांत प्रथम व सर्व जीवनाला ग्रासून टाकणारी समस्या म्हणजे भारतीयांचे दारिद्र्य हेच होय. या दारिद्र्यामुळेच अनेक क्षेत्रांतील विकासाचे मार्ग भारतीयांना बंद झाले आहेत. भारताची जनता फार मोठ्या प्रमाणामध्ये खेड्यातून राहिलेली दिसते. याकरिता रवींद्रनाथांनी ग्रामीण पुनर्रचनेचे कार्य करावे म्हणून विश्वभारतीच्या स्थापनेनंतर काही आठवड्यातच १९२२ च्या फेब्रुवारी महिन्यात श्रीनिकेतनची स्थापना केली. हा प्रयोग शांतिनिकेतनपासून काही मैलांवर असलेल्या सुरूल या एका छोट्या खेडेगावात सुरू करण्यात आला. श्रीनिकेतन हे नाव अतिशय अन्वर्थक आहे. श्री म्हणजे लक्ष्मी किंवा संपत्ती वा समृद्धी. श्रीनिकेतन म्हणजे स्वप्रयत्नातून निर्माण केलेल्या संपत्तीचे, वैभवाचे जणू माहेरघरच होय. भारतीयांच्या उन्नतीच्या आड त्यांचे अठराविश्वे दारिद्र्य नेहमीच येते. परंतु या दारिद्र्यासुद्धा इतर कोणत्याही कारणापेक्षा त्यांनी आत्मविश्वास गमावला हेच प्रमुख कारण दिसून येते. हा हरवलेला आत्मविश्वास त्यांना परत मिळवून देणे हा सुरूल येथील ग्रामीण पुनर्रचनेचा पाया होता. भारतामध्ये अमाप नैसर्गिक साधनसंपत्ती व अफाट लोकसंख्या आहे. तिचा नियोजनपूर्वक व कौशल्याने उपयोग केल्यास आपल्या भौतिक जीवनामध्ये समृद्धी निर्माण करण्यास आपणांस वेळ लागणार नाही असे त्यांचे मत होते. यासाठी प्रथम लोकांनी सहकाराचा अंगीकार करण्यास शिकले पाहिजे. "विना सहकार नहीं उद्धार" हे तत्त्व भारतीयांच्या रोमरोमामध्ये व्यापून राहिले पाहिजे. सार्वत्रिक दुःखे, समस्या किंवा अडचणी सामुदायिक प्रयत्नांतूनच दूर करता येतात; इतकेच नव्हे, तर ती दुःखे व अडचणी दूर करण्यासाठी स्वावलंबन करावे लागते, ही गोष्ट भारतीय जनतेला पटवून देणे आवश्यक होते. या दृष्टीने विचार करता भारतीयांच्या पुनरुत्थानाचा अचूक मार्ग रवींद्रनाथांना गवसला होता असेच म्हणावे लागेल. वरील सहकाराप्रमाणेच ग्रामीण पुनर्रचनेचे कार्यक्रम हाती घेण्यापूर्वी जनतेला तिच्या अडचणींची, साधन-संपत्तीची, गुणदोषांची जाणीव करून देणे आवश्यक होते. कारण अडचणींचे

निवारण करण्याकरिता जी उपाययोजना करावयाची ती स्थानिक परिस्थितीवर व साधनसामग्रीवर आधारलेली असली पाहिजे. म्हणून रवींद्रनाथांनी जवळपासच्या विभागांची तपशीलवार पाहणी करण्याचे किंवा नव्या शब्दांत बोलावयाचे तर सर्वेक्षणाचे कार्य अत्यंत आवश्यक मानले. ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्यक्रमांची उभारणी सर्वेक्षणाच्या पायावर करण्याचा पहिला प्रयत्न रवींद्रनाथांनी केला असे म्हटल्यास ते वावगे होणार नाही. त्यांच्या संस्थेमध्ये जीवनात प्रत्यक्ष सामोरे येणारे प्रश्न कसे सोडवावयाचे याचेही शिक्षण देण्याचा कार्यक्रम आखण्यात आला होता. ग्रामीण जनतेपुढे धान्योत्पादनात वाढ करणे हा प्रश्न असे. त्यासाठी अधिक धान्य कसे पिकविता येईल, भाजीपाल्याचे उत्पादन कसे वाढविता येईल, शेतीला उपयुक्त असे कोणते जोडधंदे करता येतील याची सप्रयोग माहिती ग्रामीण जनतेला देण्यात येत असे. हे सर्व कार्य करण्यासाठी कार्यकर्ते तयार करणे ही सर्वप्रथमची गरज होती. त्यानुसार रवींद्रनाथांनी श्रीनिकेतन येथे कार्यकर्त्यांसाठी अनेक शिबिरे घेतली. आज स्वातंत्र्य मिळाल्यानंतर समाजविकास योजना राबविण्यासाठी ग्रामीण पातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न ठिकठिकाणी प्रशिक्षण शिबिरे घेऊन आपण करीत असतो. अशा तऱ्हेने प्रशिक्षित कार्यकर्ते प्रथम तयार केले पाहिजेत हे आपणांस रवींद्रनाथानीच शिकविले. रवींद्रनाथांची दृष्टी जशी भावनाशील कवीची तशीच ती एका थोर समाजशास्त्रज्ञाचीही होती.

श्रीनिकेतनची सुरवात शांतिनिकेतनप्रमाणे अत्यंत लहान प्रमाणातच झाली. मिस्टर एल्महर्स्ट या कृषिशास्त्रज्ञाच्या मार्गदर्शनाखाली या प्रयोगामध्ये शांतिनिकेतन येथील काही विद्यार्थी आणि प्राध्यापक सहभागी झाले. ग्रामीण जीवनात प्रत्यक्ष सहभागी होऊन तेथील समस्यांचे निवारण करण्याचा प्रयत्न करणे, हा या प्रयोगाचा हेतू होता. श्रीनिकेतन हे केवळ तात्त्विक विचार करणारे केंद्र म्हणून राहणार नव्हते. तर भारतीय जीवनातील आर्थिक बाबींचा या ठिकाणी प्रत्यक्ष प्रयोग करून ते जीवन अधिक संपन्न व वैभवशाली कसे करता येईल हे प्रयोगाने सिद्ध करायचे होते. मि. एल्. के. एल्महर्स्ट यांच्या मदतीला रवींद्रनाथांचे एक चिरंजीव होते. हे दोघेही सेवाविस्तार कार्यामध्ये व त्यासंबंधीच्या तंत्रमंत्रामध्ये चांगले प्रवीण होते. ग्रामीण लोकांशी कसे वागावे, त्यांच्याकडून आपला व आपल्या योजनांचा स्वीकार कसा करून घ्यावा यासंबंधीचे ज्ञान व हातोटी त्यांना सहजसाध्य होती. ग्रामीण विभागात समरस होणारे योग्य कार्यकर्ते मिळेपर्यंत ग्रामीण पुनर्रचनेचे कार्य अंगीकारण्यास रवींद्रनाथ तयार नव्हते.

श्रीनिकेतनमध्ये विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण देण्यात येत असे. या शिक्षणातून तेथील प्रौढ विद्यार्थ्यांना आपल्या भावी आयुष्यात उपयोगी पडणारे

विविध व्यवसायांतील कौशल्य प्राप्त करून घेता यावे, हा त्यामागे त्यांचा हेतू होता. सुतारकाम, विणकाम, पुस्तकबांधणी, मृत्तिकाशिल्प इत्यादी ग्रामीण जीवनाशी निगडित असलेले व्यवसाय या ठिकाणी शिकविण्यात येत असत. रंगकाम व कला-कुसर अभिरुचिपूर्ण व्हावी म्हणून कलाशिक्षकांचा उपयोग करून घेण्यात येत असे. श्रीनिकेतनच्या प्रकल्पामुळे ग्रामीण जनतेला केवळ अर्थार्जनाचेच मार्गदर्शन करण्यात आले असे नसून त्यांचा जीवन जगण्याचा उत्साह व आनंद वाढविण्यासाठी मदत करण्यात आली. लोकांची मानसिक गुलामगिरीतून सुटका झाल्याशिवाय, त्यांनी गमावलेला आत्मविश्वास त्यांना परत मिळवून दिल्याशिवाय भारत खऱ्या अर्थाने कधीच स्वतंत्र होणार नाही, अशी रवींद्रनाथांची खात्री होती.

**श्रीनिकेतन : उद्दिष्टे**

१. स्थानिक लोकांच्या जीवनात प्रामाणिकपणे समरस होऊन त्यांचा विश्वास संपादन करणे व त्यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित करणे.

२. ग्रामीण जीवनातील विविध समस्यांचा अभ्यास करून त्यांवर संभाव्य उपाय शोधून काढणे.

३. ग्रामीण लोकांचे आर्थिक, आरोग्यविषयक व सामाजिक प्रश्न प्रत्यक्षपणे सोडविण्याचा प्रयत्न करणे.

४. बालवीर चळवळीच्या तत्त्वज्ञानानुसार नागरिकत्वाचे व सामाजिक कर्तव्यांचे मुलांमुलींना शिक्षण देणे.

५. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून पशुपालन, कुक्कुटपालन, सुतारकाम, लोहारकाम इत्यादी ग्रामीण उद्योगधंद्यांविषयी शास्त्रशुद्ध माहिती मिळविण्यास त्यांना उद्युक्त करणे.

श्रीनिकेतन या ठिकाणी विद्यार्थ्यांना रहाण्यासाठी वसतिगृहाची सोय करण्यात आली होती. व्यावसायिक ज्ञानाबरोबर विज्ञान, गणित, भाषा या विषयांचेही ज्ञान देण्यात येत असे. विद्यार्थ्यांनी स्वतः वाचून उपयुक्त ज्ञान मिळवावे यासाठी एका समृद्ध वाचनालयाची तेथे सोय करण्यात आली होती.

◆ ◆ ◆

# स्वामी विवेकानंद

| | |
|---|---|
| जन्म | १८६३ |
| मृत्यू | १९०२ |

पारतंत्र्याच्या काळात भारतीयांच्या निःसत्त्व व निरुत्साही जीवनात चैतन्य ओतून त्यांना स्वत्त्वाची जाणीव करून देण्याचा ज्या लोकोत्तर भारतीय पुरुषांनी प्रयत्न केला, त्यांमध्ये स्वामी विवेकानंदांचे नाव विशेषत्वाने उल्लेख करण्यासारखे आहे. पारतंत्र्यामुळे भारतीय जनता स्वतःच्या संस्कृतीला, पराक्रमाला व कर्तृत्वाला पारखी झाली होती. केवळ अंधानुकरण करून हीन दर्जाचे जीवन जगण्यामध्ये त्यांना कृतार्थता वाटत होती. आपल्या धर्माची शिकवण व आपल्या पूर्वजांनी आपल्याला दिलेला अध्यात्मिक वारसा किती उदात्त व भव्य आहे याचा विसर भारतीयांना पडला होता. विवेकानंदांनी या निःसत्त्व जनतेला आपल्या, ' उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्, निबोधत ' या दिव्य संदेशाने खडबडून जागे केले. हिंदुधर्माच्या उदात्त व गतिमान शिकवणीचा त्रिखंडात प्रसार करून भारतीयांच्या कीर्तीची पताका जगातील लोकांच्या हृदयसिंहासनावर फडकविण्याचा मान पटकाविला. भारतामध्ये ज्ञानेश्वर, शंकराचार्य यांनी जे अद्वितीय कार्य केले तशाच प्रकारचे लोकोत्तर कार्य आपल्या ३९ वर्षांच्या अल्प जीवनामध्ये करून दाखविण्याचा महान विक्रम स्वामी विवेकानंदांनी केला.

विवेकानंदांचे घराणे बंगालमधील सारस्वत जमातीमधील एक अग्रगण्य घराणे होते. त्यांच्या घराण्यामध्ये त्यांचे पणजोबा राममोहन दत्त त्या काळचे एक सुप्रसिद्ध वकील होते. त्यांचे आजोबा दुर्गाचरण दत्त हे स्वभावतःच परमार्थमार्गी होते. त्यांनी अवघ्या २५ व्या वर्षीच संन्यासाची दीक्षा घेतली होती. त्यांचे वडील विश्वनाथ दत्त यांनीही एक उत्तम वकील म्हणून बंगालमध्ये नावलौकिक मिळविला होता. वकिलीच्या धंद्यामध्ये त्यांनी अलोट पैसा मिळविला व दानधर्मासाठी खर्च करून टाकला. विवेकानंदांची आई धार्मिक प्रवृत्तीची व शिवभक्त होती. बरेच दिवस या दंपतींना पुत्ररत्नाचा लाभ न झाल्याकारणाने भुवनेश्वरी अत्यंत दुःखी व कष्टी असे. पुत्राच्या प्राप्तीसाठी ती अनेक व्रतवैकल्ये करीत असे. याचकरिता काशी येथील विश्वनाथालाही तिने अनेक प्रकारे पूजाअर्चा व अभिषेक यांच्याद्वारा पुत्रप्राप्तीसाठी साकडे घातले होते. अशा मानसिक अवस्थेमध्ये एकदा शंकराची पूजा करीत असताना तिला साक्षात्कार झाला व प्रत्यक्ष शंकराने आपणांस दर्शन देऊन आपले मनोरथ पूर्ण होणार म्हणून आशीर्वाद दिला, असे तिला वाटले. त्यानंतर थोड्याच दिवसात–१२ जानेवारी १८६३ रोजी कलकत्ता येथील आपल्या निवासस्थानी भुवनेश्वरीला पुत्ररत्नाचा लाभ झाला. त्याचे नाव नरेंद्र असे ठेवण्यात आले. त्याला घरातील सर्व मंडळी ‘ बिले ’ या टोपण नावाने संबोधीत असत. नरेंद्र हा लहानपणी अतिशय खोडकर होता. परंतु आईवडिलांची मायेची पाखर त्याच्यावर सदैव असल्यामुळे त्याच्या खोड्यांना फारसा प्रतिबंध होत नसे. अशा मुक्त व स्वच्छंदी वातावरणामध्ये नरेंद्राचे पालनपोषण उत्तम रीतीने झाले. लहानपणापासूनच वैवाहिक जीवनाचा तिटकारा त्याच्या मनामध्ये पूर्णपणे बिंबला होता. त्याने एकदा खेळण्यासाठी सीतारामाच्या मूर्ती आणल्या होत्या. आई जशी देवदेवतांची पूजाअर्चा करीत असे तसाच नरेंद्रही तिच्या अनुकरणाने सीतारामाची पूजा करण्याचा खेळ खेळत असे. एके दिवशी घरातील मोतद्दाराशी गप्पागोष्टी करीत असताना, वैवाहिक जीवनातील कटकटी, दुःखे व परावलंबित्व यांचे रसभरीत वर्णन त्याने ऐकले. तेव्हापासून, रामाने विवाह केला असल्याकारणाने सीतारामावरची त्याची भक्ती पार उडून गेली. एवढेच नव्हे, तर आपल्या घरातील गच्चीवरून त्याने त्या मूर्ती खाली भिरकावून दिल्या. नरेंद्राच्या घरचे वातावरण धर्मभेद, जातिभेद न मानणारे होते. त्याच्या वडिलांचा पेशा वकिलीचा असल्याकारणाने घरामध्ये निरनिराळ्या जातींचे व धर्मांचे पक्षकार नेहमी ये-जा करीत असत. त्यांच्याशी नरेंद्र अत्यंत आपुलकीने वागत असल्याकारणाने त्याच्या मनामध्ये जातिजातींतील किंवा धर्मांधर्मातील विषमतेची विषवल्ली रुजू शकली नाही. मुसलमानांबरोबर सलगीने वागण्यात किंवा त्यांच्याबरोबर आहार घेण्यात त्याला कसलीच दिक्कत

वाटत नसे. ही समतेवरील निष्ठा त्याच्या जीवनात सतत दिसून येते. त्याच्या घरामध्ये निरनिराळ्या धर्मीयांकरिता निरनिराळ्या प्रकारचे हुक्के ठेवलेले असत, याची नरेंद्राला मोठी गंमत वाटे. निरनिराळ्या हुक्क्यांमध्ये कोणती भिन्नता आहे हे पाहण्यासाठी त्याने एकदा सर्व हुक्के ओढून पाहिले होते. त्याला शंकर व हनुमान यांच्याबद्दल फार आदर वाटत असे. हनुमानाचा पराक्रम, स्वामिनिष्ठा व ब्रह्मचर्याचे तेज यासंबंधीच्या गोष्टी ऐकून तो मंत्रमुग्ध होत असे. सर्वांगाला भस्म लावून परमेश्वराचे चिंतन करण्याचे वेड त्याला लहानपणीच लागले होते. ब्राह्मोसमाजाच्या शिकवणीचा पगडा त्या वेळी बंगाली लोकांच्या जीवनावर विशेषत्वाने असल्याकारणाने ध्यानधारणा व समाधी यांचा सराव करण्याची प्रवृत्ती अनेक घराण्यांमध्ये दिसून येई. विशेष गोष्ट अशी की, चिंतनाच्या प्रक्रियेमध्ये नरेंद्राची प्रगती फारच अल्पावधीत झाली. आपल्या दोन भुवयांमध्ये त्याला एक ज्योतिर्गोल अगदी अल्पवयातच दिसत असे. मन एकाग्र करण्याची त्याची शक्ती विलक्षण होती. एकदा आपल्या सवंगड्यांसमवेत चिंतन करीत बसला असता त्यांच्याजवळ एक साप आला. सापाला पाहिल्याबरोबर इतर मुलांची तर घाबरगुंडी झाली. परंतु विवेकानंदांच्या एकाग्रतेत कसलाही विग्रह निर्माण झाला नाही.

विवेकानंदांचे शिक्षण कलकत्त्याच्या मेट्रॉपॉलिटन स्कूलमध्ये त्यांच्या वयाच्या पाचव्या वर्षीच सुरू झाले. परंतु शाळेच्या कृत्रिम व बंधनयुक्त वातावरणात त्यांचे मन रमू शकले नाही. त्यांच्या शिक्षणासाठी वडिलांनी खाजगी शिक्षकांची नियुक्ती केली होती. त्यांच्या जुन्या अध्यापन-पद्धतीला ते अतिशय कंटाळले. स्वच्छंदी-पणाने निरनिराळे खेळ खेळावे, मित्रांबरोबर निरनिराळ्या उपवनांमध्ये भटकावे, झाडांवर चढावे इत्यादी कार्यक्रमात ते अगदी गुंग असत. शाळेमध्ये गुरुजींच्या अध्यापनाकडे त्यांचे लक्ष लागत नसे. काही वेळाने ते इतके बेचैन होत असत की, त्यामुळे ते आपले कपडे व पुस्तके फाडून टाकण्यासही मागेपुढे पहात नसत. त्यांच्या मनामध्ये भीतीचा लवलेशही नव्हता. एकदा ते चाफ्याच्या झाडावर वटवाघळा-प्रमाणे उलटे टांगून घेऊन मित्राला आपला पराक्रम दाखवीत होते. हे पाहून एका वृद्ध नातलगांना त्यांच्या संरक्षणाची फार काळजी वाटली. अशा खोड्यांपासून त्यांना परावृत्त करण्यासाठी त्यांनी त्या चाफ्याच्या झाडावर ब्रह्मराक्षस असल्याचे नरेंद्रांना सांगितले. ते ऐकून ब्रह्मराक्षसाला हुडकून काढण्यासाठी नरेंद्रांना झाडांवर चढण्याचा चेवच आला. शाळेमध्ये असताना अभ्यासापेक्षा इतर कार्यक्रमांमध्येच नरेंद्रांची अधिक प्रगती दिसून येई. एकदा त्यांच्या शाळेचे शिक्षक सेवेतून निवृत्त

झाले. त्या प्रसंगी सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षकांना निरोप-समारंभाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. विद्यार्थ्यांतर्फे भाषण करण्याचे काम करण्यास कोणीच धजेना. त्या प्रसंगी नरेंद्राने इतके उत्तम भाषण केले की, सुरेंद्रनाथ बानर्जींसारख्या सबंध भारतवर्ष आपल्या तुफान भाषणाने निनादून सोडणाऱ्या पट्टीच्या वक्त्याकडूनही त्यांनी शाबासकी मिळविली. याच अमोघ वक्तृत्वामुळे शिकागो येथील सर्वधर्म-परिषदेतील श्रोतृवर्गाची मने त्यांनी पुढे जिंकली. सन १८८० साली त्यांनी कलकत्त्याच्या प्रेसिडेंसी कॉलेजमध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला. तेथे असताना त्यांनी भारतीय व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला. हर्बर्ट स्पेन्सर व जॉन स्टुअर्ट मिल यांच्या तत्त्वज्ञानाचा त्यांच्यावर प्रभाव पडला. तत्त्वज्ञानाबरोबरच काव्याबद्दलही त्यांना विलक्षण ओढ होती. वर्डस्वर्थ, शेले हे त्यांचे आवडते कवी होते. बॉक्सिंग, क्रिकेट, पोहणे, स्वयंपाक, घोडदौड या छंदांमध्येही त्यांची प्रगती वाखाणण्यासारखी होती. सर्वांत विशेष म्हणजे तत्त्वज्ञानामध्ये त्यांची प्रगती एवढी होती की, प्रेसिडेंसी कॉलेजचे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक प्रो. हेस्टी असे म्हणत असत की, जर्मन व इंग्लिश विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांमध्ये नरेंद्राइतका बुद्धिमान व तत्त्वज्ञ विद्यार्थी दिसून येणार नाही. प्रो. हेस्टी यांचा तत्त्वज्ञानाचा अभ्यास चांगला सखोल होता. त्यांनी जगातील निरनिराळ्या राष्ट्रांमध्ये भरपूर प्रवास केला होता. त्यांनी दिलेले हे शिफारसपत्र चांगलेच बोलके होते.

बंगालमध्ये सामाजिक व धार्मिक पुनर्रचनेची एक लाट त्या वेळी उसळली होती. राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, केशवचंद्र सेन यांसारख्या थोर लोकांनी इंग्रजांच्या सांस्कृतिक आक्रमणाला पायबंद घालण्यासाठी व हिंदुधर्मातील सामाजिक व आध्यात्मिक अवनती टाळण्यासाठी पराकाष्ठेचे प्रयत्न चालविले होते. हिंदुधर्मातील सतीच्या चालीसारख्या रूढीविरुद्ध त्यांनी बंड पुकारले.

## सद्‌गुरु

सन १८८१ मध्ये त्यांची श्रीरामकृष्ण परमहंस यांच्याशी ओळख झाली. त्या काळी विवेकानंद एक पराकाष्ठेचे संदेहवादी म्हणून ओळखले जात असत. कोठलीही गोष्ट किंवा कोठलाही विचार बुद्धीच्या निकषावर घासूनपुसून पाहिल्या-शिवाय ग्रहण करावयाचा नाही असा त्यांचा ठाम निर्धार होता. ब्राह्मो-समाजात प्रचलित असलेले चिंतन-मनन यांची उपासना ते करीत असत. त्यामुळे कोणत्याही गोष्टीकडे अत्यंत सूक्ष्म दृष्टिकोनातून व मूलग्राही विचारातून पाहण्याची त्यांना सवय जडली होती. सगुण व साकार परमेश्वराच्या भक्तीमुळे ईश्वरप्राप्ती होईल की

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५५३५

नाही याबाबत त्यांना संदेह वाटत होता. परमेश्वराचे अस्तित्व मानणेच संशयास्पद वाटत होते. म्हणून ते ज्या त्या साधु-संन्याशाला तुम्ही प्रत्यक्ष परमेश्वर पाहिला आहे का ? असा सवाल करीत असत. हा रोखठोक प्रश्न ऐकताच अनेक कच्च्या दिलाचे व कमकुवत तयारीचे तथाकथित संन्यासी डगमगून जात असत. नरेंद्राने हाच प्रश्न श्रीरामकृष्ण परमहंस यांना विचारला आणि तत्काळ त्यांनी उत्तर दिले, 'हो, मी तर परमेश्वर पाहिला आहेच, पण तुलाही दाखवतो.' आणि चमत्कार असा की, त्यांच्या साध्या करकमलाच्या स्पर्शाने नरेंद्राची समाधी लागून त्याचा सर्व मोह, संशय दूर झाला. थोर लोकांच्या आयुष्यामधील असे क्षण अत्यंत महत्त्वाचे असतात. गौतमबुद्धाला एका साध्या वृक्षाखाली अंतःकरणाची व मनाची विशिष्ट तयारी झाल्यावर एका निमिषार्धात आत्मज्ञान झाले. जगाचे कोडे उलगडले; मोह-मायेचे पटल दूर झाले; संशयाने ग्रासलेला अंतरात्मा विशुद्ध स्वरूपात देदीप्यमान दिसू लागला, आणि हीच स्थिती नरेंद्राचीही झाली. श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या आचार-विचारांमध्ये त्याला नवा अर्थ समजू लागला. नवा प्रकाश व दिव्य संदेश मिळू लागला. रामकृष्ण ही त्यांची स्फूर्तिदेवता होती. १५ ऑगस्ट सन १८८६ साली रामकृष्ण वैकुंठवासी झाले. त्यांच्या आदेशाप्रमाणे त्यांच्या सर्व शिष्यवर्गाचे नेतृत्व नरेंद्राने स्वीकारले.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ........ वि: ........

### भ्रमन्ती

ज्ञानाच्या प्रसाराकरिता त्यांनी आसेतुहिमाचल पर्यटन केले. निरनिराळ्या ठिकाणी प्रतिष्ठित पंडितांच्या सभेमध्ये वादविवाद करून वेदांताचे खरे तत्त्वज्ञान जनतेला समजावून दिले. विवेकानंदांची भव्य व आकर्षक देहयष्टी, त्यांचा धीरगंभीर आवाज, त्यांची विवेचन करण्याची अद्‌भुत शैली या सर्व अद्वितीय गुणांमुळे अनेक राजेमहाराजे त्यांच्या भजनी लागले. एकदा अलवार येथे तेथील महाराजांशी विचारविनिमय करता करता त्यांनी आपला निर्भीडपणा चांगलाच प्रत्ययास आणून दिला होता. ते महाराज स्वतः नास्तिक असल्यामुळे मूर्तिपूजेवर त्यांचा विश्वास नव्हता. विवेकानंदांनी महाराजांचा फोटो खाली काढण्यास सांगून त्यावर दरबारी लोकांना थुंकण्यास सांगितले. कारण महाराजांच्या दृष्टीने फोटो म्हणजे एक साधा कागदच होता. अर्थात् त्या फोटोची अवहेलना करण्यास कोणीच धजला नाही. पण या साध्या प्रसंगाने जीवनात भावनांचे काय स्थान आहे व मूर्तिपूजा हा भक्तीचा किंवा भावनेचा कसा विषय आहे हे विवेकानंदांनी महाराजांच्या चांगलेच निदर्शनास आणून दिले. अनेक राजेरजवाड्यांनी त्यांना भरपूर पैसा देण्याचे अभिवचन दिले. सन १८९२ साली लोकमान्य टिळक व विवेकानंद यांची भेट पुणे मुक्कामी झाली. पुण्यास ते काही दिवस राहिलेही होते. पुण्याहून बेळगाव,

म्हैसूर, कोचीन इत्यादी गावांना भेटी देत ते कन्याकुमारी येथे गेले. तेथील एका खडकावर बसून ध्यानस्थ असता त्यांना भारतभूची अवनती पाहून अत्यंत विषण्णता आली.

## सर्व-धर्म-परिषद

सन १८९३ साली ते सर्व-धर्म-परिषदेकरिता शिकागोस गेले. वाटेत त्यांनी सिलोन, चीन, जपान, कॅनडा या देशांना भेटी दिल्या. त्यामुळे त्यांचा दृष्टिकोन आणखीनच विशाल झाला. अगदी थोड्या कालावधीमध्ये जपानने केलेली उन्नती पाहून त्यांना असे वाटू लागले की, भारतवासीयांनी जपानचेच अनुकरण केले पाहिजे. भारतातील अनेक तरुण-तरुणी जपानला पाठविल्या पाहिजेत. शिकागो येथे त्यांचे पहिले काही दिवस अत्यंत हालअपेष्टांमध्ये गेले. एकदा तर महाभयंकर थंडीत सर्व रात्र एका खोक्यामध्ये बसून त्यांना काढावी लागली. परंतु संकट-समयीसुद्धा काही अनपेक्षित मदत त्यांना मिळत गेली. ११ सप्टेंबर १८९३ रोजी शिकागो येथील सर्व-धर्म-परिषदेतील त्यांचे व्याख्यान इतके ओजस्वी व श्रोतृवर्गाच्या हृदयाचा ठाव घेणारे झाले की, अमेरिकेतील सर्व वर्तमानपत्रांमध्ये अनेक स्तंभांच्या लेखांच्याद्वारे स्वामी विवेकानंदांच्यावर अनेक स्तुतिसुमने उधळली गेली. नंतर त्यांना अमेरिकेतील निरनिराळ्या शहरी व्याख्यानासाठी आमंत्रणे येऊ लागली. त्यांच्या पांडित्यपूर्ण व्याख्यानांनी अमेरिकन जनता मंत्रमुग्ध होऊन स्वामीजींचे शिष्यत्व पत्करू लागली. भारतीयांच्या वेदांताच्या तत्त्वज्ञानाचा अमेरिकेत प्रचार करून व अनेक स्त्री-पुरुषांना शिष्यत्वाची दीक्षा देऊन, स्वामीजी चार वर्षांनंतर भारतात परत आले.

भारतातील अनेक ठिकाणी त्यांचा अलौकिक गौरव करण्यात आला. येथे आल्यावर भारतीयांची अवनती सुधारण्यासाठी त्यांनी प्रयत्न करण्याचे ठरविले. त्यासाठी अनेक ठिकाणी मठ स्थापन केले. त्यांपैकी कलकत्त्याजवळील बेलूर व हिमालयातील हृषीकेश येथील मठ सुप्रसिद्ध आहेत. त्यांनी आपल्या शिष्यवर्गाची संघटना केली व जनतेची सामाजिक व आर्थिक उन्नती करण्यासाठी ज्ञान व कौशल्याचा प्रचार केला. या बाबतीत अनेक पुराणमतवाद्यांकडून त्यांना विरोध व अवहेलना सहन करावी लागली. अशा रीतीने ‘ विघ्नैः पुनःपुनरपि प्रतिहन्यमानाः प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ।" अनेक वर्षे अत्यंत कष्टप्रद जीवन व्यतीत केल्याकारणाने त्यांचे मूळचे भरभक्कम शरीरही कमकुवत बनले. त्यांना मधुमेहाचा विकार जडला व त्यातच ४ जुलै १९०२ रोजी त्यांचे देहावसान झाले. भारताचा अष्टपैलू हिरा हरपला. परंतु त्याचे तेज कमी न होता दिवसेंदिवस ते वाढतच राहिले.

## तत्त्वज्ञान

स्वामी विवेकानंदांनी वेदांताच्या तत्त्वज्ञानाचा केवळ प्रसार केला एवढेच नव्हे तर त्या तत्त्वज्ञानानुसार ते आपले जीवन जगले. वेदांताचे तत्त्वज्ञान कर्मयोगपर असल्याचे त्यांना दिसून आले. त्या तत्त्वज्ञानानुसार भारतीय जनता आपले जीवन व्यतीत करू लागली तर तिचे सर्व प्रश्न निश्चितपणे सुटू शकतील असा त्यांचा दृढ विश्वास होता. मात्र या तत्त्वज्ञानाचा केवळ विचार, मनन व चिंतन करून हे काम होणार नाही. त्यासाठी वेदांताच्या तत्त्वज्ञानाचे प्रत्यक्ष आचरण केले पाहिजे. भारतीय जनता अत्यंत अंतर्मुख असल्यामुळे तिला वेदांताच्या तत्त्वज्ञानानुसार बहिर्मुख बनविले पाहिजे. पाश्चिमात्यांकरिता त्यांचा उपदेश जरा निराळा आहे. पाश्चिमात्यांची मूळची प्रकृतीच बहिर्मुखतेची आहे. त्यांना चिंतन, मनन व अंतर्मुखतेची अधिक जरुरी आहे. भारतीय जनतेचे दुःख, दारिद्र्य, अज्ञान घालविण्यासाठी त्यांनी आपल्या मोहनिद्रेतून जागे झाले पाहिजे, स्वतः कार्यप्रवण बनले पाहिजे. विकासासाठी आवश्यक असणारे गुण भारतीयांच्या ठिकाणी सुप्तावस्थेत आहेत. त्यांना जरुरी आहे ती केवळ प्रेरणेची. म्हणूनच स्वामीजी भारतीयांना उत्तेजून म्हणतात, ‘ उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान् निबोधत । ’

## साध्य व साधने

स्वामीजी म्हणतात, आपण आपले ध्येय निश्चित करावे. ध्येय निश्चित करताना सर्व बाजूंनी याचा विचार करावा. ध्येय नेहमी उच्च व उदात्त असावे. हीन किंवा कमी प्रतीचे ध्येय डोळ्यासमोर ठेवू नये. ‘नोऽच्चार्थो विफलोऽपि दूषणपदं दूष्यस्तु कामो लघुः ।’ ध्येय निश्चित झाल्यानंतर साधनांची काळजी घेणे आवश्यक आहे. साधने चांगली निवडली म्हणजे साध्य निश्चितपणे हाती येणार याची खात्री असू द्यावी. साधने व साध्य यांचा संबंध कार्यकारणभावाप्रमाणे असतो. विशिष्ट कारणे घडली की, विशिष्ट कार्य घडणारच, याची निसर्गनियमानुसार शाश्वती असते. याचप्रमाणे योग्य साधनांची निवड केली, साधनांच्या बाबतीतील सुचिता पाळली तर साध्याचा विचार करणे जरूर नाही. किंबहुना कोणतेही कार्य करीत असतांना त्याच्या यशापयशाचा विचार न केल्यास, किंवा फलाची आकांक्षा न धरल्यास आणि केवळ साधनांवरच सर्व शक्ती केंद्रीभूत केल्यास कार्य फार चांगल्या प्रकारे होते, असा थोर लोकांचा अनुभव आहे. श्रीमद् भगवद्गीतेत हेच सांगितले आहे.

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूः मा ते संगोस्त्वकर्मणि ॥

याचाच अर्थ असा की, प्रत्येक मनुष्याने आपले विहित कर्म फलाची अपेक्षा न धरता किंवा त्यासंबंधी मनामध्ये कोठल्याही प्रकारे आसक्ती न बाळगता विरक्त वृत्तीने केले तर ते कार्य उच्च प्रतीचे होते. मधाच्या अपेक्षेने माशी मधाच्या भांड्यावर येऊन बसते. पण शेवटी मधामध्ये गुरफटल्यामुळे तिला मध चाखता येत नाही. तीच स्थिती इंद्रियोपभोग घेण्याच्या हेतूने कार्य करणाऱ्या मानवाची होते. बिचारा मनुष्यप्राणी आपण सुखोपभोग घेऊन इंद्रियांची तृप्ती करू, वासनांचे समाधान करू अशा आसक्तिपूर्ण भावनेने काम करीत असतो. पण त्याच्या नकळत सुखोपभोग त्याचा फडशा पाडीत असतात.

भोगा न भुक्ता वयमेव भुक्ताः ।
तपो न तप्तं वयमेव तप्ताः ।
कालो न यातो वयमेव याताः ।
तृष्णा न जीर्णा वयमेव जीर्णाः ॥

सर्व दुःखाचे मूळकारण म्हणजे कर्माबद्दलची आसक्ती होय. खरे सामर्थ्य विरक्तीमध्ये आहे. विरक्त राहून कर्म करणाऱ्याला सुखदुःखाचा स्पर्श होऊ शकत नाही. आसक्तीमुळे मनाचे दौर्बल्य वाढून तो कर्माचा गुलाम बनतो. त्यामुळे त्याला शारीरिक व मानसिक दुःख भोगावे लागते. मनुष्याच्या सभोवताली सर्व जंतू नेहमीच असतात. परंतु सदृढ माणसाला ज्याप्रमाणे कोणत्याही प्रकारचे रोगजंतू पछाडू शकत नाहीत, त्याचप्रमाणे आसक्तिरहित व विरक्त वृत्तीने काम करणाऱ्याला सुखदुःखादी आधिव्याधी त्रास देऊ शकत नाहीत. म्हणून प्रत्येक मानवाने बलवान बनले पाहिजे. मित्र, आप्त, स्वकीय, निरनिराळ्या उपभोग्य वस्तू यांबद्दल आसक्ती ठेवता उपयोगी नाही. मात्र याचा अर्थ असा नव्हे की कोणीही कोणावर प्रेम करू नये. प्रेम करणे हा तर मानवाचा स्वभावधर्मच आहे. मात्र प्रेमामध्ये सौदा नसावा. प्रेमाचे भांडवल करून त्याचा व्यापार करू नये.

सुखमात्यंतिकं यत् तत् बुद्धिग्राह्यमतींद्रियम् ।

फलाशा संपली की, यशाची निश्चिती झाली हे म्हणणे वरवर विचार करता 'वदतो व्याघाताचे' वाटते. परंतु जगामध्ये ऐतिहासिक काळात जे थोर पुरुष होऊन गेले त्यांना न मागताच सर्व काही मिळाले असे दिसून येते. भगवान ख्रिस्त खिळे ठोकून मारले गेले. परंतु त्यानंतरच त्यांनी सुरू केलेले कार्य फार मोठ्या प्रमाणामध्ये यशस्वी झाले. प्रत्येक मानवाने आपल्याजवळ जे काही असेल ते

देण्याचा प्रयत्न करावा. आपल्या मुठी बंद करून भिक्षा मागण्याची वृत्ती जी अनेकांमध्ये दिसून येते ती खरोखरच लाजिरवाणी आहे. दिल्याशिवाय किंवा त्याग केल्याशिवाय खरी शांती नाही. मानसिक समाधानही नाही. लाकूड सर्वस्वाला जाळून घेते पण त्यामुळेच उष्णता मिळते. सूर्य पाणी शोषण करतो पण सर्व वनस्पतींना, प्राणिमात्रांना पर्जन्याच्या रूपाने जीवन देतो. आपल्याजवळ जे काही आहे ते दिल्याशिवाय दुसऱ्याकडून आपणांस काहीही मिळणार नाही. खोलीतील हवा बाहेर गेल्याशिवाय बाहेरील हवा खोलीत येणे शक्य आहे का? म्हणूनच म्हटले आहे. 'त्यागात् शांतिः अनन्तरम्' मात्र हा अनासक्तियोग वाटतो तितका सोपा नाही. सर्वसामान्य मानवाची प्रवृत्ती आसक्तीची व फलाशा धरणारी असते "प्रवृत्तिरेषा भूतानां निवृत्तिस्तु फलावहा।" अनासक्तियोगाचा सतत अभ्यास केल्यास तो साध्य होण्यासारखा आहे. त्यामुळे एक प्रकारचे मानसिक बल आपल्याला प्राप्त होऊ शकते. कोणतेही अवघड कार्य करण्यात आपण यशस्वी होतो. हा योग साध्य न झाल्यास सुखदुःखाच्या जंजाळात मानव सापडल्याकारणाने तो दुर्बल बनतो. रोगाप्रमाणे दुःखाची बाधा दुर्बलांनाच होते. सबलांना होऊ शकत नाही. यासाठी स्वामी विवेकानंद म्हणतात. बाह्य जगावर ताबा मिळविण्यासाठी प्रथम स्वतःवरच ताबा मिळवा. स्वतःला तुम्ही जिंकलेत तर जगातील सर्व आधिव्याधींवर फार काय सर्व आत्म्यांवरही विजय मिळवू शकाल. 'नायमात्मा बलहीनेन लभ्यः।' आपण नेहमी दुसऱ्याला दोष देतो, जग वाईट आहे असे म्हणतो. लोक स्वार्थी आहेत असेही म्हणतो. पण असे जग कोणी बनवले? आपणच ना? आपणच साधने आहोत. जग वाईट असले तर त्याचा दोष आपण स्वतःच घेतला पाहिजे. म्हणून स्वामीजी म्हणतात, साधनांची काळजी घ्या म्हणजे स्वतःचीच काळजी घ्या. दुसरे कसे वागतात ते पाहू नका. आपण कसे वागणे इष्ट ते पहा. आपण शुद्ध, पवित्र असलो, आपले कर्तव्य निष्काम भावनेने, फलाची आसक्ती न धरता करीत राहिलो तर जग चांगले होईल यात संशय नाही.

## कर्तव्य म्हणजे काय?

प्रत्येकाला आपले कर्तव्य कोणते हे कळणे जरूर आहे. देशकालपरिस्थितीनुसार कर्तव्ये बदलत असतात. निरनिराळ्या धर्मानुसार आचारविचारांमध्ये बदल घडून येत असतो. हिंदूंना वेदप्रामाण्य आहे, तर ख्रिश्चन लोकांना बायबलातील आज्ञेप्रमाणे काम करणे योग्य वाटते. मुसलमान लोक कुराणावर विश्वास ठेवून त्यातील आदेशांचे तंतोतंत परिपालन करण्याचा प्रयत्न करतात. परिस्थिती बदलली की कर्तव्य बदलते. रस्त्यात एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या मनुष्यास गोळी घातली की त्याने खून केला असे आपण म्हणतो. पण युद्धामध्ये एखाद्या

सैनिकाने शंभर गोळ्या घालून अनेकांना ठार केले, तर आपण त्याच्या मर्दुमकी-बद्दल त्याची वाहवा करतो. थोडक्यात सांगावयाचे तर कर्तव्याची वस्तुनिष्ठ व्याख्या करणे कठीण आहे. पूर्वीच्या साधुसंतांनी असे म्हटले आहे की, परमेश्वराच्या सन्निध नेणारे जे काम ते कर्तव्य होय. दुसऱ्याला पीडा देणे, चोरी करणे, लबाडी करणे हे कर्तव्य होत नाही. "परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम्" यालाच 'व्यवहारातील वेदान्त' असे स्वामीजी म्हणत असत. निरनिराळ्या देशांमध्ये तेथील निरनिराळ्या चालीरीतीनुसार कर्तव्याविषयीच्या कल्पना भिन्न असतात. म्हणून त्यांची कर्तव्ये समजून घेताना आपण त्यांचाच दृष्टिकोन अंगीकारला पाहिजे. कित्येक कर्तव्ये जन्माने व आपल्या विशिष्ट स्थानाने प्राप्त होत असतात. शाळेत शिकविणाऱ्या गुरुजींची मुलांविषयीची शाळेतील व पती म्हणून घरची कर्तव्ये भिन्न असतात. ही कर्तव्ये प्रत्येकाने समजून घेतली पाहिजेत. त्या त्या स्थितीतील, वयातील व स्थानपरत्वे येणारी कर्तव्ये आपण समजून घेतली नाहीत तर निसर्गच आपणांस ती समजूत घेण्यास भाग पाडील. कर्तव्याचा मोठेपणा हा ती आपण कोणत्या वृत्तीने करतो त्यावर अवलंबून असतो. कामावरून माणसाचा दर्जा ठरविणे ही पद्धती योग्य नव्हे. कामाला परमेश्वर समजून पूज्यभावाने जो आपले कर्तव्य करतो तो श्रेष्ठ दर्जाचा होय. ( Work is Worship ). कर्तव्ये करीत असताना त्यामध्ये आपण प्रेमाचा ओलावा ओतल्यास कर्तव्यातही गोडवा निर्माण होतो. पतीबद्दलची कर्तव्ये पत्नी ज्या प्रेमाने करते, किंवा पिता आपल्या पुत्राबद्दलची कर्तव्ये करीत असताना ज्या वात्सल्यरसाने ओतप्रोत भरून ती करीत असतो, त्यामुळे त्या कर्तव्यामध्ये एक आगळी गोडी निर्माण होते. त्यामध्ये आसक्ती किंवा फलाशा असत नाही. फक्त प्रेमाचा कुंभ सर्व कर्तव्यांना व्यापून असल्याकारणाने कर्तव्यामध्ये कोठल्याही प्रकारे दुःखाचा, आत्मक्लेशाचा प्रादुर्भाव होत नाही. काम करीत असताना तुम्ही फलाशेचे गुलाम झाला नाहीत तर तुमच्या वाट्याला दुःख येणार नाही. कासव ज्याप्रमाणे आपली सर्व बाह्य इंद्रिये आत ओढून घेते आणि मग त्यावर कोठलाही प्रहार त्याला जाणवू शकत नाही त्याचप्रमाणे प्रत्येकाने इंद्रियदमन केल्यास कर्तव्याचे बंध म्हणजेच बरेवाईट परिणाम आत्म्याला बाधू शकत नाहीत. अशा रीतीने अनासक्तियोगाची कास धरून जो कर्तव्य करतो, त्याची जगावर सत्ता चालते. तो या स्वार्थी, दुःखमय जगामध्ये राहूनसुद्धा कमलपत्राप्रमाणे निर्लेप राहतो.

### शैक्षणिक तत्त्वज्ञान

'Education is the manifestation of the perfection already in man' स्वामी विवेकानंदांच्या या उद्‌गारामध्ये त्यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे

सार सामावलेले आहे. सर्व प्रकारचे ज्ञान प्रत्येक व्यक्तीच्या आत्म्यामध्ये असतेच. त्या ज्ञानावर अज्ञानाचा पडदा पडलेला असतो एवढेच. तो पडदा दूर केला, की भौतिक व आधिभौतिक ज्ञान मानवाला येत असते. आपण दोन गारगोट्या एकमेकांवर घासल्या तर त्यातून स्फुल्लिंग निर्माण होतो. घर्षणाने हा जो स्फुल्लिंग बाहेर आला तो मूळचा गारगोटीमध्ये असल्याशिवाय येऊ शकणार नाही. घर्षण हे केवळ निमित्तमात्र आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला जे ज्ञान निरनिराळ्या प्रसंगाने व निरनिराळ्या प्रेरणांतून होत असते, ते मूलतः प्रत्येक व्यक्तीच्या आत्म्याच्या ठिकाणी उपजतच असते. आपण म्हणतो की न्यूटनने गुरुत्वाकर्षणाचा शोध लावला. अर्थात् हे म्हणणे तितकेसे बरोबर नाही. न्यूटनने गुरुत्वाकर्षणाचा शोध लावला म्हणजे नवीन काही निर्माण केले, असे जर आपणांस म्हणावयाचे असेल, तर ते पूर्णपणे चुकीचे होईल. न्यूटनला गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धांताची प्रचीती आली. याचा अर्थ पूर्वी त्या ठिकाणी गुरुत्वाकर्षणच नव्हते असा नव्हे. पूर्वीच्या लोकांचे त्याबाबत अज्ञान होते हे खरे. ते अज्ञान दूर करण्यासाठी न्यूटन व झाडावरून पडणारे फळ ही नैमित्तिक कारणे घडली एवढेच. शिक्षणाचे कार्य म्हणजे व्यक्तीच्या ठिकाणी जे मूळचे ज्ञान आहेच, त्याचा आविष्कार करणे. त्या आविष्काराला योग्य ती अनुकूल परिस्थिती निर्माण केली म्हणजे व्यक्तीचे शिक्षण आपोआप होत असते. व्यक्तीचा पिंडच विकासक्षम आहे. त्या विकासामध्ये येणारे अडथळे दूर केले, काही अनुकूल परिस्थिती निर्माण केली म्हणजे व्यक्तीचा विकास होत असतो. वटवृक्षाच्या बीजाचेच उदाहरण घ्या. एवढ्या मोठ्या प्रचंड वटवृक्षाचे बीज एका लहानशा मोहरीएवढेही नसते. परंतु त्या बीजामध्ये त्या प्रचंड वटवृक्षाच्या फांद्या, पाने, खोड या सर्व सामावलेल्या असतात. हे तसे जर नसते तर एवढ्याशा लहान बीजापासून वटवृक्ष निर्माणच होऊ शकला नसता. माळी एक छोटेसे रोपटे लावतो, त्याला कुंपण घालतो, खत-पाणी देतो व त्याच्या विकासातील अडचणी दूर करतो. म्हणून काही माळ्याने रोपटे वाढविले असे म्हणता येणार नाही. रोपट्याचा विकास स्वभावतःच होत असतो. अन्नामुळे शारीरिक विकास होतो हे म्हणणेही तितकेसे बरोबर नाही. व्यक्ती जर निसर्गतः विकासक्षम नसती तर अन्नाच्या राशी ओतूनही व्यक्तीचा विकास होता ना. शिक्षकांना जेव्हा वाटते की आम्ही विद्यार्थ्यांना शिकवितो, तेव्हा ते एक मोठी चूक करीत असतात. शिकण्याचे कार्य ज्याचा-तोच करीत असतो. कोणी कोणाला शिकवू शकत नाही. कर्मेंद्रिये व ज्ञानेंद्रिये आपापल्या परीने उत्तेजित होत असतात व आपापली कामे नैसर्गिक नियमानुसार करीत असतात. यासाठी विद्यार्थ्यांना योग्य ती संधी दिली पाहिजे. त्यांना नेहमी उत्तेजन दिले पाहिजे. त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचे भीतियुक्त दडपण असता कामा नये. धाकदपटशा दाखवून त्यांना

शिकविता येईल हे म्हणणे चुकीचे आहे. गाढवाला मारूनमुटकून का कधी घोडा बनविता येतो ? याकरिता शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मानसिक पातळीवर आले पाहिजे. त्यांच्या गरजांनुसार योग्य ती परिस्थिती निर्माण केली पाहिजे. श्रीरामकृष्ण परमहंस हे एक श्रेष्ठ दर्जाचे गुरुजी होते. त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येक भक्ताची मानसिक पातळी ओळखून तेथून त्याला वर नेण्याचा ते प्रयत्न करीत असत. त्यांची अशी श्रद्धा होती की प्रत्येकजण ईश्वरी अंश आहे. त्याला भरपूर स्वातंत्र्य दिले व योग्य ती अनुकूल परिस्थिती निर्माण केली, त्याच्या मनामध्ये आत्मविश्वास निर्माण केला की, त्याचा विकास हा होणारच. आपले काम मानवाची सेवा करणे हेच होय. कोणी कोणाला शिकवू शकणार नाही. कारण प्रत्येकजण परमात्म्याचा अंशच आहे. स्वामी विवेकानंदाच्या मताप्रमाणे शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांची मने अनेकविध माहितीने भरणे नव्हे. त्यांच्या वेळच्या शिक्षणपद्धतीचे ध्येय केवळ कारकून तयार करणे हे होते. परंतु ते शिक्षणाचे खरे ध्येय होऊ शकत नाही. शिक्षणाने व्यक्तीचा शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक विकास होऊन ती चारित्र्यसंपन्न झाली पाहिजे. अशा रीतीने खरा मानव तयार करणे हे शिक्षणाचे ध्येय आहे. ते म्हणत, 'आज भारताला जर कशाची जरूरी असेल तर लोखंडी स्नायू, पोलादी नसा व दुर्दम्य निर्धार असलेल्या नवजवानांची. त्यांची इच्छाशक्ती एवढी प्रबळ असेल, की ते आपल्या या शक्तीच्या जोरावर विश्वातील गुंतागुंतीची गूढे निश्चितपणे उकलू शकतील. अशा रीतीने खरा मानव तयार करणारा धर्म, तत्त्वज्ञान व शिक्षण आज देशाला हवे आहे.'

### शैक्षणिक पद्धती

ज्ञान मिळविण्याची एकमेव पद्धत म्हणजे एकाग्रता. कला, संगीत, वाङ्मय इत्यादी क्षेत्रामध्ये जे अतुलनीय कार्य आपणांस बघावयास मिळते ते सर्व एकाग्र मनाने अविरत श्रमाने केलेले कार्य होय. प्रयोगशाळेमध्ये देहभान हरपून मनाची सर्व शक्ती एकवटून जेव्हा एखादा शास्त्रज्ञ सतत कार्य करीत राहतो तेव्हा कोठे एखाद्या शोधाचा जन्म होतो. अन्तरिक्षशास्त्रज्ञालाही अत्यंत अविचलित मनाने आकाशस्थ ग्रहगोलांचा सतत वेध घ्यावा लागतो. तेव्हाच कोठे अंतरिक्षातील निरनिराळे ग्रह व तारे यांसंबंधी अचूक माहिती मिळू शकते. जीवनातील साध्या साध्या गोष्टी करतानासुद्धा एकाग्रचित्ताची आवश्यकता असते. बुटपॉलिश करणारा पोऱ्या किंवा उत्तम पंचपक्वान्ने तयार करणारा आचारी आपल्या मनाची शक्ती एकवटून किंवा आपल्या मनाचे अवधान पूर्णपणे केन्द्रीभूत करून आपले नियोजित काम करणार नसेल तर ते काम उच्चप्रतीचे होऊ शकणार नाही. साध्या बहिर्गोल भिंगाचेच उदाहरण घ्या ना ! बहिर्गोल भिंगातून जाणारे सूर्याचे किरण एकत्रित

झाले म्हणजे साध्या किरणांपेक्षा त्यांच्या उष्णतेची तीव्रता कितीतरी प्रमाणात वाढू शकते व त्यामुळे ज्वलनाचे कार्यही होते. कोणत्याही कामाचे असेच आहे. लहानात लहान कामापासून ते मोठ्यात मोठ्या कामापर्यंत मनाची सर्व शक्ती एकवटून एकाग्रचित्ताने ते काम आपण केल्यास कामामध्ये सुकरता व सुलभता तर निर्माण होतेच, पण त्याहीपेक्षा कामाचा दर्जा अधिक सुधारतो. एकाग्रचित्ताने काम करीत राहिल्यास कोणतेही काम अवघड किंवा अशक्य नाही. एकाग्रचित्ताची महती शिक्षणामध्ये एवढी मोठी आहे की, स्वामी विवेकानंद म्हणतात की, मला जर पुन्हा प्रथमपासून शिक्षण घेण्याची संधी प्राप्त झाली तर मी एकाग्रचित्त करण्याचेच शिक्षण आत्मसात करीन. इतर निरनिराळ्या विषयांची भाराभर माहिती मिळविणे हे काही खरे शिक्षण नव्हे. एकाग्रचित्त करून काम करण्याची अवघड कला एकदा आत्मसात केली की, कोणतेही ज्ञान प्राप्त करून घेण्याचे किंवा जीवनातील अत्यंत जटिल समस्या सोडविण्याचे साधनच तुम्ही हस्तगत केल्यासारखे होईल.

एकाग्रचित्त करणे हे काम वाटते तितके सोपे नाही. त्यासाठी परिश्रमपूर्वक घेतलेल्या प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. पशू व मानव यांच्यामध्ये याच कारणामुळे त्यांच्या कार्यक्षमतेत भेद दिसून येतो. जनावरांचे लक्ष केंद्रीभूत होऊ शकत नाही. त्यामुळे शिक्षणाने अनेक गोष्टी त्यांना साध्य करता येत नाहीत. मानवी मनाचे मात्र तसे नाही. मन एकाग्र करण्याच्या बाबतीत मानवाची क्षमता फार मोठी असल्याकारणाने पूर्वी न उकललेली निसर्गाची अनेक गुपिते तो उलगडू शकतो. मन एकाग्र करण्यासाठी, आचार, विचार व उच्चार यांमध्ये सुसंगतता आणण्यासाठी प्रशिक्षण, अभ्यास ब्रह्मचर्य यांची अत्यंत आवश्यकता आहे. ब्रह्मचर्यामुळे कामप्रवृत्तीचे उदात्तीकरण होऊन मनाची शक्ती अनेक निरुपयोगी गोष्टींवर खर्च होण्याचे टळते. वरील गोष्टींबरोबरच प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी आपणा स्वतःबद्दल व आपण अंगीकारलेल्या कार्याबद्दल आत्मविश्वास व दृढ श्रद्धा हवी. भगवद्गीतेने म्हटल्याप्रमाणे व्यक्तिव्यक्तीत दिसून येणारा फरक हा त्यांच्या आत्मविश्वासावर व श्रद्धेवरच अवलंबून असतो. ' यो यच्छ्रद्धः स एव सः । ' व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व मूलतः त्याच्या श्रद्धेवर अवलंबून असते. आपणांपैकी कित्येक सुशिक्षित लोकांचे डोळे पाश्चिमात्य सुधारणांनी दिपून गेल्याचे दिसते. पाश्चिमात्यांनी बाह्य जगाचा एकाग्रचित्ताने अभ्यास केल्याकारणाने ते भौतिक सुधारणांच्या बाबतीत अग्रेसर ठरू शकले. पौर्वात्य लोकांनी किंवा भारतीय ऋषिमुनींनी बाह्य नाशवंत व क्षणभंगुर जगाचा फारसा विचार केला नाही. त्यांनी आपले मन आधिदैविक व आध्यात्मिक समस्या सोडविण्यावर केंद्रीभूत केले. त्यामुळे या क्षेत्रातील त्यांची प्रगती इतर लोकांपेक्षा फारच प्रचंड प्रमाणावर होऊ शकली. यासाठी स्वामीजी म्हणत, ' आपण स्वतःला हीन लेखू नये. पौर्वात्यांनी

मनात आणले तर व सारी शक्ती एकवटून ते कार्यरत राहिले तर तेही पाश्चिमात्यांप्रमाणे भौतिक सुधारणांमध्ये विलक्षण प्रगती करू शकतील. आपण परमेश्वराचेच अंश आहोत याचा आत्मसाक्षात्कार आपणांस झाला पाहिजे. त्यामुळे कोठलेही कार्य आपणांस अशक्य नाही असा आपण आत्मविश्वास बाळगला पाहिजे. आपणांतील परमेश्वरी अंशाचा आविष्कार कधी लहान प्रमाणामध्ये होईल तर कधी मोठ्या प्रमाणात दिसून येईल. परंतु परमेश्वराचा अंश सर्व ठिकाणी सारखाच आहे. आपण एखादा बुडबुडा पाहिला किंवा एखादी प्रचंड लाट पाहिली तरी या दोन्ही ठिकाणी असणारे पाण्याचे अस्तित्व ज्याप्रमाणे एकाच प्रकारचे आहे, किंवा पर्वत आणि परमाणू यांच्यामध्ये पदार्थत्व ज्याप्रमाणे एकाच प्रकारचे आहे, त्याचप्रमाणे सर्व व्यक्तिंमधील परमेश्वराचे अंश एकाच परमात्म्याचे भाग आहेत. त्यामुळे आत्मविश्वास बाळगून, श्रद्धायुक्त अंत:करणाने व एकाग्रचित्ताने कोठलेही कार्य करीत गेल्यास यश निश्चितपणे मिळविता येईल. शिक्षणामध्ये यासाठी एकाग्रतेच्या साधनेवर सर्वांत अधिक भर दिला पाहिजे.

## चारित्र्यशिक्षण

स्वामी विवेकानंदांच्या मताप्रमाणे शिक्षणामध्ये चारित्र्य-संवर्धनाला विशेष महत्त्व दिले पाहिजे. व्यक्तीच्या जीवनामध्ये अनेक सुखदु:खांच्या अनुभवांचा त्यांच्या मनावर किंवा अंतरात्म्यावर संस्कार होत असतो. या संस्कारानुसार व्यक्तीच्या प्रवृत्ती बनत असतात. अनेक प्रवृत्तींमुळे व्यक्तीच्या मनाचा विशिष्ट कल बनतो आणि व्यक्तीचे चारित्र्य म्हणजे हा मनाचा विशिष्ट कल, किंवा प्रवृत्तींचा समूह होय. व्यक्तीवर झालेल्या संस्कारानुसार प्रवृत्ती बनतात व प्रवृत्तीनुसार व्यक्तीच्या मनात विविध प्रकारचे विचार येत असतात. व्यक्तीचे चारित्र्य हे व्यक्तीच्या विचारांवरच अवलंबून असते. या दृष्टीने विचार करता आचारांपेक्षा किंवा उच्चारांपेक्षाही विचारांना अधिक महत्त्व दिले पाहिजे. जीवनात येणाऱ्या सुख-दु:खादि संस्कारांनुसार जे आघात व्यक्तीच्या मनावर होतात त्यांच्या अनुषंगाने व्यक्तीचे शिक्षण होते. सुखमय प्रसंगांपेक्षा दु:खमय प्रसंगांने व श्रीमंतीपेक्षा गरिबीमध्ये व्यक्तीच्या मनामध्ये अधिक चांगले व प्रेरणा देणारे संस्कार निर्माण होतात. परमेश्वराची सतत आठवण रहावी यासाठी कुंतीने श्रीकृष्णाजवळ सुखाची किंवा श्रीमंतीची मागणी न करता दु:खाचीच मागणी केली. पराच्या गादीवर लोळून केवळ ऐशआरामात जीवन कंठणाऱ्यांपैकी फारच थोडे लोक आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करू शकतील, असे इतिहासावरून आपणांस पहावयास मिळते. दु:खाची व हालअपेष्टांची वादळे सोसल्यानंतरच आणि निराशेच्या अंधकारातून कर्तव्याची व आत्मविश्वासाची काठी टेकीत प्रवास करणाऱ्यास आत्मोन्नतीचा प्रकाश

दिसतो. प्रत्येक कृतीबरोबर किंवा विचाराबरोबर मनामध्ये त्याचा ठसा उमटतो. समुद्रात उद्भवणाऱ्या प्रत्येक लाटेची खूण ज्याप्रमाणे किनाऱ्यावर उमटते, त्याचप्रमाणे विचाराचा ठसा किंवा संस्कार बोधमनावर किंवा अबोधमनावर टिकून राहिलेला असतो. ज्या व्यक्तीवर चांगले संस्कार होतात ती व्यक्ती चारित्र्यसंपन्न होते. तिच्या हातून कळत न कळत चांगल्याच गोष्टी होतात. वाईट गोष्टी करण्याचे मनात आणूनही सहसा वाईट कर्मे तिच्या हातून घडू शकत नाही. याउलट ज्या व्यक्तीवर वाईट विचारातून सतत वाईट संस्कार घडलेले असतात, त्या व्यक्तीच्या हातून चांगली कृती होण्याची अपेक्षाच नको. व्यक्तीच्या मनावर झालेले बरेवाईट संस्कार त्याच्या सामान्य वागणुकीतूनच विशेषतः पहावयास मिळतात. विशेष प्रसंगात सामान्य व्यक्तीही सहेतुकपणे चांगलेच वर्तन करते; परंतु व्यक्तीच्या चारित्र्याची खरी परीक्षा सामान्य प्रसंगात अभावितपणे ती व्यक्ती कशी वागते यावरून होते. अनेक संस्कार सातत्याने घडत राहिल्यास त्यांची सवय बनते. म्हणजे सवय बनण्यासाठी संस्कारांची पुनरावृत्ती लागते. सहेतुक क्रियेचे रूपांतर अहेतुक क्रियेत करणे म्हणजेच सवय होय. बऱ्यावाईट सवयींचा परिणाम व्यक्तीच्या चारित्र्यावर नेहमीच होत असतो. ( Habit is second Nature ) असे म्हणतात. कारण सवयीप्रमाणे व्यक्तीच्या मनाचा कल बनतो व त्यानुसार कळत न कळत आचरण बनते. वाईट सवयी लागलेला मनुष्य पूर्णपणे त्याज्य आहे असे समजण्याचे कारण नाही. कारण ज्याप्रमाणे चांगल्या सवयी लावता येतात, त्याचप्रमाणे वाईट सवयी घालविताही येतात. वाईट सवयी घालविण्याचा उत्तम उपाय म्हणजे चांगल्या सवयी लावणे हा होय.

आपला उद्धार किंवा आपला उत्कर्ष दुसरी कोणी व्यक्ती येऊन करील असे समजण्याचे कारण नाही. कारण आपले बरेवाईट चारित्र्य आपणच बनवत असतो. आपल्या बऱ्यावाईट कर्मामुळे आपण आपल्याभोवती रेशमी किडयाप्रमाणे एक कोष तयार करीत असतो आणि या पिंजऱ्यामध्ये अडकल्यामुळे आपण अत्यंत दुःखी होतो. कृतकर्मांच्या जाळीतून बाहेर पडण्यासाठी आपणांस इतर कोणाचीही मदत होणार नाही. आपण स्वतःच्या कर्तृत्वानेच त्यातून बाहेर पडले पाहिजे. भगवद्गीतेत म्हटल्याप्रमाणे 'उद्धरेत् आत्मनात्मानम् । नात्मानमवसादयेत् । आत्मैव ह्यात्मनो बंधुः । आत्मैव रिपुरात्मनः ॥' आपण आपल्या जीवनामध्ये अनेक चुका करतो. या चुका आपल्या दुर्बलतेमुळे व अज्ञानामुळे होत असतात. परंतु त्या सुधारण्याचे सामर्थ्यही आपणांतच असल्यामुळे घाबरून जाण्याचे वा वृथा शोक करण्याचे कारण नाही. आपल्या डोळ्यांवर हात ठेवणारा उगाचच म्हणतो की, जगात सर्व ठिकाणी अंधार भरून राहिला आहे. डोळ्यांवरील हात काढा म्हणजे प्रकाश दिसेल. त्याचप्रमाणे तुमची दुर्बलता व अज्ञान नाहीसे करा

म्हणजे तुमचे चारित्र्य सुधारेल. यासाठी प्रबळ इच्छाशक्ती मात्र हवी. उत्क्रांति-तत्त्वांचा अभ्यास केल्यास तुम्हांस असे दिसून येईल की, प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावरच सर्व प्राणिमात्रांनी आपला विकास करून घेतला आहे. निष्ठुर निसर्गाशी सामना देण्यासाठी पशु-पक्ष्यांनी आपल्या इच्छाशक्तीच्या जोरावरच आपल्या शरीरमनामध्ये योग्य ते बदल घडवून आणले. म्हणून स्वामीजी म्हणतात की, प्रबळ इच्छाशक्ती म्हणजेच परमेश्वर. अंधकार दूर करण्यासाठी ज्याप्रमाणे पलिता पेटवावा लागतो, त्याचप्रमाणे दुःख, त्रास दूर करण्यासाठी प्रबळ इच्छा-शक्तीच्या जोरावरच प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते व त्यामुळेच उच्चप्रतीचे चारित्र्य संपादन करता येते.

### व्यक्तिमत्त्वाचा विकास

जगामध्ये आपणांस असे दिसून येते की, प्रत्येक व्यक्तीचा व वस्तूचा एकमेकांवर प्रभाव पडतो. हा प्रभाव काही वेळा व्यक्तीच्या रूपाचा, काही वेळा गुणांचा किंवा बुद्धीचा व काही वेळा त्याच्या आत्मिक शक्तीचा असतो. आपण असे पाहिले असेल की, आपणांस भेटावयास आलेल्या व्यक्तीचा प्रभाव त्याच्या बोलण्याचालण्यावर किंवा त्याच्या विचारांवरच अवलंबून नसतो. बोलण्या-चालण्याचा किंवा विचारांचा प्रभाव फार थोडा म्हणजे केवळ एकतृतियांशच पडतो. राहिलेला दोनतृतीयांश प्रभाव व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा असतो. जगाच्या इतिहासातील थोर विचारवंत, तत्त्वज्ञ किंवा सुप्रसिद्ध लेखक यांचे उदाहरण घ्या. त्यांनी प्रतिपादिलेल्या नवविचारांचा अथवा तत्त्वज्ञानाचा प्रभाव जनतेवर फारच कमी प्रमाणात दिसून येतो. उलट भगवान् श्रीकृष्ण, गौतमबुद्ध, ख्रिस्त किंवा हजरत महंमद पैगंबर यांचे उदाहरण घ्या. त्यांचा प्रभाव सर्वसामान्य जनतेवर इतका विलक्षण दिसून येतो की, त्यामुळे कित्येक शतके अनेक देशांतून परिवर्तने झाली व कित्येक राज्ये क्रांतीमुळे उलथून टाकली गेली. हे सर्व घडले ते या धार्मिक नेत्यांच्या विचारांमुळे नसून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावामुळे होय. म्हणून शिक्षणाचे ध्येय हे प्रभावी व्यक्तिमत्त्व घडविणे किंवा मानव बनविणे हे असले पाहिजे.

व्यक्तिमत्त्व म्हणजे काय याचा उलगडा भौतिक नियमानुसार करता येत नाही. व्यक्तिमत्त्व घडविण्यामध्ये मनाचा वाटा किती ? कोणत्या मानसिक शक्तीचे किती प्रमाणात मिश्रण असले पाहिजे किंवा रसायनशास्त्रातील कोणत्या नियमांचा उपयोग करावयाचा व व्यक्तिमत्त्वाचे रसायन कसे बनवावयाचे हे ठरविता येणार नाही. अनुवंशशास्त्र, मानसशास्त्र किंवा शरीरशास्त्र यांनाही व्यक्तिमत्त्वाचा उलगडा करता आला नाही. मात्र यासाठी योगशास्त्राचा उपयोग निश्चितपणे होऊ शकेल

असे स्वामीजींचे मत आहे. सर्वसामान्य माणसाची अशी समजूत असते की, भौतिक, मानसिक व आध्यात्मिक अशी तीन भिन्न विश्वे आहेत. परंतु तसे समजण्याचे कारण नाही. ती सर्व एकच होत. फरक आहे तो केवळ त्यांच्या स्थितीचा. भौतिक विश्व हे अत्यंत अशुद्ध स्वरूपात आपल्या प्रत्ययास येते तर आध्यात्मिक विश्व त्याचेच अत्यंत विशुद्ध स्वरूप होय. आध्यात्मिक विश्वाचे अतिसूक्ष्म व विशुद्ध स्वरूप म्हणजे परमेश्वर होय. लोखंड हे प्रथम अशुद्ध स्वरूपात मातीमध्ये मिसळलेले दिसून येते. अशा मातीचे शुद्धीकरण केल्यानंतर लोखंड मिळते. लोखंडाचेही निरनिराळ्या प्रकारे शोधन केल्यावर पोलाद तयार होते. वस्तूचे जो जो अधिक शुद्ध स्वरूप पहात जावे तो तो ती वस्तू अधिक कार्यक्षम असल्याचे दिसून येते. एखादा ताकदवान मनुष्य अनेक मणांचे ओझे उचलतो. आपणांस वाटते त्याची ताकद त्याच्या स्नायूंमध्ये सामावलेली आहे. तथापि बारकाईने विचार केल्यास त्या व्यक्तीची ताकद अतिसूक्ष्म अशा मज्जातंतूंमध्ये असते. सर्व शक्ती ही खरी अतिसूक्ष्म स्वरूपातच सामावलेली असते. मात्र सूक्ष्म अवयवांची कृती इतकी गतिमान व तीव्र असते की, ती आपण पाहू शकत नाही. सर्वसामान्य लोक अशी तक्रार करतात की, त्यांना आपल्या आचार-विचारांवर ताबा ठेवता येत नाही. परंतु विचारांवर ताबा ठेवणे ही गोष्ट फारशी अवघड नाही. पाण्यावर येणारा बुडबुडा आपणांस दिसतो. परंतु त्याचा उगम पाण्यातच फार खोलवर असतो. आपण नेहमी बुडबुडा पाहतो. परंतु त्याचा उगम पाहू शकत नाही. तसेच आचार-विचारांचे आहे. आपला आचार प्रत्यक्ष वर्तणुकीत दिसून येतो. आचार हा आपल्या विचारांवर अवलंबून असतो. विचाराची ही जाणीव कित्येक वेळा आपणांस होते. परंतु त्या विचारांचे उगमस्थान आपणांस शोधून काढता येत नाही. विचाराच्या मुळाशी जर आपण गेलो, त्याची उगमस्थाने निश्चितपणे शोधून काढली तर आपणांला विचारावर व मनावर ताबा मिळविता येईल आणि हे सर्व योगशास्त्राच्या अभ्यासाने सहज शक्य आहे. पातंजलयोगशास्त्रात म्हटल्याप्रमाणे, "योगः चित्तवृत्तिनिरोधः।" मनाच्या प्रवृत्तींवर, विचारांवर ताबा मिळविणे म्हणजेच योगसाधना होय. योगसाधनेसाठी पावित्र्याची व नैतिकतेची नितान्त जरूरी असते. आपण स्वतःच्या मनावर विजय मिळविला, की दुसऱ्याच्या मनावर विजय मिळविणे फारसे अवघड नाही. कारण सर्वांचीच मने परमात्म्याच्या मनाचीच अंश आहेत. आपणांस असे दिसून येते की, व्यक्तीच्या विकासाच्या अवस्था या मानववंशाच्या उत्क्रांतीच्या विभिन्न अवस्थांच्या निदर्शक आहेत. बाल्यावस्थेतील मुलांची वागणूक जंगली माणसाप्रमाणे असते. परंतु व्यक्तीच्या अवस्थेतील बदल फारच जलद रीतीने होतो. मानववंशाला प्रगतीचा जो टप्पा गाठावयास अनेक शतके लागली तो टप्पा व्यक्ती काही वर्षांतच गाठू शकते.

सर्व प्राणिमात्राची एका विशिष्ट दिशेने उत्क्रांती होत आहे. या उत्क्रांतीचे ध्येय पूर्णत्व हे आहे. या पूर्णत्व गाठण्याच्या प्रक्रियेचा वेग निरनिराळ्या व्यक्तींमध्ये निरनिराळ्या प्रकारचा दिसून येतो. काही व्यक्तींच्या बाबतीत हा वेग एका जन्मापुरताच मर्यादित असतो तर काही व्यक्तींना हे पूर्णत्व गाठण्यासाठी अनेक जन्म घ्यावे लागतात. एवढे मात्र खरे की, प्रयत्न केल्यास योगाच्या अभ्यासाच्या बळावर आपल्या प्रगतीचा वेग वाढविता तर येतोच, पण व्यक्तिमत्त्वही सुधारता येते. साधे उदाहरण घ्या. आपल्या देशातील औद्योगिक प्रगती साधण्यासाठी आपण काही लोक प्रगत देशांमध्ये प्रशिक्षणासाठी पाठवितोच की नाही? लहानसे रोपटे अधिक वेगाने वाढावे म्हणून त्याला अनेकविध प्रकारचे साहाय्य पण देतोच की नाही? श्रीरामकृष्ण परमहंसासारख्या काही व्यक्ती आपल्या जीवनाचा विकास काही थोड्या वर्षांतच साधू शकतात. अशा लोकांना अवतारी पुरुष, देवदूत किंवा प्रेषित असे म्हणतात. त्यांना योगशास्त्राचे खरे मर्म समजून आलेले असते. त्यांनी आपल्या मनावर, आचारविचारांवर तावा मिळविलेला असावा. यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने अवतारी पुरुषांचे अनुकरण करून आपले व्यक्तिमत्त्व सुधारावे व पूर्णत्व गाठण्याच्या मार्गावरील आपला वेग वाढविण्याचा प्रयत्न करावा.

## शिक्षक आणि विद्यार्थी

स्वामी विवेकानंदांच्या शैक्षणिक विचारानुसार विद्यार्थ्यांवर योग्य संस्कार होण्यासाठी, त्यांचे शीलसंवर्धन व आत्मिक उन्नती होण्यासाठी गुरुगृहवासाची अत्यंत जरूरी आहे. अशा आश्रमपद्धतीच्या शाळांमुळे विद्यार्थी गुरुजींच्या जीवनाचे अनुकरण करून त्यांचा उच्च आदर्श सतत डोळ्यांपुढे ठेवतील. अशा प्रकारची उच्च शिक्षणपद्धती प्राचीन भारतामध्ये प्रचलित होती. विद्यार्थी गुरुजींच्या घरीच रहात असत. त्या वेळी ज्ञान इतके पवित्र मानले जात असे की त्याचा विक्रय करणे पाप समजले जात असे. विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचे शुल्क द्यावे लागत नसे. एवढेच नव्हे तर त्यांच्या जेवण्याखाण्याची व कपड्यालत्त्याचीही सोय आचार्यच करीत असत. त्या वेळच्या विद्यार्थ्यांचे शिक्षण हे प्रत्यक्ष जीवनातून व उच्च जीवनासाठी दिले जात असे. अशा प्रकारच्या शिक्षणपद्धतीसाठी आदर्श व त्यागमय जीवन जगणाऱ्या आचार्यांची अत्यंत आवश्यकता आहे.

### शिक्षक

शिक्षकांमध्ये सर्वप्रथम आपल्या विद्यार्थ्यांबद्दल संपूर्ण सहानुभूती व अलोट प्रेम असले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची पातळी ओळखून त्याला उच्च प्रतीचे ज्ञान व उपयुक्त शैक्षणिक अनुभव अत्यंत सुलभ पद्धतीने देण्याची कला त्याला

अवगत असली पाहिजे. त्याचे व्यक्तिमत्त्व इतके प्रभावी असले पाहिजे व त्याचे आचार-विचार इतके उच्च दर्जाचे असले पाहिजेत की, अनेक विद्यार्थ्यांवर त्यांचा प्रभाव अत्यंत थोड्या वेळातच पडला पाहिजे. विद्यार्थ्यांची जी श्रद्धास्थाने आहेत त्यांना विचलित करण्याचा प्रयत्न शिक्षकांनी कधीही करू नये. "न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानां कर्मसंगिनाम् ।" शिक्षकांनी निरनिराळ्या तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला पाहिजे. केवळ शब्दांच्या जंजाळात न सापडता वेदांताचे मौलिक विचार आत्मसात करून ते आचरणात आणण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला असावा. शिक्षकांचे शील व चारित्र्य उच्च प्रतीचे असले पाहिजे. शिक्षकांचे कार्य विद्यार्थ्यांना केवळ प्रेरणा देणे हे नसून आत्मिक विचारांचे विद्यार्थ्यांत संक्रमण करणे हे होय. म्हणून शिक्षक नेहमी पवित्र व शुद्ध आचरणाचा असला पाहिजे. पैसा, नावलौकिक मिळविण्याच्या हेतूंने जे शिक्षक अध्यापनाचे काम करतात ते ज्ञानाला क्षुद्र लेखून त्याचा व्यापार करीत असतात. शिक्षक व विद्यार्थी या दोघांनीही ब्रह्मचर्याचे परिपालन केले पाहिजे.

## विद्यार्थी

शिष्यत्व पत्करणे हे एक व्रत आहे. त्यासाठी सुखोपभोगाचा, अभिलाषेचा त्याग करावा लागतो. मनामध्ये आसक्ती ठेवून व सुखोपभोगांच्या जाळ्यात अडकून कोणीही सत्यान्वेषण करू शकत नाही. विद्यार्थ्यांचे जीवन अत्यंत साधे व सोज्ज्वल असले पाहिजे. श्रीमंतीमध्ये सुखोपभोग घेणाऱ्या विद्यार्थ्याला ज्ञानाची साधना करण्यास कधीच वेळ मिळत नाही. प्रेम, सत्य व निःस्वार्थीपणा या सद्गुणांमध्ये आत्म्याची खरी शक्ती दिसून येते. स्वार्थी मनुष्याची सर्व शक्ती सामान्य गोष्टी मिळविण्याकरिता खर्च होत असते. याउलट निःस्वार्थी व सर्वेंद्रियांचे दमन करणारा विद्यार्थी आपली शक्ती मोक्षप्राप्तीसाठी खर्च करू शकतो. जे लोक आपल्या इंद्रियांचा निग्रह करू शकतात व ज्यांची इच्छाशक्ती अत्यंत जाज्वल्य असते, ज्यांचे चारित्र्य निष्कलंक असते अशाच लोकांतून भगवान् बुद्ध, परमात्मा ख्राइस्ट, पूर्णावतार भगवान् श्रीकृष्ण यांसारख्या विभूती जन्मास येतात. स्वतःच्या मनावर विद्यार्थ्याने ताबा मिळविला पाहिजे. मनाला स्वतःवर स्वार होऊ न देता मनावर स्वतः स्वार होण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी केला पाहिजे. आत्मसंयमनाबरोबरच दारिद्रय, दुःख हे निमूटपणे सहन करण्याची सहनशक्ती विद्यार्थ्यात असली पाहिजे. विद्यार्थ्याने मोक्षाचा अखंड ध्यास धरला पाहिजे. काम, क्रोध इत्यादी क्षणिक सुखांच्या मागे न लागता अन्तिम व शाश्वत सत्याचा शोध घेणे हेच त्याचे शिक्षण घेण्यापाठीमागील ध्येय असले पाहिजे. आदर्श

नेहमी उच्च असला पाहिजे. "नोऽचार्थो विफलोऽपि दूषणपदं दूष्यस्तु कामो लघुः ।" क्षुद्र व हीन प्रतीचे ध्येय समोर ठेवणे उचित नव्हे. अशा रीतीने विद्यार्थ्यांनी वर्तन ठेवल्यास त्यांच्या हृदयरूपी कमलांचा विकास होऊन ज्ञानाचा गुंजारव त्यांना सतत ऐकू येईल. मात्र आपल्या आचार-विचारांमध्ये आपल्या शिक्षकावरील श्रद्धा त्याने ढळू देता कामा नये. 'आचार्यदेवो भव' ही शिकवण त्यांनी चांगली आत्मसात केली पाहिजे.

## धार्मिक शिक्षण

सर्व शिक्षणाचा गाभा म्हणजे धर्मज्ञान होय. सर्व धर्मांमधील शाश्वत अशी मूलतत्त्वे सतत लोकांच्यासमोर ठेवली पाहिजेत. धर्मतत्त्वांचे ज्ञान होण्यापूर्वी सर्व-सामान्य लोकांसाठी भगवान कृष्ण, प्रभू रामचंद्र, महावीर हनुमान, गौतमबुद्ध, ख्रिस्त यांचे आदर्श त्यांच्यापुढे ठेवले पाहिजेत. देवळे, मशिदी किंवा चर्च ही म्हणजे धर्मशिक्षणाची प्राथमिक साधने होत. निम्नप्राथमिक शिक्षणामध्ये ज्याप्रमाणे लेखन, वाचन व गणित ही ज्ञानाची साधने शिकविली जातात, त्याचप्रमाणे निरनिराळे धर्मग्रंथ, मंदिरे व मशिदी यांच्याद्वारा धर्माचे प्राथमिक स्वरूप समजून येते. विद्यार्थ्यांसमोर अवतारी पुरुषांचा कोणता आदर्श ठेवावयाचा हे सुज्ञपणे समजून घेतले पाहिजे. आज भारतातील लोकांपुढे असंख्य गोपींमध्ये रममाण होणाऱ्या व रासक्रीडा करणाऱ्या कृष्णाचा आदर्श न ठेवता, रणक्षेत्रावर स्व-कर्तव्याची जाणीव करून देणाऱ्या, गीतेचे तत्त्वज्ञान शिकविणाऱ्या व स्वतःच्या कर्तव्यासाठी अर्जुनाला युद्धासाठी सज्ज करणाऱ्या योगेश्वर कृष्णाचाच आदर्श ठेवला पाहिजे. आजच्या विद्यार्थ्यांसमोर आदर्श म्हणून महावीर हनुमानाचे उदाहरण फारच चांगले आहे. आज्ञापालन, शौर्य, सेवावृत्ती, ब्रह्मचर्य इत्यादी उच्चतम गुणांचा आदर्श म्हणजेच महावीर हनुमान होय. "मनोजवं मारुततुल्यवेगम् । जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् । वातात्मजं वानरयूथमुख्यम् । श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥" हाच आपल्या शिक्षणाचा आदर्श असला पाहिजे. आज आपल्याला हृदयाच्या नाजूक भावना छेडणाऱ्या व स्त्रैण वृत्तींची जोपासना करणाऱ्या संगीताची काहीच जरुरी नाही. आज जरुरी आहे ती प्रचंड वेगाने कामाला उद्युक्त करणाऱ्या रणवाद्यांची! पूर्वी आपण असे म्हणत होतो की, ज्याचा परमेश्वरावर विश्वास नाही तो नास्तिक. पण स्वामीजींच्या मते स्वतःवर विश्वास नसणारा मनुष्यच खरोखर नास्तिक होय. धर्माचे शिक्षण घेतलेल्या प्रत्येक व्यक्तीने स्वतःवरील प्रेमाइतकेच निःसीम प्रेम इतरांवरही केले पाहिजे. कारण सर्व भूत-मात्रांमध्ये एकाच परमात्म्याचा अंश आहे अशी त्याची श्रद्धा असली पाहिजे. धर्माच्या अभ्यासाने आपली दुर्बलता जाऊन सामर्थ्य निर्माण झाले पाहिजे.

ज्यामुळे आपले मन व बुद्धी कमकुवत बनते, त्यास विषसमान मानून त्याचा त्याग केला पाहिजे. धर्माच्या शिक्षणाने आपण परमात्म्याची प्रतिकृती आहोत याची जाणीव होते. या सत्यज्ञानामुळे एकप्रकारे आत्मसामर्थ्य वाढते. म्हणून सर्व लोकांनी वेद व उपनिषदे यांमध्ये वर्णन केलेला धर्म आचरणात आणावा. आपल्या सर्व दुःखांचे कारण शारीरिक व मानसिक दुर्बलता हेच होय. दुर्बलांना खरा धर्म समजू शकत नाही. गीतेचे खरे मर्म तुम्हांस समजून घ्यावयाचे असल्यास तुम्ही सामर्थ्यशाली असला पाहिजे. अलेक्झांडरने एकदा एका भारतीय साधूला ग्रीस देशास येण्याविषयी आज्ञापिले. त्याची आज्ञा न मानल्यास शिरच्छेद करण्याचीही धमकी त्यास दिली. परंतु साधूला धर्माचे खरे ज्ञान अवगत असल्यामुळे तो इतका निर्भय होता की, अलेक्झांडरला त्याच्यापुढे नमते घ्यावे लागले. उपनिषदांच्या अभ्यासामुळे व्यक्तीला शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक स्वातंत्र्य व सामर्थ्य उपभोगता येईल. यासाठी धर्माचा खरा अभ्यास केला पाहिजे. केवळ शब्दांची पोपटपंची नको. बुद्धीने धर्माचे वरवरचे आकलन करून घेतल्यास व्यक्ती स्वार्थी बनते. म्हणून धर्माची तत्त्वे हृदयामध्ये खोलवर रुजली पाहिजेत. धर्माने प्रेम व शांती शिकविली आहे. सर्व धर्मांमध्ये मूलभूत तत्त्वे सारखीच आहेत. निरनिराळे धर्म म्हणजे सत्याकडे पाहण्याचे निरनिराळे दृष्टिकोन होत. परमेश्वरप्राप्तीचे मार्ग भिन्न असले तरी सर्वांचे ध्येय मात्र एकच आहे. यासाठी सर्व धर्मांवर प्रेम करावे. रामकृष्ण परमहंस यांच्या मनामध्ये धर्मांच्या बाबतींत भेदभाव नव्हता. त्यांचे अनुकरण करून सहिष्णुता व सर्वसमावेशक वृत्ती वाढीस लावावी.

**स्त्रीशिक्षण**

स्त्रीपुरुषांमध्ये समान आत्मा असल्याकारणाने त्यांच्यात विषमता मानणे योग्य होणार नाही. उपनिषद कालापर्यंत भारतामध्ये स्त्रीपुरुषांचा दर्जा समान होता. गार्गी व मैत्रेयी यांच्यासारख्या स्त्रिया पुरुषऋषिमुनींबरोबर समान भूमिकेवरून वादाविवाद करीत असत. अमेरिका व इतर प्रगत देशामध्येही स्त्रीपुरुषांमध्ये समता मानली जाते. आपण मात्र स्त्रियांना कमी प्रतीच्या लेखून स्वतःवर आपत्ती ओढून घेत असतो. मनूनेही मुलगा व मुलगी यांमध्ये समता मानली आहे. " पुत्रेण दुहिता समा ", " यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः " यांसारख्या उक्तींचा उल्लेख मनुस्मृतीमध्ये आढळतो. परंतु त्यानंतरच्या काळात मात्र स्त्रियांच्या अवहेलनेस सुरुवात झालेली दिसते. स्वामी विवेकानंदांच्या मतांप्रमाणे स्त्रियांच्या सर्व समस्या शिक्षणानेच सुटतील. स्त्रिया शिक्षणाने स्वावलंबी बनू शकतील. त्यांचे शिक्षण धर्मकेंद्रित असले पाहिजे. त्यांचे चारित्र्य व शील उच्च

प्रतीचे झाले पाहिजे. स्त्रियांनी आपल्यापुढे सीतेचा आदर्श ठेवावा. सीता ही शुद्धतेची मूर्तिमंत प्रतिमा होती. काही स्त्रियांनी ब्रह्मचारी राहून खेड्यापाड्यांतून शिक्षणप्रचाराचे कार्य करावे. स्त्रियाचा उद्धार स्त्रियाच करू शकतील. स्त्रियांच्या शिक्षणक्रमामध्ये इतर विषयांबरोबरच गृहव्यवस्था, कला, शिवण, शिशुसंगोपन या विषयांचा समावेश असावा. भारतीय स्त्रियांनी पारंपरिक अबला न बनता झाशीच्या राणीप्रमाणे निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये मर्दुमकी गाजवावी. ज्या देशाच्या स्त्रिया सुशिक्षित व सुचरित असतील अशांच्याच पोटी देशाला ललामभूत ठरणारी नररत्ने जन्मास येतील.

## लोकशिक्षण

भारतातील बहुसंख्य जनता खेड्यापाड्यांतून राहत आहे. तिची स्थिती अत्यंत शोचनीय आहे. अज्ञान, दारिद्र्य व रोगराई यांनी ती जर्जर झाली आहे. खेड्यापाड्यांतील दारिद्र्य इतके भयानक आहे की, त्यामुळे मनुष्यत्वाचीही तिला जाणीव राहिलेली नाही. मात्र असंख्य व अपरंपार दुःखे अनेक वर्षे जनतेने सहन केली आहेत. या सर्व दुःस्थितीचे कारण काय हेही तिला समजेनासे झाले आहे. स्वामीजींच्या मताप्रमाणे देशाची स्थिती सुधारण्यासाठी जनसामान्यांची स्थिती सुधारणे आवश्यक आहे आणि ही जबाबदारी देशातील सुशिक्षितांवरच आहे. हे काम सुशिक्षितांनी न केल्यास त्यांना देशद्रोही समजले पाहिजे. शिक्षणाची मक्तेदारी काही थोड्या लोकांच्याकडे ठेवणे योग्य नाही. सर्वांना शिक्षणाची दारे खुली केली पाहिजेत. सर्वसामान्य जनतेचे व्यक्तिमत्त्व वाढविले पाहिजे. त्यांना योग्य शिक्षण दिल्यास ते स्वतःचा उद्धार स्वतःच करू शकतील. त्यांना द्यावयाचे शिक्षण मातृभाषेतूनच दिले पाहिजे. संस्कृतमधील कांही चांगली वचने व नवविचार त्यांना शिकविले तरी चालतील. कारण संस्कृत शब्दाला एकप्रकारची शक्ती व वजन आहे. आपल्या देशातील सर्वसामान्य जनतेला जागे करून त्यांची दुःस्थिती सुधारण्यास मदत केली पाहिजे. प्रौढांना शिकविण्यासाठी विज्ञान व कला यांचा उपयोग केला पाहिजे. ज्या ज्ञानाची त्यांना जरूरी आहे, ज्या ज्ञानामुळे त्यांना त्यांची शेती व व्यापार-उदीम सुधारता येतील तेच ज्ञान त्यांना दिले पाहिजे. खेड्यापाड्यांतील शाळांमध्ये आपल्या दारिद्र्यामुळे व अज्ञानामुळे शेतकरी येऊ शकला नाही तर शिक्षकांनी शेतकऱ्याच्या झोपडीत शाळा नेली पाहिजे. यासाठी संन्यासी, भिक्षुक यांची मदत घेतली जांवी. प्रौढ शिक्षणामध्ये, नकाशे, ग्लोब, चित्रे, कॅमेरा इत्यादी दृक्‌श्रवण साधनांचा आधुनिक पद्धतीने वापर करावा. खेड्यांतील जनता जीवनाच्या प्रचंड संघर्षामध्ये गुंतल्यामुळे त्यांना ज्ञान मिळू शकले नाही. आजपर्यंत त्यांनी पराकोटीचे शारीरिक श्रम केले. त्या

श्रमांची फळे मात्र सुशिक्षितांनी पळविली. पण ही त्यांची पिळवणूक आता थांबली पाहिजे. जनता जागी होत आहे. त्यांना मदत करण्यात सुशिक्षितांचे हित आहे. म्हणून ज्ञान आणि विज्ञान शेतकऱ्यांच्या झोपडीपर्यंत नेण्याचा निर्धार केला पाहिजे. जोपर्यंत अज्ञानी प्रौढ जनतेला सुशिक्षित केले नाही तोपर्यंत प्रत्येक शिक्षिताला बेचैन वाटले पाहिजे. हे काम सहानुभूतीने व निर्धाराने चांगल्या प्रकारे होऊ शकेल. श्रीमंतांच्या शिक्षणापेक्षा अनेक शतके जुलूम, दारिद्र्य, धर्मभोळेपणा व रूढी यांनी गांजलेल्या जनतेला शिकविणे, तिचा उद्धार करणे म्हणजे ' दरिद्री नारायणाची सेवा ' करणे होय.

# महात्मा ज्योतिबा फुले

| जन्म | १८२७ |
| --- | --- |
| मृत्यू | १८९० |

महात्मा ज्योतिबा फुले हे महाराष्ट्रातील सुधारकांचे अग्रणी होत. महाराष्ट्रामध्ये अस्पृश्यांकरिता व मुलींच्याकरिता पहिली शाळा महात्मा फुले यांनीच काढली. सामान्य व अस्पृश्य जनतेसाठी न्याय मिळावा म्हणून ज्योतिबा फुल्यांनी सामाजिक पद्धतीवर कठोर प्रहार केले. पुरोहितवर्ग सर्वसामान्य जनतेचे निरनिराळ्या प्रकारचे शोषण करीत असे. त्याविरुद्ध म. फुल्यांनी अखंड झगडा दिला. सर्व लोकांना सामाजिक व आर्थिक न्याय मिळावा, समाज समता, बंधुता व न्याय यांवर अधिष्ठित असावा म्हणून त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. आत्मोद्धारासाठी शिक्षणाचे महत्त्व त्यांनी अचूक हेरले व शिक्षणाची द्वारे अंत्यजांपासून तो परित्यक्तांपर्यंत सर्वांना खुली करण्यासाठी सर्वांगीण प्रयत्न केले. या कार्यात हितसंबंधियांकडून कुचेष्टा, मानहानी आणि हेटाळणी त्यांना सहन करावी लागली. परंतु त्यांची आपल्या ध्येयावरील निष्ठा इतकी अविचलित राहिली की, त्यांनी सर्वांचा विरोध सहन करून आपले अंगीकृत कार्य तडीस नेले.

## चरित्र

ज्योतिबा फुल्यांचे घराणे मूळचे साताऱ्याजवळील कटगुणचे. त्यांच्या पणजोबांनी गावातील वितुष्टामुळे आपले गाव सोडले व ते पुरंदर तालुक्यात खानवाडी

येथे स्थायिक झाले. त्यांच्या आजोबांचे नाव शेटीबा. शेटीबा वृत्तीने साधे व सालस असले तरी त्यांना हिशोबीपणा नव्हता. त्यातच त्यांना काही वाईट व्यसनेही लागली. त्यामुळे त्यांनी आपल्याजवळील पैसा अकारण खर्च करून टाकला. उपजीविकेसाठी त्यांना पुण्यास येणे भाग पडले. राणोजी, कृष्णा व गोविंदा ही त्यांची तीन अपत्ये. गरिबीमुळे बालवयातच या तीनही मुलांना काबाडकष्ट उपसावे लागले. पुण्यात एका माळ्याकडे ही तीन मुले काम करीत असल्यामुळे त्या धंद्यातील कसब त्यांनी लवकरच संपादन केले. फुलांचे विविध दागिने, हार, गजरे व फुलांची सजावट इत्यादी बाबतीत ही मुले पारंगत झाली. त्यांचा लौकिक इतका वाढला की, पेशव्यांनी आपल्या खाजगीतील व दरबारातील फुलांच्या सजावटीचे काम यांनाच दिले. त्यासाठी सेवेचा मोबदला म्हणून पस्तीस एकर जमीन दिली. फुलांचा व्यवसाय करू लागल्यापासून यांचे मूळचे गोऱ्हे हे आडनाव जाऊन फुले हे आडनाव रूढ झाले. थोड्या दिवसांत शेटीबा मरण पावले. नंतर तिन्ही भावंडे आपल्या वडिलांच्या मामांकडे राहू लागली. पुढे राणोजीने सर्व जमिनीचा ताबा मिळविण्यात यश मिळविले व आपल्या दोन्ही भावांना हाकून दिले. यामुळे कृष्णा व गोविंदा यांच्यावर फारच वाईट प्रसंग गुदरला. गोविंदरावांना उपजीविकेसाठी फारच कष्ट करावे लागले. पेशव्यांची गादी खालसा झाल्याकारणाने त्यांच्याकडेही कामधंदा मिळेनासा झाला. फुलांचा धंदा सोडून गोविंदरावांनी भाजीपाल्याचा धंदा सुरू केला. त्यांचे चिमणाबाई नावाच्या एका माळ्याच्या मुलीशी लग्न झाले. त्यांना दोन अपत्ये झाली. पहिला राजाराम व दुसरा ज्योतिबा. ज्योतिबांचा जन्म सन १८२७ साली झाला. त्या वेळी पेशवाई रसातळाला गेली होती. कोणत्याही राज्याच्या पडत्या काळात जी समाजामध्ये बेबंदशाही दिसून येते, जे दुर्गुण वाढीस लागतात ते सर्व या वेळी दिसून येत होते. ऐषआराम, ऐदीपणा, जुलूम, सत्तासंघर्ष, यांनी सर्व वातावरण दूषित झाले होते. सामान्य दीनदुबळ्या जनतेला आधार मिळेल अशी कोणतीही गोष्ट अस्तित्वात नव्हती. त्या वेळी केंद्रीय सत्ता नामशेष झाल्यामुळे लहानसहान सरदारांनी, सामान्य जनतेची जास्तीत जास्त पिळवणूक करण्याचा चंग बांधला होता.

**बालपण**

ज्योतिबा एक वर्षाचे असतानाच त्यांच्या मातोश्री चिमणाबाई स्वर्गवासी झाल्या. त्यामुळे ज्योतिबांना मातृसुख अजीबात मिळाले नाही. मात्र मुलांच्या संगोपनासाठी एक स्त्री-नोकर ठेवण्यात आली होती. तिने दोन्ही मुलांचे चांगले संगोपन केले. ज्योतिबा दिसण्यास गोंडस, सुदृढ व चलाख असल्यामुळे घरातील लोकांत व शेजाऱ्यापाजाऱ्यांमध्ये फार आवडते होते. या मुलाला चांगले शिक्षण द्यावे

असे गोविंदरावांनी ठरविले. परंतु त्या वेळी शिक्षण घेणे ही काही थोड्या लोकांचीच मिरासदारी होती. सरकारी शाळा अस्तित्वात नव्हत्या. कारण शिक्षणाची जबाबदारी सरकारने उचलली नव्हती. श्रीमंत लोक आपल्या मुलांसाठी स्वतंत्र शिक्षक नेमीत असत, किंवा काही लोक स्वतःचे घरी शाळा चालवीत असत. अशा शाळांतून ब्राह्मण मुलांशिवाय इतरांना क्वचितच प्रवेश मिळत असे. अशा प्रतिकूल परिस्थितीतही गोविंदरावांनी ज्योतिबांना त्यांच्या पाचव्या वर्षीच शाळेत घालण्यात यश मिळविले. ज्योतिबांची बुद्धी जात्याच तल्लख असल्यामुळे अभ्यासातील त्यांची प्रगती चांगली दिसून आली. परंतु गोविंदरावाकडे असलेल्या एका कारकुनाने मुलाला शिक्षण देण्याविरुद्ध त्यांचे मत बनविले. शिक्षणाने मुले बिघडतात, धर्मभ्रष्ट होतात, स्वतःचा व्यवसाय करीत नाहीत इत्यादी अनेक सांगीव गोष्टींचा गोविंदरावांच्यावर असा परिणाम झाला की, त्यांनी मुलाला शाळेतून काढले व शेतीत काम करावयास लावले. त्या वेळच्या प्रथेनुसार ज्योतिबांचे लग्न वयाच्या चौदाव्या वर्षी सावित्रीबाई यांच्याबरोबर झाले.

### शिक्षण

ज्योतिबांची शाळा सुटली तरी त्यांची वाचनाची गोडी कायमच राहिली. शेतातून काबाडकष्ट करून घरी परत आल्यावर पणतीच्या मिणमिणत्या उजेडात ऐतिहासिक व धार्मिक ग्रंथांचे ते वाचन करीत असत. त्यांच्या वाचनाच्या व्यासंगाकडे शेजाऱ्यापाजाऱ्यांचे नेहमीच लक्ष जाई. विशेषतः गफारबेग मुनशी गुरुजी व लेजिट मिशनरी या दोघांना ज्योतिबांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेचे महत्त्व पटले. म्हणून त्यांनी गोविंदरावांना ज्योतिबाच्या पुढील शिक्षणाची व्यवस्था करण्यास उद्युक्त केले. गोविंदरावांनाही मुलाच्या बालपणाची बहुमोल वर्षे फुकट गेल्यामुळे विलक्षण दुःख झाले. अशा रीतीने वयाच्या चौदाव्या वर्षी ज्योतिबा पुन्हा शाळेत दाखल झाले. वयाने प्रौढ असल्यामुळे व मूळचीच आकलनशक्ती चांगली असल्यामुळे इंग्रजी, मराठी, गणित या विषयांत त्यांनी चांगलीच प्रगती दाखविली. त्याच वेळी त्यांना काही मुसलमान, ख्रिश्चन व ब्राह्मण मित्र मिळाले. गावडे या मित्राबरोबर त्यांनी शिवाजीमहाराज व जॉर्ज वाशिंग्टन यांच्या चरित्रांचा सखोल अभ्यास केला. थॉमस पेनच्या Rights of Man या पुस्तकातील उदात्त विचारांचा पगडा त्यांच्या मनावर विलक्षण पडला. ख्रिश्चन व इस्लामी धर्मांचाही त्यांनी तौलनिक अभ्यास केला. कित्येक वेळा हिंदू धर्मातील रूढीरिवाजांविरुद्ध व वाईट चालीरीतींविरुद्ध बंड पुकारण्याचे त्यांच्या मनात आले. इतर धर्मांप्रमाणे आपल्या धर्मातही समतेचे तत्त्व आणावे व दीनदुबळ्या, पददलित लोकांच्या उद्धारासाठी आपले आयुष्य वेचावे असे त्यांनी ठरविले. ख्रिश्चन धर्म स्वीकारण्याचे

आमिषही त्यांना दाखविण्यात आले. परंतु मूळचा वैदिक धर्म हा अत्यंत उदार व उदात्त तत्त्वज्ञानावर आधारलेला असल्याची त्यांची खात्री झाल्यामुळे आपला धर्म व आपल्या चालीरीती सुधारणे हेच आपले कर्तव्य आहे असे त्यांना वाटले. सर्व धर्मांतील काही तत्त्वे समान असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्याचप्रमाणे प्रत्येक धर्मामध्ये काहीना काही वाईट चालीरीती रूढ झाल्याचे त्यांच्या अनुभवास आले. १८४७ साली अमेरिकेने स्वातंत्र्ययुद्ध पुकारले. त्यातून त्यांना मानवी समता, स्वातंत्र्य व मूलभूत हक्क यांची जाणीव झाली. त्याचबरोबर भारतामध्ये इंग्रजी राज्याविरुद्ध चालू असलेल्या संघर्षाचीही प्रकर्षाने जाणीव झाली.

## शैक्षणिक कार्य

वयाच्या एकविसाव्या वर्षी ज्योतिबांचे शिक्षण पूर्ण झाले. उपजीविकेसाठी त्यांनी आपला पूर्वापार माळ्याचा धंदा सुरू करण्याऐवजी त्यासाठी नवीन मार्ग चोखाळण्याचे ठरविले. यावरून ज्योतिबा गतानुगतिक नव्हते हे स्पष्ट दिसून येते. समाजातील स्त्रियांची व शूद्रांची गुलामगिरीतून व हालअपेष्टातून मुक्तता करण्यासाठी प्रयत्न करण्याचे त्यांनी ठरविले. इतर सुशिक्षित तरुणाप्रमाणे सरकारी नोकरीत शिरण्याचे त्यांच्या मनातही आले नाही. याच सुमारास एका विलक्षण प्रसंगाने त्यांच्या जीवनाला निराळे वळण लागले. त्यांना एका ब्राह्मण मित्राच्या लग्नाचे अगत्यपूर्वक निमंत्रण आले. त्या वेळी लग्नाच्या वरातीबरोबर जात असताना त्यांचा सनातन्यांकडून अपमान झाला. ते ब्राह्मणेतर असल्याकारणाने त्यांची वरातीच्या सोहळ्यातून, अपशब्दांचा मारा करून, हकालपट्टी करण्यात आली. त्यांच्या मानी स्वभावास हे अपमानाचे शल्य नेहमीच खुपत राहिले. घरी गेल्यावर त्यांनी वडिलांचा सल्ला घेतला. वडील पारंपरिक विचारसरणीत वाढले असल्याकारणाने त्यांनी अपमान निमूटपणे सहन करण्याचा त्यांना सल्ला दिला. शिवाय ब्राह्मणांची बरोबरी नकळत का होईना करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्यांनाच दोष लावला. त्या वेळी अस्पृश्यांची स्थिती इतकी भयानक होती की, सकाळी व संध्याकाळी सावल्या मोठ्या पडत असल्याकारणाने त्यांना रस्त्यावरून हिंडण्यास मज्जाव असे. एरवीसुद्धा हिंडताना गळ्यात मडके बांधणे व कमरेला पानांच्या डहाळ्या लावणे अशासारखी अपमानास्पद बंधने त्यांच्यावर होती. ज्योतिबांना वडिलांचा सल्ला मुळीच मानवला नाही. ज्या धर्मामध्ये ब्राह्मण जन्मास आले त्याच धर्मात तेही जन्मास आल्याकारणाने असा भेदभाव का असावा हे गूढ त्यांना उलगडेना. सामाजिक गुलामगिरी ही राजकीय गुलामगिरीपेक्षाही फारच भयानक आहे हे त्यांना कळून चुकले. सामाजिक विषमता व अन्याय याविरुद्ध झगडण्याचे ध्येय त्यांनी निश्चित केले. खालच्या जातीतील लोकांना शिक्षणाची कवाडे त्या वेळी

बंद होती. ती मोकळी करण्यासाठी स्वतंत्र शाळा उघडल्या पाहिजेत हे त्यांच्या लक्षात आले. याच सुमारास त्यांचे मित्र गावडे यांची बदली अहमदनगर येथे झाली होती. तेथे ख्रिश्चन मिशनऱ्यांनी दलितोद्धाराचे काम फार मोठ्या प्रमाणात चालविले होते. हे कार्य जवळून पाहण्याची संधी त्यांना लवकरच प्राप्त झाली. त्याच ठिकाणी मिस् फोर या स्त्रीमिशनरीबरोबर त्यांचा परिचय झाला. आपल्या देशातील सामान्य जनतेची आणि विशेषतः स्त्रियांची दुःखे दूर करण्याकरिता परकीय लोक इतक्या तळमळीने कार्य करीत असल्याचे पाहून त्यांना सामाजिक कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. पुण्याला परत आल्यावर त्यांनी बुधवार पेठेत भिड्यांच्या वाड्यामध्ये अस्पृश्यांसाठी व मुलींसाठी सन १८४८ मध्ये एक शाळा काढली. हीच मुलींसाठी काढलेली पहिली खाजगी प्राथमिक शाळा होय.

ज्योतिबांच्या या कृतीमुळे पुणेकर सनातनी अतिशय संतापले. स्त्रियांच्या शिक्षणामुळे धर्म बुडेल व अनर्थ बोकाळेल असे त्यांना वाटू लागले. स्त्रिया शिकल्या तर त्यांना अकाली वैधव्य प्राप्त होईल असा समज त्या काळी रूढ होता. स्त्रियांनी आपल्या पतीबरोबर जेवण करणे, चालणे, बोलणे, त्यांच्या नोकरीच्या गावी रहावयास जाणे हे पाप समजले जाई.

मुलींची शाळा काढून ज्योतिबांनी समाज सुधारण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले खरे, पण शाळेत शिकविण्यासाठी त्यांना शिक्षक किंवा शिक्षिका मिळेनात. त्यांची पत्नी सौ. सावित्रीबाई निरक्षरच होती. प्रथम त्यांनी आपल्या पत्नीस शिकविले व तिच्याकडे शिक्षिकेचे काम सोपविले. सावित्रीबाई याच महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री-शिक्षिका होत. सावित्रीबाईंना समाजाकडून होणाऱ्या निंदेचा, उपहासाचा व हेटाळणीचा विलक्षण त्रास सहन करावा लागला. परंतु तशाही परिस्थितीमध्ये आपले अध्यापनाचे कार्य त्यांनी शांतपणे चालू ठेवले. काही समाजकंटकांनी तर निंदा, नालस्ती, शेणमारा, दगडफेक यांसारख्या निंद्य गोष्टी सुरू केल्या. एवढे करून न थांबता त्यांनी ज्योतिबांच्या वडिलांवर दडपण आणण्याचाही प्रयत्न केला. ज्योतिबा लोकविरुद्ध कार्यापासून परावृत्त होत नाहीत असे पाहताच त्याला घरातून घालवून देण्यास त्यांनी त्यांच्या वडिलांना भाग पाडले. ज्योतिबाही दृढनिश्चयी होते. त्यांनी परमप्रिय पित्याचे घर सोडले, पण अंगीकृत कार्याचा त्याग केला नाही. वडिलांचे कृपाछत्र जोपर्यंत त्यांच्यावर होते तोपर्यंत उपजीविकेची फारशी विवंचना त्यांना पडली नव्हती. परंतु आता मात्र संसार चालविण्यासाठी काही तरी उद्योग करणे त्यांना जरूर होते. सरकारी नोकरी न करण्याचा त्यांचा निश्चयच होता. एखादा स्वतंत्र उद्योगधंदा करावा या हेतूने बांधकामाची लहानमोठी कामे त्यांनी अंगीकारिली. हा व्यवसाय करीत असताना शिक्षणप्रसाराच्या कार्याकडे त्यांचे दुर्लक्ष

झाले नाही. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात परकीय मिशनऱ्यांनी महाराष्ट्रामध्ये शाळा काढण्याचा सपाटा चालविला होता. ज्योतिबांनीही संघटित प्रयत्न करण्यासाठी काही मित्रमंडळींची एक समिती स्थापन केली. या समितीच्या मार्गदर्शनाखाली ३ जुलै १८५१ साली पुण्यामध्ये बुधवार पेठेतील अण्णासाहेब चिपळूणकरांच्या वाड्यात मुलींची शाळा काढण्यात आली. सुरुवातीस या शाळेत केवळ आठच मुली दाखल झाल्या. तरी पुढे ही शाळा चांगलीच लौकीकास आली. कमी पगारावर काम करणारा कोणीच शिक्षक न मिळाल्याकारणाने सावित्रीबाईंनी विनावेतन काम करण्याची तयारी दर्शविली. पुढे आणखीही काही शाळा त्यांनी स्थापन केल्या. ब्रिटिश सरकारने १८५६ साली शिक्षणाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर ज्योतिबांच्या शाळांना काही प्रमाणात सरकारी अनुदान मिळू लागले. ज्योतिबांच्या शिक्षणप्रसाराच्या कार्याचा सरकारदरबारी पुष्कळच बोलबाला झाला. त्यांच्या कार्याचे महत्त्व हळूहळू सर्वांना पटू लागले. १८५२ साली त्या वेळच्या गव्हर्नराने पुण्यास दरबार भरवून दोनशे रुपयांची शाल देऊन त्यांचा गौरव केला.

## सामाजिक कार्य

तत्कालीन उच्चवर्णीय व विशेषतः ब्राह्मण समाजातील विधवांची स्थिती फारच शोचनीय होती. पुनर्विवाहाची चाल प्रचलित नसल्याकारणाने पतिनिधनानंतरचे त्यांचे जीवन अत्यंत अनुकंपनीय होत असे. बालविवाहाच्या प्रथेमुळे तर या समस्येची तीव्रता अधिकच जाणवे. केशवपनासारख्या क्रूर व दुष्ट चालीमुळे विधवांच्या दैन्यावस्थेला पारावार राहिला नाही. या बाबतीत विधवांच्या दुःखांना वाचा फोडण्यासाठी व त्यांच्या उद्‌ध्वस्त जीवनाला चांगले वळण देण्यासाठी त्यांनी पुनर्विवाहाच्या प्रथेला जोराची चालना दिली. विधवांच्या प्रश्नाबरोबरच त्या वेळच्या समाजामध्ये अनौरस संततीचा व परित्यक्त बाल-बालिकांचा प्रश्न बिकट झाला होता. त्यावर उपाय म्हणून अनाथ बालकाश्रम काढण्याचे प्रयत्न ज्योतिबांनी सुरू केले. पहिले बालहत्याप्रतिबंधक गृह पुण्यासच त्यांच्या प्रयत्नांतून सुरू झाले. ज्या काळामध्ये विधवाविवाह किंवा परित्यक्त बालकांच्यासंबंधी बोलणेही दुरापास्त होते. अशा वेळी या समस्या सोडविण्यासाठी धैर्याने, अनेकांचा विरोध सहन करून एकाकीपणे, चिकाटीने कार्य करीत राहण्यास केवढे मोठे मनोधैर्य व निष्कलंक व्यक्तिमत्त्व असावयास पाहिजे याची कल्पनाच केलेली बरी.

ज्योतिबांना मूलबाळ नव्हते म्हणून वडिलांनी व मित्रमंडळींनी त्यांना दुसरे लग्न करण्याचा आग्रह केला. त्या वेळी एक पत्नी हयात असताना दुसरे लग्न करण्याची चाल प्रचलित होती. ज्योतिबांचा या बाबतीतील दृष्टिकोन एवढा विशाल

व मूलगामी होता की, आपली प्रिय पत्नी हयात असताना केवळ संततीसाठी लग्न करण्याचा विचार त्यांना सहन होणारा नव्हता. ज्या कारणाने पती दुसरे लग्न करू शकतो, त्याच कारणावरून पत्नीने दुसऱ्याशी लग्न केल्यास ते सहन करणे पतीस शक्य होईल का ? या दृष्टिकोनातून ते विचार करीत असत.

## कामगारांचा प्रश्न

वडिलांच्या मृत्यूनंतर ज्योतिबा लहानमोठी कंत्राटे घेत असत. असेच एकदा खडकवासला येथील एक काम त्यांनी हाती घेतले होते. त्या वेळी मजुरांचे जीवन जवळून पाहण्याची संधी त्यांना मिळाली. इंजिनिअर्स व कारकून मंडळी मजुरांची कशी फसवणूक व पिळवणूक करतात, याचे त्यांनी प्रत्यक्ष निरीक्षण केले. या जुलमाला वाचा फोडण्यासाठी त्यांनी एक पोवाडा रचला होता. मजुरांची दुःखे सरकारदरबारी वेशीवर टांगण्यासाठी त्यांनी निर्भीडपणे प्रयत्न केले.

## अस्पृश्यांचा प्रश्न

अस्पृश्यता हा प्रचलित हिंदु धर्मावरील कलंक आहे. तो धुऊन काढण्यासाठी ज्योतिबांनी निकराचे प्रयत्न केले. त्यांच्यासाठी त्यांनी शाळा काढल्या. अस्पृश्य मुलांसाठी पहिली शाळा १८५१ साली ज्योतिबा फुल्यांनीच सुरू केली. ही शाळा पुणे येथे नानापेठेत सुरु झाली. अस्पृश्यांवरील अन्याय्य निर्बंध दूर करण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. सर्व दुःखांवर रामबाण उपाय म्हणजे शिक्षण हाच असल्यामुळे अस्पृश्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याचा त्यांनी तळमळीने प्रयत्न केला. समाजकंटकांनी त्यांची पहिली अस्पृश्यांची शाळा बंद पाडल्यावर त्यांनी महारवाड्यात जाऊन तेथील मुलांना शिकविण्याचे काम अंगीकारले. अस्पृश्यांच्यावर निरनिराळे सामाजिक जुल्म व अन्याय होत असत. ते दूर करण्याचाही त्यांनी प्रयत्न केला. सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्याचा अस्पृश्यांना मज्जाव असे. हा अन्याय दूर करण्यासाठी व लोकांचे मतपरिवर्तन करण्यासाठी त्यांनी आपल्या भाषणांतून व लेखनांतून भरपूर प्रचार केला. जे लोकांना सांगितले, ते स्वतः प्रथम आचरणात आणले पाहिजे, याकरिता त्यांनी स्वतःच्या घरचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला.

## सत्यशोधक पंथ

समाजातील विषमता घालविण्यासाठी व पददलित लोकांची दुःखे दूर करण्यासाठी त्यांनी एक नवीन पंथ सुरू केला. ज्योतिबांनी अनेक धर्मग्रंथांचे वाचन

केले होते. हिंदु धर्मापेक्षा मूळचा वैदिक धर्म फार चगांल्या तत्त्वांवर आधारलेला होता हे त्यांच्या निदर्शनास आले होते. सत्यशोधक पंथ स्थापन करण्यामागे ज्योतिबांचा हेतू समाजामध्ये योग्य परिवर्तन घडवून आणणे हा होता. आतापर्यंत त्यांनी बरेच सामाजिक कार्य केले होते. त्यांच्या कार्याला पुराणमतवादी सनातन्यांकडून जोराचा विरोध होत असला तरी त्यांची नवीन सामाजिक विचारप्रणाली काही विचारी पुढाऱ्यांना समजली होती. अशा लोकांना एकत्रित करून एक प्रबळ संघटना निर्माण करावी व आपले कार्य वेगाने पुढे न्यावे हाही महात्मा ज्योतिबांचा एक महत्त्वाचा हेतू होता. सत्यशोधक पंथाची मूळची तत्त्वे पुष्कळच प्रागतिक व उदार होती. ती तत्त्वे खाली दिली आहेत.

१. ईश्वर एक असून तो सर्वव्यापी, निर्विकार, निर्गुण व सत्यमय आहे. सर्व मनुष्यप्राणी एकाच परमेश्वराची लेकरे अहेत. त्यामुळे मानवा-मानवांत भेदाभेद करणे हे ईश्वराला संमत नाही. जातिभेद, अस्पृश्यता इत्यादी गोष्टी समाज विघटनास कारणीभूत आहेत. जातिभेद, अस्पृश्यता इत्यादी गोष्टी काही विशिष्ट हितसंबंधी लोकांनी आपल्या स्वार्थासाठी निर्माण केल्या आहेत.

२. ईश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येक मानवाला पूर्ण अधिकार आहे. अशा प्रकारे भक्तिपूजन करण्यासाठी कोणाही मध्यस्थाची, दलालाची, किंवा पुरोहिताची जरूरी नसते. पुरोहितवर्ग जनतेच्या श्रद्धेचा गैर-फायदा घेऊन त्यांना लुबाडण्याचा प्रयत्न करीत असतो. ही जनतेची पिळवणूक तावडतोब थांबविणे आवश्यक आहे. धर्म, आचार व विचार प्रधान असतो. धर्मातील विचार किंवा तत्त्वे निरंकुश किंवा निर्दोष असली तरी कित्येक आचार धर्मामध्ये काही हितसंबंधी लोकांनी स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी घुसडलेले असतात. अशा आचारांना फाटा देऊन सत्यस्वरूप धर्माचे आपल्या कुवतीप्रमाणे आचरण करावे.

३. कोणताही मनुष्य विशिष्ट जातीत जन्मला म्हणून श्रेष्ठ ठरत नसून त्याचा मोठेपणा त्याच्या गुणांवर अवलंबून असतो. या दृष्टीने विचार करता हिंदूधर्मातील वर्णव्यवस्था निंद्य व त्याज्य आहे. कारण वर्ण-व्यवस्थेनुसार विशिष्ट जातीत जन्मलेल्यांना काही हक्क व सुखसोयी बहाल करण्यात आलेल्या आहेत.

खरे पाहिले तर वरील तत्त्वे सर्वांना मान्य होण्यासारखीच आहेत. हिंदु-धर्मग्रंथांमध्ये व निरनिराळ्या संतांच्या वचनांमध्ये हीच तत्त्वे दिसून येतात.

भगवद्‌गीतेमध्ये "स्त्रियो वैश्याः तथा शूद्राः तेऽपि यान्ति परां गतिम्" या वचनाप्रमाणे स्त्रिया, वैश्य व शूद्र यांना समान मानले आहे.

## दीनबंधू

आपले विचार बहुजन समाजाला पटविण्यासाठी व त्यांचा समाजामध्ये प्रसार करण्यासाठी ज्योतिबांनी १ जानेवारी १८७७ रोजी दीनबंधू नावाचे वर्तमानपत्र सुरू केले. त्या काळी वर्तमानपत्र चालविणे हे अत्यंत अवघड कार्य होते. ज्यांच्यासाठी हे वर्तमानपत्र सुरू केले तो बहुजनसमाज अशिक्षित व अडाणी असल्याकारणाने या पत्राला वर्गणीदार मिळणे अत्यंत कठीण होते. दीनबंधूचे पहिले वर्गणीदार हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच होते. तथापि समाजकल्याणाची तळमळ तीव्र असल्यामुळे ज्योतिबांनी त्यांचे मित्र श्री. भालेकर यांच्या मदतीने हे कार्य नेटाने चालू ठेवले. दीनबंधूतील लेख खरोखरच दीन-दुबळ्या लोकांना आधार देणारे, त्यांच्या दुःखाचे सान्त्वन करून त्याला वाचा फोडणारे होते. स्त्रिया, अस्पृश्य, शेतकरी व मजूर यांना समाजातील धूर्त लोक हरतऱ्हेने फसविण्याचे प्रयत्न करीत असत. त्यांच्या लबाडया चव्हाट्यावर मांडण्याचे प्रयत्न दीनबंधूतून होत असत. बहुजन समाजाच्या दुःखाला त्यांच्या शिक्षणाचा अभाव हेच प्रमुख कारण आहे हे पटल्यावरून त्यांनी दीनबंधूतील आपल्या सडेतोड लेखांच्या द्वारे सक्तीच्या व सार्वत्रिक शिक्षणाची मागणी केली होती.

## सामाजिक विरोध

ज्योतिबांना आपल्या आयुष्यामध्ये अनेक प्रकारचा छळ समाजातील हितसंबंधी लोकांकडून सोसावा लागला. कोणताही नवीन बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करणाऱ्याला अशाच प्रकारचा विरोध सहन करावा लागतो. सॉक्रेटीस आपल्या तत्त्वज्ञानाने तरुणांची माथी भडकवतो असा आरोप त्याच्यावर केला गेला होता. शेवटी विरोधकांनी त्याला विषप्राशन करण्यासही भाग पाडले. भगवान येशू ख्रिस्तालाही याच कारणामुळे आत्मनाश ओढवून घ्यावा लागला. काही नवीन सुधारणा करू पहाणाऱ्या ज्ञानेश्वरांचा, एकनाथांचा, दयानंदसरस्वती आदी संतांचाही पुराणमतवाद्यांनी असाच छळ केला होता. प्रचलित रूढीमध्ये, सामाजिक आचारविचारांमध्ये बदल घडवून आणणे समाजातील काही पुढारी लोकांना मानवणारे नसते. ज्योतिबा फुले समाजाची बैठक नवीन विचारांवर उभारण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळे त्यांचाही अनेक प्रकारे छळ झाला. ज्योतिबांवर मारेकरी घालण्याचा प्रयत्नही झाला होता. धोंडिबा कुंभार व त्याचे सहकारी ज्योतिबा घरात झोपले असता

त्यांचा खून करण्यासाठी गेले होते. परंतु ज्योतिबांचे व्यक्तिमत्त्व एवढे प्रभावी होते की मारेकरीच त्यांना शरण येऊन त्यांचे अनन्यसाधारण भक्त बनले. पुढे या लोकांनी ज्योतिरावांच्या सामाजिक कार्याला अनेक प्रकारे मदत केली. मालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी त्यांच्यावर कडाडून टीका केली. ज्योतिबांचे लेखन तसे पाहिले तर शुद्धलेखनाच्या दृष्टीने व साहित्यगुणांनी बरेच तोडके होते. त्यामध्ये विचारांचा ओजस्वीपणा व पुरोगामीपणा असला तरी त्याला भाषेचे सौष्ठव व लालित्य येणे अवघड होते. ज्योतिबांचे कार्य अत्यंत निकृष्टप्रतीचे व तुच्छ आहे असे आरोप मालाकारांनी त्यांच्या कार्याची महती न जाणता केवळ भाषेतील वैगुण्याकडे पाहूनच केले की काय अशी शंका येते. ज्योतिबांचे दुसरे कठोर टीकाकार म्हणजे लोकहितवादी हे होत. ज्योतिबा खिस्ती झाले आहेत, ते परकीय मिशनऱ्यांचे हस्तक आहेत, ते ब्राह्मणद्वेष्टे आहेत इत्यादी आरोप करून त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्नही त्यांनी केला होता.

## वाङ्मयसेवा

ज्योतिबांनी आपल्या पुरोगामी विचारांनी परिप्लुत असलेल्या धारदार लिखाणाच्या द्वारे पुष्कळच साहित्यसेवा केली आहे. त्यांनी अनेक काव्ये, पोवाडे, व अभंग रचले. दीनबंधूमध्ये अनेक विषयांवर त्यांनी लेख लिहिले आहेत. त्यांच्या सर्व लिखाणाची प्रेरणा दलितोद्धार व समाजसुधारणा हीच होती. ज्योतिबांची खालील पुस्तके प्रसिद्ध आहेत.

१. गुलामगिरी—या पुस्तकामध्ये अस्पृश्य लोकांवर पुढारलेले वर्ग कशा प्रकारे जुल्म करीत असतात याचे वर्णन केले आहे.

२. ब्राह्मणांचे कसब.

३. सत्सार.

४. इशारा

५. अस्पृश्यांची कैफियत

६. सार्वजनिक सत्यधर्म—या पुस्तकामध्ये निरनिराळ्या धर्मातील चांगल्या तत्त्वांचा संग्रह केला आहे.

ज्योतिबांच्या आयुष्यातील ठळक घटना—

१. १८४८ मुलींसाठी पहिली शाळा.

२. १८५१ अस्पृश्यांसाठी पहिली शाळा.

३. १८६३ बालहत्याप्रतिबंधक गृह.

४. १८६४ पुढारलेल्या वर्गात पहिला पुनर्विवाह घडवून आणला.

५. १८६८ अस्पृश्यांसाठी स्वतःचा हौद खुला केला.

६. १८७३ जाहीरनामा—सत्यशोधक पंथाची स्थापना.

७. १८७० कामगारांची दुःखे वेशीवर टांगली.

८. १८८४ हंटर कमिशनपुढे सक्तीच्या शिक्षणाची मागणी.

९. १८८८ महात्मा ही पदवी मिळाली.

म० ज्योतिबांनी आपल्या जीवनामध्ये केलेले कार्य असामान्य व अलौकिकच म्हणावे लागेल. तसे पाहिले तर त्यांचा जन्म एका अगदी सामान्य कुळातच झाला. परिस्थितीने शिक्षण घेण्याची संधीही त्यांना फारशी मिळाली नाही. आर्थिक परिस्थितीही प्रतिकूलच होती. असे असताही त्यांनी जे लोकजागृतीचे व समाजसुधारणेचे कार्य केले ते त्यांच्या, ध्येयनिष्ठा व दलितांबद्दल वाटणारी करुणा या गुणांमुळेच होय. गरिबांबद्दल व पददलितांबद्दल वाटणाऱ्या तळमळीनेच त्यांना असामान्य त्याग करण्यास धैर्य प्राप्त झाले. त्या जोरावरच त्यांनी आयुष्यभर एकाकीपणे, सामाजिक विरोधाला न जुमानता अन्यायाला, सामाजिक जुलमाला व असाहाय्यांच्या दुःखाला वाचा फोडली. उपेक्षितांच्या मनामध्ये अस्मिता निर्माण करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास शिकविले. ज्योतिबा हे एक प्रतिभासंपन्न द्रष्टे होते. त्यांच्या विचारांना सहानुभूतीची किनार असल्यामुळे ते सामान्यांच्या सामाजिक व वैयक्तिक समस्यांचे आकलन करू शकले, इतकेच नव्हे तर त्यातून मार्ग काढण्यासाठी स्वतःचे व स्वतःच्या संपूर्ण कुटुंबाचे जीवन त्यांनी समर्पित केले.

सर्व सामाजिक समस्यांचे व दुःखाचे मूळ अज्ञानामध्ये आहे हे त्यांच्या चाणाक्ष बुद्धीने हेरले होते व त्यामुळेच स्त्रिया, मुले व अस्पृश्य यांसाठी त्यांनी शिक्षण उपलब्ध करून देण्याचे महान प्रयत्न केले. आज आपणांस शिक्षणाचा जो प्रसार दिसतो आहे, त्याचा पाया महात्मा फुले यांनीच घातला. त्या दृष्टीने शैक्षणिक इतिहासात त्यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे.

◆ ◆ ◆

# महात्मा गांधी

| | |
|---|---|
| जन्म | १८६९ |
| मृत्यू | १९४८ |

आधुनिक कालात भारतीय जीवनाच्या अंगप्रत्यंगावर ज्यांच्या थोर व अलौकिक व्यक्तिमत्त्वाचा प्रकर्षाने प्रभाव पडला आहे ते युगपुरुष म्हणजे म. गांधी होत. म. गांधींना राष्ट्रपिता असे संबोधिले जाते ते त्यांच्या असामान्य लोकप्रियतेचे लक्षण होय. म. गांधींच्या ठिकाणी लोकमान्य टिळकांची कुशाग्र बुद्धिमत्ता, ना. गोखल्यांची वाक्पटुता किंवा पं. जवाहरलाल नेहरूंचे राजबिंडे व्यक्तिमत्त्व नसतानाही भारतीय जनमानसात त्यांना जे अढळ स्थान प्राप्त झाले ते त्यांच्या अस्सल भारतीयत्वामुळेच होय. जागतिक कीर्ती संपादन केलेला हा महात्मा, दीन, दलित व सर्वसामान्य भारतीय जीवनाशी अत्यंत समरस झाला होता. चिकाटी, दीर्घोद्योग, ध्येयनिष्ठा, सेवाभाव व सत्याचरण या गुणांच्या जोरावर अत्यंत सामान्य व्यक्तीही केवढ्या महत्पदाला जाऊ शकते याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे म. गांधी होत. गांधीजींच्या ठिकाणी गौतम बुद्धाची अहिंसा, येशूख्रिस्ताचे निरागस प्रेम व राजा हरिश्चंद्राची सत्यनिष्ठा यांचा सुरेख संगम पहावयास

मिळतो. बाहेरच्या जगाला म. गांधी म्हणजे एक राजकारणी पुरुष वाटतात. राजकारणात ते ओढले गेले ते दीनदुबळ्या भारतीय जनतेला तिच्या हाल-अपेष्टातून वर काढण्यासाठीच. परंपरागत राजकारणामध्ये त्यांनी आपल्या सत्य, अहिंसा व प्रेम यांचा वापर करून असहकाराचे व सत्याग्रहाचे नवीन शस्त्र निर्माण केले. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या सर्व आधुनिक शस्त्रास्त्रांनी सुसज्ज सत्तेशी त्यांनी जो निःशस्त्र, अहिंसात्मक प्रतिकार व सत्याग्रह या साधनांच्या साह्याने लढा दिला त्याला जगाच्या इतिहासामध्ये तोड नाही. शस्त्रांशी लढाई करण्यासाठी अधिक प्रभावी शस्त्रे पाहिजेत अशी आतापर्यंतची समजूत होती. परंतु सुसज्ज शस्त्रांशी निःशस्त्र व अहिंसात्मक लढा देता येतो व त्यात मिळविलेला विजय अद्वितीय असू शकतो हे म. गांधींनी दाखवून दिले. भारताच्या स्वातंत्र्यसंगरामध्ये म. गांधींनी जनसामान्यांना अत्यंत मानाचे स्थान प्राप्त करून दिले. आतापर्यंतचे लढे देशाचे सैनिक किंवा मूठभर लोक लढत असत. इतरेजनांना राज्ये निर्माण झाली काय किंवा पतन पावली काय याचे विशेष वाटत नसे. परंतु म. गांधींनी जो ब्रिटिश साम्राज्यसत्तेच्या विरुद्ध लढा दिला, त्यामध्ये भारतातील दीनदुबळ्या, गतेतिहास विसरलेल्या व निष्प्रभ झालेल्या जनतेला समाविष्ट करून घेतले होते. त्यामुळे पारतंत्र्याच्या काळातील उदासीनता, निष्क्रियता जाऊन सर्वसामान्य जनतेमध्ये स्वातंत्र्याबद्दल व स्वकर्तव्याबद्दल चैतन्याचे वारे वाहू लागले असल्यास नवल नाही.

राजकारणाप्रमाणेच समाजकारणामध्येही महात्माजींनी क्रांतिकारक बदल घडवून आणले. अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरील कलंक असून तो नाहीसा केला पाहिजे, असे त्यांनी आर्जवून सांगितले. त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करून हरिजनांना सामाजिक न्याय मिळवून देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. समाजामधील स्त्रियांबद्दलचा हीन दृष्टिकोन दूर करण्यासाठी व स्त्रियांना पुरुषांबरोबर मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी त्यांनी अहर्निश प्रयत्न केले. म. गांधींच्या प्रयत्नाला पुष्कळसे यश येऊन स्त्रिया निरनिराळ्या सामाजिक क्षेत्रांमध्ये बहुमोल कामगिरी बजावू लागल्या. म. गांधींच्या निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळीमध्ये भारतीय स्त्रियांनी बहुमोल वाटा उचलून आपले कर्तृत्व जगाच्या निदर्शनास आणून दिले. वरीलप्रमाणेच अर्थव्यवस्था, धर्म, आरोग्य, शिक्षण या क्षेत्रांतही महात्माजींनी क्रांतिकारक बदल सुचविले. त्यांनी सुचविलेल्या बदलांचे योग्य प्रकारे निरीक्षण केल्यास आपणांस असे दिसून येईल की, त्यांनी भारतीय समाजाचे सूक्ष्म व अचूक निरीक्षण केले होते. भारतीय जनतेच्या ज्या निरनिराळ्या समस्या जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये त्यांना दिसून आल्या, त्यांसाठी त्यांनी भारतीय संस्कृतीला, परंपरांना व जीवनमूल्यांना सुसंगत अशीच उपाययोजना सुचविली. अर्थव्यवस्थेमध्ये ग्रामोद्योगांना त्यांनी दिलेले महत्त्व, आरोग्यामध्ये निसर्गोपचाराची

त्यांनी केलेली प्रतिष्ठापना, शिक्षणामध्ये कृतियुक्त शिक्षणाचे त्यांनी जाणलेले महत्त्व, धर्माच्या बाबतीत त्यांनी दाखवून दिलेली सहिष्णुता हे त्यांच्या अस्सल भारतीयत्वाचे प्रत्यंतर समजले पाहिजे. म. गांधींचे जीवन म्हणजे सत्यासाठी केलेल्या प्रयोगाची एक अखंड मालिकाच होय. राजकारण, समाजकार्य, आर्थिक व्यवहार, धर्म इत्यादी सर्व क्षेत्रांमध्ये त्यांनी अत्यंत निष्ठापूर्वक सत्याचे प्रयोग केले. आपल्या जीवनामध्ये सत्याचरणाचा, प्रेमाचा, निष्काम सेवेचा, निःसीम त्यागाचा व विशुद्ध चारित्र्याचा आदर्श निर्माण केला. म. गांधींनी आपल्या आत्मचरित्रास 'सत्याचे प्रयोग' हे सार्थ नाव दिले आहे. हे सत्याचे प्रयोग करीत असताना त्यांनी निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये काम करण्यासाठी अलौकिक बुद्धिमत्तेच्या व विशाल कर्तृत्वाच्या नेत्यांची प्रभावळ निर्माण केली. म. गांधी हे नेत्यांचे नेते होते असे म्हणतात. राजकारणामध्ये वल्लभभाई पटेल, राजेंद्रप्रसाद, पं. जवाहरलाल नेहरू यांसारखे थोर पुरुष त्यांचे अनुयायी झाले, तर समाजकारणामध्येही ठक्करबाप्पा, विनोबा भावे यांसारखे लोकसेवक त्यांना मिळाले. प्रो. जे. सी. कुमारप्पा यांनी अर्थव्यवस्थेत लक्ष घातले, तर आरोग्य व शिक्षण यामध्ये डॉ. सुशील नायर व डॉ. झकीर हुसेन यांनी स्वतःला वाहून घेतले. मनुष्याची अचूक पारख करून त्याच्यावर योग्य कामगिरी सोपविण्याचे महात्माजींचे कौशल्य अलौकिक होते.

## चरित्र

महात्माजींचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी पोरबंदर येथे एका काठेवाडी कुटुंबात झाला. महात्माजींचे आजोबा पोरबंदर येथील राजाच्या दरबारी दिवाण होते. त्यांचे वडील करमचंद ऊर्फ कबा हे अत्यंत धार्मिक वृत्तीचे, स्वाभिमानी गृहस्थ राजकोटच्या दरबारी दिवाण होते. एका इंग्रज अधिकाऱ्याने त्यांचा स्वाभिमान दुखावल्याबरोबर त्यांनी आपल्या दिवाणपदाचा त्याग केला; कारागृहवास स्वीकारला पण शरणागती स्वीकारली नाही. वडिलांचे हे गुण म. गांधींच्यात उतरले असल्यास नवल नाही. त्यांची आई पुतळाबाई धार्मिक व सत्प्रवृत्त होती. ती नेहमी अनेक व्रतवैकल्ये करीत असे. चातुर्मासात सूर्यदर्शनाशिवाय अन्नग्रहण न करण्याचा या माउलीचा नियम असल्यामुळे कित्येक दिवस तिला अन्नग्रहणाशिवाय रहावे लागे. तिच्या दृढनिश्चयी स्वभावाचा परिणामही बाल मोहनवर झाला असणे शक्य आहे.

## बालपण

गांधीजींचे बालपण सर्वसामान्य मुलांप्रमाणेच गेले. लहानपणी ते फार भित्रे होते. त्यांचे संगोपन करण्यासाठी रंभा नावाची एक स्त्री-सेविका ठेवण्यात आली

होती. ती त्यांना भुताखेतांच्या गोष्टी सांगत असे. त्यामुळे ते इतके भीत असत की, भीतीमुळे काही रात्री त्यांना जागून काढाव्या लागत. भीती घालविण्यावर एक उपाय या रंभानेच त्यांना शिकविला. तो म्हणजे रामनाम घेणे हा होय. तेव्हापासून त्यांच्या मुखात असलेले रामनाम अखेरच्या क्षणापर्यंत टिकून राहिले हे नवल होय. वयाच्या ७ व्या वर्षी ते शाळेत जाऊ लागले. शाळेत असतानाही त्यांच्या बुद्धीची चमक कधीही दिसून आली नाही. मित्रमंडळींत मिसळणे त्यांना आवडत नसे. त्यांचा स्वभाव अत्यंत संकोची व लाजाळू होता. मात्र आपला अभ्यास करावा व शिक्षकांकडून होणारी अवहेलना टाळावी असे त्यांना वाटत असे. यामुळेच भूमिती व संस्कृत यांसारखे कठीण विषय त्यांनी मुळची गोडी नसतानाही अत्यंत चिकाटीने व दृढनिश्चयाने आत्मसात केले होते. त्यांना खेळ खेळण्याची किंवा व्यायाम घेण्याची बिलकूल आवड नसे. शाळेत असताना त्यांना काही वाईट व्यसनेही लागली होती. कुसंगतीमुळे ते विड्या ओढू लागले होते. त्यासाठी लागणाऱ्या पैशांची गरज भागविण्याकरिता घरातील नोकरचाकरांच्या चोऱ्या करण्यासही ते शिकले. शारीरिक दुर्बलता घालविण्यासाठी डाळभाताचा आहार उपयोगी नाही, यासाठी मांसाहारच केला पाहिजे असे एका मित्राने सांगितल्यावरून त्यांनी मांसाहारास सुरवात केली. त्यासाठी लागणारे पैसे उभे करण्याकरिता त्यांनी घरातील सोन्याचे कडे तोडून त्याचा तुकडा सोनाराकडे विकला. परंतु हे सर्व दुराचरण करीत असताना त्यांचे सात्त्विक अंतर्मन त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते. लहानपणी रामायणमहाभारतातील नीतिपर कथांच्या श्रवणाने त्यांचे मन सात्त्विक बनले होते. श्रावणबाळाची गोष्ट ऐकल्यापासून आई-वडिलांच्या सेवेबद्दल त्यांना विशेष गोडी वाटू लागली होती. राजा हरिश्चंद्राचे नाटक पाहिल्यापासून सत्यवचनीपणा त्यांच्या रोमरोमांमध्ये मुरला होता. या सत्प्रवृत्ती या दुर्व्यसनात त्यांना स्वस्थ बसू देईनात. आपल्या पापाचरणाचे प्रायश्चित्त घेण्यासाठी त्यांनी धोत्र्याचे विष खाऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न चालविला. परंतु तितकेही धैर्य नसल्यामुळे ते त्यापासून परावृत्त झाले. शेवटी प्रायश्चित्त म्हणून आपल्या पापाचरणाची कबुली त्यांनी आपल्या वडिलांजवळ दिली व तेव्हापासून त्यांनी जडलेली व्यसने निश्चयपूर्वक सोडली. मॅट्रिक झाल्यानंतर ते बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लंडला जावयास निघाले. परंतु तेथील ऐशआरामी वातावरणात आपला मुलगा बिघडून जाईल म्हणून त्यांच्या आईने बराच विरोध केला. शेवटी एका जैन साधूच्या सांगण्याप्रमाणे दारू न पिण्याची व मांसाहार न करण्याची शपथ घेतल्यावर त्यांना परदेशगमनास परवानगी मिळाली. धर्मावरील श्रद्धा व आईला दिलेले वचन या दोन गोष्टींच्या प्रभावाने ते इंग्लंडमध्ये राहूनही निष्कलंक राहिले. १८९१ साली बॅरिस्टरीची परीक्षा देऊन ते परत भारतास आले

## आफ्रिकेत

वकिलीचा धंदा सुरू करण्यासाठी त्यांनी मुंबई शहराची निवड केली. परंतु वकिलीची कामे चालविण्याचा अनुभव नसल्याने किंवा मिळविलेल्या ज्ञानाचा भारतीय परिस्थितीत फारसा उपयोग होत नसल्याने त्यांचा व्यवसाय चालेना. आफ्रिकेतील एका व्यापाऱ्याने काही खटले चालविण्यासाठी त्यांना जेव्हा बोलावणे केले, तेव्हा त्यांनी तात्काळ संमती दिली. आफ्रिकेच्या दर्बान बंदरात दादा अब्दुला हे व्यापारी जेव्हा त्यांना उतरवून घेण्यास आले तेव्हा तेथील विषमतेचे व वर्ण-विद्वेषाचे वातावरण पाहून त्यांना अत्यंत दुःख झाले. आफ्रिकेत हिंदी मजूर व काळे निग्रो यांना अत्यंत अपमानास्पद वागणूक मिळे. या लोकांना सार्वजनिक ठिकाणी जाण्यास बंदी करणारे कायदे त्या वेळी आफ्रिकेत होते. अशा अपमानास्पद वागणुकीची झळ म. गांधींनाही पोहोचली. दादा अब्दुलाचे खटले चालविण्यासाठी जेव्हा ते न्यायाधिशासमोर उभे राहिले, तेव्हा त्यांना काठेवाडी पगडी घालण्यास बंदी करण्यात आली. पगडी घालून कोर्टकचेरीस जाण्यास हिंदी माणसास प्रतिबंध होता. एकदा ते दर्बान ते प्रिटोरिया हा प्रवास रेल्वेने करीत असताना काळ्या माणसाने पहिल्या वर्गाने प्रवास करता कामा नये म्हणून त्यांना डब्यातून बाहेर खेचून काढण्यात आले. ती रात्र त्यांना एका आडवळणी स्टेशनवर, थंडीत कुड-कुडत काढावी लागली. हिंदी मनुष्य म्हणून घोडागाडीमध्येही चढण्यास त्यांना मज्जाव होता. जोहान्सबर्ग येथील हॉटेलात, काळा मनुष्य या सबबीवर त्यांना जागा नाकारण्यात आली. या सर्व अपमानांचा व दुःखांचा त्यांच्या मनावर अत्यंत खोल परिणाम झाला. ते दुःख दूर करण्यासाठी काहीतरी सामुदायिक प्रतिकार केला पाहिजे असे त्यांना वाटू लागले. कारण हे कार्य एकट्यादुकट्याने करता येण्यासारखे नव्हते. लोकमत जागृत करण्यासाठी त्यांनी सभा घेण्यास सुरुवात केली. हिंदी लोकांमध्ये सुसंघटितपणा येण्यासाठी ‘नाताळ इंडियन काँग्रेस’ नावाची संस्था स्थापन केली. लोकांच्या दुःखाला वाचा फोडण्यासाठी ‘इंडियन ओपिनियन’ नावाचे वर्तमानपत्र त्यांनी सुरू केले. लोकमताचा प्रभाव जसजसा वाढू लागला, हिंदी लोकांची ऐक्यभावना जसजशी प्रबळ होऊ लागली, तसतशी त्यांच्यावरील अन्यायाची पकड ढिली होऊ लागली. हिंदी लोकांना पहिल्या वर्गाने प्रवास करण्यास परवानगी मिळाली. काळ्या लोकांना नाताळमध्ये रात्री ९ च्या पुढे फिरण्यास बंदी करणारा कायदा मागे घेण्यात आला. याचा परिणाम असा झाला की, आपल्या अन्यायाविरुद्ध आपण आवाज उठविल्यास व प्रतिकार करण्याची तयारी दाखविल्यास थोडाबहुत न्याय मिळू शकतो याची जाणीव आफ्रिकेतील भारतीय लोकांना आली व त्यांचा आत्मविश्वास वाढीस लागला.

## कार्याचा ओनामा

आफ्रिकेतील काम संपल्यामुळे म. गांधी भारतात परत आल्यावर त्यांनी आफ्रिकेतील भारतीय जनतेच्या करुण कहाण्या सर्वांना समजावून दिल्या. या त्यांच्या प्रचारामुळे आफ्रिकेतील गोरे लोक अधिकच संतापले. आपल्या लोकांची व आपल्या देशाची म. गांधी निंदा करतात असे त्यांना वाटू लागले. पुढे दादा अब्दुल्लाचे, आफ्रिकेत येण्याविषयी पुन्हा बोलावणे आल्यामुळे ते दर्बानला जावयास निघाले. परंतु त्यांच्या विरुद्ध तेथील गोऱ्या लोकांनी एवढा प्रक्षोभ माजविला होता की, त्यांचे जहाज तीन आठवडेपर्यंत दर्बान बंदराला लागूच शकले नाही आणि शेवटी जेव्हा ते दर्बान बंदरात उतरले तेव्हा गोऱ्या गुंडानी, दगडांनी व काठ्यांनी त्यांना बरीच मारहाण केली. या मारहाणीतून तेथील पोलिस सुपरिंटेंडेंटच्या पत्नी अलेक्झांडर यांनी त्यांना वाचविले. गोऱ्या लोकांचा समज असा झाला होता की म. गांधी पाच-सहाशे भारतीय गुंडांना घेऊन, आपल्यावर चाल करून येत आहेत. परंतु हा गैरसमज वर्तमानपत्रांच्या द्वारा दूर केल्यावर कित्येक गोरे लोक त्यांचे मित्र बनले. भारतातील काळे लोक आफ्रिकेमध्ये केवळ पैसा मिळविण्याकरिता येतात; त्या देशाच्या आशाआकांक्षांशी, अडीअडचणींशी, समरस होत नाहीत; ते उपरे म्हणून येतात व उपरे म्हणूनच जातात, त्यांची आफ्रिकेबद्दल निष्ठा असू शकत नाही हा हिंदी लोकांबद्दलचा गैरसमज घालविण्यासाठी म. गांधींनी बोअर युद्धामध्ये आपल्या भारतीय मित्रांसमवेत सुश्रूषा पथकात काम केले. हे युद्ध डच व इंग्रज यांमध्ये लढले गेले. त्यामुळे भारतीयांबद्दलचे गैरसमज दूर होण्यास मदत झाली. आफ्रिकेतील निरनिराळ्या वसाहतींमध्ये हिंदी माणसांवर अनेक अन्याय्य कायदे लागू करण्यात आले होते. ट्रान्सव्हाल येथे हिंदी मनुष्याला आपल्या नावाची नोंद करावी लागे व त्यामध्ये आपले नाव, पत्ता, वय, अंगावरील खुणा इत्यादी सर्व देऊन नेहमी आपल्याबरोबर एक पास बाळगावा लागे. याशिवाय प्रत्येक हिंदी माणसाला दरडोई वार्षिक तीन पौंडांचा कर भरावा लागे. म. गांधींना हे कायदे अत्यंत अपमानास्पद वाटले. त्याविरूद्ध बंड करण्यासाठी त्यांनी जनतेला आवाहन केले. सत्याग्रहामध्ये भाग घेणाऱ्या लोकांसाठी त्यांनी एक शिबिर उघडले. त्या शिबिराला टॉलस्टॉय फार्म असे नाव देण्यात आले. १० जानेवारी १९०८ रोजी ३०० हिंदी सत्याग्रहींना घेऊन महात्माजींनी ट्रान्सवाल वसाहतीत प्रवेश केला व कायदेभंगाच्या चळवळीला सुरुवात केली. गोऱ्या लोकांनी त्यांना पुष्कळ मारहाण केली. परंतु त्याविरुद्ध कोणताही शारीरिक प्रतिकार करावयाचा नाही असे ठरले असल्यामुळे सर्व सत्याग्रहींनी आत्मक्लेश सहन केले. अशा रीतीने सत्याग्रहाची सुरवात झाली. या सत्याग्रहात म. गांधींना दोन महिने कारागृहवास घडला. परंतु त्याचा परिणाम म्हणून तेथील शासनप्रमुख फील्डमार्शल स्मट्स् हे

अन्याय्य कायदे रद्द करण्यास कबूल झाले. अर्थात ही त्यांची एक हुलकावणी होती. महात्माजींनी सत्याग्रह स्थगित ठेवला. सत्याग्रहींपैकी काहींना ते आवडले नाही. मीर आलम नावाच्या एका सत्याग्रहीनेच, अवसानघातकी म्हणून महात्माजींना खूप ठोकले. इंग्रज लोकांनी अनेक वेळा वचनभंग केले. नामदार गोखल्यांनी मध्यस्थी केल्यानंतरही त्यांनी आपला शब्द पाळला नाही. उलट नोंदणी-पद्धतीच्या विवाहाला मान्यता मिळणार नाही असा कायदा करून हिंदी लोकांच्या पूर्वीच्याच अन्यायाच्या जखमेवर मीठ चोळण्याचे कार्य केले. याचा परिणाम असा झाला की, सत्याग्रहाच्या मोहिमेमध्ये भारतीय स्त्रिया मोठ्या संख्येने दाखल झाल्या. त्यांचे मनोधैर्य एवढे मोठे होते की, वलिअम्मासारखी तरुण स्त्री कारागृहवासाच्या अनन्वित छळामुळे मरणोन्मुख स्थितीत असतानाही जगलेवाचले तर पुन्हा सत्याग्रह करीन असे म्हणू शकली. स्त्रियांच्या प्रेरणेमुळेच दक्षिण आफ्रिकेतील खाणमजूरही सत्याग्रहात सामील झाले. यामुळे सर्वत्र सत्याग्रहाचे रणकुंड पेटले. त्याचा परिणाम असा झाला की, भारतीयांवरील बहुतेक सर्व जुलमी कायदे रद्द करण्यात आले. महात्माजींच्या यशाचे पडसाद भारतीय राजकारणावर पडत होते. अशा वेळी सन १९१४ साली म. गांधी हिंदुस्थानात परत आले.

## मायदेशी परत

भारतात आल्यानंतर ज्या सत्याग्रह-चळवळीने आफ्रिकेत त्यांना यश मिळवून दिले, तिचा उपयोग भारतीय लोकांना आपले हक्क मिळवून देण्यासाठी करावा असे त्यांना वाटू लागले. म. गांधी नामदार गोखल्यांना आपले गुरू मानीत असत. म्हणून प्रथम त्यांनी त्यांची भेट घेतली. कोणतीही चळवळ सुरू करण्यापूर्वी प्रथम हिंदुस्थानातील परिस्थितीचे सूक्ष्म अवलोकन करा असे त्यांनी म. गांधींना सांगितले. त्यांच्या आदेशानुसार त्यांनी सर्व भारताचा प्रवास केला. प्रथम ते शांतिनिकेतनमध्ये राहिले. नंतर साबरमती येथे त्यांनी एका आश्रमाची स्थापना केली. बिहार येथील चंपारण्यामध्ये निळीचे मळेवाले युरोपियन लोक मजुरांचा अनन्वित छळ करीत. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी म. गांधींनी चळवळ सुरू केली. या चळवळीत त्यांना डॉ. राजेंद्रप्रसाद हे साथीदार लाभले. खेडा जिल्ह्यामध्ये दुष्काळग्रस्त परिस्थिती असतानाही सरकार सारावसुली करीत होते. त्याविरुद्ध साराबंदीची चळवळ महात्माजींनी हाती घेतली. त्या वेळी सरदार वल्लभभाई पटेल हे सहकारी त्यांना लाभले. अहमदाबादमध्ये कापड-गिरण्यांचे मालक, मजुरांना न्याय्य व सहानुभूतीची वागणूक देत नसत. त्यांची गाऱ्हाणी समजून घेऊन गांधीजींनी त्यांच्यासाठीही चळवळ सुरू केली. या चळवळीचा परिणाम असा झाला की, गिरणी-मालक, मजुरांची उपासमार व्हावी या हेतूने मजुरांच्या

मागण्या मान्य करीनासे झाले. त्यांनी अधिकच ताठर भूमिका स्वीकारली. मजुरांची आर्थिक स्थिती अगदीच खालावल्याकारणाने कित्येक मजूर पुन्हा कामावर जाण्याचा विचार करू लागले. सत्याग्रहाच्या मोहिमेस आपणांस अपयश येत आहे असे दिसताच गांधीजींनी उपवास सुरू केला. त्यांच्या आयुष्यातील सार्वजनिक कार्याकरिता अंगीकारलेला हा पहिलाच उपवास होय. यानंतर पुढील आयुष्यात त्यांनी अनेकदा उपवास केले. उपवासाचा हेतू प्रतिपक्षावर दडपण आणणे हा नसून आत्मक्लेशांच्या द्वारे असत् प्रवृत्तींना योग्य वळण लावणे व विरोधी लोकांचे हृदयपरिवर्तन करणे हा होता. गांधीजी उपवासाच्या द्वारे हिंसाचार करतात, अशीही काही लोक टीका करीत असत. गांधीजींच्या उपवास करण्याच्या पद्धतीचा योग्य अभ्यास केल्यास त्यांच्या टीकेतील फोलपणा प्रत्ययास येतो. मजुरांच्या मागण्यांसाठी केलेल्या उपवासाचा योग्य तोच परिणाम घडून आला. गिरणीमालकांनी सहानुभूतीची भूमिका स्वीकारली व मजुरांच्या बहुतेक सर्व मागण्या मान्य करण्यात आल्या. यानंतर गांधीजींचे लक्ष सामाजिक विषमतेकडे गेले. हिंदू समाजातील अस्पृश्य जातिबांधव पशूंच्यापेक्षाही हीन दर्जाचे जीवन जगत असत. त्यांना समभावाची वागणूक मिळत नसे. एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीवर अन्याय्य बंधने लादणे, ही म. गांधींच्या मते हिंसा असल्याकारणाने त्यांनी अस्पृश्यता नाहीशी करण्याचा निश्चय केला. एखादी गोष्ट गांधीजींना पटल्यानंतर ते त्या गोष्टीचा पूर्ण पिच्छा पुरवीत असत. तो इतका की, ते त्या कामाचा संपूर्ण फडशा तरी पाडीत असत किंवा आत्मार्पणाची तयारी करीत. हिंदू धर्मातील अस्पृश्यता नाहीशी करण्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. आपल्या वर्तमानपत्राचे नाव 'हरिजन' असेच ठेवले. सवर्ण हिंदूंचे हृदयपरिवर्तन व्हावे म्हणून त्यांनी उपवास केले. आपल्या आश्रमामध्ये अस्पृश्य कुटुंबांना आश्रय दिला. या बाबतीत स्वतःच्या पत्नीच्या विरोधाचीही तमा त्यांनी बाळगली नाही. दरम्यानच्या काळामध्ये ब्रिटिश सरकार हिंदी प्रजाजनांना कोणतेही हक्क न देता त्यांच्यावर दडपशाहीचा वरवंटा फिरविण्याचा प्रयत्न करीत असे. क्रांतिकारक चळवळींना पायबंद घालण्यासाठी सरकारने अमानुष कायदे अमलात आणले. या कायद्यांच्या विरुद्ध आवाज उठविणाऱ्यांची निर्घृण हत्या केली गेली. जालियनवाला बागेमध्ये भरलेल्या सभेवर माशिनगन्स चालविण्यात आल्या. त्यामुळे अनेक निरपराध लोकांची हत्या झाली. हे महात्माजींना उघड्या डोळ्यांनी बघता येणे शक्य नव्हते. त्याचा प्रतिकार करण्यासाठी त्यांनी असहकारितेची चळवळ सुरू केली. देशातील जुलमी कायदे जर आपण मानले नाहीत, तर त्यांची अम्मलबजावणी करता येणे शक्य नसते, हे त्यांनी सामान्य जनतेला दाखवून दिले. सरकारचा कायदा आपण मानला तरच त्याची प्रतिष्ठा राहते. किंबहुना बहुसंख्य जनता ज्या कायद्याला

अनुकूल असते, तोच कायदा टिकून राहू शकतो, हे तत्त्व महात्माजींनी सरकारच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न केला. याच्याच अनुरोधाने बारडोलीचा सत्याग्रह त्यांनी सुरू केला. जुलमी व परकीय सरकारला शेतसारा द्यावयाचा नाही, या दृढ निश्चयाने बारडोलीतील शेतकरी सत्याग्रही, सरदार वल्लभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली एकत्रित आले. सत्याग्रहींचा जोर दिवसेंदिवस वाढू लागला. परंतु चौरीचुरा येथे काही क्रांतिकारकांनी हिंसाचारी कृत्ये केल्यामुळे महात्माजींनी सत्याग्रह एकदम बंद केला. त्यामुळे त्यांच्यावर देशामध्ये टीकेची झोड उठविण्यात आली. परंतु आपल्याला पटलेल्या तत्त्वापासून ते यत्किंचितही विचलित होत नसत. त्यांची आपल्या जीवनमूल्यांवर इतकी अढळ श्रद्धा असे की, प्रतिपक्षांच्या टीकेचा, अपमानास्पद वागणुकीचा त्यावर काहीच परिणाम होत नसे. बारडोलीच्या सत्याग्रहात महात्माजींना सहा वर्षे कारागृहवासाची शिक्षा झाली. परंतु ते आजारी पडल्याकारणाने त्यांची त्यातून लवकरच सुटका झाली. सरकार हिंदी जनतेच्या मागण्या मान्य न करता देशावरील आपली मगरमिठी जुलमी कायद्यांच्या रूपाने अधिक दृढ करू पहात आहे, असे दिसताच महात्माजींनी कायदेभंगाची चळवळ पुन्हा सुरू केली.

## हिंदु-मुसलमान

या वेळी ब्रिटिश सरकार कुटिल राजनीतीचे डाव खेळू लागले. देशातील जातीजमातींमध्ये धर्मद्वेष पसरविण्याचे कुटिल कारस्थान त्यांनी रचले. कित्येक वेळा मुसलमानांना जवळ करून हिंदुमुसलमानांमध्ये आत्यंतिक बेबनाव घडवून आणला. त्यामुळे देशामध्ये हिंदुमुसलमानांचे झगडे सुरू झाले. मोठमोठ्या शहरांतील लोकांचे जीवन असह्य व असुरक्षित होऊ लागले. हिंदु-मुसलमान-एकता ही महात्माजींना प्राणप्रिय अशी गोष्ट होती. त्यांच्यातील भांडणे ही भावाभावांतील भांडणांप्रमाणे होत असे त्यांना वाटे. हिंदुमुसलमानांमध्ये ऐक्य निर्माण कण्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. सत्याग्रहींच्या शस्त्रागारांतील अमोघ शस्त्र म्हणजे प्राणांतिक उपोषण हेही वापरून पाहिले. मुसलमानांच्या न्याय्य मागण्यापेक्षाही अधिक सवलती त्यांना देऊ केल्या. परंतु ब्रिटिशांच्या पाठिंब्यामुळे हट्टाला पेटलेल्या मुसलमान समाजाने त्यांचे ऐकले नाही. हिंदु-मुसलमानांतील वैर ही स्वराज्यप्राप्तीच्या मार्गावरील धोंड आहे असे त्यांना वाटे. स्वराज्यप्राप्तीनंतर दोन्ही जमातींचे हितसंबंध सुधारतील व दोघांचेही जीवन सुखी व समृद्ध करता येईल असा त्यांना विश्वास होता. यासाठी १९२४ साली त्यांनी २१ दिवसांचे उपोषण सुरू केले. त्याचा थोडाबहुत परिणाम होऊन तात्पुरते का होईना हिंदुमुसलमानांमध्ये ऐक्य प्रस्थापित झाले.

## मिठाचा सत्याग्रह

ब्रिटिशांनी सत्तात्याग करावा म्हणून त्यांनी हिंदी जनतेच्या वतीने ११ मागण्या सरकारला सादर केल्या. परंतु सरकार यत्किंचितही लक्ष देत नाही असे दिसून आल्यावर त्यांतील एका मागणीसाठी त्यांनी कायदेभंगाची चळवळ सुरू केली. ११ मार्च १९३० या ऐतिहासिक दिवशी ते ८० स्वयंसेवकांसमवेत अमदाबादपासून दांडीपर्यंतच्या दांडीयात्रेस निघाले. दांडी येथे मिठावरील कर न देता त्यांनी मीठ घेतले व "नमक का कायदा तोड दो" अशी घोषणा दिली. महात्माजींनी यःकश्चित् चिमूटभर मीठ उचलले परंतु त्यामुळे उसळलेल्या चळवळीच्या झंझावातात ब्रिटिश साम्राज्यशाहीचा डोलारा खिळखिळा होऊन गेला. अनेक ठिकाणी असंख्य सत्याग्रहींनी मिठाचा कायदा मोडला. सहस्रावधी लोक कारागृहवास भोगू लागले. असंख्य सत्याग्रहींमध्ये स्त्री, पुरुष, आबालवृद्ध, सुशिक्षित, अशिक्षित, हिंदू, मुसलमान, पार्शी, खिश्चन अशा सर्व भारतीयांचा समावेश होता. महात्माजींनी कायदेभंगाची चळवळ खेड्यातील शेतकऱ्याच्या झोपडीपर्यंत नेऊन पोहोचवली होती. आतापर्यंत निद्रिस्त असलेला भारतीय समाज जागा झाला होता. लोकमान्य टिळकांनी म्हटल्याप्रमाणे भारतीय जनता ब्रिटिश साम्राज्यशाहीला बजावून सांगत होती की, यापुढे पारतंत्र्याचे लाजिरवाणे जिणे ती सहन करणार नाही. या सर्व चळवळीचा परिणाम असा झाला की, महात्मा गांधी यांच्याशी त्या वेळचे व्हाइसरॉय यांनी समेट केला. सर्व राजबंद्यांना मुक्त केले. मिठावरील कर रद्द केला. भारतीय जनतेचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी इंग्लंडमध्ये गोलमेज परिषद भरविण्याचा कुटिल डाव यानंतर ब्रिटिशांनी टाकला. भारतातील निरनिराळ्या जातीजमातींमध्ये व पक्षोपपक्षांमध्ये एकवाक्यता नसल्यामुळे अशा प्रकारची परिषद कधीच यशस्वी होऊ शकणार नाही हे सरकारला माहीत होते. या परिषदेचा परिणाम अपेक्षेप्रमाणेच झाला. ब्रिटिश सरकार मानभावीपणाने म्हणू लागले की, 'भारताच्या जनतेने आपल्या मागण्या एकमुखाने मागाव्यात म्हणजे आम्ही वसाहतीचे स्वराज्यच काय पण संपूर्ण स्वातंत्र्यही द्यावयास तयार आहोत.' आतून मात्र एकमुखी मागण्या येणार नाहीत यासाठी सर्वप्रकारची दक्षता बाळगू लागले.

## अस्पृश्यता-निवारण

हिंदूंपासून मुसलमानांना विभक्त करण्याचा कुटिल प्रयत्न यशस्वी झाल्यावर स्पृश्य हिंदूंपासून अस्पृश्यांना वेगळे करण्याचा घाट त्यांनी बांधला. याचसाठी जातीय मतदारसंघाचे तत्त्व अनुसरावयास त्यांनी सुरुवात केली. या तत्त्वाच्या भीषणपणाची कल्पना महात्माजींना असल्याकारणाने २० सप्टेंबर १९३० रोजी

त्यांनी या तत्त्वाविरुद्ध प्राणांतिक उपोषण सुरू केले. याचा परिणाम सवर्ण हिंदू व अस्पृश्य यांच्यात एकोपा घडून येऊन जातीय मतदारसंघ रद्द करण्यात आले. १९३४ साली वर्ध्यापासून ९ मैलांवर सेवाग्राम येथे गांधीजींनी नवीन आश्रम सुरू केला. तेथूनच ग्रामोद्योग, नयी तालीम, अस्पृश्यता-निवारण या बाबतींच्या कार्यात अधिक चालना मिळाली.

## दुसरे महायुद्ध

१९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाले. भारत स्वतंत्र नसल्याकारणाने ब्रिटिशांनी चालविलेल्या या युद्धामध्ये त्याला भाग घेण्याचे काहीच कारण नाही असे महात्माजींना वाटे. परंतु शत्रूच्या संकटकाळामध्ये त्याला अधिक अडचणीत न पाडण्याचे महात्मा गांधींचे ब्रीद असल्याकारणाने त्यांनी काही काळ कायदेभंगाची चळवळ स्थगित केली. मात्र युद्धानंतर स्वराज्य देऊ असे इंग्रजांकडून त्यांनी आश्वासन मागितले. परंतु या बाबतीत कोणतीच कृती करण्यास सरकार तयार नव्हते. त्यामुळे गांधीजी अधिकच विचारात पडले. शेवटी ८ ऑगस्ट १९४२ रोजी भारतीय काँग्रेसने 'चले जाव'चा ठराव पास केला. त्यास गांधींनी संमती दर्शविली. हा स्वातंत्र्यसंग्रामातील अंतिम लढा होय, असेच लोक मानू लागले. कारण 'करेंगे या मरेंगे' या निर्धाराने जनतेचा प्रतिकार दिवसेंदिवस वाढू लागला. सरकारने देशातील अत्याचाराचे खापर म. गांधी व काँग्रेस-पुढारी यांच्या माथी फोडण्याचा प्रयत्न केला. सर्व पुढाऱ्यांना तुरुंगात डांबून ठेवण्यात आले. १५ ऑगस्ट १९४२ रोजी म. गांधींचे एक अत्यंत निकटवर्ती सहकारी व चिटणीस महादेवभाई देसाई यांचे पुण्याच्या तुरुंगात निधन झाले. यामुळे महात्माजींना वज्राघाताचे दुःख झाले. दुसरा आघात म्हणजे २२ फेब्रुवारी १९४४ रोजी त्यांच्या पत्नी यांचे निधन हा होय. १९४५ साली दुसरे महायुद्ध संपले. युद्धातील आत्यंतिक अडचणी, बिकट आर्थिक परिस्थिती व जागतिक लोकमत यांमुळे ब्रिटिश सरकार अत्यंत कमकुवत झाले होते. युद्धानंतरच्या निवडणुकीमध्ये कॉन्झर्व्हेटिव्ह पक्ष पराभूत होऊन मजूरपक्ष अधिकारारूढ झाला होता. या पक्षाचे भारताविषयीचे धोरण बरेच उदार होते. त्यांनी स्वराज्यासंबंधीच्या अनेक योजना हिंदी पुढाऱ्यांसमोर मांडल्या. परंतु भारतातील धार्मिक मतभेदांमुळे व पुढाऱ्यांतील बेबनाव अत्यंत पराकोटीस पोहोचल्यामुळे पाकिस्तानच्या निर्मितीशिवाय कोणतेच पुढचे पाऊल उचलणे अशक्य दिसू लागले. पाकिस्तानच्या निर्मितीसाठी भारताच्या निरनिराळ्या प्रांतांमध्ये भीषण दंगे, अमानुष अत्याचार सुरू झाले. महात्माजी हे दंगे शमविण्यासाठी ठिकठिकाणी जाऊ लागले. अशा परिस्थितीमध्ये १५ ऑगस्ट १९४७ रोजी पाकिस्तान व भारत ही दोन स्वतंत्र राष्ट्रे निर्माण झाली. स्वातंत्र्याचा

सोहळा नव्या दिल्लीतील लाल किल्ल्यावर होत असताना भारतीय स्वातंत्र्याचा उद्गाता व त्यासाठी अहर्निश झटणारा महात्मा नौखालीमध्ये हालअपेष्टात सापडलेल्या आपल्या बांधवांचे दुःखाश्रू पुसण्यात निमग्न झाला होता. पाकिस्तानची निर्मिती हे असंख्य भारतीयांच्या हृदयामध्ये बोचणारे एक शल्य होते. म. गांधी मुसलमानांबद्दल जरुरीपेक्षा अधिक कळवळा दाखवितात व त्यामुळे सर्व देशाचे नुकसान होऊन अनर्थ घडून येतात असे काहींना वाटत होते. त्यामुळे महात्माजींच्या हत्येचे अनेक प्रयत्न झाले होते. अशाच प्रयत्नांपैकी एक प्रयत्न ३० जानेवारी १९४८ रोजी दिल्ली येथे घडला. महात्माजी प्रार्थनेस जात असताना एका माथेफिरूने त्यांच्यावर चार गोळ्या झाडल्या व त्यातच त्यांचा अन्त झाला. महात्माजींचा पार्थिव देह आपणांतून नाहीसा झाला तरीही त्यांनी दिलेला दिव्य संदेश भारतीयांना दीपस्तंभाप्रमाणे सतत मार्गदर्शक ठरू लागला.

म. गांधीजींसारख्या लोकोत्तर पुरुषाचे जीवनचरित्र समग्रपणे देणे स्थलाभावास्तव अशक्य आहे. त्यांच्या जीवनातील काही निवडक मार्गदर्शक घटनांचीच फक्त या ठिकाणी नोंद करण्यात आली आहे. म. गांधी हे एक युगपुरुष होते. त्यांनी भारतीय इतिहासाच्या प्रवाहाला योग्य प्रकारे विशिष्ट अशी कलाटणी दिली. असंख्य देशबांधव स्वाभिमानाने व देशोद्धाराच्या प्रेरणेने प्रभावित झाले. त्यांच्या सत्याग्रहाच्या चळवळीमध्ये हजारो स्त्रीपुरुषांनी भाग घेतला. लाखो लोकांनी त्याबद्दल सहानभूती बाळगून निरनिराळ्या प्रकारे साह्य केले. शेकडो कुटुंबांनी देशाच्या हिताकरिता आपल्या सर्वस्वाचा त्याग केला. कित्येक तरुणतरुणींनी देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामात आपल्या पंचप्राणांचे हवन केले. महात्माजींचे जीवन म्हणजे एक अखंड यज्ञच होता. ते स्वतःसाठी असे जगलेच नाहीत. भारतीय जीवन सुधारण्यासाठी त्यांनी निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये अत्यंत प्रामाणिकपणे प्रयोग केले. त्या त्या क्षेत्रात काम करण्यासाठी कर्तृत्ववान त्यागी व सच्चरित अशा लोकांची पिढी निर्माण केली. ग्रामोद्योग, हरिजन सेवा संघ, हिंदुस्तानी तालिमी संघ, निसर्गोपचार-केंद्र, सत्याग्रहाश्रम अशा कितीतरी संघटनांमध्ये हजारो निष्ठावंत कार्यकर्ते काम करताना दिसू लागले. हा सर्व महात्मा गांधींच्या जीवनाचाच प्रभाव होता. म. गांधींच्या जीवनाचे मूल्यमापन करताना त्यांच्याविषयी जगातील थोर तत्त्वचिंतक काय म्हणतात याचा अभ्यास करणे उपयुक्त ठरणार आहे.

### थोरांची मते

ब्रिटिश तत्त्ववेत्ते कार्लाईल म. गांधींसंबंधी म्हणतात, "हा महापुरुष म्हणजे परमेश्वराने जगतावर फेकलेली एक जळती मशालच होय." अल्बर्ट आइनूस्टाइन

यांचे उद्गार सूचक आहेत. ते म्हणतात, "कोठल्याही बाह्यसत्तेवाचून झालेला लोकांचा नेता, मुत्सद्दीपणाने नव्हे तर आत्मक्लेशाने यश मिळविणारा राजकारणी पुरुष, हिंसेचा तिरस्कार करणारा विजयी योद्धा, परमकारुण्य व शहाणपणा यांची प्रत्यक्ष मूर्ती, निश्चयाचा महामेरू, आपल्या लोकांच्या उन्नतीसाठी आपले सारे जीवन समर्पण करणारा युगपुरुष म्हणजे महात्मा गांधी होत. त्यांनी युरोपच्या पाशवी शक्तीशी मानव्याच्या मृदुतेच्या साह्याने लढा दिला व त्यांत आपले वर्चस्व प्रस्थापित केले. या भूमीवर एवढा महात्मा शरीररूपाने वावरत होता हे कदाचित् पुढील पिढ्यांना खरेच वाटणार नाही." अमेरिकेचे एक तत्त्वचिंतक रे. ओल्म्स म्हणतात, "गांधीजी नम्र, सभ्य आणि अत्यंत दयाळू होते. शिष्टाचारातील साधेपणाने ते माणसाला तात्काळ वश करीत. वागणुकीत मृदू व शांत असूनही त्यांची इच्छाशक्ती कणखर व धैर्य पोलादी होते. त्यांचा प्रामाणिकपणा स्फटिकासारखा निर्मळ व सत्यप्रेम अढळ होते. सर्वस्वाचा त्याग केल्यामुळे ते दुसऱ्याकडून कोठलीही गोष्ट मागू शकत. भौतिक सुखाचे विचार, संसाराची चिंता, महत्त्वाकांक्षा या त्यांच्या जीवनातून केव्हाच अदृश्य झाल्या आहेत. सत्य आणि प्रेम यांत प्रगट होणाऱ्या तेजाने त्यांचे जीवन उजळून निघाले आहे." समाजशास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ रोमँरोला म्हणतात, "हिंदुस्थानच्या जनतेत स्वतःच्या एकीची, स्वातंत्र्याची व स्वसामर्थ्याची अभिमानास्पद जाणीव जागृत करणाऱ्या कार्यप्रवण जीवनाची प्रेरणा देणे एवढेच काही त्यांचे कार्य नव्हे. पाश्चात्त्य देशांतील लोकांसाठी त्या लोकांच्याच खिस्ताचा विस्मृत व भ्रष्ट झालेला संदेश पुनरुज्जीवित करण्याचे कार्य गांधीजींनी केले आहे. मानव जातीतील ऋषींच्या आणि संतांच्या मालिकेत त्यांनी आपले नाव चिरस्थायी केले असून, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची प्रभा पृथ्वीच्या पाठीवर निरनिराळ्या देशांवर पसरली आहे." कविसम्राट रवींद्रनाथ टागोर म्हणतात, "गांधीजी हे यज्ञाचे मूर्त रूप होय. सत्तेची अभिलाषा त्यांच्याजवळ नाही. आत्मक्लेशांनी त्यांनी मिळविलेले सामर्थ्य एखाद्या सुरेल संगीताप्रमाणे किंवा सुरेख सौंदर्याकृतीप्रमाणे लोकांवर प्रभुता चालविते." गांधीजींनी आपले वारस म्हणून मानलेले हिंदुस्थानचे जगविख्यात पंतप्रधान पं. नेहरू यांनी त्यांचे वर्णन अतिशय समर्पक शब्दांत केले आहे.

"या किरकोळ दिसणाऱ्या माणसात पोलादाचे व खडकाचे सामर्थ्य आहे. ते कुठल्याही भौतिक शक्तीला दाद देणार नाहीत. यांच्या साध्या चेहऱ्यामोहऱ्यात व अर्धनग्न शरीरात असे काही बादशाही वैभव आहे की, ते तुम्हांला आपणांपुढे नमवितेच. त्यांनी उच्चारलेले शब्द आपल्या अंतर्मनात खोलवर रुजतात. त्यांनी दाखविलेला मार्ग कष्टाचा असला तरी शूराचा होता. स्वातंत्र्यमंदिराकडे जाण्याचा

तोच एकमेव मार्ग होता. ज्या सूर्याने आजवर आपणांस प्रकाश दिला तो अस्तास गेला आहे. गांधीजींच्या शिकवणीची दिव्य प्रभा हीच आपणांस एकमेव आधार आहे. त्यांनी जेथे जेथे स्पर्श केला त्या त्या ठिकाणी चैतन्य आले. ते जेथे जात तेथे मंदिर होई."

## जीवनाचे तत्त्वज्ञान

म. गांधींचे जीवनविषयक तत्त्वज्ञान हा त्यांच्यावर झालेले संस्कार, जीवनामध्ये त्यांना आलेले अनुभव, उपनिषदे, वेद, भगवद्‌गीता, निरनिराळ्या धर्मांचा तौलनिक अभ्यास या सर्वांचा परिपाक म्हणावा लागेल. वैदिक तत्त्वज्ञानाप्रमाणेच त्यांनी इस्लाम, खिस्ती, बौद्ध व जैन या तत्त्वज्ञानांचा सखोल अभ्यास केला होता. कौंट लिओ टॉलस्टॉय यांच्या 'The Kingdom of God is within you' या ग्रंथाचा आणि रस्किन यांच्या 'Unto this Last' या ग्रंथातील तत्त्वज्ञानाचा त्यांच्यावर विलक्षण परिणाम झाला होता. लोकमान्य टिळकांनी भगवद्‌गीतेच्या परिशीलनाने ज्याप्रमाणे कर्मयोग शोधून काढला, त्याचप्रमाणे म. गांधींनी भगवान् श्रीकृष्णाच्या शिकवणुकीतून अनासक्तियोगाचा आपणांस साक्षात्कार झाल्याचे सांगितले आहे. महात्माजींचे सर्व जीवन शिस्तमय, सुसूत्र व काही शाश्वत मूल्यांवर आधारलेले होते. या तत्त्वज्ञानाच्या आधारानेच त्यांनी भारतातील आर्थिक, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक पुनर्रचना करण्याचे कार्यक्रम आखले होते. त्यांनी आपले तत्त्वज्ञान प्रत्यक्ष जीवनात उतरविण्याचा शिकस्तीचा प्रयत्न केलेला आढळतो. महात्माजींची मूळची प्रवृत्ती धार्मिक होती. त्यांची परमेश्वरावर अढळ श्रद्धा होती. प्रत्येक जीवमात्र परमेश्वराचाच अंश आहे याची त्यांना खात्री होती. 'जीवो ब्रह्मैव नापरः।' हा सिद्धान्त ते पूर्णपणे आचरणात आणू पहात होते. सर्व मनुष्यप्राणी ईश्वराचीच लेकरे असल्याकारणाने त्यांच्यामध्ये वैर, द्वेष किंवा भेदभाव असणे त्यांना सयुक्तिक वाटत नव्हते. मानवी जीवनाचे अंतिम ध्येय परमेश्वरप्राप्ती असे ते मानीत असत. त्यांच्याच शब्दांत सांगावयाचे तर "मी आत्मस्वरूप जाणण्यासाठी आणि या जीवनातच मोक्ष मिळविण्यासाठी उत्सुक आहे. मोक्षप्राप्तीसाठी देशसेवा ही एक साधना आहे. परमेश्वराच्या चित्स्वरूपाशी एकरूप होणे म्हणजेच मोक्ष होय. परंतु त्यासाठी मला गुहेत जाऊन राहण्याची किंवा सर्वसंगपरित्याग करण्याची जरूरी भासत नाही. देशसेवेसाठी अविश्रांत श्रम आणि त्या योगाने अखिल मानवतेची सेवा करणे हाच माझ्या मोक्षाचा मार्ग होय. सर्वजीवमात्राशी मला समरस व्हावयाचे आहे." महात्मा गांधींच्या जीवनाच्या तत्त्वज्ञानातील प्रमुख सिद्धान्त खालील पद्यपंक्तीत दिसून येतात.

## एकादशव्रते

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, असंग्रह,
शरीरश्रम, अस्वाद, सर्वत्र भयवर्जन
सर्वधर्मी समानत्व, स्वदेशी, स्पर्शभावना
ही एकादश सेवावी नम्रत्वे व्रतनिश्चये ॥ १ ॥

## अहिंसा

मानवी जीवनाचा आधार म्हणजे अहिंसा होय. पशुकोटीमध्ये हिंसा हीच प्रवृत्ती असते. 'बळी तो कान पिळी' हे तत्त्व हीन कोटीतील पशु-पक्ष्यांमध्ये दिसून येते. परंतु विकासाच्या उच्चतम स्थितीमध्ये असणाऱ्या मानवांमध्ये सर्व व्यवहार अहिंसेच्या तत्त्वानुसार चालले पाहिजेत. अहिंसेचा अर्थ केवळ हिंसा न करणे किंवा निष्क्रियता असा नाही. अहिंसेमध्ये प्रत्यक्ष क्रियात्मक भागही असतो. दुसऱ्यासाठी त्याग, सहनशीलता, सेवा व आत्मक्लेश यांचा अहिंसेमध्ये समावेश होतो. अहिंसा केवळ आचरणात्मकही नाही, ती वैचारिकही आहे. आपला आचार-विचार व उच्चार या सर्वांमध्ये अहिंसेचा प्रादुर्भाव दिसला पाहिजे. अग्नीवर विजय मिळविण्यासाठी ज्याप्रमाणे पाण्याचा उपयोग करावा लागतो, त्याचप्रमाणे जगातील असत् प्रवृत्तींवर, विद्वेषांवर किंवा हिंसाचारावर विजय मिळविण्यासाठी अहिंसेचा उपयोग होतो. काही लोकांच्या समजुतीप्रमाणे अहिंसा हे भ्याड व निर्बलांचे शस्त्र आहे, हे म्हणणे गांधीजींच्या मते योग्य नव्हे. खरी अहिंसा ही सामर्थ्यसंपन्न शूरांच्या ठिकाणीच असू शकते. अहिंसेचा वापर केल्याने पाशवी शक्तीपुढे नैतिक व आध्यात्मिक विजय संपादन करता येतो. हिंसेने हिंसा कधीच नाहीशी होऊ शकत नाही. आगीत तेल ओतल्याप्रमाणे ती अधिकच वाढत जाते. उभय पक्षांमध्ये द्वेषाचा फैलाव होतो. याउलट, अहिंसा ही उभय पक्षांना हितकारक असते. तिचा परिणाम चिरकाल टिकतो. भांडणाऱ्या दोन्ही पक्षांमध्ये मैत्रीची व प्रेमाची भावना निर्माण होते. अहिंसा म्हणजे एकप्रकारे तपाचरणच होय. त्यामुळे व्यक्तीची आत्मशुद्धी होते. असत् प्रवृत्तींचा नाश होऊन सत् प्रवृत्तींचे बीजारोपण होते. म. गांधींनी आपल्या निरनिराळ्या चळवळींमध्ये अहिंसात्मक निःशस्त्र प्रतिकाराचा उपयोग केला. स्वातंत्र्याच्या अनेक संग्रामांमध्ये त्यांनी आत्मक्लेश सहन करण्याची सत्याग्रहींना शिकवण दिली. त्याचा परिणाम असा झाला की, भारतीयांच्या मनामध्ये प्रतिपक्षाबद्दल व इंग्रजांच्या मनामध्ये गांधीजी व सत्याग्रही यांच्याबद्दल फारशी द्वेषाची भावना निर्माण झाली नाही. सामाजिक क्षेत्रातही महात्माजींनी अहिंसेचाच उपयोग केला. समाजातील

काही वर्गाला अत्यंत हीन दर्जाची वागणूक देणे, म्हणजे त्यांच्या मते हिंसा होय. त्यासाठी व त्यांना समतेची वागणूक मिळावी म्हणून त्यांनी अनेक चळवळी केल्या. हिंदू समाजातील अस्पृश्यता नाहीशी व्हावी म्हणून प्राणांतिक उपोषणेही केली. म. गांधी आपले सर्व व्यवहार अहिंसेच्या तत्त्वानुसार चालवीत असत. अहिंसेसंबंधी त्यांचा आत्मप्रत्यय खालील उताऱ्यात दिसून येतो. ते म्हणतात---

" मानवी जीवनामध्ये अहिंसेचे सामर्थ्य अतुलनीय आहे. ते जीवनसर्वस्व आहे. अहिंसा हा शूरांचा धर्म आहे. भेकडांच्या आटोक्यात अहिंसा येणे शक्य नाही. अहिंसा हा एखादा ठोकळेवजा निर्जीव सिद्धान्त नसून ती जिवंत व चैतन्यदायी शक्ती आहे. आत्म्याचा तो एक विशेष गुण आहे. 'अहिंसा परमो धर्मः' हे त्रिकालाबाधित सत्य आहे. दुष्प्रवृत्ती अहिंसेपुढे उभी राहू शकणार नाही. मत्सर, क्रोध, द्वेष इत्यादींचा अंधकार अहिंसासूर्याच्या उदयाबरोबर नष्ट होतो. नामर्दपणापेक्षा हिंसा केव्हाही बरी. हिंसावादी माणसाला केव्हातरी अहिंसावादी होण्याची आशा आहे. पण नामर्दाला ही आशा मुळीच नाही. हातामध्ये तलवार घेऊन शत्रूशी लढत लढत मरणारा तर शूर खराच, पण अत्यंत निर्भयतेने लहानसे बोटही न उचलता जो निधड्या छातीने आत्माहुती देतो तो अधिक शूर होय. खरा अहिंसक स्वतःचा वध होत असतानाही ओठांवरील हसे मावळू देणार नाही. "

### सत्य

अहिंसेइतकेच महात्माजींना प्राणप्रिय असे दुसरे तत्त्व म्हणजे सत्य होय. सत्य आणि अहिंसा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. महात्माजी सत्याला परमेश्वराइतके महत्त्व देत असत. किंबहुना सत्य म्हणजेच परमेश्वर असे त्यांना वाटे. सत्याची उपासना म्हणजेच ईश्वरोपासना असे ते मानीत. सत्य हे चिरंतन, शाश्वत असते. एका देशाने दुसऱ्या देशावर राज्य करणे, एका जमातीने दुसऱ्या जमातींचे शोषण करणे ही ज्याप्रमाणे हिंसा होय, त्याचप्रमाणे ती एक असत्य गोष्ट होय. महात्माजींनी आपल्या सर्व जीवनामध्ये सत्याचे प्रयोग केले. सत्याविषयी ते म्हणतात, " सत्य हाच माझा परमोच्च धर्म आहे. या धर्मामध्ये सर्व धर्मांचे सार सामावलेले आहे. सत्य हे केवळ वाचिक नसून वैचारिक व प्रात्यक्षिकही आहे. सत्य म्हणजे सापेक्ष सत्य नव्हे. ते नित्य, शुद्ध, सनातन आणि अपरिवर्तनीय असे आहे. त्यालाच ईश्वर असे म्हणतात. ईश्वराच्या अनेक व्याख्या व अनेक स्वरूपे सांगितली जातात. परंतु सत्य म्हणजेच परमेश्वर ही त्याची व्याख्या व हे त्याचे स्वरूप मला सर्वांत प्रिय आहे. खरी ईश्वरप्राप्ती होणे म्हणजे पूर्ण सत्य हस्तगत करणे होय. तथापि सत्याचा मार्ग बिकट आणि असिधाराव्रताप्रमाणे अवघड

आहे. अहिंसा हा सत्याचा पाया आहे. सत्याला जर अहिंसेचा आधार नसेल तर सत्याचे पालन असंभवनीय आहे. वासना सोडून सेवाभावात रममाण होणे, सहिष्णू वृत्ती बाळगून परमेश्वराशी एकरूप होणे म्हणजेच सत्याचरण करणे हे होय.

### अस्तेय

सत्याप्रमाणेच गांधीजींना अस्तेयाचे व्रत प्राणप्रिय होते. त्यांच्या मते प्रत्येकाने समाजाची सेवा अखंडपणे केली पाहिजे. भगवद्गीतेत म्हटल्याप्रमाणे समाजामध्ये राहून समाजाच्या उपकारामुळे ज्या अनेकविध सुखसोयी व्यक्तीला मिळतात त्यांपैकी काही भाग समाजाला न देता सर्वस्वी स्वतःच उपभोगणे म्हणजे चोरी होय. 'तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुंक्ते स्तेन एव सः'. अस्तेय याचा अर्थ केवळ दुसऱ्याची चोरी न करणे एवढाच नसून आपल्यावरील समाजऋण फेडणे असाही आहे.

### अस्वाद

अस्वाद व्रताचे आचरण गांधीजी स्वतः करीत असत. याचा अर्थ जिभेचे चोचले न पुरविता अन्न भक्षण करणे असा आहे. त्यांच्या आश्रमातील जेवण अतिशय साधे असे. निरनिराळ्या प्रकारांनी चविष्ट अन्न करण्याचे ते टाळीत. अन्नासाठी शरीर नसून शरीर कार्यक्षम करण्यासाठीच अन्न आहे असे ते म्हणत. आपल्या सेवेच्या, कर्तव्यनिष्ठेच्या आड येणाऱ्या सर्व गोष्टी त्यांनी दूर केल्या होत्या.

### असंग्रहादी

असंग्रहाच्या बाबतीतही त्यांची भूमिका समाजधारणेस पोषक अशीच होती. आपल्याला जरुरी नसणाऱ्या वस्तूंचा संग्रह व्यक्तीने केल्यास इतर व्यक्तींना त्या मिळू शकत नाहीत. शिवाय जरूर नसणाऱ्या वस्तू संग्रही ठेवण्याचा व्यापही फार मोठा असतो. श्रीमंतांनी किंवा पुंजीपतींनी आपला पैसा हा गरिबांसाठी ठेव म्हणून वापरला पाहिजे. सर्व धर्मांच्या तत्त्वांमध्ये समानता असल्याचा प्रत्यय महात्माजींना आला होता. त्यामुळे धर्मातील भांडणे ही निरर्थक होत असे ते म्हणत. ब्रिटिशांच्या राजवटीमुळे भारतातील सर्व धंदे रसातळाला गेले व येथील जनतेचे आर्थिक शोषण होत आहे असे वाटल्यावरूनच त्यांनी स्वदेशी तत्त्वाचा मोठ्या हिरीरीने प्रचार केला. दुसऱ्याचे शोषण करणे म्हणजे हिंसा होय. ती टाळण्यासाठी व स्वतःचा उद्धार करण्यासाठी स्वदेशीचा अंगीकार हे सर्वोत्तम तत्त्व आहे असे त्यांना वाटे. पारतंत्र्यामुळे भारतीय जनता भयग्रस्त झाली होती. तिला निर्भय

बनविण्यासाठी व सत्यपरिस्थितीची जाणीव करून देण्यासाठी महात्माजींनी निरनिराळे उत्तेजनात्मक व्यवसाय सुचविले. उद्योगी मनुष्य स्वतः निर्भय राहून दुसऱ्यालाही निर्भय बनवितो. सत्य, अहिंसा, प्रेम यांवर अधिष्ठित, समता, सहकार्य, बंधुता व सहिष्णुता या तत्त्वांचे आचरण करणारा, लोकशाही नवसमाज निर्माण करणे हे महात्माजींचे सामाजिक उद्दिष्ट होते. त्यामध्ये सर्वांना सामाजिक न्याय, आर्थिक समता व विकासाच्या समान संधीची शाश्वती होती. त्यांना वर्गविग्रह मान्य नव्हता. समाजातील सर्व घटक बंधुभावाने, प्रेमाने व सहकार्याने उद्योगरत रहावेत व भारतामध्ये एक रामराज्य निर्माण व्हावे अशी त्यांची अपेक्षा होती. स्त्रीजातीबद्दल महात्माजींना अत्यंत आदर होता. स्त्रियांची गुलामगिरीतून मुक्तता व्हावी व त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा असे त्यांना वाटे. सत्य व अहिंसा यांचे अधिराज्य निर्माण करण्यासाठी स्त्रिया अधिक प्रभावशाली नेतृत्व करतील असे त्यांना वाटे. ते म्हणत, "अहिंसात्मक युद्धामध्ये स्त्रियांचे विजय पुरुषांहून अधिक श्रेष्ठ होत. स्त्रियांना अबला म्हणणे हा त्यांचा अपमान आहे. पुरुषांनी स्त्रियांवर जुल्म करणे, त्यांना असमानतेची वागणूक देणे, त्यांच्यावर अन्याय करणे हे पाशवी कृत्य होय. शक्ती याचा अर्थ पाशवी शक्ती असाच असेल तर स्त्री ही पुरुषाहून खरोखरच दुर्बल म्हणावी लागेल. पण शक्तीचा अर्थ नैतिक बल अथवा आध्यात्मिक सामर्थ्य असा केल्यास स्त्री ही पुरुषाहून अधिक समर्थ ठरेल. तिच्या अंगी पुरुषापेक्षा अधिक सहनशक्ती, चिकाटी व मनोधैर्य असते. तिच्यावाचून पुरुषाचे जीवन अशक्यच होय. मानवाच्या जीवनामध्ये अहिंसेचे राज्य प्रस्थापित झाल्यास मानवाचे भवितव्य स्त्रियांच्याच हाती देणे युक्त ठरेल."

महात्माजींच्या जीवनाच्या तत्त्वज्ञानामध्ये सत्य, अहिंसा, प्रेम यांसारख्या उत्तमोत्तम, शाश्वत व महत्त्वाच्या मूल्यांप्रमाणेच नियमितपणा, साधेपणा काटकसरीपणा यांसारख्या अत्यंत क्षुल्लक वाटणाऱ्या तत्त्वांचाही समावेश झालेला दिसून येतो.

## शैक्षणिक तत्त्वज्ञान

पाश्चिमात्य शिक्षणशास्त्रज्ञांनी शैक्षणिक तत्त्वज्ञानासंबंधी निसर्गवाद, आदर्शवाद, वास्तववाद व कार्यवाद असे चार पंथ मानले आहेत. महात्माजींच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानात मात्र या चारही शैक्षणिक पंथातील मूलतत्त्वांचा सुरेख संगम झालेला दिसून येतो. महात्माजींनी आपल्या उराशी बाळगलेल्या सत्य, अहिंसा, प्रेम या शाश्वत मूल्यांच्या प्रचीतीसाठी अनेक प्रयोग करून पाहिले. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राजकारण अशा विविध क्षेत्रांमध्ये केलेल्या प्रयोगांतून त्यांनी काही मूलगामी सिद्धान्त प्रतिपादन केले. आफ्रिकेत व भारतात निरनिराळ्या प्रतिकूल परिस्थितीशी झगडत असता त्यांनी काही शैक्षणिक प्रयोगही केले. या प्रयोगांतून

त्यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान तावूनसुलाखून बाहेर पडलेले दिसून येते. गांधीजींच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा विशेष म्हणजे ते प्लेटोच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे केवळ मनोराज्यामध्ये रममाण होणारे नाही. त्याला प्रत्यक्ष वस्तुस्थितीची बैठक असल्यामुळे ते एकांगीही नाही. महात्माजी मानवी जीवनाचे उद्दिष्ट परमेश्वरप्राप्ती किंवा मोक्ष असे मानतात. त्यासाठी शिक्षण हे एक साधन आहे, अशी त्यांची श्रद्धा होती. ईश्वरप्राप्तीबरोबरच मानवाच्या जीवनामध्ये सत्य, अहिंसा व प्रेम यांचे अधिष्ठान निर्माण करण्यासाठी त्यांना विश्वबंधुत्वाची कल्पना अतिशय आवडत होती. शिक्षण म्हणजे तत्त्वज्ञानाचे प्रत्यक्ष आचरण असे ते मानीत असत. म्हणूनच जीवनाच्या तत्त्वज्ञानाची कसोटी शिक्षणाच्या प्रत्यक्ष निकषावर त्यांनी घासून पाहिली होती.

## शिक्षणाचा हेतू

महात्माजींनी शिक्षणाचे विविध हेतू सांगितले आहेत. पर्वतावर चढणाऱ्या व्यक्तीला ज्याप्रमाणे जसजसे वर चढत जाताना अधिकाधिक विशाल क्षितिजे दिसू लागतात, त्याचप्रमाणे महात्माजींनी वर्णन केलेली शिक्षणाची उद्दिष्टे परिस्थितीनुसार लहानमोठी असल्याचे दिसून येते. छोट्या उद्दिष्टांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये नागरिकता आणणे, लोकशाही वृत्तीची वाढ करणे, चारित्र्यसंवर्धन करणे, समता, सहिष्णुता, उद्योगप्रियता, स्वावलंबन या गुणांचा विकास करणे इत्यादी गोष्टी येतील. शिक्षणाच्या परमोच्च ध्येयामध्ये मात्र ईश्वरप्राप्ती याचा समावेश होऊ शकेल. शिक्षणामुळे बुद्धी, कृती आणि भावना ( Head, Hand and Heart ) यांचा समकालीन व समप्रमाणात विकास व्हावा असे त्यांचे मत होते. चारित्र्यसंवर्धनासाठी आत्मनिग्रह, स्वयंशिस्त, आत्मशुद्धी यांची अत्यंत जरूरी आहे असे त्यांना वाटे. शिक्षणाने प्रत्येक व्यक्ती स्वयंपूर्ण बनली पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता. सुशिक्षित बेकारी म्हणजे, 'वदतो व्याघाताचे' एक उदाहरण असे त्यांना वाटे. शिक्षणाने जर स्वावलंबन व स्वयंपूर्णता शिकविली नाही तर ते खऱ्या अर्थाने शिक्षणच नव्हे, असेही त्यांचे मत होते. केवळ साक्षरतेला किंवा शब्दनिष्ठ ज्ञानाला त्यांनी फारसे महत्त्व दिले नाही. शिक्षणाचा मध्यवर्ती बिंदू विद्यार्थी हाच असला पाहिजे असे मत पेस्टॉलॉझी, फ्रोबेल, हर्बार्ट या पाश्चिमात्य शिक्षणतज्ज्ञांप्रमाणेच त्यांनीही प्रतिपादिले आहे. शिक्षण व जीवन यांची फारकत होता उपयोगी नाही. शिक्षणामुळे व्यक्तिजीवनाच्या आशा-आकांक्षा सफल झाल्या पाहिजेत. त्यासाठी शिक्षण हे जीवनप्रसंगातून व जीवनाच्या समृद्धीसाठी दिले पाहिजे हे त्यांचे मत अत्यंत पुरोगामी विचाराचे निदर्शक आहे. केवळ पुस्तकी शिक्षण हे कुचकामी असते. त्याचा जीवनाला काहीही उपयोग होऊ शकत नाही, हे त्यांनी आपल्या शैक्षणिक प्रयोगांतून दाखवून दिले आहे. अमेरिकन शिक्षणशास्त्रज्ञ जॉन ड्यूयी यांच्या विचारांशी कृतिकेंद्रित शिक्षणाबाबत ते सहमत आहेत.

जीवन म्हणजे केवळ शब्दनिष्ठता नव्हे, ती एक अखंड कृतीची किंवा उद्योगाची मालिकाच आहे. जीवनाची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये आदर्श जीवन जगले पाहिजे, हे त्यांचे म्हणणे कार्यवादी तत्त्वज्ञानाशी अत्यंत मिळतेजुळते आहे. सर्व शिक्षण हे उद्योगाभोवती गुंफले पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता. उद्योगातून शिक्षण दिल्यास ज्ञान जरूर तेवढे, जरूर त्या वेळी देता येणे शक्य आहे. जरूर नसलेले ज्ञान विद्यार्थ्यांनी ग्रहण केल्यास ते त्यांना उपकारक न होता भारभूतच होते. म्हणून कृतिद्वारा मिळालेले ज्ञान हे श्रेष्ठ प्रतीचे ज्ञान होय असे ते मानीत. त्यांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे ज्ञानाशिवाय केलेली कृती किंवा उद्योग आंधळी होय व कृतीशिवाय मिळविलेले ज्ञान हे लंगडे होय. ते व्यवहारामध्ये कधीच चालू शकणार नाही. महात्माजींच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानामध्ये मानसशास्त्र, समाजशास्त्र व जीवशास्त्र या शिक्षणाला पोषक अशा शास्त्रांचा अभ्यास दिसून येतो.

### सामाजिक ध्येय

शिक्षणाच्या व्यक्तिगत ध्येयाबरोबरच शिक्षणाच्या सामाजिक ध्येयाकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाबरोबरच शिक्षणामुळे संस्कृतीचे संक्रमण व संवर्धन झाले पाहिजे. ब्रिटिशांनी भारतामध्ये सुरू केलेल्या शिक्षण-पद्धतीमुळे भारतीय स्वतःच्या संस्कृतीला विसरले ही सर्वांत महान आपत्ती होय असे ते मानीत. संस्कृतीचा स्रोत अखंड टिकून राहिला पाहिजे. एखाद्या पिढीला हा स्रोत खंडित झाला तर त्या व पुढच्या पिढ्यांची अपरिमित हानी होते. प्रत्येक पुढची पिढी मागच्या पिढीच्या खांद्यावर उभी राहिलेली असते. हा तिचा आधारच नाहीसा झाल्यास तिचे विघटन व विनाश होण्यास वेळ लागणार नाही. संस्कृती ही केवळ शब्दाने देता येत नसते. ती क्रियात्मक असली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या बोलण्यात, चालण्यात, बसण्यात, उठण्यात ती प्रतिबिंबित झाली पाहिजे. प्रत्येक देशाच्या संस्कृतीच्या बाबतीत काही वैशिष्ट्ये असतात. भारतीय संस्कृतीचीही काही ठळक वैशिष्ट्ये आहेत. सामाजिक उद्दिष्टांमध्ये नवसमाजनिर्मिती हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट त्यांनी मानले होते. खऱ्या राष्ट्रीय शिक्षणामुळे एक आदर्श असा नवसमाज निर्माण झाला पाहिजे. हा समाज सत्य, अहिंसा व प्रेम यांवर अधिष्ठित असून, समता, सहिष्णुता व सहकार्य या तत्त्वाने वागणारा असेल. यामध्ये वर्गविग्रह असणार नाही. समाजातील प्रत्येक घटक उद्योगरत असल्या-कारणाने कोणी कोणाचे शोषण करणार नाही. सर्व लोकांना आपापल्या धर्मा-प्रमाणे वागण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य असून सर्व धर्मांना योग्य तो मान दिला जाईल. शिक्षण ही एक सतत चालणारी क्रिया असल्यामुळे केवळ शालेय शिक्षणामुळे तिचा आरंभ किंवा शेवट होणार नाही. 'सा विद्या या विमुक्तये' हे शैक्षणिक उद्दिष्ट केवळ आध्यात्मिक बाबतीतच नव्हे तर राजकीय, सामाजिक व

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ६८४२५ · निबंध
९२९३ · १९१३१७
१६६३५ दा. क्र. १०१


अन्य बाबतींतही त्यांनी मान्य केले होते. शिक्षणामध्ये त्याच्या स्वाश्रयीपणावर त्यांनी विशेष भर दिला होता. शालेय उद्योग जर व्यवस्थित व्हावयाचे असतील तर त्यांपासून काही निश्चित स्वरूपाचे उत्पादन झाले पाहिजे असे त्यांना वाटे. ते भारताच्या विशिष्ट परिस्थितीला योग्यच होते असे म्हणावे लागेल. शिक्षणाची संधी सर्वांना उपलब्ध करून द्यावयाची असेल, म्हणजेच शिक्षण सक्तीचे, सार्वत्रिक व मोफत करावयाचे असल्यास, भारताच्या विशिष्ट आर्थिक परिस्थितीत ते काही अंशी स्वाश्रयी किंवा उत्पादनक्षम बनविणे अत्यंत आवश्यक आहे.

## अभ्यासक्रम

महात्माजींच्या शैक्षणिक तत्त्वानुसार शिक्षण द्यावयाचे झाल्यास पूर्वीच्या शिक्षणामध्ये आमूलाग्र बदल करणे आवश्यकच होते. महात्माजींच्या मते सर्व शिक्षण सभोवतालच्या परिस्थितीशी निगडित असले पाहिजे. कारण बहुसंख्य विद्यार्थी त्यांच्या सभोवतालच्या परिस्थितीतच जीवन व्यतीत करणारे असतात. इतिहासामध्ये पाश्चिमात्यांच्या इतिहासापेक्षा स्वतःच्या भारतीयांच्या इतिहासाला अधिक महत्त्व द्यावयास हवे. शिक्षणाचे माध्यम परकीय भाषा न ठेवता मातृभाषा हेच असले पाहिजे. मातेइतकीच मातृभाषेची महती महात्माजी जाणून होते. परकीय भाषेतून विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यास लावणे म्हणजे एक प्रकारचा जुलूमच होय असे त्यांना वाटे. मातृभाषेतून निरनिराळे ते केवळ सुगम पद्धतीने शिकता येते एवढेच नसून किती तरी अधिक पटीने ज्ञान संपादन करता येते. पूर्वीच्या शिक्षणामध्ये केवळ शब्दांवर किंवा वाङ्मयावर विशेष भर दिला होता, तोही त्यांना मान्य नव्हता. ज्ञानेंद्रियांबरोबरच कर्मेंद्रियांचाही विकास झाला पाहिजे आणि त्यासाठी कृतियुक्त अभ्यासक्रम तयार केला पाहिजे असे त्यांनी आग्रहाने प्रतिपादले आहे. गांधीजी म्हणतात, "माझे असे मत आहे की, हात, पाय, डोळे, कान, नाक इत्यादी अवयवांना योग्य व्यायाम देण्यातच खरे बौद्धिक शिक्षण आहे. आपल्या अवयवांचा निरनिराळ्या कृतींतून कसा विकास करावा याची जाणीव विद्यार्थ्यांना झाल्यास बौद्धिक प्रगती जलद व उत्कृष्ट होते. मन, शरीर व आत्मा यांचा विकास एकाच वेळी योग्य प्रमाणात झाला पाहिजे. आत्मिक व शारीरिक गुणांच्या विकासाबरोबरच मनाचीही प्रगती होते. मनुष्य केवळ बुद्धी, हृदय, आत्मा किंवा शरीर यांचा बनलेला नाही. या तीनही घटकांचे योग्य व संतुलित मिश्रण झाले म्हणजे मनुष्याचा पूर्ण विकास होतो. खऱ्या शिक्षणाचे हे मूलतत्त्व होय."

## पद्धती

अध्ययन-अध्यापनासाठी पाठांतर-पद्धती महात्माजींना मान्य नाही. शिक्षण म्हणजे अनुभव व योग्य संस्कार होत. यासाठी अनुरूप शैक्षणिक अनुभव

विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले पाहिजेत. केवळ शब्दांच्या पोपटपंचीने खरे शिक्षण होत नसते. विद्यार्थ्यांना जीवनाचा अनुभव येण्यासाठी ते कृतियुक्त असले पाहिजे. मात्र अशी कृती किंवा उद्योग यांत्रिक पद्धतीने न करता शास्त्रीय पद्धतीने करण्यावरच विशेष भर दिला पाहिजे. कृती व उद्योग करताना त्यांच्या उत्पादन-क्षमतेकडे विशेष लक्ष पुरवून शिक्षण स्वावलंबी व स्वाश्रयी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

### शिक्षक

शिक्षक हा केवळ वाङ्मयपटू असून चालणार नाही. उद्योगासाठी निर-निराळी कौशल्ये त्याने प्राप्त करून घेतली पाहिजेत. तो केवळ वाचिवीर असून चालणार नाही. तो कृतिवीरही असला पाहिजे. सत्य, अहिंसा, प्रेम यांसारख्या शाश्वत मूल्यांवर त्याची श्रद्धा असली पाहिजे. त्याचे चारित्र्य निष्कलंक व आदर्श असले पाहिजे. मुलांच्या विचारांशी व भावनांशी तो समरस होऊ शकला पाहिजे.

अशा रीतीने महात्माजींचे शैक्षणिक तत्त्वज्ञान हे आधुनिक शिक्षणविचारांशी पुष्कळसे मिळते-जुळते आहे.

### शैक्षणिक प्रयोग

म. गांधी आपल्या चरितार्थासाठी आफ्रिकेत गेल्यावर त्यांना तेथील भारतीय जनतेची अत्यंत अनुकंपनीय अवस्था पाहून फार दुःख झाले. त्यामुळे त्यांचे मन इतके द्रवले की, ते आपला आफ्रिकेत येण्याचा हेतूच विसरले. एवढेच नाही, तर तेथील पददलित जनतेच्या उद्धाराचे कार्य त्यांनी हाती घेतले. म. गांधी आफ्रिकेत गेले हा एक योगायोगच म्हटला पाहिजे. त्यांची वकिली मुंबईस चांगल्या तऱ्हेने चालू शकती तर ते आफ्रिकेस जाते ना. आफ्रिकेतील स्वबांधवांच्या दुरवस्थेचे कारण अज्ञान होय, हे त्यांनी प्रथमदर्शनीच हेरले. त्यासाठी त्यांनी गेल्याबरोबर काही शिक्षण-वर्ग सुरू केले. या वर्गातून ते तेथील लोकांना इंग्रजी शिकवू लागले. आफ्रिकेमध्ये असतानाच त्यांनी तेथील समाजाचे सूक्ष्म निरीक्षण केले. समाजाची सेवा म्हणजेच ईश्वरसेवा असा त्यांनी मनाशी निर्धार केला. जनतेची सेवा करण्याच्या हेतूनेच त्यांनी विविध प्रयोग केले. त्यांमध्ये शैक्षणिक प्रयोगांचाही समावेश होतो. १८९६ साली मुंबईस परत आल्यावर त्यांना भारतामध्ये ठिकठिकाणी प्लेगचा प्रादुर्भाव दिसून आला. अशा आपत्तीतही जनतेची सेवा करण्यासाठी ते पुढे सरसावले. नंतर १८९७ साली आफ्रिकेच्या जनतेकडून बोलावणे आल्यामुळे ते पुन्हा तिकडे गेले. या वेळी ते सहकुटुंबच तिकडे गेले.

अर्थातच तेथे गेल्याबरोबर स्वतःच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न त्यांच्या डोळ्यांपुढे उभा राहिला. तेथील शाळांतून इंग्रजी माध्यम असल्यामुळे स्वतःची मुले पाठविणे त्यांना इष्ट वाटेना. म्हणून मुलांना घरीच शिकविण्याचा प्रयोग त्यांनी सुरू केला. माता व पिता हेच मुलांचे खरे शिक्षक होत असे त्यांना वाटे. मातृभाषेतून मुलांना शिकविल्यामुळे व उद्योगाचे माध्यम अंगीकारल्यामुळे मुलांच्यावर फार चांगले संस्कार अल्पावधीत होतात, असा त्यांना अनुभव मिळाला. आफ्रिकेतील निर-निराळ्या सत्याग्रहींसाठी त्यांना शिबिरे घ्यावी लागली. सन १९०४ साली दरबानहून १५ मैलांवर फिनिक्स येथे असेच एक शिबिर स्थापन करण्यात आले. आफ्रिकेतील भारतीय जनतेच्या दुःखाला वाचा फोडण्यासाठी इंडियन ओपीनियन नावाचे वृत्तपत्र ते येथून चालवीत असत. त्यासाठी आलेले काही लोक व सत्याग्रही यांची काही कुटुंबेही तेथे रहात. त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न कसा सोडवावा, हा प्रश्न गांधीजींच्या पुढे उभा राहिला. त्यांना जरूर असणारे शिक्षण देणे भाग होते. अन्नाकरिता शेतीची जरुरी होती, आरोग्याकरिता सफाईची जरुरी होती व प्रत्येकाला कामधंदा मिळवून देण्यासाठी उद्योगांचीही जरुरी होती. अशा सत्याग्रहींच्या शिबिरामध्ये केवळ वाङ्मयाचे शिक्षण निरर्थकच होते. अशा रीतीने जरुरीच्या पोटी तेथील अभ्यासक्रम तयार झाला. मातृभाषा हेच शिक्षणाचे माध्यम ठरले. महात्माजींना शाळासंचालनाचा अनुभव पूर्वी नव्हता. शिक्षक म्हणून त्यांनी कधी कामही केलेले नव्हते. तथापि प्राप्त परिस्थितीमध्ये स्वतःच्या निश्चय-शक्तीच्या जोरावर त्यांनी अध्यापनाचे कार्य प्रभावीपणे पार पाडले. हाच त्यांचा पहिला शैक्षणिक प्रयोग होय.

### टॉलस्टॉय फार्म

सन १९११ साली ट्रान्सव्हाल राज्यामध्ये सत्याग्रह करण्यासाठी जमलेल्या लोकांची वसाहत ट्रान्सव्हालनजीक स्थापन करण्यात आली. त्या वसाहतीला टॉलस्टॉय फार्म असे नाव देण्यात आले. महात्माजींच्या मते पिता हाच खरा शिक्षक असल्यामुळे व तेथील सर्व लोक महात्माजींना पितृतुल्य मानीत असल्यामुळे तेथील सर्व कार्यक्रमांची महात्माजींच्यावरच जबाबदारी येऊन पडली. या वसाहती-मध्ये हिंदू, मुसलमान, खिश्चन, पार्शी इत्यादी सर्व धर्मांचे लोक होते. विश्वभारती-प्रमाणे तेथील वातावरण कौटुंबिक स्वरूपाचे होते. हरमन कॅलेनबाच हे जर्मन प्राध्यापक या वेळी त्यांच्या मदतीस होते. टॉलस्टॉय फार्म ही एक स्वावलंबी व स्वयंपूर्ण वसाहत बनविण्याचा महात्माजींनी प्रयोग केला. त्या ठिकाणी त्यांना आपले शैक्षणिक प्रयोग करण्यासाठी आदर्श अशी प्रयोगशाळाच मिळाली. कारण त्यांच्या वसाहतीत राहणारी मुले निरनिराळ्या धर्मांची व निरनिराळ्या संस्कृतींत वाढलेली होती. वसाहतीतील जीवन मुद्दामच साधे ठेवण्यात आले होते. कारण

तेथील जीवनासाठी लागणारे आर्थिक साह्य तेथील लोकांना स्वतःच्या श्रमातूनच निर्माण करावे लागे. सर्व कामे वसाहतीत राहणारे लोकच करीत असत. स्वयं-पाकापासून तो संडाससफाईपर्यंतची सर्व बारीकसारीक कामे सर्वांनाच आळीपाळीने करावी लागत असत. शिक्षणक्रमामध्ये शेती, सुतारकाम, चर्मकाम इत्यादी व्यवसायांचा समावेश होता. शिक्षकांनाही विद्यार्थ्यांच्या बरोबरीने काम करावे लागे. औद्योगिक शिक्षणाबरोबरच वाङ्मयीन शिक्षणाकडेही महात्माजी विशेष लक्ष देत असत. हिंदी, उर्दू, तामीळ, गुजराथी, इंग्रजी या भाषा शिकविल्या जात असत. इतर विषयांमध्ये इतिहास, भूगोल व गणित यांचा समावेश असे. हे विषय शिकविण्याचे माध्यम गुजराथी किंवा मातृभाषा असे. भाषा शिकविण्याचे काम महात्माजींनी स्वतःकडे घेतले होते. यासाठी किंवा इतर विषयांसाठीसुद्धा पाठ्य-पुस्तकांचा उपयोग केला जात नसे. भाषा किंवा इतर विषय शिकविण्यासाठी पाठ्य-पुस्तकांची जरुरी नाही असे त्यांचे मत होते. निरनिराळ्या विषयांचा गोशवारा शिक्षक विद्यार्थ्यांना तोंडी सांगत असत. वाचण्यापेक्षा ऐकण्याचे काम अधिक आनंददायी व परिणामकारक असते असे महात्माजींचे मत होते. कथन केलेल्या भागावर अधूनमधून प्रश्नही विचारले जात असत. भाषेच्या बाबतीत महात्माजींचे असे मत होते की, मातृभाषा विद्यार्थ्यांना चांगली अवगत झाल्यास इतर भाषा शिकणे त्यांना फारसे अवघड होणार नाही. एका भाषेच्या अध्ययनात संपादन केलेले कौशल्य इतर भाषा-अध्ययनामध्ये संक्रमित होऊ शकते असे त्यांचे मत होते. शिक्षणपद्धतीतील Transfer of Training महात्माजींना मान्य होते असे दिसते. शिक्षणाने विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक विकास झाला पाहिजे, त्याचप्रमाणे शिक्षणाने विद्यार्थ्यांचे चारित्र्य संपन्न झाले पाहिजे असे त्यांचे गृहीत तत्त्व होते. आध्यात्मिक उन्नतीसाठी प्रत्येकाला स्वतःच्या धर्माची ओळख असणे आवश्यक होते. शारीरिक शिक्षण स्वतंत्रपणे शिकविण्याची जरुरी नाही. कारण निरनिराळे उद्योग करीत असताना विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास होणे शक्य आहे असे त्यांना वाटे. ट्रान्सव्हाल येथील महात्माजींची चळवळ तेथील सरकारशी समेट झाल्यानंतर थांबविण्यात आली व त्यामुळे टॉलस्टॉय फार्मचेही कार्य संपुष्टात आले.

### अहमदाबाद आश्रम

भारतात आल्यानंतर देशसेवेसाठी स्वयंसेवक निर्माण करण्याच्या हेतूने २५ मे १९१५ रोजी महात्माजींनी अहमदाबादच्या नजीक एक आश्रम स्थापन केला. आश्रमाचा दुसरा हेतू देशसेवेबरोबरच सत्याचा शोध करणे हाही होता. आश्रम-वासीयांसाठी महात्माजींनी अनेक नियम तयार केले होते. त्यांमध्ये सत्य, अहिंसा, प्रेम, असंग्रह, शरीरश्रम इत्यादी गोष्टींचा समावेश होता. याच नियमांची पुढे

एकादश व्रते बनविण्यात आली. प्रत्येक सत्याग्रहीने एकादश व्रतांचे परिपालन करावे असे त्यांच्यावर बंधन असे. साधी रहाणी, उत्पादक उद्योग, श्रमप्रतिष्ठा, समता, चारित्र्य या गोष्टींवर आश्रमामध्ये विशेष भर देण्यात आला होता. दैनंदिन कार्यक्रमामध्ये प्रार्थना, सफाई, कताई, शेती, गोपालन इत्यादी गोष्टींचा समावेश होता. भारताच्या खेड्यांची दुःस्थिती सुधारण्यासाठी सामुदायिक सफाईची अत्यंत आवश्यकता आहे हे त्यांच्या सखोल निरीक्षणावरून त्यांना पटले होते. भारतामध्ये अज्ञान, दारिद्र्य व अनारोग्य या तीन गोष्टी प्रामुख्याने त्यांनी पाहिल्या. अज्ञान दूर करण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण, दारिद्र्याचे उच्चाटन करण्यासाठी ग्रामोद्योग व अनारोग्य नाहीसे करण्यासाठी सामुदायिक सफाई हे उपाय त्यांनी सुचविले. या आश्रमामध्ये प्रथम तेरा तामीळ व बारा इतर भाषिक मिळून २५ स्वयंसेवक होते. सूतकताई, ग्रामोद्योग यांच्या शिक्षणावर विशेष भर देण्यात आला होता. भारतामध्ये भावनात्मक एकता कशी निर्माण करता येईल याचे महात्माजी चिंतन करीत असत. सर्वप्रथम हिंदु समाजातील अस्पृश्यता दूर केली पाहिजे असे त्यांनी ठरविले. यासाठी आश्रमातील प्रवेशाबाबत अस्पृश्यांना अग्रक्रम देण्यात आला. समाज-शिक्षणाचे कार्यक्रमही अंगीकारण्यात आले. स्त्रियांची आर्थिक व सामाजिक गुलामगिरीतून मुक्तता करण्याचे त्यांनी प्रयत्न केले. मातृभाषेबरोबर इतर भाषा शिकविण्यासाठी Direct Method चा प्रयोग महात्माजींनी या वेळी सुरू केला. या आश्रमातून महात्माजींनी देशसेवेसाठी वाहून घेणारे अनेक तरुण स्त्रीपुरुष तयार केले.

### साबरमती आश्रम

अहमदाबादच्या जवळपास प्लेगचा प्रादुर्भाव झाल्याकारणाने महात्माजींना तेथील आश्रम दुसरीकडे हलविणे भागच होते. आश्रमाची जागा प्रमुख शहरापासून दूर असावी असे त्यांनी ठरविले. योग्य जागा साबरमती स्टेशनाजवळ थोड्याच दिवसांत मिळाली. या आश्रमात प्रथम पन्नास लोक सामील झाले होते. येथील सामुदायिक जीवन पूर्वीप्रमाणेच स्वावलंबन, उद्योग, स्वार्थत्याग, सेवा या तत्त्वांवर आधारलेले होते. आश्रमी लोकांना प्रथम अत्यंत कष्टाची कामे करावी लागली. जमीन साफ करणे, झाडे-झुडपे तोडणे, झोपड्या बांधणे, शेतीची इत्यादी सर्व कामे स्वावलंबनानेच होत. या आश्रमामध्ये वस्त्राच्या व अन्नाच्या बाबतीत स्वयंपूर्णता आणण्याचे प्रयत्न आश्रमवासी करू लागले.

### चंपारण्याश्रम

बिहार प्रांतातील चंपारण्य येथे निळीचा फार मोठा उद्योग चालत असे. निळीचे मळेवाले इंग्रज लोक, कामगारांना अत्यंत कमी वेतन देऊन त्यांचे शोषण

करीत असत. कामगारांनी थोडासाही असंतोष दाखविल्यास त्यांची निर्घृणपणे हत्या केली जात असे. या अन्यायाकडे महात्माजींचे जेव्हा लक्ष वेधण्यात आले तेव्हा त्यांनी प्रतिकाराची मोहीम उघडली. या मोहिमेमध्ये डॉ. राजेंद्रप्रसाद हे त्यांचे सहकारी होते. शेतकऱ्यांची व कामगारांची निकृष्ट परिस्थिती सुधारण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण देण्याची त्यांना जरुरी भासली. प्रथम त्यांनी जवळपासच्या सहा खेड्यांत सहा शाळा चालविण्यासाठी योग्य शिक्षक मिळावे म्हणून वर्तमानपत्रातून आवाहन केले; त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. अनेक स्वयंसेवक-शिक्षक त्यांच्याबरोबर काम करण्यास तयार झाले. त्यांमध्ये अनेक स्त्रिया होत्या. प्रत्येक ठिकाणी एक पुरुष-शिक्षक व एक स्त्री-शिक्षक देण्यात आले. ग्रामसुधारणेची प्रथम सहा केंद्रे होती. त्यांची संख्या लवकरच वाढली. पण कार्यकर्त्यांची उणीव महात्माजींना कधीच भासली नाही. खेड्यांतील लोकांचे आरोग्य सुधारणासाठी भारत सेवक समाजाने काही डॉक्टर्स पुरविले. शालेय शिक्षणाचे व समाज-शिक्षणाचे काम धुमधडाक्याने सुरू झाले. अशा प्रकारच्या शिक्षणामध्ये लेखन, वाचन, गणित यासारख्या पारंपरिक शिक्षणावर फारसा भर देण्यात आला नव्हता. मात्र वैयक्तिक व सामुदायिक स्वच्छता, वागणुकीचे नीतिनियम, चारित्र्य-संवर्धन, नागरिकशास्त्र यांसारख्या समाजोपयोगी विषयांकडे विशेष लक्ष देण्यात आले होते. पुढे नीळ-कामगारांचे म्हणणे सरकारने व मळेवाल्यांनी मान्य केल्यानंतर तेथील सत्याग्रह थांबविण्यात आला व आश्रम चालविण्याची जरुरी संपली. यानंतर महात्माजींनी आपला आश्रम वर्ध्यापासून ११ मैलांवर सेवाग्राम येथे उघडला. या आश्रमातून त्यांनी राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक कार्यक्रम सुरू केले. सर्व कार्यक्रमांचा हेतू देशाची सर्वांगीण उन्नती व्हावी हाच होता. याच आश्रमातून त्यांनी वर्धा-शिक्षण-योजना प्रतिपादन केली. महात्माजी स्वतःच म्हणत की, देशाला दिलेल्या अनेक देणग्यांपैकी वर्धा-शिक्षण-योजना ही सर्वांत महत्त्वाची व अमोल देणगी होय.

महात्माजींनी केलेल्या शैक्षणिक प्रयोगाचे परिशीलन केल्यास आपणांस असे दिसून येईल की, सत्य, अहिंसा व प्रेम यांसारखी शाश्वत मूल्ये त्यांनी प्रत्यक्ष जीवनामध्ये कशी आणता येतील हेच सप्रयोग दाखविले आहे. प्राप्त परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी स्वावलंबन, उद्योग, सेवा, साधेपणा, स्वार्थत्याग, समता, चारित्र्य-संवर्धन इत्यादी तत्त्वे वरील मूल्यांच्या अनुषंगाने त्यांना उपयोगी पडली. वर्धा-शिक्षण-योजना हे त्यांनी आयुष्यातील चाळीस वर्षे निरनिराळ्या परिस्थितींत केलेल्या शैक्षणिक प्रयोगांचे सुमधुर फल होय. त्याचाच विचार आपणांस आता करावयाचा आहे.

## वर्धा-शिक्षणयोजना

महात्माजी आफ्रिकेतून भारतात आल्यापासून भारताचे नेतृत्व करण्याची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली. त्यांचे विचार मूलग्राही असून त्यांना परकीय सत्तेशी झगडा देण्याचा अनुभव होता. उदारमतवादी लोकांच्या अर्जविनवण्या पद्धतीला लोक कंटाळले होते. क्रांतिकारकांच्या हिंसात्मक कृत्यानेही स्वातंत्र्य मिळविता येईल, यावर बहुसंख्य जनतेचा विश्वास नव्हता. स्वातंत्र्यासाठी झगडणारी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हीच एकमेव बलिष्ठ संस्था सन १८८५ पासून अव्याहतपणे काम करीत होती. तिचे नेतृत्व गांधीजींनी स्वीकारल्यानंतर स्वराज्यासाठी त्यांनी चतुःसूत्री प्रतिपादन केली. त्यामध्ये असहकार, स्वदेशी याबरोबरच राष्ट्रीय शिक्षणाचाही समावेश करण्यात आला होता. भारतीयांची दुःखे दूर करण्यासाठी शिक्षण हे एक प्रभावी साधन आहे असे ते मानत असत. सन १८३५ सालापासून मेकॉलेने सुरू केलेल्या परकीय शिक्षणपद्धतीचे विघातक परिणाम त्यांना दिसून येत होते. त्या शिक्षणाचा सर्वांत मोठा दोष म्हणजे ते भारतीयांच्या आशा-आकांक्षांशी निगडित नव्हते. त्यामुळे इंग्रजांचे राज्य दृढमूल करण्यासाठी गुलामगिरी वृत्तीचे, शरीराने केवळ भारतीय पण मनाने व संस्कृतीने परकीय असे कारकून निर्माण केले जात असत. स्वबांधवांशी फटकून वागण्यात त्यांना अभिमान वाटे. स्वतःची संस्कृती, स्वतःचा धर्म, नीतिनियम, परंपरा इत्यादी गोष्टी त्यांना हीन प्रतीच्या वाटत असत. शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असल्याकारणाने विद्यार्थ्यांना खरे ज्ञान प्राप्त न होता त्यांच्या बहुमोल आयुष्याचा अपव्यय होत असे. शिक्षण केवळ पुस्तकी असल्यामुळे विद्यार्थ्यांची सर्वांगीण उन्नती साधली जात नसे. चारित्र्य व शीलसंवर्धनाशी या शिक्षणाचे फारसे सोयरसुतक नव्हते. अध्यापनपद्धती, परीक्षापद्धती, अभ्यासक्रम इत्यादी अनेक शैक्षणिक बाबतींत या पद्धतीत इतके दोष होते की, ती शक्य तितक्या लवकर बदलल्याशिवाय भारताचे कोणत्याही क्षेत्रात भले होणार नाही असे महात्माजींचे ठाम मत बनले.

त्यांच्या आफ्रिकेतील शैक्षणिक प्रयोगांच्या अनुभवातून त्यांची काही शिक्षणविषयक ठाम मते बनलेली होती. त्यांचाच पाठपुरावा त्यांनी सन १९३३ पासून आपल्या ‘ हरिजन ’ साप्ताहिकातून सुरू केला. शिक्षणाचा सर्वांगीण विचार करण्यासाठी २२ व २३ आक्टोबर १९३७ रोजी वर्धा येथे एक परिषद बोलावण्यात आली. त्या वेळी भारताच्या सात प्रांतांमधून काँग्रेसची मंत्रिमंडळे अधिकारारूढ होती. या प्रांतातील सात मंत्री परिषदेला हजर होते. याशिवाय भारतातील विद्वान शिक्षणतज्ज्ञांनाही परिषदेतर्फे आमंत्रणे देण्यात आली होती. परिषदेमध्ये एक चारकलमी ठराव पास करण्यात आला. तोच वर्धा-शिक्षण-योजनेचा उगम होय. ती कलमे अशी—

१. सात ते चौदा वर्षे वयापर्यंतच्या मुलांमुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे, सार्वत्रिक व मोफत असावे.

२. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावी.

३. शिक्षण कोणत्यातरी एका उत्पादक उद्योगाच्या द्वारा देण्यात यावे.

४. शिक्षण स्वाश्रयी असावे; म्हणजेच निवडलेल्या उत्पादक उद्योगातून निर्माण होणाऱ्या उत्पादनातून शिक्षकांच्या पगाराचा प्रश्न सुटावा.

परिषदेने अभ्यासक्रम तयार करण्यासाठी डॉ. झकीर हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. तिने सात वर्षांचा सविस्तर अभ्यासक्रम तयार केला व तो हरिपुरा येथे कॉंग्रेसला सादर करण्यात आला. कॉंग्रेसने त्याला मान्यता दिल्यानंतर हिंदुस्थानी तालिमीसंघाची स्थापना वर्धा येथे करण्यात आली. संघाकडे वर्धा-शिक्षणयोजनेचा सर्वंकष अभ्यास करण्याचे काम सोपविण्यात आले. त्यासाठी संघाने ही योजना प्रत्यक्ष कार्यान्वित करून उपयुक्त सूचना करावयाच्या होत्या. कॉंग्रेस-मंत्रिमंडळे असणाऱ्या सात प्रांतांमध्ये या शिक्षणयोजनेची अंमलबजावणी सुरू झाली. परंतु लवकरच दुसरे महायुद्ध सुरू झाल्याकारणाने कॉंग्रेस-मंत्रिमंडळांनी राजिनामे दिले. त्यामुळे वर्धाशिक्षणयोजनेच्या अम्मलबजावणीमध्ये काहीसा खंड पडला. सन १९३८ मध्ये मध्यवर्ती सरकारच्या आदेशानुसार खेर-समितीने वर्धा-शिक्षणयोजनेचे व प्रत्यक्ष कार्यवाहीचे मूल्यमापन करून काही सूचना केल्या होत्या. सन १९४४ साली शिक्षणाच्या पुनरवलोकनासाठी नेमलेल्या सार्जेंट-कमिशनने वर्धा-शिक्षणयोजनेला मान्यता दिली. १९३९ मध्ये व १९४५ मध्ये अनुक्रमे, पुणे व वर्धा येथे या योजनेमध्ये सुधारणा सुचविण्यासाठी परिषदा घेण्यात आल्या. योजनेच्या कार्यवाहीसाठी शिक्षकांना जरूर ते प्रशिक्षण देण्याकरिता अध्यापक-विद्यालयांचे रूपांतर मूलोद्योगी प्रशिक्षण संस्थांमध्ये करण्यात आले. पदवीधर शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी निरनिराळ्या मातृभाषांतून पदव्युत्तर अध्यापक-महाविद्यालये स्थापन झाली. सन १८५५ मध्ये "National Council of Basic Education" या नावाची मध्यवर्ती संस्था स्थापन झाली. अशा रीतीने वर्धा-योजनेला सर्व बाजूने चालना देण्याचा प्रयत्न झाला. सामान्य प्राथमिक शाळांचे रूपांतर मूलोद्योगी प्राथमिक शाळांत करण्याचे प्रयत्न सुरू झाले. तथापि त्यांची गती फारच मंद असल्याकारणाने तीन प्रकारच्या प्राथमिक शाळा दिसू लागल्या— (१) साध्या प्राथमिक शाळा, (२) मूलोद्योग व शिक्षण देणाऱ्या प्राथमिक शाळा व (३) मूलोद्योगातून शिक्षण देणाऱ्या प्राथमिक शाळा. सफाई, प्रार्थना, परिपाठ, स्वयंशासन यांसारख्या काही वैशिष्ट्यांचा अवलंब मात्र सर्व प्राथमिक शाळांनी लवकरच केला. महाराष्ट्रामध्ये मूलोद्योगी शाळांत रूपांतर झालेल्या प्राथमिक

शाळांची संख्या केवळ दहा टक्केच झाली. मध्यंतरीच्या काळामध्ये वर्धा-शिक्षण-योजनेवर निरनिराळे संस्कार होऊन मूळ योजनेत काही बदल झाले. महात्माजींनी आपल्या योजनेला ' मूलोद्योगी राष्ट्रीय ग्रामशिक्षण ' असे नाव दिले होते. परंतु निरनिराळ्या वेळी याच योजनेला पुढील निरनिराळी नामाभिधाने मिळाली. जसे, वर्धा-शिक्षण-योजना, नयी तालीम, जीवन-शिक्षणपद्धती, बुनयादी तालीम, बेसिक एज्युकेशन. विख्यात तत्त्वचिंतक आचार्य भागवत यांनी दिलेले जीवन-शिक्षण हे नाव महाराष्ट्रामध्ये सर्वत्र रूढ झालेले दिसून येते.

## योजनेची वैशिष्ट्ये

या योजनेनुसार प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्यात आले. शिक्षण सार्वत्रिक करावे या दृष्टीने ना. गोखल्यांसारखे पुढारी अनेक वर्षे प्रयत्न करीत होते. शिक्षण ही कोणत्याही एका वर्गाची मक्तेदारी न ठेवता धर्म, जात, पंथ, लिंग यांसारखे कोणतेही भेदभाव न करता, सर्वांना ते देण्याचे कर्तव्य शासनाने स्वीकारले. शिक्षण सार्वत्रिक करण्याबरोबरच मोफत करणे आवश्यक होते. भारतीय जनता आर्थिक दृष्ट्या मागास असल्याकारणाने अनेक लोकांना आपल्या मुलां-मुलींना शिक्षण देणे परवडणारे नव्हते. अर्थात् मोफत याचा अर्थ निःशुल्क एवढाच घेतला पाहिजे. शिक्षणासाठी पाठ्यपुस्तके, गणवेश, लेखन-साहित्य यांवर होणारा खर्च पालकांनाच सोसावा लागणार होता. भारतातील जनता पुष्कळशी अज्ञानी असल्याकारणाने व शिक्षणाचे महत्त्व सर्वांनाच योग्य प्रकारे कळत नसल्याकारणाने शिक्षण सक्तीचे करण्यात आले. याचा अर्थ असा की, आपल्या मुलांमुलींना शिक्षण देणे ही बाब पालकांच्या मर्जीवर अवलंबून नसून ती आवश्यक मानली गेली. त्यासाठी जरूर तो कायदा करण्यात आला. मुलांना शिक्षण न देणारे पालक या कायद्याखाली गुन्ह्यास पात्र होऊ लागले. या योजनेमुळे भारतातील प्रत्येक बालकाला सात वर्षांचे शिक्षण आवश्यक मानण्यात आले. नामदार गोखले केवळ चार वर्षांच्याच शिक्षणाची मागणी करीत होते. परंतु जागतिक ज्ञानाच्या वाढीबरोबर व ज्ञानविज्ञानाच्या प्रगतीमुळे किमान शिक्षणाची मर्यादा वाढविणे आवश्यक वाटले. सात वर्षांचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्याला महात्माजींच्या मते मॅट्रिक उणे इंग्रजी इतके शिक्षण मिळणे आवश्यक होते. ज्ञान-विज्ञानातील प्रगतीबरोबर ही किमान मर्यादा सतत वाढविणे आवश्यक आहे. सन १९६६ सालच्या भारतीय शिक्षण महामंडळाने किमान शिक्षणाची मर्यादा ११ वर्षांची केली आहे, हे सर्व-श्रुतच आहे. आजचे विद्यार्थी हे उद्याचे जबाबदार नागरिक आहेत. या दृष्टीने विचार करता सात वर्षांची किमान शिक्षणयोजना अत्यंत आवश्यक होती असेच म्हणावे लागेल. काहींच्या मते शिक्षणाची सुरुवात सातव्या वर्षी न करता सहाव्या

वर्षी करावयास पाहिजे. परंतु विशिष्ट भारतीय परिस्थिती लक्षात घेता सात हीच वयोमर्यादा योग्य होती असे म्हणावे लागेल. शिवाय सहाव्या वर्षी शिक्षणास सुरुवात केली असता शिक्षणाचा व्याप अधिकच वाढला असता. ज्या सुशिक्षित घराण्यातील मुलांना शिक्षणाचे अनुकूल वातावरण सुदैवाने मिळते, त्यांच्यासाठी शालाप्रवेशाची वयोमर्यादा पाचपर्यंतही आणण्यात आली आहे.

वर्धा-योजनेचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे मातृभाषेतून शिक्षण देणे हे होय. परकीय भाषेतून शिक्षण देणे म्हणजे लहान मुलांवर एकप्रकारे अन्याय करणेच होय. त्यामुळे दोन प्रकारच्या अडचणी एकाच वेळी आपण विद्यार्थ्यांसमोर ठेवीत असतो. पहिली म्हणजे परकीय भाषेची अडचण व दुसरी म्हणजे नवीन ज्ञानाची अडचण. मातेइतकीच मातृभाषेची जवळीक विद्यार्थ्यांना वाटत असल्यामुळे तिच्या माध्यमातून दिलेले शिक्षण सुलभ व अधिक परिणामकारक होते. वर्धा-योजनेचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य किंबहुना या योजनेचा प्राण म्हणजे उत्पादक उद्योगांच्याद्वारा शिक्षण देणे हा होय. जॉन ड्यूयी, मॅाँटेसोरी, फ्रोबेल या पाश्चिमात्य तत्त्वज्ञान्यांच्या मताप्रमाणेच शिक्षण हे केवळ पुस्तकी न ठेवता ते कृतिद्वारा द्यावे असे महात्माजींचेही ठाम मत होते. त्यांनी केलेल्या निरनिराळ्या शैक्षणिक प्रयोगांत कृतीला व उद्योगांना महत्त्व देण्यात आले होते. कृतिद्वारा शिक्षणाशिवाय व्यक्तीचा सर्वांगीण विकास–शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक होऊ शकत नाही अशी त्यांची धारणा होती. वर सांगितल्याप्रमाणे अनेक शिक्षणतज्ज्ञांनी कृतिकेंद्रित शिक्षणाचा पाठपुरावा केला होता. परंतु कित्येकांनी शिक्षणामध्ये कृतींची किंवा उद्योगांची भर घातली होती, तर कित्येकांनी ज्ञानेंद्रिय-शिक्षणाकरिता कृतीचे महत्त्व वर्णन केले होते. अमेरिकेतील प्रॉजेक्ट मेथड-मध्ये कृतिद्वारा शिक्षण देण्याचा आग्रह होता, पण त्यातून काही उत्पादनाची अपेक्षा धरलेली नव्हती. महात्माजींनी मात्र आपल्या पद्धतीमध्ये उत्पादनाला महत्त्व दिले होते. त्यामुळे उद्योगाच्या सर्व क्रियांमध्ये एकप्रकारचा काटेकोरपणा येईल असे त्यांना वाटत होते. ज्ञान व कृती यांचा अतूट संबंध महात्माजींना मान्य होता. कोणतेही ज्ञान मिळविण्यासाठी उद्योग किंवा कृती केली पाहिजे असे त्यांचे मत होते. उद्योग व कृती यांच्या या संबंधाला आचार्य विनोबा भावे यांनी समवायसंबंध असे नाव दिले आहे. संस्कृत तर्कभाषेमध्ये समवाय-संबंधाची व्याख्या ' अयुतसिद्धसंबंधः समवायः ' अशी केली आहे. ज्या दोन गोष्टींचा संबंध नैसर्गिक व अत्यंत घनिष्ठ असतो, त्यास समवायसंबंध असे म्हणतात. कार्यकारणसंबंधाप्रमाणेच समवाय हा सुद्धा संबंधसूचक शब्द आहे. शिक्षणाच्या बाबतीत बोलावयाचे तर ज्ञान आणि कृती किंवा उद्योग यांचा संबंध घनिष्ठ अतएव समवायसंबंध होय. घटापासून ज्याप्रमाणे मृत्तिका अलग काढता येत

नाही, त्याचप्रमाणे कृतीतून ज्ञान किंवा ज्ञानातून कृती ही अलग करता येणे शक्य नाही. ज्ञान मिळविण्याची नैसर्गिक पद्धती म्हणजे कृती किंवा उद्योग हीच होय. मध्यंतरीच्या काळामध्ये पुस्तकी व चुकीच्या पद्धतीने शिक्षण दिले जात असे. कृतिकेंद्रित शिक्षणाने मिळणारे ज्ञान जरूर तेव्हा व जरूर तेवढे मिळत असल्या-कारणाने ते जीवनाशी एकजीव होते. त्याचे ओझे विद्यार्थ्यांना वाटू शकत नाही. त्यामुळे समवाय पद्धतीने करावयाच्या अध्यापन-पद्धतीवर विशेष भर देण्यात आला. कृतीसाठी मूलोद्योग हे एवढेच प्रथम केंद्र मानण्यात येत असे. त्यामध्ये समाज व निसर्ग या केंद्रांची भर घालण्यात आली. कृती करीत असता ज्या ज्ञानाची नैसर्गिकरीत्या आवश्यकता भासेल ते ज्ञान देण्याची पद्धती ठरली. इतिहास, भूगोल, शास्त्र इत्यादी विषयवार ज्ञानाचे विभाजन टाळण्याचा प्रयत्न होऊ लागला व सर्व ज्ञान हें एकसंघ व सलग आहे याची जाणीव शिक्षकांना होऊ लागली. परंतु समवायसंबंध-पद्धतीने शिकविणे ही अत्यंत अवघड गोष्ट आहे. त्यासाठी शिक्षकांची मोठी तयारी होणे आवश्यक आहे. शिवाय समवायसंबंध कसा जोडावयाचा याचेही संपूर्ण ज्ञान सामान्य शिक्षकांना नसल्याकारणाने कित्येक अनैसर्गिक व हास्यास्पद संबंध जोडण्याचे प्रयत्न शाळा व अध्यापक विद्यालयांतून दिसू लागले. त्यामुळे सामान्य शिक्षकांची कुवत नवीन शिक्षणपद्धती पेलण्याइतपत नाही हें प्रत्ययास आले. या योजनेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिचा स्वाश्रयीपणा. शिक्षण हे स्वावलंबी असावे, भारतातील प्रत्येक व्यक्तीने शिक्षणकालांतसुद्धा काहीतरी उत्पादन करावे यावर महात्माजींचा कटाक्ष होता. स्वाश्रयीपणा हा योजनेचा महत्त्वाचा निकष आहे ( Acid Test ) असे ते मानीत. भारताच्या आर्थिक परिस्थितीच्या दृष्टीने ते योग्य होते. शिक्षण सार्वत्रिक केल्यास राज्यांच्या तुटपुंज्या तिजोऱ्यांना ते पेलणारे नव्हते. शिक्षण तर सार्वत्रिक व सक्तीचे करणे आवश्यकच होते. यावर उत्तम उपाय म्हणजे ते उत्पादक करणे हाच होय. मूलोद्योगाच्या निवडीचे जे निकष ठरविण्यात आले होते, त्यांमध्ये उत्पादनक्षमता हा निकष महत्त्वाचा मानला जाई. इतर दोन निकषांमध्ये सभोवतालच्या परिस्थितीशी निगडित असणे व तो शिक्षणक्षम असणे यांचा समावेश होता. शिक्षण स्वाश्रयी करण्याच्या या कल्पनेस भारतातील अनेक शिक्षणतज्ज्ञांनी कसून विरोध केला. त्यामुळे शिक्षण म्हणजे मुलांची पिळवणूक होईल असे त्यांचे मत होते. शिक्षकलोक आपला पगार भागविण्यासाठी विद्यार्थ्यांना कामाच्या ओझ्या-खाली दडपून टाकतील असेही कित्येकांचे मत होते. शिवाय प्रयोगासाठी केलेले उत्पादन फारसे आकर्षक व उत्तम प्रतीचे असू शकणार नाही असे त्यांना वाटे. या टीकेमध्ये पुष्कळच तथ्य होते. त्यामुळे हे तत्त्व पुढे वर्धा-शिक्षण-योजनेतून गाळण्यात आले.

महात्माजींनी प्रतिपादिलेली वर्धा-शिक्षण-योजना किंवा जीवन-शिक्षण-पद्धती आधुनिक शैक्षणिक तत्त्वांवर आधारलेली होती. ते स्वतः शिक्षणशास्त्रज्ञ म्हणून फारसे प्रसिद्ध नसले तरी त्यांचा भारतीय जीवनाचा अभ्यास अत्यंत सखोल होता आणि शिक्षण म्हणजे जीवनाचा अविभाज्य भाग आहे हे तत्त्व त्यांना पुरेपूर पटलेले होते. त्यांनी आदर्श जीवन जगण्यासाठी जीवनाच्या अंगोपांगांमध्ये विविध यशस्वी प्रयोग केले होते. त्यांच्या जीवन-शिक्षण-पद्धतीला मानसशास्त्रीय, सामाजिक व आर्थिक तत्त्वांचा आधार होता.

## मानसशास्त्रीय पाया

अध्ययन-अध्यापनामध्ये विषयांबरोबरच विद्यार्थ्यांनाही महत्त्वाचे स्थान असते. किंबहुना ज्याला शिकवावयाचे ती व्यक्ती म्हणजे त्याचे शरीर व मन यांचा विशेष अभ्यास करणे अगत्याचे असते. शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या शारीरिक कुवती-बरोबरच त्यांच्या मानसिक प्रवृत्तींच्या अनुषंगाने देणे इष्ट असते. विद्यार्थ्यांची बाल-वयातील वागणूक प्रावृत्तिक म्हणजेच नैसर्गिक प्रवृत्तींना धरून असते. त्यांच्या साह्याने अध्यापन केल्यास शिक्षणाची नौका प्रवाहाबरोबर हाकारण्याप्रमाणे शिक्षण सुलभ होते. सहजप्रवृत्तींमध्ये बालवयात नवनिर्मिति-प्रवृत्तीचा विशेष प्रादुर्भाव दिसून येतो. विद्यार्थ्यांना नेहमी काहीतरी कृती करावीशी वाटते. कृती करणे हा त्यांचा स्वभावधर्मच होय. कृती न करणारे मूल एक आजारी तरी असू शकेल किंवा मानसिक दृष्ट्या विकृती झालेले असू शकेल. वर्धा-शिक्षणयोजनेमध्ये शिक्षण हे कृतिकेंद्रित असल्यामुळे मानसशास्त्रीय तत्त्वाशी अधिक सुसंगत आहे. कृती किंवा उद्योगामुळे विद्यार्थ्यांना आपली ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये यांचा वापर करावा लागतो. त्यामुळे त्यांचा योग्य तो विकास होण्यास मदत होते. शिवाय पुस्तकी शिक्षणामध्ये ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये यांचा समन्वय साधता येत नाही. तो समन्वय कृतिकेंद्रित शिक्षणाने योग्य प्रमाणात साधता येतो. विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा-प्रवृत्ती अधिक प्रखर असते. जिज्ञासा-प्रवृत्तीला योग्य वळण लावण्यास किंवा तिचे उदात्तीकरण करण्यास उद्योगाशिवाय दुसरे साधन नाही. कृतीतून मिळणारे ज्ञान विद्यार्थी स्वप्रयत्नाने जरूर तेव्हा व जरूर त्या वेळी मिळवीत असतात. त्यामुळे त्यांना ज्ञानप्राप्तीचा आनंद उपभोगता येतो. शिक्षणामध्ये प्रेरणा ( Motivation ) व निरीक्षण यांना अतिशय महत्त्व दिले गेले आहे. उद्योगकेंद्रित शिक्षणामुळे वरील दोन्ही गोष्टी साध्य होतात. कृतीविषयी जिज्ञासा असल्यामुळे विद्यार्थ्यांना स्वयंप्रेरणा मिळते. अध्ययनाला योग्य ती चालना मिळते. निरनिराळ्या वस्तू, साधने ते स्वतःच हाताळीत असल्याकारणाने त्यांची निरीक्षणशक्ती वाढीला लागते. याशिवाय कितीतरी मानसशास्त्रीय तत्त्वांचा वापर जीवन-शिक्षणपद्धतीमध्ये केल्याचे आपणांस दिसून येईल. शिक्षणाने वर्तनात योग्य तो बदल करण्यासाठी त्यांच्यावर उपयुक्त

संस्कार करावयाचे असतात. संस्कार विविध अनुभवांतून होत असतात. असे पूर्व-नियोजित व उपयुक्त अनुभव विद्यार्थ्यांना देणे म्हणजे शिक्षण होय, असे शिक्षणवेत्ते म्हणतात. वर्धा-शिक्षण-योजनेमुळे विविध कृतींतून वा उद्योगांतून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव देता येतात. प्रत्यक्ष अनुभव हे शिक्षणामध्ये सर्वात महत्त्वाचे होत. पुस्तकी शिक्षणामुळे प्रत्यक्ष अनुभव मिळत नाही. त्यामुळे मिळणारे अनुभव दुय्यम प्रतीचे असतात. यासाठी कृतियुक्त शिक्षणपद्धती श्रेष्ठ मानली आहे. या शिक्षणपद्धतीमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, सौंदर्याभिरुची व जबाबदारीची जाणीव वाढीला लागते. थॉर्नडाइकने शिकण्यासंबंधीचे तीन नियम प्रतिपादिले. पहिल्या नियमान्वये त्याने शिकणाराची शारीरिक व मानसिक तयारी असावी लागते असे प्रतिपादिले आहे. उद्योगामुळे विद्यार्थ्यांना स्वयंप्रेरणा मिळत असल्याकारणाने व सहजप्रवृत्तीचे पोषण होत असल्याकारणाने शिकण्यापूर्वी त्याची मानसिक तयारी सहजगत्या होते. थॉर्नडाइकचा दुसरा नियम समाधानासंबंधीचा आहे. ज्या कृतीमुळे व्यक्तीला समाधान होते त्या कृतीची पुनरावृत्ती केली जाते व ज्या कृतीमुळे असमाधान व दुःख होते ती कृती लोप पावते. या नियमाची परिपूर्ती कृतिकेंद्रित शिक्षणानेच होते. विद्यार्थी निरनिराळ्या कृती करतात, बरेच वेळा चुकीच्या कृतीमुळे इच्छित वस्तू तयार होत नाहीत व त्यामुळे त्याना आनंदप्राप्ती होत नाही. परिणामी चुकीच्या कृती टाळण्याकडे त्यांची स्वाभाविक प्रवृत्ती होते. तिसरा नियम पुनरावृत्तीसंबंधीचा आहे. योग्य ती कृती करीत गेल्याकारणाने विद्यार्थ्यांना आपल्या कार्यात सहजता व सुकरता प्राप्त होते. शिकण्यासंबंधीच्या आणखी काही विचार प्रणालिनी आहेत. त्यांपैकी एक म्हणजे मर्मदृष्टि-पद्धती ( Insight Theory ). दुसरी प्रणाली म्हणजे प्रयत्नप्रमाद पद्धती होय. दोन्ही प्रणालींचा उपयोग कृतिकेंद्रित शिक्षणपद्धतीमध्ये दिसून येतो. पाश्चिमात्य शिक्षणतज्ज्ञांनी शिक्षणाचा सखोल अभ्यास करून काही सर्वमान्य सूत्रे प्रतिपादन केली आहेत. ही सूत्रे म्हणजे अध्ययन व अध्यापनच्या मार्गावरील पथ-दर्शक दीपस्तंभच होत. त्यांपैकी काही सूत्रांचा उपयोग वर्धा-शिक्षण-पद्धतीमध्ये केला असल्याचे दिसून येईल.

## मूर्ताकडून अमूर्ताकडे

वर्धा-शिक्षणयोजनेमध्ये प्रत्यक्ष वस्तू किंवा कृती करावयाची असल्याकारणाने प्रथम अमूर्तापेक्षा मूर्ताशीच संबंध येतो. कृतीच्या द्वारा ज्ञान मिळत असल्याकारणाने या सूत्राचा चांगला उपयोग करून घेतला जातो. वरील सूत्राप्रमाणेच ज्ञातातून अज्ञाताकडे, सुगमाकडून दुर्गमाकडे यांसारख्या शैक्षणिक सूत्रांचा आधार जीवन-शिक्षणपद्धतीत घेण्यात आला आहे. पुस्तकी शिक्षणामुळे ज्ञानाचे

कृत्रिम व अनैसर्गिक विभाजन करण्यात येते. परंतु कृतिकेंद्रित शिक्षणामुळे ज्ञान जरूर तेव्हा, जरूर त्या प्रमाणात व जरूर त्या विषयाचे मिळत असल्याकारणाने ज्ञानाच्या एकतेला बाध येत नाही. ते लादलेले नसल्याकारणाने ते जीवनाशी एकरूप होते व प्रत्यक्ष व्यवहारात उपयोगी पडते. आपल्या विद्यार्थ्यांमध्ये अनेक व्यक्तिभेद आपणांस दिसून येतात. वर्धा-शिक्षणयोजनेत असलेल्या अनेक उद्योग-प्रक्रियांमध्ये व्यक्तीच्या आवडीनुसार व कुवतीनुरूप काम देता येते. क्रीडन-पद्धतीतील स्वातंत्र्य, स्वेच्छा व आनंद या तीन शैक्षणिक तत्त्वांचा वापर महात्माजींच्या जीवन-शिक्षणपद्धतीमध्ये आपणांस दिसून येतो. मॉंटेसोरी, फ्रोबेल, जॉन ड्यूयी या शिक्षणशास्त्रज्ञांनी कृतिकेंद्रित शिक्षणाला महत्त्वाचे स्थान दिले आहे. परंतु महात्माजींची उद्योगद्वारा शिक्षण देण्याची पद्धती वरील शिक्षण-शास्त्रज्ञांच्या पद्धतीपेक्षा थोडी भिन्न आहे. त्यांच्या पद्धतीमध्ये उत्पादनाला किंवा उत्पादक उद्योगांना अधिक महत्त्व दिलेले असल्याकारणाने ही पद्धती अधिक विकसित व पुरोगामी वाटते. कोठारी शिक्षण महामंडळाने शिक्षणामधील कृतीचे महत्त्व जाणून कार्यानुभवाची योजना केली आहे. प्रगत राष्ट्रांतील शिक्षणपद्धती-मध्येही तात्त्विक शिक्षणाबरोबरच प्रात्यक्षिक शिक्षणाला म्हणजेच कार्यानुभवाला विशेष महत्त्व दिलेले असते. शिक्षणाचे ध्येय व्यक्तीचा शारीरिक, मानसिक व आत्मिक विकास करणे हे निश्चित केल्यावर उद्योगद्वारा शिक्षण देणे हे अत्यंत आवश्यक आहे.

## सामाजिक पाया

पुस्तकी शिक्षणामुळे सुशिक्षित व अशिक्षित असे समाजामध्ये दोन वर्ग उत्पन्न होतात. बुद्धिजीवी वर्ग श्रम करीत नाही व श्रमजीवी वर्ग ज्ञानाचा वापर करीत नाही. वर्धा-शिक्षणयोजनेमध्ये शिक्षण हे उद्योगातून दिले जात असल्यामुळे बुद्धिजीवी व श्रमजीवी असे वर्ग निर्माण होत नाहीत. भावी काळामध्ये उद्योगांना विज्ञानाची व तंत्रज्ञानाची जोड दिल्याशिवाय आर्थिक बाबतीत आपण स्वयंपूर्ण होऊ शकणार नाही. ही एक काळाची गरज आहे असेच म्हटले पाहिजे. उद्योग करीत असताना विद्यार्थ्यांना एकमेकांबरोबर सहकार्य करणे भाग असते. अशा प्रकारे सहकार्याची संधी व प्रसंग वरचेवर आल्याकारणाने विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक सहकार्य, न्याय व बंधुता यांची भावना वाढीला लागू शकेल. भावी काळामध्ये समाजातील प्रत्येक घटकाने काही उत्पादक उद्योग करणे आवश्यक आहे. त्या-शिवाय कोणत्याही समाजाची किंवा राष्ट्राची प्रगती होऊ शकणार नाही. विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच उद्योगद्वारा शिक्षण दिल्याकारणाने श्रमप्रतिष्ठा हा त्यांचा स्थायिभाव बनू शकेल. मूलोद्योगद्वारा शिक्षण देण्याच्या तत्त्वामागे

भारताची भावी पिढी कार्यप्रवण व उद्योगी बनावी हाच महात्माजींचा उच्च हेतू होता. विद्यार्थ्यांना केवळ विणकर, सुतार किंवा शेतकरी बनविणे हा त्यामागील महत्त्वाचा हेतू नव्हता. या उद्योगाच्या अनुषंगाने काहींना आपला व्यवसाय भावी जीवनात चांगला करता आल्यास, किंवा काहींना धंदेशिक्षण मिळाल्यास त्यांच्या मते ते काही गैर होते असे नव्हे. वर्धा-शिक्षणयोजना ही अहिंसा, सत्य व प्रेम यांवर आधारलेली असल्याकारणाने समाजातील कोणत्याही एका वर्गाने दुसऱ्या वर्गाचे शोषण करणे ही क्रिया मंदावणार होती. बुद्धिजीवी वर्गानेही काही उत्पादक श्रम केले पाहिजेत व श्रमजीवी वर्गानेही काही ज्ञानोपासना केली पाहिजे असे गांधीजींचे मत होते. वर्धा-शिक्षण-योजनेचा हेतू निःशब्द, रक्तहीन, सामाजिक क्रांती घडवून आणण्याचा होता. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे एक प्रभावी साधन असल्याकारणाने, वर्धा-शिक्षणयोजनेचे सामाजिक ध्येय सत्य, अहिंसा, प्रेम यांवर अधिष्ठित सहकार्य, समता व सहिष्णुता या तत्त्वांशी निगडित लोकशाहीप्रधान नवसमाज निर्माण करणे हे होते. या दृष्टिकोनातून विचार करता वर्धा-शिक्षणयोजने-मध्ये आधुनिक सामाजिक तत्त्वांचा पुरेपूर उपयोग केल्याचे दिसून येते.

## आर्थिक पाया

महात्माजींना आर्थिक क्षेत्रामध्ये उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण हवे होते. कारण उद्योगधंद्यांचे केंद्रीकरण व यांत्रिकीकरण केल्यास कामधंदा फारच थोडया लोकांना मिळू शकतो व कित्येक लोकांवर बेकारीची पाळी येते. या पद्धतीमध्ये उत्पादनाची साधने काही मूठभर पुंजीपतींच्या हातात असल्यामुळे मजुरांच्या श्रमाचा फायदा मजुरांच्या पदरी न पडता श्रीमंतांनाच मिळतो. महात्माजींना ही आर्थिक व्यवस्था पसंत नव्हती. म्हणून त्यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेची नवीन पद्धती स्वीकारली. या पद्धतीचे स्पष्टीकरण प्रो. जे. सी. कुमारप्पा यांनी केले आहे. शोषणरहित समाज निर्माण करण्यासाठी भारतामध्ये असंख्य लघुउद्योग निर्माण केले पाहिजेत असे त्यांनी प्रतिपादिले होते. महात्माजींनी स्वीकारलेला चरखा हा ग्रामीण लघुउद्योगाचा केंद्र समजला पाहिजे. जे उद्योग करण्यासाठी फारशी मोठी यंत्रसामग्रीची जरुरी नसते व उद्योगास लागणाऱ्या साधनसामग्रीची दुरुस्ती ज्या उद्योगांच्या बाबतीत खेडयातच होऊ शकते असे उद्योग महात्माजींना लोकप्रिय करावयाचे होते. त्यामुळे भारतातील असंख्य जनतेला आपल्या पोटापाण्याचा प्रश्न सोडविता आला असता. असंख्य लोकांना कार्यप्रवण व उद्योगी बनविण्याचे साधन वर्धा-योजनेत असल्या-कारणाने ती भारतामध्ये अपेक्षित अशी नवीन अर्थव्यवस्था निर्माण करू शकेल असे महात्माजींना वाटल्यास नवल नाही. इतर अनेक बाबतींतही वर्धा-शिक्षण-योजना ही शास्त्रशुद्ध पायावर आधारली असल्याचे आपणांस दिसून येईल.

महात्माजी हे धार्मिक प्रवृत्तीचे होते. स्वभाषेप्रमाणेच स्वधर्मही त्यांना प्राणप्रिय होता. त्यांनी आपल्या योजनेमध्ये मातृभाषेला जसे महत्त्व दिले आहे, तसेच धार्मिक शिक्षणालाही दिले आहे. मात्र धार्मिक शिक्षणामुळे परधर्माबद्दलचा अनादर वाढू न देण्याची खबरदारी बाळगली पाहिजे. सर्व धर्मातील तत्त्वे, पुष्कळ अंशी सारखीच असतात. अशा जीवनमूल्यांचा उपयोग दैनिक प्रार्थनेसाठी करावा असा त्यांचा आग्रह होता. प्रार्थना म्हणजे अंतःशुद्धी असे ते म्हणत असत. अंतःशुद्धीशिवाय कोणत्याही कार्यास प्रारंभ करू नये असे त्यांना वाटे.

वर्धा-शिक्षणयोजनेला मानसशास्त्रीय, सामाजिक व आर्थिक अशा भक्कम तत्त्वांचा आधार असला तरी ही शिक्षणपद्धती भारतामध्ये अपेक्षेप्रमाणे का यशस्वी होऊ शकली नाही याचे विवेचन करणे आता महत्त्वाचे आहे. तसे पाहिले तर ही योजना महात्माजींसारख्या अत्यंत लोकप्रिय व राष्ट्राला आदरणीय अशा महापुरुषाने प्रतिपादिलेली होती. देशातील सर्वांत बलाढ्य अशा राजकीय पक्षाने म्हणजेच भारतीय काँग्रेसने तिचा स्वीकार केलेला असल्यामुळे ती यशस्वी होणे स्वाभाविक होते. परंतु इतकी सर्व अनुकूल परिस्थिती असतानाही ही शिक्षणपद्धती संपूर्णपणे यशस्वी होऊ शकली नाही हे उघड सत्य आहे. याला कारणे कोणती असावीत ? भारतातील जनमानसात अनेक शतके दृढमूल झालेली पारंपरिकता व स्थितिप्रियता कारणीभूत असू शकेल का ? यासंबंधी अनेक दृष्टींनी आपणांस विवेचन करता येईल. विवेचन स्थलाभावी संपूर्ण व सर्वंकष करण्याचे टाळून काही महत्त्वाचे मुद्दे खाली दिले आहेत.

वर्धा-शिक्षणयोजनेच्या चार मूल तत्त्वांपैकी सात वर्षांचे शिक्षण सक्तीचे, सार्वत्रिक व मोफत असावे हे तत्त्व सर्वमान्य झाले व त्याची अंमलबजावणीही यशस्वीपणे होत आहे. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावी, या दुसऱ्या तत्त्वाचा स्वीकारही तात्त्विकदृष्ट्या सर्वमान्य झाला आहे. प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावरच काय, परंतु माध्यमिक व विश्वविद्यालयीन स्तरावरही शिक्षणाचे माध्यम मातृभाषाच असावी या दृष्टीने शिक्षणक्षेत्रातील लोक प्रयत्नशील आहेत. प्रश्न आहे तो उरलेल्या दोन तत्त्वांसंबंधीचा. वर्धा-शिक्षण योजनेप्रमाणे, शिक्षण हे उत्पादक उद्योगद्वारा द्यावयाचे होते. त्यालाच समवाय पद्धतीने अध्यापन करणे असे सामान्यपणे म्हटले जाते होते. अर्थात् ही अध्यापनपद्धती सर्वसामान्य शिक्षकांना पेलणारी नव्हती. सर्व शालेय विषयांचे ज्ञान निरनिराळ्या उद्योगांना किंवा कृतींना कृत्रिमरीत्या जोडण्याचा हास्यास्पद प्रयत्न शिक्षकांनी सुरू केला. त्यामुळे कित्येक शिक्षणशास्त्रज्ञांचे याविषयीचे मत प्रतिकूल बनू लागले. आणखी असे की, बहुतेक शाळांतून सूतकताई व विणकाम हाच मूलोद्योग स्वीकारण्यात आला.

मूलोद्योग निवडीसंबंधीचे निकष कित्येक ठिकाणी तो कार्यान्वित करण्याच्या सुकरते-मुळे धुडकावून लावले गेले. मूलोद्योग हे सभोवतालच्या परिस्थितीशी निगडित असले पाहिजेत, असे वर्धा-शिक्षण-योजनेमध्ये प्रतिपादिले असतानाही कोकणासारख्या शेती-प्रधान भागामध्ये सूतकताई व विणकाम हा उद्योग सुरू करण्यात आला. त्यामुळे कच्चा माल मिळविण्यासाठी अनेक अडचणी निर्माण झाल्या. कित्येक ठिकाणी तर वर्धा-शिक्षणयोजना म्हणजे सूतकताई असे सोयिस्कर समीकरण मांडण्यात येऊ लागले. सूतकताई व विणकाम हा मूलोद्योग प्रौढांना व देशभक्तांना कितीही आकर्षक वाटला तरी लहान मुलांना त्याच्यासंबंधी स्वाभाविक व आंतरिक गोडी वाटावी असे त्यामध्ये काही नव्हते. याउलट विणकामाचा तयार माल पूर्ण होण्यासाठी अनेक गुंतागुंतीच्या व कंटाळवाण्या प्रक्रियांतून विद्यार्थ्यांना जावे लागत असल्या-कारणाने त्यांना या मूलोद्योगासंबंधी नैसर्गिक आवड नव्हती. याचा परिणाम असा झाला की, कित्येक शाळांतून विद्यार्थी आपल्यावर लादलेले काम पूर्ण करण्यासाठी अप्रामाणिक मार्गांचा अवलंब करताना दिसू लागले. महात्माजींची ही योजना मांडताना अशी कल्पना होती की, तिच्या तत्त्वांचा वापर शिक्षणाच्या सर्व स्तरांवर म्हणजेच पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणात करण्यात यावा. प्रत्यक्षात मात्र या शिक्षणपद्धतीची कार्यवाही प्राथमिक शिक्षणा-पुरती मर्यादित ठेवली गेली.

प्राथमिक शाळांमधून शिकविणारे शिक्षक हे माध्यमिक शिक्षण घेतलेले असल्याकारणाने व त्याचप्रमाणे प्राथमिक शिक्षकांचे प्रशिक्षण करणारे शिक्षक प्रशिक्षित पदवीधर असल्यामुळे त्यांना वर्धा-योजनेसंबंधी आपुलकी किंवा श्रद्धा नसणे स्वाभाविक होते. त्यामुळे या योजनेची अम्मलबजावणी करण्याकरिता अढळ श्रद्धेचे शिक्षक सुरुवातीपासूनच मिळू शकले नाहीत. कोणतीही शिक्षणयोजना निर्दोष व सर्वगुणसंपन्न असली तरी तिची अम्मलबजावणी व यशापयश शेवटी ही योजना राबविणाऱ्या शिक्षकांवरच अवलंबून असते.

वर्धा-शिक्षणयोजनेचे यश मर्यादित राहण्यास खालील संभाव्य कारणे असावीत असे वाटते—

१. ही योजना मान्य करताना जो उत्साह जनतेच्या पुढाऱ्यांमध्ये होता तो, ती योजना प्रत्यक्ष राबविताना दिसून आला नाही. त्यामुळे जनतेचे सक्रिय सहकार्य मिळू शकले नाही. प्रत्येक राज्यामध्ये फारच थोड्या शाळांचे रूपांतर खऱ्या अर्थाने मूलोद्योगी प्राथमिक शाळांत होऊ शकले. बहुसंख्य शाळा सामान्य प्रकारच्याच राहिल्या. पालकांनाही मूलोद्योगांमध्ये आपल्या पाल्याचा वेळ निरर्थक वाया जात आहे असे वाटू लागले.

२. ही योजना फक्त प्राथमिक शिक्षणापुरती मर्यादित राहिल्याने माध्यमिक व उच्च शिक्षणातील शिक्षकवर्ग या योजनेकडे तुच्छतेने पाहू लागला. भारतामध्ये समाजातील जातिभेदाप्रमाणे शिक्षणक्षेत्रामध्येही उच्चनीच वर्गव्यवस्था प्रचलित आहे असे कधी कधी प्रत्ययास येते. प्राथमिक शिक्षण शूद्राप्रमाणे उपेक्षित व दुर्लक्षित राहिलेले. त्यामुळे वर्धा-शिक्षणपद्धतिद्वारा प्राथमिक स्तरावर सुरू करण्यात आलेल्या बदलांचे स्वागत माध्यमिक व उच्च स्तरावर काम करणाऱ्या मंडळींकडून झाले नाही. उलट, त्यांच्याकडून या प्रयत्नांची व होऊ घातलेल्या परिवर्तनाची कित्येक वेळा हेटाळणीच झाली. योजनेच्या अंमलबजावणीस लागणारे प्रोत्साहन तज्ज्ञांकडून न मिळाल्यामुळे सुरुवातीपासूनच ही जोजना राबविताना निरुत्साह दिसून आला.

३. स्वातंत्र्यानंतर आर्थिक पुनर्रचनेच्या धोरणात बदल झाला. भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी मोठ्या उद्योगधंद्यांना व अर्थव्यवस्थेच्या केन्द्रीकरणाला पोषक असे अर्थव्यवस्थेचे धोरण स्वीकारले. त्यामुळे आधुनिकीकरण व यांत्रिकीकरण यांवर भर देण्यात आला. ग्रामोद्योगांना पूरक असे उद्योग वर्धा-शिक्षणयोजनेत शिकविले जात असत. ते शिक्षण नवीन धोरणाशी सुसंगत वाटेनासे झाले.

४. या योजनेचा तोंडी पुरस्कार अनेक थोर व्यक्तींनी केला होता. परंतु प्रत्यक्षात मात्र त्याचा पाठपुरावा त्यांनी कधीच केला नाही. स्वतःच्या मुलांना शिक्षण देण्याचा प्रश्न उभा रहाताच त्यांनी वर्धाशिक्षण-योजनेचा स्वीकार केवळ तत्त्वतःच केला असल्याचे दिसून आले. कारण त्यांनी स्वतःच्या मुलांना कॉन्व्हेंटसारख्या इंग्रजी माध्यमाच्या व बिगर-मूलोद्योगी शाळांमधून शिक्षण देण्याचा अट्टाहास धरला.

५. मूलोद्योगी शाळांचे रूपांतर ग्रामीण भागात विशेष प्रमाणात केले गेले. त्यामुळे तेथील जनतेला आपणांला निकृष्ट प्रतीचे शिक्षण देण्याचा दुष्ट डाव रचण्यात येत आहे असे वाटू लागले. त्यामुळे ग्रामीण जनतेने या योजनेला कित्येक वेळा कडाडून विरोध केला.

वर्धाशिक्षणयोजना अशा रीतीने शास्त्रीय तत्त्वावर आधारलेली असली तरी अपेक्षित प्रमाणात यशस्वी होऊ शकली नाही.

महात्माजींची गणना त्यांच्या मूळच्या स्वाभाविक प्रवृत्तीनुसार भारतीय साधुसंतांच्यामध्ये केली पाहिजे. " दया तिचे नाव संतांचे पालन, आणिक निर्दालन

कंटकांचे " या उक्तीप्रमाणे त्यांना भारतीय साधुसंतांप्रमाणे दीन, पददलित, अनाथ लोकांबद्दल अपार करुणा होती. या करुणेच्या पोटीच पददलित लोकांच्या उद्धारासाठी त्यांनी आपल्या जीवनामध्ये अखंड परिश्रम घेतले. ते राजकारणात पडले, हा एक केवळ अपघातच होय. गरिबांच्या उद्धारासाठी स्वातंत्र्यप्राप्ती हे त्यांचे एक साधन होते; साध्य नव्हते. सत्य, अहिंसा, प्रेम यांचे अधिराज्य निर्माण करणे व सर्व लोकांना सुख व शांतीचे जीवन जगण्यास मदत करणे हे त्यांचे ध्येय होते. यासाठी त्या वेळची परिस्थिती अत्यंत प्रतिकूल होती. या प्रतिकूल परिस्थितीला योग्य ती कलाटणी देण्यासाठी त्यांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक व जीवनाच्या इतर सर्व क्षेत्रांमध्ये क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यांच्या शिकवणुकीचा व प्रयत्नांचा भारतीय जीवनावर सर्वात अधिक ठसा आधुनिक काळात दिसून येतो. भारतामध्ये व जगातील इतर देशांतही गांधीजींइतकी लोकप्रियता क्वचितच दुसऱ्या महापुरुषाला लाभली असेल. अहिंसात्मक प्रतिकार करण्याचे त्यांचे तंत्र मार्टिन ल्यूथर किंग यांच्यासारख्या थोर पुढाऱ्यांनीही अनुसरलेले दिसून येते. जगाला दिलेली ही त्यांची एक महत्त्वाची देणगीच होय. निःशस्त्र लोकांनी शस्त्राने सुसज्ज लोकांबरोबर आपल्या न्याय्य हक्कांसाठी कसा संग्राम द्यावा हे महात्मा गांधींनी आपल्या कर्तृत्वाने जगाला दाखविले. महात्माजींचे व्यक्तिमत्त्व अत्यंत सामान्य होते. पाच फूट चार इंच उंचीचा, १०८ पौंड वजनाचा, कृश शरीराचा सामान्य मनुष्य काही सद्गुणांच्या जोरावर किती असामान्य कर्तृत्व करू शकतो, याचे महात्मा गांधी हे एक मूर्तिमंत उदाहरण होय. साधेपणा, वक्तशीरपणा, दृढनिश्चय, सत्य, अहिंसा, प्रेम या शाश्वत मूल्यांवर अढळ श्रद्धा, धैर्य, सेवावृत्ती, लोकसंग्रह करण्याची प्रवृत्ती यांसारख्या सद्गुणांच्या जोरावर महात्मा गांधींनी अतुलनीय असे कार्य आपल्या जीवनात करून दाखविले यात संशय नाही.

◆ ◆ ◆

# कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे

| | |
|---|---|
| जन्म | १८७३ |
| मृत्यू | १९४४ |

भारतामध्ये समाजसेवेचे व्रत घेतलेली अनेक नररत्ने जन्मास आली. प्रतिकूल परिस्थितीला न जुमानता प्रयत्नांची पराकाष्ठा करून त्यांनी समाजसेवेसाठी आपले जीवन व्यतीत केले. यांपैकी कित्येकांना आपल्या पूर्वायुष्यात सामाजिक अन्यायाची, दुष्ट रूढींची, प्रतिकूल परिस्थितीची इतकी झळ पोहोचली होती की, त्यामुळे सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या जीवनातील महत्त्वाचा भाग खर्ची घातला. सामाजिक सुधारणेच्या प्रेरणेमुळे त्यांनी स्वतःच्या सुखसोयींकडे, मानसन्मानाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. समाजसेवेची संधी मिळताच त्या संधीचा आत्मप्रेरणेने त्यांनी पूर्ण फायदा घेतला. अशा थोर समाजसुधारकांपैकी कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे हे एक होत.

**बालपण**

त्यांचा जन्म जमखिंडी संस्थानामध्ये सन १८७३ साली झाला. त्यांच्या घराण्यातील काही पूर्वज लष्करात नोकरी करीत असल्यामुळे त्यांच्या घराण्याला सुभेदार ही पदवी प्राप्त झाली होती. त्यांचे आजोबा बसवंतराव ऊर्फ बसाप्पा अतिशय कष्टाळू

व उद्योगी असल्यामुळे घरची आर्थिक परिस्थिती बऱ्यापैकी होती. वडील रामजी हे देवभोळे व वारकरी संप्रदायातील असल्यामुळे त्यांचा भक्तिमार्गाकडे विशेष ओढा होता. व्यावहारिकता फारशी अंगी नसल्यामुळे व बैरागी-फकीर यांच्या नादी लागल्यामुळे त्यांच्या घरची आर्थिक स्थिती बरीच खालावत गेली. विठ्ठलराव यांना चांगले शिक्षण देण्याचा मात्र त्यांनी प्रयत्न केला. विठ्ठलरावांचे लग्न त्या वेळच्या पद्धतीनुसार वयाच्या ९ व्या वर्षी नवरीच्या पाळण्याला बाशिंग बांधूनच झाले. विठ्ठलरावांना लहानपणापासून निसर्गप्रेम व उद्योगीपणा यांचे बाळकडू मिळाले होते. आपल्या सवंगड्यांना घेऊन मातीचे गणपती तयार करणे, शाई व साबण बनविणे यांसारखे ते उद्योग करीत. त्यांची सहनशीलता दांडगी होती. जळत्या उदबत्तीचे चटके त्यांनी निमूटपणे सहन केले होते. घरातील धार्मिक प्रवृत्तीमुळे त्यांना पूजाअर्चा व आलेल्या अतिथि-बुवाबैराग्यांची सेवा करावी लागत असे. अचेतनाच्या पूजेचा व धार्मिक आचारांच्या स्तोमांचा त्यांना अतिशय कंटाळा असे. शाळेमध्ये ते एक हुशार विद्यार्थी म्हणून गणले जात. हायस्कूलमध्ये त्यांना शिष्यवृत्ती मिळाली होती. वयाच्या अठराव्या वर्षी मॅट्रिक झाल्यावर घरच्या गरिबीमुळे प्रथम त्यांना जमखिंडी संस्थानामध्ये नोकरी पत्करावी लागली. पुढे त्यांना पशुवैद्यक बनविण्याचे संस्थानाने ठरविल्यामुळे व ते शिक्षण घेण्याचे त्यांनी अमान्य केल्यामुळे त्यांची नोकरी सुटली. दारिद्र्याच्या हालअपेष्टा सहन करीत असतानाही उच्च शिक्षणाची त्यांची ऊर्मी नाहीशी झाली नव्हती. त्यांच्या मुख्याध्यापकांच्या सल्ल्यावरून उच्च शिक्षणासाठी ते पुण्यास गेले. तेथे मराठा एज्युकेशन सोसायटीतर्फे दहा रुपयांची शिष्यवृत्ती मिळविण्यात त्यांना यश मिळाले. परंतु कॉलेजची नादारी त्यांना मिळू शकली नाही. कॉलेजची परीक्षा-फी देण्यासाठीही त्यांच्याजवळ पैसे नव्हते. इतक्या पराकोटीच्या दारिद्र्यामध्ये व अत्यंत हालअपेष्टात त्यांना आपले उच्च शिक्षण पूर्ण करावे लागले. कॉलेजातील अभ्यास-विषयांबरोबरच त्यांनी सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ जॉन स्टुअर्ट मिल, स्पेन्सर, मेकॉले यांच्या ग्रंथांचा सखोल अभ्यास केला. कादंबरीकार हरीभाऊ आपटे यांनी आपल्या वाङ्मयामध्ये रंगविलेली स्त्रियांची विकट व असाहाय्य परिस्थिती पाहून त्यांच्या मनाला पीळ पडत असे. कॉलेजातील परीक्षा-पद्धती म्हणजे विद्यार्थ्यांची शुद्ध पिळवणूक, असे त्यांना वाटे. याच सुमारास त्यांच्या बहिणीचा तिच्या सासुरवाडीस अत्यंत छळ झाल्याकारणाने त्यांनी तिला नवऱ्याच्या व सासुसासऱ्यांच्या जाचातून मुक्त करण्यासाठी शिक्षण देण्याचे ठरविले. त्यामुळे स्त्रियांच्या अडचणी व त्यांच्यावर होणारा सामाजिक अन्याय त्यांना प्रत्यक्ष अनुभवावयास मिळाला. **जनाक्कांचा** छळ ही एक समाजसुधारणेची प्रेरणा देणारीच घटना होय. जागतिक युनिटेरियन असोशिएशनचे प्रतिनिधी डॉ. सँडरलन यांच्या एकेश्वरी मताचा प्रभाव त्यांच्यावर इतका झाला की, धर्मांच्या

कार्यासाठी वाहून घेण्याची कल्पना त्यांच्या मनामध्ये रुजली. बी. ए. झाल्यावर एलएल्. बी. ची परीक्षा पास होऊन वकील व्हावे असे त्यांनी ठरविले होते. परंतु त्यांच्या जीवनाला वळण देणारी एक घटना याच सुमारास घडली. युनिटेरियन ॲसोसिएशनतर्फे इंग्लंडमध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या एकेश्वरी मताच्या काही भारतीय लोकांना शिष्यवृत्त्या द्यावयाच्या होत्या. महाराष्ट्रातील प्रार्थनासमाजाचे धुरीण डॉ. भांडारकर यांनी त्यांपैकी एक शिष्यवृत्ती विठ्ठलरावांना दिली व त्यांनी स्वार्थाला तिलांजली देऊन समाजकार्यास वाहून घेण्यासाठी तिचा निर्धाराने स्वीकार केला.

## सामाजिक व शैक्षणिक कार्य

परदेश-वास्तव्यात त्यांना तेथील समाजाचे, त्यांच्या चालिरीतींचे व वाङ्मयाचे दर्शन घडले. भारतीय समाज व परदेशातील समाज यांच्या स्थितीची त्यामुळे त्यांना तुलना करता आली. त्यांचा वैचारिक दृष्टिकोन विशाल बनला. आपल्या सामाजिक समस्या स्पष्टपणे दिसू लागल्या व त्यांवर उपाययोजना कोणती करावयाची याबद्दलचे मार्गही सुचू लागले. धार्मिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर भारतात परत आल्यावर भारताच्या कोनाकोपऱ्यात त्यांनी दौरा केला. या दौऱ्यामध्ये उदार धर्माची शिकवण त्यांनी जनतेला दिली व त्याचबरोबर सामाजिक, धार्मिक अवनतीचे निरीक्षणही केले. आपल्या देवळांतील गलिच्छपणा, घृणास्पद व किळसवाणी दृश्ये, दुष्ट चालिरीती व रूढी यांमुळे त्यांच्या मनाला उद्‌वेग निर्माण झाला. ही परिस्थिती बदलण्यासाठी त्यांनी जिद्दीने प्रयत्न सुरू केले. त्या वेळी देवाला मुली वाहण्याची (मुरळीची) प्रथा प्रचलित होती. ती दूर करण्याचाही प्रयत्न त्यांनी सुरू केला. जातिभेदाच्या दुष्ट रूढीमुळे समाजातील घटकांचे कसे विघटन होत चालले आहे ते त्यांनी अनुभवले व त्याविरुद्ध लढा देण्यासाठी १८ ऑक्टोबर १९०६ रोजी ' डिप्रेस्ड् क्लास मिशन ' नावाची अखिल भारतीय संस्था सुरू केली. यापूर्वीही म. ज्योतिराव फुले यांचे या दिशेने प्रयत्न सुरू होतेच. त्या प्रयत्नांना अखिल भारतीय स्वरूप देण्याची योजना त्यांनी आखली. समाजातील उपेक्षितांची व पददलितांची सुधारणा करण्यास शिक्षणाची समान संधी त्यांना उपलब्ध करून देणे हेच प्रभावी साधन आहे हे त्यांनी ओळखले होते. त्यासाठी त्यांनी अनेक शिक्षणसंस्था व उद्योगगृहे स्थापन केली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने अस्पृश्यता निवारणाचा ठराव पास करावा म्हणून त्यांनी कसोशीने प्रयत्न केले व त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन अशा प्रकारचा ठराव सन १९१० साली कलकत्ता येथील काँग्रेसच्या अधिवेशनामध्ये डॉ. ॲनी बेझंट यांच्या अध्यक्षतेखाली पास झाला. हिंदु-धर्मावरील अस्पृश्यतेचा कलंक पुसण्यासाठी व भारतातील आमजनतेला

अस्पृश्यतेचे विराट स्वरूप समजून देण्यासाठी सन १९२० साली नागपूर येथे म. गांधींच्या अध्यक्षतेखाली त्यांनी एक प्रचंड मेळावा भरविला. सक्तीच्या शिक्षणामध्ये केवळ मुलांचाच समावेश न करता मुलींचाही अंतर्भाव व्हावा म्हणून त्यांनी कसोशीने प्रयत्न केले. या त्यांच्या प्रयत्नांस पुढे सुयशही प्राप्त झाले. राजकारणामध्येही त्यांनी भाग घेतला होता. सन १९२८ साली सारावाढीविरुद्ध लोकमत बनविण्यासाठी त्यांनी शेतकऱ्यांची एक परिषद पुणे येथे घेतली. १९३० साली कायदेभंग करून तुरुंगवासही त्यांनी पत्करला होता. त्यांची साहित्यसेवा उच्च प्रतीची होती. त्यांचा इतिहासाचा अभ्यास सखोल व गाढा होता. भाषेचा तौलनिक अभ्यास करण्याचा त्यांना छंद होता. 'शिंदे लेखसंग्रह' म्हणून त्यांच्या स्फूर्तिप्रद लेखांचा एक संग्रह प्रसिद्ध आहे. त्यांनी देशभर दिलेली व्याख्याने ओजस्वी व विचारप्रवर्तक असत.

कर्मवीर विठ्ठलराव रामजी शिंदे यांच्या कार्याचा गौरव प्रथम बडोदे संस्थानात झाला. त्या वेळी त्यांना नोबेल पारितोषिकासारखे एक पारितोषिकही देण्यात आले. मुंबई राज्यातर्फेही त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. त्यांच्या कार्याचे महत्त्व जाणून मध्यवर्ती सरकारकडूनही त्यांना काही मदत मिळाली. २ जानेवारी १९४४ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या जीवनकार्याचा विशेष म्हणजे धार्मिक व सामाजिक सुधारणा करण्यात त्यांनी अत्यंत निःस्वार्थीपणे व तळमळीने भाग घेतला. मुरळीसारख्या दुष्ट चालीविरुद्ध त्यांनी बंड पुकारले. स्त्रिया व अस्पृश्य या समाजातील पददलित घटकांना शिक्षणाची संधी प्राप्त करून देण्यासाठी त्यांनी अहर्निश प्रयत्न केले. हे करीत असताना त्यांना कोणी आधुनिक काळचा कली अशी टीका करून किंवा अन्यप्रकारे हिणवण्याचे प्रयत्न केले तरी त्यांची त्यांनी कधी तमा बाळगली नाही.

## महर्षी कर्वे

| जन्म | १८५८ |
| --- | --- |
| मृत्यू | १९६२ |

उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः ।
दैवेन देयमिति कापुरुषा वदन्ति ।
दैवं निहत्य कुरु पौरुषमात्मशक्त्या ।
यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः ।।

निरनिराळ्या देशांमध्ये ज्या व्यक्तींनी आपल्या जीवनामध्ये अलौकिक कार्य करून दाखविले, त्यांच्यांतील सर्वांत मोठा गुणविशेष म्हणजे दीर्घोद्योग हा होय. या दीर्घोद्योगाला योग्य ध्येयाची व अविचलित श्रद्धेची जोड मिळाल्यास मणिकांचनयोग घडून येतो. अशा थोर विभूती राजकारणामध्ये आपल्या प्रखर तेजाने तळपणाऱ्या असोत किंवा समाज-सुधारणेच्या शांत चंद्रप्रकाशामध्ये अविरत काम करणाऱ्या असोत, त्यांच्यामध्ये दिसून येणारे गुण सारखेच असतात. आपण मागे पाहिलेल्या शिक्षणशास्त्रज्ञांमध्येही दीर्घोद्योग, चिकाटी, ध्येयनिष्ठा यांसारखे प्रमुख गुण दिसून येतात. वरील सुभाषितात म्हटल्याप्रमाणे थोर लोकांनी मिळविलेले यश हे इतरेजनांना कित्येक वेळा दैवयोगाने प्राप्त झाले असे वाटते. सर्वसामान्यांमध्ये चिकाटी व दीर्घोद्योग, त्याचप्रमाणे ध्येयनिष्ठा व अविचलित श्रद्धा

यांचा अभाव दिसून येतो. जगातील निरनिराळ्या अलौकिक विभूतींमध्ये आणखी एक विशेष दिसून येतो, तो म्हणजे प्रचलित सामाजिक व राजकीय परिस्थितीतील उणीवांची व दोषांची जाण ही होय. ही जाणीव प्रकर्षाने झाल्यानंतर या उणीवा दूर करण्यासाठी त्यांना निरनिराळे मार्ग दिसून येतात. अलौकिक कर्तृत्वासाठी अशा द्रष्टेपणाचीही जरुरी फार मोठ्या प्रमाणात असते, असेही आपणांस दिसून येईल. महर्षी धोंडो केशव ऊर्फ अण्णासाहेब कर्वे यांच्या जीवनाचा अभ्यास केल्यास वरील गुणविशेषांचा सुरेख संगम त्यामध्ये झाल्याचे आपणांस निदर्शनास येते. भारतीय स्त्रियांच्या दुःस्थितीची व त्यांच्यावर होणाऱ्या सामाजिक अन्यायाची जाणीव त्यांना लहान वयातच झाली. हा अन्याय दूर करण्यासाठी व स्त्रियांच्या सर्वांगीण विकासास समान संधी प्राप्त करून घेण्यासाठी त्यांनी आपल्या जीवनामध्ये अहर्निश प्रयत्न केले. आपल्या ध्येयावर त्यांची अढळ श्रद्धा असल्याकारणाने त्यांनी लोकनिंदेची व शारीरिक परिश्रमाची तमा बाळगली नाही.

## बालपण व शिक्षण

अण्णासाहेब कर्वे यांचा जन्म १८ एप्रिल १८५८ साली मुरुडपासून १५ मैलांवरील शेरवली या गावी झाला. त्यांचे वडील अत्यंत सत्त्वशील, शांत वृत्तीचे व दीर्घोद्योगी होते. काथ्याचा सुंभ तयार करणे, रहाटाच्या माळा वळणे, पागोटी बांधणे इत्यादी उद्योगांमध्ये ते निमग्न असत. त्यांचा संसार गरिबीचा व काटकसरीचा होता. आईचा स्वभाव काहीसा रागीट किंवा तापट असला तरी त्याची झळ इतरांना पोहोचत नसे. आपल्या गरिबीमध्येही हे कुटुंब काटकसरीने पण समाधानाने आपला चरितार्थ चालवीत असे. त्यांचे वडीलबंधू भिकाजीपंत शाळाखात्यात शिक्षक होते. त्यांची धाकटी बहीण अंबाताई व्यवहारदक्ष, बुद्धिमान व दूरदर्शी होती. त्यांची थोरली भावंडे निवर्तल्यावर, नवसामुळे राहिलेल्यांची नावे भिकू व धोंडू अशी ठेवण्यात आली होती. अण्णासाहेबांचे प्राथमिक शिक्षण मुरुडगावीच झाले. कित्ते गिरवणे, भूपाळ्या म्हणणे, पाठांतर करणे असा त्या वेळी शिक्षणक्रम असे. लहानपणापासून त्यांची वाणी खणखणीत, शुद्ध व स्पष्ट होती. रामविजय, हरिविजय वगैरे पौराणिक ग्रंथ यांचेही वाचन त्यांनी केले होते. त्यांच्या जीवनाला त्यांना प्राथमिक शाळेत लाभलेले सोमण गुरुजी यांनी फार मोठे वळण लावलेले दिसते. समाजसेवेचे बाळकडू त्यांच्याच अनुकरणाने त्यांना मिळाले. समाजातील निरक्षर प्रौढांना वर्तमानपत्रे वाचून दाखवून समाजसेवा करण्याचा श्रीगणेशा त्यांनी गिरविला. सोमण गुरुजींच्या सान्निध्यात समाजसुधारणेच्या अनेक कल्पना त्यांना सुचल्या. सहकाराशिवाय सुधारणा नाही, या एका कल्पनेवरून त्यांनी व्यापारोत्तेजक सहकारी मंडळाची स्थापना केली होती. त्यांचा पहिला विवाह

सन १८७३ साली वयाच्या १५ व्या वर्षी झाला. त्याच वेळी त्यांचे प्राथमिक शिक्षणही पूर्ण झाले नव्हते. वयाच्या १७ व्या वर्षी जेव्हा ते व्ह. फा. च्या परीक्षेस गेले होते, तेव्हा शरीराचा बांधा लहान दिसल्यामुळे ते वयाने लहान असावेत अशा समजुतीने त्यांना परीक्षेस बसू दिले गेले नाही. या वेळी त्यांचा स्वभाव अत्यंत लाजाळू व सर्वसामान्य मुलांप्रमाणे भित्रा होता. १८८१ साली त्यांनी मॅट्रिक्युलेशनची परीक्षा दिली. या परीक्षेसाठी त्यांनी आपल्या गावापासून मुंबईपर्यंतचा प्रवास पायी केला होता. स्वतःचा स्वयंपाक व इतर व्यक्तिगत कामे ते स्वतःच करीत असत. त्यामुळे स्वावलंबनाचे तत्त्व त्याच्या अंगामध्ये पूर्णपणे बाणले होते. १८८४ साली बी. ए. ची परीक्षा पास झाल्यानंतर काही काळ त्यांनी शिक्षक म्हणून काम केले. १८८७ साली एम्. ए. ची परीक्षा देण्याचा त्यांनी अयशस्वी प्रयत्न केला. पुढे काही वर्षे फर्ग्युसन कॉलेजमध्ये गणिताचे प्राध्यापक म्हणूनही त्यांनी काम केले. १८९१ साली त्यांची पहिली पत्नी निधन पावली. नंतर त्यांनी १८ मार्च १८९३ साली आनंदीबाई ऊर्फ बाया यांच्याशी पुनर्विवाह केला. हिंदूसमाजातील विधवांची दुःस्थिती दूर करण्यासाठी पुनर्विवाहाच्या चळवळीस त्यांनी स्वतःच्या कृतीने चालना दिली. या वेळी लोकमताच्या प्रखर विरोधाला, कुत्सिक टीकेला त्यांना तोंड द्यावे लागले. स्त्रियांच्या, विशेषतः विधवांच्या, शोचनीय परिस्थितीची जाणीव त्यांना लहानपणीच झाली होती. त्यांच्या शेजारी रहाणाऱ्या एका बालविधवेला अत्यंत असहाय परिस्थितीमध्ये कसे हीन जिणे जगावे लागले व शेवटी हालहाल होत रूढीच्या जोखडामध्ये कसे आत्मार्पण करावे लागले याची त्यांना पूर्ण कल्पना होती. विधवाविवाहाला उत्तेजन देण्यासाठी ३१ डिसेंबर १८९३ साली त्यांनी विधवा-विवाहोत्तेजक मंडळाची स्थापना केली. स्त्रियांची उन्नती ही शिक्षणानेच होऊ शकेल, हे तत्त्व पटल्यामुळे त्यांनी १४ जून १८९६ साली अनाथ बालिकाश्रमाची स्थापना केली. या संस्थेने विधवा व परित्यक्ता यांच्या शिक्षणाकडे विशेषतः लक्ष द्यावे व पुनर्विवाहाच्या प्रतिकूल झंझावाती टीकेत सापडू नये असे त्यांचे धोरण होते.

## शैक्षणिक कार्य

अनाथ बालिकाश्रमाचे स्थलांतर ३ जून १९०० साली हिंगणे येथे करण्यात आले. पुढे ४ मार्च १९०७ साली हिंगण्यातच महिला विद्यालयाची स्थापना करण्यात आली. अनाथ बालिकाश्रमाच्या स्त्रीशिक्षणविषयक कल्पनेचा हा विकास होता. अनाथ बालिकाश्रमाच्या वृक्षावर महिला विद्यालयाचे रुजलेले रोपटे पुढे निराळे व स्वतंत्रपणे वाढू लागले. स्त्रियांना त्यांच्या जीवनात उपयोगी पडेल व त्यांच्या स्वाभाविक प्रवृत्तीस पोषक ठरेल अशा प्रकारचे शिक्षण द्यावे अशी त्यांची स्त्रीशिक्षणविषयक

धारणा होती. बहुसंख्य स्त्रियांना आपल्या जीवनामध्ये गृहिणीपदाची जबाबदारी पार पाडावी लागते. ती जबाबदारी पार पाडण्यासाठी गृहजीवनशास्त्र, आरोग्यशास्त्र, वनस्पतिशास्त्र, शिशुसंगोपनशास्त्र यांसारख्या शास्त्रांचे शिक्षण त्यांना देणे आवश्यक आहे असे त्यांचे ठाम मत होते. स्त्रीशिक्षणविषयक कार्य करीत असताना जपानमधील स्त्रियांच्या विद्यापीठाची माहिती देणारी एक पुस्तिका ऑगस्ट १९१५ साली त्यांच्या हाती आली. त्यामुळे स्त्रियांचे स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यास त्यांना प्रेरणा मिळाली. स्त्रीशिक्षणविषयक कार्याची त्यांना मूळचीच आत्मीयता होती, त्याच कार्याच्या विकासासाठी यामुळे त्यांना नवी दिशा मिळाली. स्त्रियांच्या उन्नतीसाठी जे जपानी बांधवांनी केले, ते आपणांसही करता येईल असे त्यांना वाटू लागले. स्वतंत्र विद्यापीठाच्या कल्पनेमागे त्यांची भूमिका अशी होती—

"स्त्रियांकरिता स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना करण्यात आमचा हेतू अमेरिका किंवा युरोप येथील स्त्रियांच्या उच्च शिक्षणाच्या संस्थांचे अनुकरण करणे हा नाही किंवा आपल्या देशातील पुरुषांच्या विश्वविद्यालयात नेमलेल्या अभ्यासक्रमाशी स्पर्धा करणे हाही नाही. वर्तमानकालीन स्त्रीवर्गाच्या शारीरिक व मानसिक स्थितीला अनुसरून योग्य होईल असा अभ्यासक्रम तयार करणे व स्त्रियांच्या स्वाभाविक प्रवृत्तीला अनुसरून तो वाढविणे हा हेतू आहे."

स्त्रीशिक्षणविषयक त्यांच्या धोरणामध्ये खालील शैक्षणिक तत्त्वे प्रामुख्याने दिसून येतात—

१. पुरुषांप्रमाणेच स्त्रिया या मानवजातीचा घटक असून त्यांना विशिष्ट व्यक्तिमत्त्व आहे.

२. हे वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्व लक्षात घेऊन त्याच्या विकासास अनुरूप असेच शिक्षण दिले पाहिजे.

३. स्त्रियांच्या शिक्षणामध्ये त्यांना सुपत्नी व सुमाता होण्याची पात्रता निर्माण करणारे शैक्षणिक उपक्रम असावेत.

४. स्त्रियांचे शिक्षण व राष्ट्रीय विकास यांचा निकटचा संबंध आहे हे लक्षात असावे.

याच सुमारास समाजातील जन्मजात उच्च-नीचता दूर करण्यासाठी जातिभेद नष्ट करून समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी त्यांचे प्रयत्न चालू होते. मात्र समाजाचा विरोध शक्य तितका कमी होईल अशा दृष्टीने काम करण्याचे त्यांचे धोरण होते. स्त्रियांप्रमाणेच समाजामध्ये अस्पृश्यांची स्थितीही अत्यंत

शोचनीय होती. जातिभेदामुळे हा वर्ग आपले जीवन अत्यंत वाईट परिस्थितीमध्ये कंठीत होता. अण्णासाहेब कर्व्यांचे सामाजिक कार्य पाहून राष्ट्रीय सामाजिक परिषदेचे अध्यक्षस्थान त्यांना १९१५ साली देण्यात आले. त्याच वेळी त्यांनी आपले स्त्रीशिक्षणविषयक विचार व स्त्री-विद्यापीठाची कल्पना बोलून दाखविली.

३ जून १९१६ रोजी महिला विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. त्यातील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे—

१. स्त्रियांच्या शिक्षणामध्ये इंग्रजी माध्यमाची फार मोठी अडचण भासत असे. त्यामुळे त्यांच्या स्त्री-विद्यापीठामध्ये मातृभाषेचा शिक्षणाचे माध्यम म्हणून स्वीकार करण्याचे त्यांनी ठरविले.

२. इंग्रजीचे महत्त्वही त्यांनी जाणले होते. म्हणून इंग्रजी शिकविण्याची सोय विद्यापीठात करण्यात आली होती.

३. स्त्रियांच्या व्यक्तिविकासास अनुरूप व त्यांच्या भावी विकासास पोषक असे गृहजीवनशास्त्र, आरोग्यशास्त्र यांसारखे विषय सक्तीचे करण्यात आले होते.

४. स्त्रियांच्या शारीरिक व मानसिक व्यक्तिभेदास अनुसरून अध्ययन-विषयामध्ये विविधता आणण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.

शिक्षणाचे माध्यम व अभ्यासक्रमाची विविधता यांसंबंधींची अण्णासाहेबांची मते पुष्कळच प्रागतिक होती असे आपणांस दिसून येईल. पदवी परीक्षेचा अभ्यासक्रम तीन वर्षांचा करण्याची योजना महर्षी अण्णासाहेब कर्वे यांनी ५० वर्षांपूर्वीच आखली होती. यावरून त्यांचा द्रष्टेपणा आपणांस दिसून येईल. रवींद्रनाथ टागोरांनीही मातृभाषेतून शिक्षण देण्यावर विशेष भर दिला होता. कोणत्याही मोठ्या कार्याची सुरुवात फार छोट्या स्वरूपात होत असते. त्यास अनुसरून विद्यापीठाचे पहिले स्वरूप एखाद्या महानदीच्या उगमाच्या स्वरूपा-प्रमाणे फारच छोटे होते. परंतु पुढे तिचा विकास होऊन स्त्रीशिक्षणविषयक ज्ञानगंगेचे विशाल स्वरूप महिला विद्यापीठाला प्राप्त झाल्याचे आपणांला दिसून येईल. आपल्या विद्यापीठाच्या प्रगतीसाठी अण्णासाहेबांनी सरकारी मदतीची फारशी याचना केली नाही. इतकेच नव्हे, तर विद्यापीठासाठी सरकारी मान्यता मिळविण्याचीही फिकीर केली नाही. त्यांचा सर्व भर जनताजनार्दनाच्या मान्यतेवर व कार्याच्या महत्त्वेवरच होता. कार्याची उपयुक्तता व विकास जनतेच्या लक्षात आल्यावर ते लोकादरास आपोआप पात्र होईल व तदनंतर सरकारी मदतीचा व मान्यतेचा ओघ आपोआप त्याकडे वळेल अशी त्यांची श्रद्धा होती. त्यांनी

आपल्या कार्याच्या प्रचारासाठी इंग्लंड, फ्रान्स, बेल्जम, हॉलंड, डेन्मार्क, अमेरिका, जपान, चीन, फिलिपाइन्स, आफ्रिका इत्यादी देशांत दौरा केला होता. त्यामुळे स्वदेशाप्रमाणेच परदेशांकडूनही त्यांना आपल्या कार्यासाठी आर्थिक मदत सतत मिळत गेली. स्वदेशामध्येही त्यांच्या उत्तरार्धात त्यांना मानसन्मान व लोकादर मिळाला. त्यांना पुणे विद्यापीठाची व बनारस हिंदू विद्यापीठाची बहुमानदर्शक डी. लिट्. ही पदवी बहाल करण्यात आली होती. भारत सरकारनेही सन १९५५ साली 'पद्मविभूषण' ही पदवी देऊन त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव केला.

पद्मविभूषण डॉ. अण्णासाहेब कर्वे यांना सुदैवाने चांगले दीर्घायुष्य लाभले. त्यामुळे त्यांना आपले आवडते शैक्षणिक व सामाजिक कार्य करावयास भरपूर अवधी मिळाला. भारताला स्वातंत्र्य मिळालेले त्यांनी पाहिले. सामाजिक समतेशिवाय व समाजातील सर्व घटकांना शिक्षणाची समान संधी दिल्याशिवाय केवळ राजकीय स्वातंत्र्याला कोणताही अर्थ राहू शकत नाही, हे त्यांनी फार पूर्वीपासूनच ओळखले होते. त्यांच्या कार्याचे खरे मूल्यमापन त्यांच्या प्रयत्नामुळे सामाजिक समता किती प्रमाणामध्ये प्रस्थापित झाली, स्त्रिया व पददलित वर्ग यांच्या विकासासाठी समान संधी किती प्रमाणामध्ये मिळू लागली यावरून दिसून येईल. १८ एप्रिल १९५३ रोजी महाराष्ट्र सामाजिक परिषदेचे उद्घाटन करताना त्यांनी म्हटले, 'स्वराज्याचे सुराज्य बनवावयाचे असेल तर प्रथम सामाजिक समता प्रस्थापित केली पाहिजे. तिच्या-शिवाय समाजातील सर्व घटकांना आर्थिक, शैक्षणिक, राजकीय सत्ता उपभोगता येणार नाही.' साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर यांनी सन १९३८ च्या एका लेखात म्हटल्याप्रमाणे "अण्णासाहेबांची ध्येयसाधना प्रचंड होती. आपले कार्य बिनबोभाट करावयाचे, प्रतिपक्षाशी वाद न घालता कमीत कमी विरोध करावयाचा, या त्यांच्या पद्धतीला साधन असे जरी म्हटले नाही, तरी त्यांचे कार्य यशस्वी होण्यात त्याचा बराचसा भाग आहे. त्यांचे प्रत्यक्ष साधन म्हटले म्हणजे त्यांचा स्वतःचा दांडगा उद्योग. ते आपला उद्योग अत्यंत निरलसपणे, आस्थेने व निःस्वार्थ बुद्धीने करीत असत. आपल्या कार्यासाठी त्यांनी अनेक देणग्या जमविल्या. तथापि त्यात स्वतःच्या मोलाच्या मिळकतीची भर घालून जमविलेला सर्व पैसा सार्वजनिक कार्यासाठी खर्च केला. त्यांच्या कार्याचा आणखी एक विशेष म्हणजे समाज-सेवेसाठी स्वतःचे तन, मन व धन अर्पण करणारी ध्येयनिष्ठ व चारित्र्यसंपन्न अशी एक पिढी त्यांनी निर्माण केली."

◆ ◆ ◆

# शिक्षणाचे शिल्पकार

## पाश्चिमात्य

# प्रास्ताविक

मानवाच्या गतेतिहासाकडे आपण दृष्टिक्षेप टाकल्यास आपणांस असे दिसून येईल की, शिक्षणाच्या कल्पनेत, ध्येयधोरणात, शासनव्यवस्थेत व शैक्षणिक सामग्रीमध्ये सतत परिवर्तन होत आले आहे. शिक्षण हे समाजाच्या आशाआकांक्षांशी व गरजांशी निगडित असल्यामुळे समाजाच्या गरजा आणि आशाआकांक्षा जसजशा बदलत गेल्या, तसतसे शिक्षणाच्या कल्पनेमध्ये व शिक्षणाच्या इतर अंगोपांगामध्ये जरूर ते बदल होत गेले. शिक्षणावर समाजाच्या राजकीय, आर्थिक व धार्मिक विचारांचा फार मोठ्या प्रमाणामध्ये परिणाम झालेला दिसून येणे, समाजाचे ध्येय आणि समजुती यांचाही प्रभाव शिक्षणाच्या प्रक्रियेवर होणे अपरिहार्यच असते. समाजाची संस्कृती म्हणजेच समाजाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक विचारप्रणालींचा परिपाकच होय. या संस्कृतीचा ज्याप्रमाणे शिक्षणावर परिणाम झालेला आपण पाहतो, त्याप्रमाणेच संस्कृतीमध्येही योग्य ते बदल शिक्षणामुळे घडून आल्याचे आपल्या दृष्टोत्पत्तीस येते.

पाश्चिमात्य शिक्षणामध्ये वरीलप्रमाणे गेली अनेक शतके बदल होत आले आहेत. शिक्षणाच्या कल्पनेचा उदय मानवी समाजाला स्थिरावस्था प्राप्त झाल्यानंतरच

झाला असावा. प्रथम शिक्षण ही बाब कुटुंबापुरतीच मर्यादित होती. मुलामुलींचे शिक्षण कुटुंबामध्येच आईवडिलांकडून होत असे. या शिक्षणामध्ये जीवनाच्या निरानिराळ्या साधनसामग्रीचे, रीतिरिवाजांचे व जीवनावश्यक गरजा भागविणाऱ्या विषयांचे ज्ञान दिले जात असे. पुढे लेखनकलेचा विकास झाल्यानंतर व शेतीचा शोध लागून मानव एके ठिकाणी स्थिर झाल्यानंतर मागील पिढ्यांचे ज्ञान पुढील पिढीपर्यंत संक्रमित होऊ लागले. अशा रीतीने विकसित झालेले ज्ञान प्रत्येक कुटुंबास देता येणे शक्य नसल्यामुळे शाळा या सामाजिक संस्थेची निर्मिती झाली. प्रथम शिक्षणावर कुटुंबाचा व नंतर धर्मसंस्थेचा पगडा दिसून येतो. धर्मसंस्थेकडून शिक्षणावरील हे अधिकार राज्यसंस्थेने हिरावून घेण्याचे प्रयत्न अनेक शतकांपर्यंत केल्याचे दिसून येते. कारण धर्मसंस्थेला आपले धर्माचे अधिराज्य प्रस्थापित करण्यासाठी ज्याप्रमाणे सुशिक्षित व सुसंस्कारित लोकांची आवश्यकता भासली, त्याचप्रमाणे राज्यशासन चालविण्यासाठी व आपली सत्ता अबाधित राखण्यासाठी राजेलोकांनाही शिक्षण आपल्या ताब्यात ठेवणे आवश्यक वाटू लागले.

प्रथम शिक्षण ही काही मूठभर लोकांचीच मिरासदारी होती. शिक्षण हा काही आम जनतेचा जन्मसिद्ध हक्क असल्याचे त्या काळी मान्य करण्यात आले नव्हते. अभ्यासक्रमामध्ये धार्मिक ग्रंथांचे वाचन व पाठांतर यांचाच समावेश सुरुवातीस करण्यात आला होता. नीतिविषयक कल्पनांचा अभ्यासही याच वेळी सुरू झाला. शिक्षणावर पहिल्या काही शतकांमध्ये बॅबिलोनियन, ॲसीरियन व पर्शियन संस्कृतींचा विशेष प्रभाव दिसून येतो. शिक्षण हे विशिष्ट प्रकारचे राजकीय ध्येय गाठण्याचे साधन आहे, हे स्पार्टा येथील शिक्षणक्रमावरून दिसून येते. स्पार्टा हे नगरराज्य शत्रुपक्षाने वेढलेले असल्याकारणाने शत्रूंशी मुकाबला करणारे योद्धे निर्माण करणे एवढेच येथील शिक्षणपद्धतीचे ध्येय होते. या शिक्षणामध्ये शारीरिक कवायत, काटकपणा, युद्धोपयोगी शस्त्रास्त्रांचे ज्ञान, मर्दानी खेळ यांवरच विशेष भर देण्यात येत असे. राष्ट्राचे संरक्षण करणे हाच एकमेव हेतू असल्याकारणाने व्यक्तीला स्वतंत्र अस्तित्वच मिळू शकत नव्हते. निर्बल व कमकुवत अपत्यांना खुशाल डोंगराच्या कडेकपारीत सोडून देण्यात येत असे. शासनव्यवस्था हुकूमशाही होती. त्या वेळी दिले जाणारे शिक्षण ही त्या काळची एक गरजच होती असे आपणांस दिसून येईल. त्यानंतरच्या काळात म्हणजे इसवी सनाच्या ५ व्या ६ व्या शतकामध्ये अथेन्स येथील शिक्षणपद्धतीत व्यक्तिस्वातंत्र्याची काहीशी कदर होत असल्याचे आपणांस दिसून येईल. कला, वाङ्मय व तत्त्वज्ञान या बाबतींत बहुमोल वारसा ग्रीकांनी पुढील पिढ्यांना दिला आहे. अथेन्स या राष्ट्राला स्पार्टाप्रमाणे शत्रूकडून तितकासा धोका नव्हता व तो

काळ शांततेचा व सुबत्तेचा होता हेच याचे कारण आहे. रोमन साम्राज्यामध्ये राज्यशासनाकरिता जनतेचे सहकार्य घेतले जात असल्याकारणाने जनतेच्या शिक्षणाकडे थोडेबहुत लक्ष दिले जात असे. तथापि शिक्षणाचा हक्क अमीर-उमराव व अधिकारीवर्ग यांच्या मुलापुरताच मर्यादित होता.

पुढे खिस्ती युगामध्ये शिक्षणाचा पाया अधिक विस्तृत करण्यात आला. सर्व मानवाला आपला धर्म शिकवावा, या हेतूने शिक्षणाची कवाडे बहुसंख्याकांना मोकळी करण्यात आली. त्यामुळे धार्मिक ग्रंथ, परमेश्वराविषयीच्या कल्पना, विश्वाची उत्पत्ती, स्थिती व लय यांसंबंधीचे ज्ञान शाळांतून दिले जाऊ लागले. मध्ययुगीन काळामध्ये निरनिराळ्या युद्धजन्य अशांततेमुळे शिक्षण व संस्कृतीचा लोप होतो की काय असे वाटू लागले. परंतु त्याही अग्निदिव्यातून शिक्षणाचा विकास कुंठित न होता तसाच पुढे चालू राहिला. चौदाव्या शतकामध्ये पाश्चिमात्य राष्ट्रांत विद्येच्या पुनरुज्जीवनाची लाट सुरू झाली. त्यामुळे ग्रीक व लॅटिन वाङ्मयाच्या अभ्यासाला पुन्हा जोराने चालना मिळाली. भौतिक शास्त्रांमध्ये निरनिराळे शोध लागल्यामुळे अभ्यासक्रमामध्ये अनेक विषयांची भर पडली. शिक्षणाच्या ध्येयामध्येही अनुकूल असेच बदल होत गेले. व्यक्तिस्वातंत्र्याचा विकास होऊन शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे, असे तज्ज्ञांना वाटू लागले.

व्यक्ती ही राष्ट्राच्या व समाजाच्या धारणेस एक आवश्यक घटक एवढीच व्यक्तीसंबंधीची कल्पना मर्यादित न रहाता तिच्या विकासाला भरपूर स्वातंत्र्य देण्यात येऊ लागले. शासनव्यवस्थेमध्ये लोकशाही तत्त्वांचा अंगीकार होऊ लागल्यामुळे व्यक्तीच्या स्वातंत्र्याला विशेष संधी देण्यात येऊ लागली. अर्थात या स्वातंत्र्याला मर्यादा फक्त राष्ट्राच्या संरक्षणाचीच. राष्ट्रस्वातंत्र्य धोक्यात न येईल अशा सर्व बाबींमध्ये व्यक्तीला स्वातंत्र्य देण्यात येऊ लागले.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात युरोप व अमेरिकेतील राष्ट्रांमध्ये शिक्षणासंबंधी असमाधानाची व विफलतेची भावना दिसून येते. त्याला महत्त्वाची कारणे म्हणजे ज्ञानाचा प्रचंड स्फोट, राष्ट्रीय भावनेची तीव्रता, शैक्षणिक सिद्धान्ताबाबत गोंधळ आणि जीवशास्त्रातील उत्क्रांतिवादाची सर्व शास्त्रांवर पडलेली छाप ही होत. कोपर्निकसच्या सिद्धान्तानंतर मानवी जीवनात एवढी मोठी खळबळ डार्विनच्या उत्क्रांतिवादानेच निर्माण केली.

डार्विनने जीवशास्त्राच्या आधारे–नैसर्गिक निवड ( Principle of Natural Selection ), जीवनासाठी धडपड ( Struggle for

Existence ) व जगण्यास लायक असलेल्यांचा टिकाव ( Survival of the Fittest ) हे तीन प्रमुख सिद्धान्त प्रतिपादन केले. या नव्या सिद्धान्ताच्या प्रकाशात इतर सर्व शास्त्रांतील तत्त्वांची पुन्हा मांडणी करणे भाग पडले. शिक्षणात कोणते ज्ञान अत्यंत आवश्यक आहे याची चर्चा सुरू झाली. आत्मसंरक्षण व जातिसंरक्षण यास प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे उपकारक ठरणारे ज्ञानच सर्वांत महत्त्वाचे आहे व तेच विद्यार्थ्यांना अग्रक्रमाने द्यावे असे ठरविण्यात आले आहे. शिक्षणामध्ये शास्त्रीय प्रवृत्ती ( Scientific Tendency ) निर्माण करण्यात हर्बार्ट स्पेन्सर, बेकन, टॉमस हक्स्ले यांचाच पुढाकार दिसून येतो. वैज्ञानिक प्रवृत्तीबरोबरच मानसशास्त्रीय प्रवृत्ती व समाजशास्त्रीय प्रवृत्ती यांची जोपासना शिक्षणाच्या क्षेत्रात होऊ लागली.

प्रथम अभ्यासक्रम हा विषयकेंद्रित असल्याचे आपणांस दिसून येते; त्यानंतरच्या काळात जीवशास्त्राचा व मानसशास्त्राचा उदय झाल्यानंतर बालक हे शिक्षणाचे केंद्र मानण्यात येऊ लागले. याही कल्पनेत विकास होऊन जॉन ड्यूयी यांच्या कल्पनेप्रमाणे व्यक्तीला समाजाव्यतिरिक्त अस्तित्वच असू शकत नाही असे मानण्यात येऊ लागले. त्यामुळे आजकाल शिक्षणाचा केंद्रबिंदू बालक हाच असला तरी तो सामाजिक संदर्भात आहे.

शिक्षणाच्या कल्पनेमध्येही त्या त्या वेळच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीचे प्रतिबिंब पहावयास मिळते. इ. स. पूर्वी ४ थ्या शतकामध्ये सॉक्रेटिस ज्ञानाला सर्वात अधिक महत्त्व देत असे. Knowledge is Virtue हे त्याचे शिक्षणासंबंधीचे बोधवाक्य होते. त्या वेळच्या सोफिस्टांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे तो मानवी व्यक्तीचे पावित्र्य मान्य करीत होता. Man is the Measure at all Things असे सोफिस्ट म्हणत असत. कायदे हे जर मानवाने केले आहेत तर त्यांनी मानव बांधला जाऊ नये. ते मोडण्याचे हक्कही मानवाला असले पाहिजेत.

प्लेटोच्या रिपब्लिक ग्रंथामध्ये त्याने प्रत्येक व्यक्तीला त्याच्या कुवतीनुसार राष्ट्राकरिता काही कर्तव्ये पार पाडण्यास बजावले आहे. व्यक्तिभेद मान्य करून त्यांनी समाजामध्ये तीन वर्ग मान्य केले. ( १ ) कामगारांचा, ( २ ) योद्ध्यांचा व ( ३ ) तत्त्वज्ञान्यांचा–तत्त्वज्ञ हेच राज्यकर्ते असावेत असे तो मानीत असे. शिक्षणाच्या निरनिराळ्या स्तरांवर या वर्गातील लोकांची निवड करण्यात येईल, असे त्याला वाटे. प्रत्येक वर्गाने आपणांस नेमून दिलेले काम करावे व त्यातच राष्ट्राचे व व्यक्तीचे हित आहे असे तो मानीत असल्यामुळे कुटुंब, संपत्ती, लग्नसंस्था व शिक्षण या सर्वांवर शासनव्यवस्थेचे नियंत्रण त्याने गृहीत धरले आहे. तिसऱ्या शतकामध्ये

ॲरिस्टॉटलने प्लेटोचीच मते प्रतिपादिली आहेत. मात्र शासनासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे असे तो मानीत असे. त्याने त्या वेळच्या सर्व ज्ञानाचे संकलन करून ठेवले आहे. शिक्षणाच्या पद्धतीमध्ये निरीक्षणाला व प्रयोगाला ॲरिस्टॉटलच्या विचारामुळे चालना मिळाली. त्याने प्रतिपादलेल्या उद्‍गामी व अवगामी पद्धती-मुळे शास्त्रीय संशोधनास मदत झाली, असेच म्हणावे लागेल.

पुढे १४ व्या शतकामध्ये कोणत्या विषयाचे शिक्षण द्यावे, यासंबंधीचा विचार प्रामुख्याने चर्चिला जाऊ लागला. शास्त्रीय शिक्षण हेच सर्वांत महत्त्वाचे शिक्षण, असे विचार बेकन व हर्बार्ट स्पेन्सर यांनी मांडले. १६ व्या शतकामध्ये कोमेनिअस याने शिक्षणामध्ये पाठ्यपुस्तकांचे महत्त्व प्रतिपादन केले. त्याचप्रमाणे त्याने ज्ञानेंद्रियांच्या शिक्षणासही चालना दिली. १८ व्या शतकामध्ये रूसोने निसर्गवाद प्रतिपादला. त्यामुळे शिक्षण हे मुलांच्या सहजप्रवृत्तीनुसार व निसर्गाच्या सांनिध्यात दिले गेले पाहिजे असा विचार पुढे आला. त्याचप्रमाणे शिक्षण हे सार्वत्रिक असावे असेही मानले जाऊ लागले. शिक्षक-प्रशिक्षणाला पेस्टॉलॉझीने चालना दिली, तर अध्यापनपद्धतीमध्ये पाच पायऱ्या विशद करून अध्यापनतंत्राला मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न हर्बार्टने केला. आतापर्यंतचे शिक्षण हे सहासात वर्षांवरील मुलांसाठीच होते. त्या वयापूर्वीच्या मुलांमुलींच्या शिक्षणाकडे फ्रोबेल व मॉंटेसोरी यांनी विशेष लक्ष दिले.

१९ व्या शतकामध्ये औद्योगिक क्रांती सुरू झाली व त्यामुळे सामाजिक परिस्थितीत आमूलाग्र परिवर्तन घडून आले. प्रत्येक व्यक्तीला उपजीविकेसाठी शिक्षण घेणे क्रमप्राप्त झाले. सर्व उद्योगधंद्यांचे यांत्रिकीकरण झाल्यामुळे प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाशिवाय दुसरा मार्ग उरला नाही. शिक्षणाची सर्वांना समान संधी हे तत्त्व लोकशाही राष्ट्रांत मान्यता पावले आहे. बौद्धिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण अपरिहार्य वाटू लागले. आज व्यवसाय व शिक्षण यांची अविभाज्य सांगड घालण्यात येऊ लागल्याचे दिसते.

वरील विवेचनावरून आपणांस असे दिसून येईल की, शिक्षणाची प्रचलित परिस्थिती समजून घेण्यासाठी ज्याप्रमाणे गतेतिहासातील निरनिराळी परिवर्तने अभ्यासणे आवश्यक ठरते, त्याचप्रमाणे भावी शिक्षणाचे स्वरूप कसे राहील याचा अंदाज बांधण्यासाठीही ते उपयुक्त ठरेल. या पार्श्वभूमीवर आपण ग्रंथामध्ये पुढे दिलेल्या थोर शिक्षणतज्ज्ञांचे शैक्षणिक विचार समजून घेतल्यास शिक्षणाची नवी वळणे समजून घेणे सुलभ होणार आहे.

— लेखक

# प्लेटो

| | |
|---|---|
| जन्म | इ. स. पू. ४२७ किंवा ४२९ |
| मृत्यू | इ. स. पू. ३४७ |

पाश्चिमात्य तत्त्वज्ञांमध्ये शिक्षणाला तत्त्वज्ञानाची जोड देण्यात प्लेटो हा अग्रेसर होता. त्याच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव जीवनाच्या सर्व क्षेत्रांतील विचारांवर गेल्या वीस शतकांचेवर पडलेला दिसून येतो. त्या वेळचे पारंपरिक विचार, रूढी व धार्मिक कल्पना यांना प्लेटोने आपल्या क्रांतिकारक, स्वतंत्र व नवीन विचाराने चांगलाच धक्का दिला होता. प्लेटो हा शिक्षकही होता. प्लेटोच्या पूर्वी ग्रीस देशामध्ये संस्कृतीचा प्रचार करण्याचे कार्य सोफिस्ट करीत असत. त्यांनी ज्ञानाची दुकानदारीच मांडली होती. ग्रीक लोकांना आपल्या पूर्वीच्या संस्कृतीच्या मानाने आपला दर्जा फार कमी आहे असे वाटत असे व सांस्कृतिक दर्जा उंचावण्यासाठी त्यांना सोफिस्ट लोकांनी दिलेल्या शिक्षणाची जरुरी भासत असे. मनुष्याला हव्या असलेल्या ज्ञानाचा सोफिस्ट विक्रय करीत असत. शाश्वत मूल्यांबद्दल त्यांना विधिनिषेध नव्हता. त्यांच्याबद्दल जनतेतील बुद्धिवादी लोकांमध्ये एकप्रकारची घृणाच असे. त्यांच्या तत्त्वज्ञानाची बैठक भौतिक होती. "Man is the measure of all things"—मनुष्याला जे जे चांगले ते ते सर्व योग्य असे ते म्हणत असत. याच तत्त्वज्ञानाचा पुन्हा उदय कार्यवादी लोकांच्या तत्त्वज्ञानात

( Pragmatists ) झाल्याचे दिसून येते. 'What works well is true' ( जे व्यवहारात उपयोगी पडते ते सत्य ) हे विधान आणि सोफिस्ट लोकांचे मूळ तत्त्वज्ञान यांमध्ये पुष्कळच समानता दिसून येते. तथापि हे जरी खरे असले तरी त्या वेळच्या परिस्थितीत, मानवाच्या वैचारिक विकासाच्या अवस्थेत, हे तत्त्वज्ञान पेलण्यासारखे नव्हते. म्हणून समाजामध्ये सोफिस्टांची अवहेलना, हेटाळणी व द्वेष होत असे.

अशा परिस्थितीमध्ये प्लेटोचा जन्म इ. स. पू. ४२७ साली ग्रीस देशात झाला. त्याच्या जन्माच्या काळासंबंधी इतिहासामध्ये काही मतभेद दिसून येतात. काहींच्या मते त्याचा जन्म इ. स. पू. ४२९ साली झाला असावा असे वाटते. प्लेटोचे बालपण, शिक्षण यांसंबंधी फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. एवढे मात्र खरे की, त्याचा जन्म अथेन्स शहरी, एका उंच अमीरउमराव, जहागीरदार, श्रीमंत व सुखवस्तू कुटुंबात झाला. त्या वेळच्या रूढीनुसार त्याला उत्तम प्रकारचे शिक्षण मिळाले असले पाहिजे. घरची श्रीमंती असल्याकारणाने त्याने भरपूर प्रवास केला असावा. त्यामुळे त्याच्या विचारात प्रगल्भता व अनुभवामध्ये विविधता आलेली होती. वयाच्या २० व्या वर्षी त्याची अथेन्सचा बंडखोर विचारवंत सॉक्रेटीस याच्याशी गाठ पडली. त्याचे रूपांतर पुढे गाढ मैत्रीत झाले. तो स्वतःस सॉक्रेटीसचा शिष्य व अनुयायी समजत असे. खरे म्हणजे दोघांच्या वयामध्ये बेचाळीस वर्षांचे अंतर असतानाही त्यांची मैत्री इतकी चिरकाल टिकली ही एक आश्चर्याची गोष्ट आहे.

सॉक्रेटीसच्या तत्त्वज्ञानासंबंधी आज आपणांस जी माहिती मिळू शकते, त्याबद्दल आपण प्लेटोचे ऋणी असले पाहिजे. प्लेटो हा सॉक्रेटीसच्या सतत बरोबर असे. त्यांनी चालविलेल्या चर्चासत्रात तो भाग घेत असे. सॉक्रेटीसने आपले तत्त्वज्ञान ग्रंथरूपाने कधीच लिहून ठेवले नसले, तरी प्लेटोच्या लिखाणावरून आपणांला त्याची पूर्ण प्रचीती येऊ शकते. प्लेटोने हे कार्य केले नसते तर भावी पिढी सॉक्रेटीसच्या मूलगामी व क्रांतिकारक विचारांना मुकली असती. सॉक्रेटीसशी असलेल्या प्लेटोच्या या संबंधाचा पुढे आणखी एक परिणाम झाला व त्यामुळे त्याच्या जीवनास निराळे वळण मिळाले. सॉक्रेटीस हा निर्भीड व सत्यप्रिय असल्याकारणाने प्रचलित मतांना न जुमानता तो आपले विचार जनतेमध्ये प्रसृत करीत असे. ते विचार रूढ कल्पनांना धक्का देणारे असल्याकारणाने राज्यकर्त्यांना व हितसंबंधी पंडितांना रुचणारे नव्हते. त्यामुळे त्यांनी सॉक्रेटीसवर देशद्रोहाचा आरोप ठेवून त्याला विषपेला घ्यावयास लावून आत्मसमर्पण करण्यास भाग पाडले होते.

सॉक्रेटीसवर 'तो जुन्या देवदेवतांना मान्यता देत नाही, नवीन देवता उत्पन्न करतो व तरुणांची माथी भडकवतो' असा आरोप करण्यात आला होता. सॉक्रेटीसच्या वधाचे जे निरनिराळे परिणाम घडून आले त्यांत त्याच्या मित्रांना व शिष्यांना आपल्या जीवितास धोका आहे असे वाटू लागले. त्यामुळे प्लेटोला देशत्याग करावा लागला. आणखी एक परिणाम असा की, त्याच्या परमप्रिय गुरुजींचा अशा प्रकारे अत्यंत अन्याय्य परिस्थितीत दुःखद अन्त झाल्याकारणाने त्यांचेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता प्लेटोने सॉक्रेटीसच्या मतांचा प्रचार करण्याचा दृढ निश्चय केला. त्याची ही भ्रमंती १२ वर्षे चालू होती.

बारा वर्षांनंतर पुन्हा तो आपल्या गावी आला व त्याने एक शाळा उघडली. तिचे नाव ॲकॅडमी असे ठेवले होते. त्या शाळेत तत्त्वज्ञानविषयक चर्चा, संवाद, भाषणे व प्रयोग होत असत. प्लेटो हा एक साधा शिक्षक नव्हता. तो मूळचा तत्त्वज्ञ आणि आपल्या तत्त्वांची पारख करण्यासाठी शिक्षक बनला होता. त्याची ही शाळा म्हणजे हल्लीच्या पद्धतीप्रमाणे लहान शाळा नव्हती. त्या ठिकाणी लहानमोठे स्त्रीपुरुष, सर्व प्रकारचे लोक येत असत. या शाळेमध्ये विचार कसा करावा हेच प्रामुख्याने शिकविले जात असे. तत्त्वांच्या शोधापेक्षा तत्त्व शोधण्याच्या पद्धतीवरच अधिक भर दिला जात असे. ही पद्धती म्हणजे सॉक्रेटीसने अनुसरलेली प्रश्नपद्धती होय. सॉक्रेटीस आपल्या शिष्यांना अनेक प्रश्न विचारून त्यांच्या खुळचट व चुकीच्या कल्पना प्रथम दूर करीत असे व नंतर विचारप्रवर्तक व मार्गदर्शक प्रश्न विचारून सत्याचा साक्षात्कार त्यांना घडवीत असे. ही सॉक्रेटीसची पद्धती अनुसरण्यापूर्वी त्याने आपल्या शाळेत व्याख्यान देण्याचा प्रयत्न केला होता. परंतु तो इतका अयशस्वी ठरला की, त्याचे व्याख्यान संपण्यापूर्वीच बरेचसे श्रोते त्याची शाळा सोडून निघून गेले होते. त्याची चर्चा-पद्धती मात्र बरीच यशस्वी झाल्याचे दिसून येते. कारण चर्चेमध्ये अनौपचारिक, खेळीमेळीचे, विनोदी व आनंदी वातावरण असे. चर्चेच्या जोडीला खाद्य व पेय पदार्थ भरपूर प्रमाणात असत.

प्लेटो केवळ सॉक्रेटीसच्याच तत्त्वज्ञानाचा प्रसार करीत नव्हता, तर त्याचे स्वतःचेही वैशिष्ट्यपूर्ण व स्वतंत्र तत्त्वज्ञान होते. याच वेळी प्लेटोने आपले दोन अलौकिक ग्रंथ लिहिले. ( १ ) Republic व ( २ ) The laws. प्लेटोच्या तत्त्वज्ञानाने शासनव्यवस्था व समाजरचना यांचा पाया घातला. तो आदर्शवादाचा प्रणेता समजला जातो, हे त्याच्या याच तत्त्वज्ञानावरून.

## प्लेटोचे तत्त्वज्ञान

ज्ञान हे सनातन असून ते आत्म्याचे अविच्छिन्न भाग असते. ते आतून येत असते. आत्म्याचा गर्भावस्थेमध्ये शरीराशी संबंध येताना ते काहीसे धूसर होते. यामुळे बालपणामध्ये ज्ञानाचा आविष्कार दिसून येत नाही. परंतु ते आपल्याशी निगडीत असल्याने ते नवीनपणे बाहेरून कोठूनतरी येते असे समजणे चुकीचे आहे. आत्मा हा नित्य, अमर व शाश्वत असतो. शरीरमात्र अनित्य व अशाश्वत असते. आत्म्याचे अंगभूत ज्ञानसुद्धा शाश्वत व नित्य असेच असते. ज्ञानाचे तीन प्रकार मानता येतात—( १ ) ज्ञानेंद्रियांच्या साहाय्याने मिळणारे ज्ञान. जसे–लिंबू आंबट असते. बर्फ थंड असते. गुलाबाचे फूल तांबडे आहे. प्लेटोच्या मते ज्ञानेंद्रियांच्या साह्याने मिळणारे ज्ञान असत्य व म्हणून निरुपयोगी आहे. ( २ ) दुसऱ्या प्रकारचे ज्ञान म्हणजे निरनिराळ्या वस्तुमात्रांबद्दल आपली बनलेली मते. ही सुद्धा नित्य व शाश्वत नसल्याकारणाने व अंत:प्रेरणेने बनलेली नसल्याकारणाने असत्य मानावीत. तिसऱ्या प्रकारचे ज्ञान-आत्म्याच्या प्रचितीमुळे किंवा पुन:प्रत्ययाने आतून उत्स्फूर्त होत असल्याकारणाने ते सत्य व शाश्वत समजले पाहिजे. मानसिक व अंत:स्फूर्त ज्ञान हे अतींद्रिय असते. ते सत्य, शिव व सुंदर होय. प्लेटोच्या मते दोन विश्वे संभवतात. एक कल्पनांचे व विचारांचे विश्व आणि दुसरे वस्तूंचे स्थावरजंगम मालमत्तेचे, कल्पनांचे जग स्थिर, चिरंतन व खरे असते. ते अव्यक्त, निर्गुण, निराकार व मानसिक असते ( Spaeceless ). दुसरे विश्व खोटे, अनित्य व केवळ भासमान होय. खोट्या विश्वाच्या मागे मानवाने लागणे हे त्याच्या हिताचे नाही. जगामध्ये जर काही श्रेष्ठ व चिरंतन असेल तर तो म्हणजे शाश्वत विचार होय. तो वस्तुमात्रापासून व भौतिक जगापासून निराळा असतो. भौतिक जग हे ज्ञानेंद्रियांचे, अपूर्ण व स्थलकालाबाधित बदलणारे असते. त्यातूनच सर्व वस्तुमात्रांचा उगम होतो. समाजातील सर्व दुष्ट प्रवृत्ती यातूनच जन्म घेतात.

## मानसशास्त्र

व्यक्ती ही आत्मा व शरीर यांची बनलेली असते. आत्म्याला तीन गुणधर्म दिसून येतात—( १ ) वासना किंवा भूक, ( २ ) स्वयंप्रेरणा किंवा चैतन्य, ( ३ ) विचार. आत्म्याचा शरीराशी संबंध आल्याकारणाने वासना व प्रेरणा निर्माण होतात. त्यांच्या पोटीच सहजप्रवृत्तींचा जन्म होतो. शरीराच्या साहचर्यामुळे निर्माण झालेले गुणधर्म प्लेटोच्या मते हीन प्रतीचे आहेत. आत्म्याचा शुद्ध आविष्कार विचारामध्ये दिसून येतो. आत्मा हा शरीररात आल्याकारणाने बंदिवान

बनतो. त्यामुळे त्याचे शुद्ध स्वरूप कमी होत असते. मन व शरीर यांचा समन्वय साधणे अत्यंत जरूर आहे. त्यामुळेच मानवी जीवनाला पूर्णत्व प्राप्त होईल.

## नीती

प्लेटोच्या मते मानवी जीवनात कल्याण साधणे ही खरी नीतीची कल्पना आहे. नीतीसाठी मनुष्याला सद्‌गुणांची जोपासना करणे भाग आहे. अशा प्रकारच्या सद्‌गुणामध्ये न्याय, संयम, औदार्य व समतोलपणा (Temperance) यांना प्रमुख स्थान आहे. सहजप्रवृत्तींच्या अनुषंगाने वासना निर्माण होत असल्या तरी त्यांना संयमाचा बांध घालणे आवश्यक आहे व त्यामुळे नीतीचे अधिराज्य प्रस्थापित करता येईल. भौतिक जगामध्ये दुष्ट प्रवृत्ती वास करीत असतात. त्यांचा उगम शारीरिक वासनांशी निगडित असतो. या दुष्ट प्रवृत्तींवर विजय मिळवून कल्पनांच्या व विचारांच्या जगामध्ये रममाण होणे हे खऱ्या ज्ञात्याचे कर्तव्य आहे.

**शासन व समाजव्यवस्था**—प्लेटोचे ध्येय एक आदर्श राष्ट्र निर्माण करणे असे होते. आदर्श राष्ट्रासाठी आदर्श नागरिक तयार करणे अत्यंत जरुरीचे आहे, अशी त्याची धारणा होती. या ध्येयपूर्तीसाठी शिक्षण हे एक प्रभावी साधन आहे, अशी त्याची खात्री असल्यामुळे त्याने आपले शिक्षणविषयक विचार आपल्या ‘The Republic and The Laws’ या पुस्तकात ग्रथित केले आहेत. राष्ट्रनिर्मितीसाठी शिक्षणाचा कसा उपयोग होतो हे त्याला स्पार्टा व अथेन्स या राष्ट्रांच्या उदाहरणावरून चांगले माहीत होते. स्पार्टा या राष्ट्रामध्ये जेते व जित यांचा सतत संग्राम चालू असे व आपल्या अस्तित्वासाठी जेत्या लोकांना आपले लष्कर सुसज्ज ठेवणे भाग होते. म्हणून त्यांच्या शिक्षणपद्धतीचे ध्येय लढाऊ सैनिक तयार करणे असे होते. त्यामुळे त्या राष्ट्रामध्ये व्यक्तीला गौण दर्जा प्राप्त झाला होता. प्लेटोचे विचार या धोरणाशी सुसंगतच होते. कुटुंबव्यवस्थेवर व व्यक्तिस्वातंत्र्यावर त्याचा विश्वास नव्हता. व्यक्तीला स्वातंत्र्य दिल्यास राष्ट्र कमकुवत बनते असे त्याचे मत होते. व्यक्ती व राष्ट्र यांच्या हितसंबंधामध्ये राष्ट्राच्या हितसंबंधाना अधिक महत्त्व देणे भाग आहे. किंबहुना त्याचे असेही मत होते की, व्यक्तीने आपले हितसंबंध राष्ट्राच्या हितसंबंधांशी निगडित ठेवले पाहिजेत. राष्ट्र म्हणजे केवळ व्यक्तींचा एक समूह असे नसून त्याला स्वतंत्र अस्तित्व व व्यक्तिमत्व असते. व्यक्तीचे जे गुणधर्म तेच राष्ट्राचेही असतात. मात्र राष्ट्रामध्ये ते मोठ्या प्रमाणात दिसतात एवढेच. व्यक्तीमध्ये वासना, प्रेरणा व विचार हे तीन प्रमुख गुणधर्म दिसून येतात. त्यानुसार समाजामध्ये तीन प्रकारचे लोक पहावयास मिळतात. गुलाम किंवा हीन जातीच्या लोकांमध्ये वासनांचे प्राबल्य असते. त्यांना

शिक्षणादि संस्कारांची जरुरी नसते. त्यांचे शिक्षण त्यांच्या आईबापांकडून पारंपरिक पद्धतीनुसार होऊ द्यावे. समाजातील दुसरा वर्ग म्हणजे सैन्य किंवा लढाऊ वृत्तीच्या लोकांचा. त्यांच्यामध्ये रजोगुण किंवा प्रेरणा वा चैतन्य दिसून येते. तिसरा वर्ग उच्च लोकांचा. ते विचाराच्या विश्वामध्ये रममाण झालेले असतात. दुसऱ्या व तिसऱ्या वर्गाच्या लोकांसाठी शिक्षणाची जरुरी असते. मात्र खरे शिक्षण कुटुंबात कधीच होऊ शकत नाही. आपल्या नागरिकांच्या शिक्षणाची जबाबदारी राष्ट्राने स्वीकारली पाहिजे. प्लेटो हा सार्वत्रिक शिक्षणाचा पुरस्कर्ता नव्हता. निवडक लोकांना शिक्षण द्यावे असे त्याचे मत होते. या लोकांच्यावर राष्ट्रासाठी फार मोठा त्याग करण्याची जबाबदारी येऊन पडत असे. अशा प्रकारे शिक्षित झालेल्या लोकांतूनच तत्त्वज्ञ प्रशासक निवडले जात असत. या लोकांना स्वतःचे कुटुंब वा संसार करता येत नसे. त्यांना त्याग, सेवा व शिस्त यांवर आधारलेले संन्यस्त वृत्तीचे जीवन जगावे लागत असे. मात्र ज्या निवडक लोकांसाठी प्लेटोने उच्च शिक्षण आवश्यक मानले होते, त्यांना आपल्या मुलांना शासकीय शाळेमध्ये पाठविणे आवश्यक होते; कारण मुले ही राष्ट्राची संपत्ती समजली जात असे.

**स्त्रिया**—प्लेटोने स्त्री व पुरुष यांमध्ये फारसा भेद केलेला नाही. दोघांनी राष्ट्राची समान कामे करावीत, असे त्याने आग्रहाने प्रतिपादिले आहे. प्लेटोला, तो आमरण ब्रह्मचारी असल्यामुळे, स्त्रीस्वभावातील वैशिष्ट्ये तितकीशी आकलन झालेली नसावीत. त्याच्या मताप्रमाणे स्त्रिया या पुरुषांपेक्षा काहीशा अशक्त असतात; एवढाच काय तो फरक. शिक्षणाच्या बाबतीत प्लेटोने मुले व मुली यांच्याकरिता सारखाच अभ्यासक्रम नेमून दिला होता. यावरून स्त्रिपुरुषांना समान संधी मिळावी असे प्लेटोचे मत होते असे दिसून येते.

**शिक्षण**—प्लेटोने शिक्षणाला अतिशय महत्त्व दिले आहे. शिक्षण म्हणजे नीतिमत्ता साधण्याची एक प्रक्रियाच होय. प्लेटोचे परमोच्च ध्येय राष्ट्रामध्ये नीतिमत्तेचे व एकतेचे अधिराज्य निर्माण करणे हे असल्यामुळे त्यासाठी त्याने शिक्षणाचा उपयोग केला. शिक्षणाने व्यक्ती सुसंस्कृत होतील, नीतिमान बनतील व कायद्याच्या किंवा नीतिनियमांच्या बंधनांची जरुरी न लागता ते ऐक्यभावनेने वागतील अशी त्याची अपेक्षा आहे. शिक्षणाने व्यक्तींची विवेकबुद्धी जागृत होऊ शकेल व ज्या गोष्टी स्वीकारणे जरूर आहे, त्याच गोष्टी ते स्वीकारतील व ज्या गोष्टींचा त्याग करणे जरूर आहे, त्या सोडून देतील असे त्याला वाटले. ( By education the individual willlearn to hate what he ought to hate and love what he ought to love. ) शिक्षणामुळे

सहकार्य, ऐक्य, स्वार्थत्याग व सेवावृत्ती या गुणांचा परिपोष होईल व उत्तम नागरिक तयार होतील. नागरिकांतूनच प्रशासक निर्माण करावयाचे असल्यामुळे त्यांना चिरंतन मूल्ये समजणे आवश्यक आहे. या मूल्यांमध्ये सत्यं–शिवं–सुंदरम् यांना सर्वांत अधिक महत्त्व आहे. सुशिक्षित व्यक्तींनी वासनांच्या आहारी न जाता विचारांच्या व सद्‌गुणांच्या विश्वामध्ये रममाण झाले पाहिजे. ज्यांना खरी मूल्ये समजली आहेत, असेच लोक आपले ज्ञान योग्य रीतीने वापरू शकतात. अशाच लोकांमध्ये सेवावृत्ती व नेतृत्व हे गुण दिसून येतात. आणि हेच लोक राष्ट्राचे प्रशासन करण्यास लायक समजले पाहिजेत. शिक्षणामुळे व्यक्तीचा आणखी एक फायदा होतो, त्याला आपल्या वर्तनामध्ये समतोलपणा राखता येऊन व्यक्तिमत्वामध्ये सुसंवाद राखता येतो. शरीर व मन--विचार व सवयी--स्वार्थ व परार्थ या बाबतीत त्यांच्या मनात संघर्ष निर्माण होत नाही. समाजातील ज्या विशिष्ट वर्गांना प्लेटोने शिक्षणाच्यो बाबतीत सक्ती केलेली आहे, त्यांच्या अध्ययन-प्रक्रियेबद्दल मात्र आनंदी व स्वातंत्र्याचे वातावरण निर्माण करावे असे त्याने प्रतिपादिले आहे.

शिक्षणाचे त्याने मानलेले दोन प्रकार

[ १ ] जीवनोपयोगी किंवा व्यवहारी व [ २ ] राष्ट्रसेवेसाठी आवश्यक असे. पहिल्या प्रकाराच्या शिक्षणामध्ये निरनिराळे हस्तोद्योग, उद्योगधंदे यांचा समावेश होतो. या औद्योगिक शिक्षणाला हीन प्रकारचे शिक्षण असे प्लेटोने मानले आहे. सद्‌गुणांचे व नीतिमत्तेचे जे बुद्धिनिष्ठ शिक्षण तेच उच्च प्रकारचे शिक्षण होय असे त्याचे मत होते. त्याच्या अभ्यासक्रमामध्ये शारीरिक व्यायाम, संगीत व गणित यांना विशेष प्राधान्य दिले आहे. शिक्षणासाठी त्याने आठ नियम तयार केले आहेत. त्या नियमांचे परिपालन केल्यास शिक्षणाचे कार्य सुव्यवस्थित रीतीने चालेल असे त्याला वाटते.

( १ ) शिक्षणासाठी शाळेमध्ये व समाजामध्ये नैतिक वातावरण असले पाहिजे.

( २ ) नैतिक नियमांची व त्यांनुसार अपेक्षित वागणुकीची कडक रीतीने अम्मलबजावणी केली पाहिजे.

( ३ ) होमरसारख्या, ज्या काव्यामध्ये असत्य गोष्टी प्रतिपादन केल्या आहेत अशी काव्ये किंवा गीते विद्यार्थ्यांना शिकवू नयेत.

( ४ ) शिक्षणामध्ये Pantomimes ( मूकनाट्य ) चा वापर करू नये.

( ५ ) मुलांमुलींसाठी जे विशिष्ट प्रकारचे खेळ ठरवून दिले आहेत, त्यांत सहसा बदल करू नये.

( ६ ) विद्यार्थ्यांना रंगकाम, शिल्प, बांधकाम इत्यादी शिकवितान। नीतिनियमांनुसार त्यांवर नियंत्रण ठेवावे.

( ७ ) प्राचीन परंपरा व संस्कृती यांबद्दल विद्यार्थ्यांच्या मनामध्ये आदर-भाव असावा.

( ८ ) जे धार्मिक आचारविचार परंपरेने चालू आहेत त्यांमध्ये बदल करू नये. धार्मिक गाणी, सामुदायिक गीते किंवा काव्य यांमध्ये बदल केल्यास त्याचा राष्ट्रधारणेवर परिणाम घडून येतो.

## शैक्षणिक प्रशासन

शिक्षक हा उच्च संस्कृतीचा व आदर्श नीतिमत्तेचा असावा. त्याचे वय पन्नास-च्या वर असावे. पन्नास वर्षांचे आत व्यक्तीला पूर्णत्व येत नसल्याकारणाने त्याच्यावर शिक्षणाची जबाबदारी टाकू नये. शिक्षकाची मुदत पाच वर्षांची असावी. शिक्षकाची निवड करण्याचे काम शिक्षणमंत्र्यांचे राहील. शिक्षणमंत्र्यांची ही निवड मॅजिस्ट्रेट करतील. शिक्षणमंत्र्यांच्या हाताखाली एक संगीत संचालक व दुसरा शारीरिक शिक्षण संचालक राहील. निरनिराळ्या स्पर्धा घेण्यासाठी शिक्षक राहतील. अध्या-पनपद्धतीचे बाबतीत ( Transfer of training ) प्रशिक्षणाचे संक्रमण हे तत्त्व प्लेटोला मान्य असल्याचे दिसून येते. गणितामुळे झालेली स्मरणशक्तीची वाढ व्यक्तीला आपल्या जीवनात हरघडी उपयोगी पडेल असे त्याचे मत होते. आपल्या अभ्यासक्रमामध्ये गणिताच्या अभ्यासाला त्याने बरेच महत्त्व दिले होते.

Arithmatic stirs of him who is by nature sleepy and dull and makes him quick to learn, rententive shrewd and added by art devine he makes progress quite beyond his natural powers.

## शिक्षणक्रम

प्लेटोने व्यक्तीच्या शिक्षणासाठी फार मोठा शिक्षणक्रम सुचविला आहे. एक ते तीन या वर्षामध्ये मुलांमुलींचे शिक्षण घरीच व्हावे. त्या वेळी त्यांना स्वच्छतेची व नीटनेटक्या जीवनाची कल्पना आणून द्यावी. निरनिराळ्या शारीरिक व्याधीं-पासून त्यांचे संरक्षण करावे. सुदृढ व निरोगी जीवनासाठी आरोग्याच्या चांगल्या सवयी लावाव्यात. त्यासाठी त्यांचे संगोपन चांगल्या रीतीने करण्यात यावे. पुढे सहा वर्षांपर्यंत स्वच्छतेचे व निरोगी जीवनाचे शिक्षण देण्यात यावे. या वयात मुलांमुलींना खेळ, गाणी व गोष्टी शिकवाव्यात. त्यांच्या अंगी धैर्य व स्वयंशिस्त

येईल असे कार्यक्रम आखावेत. शारीरिक विकासावर विशेष भर देऊन शरीर काटक व प्रतिकारक्षम करण्याचा प्रयत्न करावा. शिक्षणाची सुरवात योग्य सुमुहूर्तावर करावी.

" That the begining in every task is the Chief thing especially for any creature that is young and tender. For it is than that the child is best mouled and takes the impression that one wishes to stamp upon it. "

सहा ते तेरा या वयातील मुलामुलींना स्वतंत्र शालागृहामध्ये शिक्षण देण्यात यावे. या वेळी संगीत, खेळ, धर्म, नीती व गणित हे विषय शिकवावेत. भूमिती व गणित या विषयांमुळे विद्यार्थ्यांच्या विचाराला चालना मिळेल व त्यामुळे बाह्य जीवन व विश्वातील मूलभूत एकता यांचे प्रत्यंतर विद्यार्थ्यांना येईल. तेरा ते वीस या वयातील मुलामुलींना माध्यमिक शिक्षण देण्यात येईल. त्यात वाद्यसंगीत, काव्य, धार्मिक गाणी यांचा समावेश असेल. या वेळच्या शिक्षणात बौद्धिकापेक्षा शारीरिक व्यायामावर अधिक भर देण्यात येईल. त्यात लष्करी शिक्षणाचाही समावेश असेल. त्यामुळे प्रत्येक नागरिक हा आपल्या देशाच्या संरक्षणासाठी भावी जीवनामध्ये सुसज्य व तयार राहील. मुलांबरोबर मुलींनाही लष्करी शिक्षण देण्याचा कार्यक्रम प्लेटोने आखला आहे. वीस ते तीस या वयामध्ये विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण देण्यात देईल. मात्र उच्च शिक्षणासाठी फार काळजीपूर्वक निवड करण्यात येईल. त्यांच्या शिक्षणासाठी विविध शास्त्रे व तत्त्वज्ञान यांचा अभ्यासक्रम आखण्यात आला होता. त्यामुळे विद्यार्थ्यांना उच्च पातळीवरून विचार करण्याची सवय लागेल असे त्याचे मत होते.

या दोन विषयांबरोबरच गणित, भूमिती व संगीत या विषयांचाही अभ्यासक्रमात समावेश असेल. अमूर्त स्वरूपात चिंतन करणे ही कला विद्यार्थ्यांनी आत्मसात करावी, असा प्लेटोचा आग्रह आहे. कारण विचारातील किंवा कल्पनेतील सृष्टी हीच खरी असून वस्तुमात्राचे जग हे नाशवंत व मिथ्या आहे असे प्लेटो म्हणतो. तीस ते पस्तीस वर्षांच्या प्रौढांना तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, समाजशास्त्र, कायदा व शिक्षणशास्त्र यांचे शिक्षण देण्यात येईल. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सत्य, शिव व सुंदर ही शाश्वत मूल्ये वाढीस लागतील. त्यांना विश्वाचे खरे ज्ञान प्राप्त होऊन समाजाचे नेतृत्व करण्यास व त्याची नैतिक पातळीवरून सेवा करण्यास ते योग्य बनतील. हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या लोकांतून शासनासाठी जरूर ते अधिकारी निवडण्यात येतील. अशा अधिकाऱ्यांनी ३५ ते ५० वर्षे वयांपर्यंत समाजाची

निस्वार्थ बुद्धीने सेवा करावयाची. पन्नास वयाच्या पुढील लोकांनी आपला जीवनकाल तत्त्वज्ञानाच्या चिंतनामध्ये व्यतीत करावयाचा. या चिंतनातून त्यांना विश्वातील शाश्वत सत्य व एकता समजून येईल. सत् कोणते व असत् कोणते याचे ज्ञान त्यांना होऊ शकेल. राष्ट्राचा प्रमुख हा तत्त्वज्ञ असावा असे प्लेटोने आग्रहाने प्रतिपादिले आहे. ' Philosophers shiuld be rulers ' हे त्याचे मत सुप्रसिद्ध आहे. तत्त्वज्ञानांचा समतोल व सर्वंकष विचार करण्याची सवय असल्यामुळे ते कल्याणकारी राज्य निर्माण करतील, असा प्लेटोचा विश्वास होता. प्लेटोला लोकशाही मान्य नव्हती असे दिसते.

लोकांच्या मतांवर व वैयक्तिक स्वातंत्र्यावर राष्ट्राचा कारभार सुपूर्त केल्यास ते राष्ट्र फार काळ टिकेल असे त्याला वाटत नव्हते. कोणतेही राष्ट्र कार्यक्षम व बलवान होण्यासाठी त्यामधील सर्व जातीजमातींमध्ये व व्यक्तींमध्ये ऐक्य भावना पूर्णपणे रुजली पाहिजे. हे ऐक्य निर्माण करण्यासाठी शासनाचे नियंत्रण अत्यंत प्रभावीपणे प्रत्येक व्यक्तीवर असणे आवश्यक आहे, असे प्लेटो मानीत असे. त्यामुळे त्याने व्यक्तिस्वातंत्र्याचा, समतेचा बळी देऊन राष्ट्र बलवान करण्यावर अधिक भर दिलेला दिसतो. हे त्याचे विचार पारंपरिक राज्यपद्धतीशी सुसंगत असेच होते. स्पार्टा हे अत्यंत बलशाली व समर्थ राष्ट्र हुकूमशाही व व्यक्तिस्वातंत्र्याला वाव न देणारेच होते. त्यानंतरच्या काळात अथेन्स या राष्ट्रामध्ये, शासनाची पकड थोडी ढिली पडल्याबरोबर राष्ट्र कसे कमकुवत बनले हे प्लेटोने पाहिले होते. त्या वेळेच्या उदारमतवादी शिक्षणाच्या ( Liberal ) ज्या कल्पना होत्या, त्याच प्लेटोच्याही होत्या असे दिसून येते. शिक्षण हे केवळ सुखवस्तू लोकांकरिता आहे, त्यांचा मोकळा वेळ सत्कारणी लागावा एवढाच त्याचा हेतू.

कामकरी लोकांसाठी शिक्षणाची जरुरी नाही. त्यांनी आपले शिक्षण अनुकरणाने व परंपरागत पद्धतीने घ्यावे अशी जी मतप्रणाली पूर्वीपासून चालत आलेली होती, तिलाच प्लेटोने उचलून धरले. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे हे मत प्लेटोने पाश्चात्य शिक्षणाच्या इतिहासात प्रथम प्रतिपादण्याचा मान मिळविला. शिक्षणावर शासनाचे नियंत्रण असले पाहिजे हे तत्त्वही अत्यंत प्रभावीपणे त्याने आपल्या ग्रंथात सर्वप्रथम मांडले आहे. या तत्त्वाचा स्वीकार केवळ हुकूमशाही राष्ट्रातच नव्हे तर लोकशाही राष्ट्रातही करण्यात आला. अलिकडच्या काळामध्ये कित्येक देशांत शिक्षणाची जबाबदारी शासनाने स्वीकारल्याची उदाहरणे आपणांस दिसून येतात. शिक्षण मिळणे हा प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिद्ध हक्क असून ते प्रत्येक व्यक्तीच्या गरजेनुसार व पात्रतेनुसार उपलब्ध करून देणे हे शासनाचे कर्तव्य आहे, असे बहुसंख्य प्रगत राष्ट्रे मान्य

करू लागली आहेत. जर्मनी, इटली, रशिया या राष्ट्रांनी शिक्षणावर कडक नियंत्रण ठेवले ते निराळ्या हेतूने.

एका विचाराची, एका ध्येयाने प्रेरित झालेली व शासनाशी पूर्णपणे 'स्वामीनिष्ठ राहणारी तरुण पिढी' निर्माण करण्याचे कार्य हुकूमशाही राष्ट्रांना निर्माण करायचे असते. त्यासाठी राष्ट्र हेच सर्वस्व समजले जाऊन व्यक्ती कःपदार्थ समजली जाते. राष्ट्राचे हित तेच व्यक्तीचे हित, राष्ट्राचे कल्याण तेच व्यक्तीचे कल्याण असे ब्रीदवाक्य मानण्यात येते. व्यक्तीला स्वातंत्र्य, समता, न्याय यांचा अनुभव घेता येत नाही. प्लेटोची विचारसरणी काहीशी हुकूमशाही विचारसरणीशी मिळतीजुळती असली तरी राष्ट्रातील सुशिक्षित नागरिकांना विशिष्ट वयानंतर वैचारिक स्वातंत्र्य असावे असे त्याचे मत होते. उच्च संस्कृती प्राप्त झालेली व्यक्ती नीतिमान बनेल व तिला कायद्याची बंधने घालण्यांची जरुरी लागणार नाही असे त्याचे मत होते. इ. स. पू. ५ व्या शतकात स्त्री-पुरुषांच्या बाबतीत त्याने समानता मानली हे आश्चर्य करण्यासारखे आहे.

त्याने आपल्या शिक्षणासाठी जो एवढा मोठा कालावधी निश्चित केला त्याचे कारण त्याला उत्तम प्रशासक व तत्त्वज्ञ निर्माण करावयाचे होते हे होय. सर्व-साधारण व्यक्तीचे शिक्षण विसाव्या वर्षीच पूर्ण होत असे. निवडक व अत्यंत लायक व्यक्तींना उच्च शिक्षणाचा लाभ घेता येत असे. शिक्षण घेणे हे पालकांच्या किंवा मुलामुलींच्या मर्जीवर अवलंबून नसले व त्यासाठी शासनाची सक्ती असली तरीसुद्धा शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये सक्तीचे, दंडाचे किंवा भीतीचे वातावरण नसे. शिक्षणामध्ये अधिकाधिक स्वातंत्र्य मिळावे व शालेय वातावरण आनंदी व आपुल-कीचे असावे यावर प्लेटोने भर दिला आहे. विचारांचे लष्करीकरण ( Redi-mentation ) प्लेटोने कधीच मान्य केले नाही. त्यामुळे प्लेटोची हुकूमशाही ही कल्याणकारी किंवा Benevolent dictatorship होती असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

प्लेटो हा एक महान् तत्त्ववेत्ता व शिक्षक होऊन गेला. सत्य, शिव व सुंदर यासंबंधीची शाश्वत मूल्ये आत्म्याचाच एक भाग असल्यामुळे ती चिरंतन व अविनाशी आहेत, असे त्याने प्रतिपादले. खरे ज्ञान हे कल्पनेत व विचारात असते. ज्ञानेंद्रियजन्य व व्यक्त वस्तुमात्रासंबंधीचे ज्ञान हे असत् व मिथ्या असल्या-कारणाने त्यांच्यामागे लागणे म्हणजे एक अविचारच होय. या त्याच्या तत्त्वज्ञानाचा परिपाक पुढील काही शतकांमध्ये ( Idealism) अध्यात्मवादाचा पाया घाल-ण्यात झाला.

● ● ●

# कोमिनिअस

| | |
|---|---|
| जन्म | १५९२ |
| मृत्यू | १६७० |

आधुनिक शिक्षणपद्धतीचा प्रणेता जॉन ॲमॉस कोमिनिअस याचा जन्म १५९२ साली मोरेव्हिया या प्रांतात झाला. मोरेव्हिया हा प्रांत झेकोस्लोव्हाकियात आहे. आधुनिक शिक्षणपद्धतीमध्ये शिक्षणाला ज्या उपकारक गोष्टी व तत्त्वे दिसून येतात, त्यांपैकी काही तत्त्वांचा साक्षात्कार ३०० वर्षांपूर्वी या शिक्षणशास्त्रज्ञाला झाला होता असे दिसून येईल. कोमिनिअसच्या जन्मापूर्वी युरोप खंडात विद्येच्या पुनरुज्जीवनाची लाट उसळली होती. गतकालच्या वाङ्मयाच्या कलाकुसरीने व संस्कृतीने लोक भारावून गेले होते. त्यातच नवनवीन शास्त्रीय शोधांची भर पडल्याकारणाने लोकांच्या जीवनाला एक प्रकारची गतिमानता प्राप्त झाली होती. पृथ्वीचा आकार निश्चित करणारा कोपरनिकस, थर्मामीटरचा शोध लावणारा गॅलिलिओ, गुरुत्वाकर्षणाचा प्रभाव दाखविणारा न्यूटन, गतीचे सिद्धान्त प्रतिपादणारा पास्कल कोमिनिअसच्या जन्मापूर्वी नुकतेच होऊन गेले होते. या शास्त्रीय वातावरणाचा परिणाम कोमिनिअसच्या जीवनावर होणे अपरिहार्यच होते. शास्त्रीय शोधामुळे विचारवंतांच्या विचारांना एक निराळे वळण लागले होते. कोणत्याही गोष्टी परंपरेनुसार गृहीत तत्त्व म्हणून न मानता त्या निरीक्षण, परीक्षण, प्रयोग व उद्‌गामी आणि अवगामी निकषांवर घासून-पुसून पाहण्याचे बाळकडू कोमिनिअसच्या पिढीला देण्याचा प्रयत्न शास्त्रज्ञांनी केला होता.

### बालपण

कोमिनिअसचे बालपण मोरेव्हियाच्या एका छोट्याशा व शांतताप्रिय जमातीमध्ये गेले. ही जमात धर्माने प्रॉटेस्टंटपंथी होती. कोणाच्याही अध्यात-मध्यात न पडण्याचा त्यांचा स्वभाव. आपण शांततेने जगावे व दुसऱ्यांना सुखा-समाधानाने जगू द्यावे ही त्यांची प्रवृत्ती. अशा वातावरणात कोमिनिअसच्या आयुष्याची पहिली २६ वर्षे गेली. परंतु नंतर ३० वर्षेपर्यंत युद्धाच्या खाईत हा प्रदेश लोटला गेल्याकारणाने कोमिनिअसला नाइलाजाने अनेक ठिकाणी भटकावे लागले. स्वतःचा जीव वाचविण्यासाठी व तुरुंगाची शिक्षा टाळण्यासाठी कित्येक वेळी त्याला अज्ञातवास स्वीकारावा लागला. या युद्धाचा आणि जर्मन लोकांचा अर्था-अर्थी काहीही संबंध नव्हता. फ्रेंच सैनिक या भूमीचा युद्धभूमी म्हणून उपयोग करीत असत. युद्धामुळे झालेल्या उध्वस्त जीवनामुळे कोमिनिअसच्या मूळ स्वभावात कोठलाही बदल झाला नाही. त्याच्या विचारांना द्वेष, कटुता तिरस्कार यांनी कधी स्पर्श केला नाही.

कोमिनिअसचे प्राथमिक शिक्षण खेड्यातील एका प्राथमिक शाळेत झाले. झेक भाषेशिवाय त्याला येथे विशेष काही शिकावयास मिळाले नाही. शाळेमध्ये तो हुशार विद्यार्थी म्हणून कधीच चमकला नाही. मात्र त्याचा स्वभाव गंभीर आणि विचारी होता. त्याला सर्व गोष्टींच्या निरीक्षणाची आवड होती. त्याच्या माध्यमिक शिक्षणाची सुरवात इतर मुलांच्या मानाने बरीच उशीरा झाली. या वेळी त्याचे वय सोळा वर्षांचे होते. परंतु या वाढत्या वयाचा त्याला एक मोठा फायदा झाला. इतर मुलांच्या मानाने त्याची ग्रहणशक्ती व बरेवाईट ओळखण्याचे त्याचे ज्ञान अधिक होते. शिक्षक ज्या पद्धतीने अध्यापन करीत असत,त्यातील दोष व उणीवा त्याला प्रकर्षाने जाणवू लागल्या. तेव्हा व्याकरण पाठ करून लॅटीन शिकणे हेच माध्यमिक शिक्षणाचे प्रमुख कार्य असे. शब्दकोषांच्या मदतीशिवाय भाषांतर करणे व अर्थ न समजता भाषांतर करणे यावरच अधिक भर दिला जात असे. या शिक्षणपद्धतीमुळे तो अतिशय रंजिस आला. अध्यापनाच्या नवीन पद्धती शोधून काढण्याची गरज त्याला या ठिकाणीच प्रकर्षाने जाणवली. माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढे त्याने हारबोर्न येथील विश्वविद्यालयात शिक्षण घेतले.

विश्वविद्यालयातील अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर धर्मोपदेशक होण्याची त्याची इच्छा होती; परंतु मोरेव्हिया येथे त्याला काही वर्षे शिक्षक म्हणून काम करावे लागले. शैक्षणिक समस्या व प्रत्यक्ष अध्यापनपद्धती यांचा अनुभव प्रत्यक्ष-पणे त्याला या ठिकाणी आला. पुढे पोलंडमध्ये एका शाळेचा मुख्याध्यापक

म्हणून त्याला १३ वर्षे काम करावे लागले. सर्व समाजाकरिता सर्व विषयांचा समावेश असलेला एक ज्ञानकोष लिहावा असे त्याच्या प्रथमपासूनच मनात होते. अनेक वर्षे सुरू असलेल्या युद्धामुळे त्याच्या प्रांतातील लोकांचे जीवन उध्वस्त व अनुकंपनीय झाले होते. त्यांना दिलासा देण्यासाठी अशा प्रकारच्या ज्ञानसाधनाची अतिशय गरज आहे असे त्याला वाटत होते. पैशाअभावी हे कार्य तो करू शकला नाही, तरीही शालेय मुलांसाठी पाठ्यपुस्तके लिहिण्यात त्याने आपली शक्ती खर्च केली.

त्याने ग्रीक व लॅटीन भाषेत एक प्रचंड शब्दकोष तयार करण्याचे योजले होते. त्यासाठी त्याला ४० वर्षेपर्यंत अहर्निश झटावे लागले. शब्दकोषाशिवाय लॅटीन भाषा शिकण्याच्या काय यातना असतात हे त्याने प्रत्यक्ष अनुभवले असल्याकारणाने भावी पिढीच्या सुलभतेसाठी त्याने हे कार्य अंगिकारले होते. जगातील सर्व ज्ञान एकत्रित करून ते सर्वांना देण्याची एक योजना त्याने आखली होती. अशा ज्ञानामुळे आपल्या बांधवांचे दुःख, दारिद्य व औदासीन्य दूर होईल असे त्याला वाटत असे. शिक्षणाचा हेतू ज्ञान मिळविणे, सद्गुण अंगी बाणणे व धार्मिक प्रवृत्तींची जोपासना होणे हा आहे, असे त्याचे निश्चित मत होते. आपली शैक्षणिक मते प्रतिपादण्यासाठी त्याने दि ग्रेट डिडॅक्टिक (The great Didactic) नावाचा उत्कृष्ट ग्रंथ लिहिला आहे. त्यात प्रतिपादिलेली अनेक तत्त्वे आज शिक्षण-क्षेत्रात प्रत्यक्षपणे वापरली जात असल्याचे आपण पाहतो. त्यामुळे कोमिनिअसची योग्यता आपणांस पटून येते. त्याने प्रतिपादिलेली काही शैक्षणिक तत्त्वे खाली दिली आहेत —

(१) मुले म्हणजे समाजाचा एक पवित्र ठेवा आहे. ती शिक्षणक्षम असून त्यांना विचारशक्ती आहे.

(२) ती उद्याचे नागरिक असल्याकारणाने त्यांच्या शिक्षणाकडे सर्वात अधिक लक्ष दिले पाहिजे.

(३) शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचे असावे. त्यामध्ये गरीब, श्रीमंत, मुलगा, मुलगी असे भेद असू नयेत.

(४) शिक्षण देण्यासाठी ज्ञानेंद्रियांचा विकास केला पाहिजे. ज्ञानेंद्रियां-मार्फत दिले जाणारे शिक्षण नैसर्गिक व परिणामकारक असते.

(५) एकाच प्रकारचे शिक्षण सर्वांना देऊ नये. मानसिक व शारीरिक फरक लक्षात घेऊन, तसेच प्रत्येक व्यक्तीची गरज व कुवत लक्षात घेऊन योग्य प्रकारचे शिक्षण देण्यात यावे.

( ६ ) हुशार मुलांचा उपयोग वर्गातील इतर मुलांच्या अध्ययनात साह्य करण्यासाठी करावा. म्हणजेच वर्गामध्ये वर्गनायक पद्धती असावी. ज्ञान देण्यापूर्वी ज्ञानाचा क्रम लावावा. प्रथम सोपे व नंतर क्रमाक्रमाने अवघड ज्ञान द्यावे.

( ७ ) ज्ञाताकडून अज्ञाताकडे, मूर्ताकडून अमूर्ताकडे व सुगमाकडून दुर्गमाकडे ही शैक्षणिक तत्त्वे शिक्षकांनी प्रत्यक्ष अमलात आणावीत.

( ८ ) अध्यापनापूर्वी विद्यार्थ्यांची शारीरिक व मानसिक तयारी अजमावावी. त्यांची जिज्ञासा जागृत करावी. विद्यार्थ्यांना झेपेल व पचेल असेच ज्ञान द्यावे.

( ९ ) विद्यार्थ्यांना द्यावयाचे ज्ञान त्यांना जीवनामध्ये उपयुक्त ठरेल असेच असावे. जीवनास निरुपयोगी ज्ञान कटाक्षाने टाळावे.

### शिक्षणाचे ध्येय

शिक्षणाचे अन्तिम ध्येय ज्ञानार्जन, सद्‌गुणांची जोपासना व धर्माचरण हे असले पाहिजे. शिक्षणाने व्यक्तीचे जीवन सुखी व समृद्ध झाले पाहिजे. त्यासाठी प्रत्येक सुशिक्षित व्यक्ती उद्योगी, उत्साही, कर्तव्यदक्ष, मृदुभाषी व ईश्वरोपासक बनली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीमध्ये जगातील यच्चयावत ज्ञान मिळविण्याची पात्रता आहे. कारण प्रत्येक व्यक्तीमध्ये ईश्वराचा अंश आहे. आणि हे विश्व ईश्वरानेच निर्माण केले आहे. व्यक्तीच्या शिक्षणाची सुरुवात व्यक्तीच्या जन्मापासून झाली पाहिजे.

### शिक्षणाची यंत्रणा

अध्यापनास सुरुवात करण्यापूर्वी शिक्षकाने प्रत्येक विषयाचे पूर्ण वर्षाचे, महिन्याचे, दिवसाचे व तासाचे अंदाजपत्रक केले पाहिजे. अशा योजनापत्रकाशिवाय अध्यापन करणे कोणाही शिक्षकाला शक्य होणार नाही. प्रत्येक वर्गाकरिता एक स्वतंत्र खोली व स्वतंत्र शिक्षक असावा. विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभ व्हावे म्हणून विषयवार क्रमिक पुस्तके असली पाहिजेत. वर्गासाठी केवळ एकच क्रमिक पुस्तक न ठेवता सर्व विद्यार्थ्यांजवळ स्वतःची क्रमिक पुस्तके असली पाहिजेत. दररोजचा शाळेचा काळ चार ते पाच तासांचाच असावा. आठ-नऊ तास सतत एके ठिकाणी बसणे लहान मुलांना शक्य होणार नाही. दररोजच्या शालेय वेळात अर्धा तास विश्रांतीसाठी निर्धारित करावा. काही दिवसानंतर शाळेला एखाद्या दिवसाची सुट्टी असावी. बौद्धिक विषय सकाळी विद्यार्थी ताजेतवाने असताना घेण्यात यावेत. शारीरिक श्रमाचे तास संध्याकाळी ठेवल्यास विद्यार्थ्यांच्या दृष्टीने सोयीचे होईल. विद्यार्थ्यांना गृहपाठ देऊ नयेत.

## वर्गपद्धती

कोमिनिअसच्या काळापूर्वी आजच्याप्रमाणे वर्गपद्धती अस्तित्वात नव्हती. अनेक विद्यार्थ्यांना एकाच वेळी कसे शिकवावे याचे ज्ञान शिक्षकांना नसे. त्या वेळी प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक रीत्या अध्यापन पाठ देण्यात येत असत. त्यामुळे अध्यापन-कार्यात फारच विलंब होत असे. कोमिनिअसने शिक्षणामध्ये प्रथम, वर्गपद्धती सुरू केली. कोमिनिअसचे हे शैक्षणिक विचार पाहून त्याच्या सूक्ष्म शैक्षणिक विचारप्रणालीबद्दल प्रत्येकाला अभिमान वाटे.

## शैक्षणिक मानसशास्त्र

विद्यार्थ्यांचे शिक्षण हे त्याच्या नैसर्गिक विकासावर आधारलेले असले पाहिजे. अध्यापनामध्ये नैसर्गिक पद्धतीचा अवलंब केला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीमध्ये काही सुप्त शक्ती असतात. त्यांचा विकास करणे हेच शिक्षणाचे कार्य होय. कोमिनिअसच्या मानसशास्त्रीय तत्त्वांचा आजच्या परिस्थितीत विचार करता शक्ति-समूहाचे मानसशास्त्र मागे पडल्याचे दिसून येईल. तथापि मनोव्यापारांसंबंधी त्याने प्रतिपादिलेली तत्त्वे आजही सर्वमान्य होण्यासारखीच आहेत. ज्ञानेंद्रिये म्हणजे आत्म्याकडे नेणारी प्रवेशद्वारेच होत असे तो म्हणत असे. त्यामुळे त्याने लहान मुलांच्या शिक्षणात ज्ञानेंद्रिय-विकासावर विशेष भर दिला होता. याच तत्त्वाचा पाठपुरावा पुढे मॉंटेसोरींनी आपल्या शिक्षणपद्धतीत केल्याचे आपणांस दिसून येईल. कल्पनाशक्ती हे एक आंतरइंद्रियच होय असे तो मानी. विद्यार्थ्यांची अध्यात्मिक शक्ती वाढीला लावण्यासाठी व ज्ञानग्रहण सुलभ करण्यासाठी या शक्तीचा फार उपयोग होतो. सरावाने स्मरणशक्तीचा विकास होतो असे तो म्हणे.

परंतु स्मरणापूर्वी प्रत्यक्ष अनुभव आवश्यक आहे. कोणतीही गोष्ट पूर्णपणे समजल्याशिवाय व ती इंद्रियगोचर झाल्याशिवाय तिचे स्मरण करावयास लावणे योग्य होणार नाही. यासाठी फळा, चित्रे, आकृत्या यांसारख्या दृक् साधनांचा वापर विशेषत्वाने केला पाहिजे. मात्र सर्वच गोष्टी लक्षात ठेवण्याचा व्यक्तीने प्रयत्न करू नये. विचारशक्तीमुळे इप्सित वस्तू कशी प्राप्त करून घ्यावी, कोणत्या गोष्टी टाळाव्यात व निरनिराळ्या प्रसंगी योग्य निर्णय कसे घ्यावेत याचे ज्ञान होते. शिक्षणामधील भावनांचे महत्त्वाचे स्थान कोमिनिअसने सर्वप्रथम जाणले होते. भावनांचा इतका पद्धतशीर अभ्यास त्याच्यापूर्वी कोणी केल्याचे आढळून येत नाही. अध्ययन-अध्यापनामध्ये प्रेरणा किंवा जिज्ञासा अत्यंत महत्त्वाची आहे. कोणत्याही कृत्रिम पद्धतीपेक्षा जिज्ञासेला आवाहन करून केलेले अध्यापन सरस असते. कोमिनिअसला विद्यार्थ्यांतील काही व्यक्तिभेद अवगत होते. सर्वांत

महत्त्वाची गोष्ट अशी की, पेस्टॉलॉझीपूर्वी दोनशे वर्षे कोमिनिअसने शिक्षणामध्ये वर्गपद्धती अमलात आणली. वर्गपद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये सूचना, अनुकरण व सहानुभूती या स्वाभाविक प्रवृत्तींचा उपयोग करता येतो हे त्यानेच दाखवून दिले.

अभ्यासक्रम

शाळेचा अभ्यासक्रम सर्वसमावेशक असला पाहिजे, असे त्याला वाटे. कारण प्रत्येक व्यक्ती जगातील सर्व विषय शिकण्यास समर्थ आहे, असे त्याचे मत होते. त्यामुळे त्याने शालेय अभ्यासक्रमात सर्व विषयांचा समावेश करण्याचा प्रयत्न केला. मात्र प्रत्येक विषयाचे बारीकसारीक ज्ञान विद्यार्थ्याला मिळावे, असा त्याचा आग्रह नव्हता. केवळ त्या विषयाचे स्थूल स्वरूप व ठळक तत्त्वे विद्यार्थ्यांना समजली तरी पुरे असे त्याला वाटे. विषयातील मुद्द्यांचा योग्य क्रम लावल्यास व योग्य अध्यापनपद्धती वापरल्यास विद्यार्थ्यांना कितीतरी ज्ञान सहजपणे देता येईल असे त्याचे मत होते. भाषेच्या अभ्यासात त्याने मातृभाषेवर विशेष भर दिला. त्याचप्रमाणे काही परकीय भाषा विद्यार्थ्यांना शिकविणे त्याला उपयुक्त वाटे. प्राचीन भाषांच्या अध्ययनावर व त्यात लिहिलेल्या ग्रंथांच्या अभ्यासावर विशेष भर देऊ नये असे त्याला वाटे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे जे श्रम वाचतील त्यातून इतर अनेक महत्त्वाचे विषय शिकता येतील आणि नैतिक व आध्यात्मिक विकास साधता येईल. त्याच्या अभ्यासक्रमामध्ये व्याकरण, गणित, भूमिती, खगोलशास्त्र, पदार्थविज्ञान, भूगोल, इतिहास, धर्म, हस्तकला, साहित्यशास्त्र या विषयांचा समावेश असे. शारीरिक सुदृढतेकरिता शारीरिक शिक्षणावरही त्याने भर दिला होता. हे त्या काळी क्रांतिकारक समजले गेले. विनोदाचा उपयोग बुद्धीला तल्लखपणा आणण्यासाठी करावा.

अध्यापन-पद्धती

कोमेनिअस शिक्षकांच्या अध्यापन-पद्धतीला अतिशय महत्त्व देतो. सर्व विषयांसाठी एकच सर्वमान्य अध्यापनपद्धती असावी असे त्याचे मत आहे. अर्थात हे त्याचे तत्त्व आधुनिक शिक्षण निकषाचे तत्त्वावर कितपत टिकाव धरू शकेल याची शंकाच आहे. तथापि एकाच सर्वमान्य पद्धतीमुळे शिक्षकास अध्यापन करणे व विद्यार्थ्यांना अध्ययन करणे सुलभ जाईल असे त्याचे मत होते. शिक्षकांनी खालील मुद्द्यांकडे अधिक लक्ष दिल्यास अध्यापन विशेष यशस्वी होईल असे त्याला वाटे—

१. अध्यापनात विद्यार्थ्यांच्या अभिरुचीला प्राधान्य द्यावे.

२. त्यांना ज्या विषयासंबंधी गोडी वाटणार नाही, ते विषय शिकविण्याचा अट्टाहास धरू नये.
३. शिकवावयाचा विषय विद्यार्थ्यांपुढे स्पष्टपणे मांडावा. विवेचनात आडवळणे असू नयेत.
४. प्रथम सर्वसामान्य तत्त्वे विषद करावीत. बारीकसारीक धागे गुंफावेत.
५. एक मुद्दा पूर्ण समजल्याशिवाय दुसऱ्या मुद्द्याच्या अध्यापनास हात घालू नये. विषयज्ञान स्पष्ट होण्यासाठी निरनिराळ्या विषयांतील समन्वय, साम्य व फरक स्पष्ट करावा.
६. जीवनावश्यक ज्ञानाला प्राधान्य देऊन त्याचे जीवनात उपयोजन करावे.
७. मुद्यांचा योग्य क्रम लावून एका वेळी एकच मुद्दा शिकवावा.
८. ज्ञाताकडून अज्ञाताकडे या तत्त्वाचा अवलंब करावा.
९. ज्ञानेंद्रिये, कल्पना, आकलन व स्मरण यांचा उपयोग करावा.
१०. कृतीद्वारा अध्ययन असावे.
११. वस्तूवस्तूतील संबंध व त्यांचे स्थान अभ्यासावे.
१२. अध्ययन-विषय विद्यार्थ्यांच्या आवाक्याबाहेरचे असू नयेत.
१३. वस्तू, कृती यांचे भाषेशी साहचर्य असावे.
१४. आपणांस समजलेला विषय विद्यार्थ्यांनी दुसऱ्याला सांगावयाचा प्रयत्न करावा. कारण अध्यापन करीत असताना किंवा दुसऱ्याला सांगत असताना स्वतःच्या ज्ञानाला उजळा मिळतो व ज्ञानाचे दृढीकरण होते.
१५. सर्व विषयांचा समन्वय साधावा. अध्ययन-अध्यापनामध्ये अनेक मानसिक शक्तींचा व ज्ञानेंद्रियांचा उपयोग करावा.

## क्रमिक पुस्तके

त्याच्या वेळी फारच थोडी क्रमिक पुस्तके उपलब्ध होती. आणि जी उपलब्ध होती ती फक्त लॅटीन भाषेत लिहिली असून शिक्षकच क्रमिक पुस्तकांचा उपयोग करीत. प्रत्येक विद्यार्थ्याजवळ निरनिराळ्या विषयांची क्रमिक पुस्तके असली पाहिजेत, असा आग्रह प्रथम कोमिनिअस यानेच धरला.

## शिक्षणाचे टप्पे

व्यक्तीच्या शिक्षणाचे कोमेनिअसने एकूण चार टप्पे पाडले आहेत. प्रत्येक टप्पा सहा वर्षांचा असून त्याची सुरवात जन्मापासूनच होते.

१. पहिला टप्पा ( वय वर्षे १ ते ६ )

या वयात मूल घरी असून नैसर्गिक पद्धतीने शिकत असते. माता हीच त्याची पहिली शिक्षिका होय. कित्येक मातांना अज्ञानामुळे आपल्या या जबाबदारीची जाणीव नसते. त्यांच्यासाठी कोमिनिअसने School Infancy ( स्कूल इन्‌फंसी ) नावाचे पुस्तक लिहिले. प्रत्यक्ष वस्तू दाखवून व कृतीद्वारा या वयातील विद्यार्थ्यांना शिकवावे असे त्याने प्रतिपादिले आहे. गृहशिक्षणाची किंवा पूर्व प्राथमिक शिक्षणाची गरज जाणणारा कोमेनिअस हाच पहिला शिक्षणशास्त्रज्ञ होय. पुढील काळात फ्रोबेलने बालोद्यान पद्धती, मॅाँटेसोरींनी मॅाँटेसोरी पद्धती यांसारख्या पद्धती शोधून काढल्या असल्या, तरी त्यांचा उगम कोमिनिअसच्या मातृशालेमध्येच दिसून येतो.

२. व्हर्नायक्युलर स्कूल—प्राथमिक शाळा ( वय ७ ते १२ )

या वेळी विद्यार्थ्यांना मातृभाषेचे वाचन, लेखन शिकवावयाचे. ते शिकवीत असताना चित्रमय पुस्तकांचा उपयोग करावयाचा. शिक्षणामध्ये चित्रमय पुस्तकांचा उपयोग करणारा कोमिनिअस हाच पहिला शिक्षणशास्त्रज्ञ होय. मातृभाषेबरोबरच अंकगणित, गायन, नीतिशास्त्र यांचाही अभ्यास या वेळी मुलांनी करावयाचा. अर्थशास्त्र व राजकारण यांचे जरुरीपुरते ज्ञान विद्यार्थ्यांना द्यावयाचे. इतिहासाच्या अभ्यासामध्ये मानवाचा जन्म व त्याची मुक्ततेसाठी धडपड यांचे ज्ञान द्यावयाचे. बहुसंख्य मुले या शिक्षणानंतर पुढील शिक्षण घेऊ शकणार नाहीत. म्हणून याच वयामध्ये त्यांना जीवनाला उपयोगी पडेल अशा एखाद्या व्यवसायाचे शिक्षण द्यावयाचे. ही शाळा सकाळी दोन तास व दुपारी दोन तास चालवावयाची. या सहा वर्षांतील प्रत्येक वर्षाला एका निश्चित विषयाचे ज्ञान द्यावयाचे. त्याचा क्रम कोमिनिअसने अतिशय काळजीपूर्वक ठरविला होता. तो असा–( १ ) व्याकरण, ( २ ) तत्त्वज्ञान, ( ३ ) अंकगणित, ( ४ ) नीतिशास्त्र, ( ५ ) भाषा, ( ६ ) वक्तृत्व.

३. लॅटीन शाळा ( वय १३ ते १८ )

या शाळेमध्ये निवडक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत असे. हा सहा वर्षांचा शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांतून वैय्याकरणी, गणिती, ज्योतिर्विद, वक्ते, गायक व धर्मोपदेशक निर्माण होतील अशी अपेक्षा होती. या शाळेत चमकणारे काही निवडक विद्यार्थी विश्वविद्यालयात प्रवेश घेत असत. तेथे ज्ञानदानापेक्षा संशोधनावर अधिक भर दिला जात असे.

## ४. चौथा टप्पा (विश्वविद्यालयीन) वय १९ ते २४

लॅटीन शाळेतील हुशार विद्यार्थ्यांची निवड विश्वविद्यालयीन शिक्षणासाठी करण्यात येत असे. तेथील शिक्षणामुळे काही नवीन तत्त्वांचा शोध लागावा व मानवाचे ऐहिक व पारमार्थिक जीवन सुखी व समृद्ध व्हावे अशी कोमिनिअसची इच्छा होती.

कोमिनिअसच्या जीवनाचा व त्याने केलेल्या शैक्षणिक कार्याचा विचार केल्यास आपणांस असे दिसून येईल की, कोमिनिअसच्या मूळच्या धार्मिक मानवतावादी व तत्त्वचिंतक प्रवृत्तींचा त्याने प्रदिपादिलेल्या शैक्षणिक तत्त्वांवर फार मोठा प्रभाव पडलेला होता. त्याने मांडलेली सर्व मते त्याच्या काळात स्वीकारली जाण्याची शक्यता नव्हती, इतकी ती क्रांतिकारक होती. ती तशी स्वीकारली जावीत अशी कोमिनिअसची स्वतःचीही अपेक्षा नसावी. मात्र प्रचलित शिक्षणपद्धतीला विरोध करणारी व त्या वेळच्या राज्यकर्त्यांचा व धर्मोपदेशकांचा रोष ओढवून घेणारी ही शैक्षणिक तत्त्वे कोमिनिअसने परखडपणे व कोणाचाही मुलाहिजा न ठेवता मांडली, यात त्याचा आत्मविश्वास व तत्त्वाविषयींचा निश्चितपणा दिसून येतो. शिक्षण सार्वत्रिक असावे. गरीब, श्रीमंत, स्त्रीपुरुष, मुलगा, मुलगी असे भेद त्यात असू नयेत हे तत्त्व आज सर्व प्रगत देशांनी स्वीकारले आहे. शिक्षण मिळणे हा प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिद्ध हक्क आहे, असे आपण आज मानतो. परंतु १६ व्या शतकात गरिबांच्या व मुलींच्या शिक्षणाची इतकी दयनीय स्थिती होती की, शिक्षण सार्वत्रिक असावे असे म्हणणारा देशद्रोही समजला जात असे. राज्यकर्त्यांना व समाजधुरिणांना आहे ही परिस्थिती टिकून राहावी असे वाटत असे. गरिबांना शिक्षण दिल्यास ते प्रचलिताविरुद्ध बंड पुकारतील अशी साधार भीती व्यक्त करण्यात येत असे.

गरीब मुलांना त्याही वेळी दुकानात किंवा अन्यत्र काम करून पोट भरावे लागे. त्यामुळे ते शिक्षणापासून वंचित रहात. शिक्षण सार्वजनिक असावे या विचारामागे कोमिनिअसची गरिबाबद्दलची अपार करुणा दिसून येते. कोमिनिअसचा मूळचा पिंड धार्मिक व परमेश्वराजवळ निष्ठा बाळगणारा होता. ऐहिक व पारलौकिक सुखासाठी व परमेश्वराच्या सन्निध जाण्यासाठी ज्ञानाची व सद्‌गुणाची अपार गरज आहे व सर्व मनुष्यमात्र ईश्वराची लेकरे असल्यामुळे सर्वांना—कोणताही अपवाद न बाळगता—लिंगभेद, भाषाभेद, स्थानभेद व उच्च-नीचता लक्षात न घेता शिक्षण दिले पाहिजे असे त्याने प्रतिपादले. पूर्वप्राथमिक शिक्षणाची जरुरी आज लोकशाहीमध्ये सर्व राज्ये मानतात. मातृभाषा ही

शिक्षणाच्या सर्व स्तरांवर अध्यापनाचे माध्यम असावी, हे तत्त्व आज आपण स्वीकारले आहे. ज्ञानाचा क्रम असावा, विद्यार्थ्यांच्या मनाच्या कुवतीचा अभ्यास करावा. मूर्त व कृतियुक्त शिक्षणाला विशेष महत्त्व द्यावे. तात्त्विकाबरोबरच प्रात्यक्षिकास स्थान असावे इत्यादी गोष्टी आज शिक्षणशास्त्रामध्ये मान्यता पावलेल्या दिसतात. परंतु तीनशे वर्षांपूर्वी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ही तत्त्वे प्रथम प्रतिपादणारा कोमिनिअस हा शिक्षणक्षेत्रातील एक द्रष्टा समजला पाहिजे.

## मूल्यमापन

शिक्षणामध्ये कोमिनिअसने अत्यंत क्रांतिकारक विचार मांडले. क्रमिक पुस्तकांच्या निर्मितीस त्याने चालना दिली. वर्गपद्धती, ज्ञानेंद्रियविकास, शालेय विषयांचा समन्वय यांसारख्या नवनवीन कल्पनांचा प्रचार त्यानेच प्रथम शिक्षणात केला. या दृष्टीने विचार करता कोमिनिअसचे कार्य अलौकिक म्हणावे लागेल.

## रूसो

| जन्म | १७१२ |
|---|---|
| मृत्यू | १७७८ |

पाश्चिमात्य देशांच्या इतिहासात १८ वे शतक खळबळजनक घटनांनी भरलेले दिसून येते. नवीन विचारांची ज्योत घेऊन त्याच्या साह्याने प्रज्वलित झालेली प्रज्ञावंतांची मने प्रचलित व रूढ कल्पनांविरुद्ध उघड उघड बंड पुकारू लागली होती. अशा वैचारिक बंडखोरीमध्ये जीन जॅक्स रूसो हा अग्रगण्य होय. रूसोच्या जीवनावर तत्कालीन फ्रेंच जीवनाचा अतिशय परिणाम झाला होता. समाजामध्ये गरीब व श्रीमंत असे वर्गभेद निर्माण झाले होते. अल्पसंख्य श्रीमंत वर्ग बहुसंख्य गरिबांचे निरनिराळ्या प्रकारांनी शोषण करून आपला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करीत होता. अशा परिस्थितीमध्ये स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांचा उदय होऊ लागला होता. समाजातील सर्व संस्था व शिक्षणपद्धती कालबाह्य व जुन्यापुराण्या होऊ लागल्या होत्या. नवीन कल्पनांच्या व विचारांच्या आनुषंगाने त्यामध्ये इष्ट तो बदल घडवून आणणे सर्वांनाच आवश्यक वाटत होते. काळाच्या ओघाबरोबर नवीन कल्पना व नवीन शोध यांचा उदय होऊनही सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक अशा आकांक्षांशी मिळतेजुळते घेणाऱ्या शिक्षणपद्धतीची मोठी आवश्यकता होती. आणि ही गरज रूसोने आपल्या जीवनकार्यामुळे परिपूर्ण केली असेच म्हणावे लागेल.

रूसोच्या जीवनाच्या प्रारंभाची कित्येक वर्षे अगदी सामान्य परिस्थितीतच गेली. त्याचा जन्म २८–६–१७१२ रोजी जिनेव्हा येथे एका फ्रेंच प्रॉटेस्टंट मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्याचे वडील घड्याळे दुरुस्त करण्यचा धंदा करीत. त्याच्या जन्मानंतर थोड्याच दिवसांत त्याची आई निधन पावली. त्यामुळे त्याला मातृसुख कसे ते मिळालेच नाही. मातृसुखाची लालसा शेवटपर्यंत तृप्त न झाल्याने आईच्या मोठेपणाचे गोडवे त्याने आपल्या ग्रंथात प्रकर्षाने गाइले आहेत. पहिली काही वर्षे त्याचे लालनपालन त्याच्या आत्याने केले. तेथे असताना संयम, शिस्त, आज्ञाधारकपणा यांसारखे गृहशिक्षणात रुजणारे गुण त्याच्या अंगी बाणले गेले नाहीत. याउलट स्वैराचार व नियमांच्या विरुद्ध बंड पुकारणे याच गोष्टी तो शिकला. त्याचे वडीलही आपली जबाबदारी ओळखून वागणारे नव्हते. त्यांच्या आचारविचारांत नेहमी बेजबाबदारपणा व भंपकगिरी दिसून येत असे. वडिलांची अभिरुचीही अगदी सामान्य प्रतीची होती. त्यांच्या वाचनामध्ये नेहमी कामुक व लैंगिक कादंबऱ्यांचा समावेश असे. छोटा रूसो देखील अशाच प्रकारची—लहान मुलांना अयोग्य अशी—पुस्तके वाचू लागला. त्याच्या थोरल्या भावाला व वडिलांना काही कोर्टकचेरीच्या लफड्यात सापडल्यामुळे देशाबाहेर पळून जावे लागले होते. अशा रीतीने बालवयामध्ये औपचारिक शिक्षणातून होणारे संस्कार रूसोवर झाले नाहीत. त्याच्या जीवनाची जडण-घडण निसर्गातून व परिस्थितीतून मिळणाऱ्या अनुभवानेच केली गेली.

यानंतरची बरीच वर्षे त्याने निरनिराळे व्यवसाय करण्यात घालविली. प्रथम तो आपल्या मामांकडे राहिला. नंतर एका पाद्र्याकडे घरगडी किंवा हरकाम्या म्हणूनही तो राहिला. तेथे असताना तो आपल्या कामाच्या कचाट्यातून सुटण्यासाठी शहराच्या बाहेर एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी जाऊन बसे. तेथेच त्याला निसर्गाबद्दलची पहिली ओढ निर्माण झाली. निसर्गाशी एकरूप होताना त्याच्या डोळ्यांना अक्षरशः अश्रू येत असत. याच वेळी तो चित्रकला, रंगकाम व किरकोळ हस्तोद्योग शिकला. संगीताचेही त्याला मनस्वी वेड होते. असाच एकदा निसर्गाच्या सान्निध्यात तो रममाण झाला असताना त्याला घरी येण्याचे भान राहिले नाही आणि जेव्हा फार उशीरा घरी येण्यास तो परत निघाला, तेव्हा गावाची वेस बंद झाली होती. त्यामुळे तो तसाच ते गाव सोडून वयाच्या सोळाव्या वर्षीच इतस्ततः भटकू लागला. या भ्रमंतीमुळे तो समाजाच्या निरनिराळ्या स्तरांतील लोकांशी मिसळू शकला. त्यांच्या जीवनातील दुःखांची व हालअपेष्टांची त्याला पूर्ण जाणीव झाली. सामान्य माणसाच्या मनातील खुपणारे सल नेमके काय आहे, हे तो ओळखू शकला.

त्या वेळचे प्रचलित विचारवंत मॅाँटेग्यू, लॉक, पोप व्हाल्टेअर यांच्या ग्रंथांच्या परिशीलनाने त्याच्या विचारशक्तीचा विकास झाला. विज्ञानातील नवनवीन शोधासंबंधी त्याने बरीच माहिती मिळविली होती. पास्कल, केपलर, न्यूटन या शास्त्रज्ञांचे शोध तो जाणून होता. प्लेटोच्या रिपब्लिक या ग्रंथाबद्दल त्याला विलक्षण आकर्षण वाटत असे. आजपर्यंत लिहिलेल्या ग्रंथामध्ये रिपब्लिक या ग्रंथाला सर्वश्रेष्ठ स्थान आहे असे तो म्हणत असे. डॅनिअल डीफो याने लिहिलेला रॉबिनसन क्रूसो हा त्याचा असाच एक अत्यंत आवडता ग्रंथ होता. त्याच्या भटक्या जीवनात मॅडम डी वॅरेस या कॅथॉलिक बाईचा प्रभाव बराच दिसून येतो. अनेक वेळा व अनेक वर्षे रूसो या बाईच्या आश्रयास रहात असे. त्याने अनेक उद्योग व धंदे पत्करले, पण बहुतेक सर्व ठिकाणी त्याच्या वाट्याला अपयशच आले. त्याच्या जीवनाला कोठल्याही प्रकारे शिस्त व संयम यांचा स्पर्श झालेला दिसत नाही. चोरी करणे, खोटे बोलणे, स्वतःची जबाबदारी टाळणे, दुसऱ्यावर नाहक आरोप करून त्याला बदनाम करणे अशा प्रकारांबद्दल त्याला काहीच वाटत नसे.

पॅरीस शहरी सन १७४३ मध्ये त्याने थेरेसी नामक एका स्त्रीशी लग्न केले. तिच्यापासून त्याला पाच मुले झाली. परंतु विलक्षण गोष्ट अशी की, त्यांच्या संगोपनाची कोणत्याही प्रकारची जबाबदारी न स्वीकारता किंवा किंचितही तरतूद न करता त्याने आपली सर्व मुले वाऱ्यावर सोडून दिली. याबाबतचा सर्वच्या सर्व दोष तो समाजावरच टाकतो. पुढे त्याची अशाच भ्रमंतीच्या काळामध्ये काही लेखकांशी व समाजसेवकांशी ओळख झाली. एके दिवशी सायंकाळी तुरुंगात असलेल्या आपल्या एका मित्राला तो भेटावयास जात असताना त्याच्या आयुष्याला कलाटणी देणारी व त्याचा पुनर्जन्म घडवून आणणारी घटना घडून आली. रस्त्यातच उभ्या असलेल्या जाहिरात फलकाकडे त्याचे लक्ष गेले. त्यावर एक निबंध-स्पर्धा सुचविण्यात आली होती. निबंधाचा विषय पुढीलप्रमाणे होता—" शास्त्र व कला यांच्या विकासामुळे समाजाची नीतिमत्ता वाढीस लागली आहे, का तिची अधोगती होत आहे ? " वरील निबंधस्पर्धा अजॉन् येथील सायन्स समितीने पुरस्कृत केली होती. निबंधातील या प्रश्नाने विजेचा धक्का बसावा त्याप्रमाणे त्याला झाले. त्या विषयाच्या चिंतनाने एका नव्याच विश्वात गेल्याचा भास त्याला झाला. त्याने निबंध लिहिला व बक्षिसही पटकाविले. त्याने व्यक्त केलेले विचार अत्यंत क्रांतिकारक होते. तथापि त्या विचाराशी परीक्षक मंडळातील बहुसंख्य सभासद सहमत झाले होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलमत
निबंध
७४४२५
११३७५
१२७३



सन १७५६ ते १७६२ या काळामध्ये आजारीपणामुळे त्याला एके ठिकाणी खिळून रहावे लागले. परंतु ही सहा वर्षे त्याने निष्क्रियतेने घालविली नाहीत. याच काळामध्ये राज्यशास्त्रावरील Social contract व शिक्षणावरील Emile हे दोन जगप्रसिद्ध ग्रंथ त्याने लिहिले. त्याचे सर्व आयुष्य हाल‌अपेष्टा, दारिद्र्य, वंचना व दुःख यांनी भरलेले आहे. आपल्या पत्नीच्या चारित्र्याबद्दल संशय आल्याकारणाने त्याने तिच्यापासून फारकत घेतली होती. कौटुंबिक सौख्याच्या बाबतीतही तो असा अभागीच होता. तऱ्हेवाईकपणा व विक्षिप्तपणा असूनही व्हॉल्टेअरसारख्या पंडितांशी असलेली त्याची मैत्री त्याला जीवनात अतिशय उपकारक ठरली. सामाजिक व राजकीय क्रांतीच्या बाबतीत व्हाल्टेअरच्या ज्वलज्जहाल विचारामुळे जी प्रेरणा त्या काळातील तरुणांना मिळाली, तशाच प्रकारची प्रेरणा व चालना शिक्षणक्षेत्रामध्ये रूसोच्या विचारामुळे मिळू शकली.

## एमिली ( Emile )

रूसोने शिक्षणावर लिहिलेला हा एक अत्यंत क्रांतिकारक व विचारप्रवर्तक ग्रंथ आहे. प्रचलित शिक्षणपद्धती व शैक्षणिक तत्त्वे ही अप्रस्तुत, प्रतिगामी व अव्यवहार्य असल्यामुळे त्यांचे विरुद्ध रूसोने बंड पुकारले आहे. Emile हा रूसोचा मानसपुत्र होय. त्याच्या शिक्षणाची सर्व योजना या पुस्तकात अतिशय विस्तृतपणे दिली आहे. हे पुस्तक लिहिण्यामागे रूसोचे खालील मुख्य हेतू दिसून येतात—

१. प्रचलित शिक्षणपद्धती कालबाह्य झाल्याकारणाने आपण पुन्हा एकदा निसर्गाकडे वळले पाहिजे.

२. शिक्षणाचा हेतू नागरिक किंवा कोणत्यातरी सामाजिक किंवा राजकीय तत्त्वप्रणालीच्या वेष्टनामध्ये बंदिस्त केलेला मनुष्य निर्माण करणे नसून नैसर्गिक मानव घडविणे हा त्याचा हेतू आहे.

३. शैक्षणिक पद्धतीतील गुंतागुंत काढून टाकून ती अतिशय सुलभ केली पाहिजे.

४. व्यक्तिविकासातील निरनिराळ्या अवस्थांत बाल्य हा अत्यंत महत्त्वाचा व संस्कारक्षम काळ आहे.

५. व्यक्तीला दडपून टाकणारी सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य बंधने दूर केली पाहिजेत.

६. व्यक्तीचे नैसर्गिक स्वातंत्र्य अबाधित राखले गेले पाहिजे.

७ मुलाच्या मूलभूत प्रवृत्ती चांगल्या असतात व त्यांच्या विकासाचा क्रम निसर्गानेच घालून दिलेला असल्यामुळे त्यामध्ये कोणत्याही तऱ्हेचा बदल करण्यात येऊ नये. व्यक्ती ही समाजाची घटक असते. समाजामध्ये व्यक्तीचे शिक्षण होते; परंतु ते समाजाकडून होत नाही.

रूसोने प्रतिपादिलेल्या तत्त्वज्ञानाला शिक्षणामध्ये निसर्गवाद हे नाव मिळाले आहे. निसर्ग या शब्दाला रूसोने त्रिविध अर्थ दिला आहे.

## १. कृत्रिम समाजापासून अलग

मूल निसर्गतः चांगले असते. त्याच्यावर समाजातील निरनिराळ्या व्यक्ती, संस्था व परिस्थिती वाईट संस्कार घडवितात. रूसोच्या वेळी फ्रेंच समाजाची परिस्थिती फारच शोचनीय होती. समाजामध्ये ढोंगीपणा, कृत्रिमता, परोपजीवी वृत्ती कमालीची वाढल्यामुळे बहुसंख्य गरीब जनतेचा असंतोष पराकोटीला पोहोचला होता. याच परिस्थितीतून अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात फ्रान्समध्ये भीषण क्रांती होऊन स्वातंत्र्य, समता व बंधुता या तीन तत्त्वांचा उदय झाला. या नव्या मनूची मुहूर्तमेढ रोवण्यामध्ये रूसोचे कार्य अमोलिक आहे. प्रचलित रूढ कल्पनांविरुद्ध त्याचे विचार इतके प्रखर होते की, रूढ कल्पनांच्या बरोबर विरुद्ध वागा म्हणजे तुमचे वर्तन बरोबर होईल असे तो नेहमी म्हणत असे.

## २. नैसर्गिक प्रवृत्ती

निसर्गाचा त्याने लावलेला दुसरा अर्थ म्हणजे मानवाची सहजप्रवृत्ती किंवा स्वाभाविक वृत्ती होय. बालक जन्मतः चांगले असते. त्याच्या मूलभूत प्रवृत्ती त्याच्या व्यक्तिविकासास व समाजधारणेस उपकारक असतात. समाजाच्या कृत्रिम बंधनांमुळे व अनिष्ट चालीरीतींमुळे बालकाचा योग्य प्रकारे विकास न झाल्यामुळे व्यक्तीचे जीवन दूषित होते.

## ३. निसर्ग सान्निध्य

निसर्गाचा त्याने लावलेला तिसरा अर्थ म्हणजे कृत्रिम समाजापासून दूर व प्रत्यक्ष निसर्गाच्या सान्निध्यात व्यक्तीचा विकास घडवून आणणे हा होय. झाडे, पशुपक्षी, डोंगर, नद्या यांच्या सान्निध्यात व स्वातंत्र्याच्या वातावरणामध्ये व्यक्तीच्या मूलभूत शक्तींचा परमोच्च विकास होतो. हे त्याचे म्हणणे आत्मानुभवावर आधारलेले होते. त्याला स्वतःला कोणत्याही प्रकारचे सुव्यवस्थित, औपचारिक शिक्षण मिळाले नसले तरी त्याच्या अंगच्या मूलभूत शक्तींचा परमोच्च विकास केवळ

निसर्गाच्या सान्निध्यातच झाला असे त्याला वाटले. इतर बालकाप्रमाणे त्याचे शिक्षण प्रचलित शिक्षणपद्धतीत व कृत्रिम बंधनांच्या दडपणाखाली झाले असते तर त्याच्या स्वतंत्र प्रज्ञेचा फुलोरा इतका उमलला नसता असे त्याला वाटते.

एमिली या ग्रंथाचे पाच विभाग पाडण्यात आले आहेत. पहिल्या चार विभागांत व्यक्तिविकासाच्या चार अवस्था त्याने सांगितल्या असून त्या त्या अवस्थांमध्ये कोणते शिक्षण द्यावे याचे दिग्दर्शन केले आहे. पाचव्या विभागामध्ये स्त्रीशिक्षणाविषयीचे त्याचे परखड विचार त्याने मांडले आहेत. प्रत्येक अवस्था ही स्वतंत्र असून त्या अवस्थेची काही शारीरिक व मानसिक वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे त्या वेळी द्यावयाचे शिक्षण त्या त्या अवस्थांना अनुरूप असेच असले पाहिजे. एमिलीची सुरवात निसर्गाच्या वा परमेश्वराच्या सद्‌हेतूच्या गायनाने व मानवाच्या कृत्रिम व दुष्परिणामाच्या अवहेलनेने झाली आहे. God makes all things good, man meddles with them and they become evil.

## ( १ ) शैशवावस्था (वय १ ते ५ )

व्यक्तीच्या शिक्षणास जन्मापासून किंबहुना जन्मापूर्वीपासूनही सुरवात होते. व्यक्तीला जे जे अनुभव येत असतात त्यांतूनच तिचे शिक्षण होत असते. अनुभवाशिवाय दिलेले शिक्षण हे व्यर्थ होय. या वयामध्ये व्यक्तीच्या ज्ञानेंद्रियविकासाचा प्रयत्न करावयास हवा. ज्ञानेंद्रियविकास हा प्रत्यक्ष अनुभवानेच होत असतो. त्याचप्रमाणे व्यक्तीच्या ज्या सहजप्रवृत्ती असतात त्यांचा विकास नैसर्गिक वातावरणात करणे हे शिक्षकाचे काम आहे. या वयातील विद्यार्थ्यांना शिक्षकांनी शिकविण्याचा किंवा आपली स्वतःची मते लादण्याचा प्रयत्न करू नये. विद्यार्थी स्वतःच्या कलाने शिकतील अशी अनुकूल परिस्थिती निर्माण करणे एवढेच शिक्षकाचे काम आहे. ज्ञानेंद्रियांचा विकास व कर्मेंद्रिये कार्यक्षम बनविणे हीच प्रमुख कार्ये या वेळी केली पाहिजेत. शरीराचा विकास निसर्गनियमानुसार या वयात होतच असतो. त्या विकासास शिक्षणाने मदत झाली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीचे शरीर सुदृढ व धष्टपुष्ट झाले पाहिजे. सुदृढ व्यक्तीची मुले शिक्षण घेण्यास योग्य असतात. The woeker the body the more it commands, the Stronger it is, better it obeys. विद्यार्थ्यांना स्वतःच्या मूलभूत शक्तींचे ज्ञान झाले पाहिजे. त्याचप्रमाणे त्याला स्वतःवर ताबा ठेवता आला पाहिजे व स्वतःचे रक्षण करण्यासही त्याने शिकले पाहिजे. त्या वेळच्या शिक्षणपद्धतीवर रूसोने प्रखर टीका केली आहे. लहान मूल म्हणजे प्रौढाची छोटी आवृत्ती असा समज त्या वेळी प्रचलित होता. त्याचे कपडे, त्याचे खेळ, आचारविचार हे सर्व प्रौढांच्या सापेक्षतेने बनविलेले असत. अशा प्रकारच्या

कपड्यामुळे मुलाच्या नैसर्गिक विकासास अडथळा येतो. म्हणून ते न घालता त्याच्या स्वाभाविक हालचाली सुकर होतील अशाच प्रकारचे कपडे या वयातील विद्यार्थ्यांनी वापरले पाहिजेत असे त्याचे ठाम मत होते.

## (२) बाल्यावस्था (वय ५ ते १२)

या अवस्थेमध्ये विद्यार्थ्यांना कृतियुक्त शिक्षण द्यावे. म्हणजे त्यांच्या सहज-प्रवृत्ती विकसित होतील. यासाठी प्रत्यक्ष परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांना शिकविले पाहिजे. परिकथा किंवा काल्पनिक कथा त्यांना बिलकूल शिकवू नयेत. या कथा शिकविण्याचा हेतू नीतीचा बोध करणे हा असतो; परंतु या वयातील विद्यार्थ्यांना नीतीची काहीच कल्पना नसल्यामुळे अशा खोट्यानाट्या गोष्टी विद्यार्थ्यांना शिक-विणे हानिकारक असते. इतर कोणत्याही भाषेपेक्षा मातृभाषेचे अध्ययन विद्या-र्थ्यांना अतिशय उपयोगी पडते. परकीय भाषा या वयात त्यांच्यावर लादणे म्हणजे त्यांच्यावर अन्यायच करणे होय. या वयातील विकास एका विशिष्ट नैसर्गिक क्रमानुसार होत असतो. त्या क्रमामध्ये बदल घडवून आणणे,प्रगतीच्या दृष्टीने हानि-कारक होय. कित्येक वेळा पालकांना व शिक्षकांना आपल्या मुलांनी विकासाच्या काही पायऱ्या गाळून एकदम प्रगत पायरीवर जावे असे वाटते. परंतु तसे करणे रूसोच्या मताविरुद्ध आहे. तो म्हणतो, अशा रीतीने वेळ व श्रम वाचवू नका. त्या त्या अवस्थांना लागणारा वेळ भरपूर प्रमाणात द्या. "Do not save time but loose it." या अवस्थेत द्यावयाचे शिक्षण नकारात्मक (Negative) असावे, या प्रकारच्या शिक्षणाचा त्याने लावलेला अर्थ खाली दिला आहे.

### १. पुस्तके नकोत

शिक्षणामध्ये पुस्तकांची मध्यस्थी नको. त्यामुळे प्रत्यक्ष अनुभव–निसर्ग व मूल यांच्यामध्ये दुरावा निर्माण होतो. पुस्तकांची मदत फक्त पोपटपंची करावयास शिकविते. मूलभूत विचार करण्याची शक्ती किंवा शब्दामागील खरा अर्थ विद्यार्थ्यांना येत नाही. खरे शिक्षण प्रयत्नपूर्वक घेतलेल्या प्रत्यक्ष अनुभवातूनच होत असते.

### २. वेळेची काटकसर नको

खेळणे, धावणे, उड्या मारणे यांत बाल्यावस्थेत मुलांचा वेळ जात असतो. हा वेळ वाया जातो, असे कित्येकांना वाटत असते. त्यामुळे ते मुलांच्यावर कृत्रिम बंधने लादण्याचा प्रयत्न करीत असतात. परंतु त्यामुळे विद्यार्थ्यांचे हित न होता अहितच होण्याचा अधिक संभव असतो. विद्यार्थ्यांच्या विकासाचा क्रम ठरलेला

असतो. त्याला विशिष्ट कालावधी आवश्यक असतो. तो जर योग्य प्रकारे देण्यात आला नाही, तर त्यांचा विकास योग्य प्रकारे होत नाही.

### ३. सवयीची गुलामगिरी नको

रूसो सवयींच्या कृत्रिम बंधनांच्या विरुद्ध आहे. सवयीमुळे विद्यार्थ्यांच्या कृतीतील सहेतुकता नाहीशी होऊन त्यांना आनंद व स्वातंत्र्य गमवावे लागते. सवयी लावावयाच्याच असतील तर नैसर्गिक विकासाला धरूनच त्या असल्या पाहिजेत. कृत्रिम बंधने लादणाऱ्या सवयी विद्यार्थ्यांना लावणे इष्ट नाही.

### ४. नीति-शिक्षण नको

विद्यार्थ्यांना प्रौढांनी ठरविलेल्या नीतिनियमांचे धडे देऊ नयेत. कारण त्यांच्या विकासामध्ये अशा शिक्षणाचा काहीच उपयोग होत नाही. उलट विद्यार्थ्यांचे स्वातंत्र्य व सहजप्रवृत्तींचा विकास यांना मुरड घातली जाते. चांगले काय व वाईट काय हे विद्यार्थ्यांनी स्वतःच्या अनुभवातून शिकावे.

### ५. समाजसंपर्क नको

रूसोच्या काळी एकूण सामाजिक जीवन लाचलुचपत, अनाचार, कृत्रिमता व ढोंगीपणा यांमुळे दूषित झाले असल्यकारणाने अशा समाजापासून विद्यार्थ्यांना अलिप्त ठेवावे असे त्याचे प्रांजल मत होते. समाजाच्या संपर्कामुळे मूलचे सत्प्रवृत्त असलेले बालक बिघडून जाईल अशी त्याने भीती व्यक्त केली आहे. त्याने आपल्या एमिल या मानसपुत्राला समाजापासून दूर, निसर्गाच्या सान्निध्यात स्वयंशिक्षण देण्याची योजना आखली होती.

### ६. कृत्रिम शिस्त नको

शिस्त ही वरपांगी असू नये व ती औपचारिकपणे लादणे इष्ट नव्हे. खरी शिस्त ही आत्मप्रत्ययातून व स्वानुभवातून येणारी असते. प्रौढांनी लादलेल्या शिस्तीचे परिणाम विद्यार्थ्यांच्या दृष्टीने फारच अपायकारक होतात. त्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण होऊन नैसर्गिक विकासास आडकाठी येते. या बाबतीत रूसोने ‘Doctrine of natural Consequence’—‘नैसर्गिक परिणामाचा नियम’ प्रतिपादला आहे. या तत्त्वानुसार मुलाला झाडावर चढावयाचे असेल तर शिक्षकाने आडकाठी न करता त्याला चढू द्यावे. झाडावरून तो पडला तर; ही गोष्ट करू नये हे तो आपोआप शिकेलच.

### ७. रूढी नको

रूसोच्या काळातील सामाजिक परिस्थिती अनेक रूढींनी व धार्मिक नीति-नियमांनी जखडलेली होती. अशा स्थितीमध्ये विद्यार्थ्यांचा नैसर्गिक विकास होऊ शकणार नाही असे त्याने प्रतिपादिले आहे. सद्यःस्थितीच्या व रूढींच्या अगदी विरुद्ध वागा म्हणजे आपण अगदी बरोबर वागू असे जे तो काहीशा वैतागाने म्हणाला, त्यावरून त्या वेळच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक व शैक्षणिक परिस्थितीची त्याला वाटत असलेली घृणा दिसून येते.

## ( ३ ) कौमार्यावस्था ( वय १२ ते १५ )

व्यक्तीच्या वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत बुद्धी झोपी गेलेली असते असे तो म्हणे. त्यामुळे या वयापर्यंत बौद्धिक शिक्षण देण्याचा केलेला प्रयत्न अयशस्वी होतो. १२ ते १५ या वयामध्ये बौद्धिक शिक्षणास सुरुवात करावी. मात्र ते देण्यापूर्वी कोणते ज्ञान उपयुक्त आहे व कोणत्या ज्ञानाची विद्यार्थ्यांना जरुरी आहे याचा अंदाज शिक्षकांनी घेतला पाहिजे. मागे सांगितल्याप्रमाणे पुस्तकांचा उपयोग शक्यतोवर करू नये. एखादे पुस्तक विद्यार्थ्यांच्या हाती द्यावयाचे असल्यास डॅनिअल डीफोचे रॉबिनसन क्रूसो हेच पुस्तक द्यावे. कारण त्यामध्ये नैसर्गिक परिस्थितीत आत्मरक्षण कसे करावे व श्रमाची प्रतिष्ठा कशी राखावी यांचे प्रति-पादन केले आहे. विज्ञानाचे शिक्षण पुस्तकातून किंवा दुसऱ्याच्या अनुभवावरून देण्यापेक्षा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शास्त्रज्ञाची भूमिका देऊन निरनिराळ्या शोधांचा पुन्हा प्रत्यय आणून द्यावा. विद्यार्थ्यांच्या चुकांमुळे शिक्षकांनी भिऊन जाण्याचे काही कारण नाही. स्वप्रयत्नाने शिकणाऱ्या बालकाच्या हातून कित्येक चुका या होणारच. त्यांना प्रगतीच्या मार्गातील अडथळे न समजता विकासाच्या सोपाना-तील पायऱ्या समजणे शहाणपणाचे आहे. या वेळचे सर्व शिक्षण उपयुक्तता, जरुरी व प्रत्यक्ष परिस्थिती यांच्यावर आधारलेले असले पाहिजे.

## ( ४ ) पौगंडावस्था ( वय १५ ते २२ )

हा काल व्यक्तिविकासाच्या दृष्टीने अत्यंत नाजुक असतो. या अवस्थेमध्ये विद्यार्थ्याला धार्मिक, नैतिक व सामाजिक शिक्षण द्यावयाचे असते. आतापर्यंतच्या विविध अनुभवांमुळे विद्यार्थ्यांचे मन व शरीर विकसित झालेले असते. निरनिराळ्या सामाजिक व वैयक्तिक भावनांचा उद्रेक त्याच्या मनामध्ये होत असतो. या सर्व भावनांमध्ये कामभावना या वयामध्ये अतिशय प्रबल असते. त्यामुळे जगाकडे व समाजाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन व्यक्तीला येत असतो. भिन्न लिंगी व्यक्तीचे साहचर्य व सहवास आपणांस कसा मिळेल याबद्दल प्रत्येक व्यक्ती

आसुसलेली असते. कामवासनेचा उदय म्हणजे व्यक्तीचा पुनर्जन्मच होय. व्यक्तीचे पहिले आयुष्य स्वतःकरिता असते, तर यानंतरचे आयुष्य पुनरुत्पत्ती व समाजधारणा यांसाठी व्यतीत होणार असते. यापुढील सर्व जीवनावर कामभावनेचा प्रभाव प्रकर्षाने दिसून येतो. (Sex is the river that firtilizes the whole field of life) या कामवासनेचे उदात्तीकरण करणे हे या वयातील शिक्षणाचे प्रमुख कार्य होय आणि असे उदात्तीकरण विविध व्यवसाय व उद्योग यांच्या अनुषंगाने करता येते. रूसोच्या एमिलीला याच अवस्थेमध्ये आपल्या सहधर्मचारिणीचा शोध लागला. ती अशीच ग्रामीण व नैसर्गिक परिस्थितीमध्ये वाढलेली होती. तिला विणणे, कलाकुसरीची कामे करणे व इतर स्त्रीसुलभ कामे करता येत होती. ती समाजातील खालच्या थरातीलच होती. आपली पत्नी ही आपल्यापेक्षा खालच्या सामाजिक थरातील असावी असे रूसोचे मत होते. याच संदर्भात रूसोने स्त्रियांच्या शिक्षणाविषयीचे आपले विलक्षण विचार मांडले आहेत.

### स्त्रीशिक्षण

" Men are born to serve and women are boru to please. " स्त्रीचे जीवितकार्य म्हणजे पुरुषांचे मनोरंजन करणे हेच आहे. स्त्री ही विकासाच्या कोणत्याही अवस्थेत असली तरी तिचे प्रमुख कार्य पुरुषांच्या कार्यामध्ये मदत करणे व त्यांचा अनुनय करणे हेच आहे. पुरुष हा निसर्गतः बलवान व कार्यप्रवण असतो, तर स्त्री ही दुबळी व घराच्या चार भिंतीआड रहाण्यायोग्य असते. पुरुष आपल्या भावना विचाराने व्यक्त करतो, तर स्त्री आपल्या भावना शालीनतेने स्पष्ट करते. लिंगभेदामुळे उभयतांची कार्ये भिन्न असल्याकारणाने स्त्रीला पुरुषापेक्षा निराळ्या प्रकारचे शिक्षण देण्यात आले पाहिजे. पुरुषांचे मनोरंजन करणे, त्याला योग्य वेळी सल्ला देणे व दुःखाच्या परिस्थितीत त्याचे सांत्वन करणे ही स्त्रीची कामे आहेत; असे त्याने प्रतिपादिले आहे. ही रूसोची मते हल्लीच्या समतेच्या युगामध्ये कालबाह्य वाटल्याशिवाय राहणार नाहीत.

### एमिलीवरील टीका

एमिली या ग्रंथामध्ये अनेक अतिशयोक्तीपूर्ण, परस्परविसंगत व वदतो व्याघाताची अनेक उदाहरणे दिसून येतात. रूसो हा निराशावादी असला तरी तो आशावादी असल्याचा देखावा करतो. समाजाच्या सत्प्रवृत्तीतर त्याचा विश्वास नाही. पण व्यक्तीच्या चांगुलपणावर मात्र तो विसंबून रहातो. या वेळी समाज हा व्यक्तींनीच बनलेला असतो हे तो विसरतो. भावना व विचार, निसर्ग आणि संस्कृती या एकमेकांशी सुसंवादी होऊ शकणार नाहीत असे तो म्हणतो. मुलांना

पूर्ण स्वातंत्र्य द्यावे असे ज्या वेळी तो म्हणतो, त्याच वेळी त्याचा विद्यार्थी सतत शिक्षकाच्या देखरेखीखाली असावा असेही म्हणतो. मुलांना सर्व प्रकारच्या नैसर्गिक संधी उपलब्ध करून देणारा रूसो मुलींच्या बाबतीत मात्र एकदम कठोर बनतो. वरील प्रकारची अनेक असंबद्ध विधाने एमिलीमध्ये असली तरी रूसोचा हा ग्रंथ त्याच्या अद्वितीय व मूलगामी विचारांमुळे चिरंतन राहील. एमिलीमुळे आपल्या विचारापेक्षा भावनांनाच अधिक आवाहन मिळते आणि त्यामुळे आपण भावनावश होऊन रूसोच्या अनेक चुका पोटात घालतो. विद्यार्थ्यांच्या मनाचा अभ्यास केला पाहिजे याची प्रकर्षाने जाणीव प्रथम एमिलमुळेच झाली. लहान मूल व प्रौढ यातील मानसशास्त्रीय भेद रूसोनेच स्पष्ट केला. ज्ञानेंद्रिय शिक्षणाचे महत्त्वही त्याने नजरेस आणले. त्याने औपचारिक, पारंपारिक व उपदेशपर शिक्षणपद्धतीऐवजी अधिक शास्त्रीय व मानसशास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला. स्वयंशिक्षणाला त्याने चालना दिली. रूसो हा तत्त्वचिंतक व मूलग्राही विचारवंत होता. त्याने अत्यंत मौलिक असे शैक्षणिक विचार मांडले, तथापि त्यांचे संयोगीकरण व ते सुसूत्रपद्धतीने मांडणे त्याला जमले नाही. त्यामुळे त्याच्या ग्रंथाच्या वाचनात विचारांपेक्षा भावनेवर विशेष भर दिलेला आढळतो.

रूसोच्या लेखनाचा परिणाम—

१. शिक्षणकार्यात मुलांचे प्रमुख स्थान;
२. शिक्षकांनी मुलाचे मानसशास्त्र अभ्यासावे;
३. पालकांनी मुलास मुलांसारखे वागवावे;
४. मुलांसाठी नवीन पुस्तके लिहिण्यात आली;
५. मुलांना उपयुक्त असा अभ्यासक्रम सुरू झाला.

**मानसशास्त्रीय प्रगती**

रूसोचा मानसशास्त्राशी फारसा परिचय नव्हता तथापि भावी काळामध्ये शिक्षण हे बालकेंद्रित झाले त्याला रूसोच कारणीभूत होता. त्याने मुलांच्या जिज्ञासेवर व अभिरुचीवर विशेष भर देऊन त्यांचा अध्यापनात उपयोग करावा असे प्रतिपादिले. यातूनच भावी काळात पेस्टॉलॉझीला वस्तुपाठाची कल्पना, फ्रोबेलला प्रक्षेपित क्रियेची ( Motor Expression ) आणि हर्बार्टला आपल्या शिक्षणाच्या पाच पायऱ्यांची कल्पना सुचली असावी. रूसोच्या शैक्षणिक प्रतिपादनामुळेच अध्ययन-प्रक्रियेतील प्रेरणेला, समस्यानिर्मित अध्यापनाला-ज्ञानेंद्रियांच्या शिक्षणाला आणि कृतियुक्त शिक्षणपद्धतीला महत्त्व प्राप्त करून दिले. म्हणून शिक्षणातील मानसशास्त्रीय प्रवृत्तींचा जनक असे त्यास संबोधल्यास वावगे

होणार नाही. ड्यूईप्रमाणेच रूसोच्या मतेही शिक्षण म्हणजे प्रत्यक्ष जीवनच होय; केवळ जीवनाची पूर्वतयारी नव्हे.

## तत्कालीन परिस्थिती

१८ व्या शतकात अनेक चुकीच्या व विघातक शैक्षणिक समजुती रूढ होत्या. त्या तत्त्वानुसार चाललेले शिक्षण विद्यार्थ्यांना उपकारक न होता अनेक वेळा अपकारच होत असे. मूल म्हणजे प्रौढाची प्रतिकृती होय असे मानून प्रौढांच्या ज्या आशा, आकांक्षा, उपक्रम आणि वैशिष्ट्ये असत, त्यांनुसार लहान मुलांना शिक्षण देण्याचा प्रयत्न होई. लहान मुलांचे मानसिक विश्व भिन्न असते याची त्या वेळी कल्पना नव्हती. प्रौढांना आपल्या जीवनात जे उद्योग करावे लागत, ज्या पद्धतीने समाजामध्ये वागावे लागे, त्याला उपयोगी पडणारे शिक्षण लहान मुलांना देण्यावर कटाक्ष असे. विद्यार्थ्यांच्या किंवा त्यांच्या मनाच्या अभ्यासापेक्षा विषयांच्या अभ्यासावर विशेष भर देण्यात येत असे. रूसोने ही पद्धती बदलली. शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्याला मध्यवर्ती स्थान दिले पाहिजे असे त्याने प्रतिपादले. शिक्षण म्हणजे विद्यार्थ्याच्या डोक्यात काही नवे ज्ञान किंवा कल्पना भरणे हे नसून त्याच्या मानसिक व शारीरिक विकासाला सुसंधी प्राप्त करून देणे हे होय. प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे असे व्यक्तिमत्त्व व विशिष्ट स्थान असते. समाजाकरिता व्यक्तीचे बलिदान होता कामा नये. शिक्षणाचा हेतू विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक व नैतिक प्रवृत्तींचा विकास निसर्गनियमानुसार घडवून आणणे हा होय. या तत्त्वांचा पाठपुरावा त्याने सतत केला.

## शिक्षणातील सामाजिकता

रूसोने समाजाच्या कृत्रिम व वरपांगी चालीरीतींवर कठोर हल्ला चढविला, त्यामुळे त्या वेळी प्रचलित असलेल्या अनैसर्गिक शिक्षणसंस्थांना व शिक्षण-पद्धतींना त्याने विरोध केला. त्याने आदिमानवाचे गोडवे गायले व प्राचीन समाज-व्यवस्थेची स्तुती केली. साधे, अकृत्रिम जीवन त्याला आवडत होते. समाजातील प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या चरितार्थासाठी उत्पादक उद्योग करावा असा रूसोचा आग्रह होता. यातच भावी कालातील व्यावसायिक शिक्षणाची बीजे आपणांस पहावयास मिळतात. भावी काळात झालेल्या शिक्षणशास्त्रज्ञांच्या मौलिक तत्त्वांचा उगम किंवा त्यासंबंधीची प्रेरणा रूसोच्या एमिलीमध्ये पहावयास मिळते. रूसोचे नकारात्मक शिक्षण आणि समाजविन्मुख शिक्षणपद्धती यांमध्ये शिक्षणातील सामाजिकतेच्या चळवळीतील अनेक मुद्दे पहावयास मिळतात.

## वैज्ञानिक चळवळ

रूसोने आपल्या निसर्गवादामध्ये व्यक्तिगत निरीक्षणावर भर देऊन पुस्तकी विद्येचा धिक्कार केला होता. त्यामुळेच शालेय अभ्यासक्रमामध्ये निसर्ग-परिचय, वनस्पती व प्राणिजीवन यांसारख्या विषयांचा लवकर समावेश होऊ शकला. पेस्टॅलॉझीने शालेय अभ्यासक्रमामध्ये भूगोलाचा व निसर्गाचा जो समावेश केला, त्याची प्रेरणा रूसोच्या तत्त्वज्ञानात पहावयास मिळेल. शालेय अध्यापनामध्ये शास्त्रीय विषयाला मानाचे स्थान हर्बार्ट, स्पेन्स व हक्स्ले या शास्त्रज्ञांनी दिले व त्याची पूर्वपीठिका रूसोने घातली असे म्हणावयास हरकत नाही.

## शिक्षणपद्धती

प्रत्यक्ष वस्तू व अनुभव यांतून विद्यार्थ्यांनी स्वयंप्रेरणेने शिकावे. शक्यतो पुस्तकांचा वापर अध्यापन-अध्ययनासाठी करू नये. कृतियुक्त शिक्षण व क्रीडन-पद्धतीचे शिक्षण या अध्ययन-अध्यापनाच्या चांगल्या पद्धती आहेत. सांकेतिक खुणांच्या वापरापूर्वी प्रत्यक्ष वस्तू दाखवाव्यात व शब्दाच्या उच्चारापूर्वी प्रत्यक्ष अनुभव घ्यावा. शिक्षण म्हणजे बाहेरून लादण्याची क्रिया नसून ती एक आंतरिक प्रक्रिया आहे. " Education does not arise from without; it springs from within. " मूलभूत नैसर्गिक शक्तींचा विकास करणे म्हणजेच शिक्षण होय. अध्यापनपद्धती ही विद्यार्थ्यांचे वय व विषयाचे स्वरूप यांवर अवलंबून असावी. मात्र अध्यापनामध्ये शिक्षेमुळे भीतियुक्त वातावरण निर्माण करू नये.

## शिक्षक

शिक्षकाला मुलांच्या सहजप्रवृत्तींचे व विकासाच्या निरनिराळ्या अवस्थांच्या वैशिष्ट्यांचे संपूर्ण ज्ञान हवे. शिक्षकाची खरी भूमिका मार्गदर्शकाची आहे. त्याने आपले ज्ञान व अनुभव विद्यार्थ्यांवर लादण्याचा प्रयत्न करू नये. मात्र त्यांच्या स्वयंशिक्षणास अनुकूल परिस्थिती निर्माण करावी. मुलांना शक्य तितके स्वातंत्र्य द्यावे व त्यांना अडचणीच्या परिस्थितीमध्ये अपाय होणार नाही इतके त्यांच्यावर लक्ष असू द्यावे. विद्यार्थ्यांच्या विचारांशी व भावनांशी समरस होण्यासाठी त्याने आत्मसंयमन पाळले पाहिजे.

## शिक्षणाचे ध्येय

व्यक्तींच्या सुप्तशक्तींचा अधिकाधिक विकास घडवून आणणे आणि तोही नैसर्गिक वातावरणामध्ये घडवून आणणे हे शिक्षणाचे ध्येय आहे. ज्या समाजामध्ये

धैर्य, सहनशीलता, समता, बंधुता, साधेपणा व स्वातंत्र्य या मूलभूत गुणांची वाढ होते, असा नवसमाज निर्माण करणे हे शिक्षणाचे सामाजिक ध्येय आहे. शिक्षणाने तयार केलेला स्वाभाविक मानव हाच अशा समाजाचा योग्य घटक होऊ शकेल. पशुता, रानटीपणा, एकाकी अवस्था व सामाजिक अवस्था या उत्क्रांतीच्या स्वाभाविक पायऱ्या आहेत.

रूसो हा प्रतिभासंपन्न व मूलग्राही विचारांना चालना देणारा शिक्षणतज्ज्ञ होता. त्याने प्रतिपादिलेली स्त्रीशिक्षणविषयक काही तत्त्वे, नकारात्मक शिक्षण व नैसर्गिक परिणामातून शिस्त या गोष्टी कित्येकांना आजच्या परिस्थितीत कालबाह्य व विसंवादी वाटल्या, तरी एकोणिसाव्या व विसाव्या शतकातील शिक्षणतज्ज्ञांना व समाजसुधारकांना त्याने केलेले वैचारिक मार्गदर्शन हे दीपस्तंभाप्रमाणे सुस्पष्ट व क्रांतिकारक होते, यात संदेह नाही.

◆ ◆ ◆

# पेस्टॅलॉझी

| | |
|---|---|
| जन्म | १७४६ |
| मृत्यू | १८२७ |

शिक्षणामध्ये निसर्गवाद सुरू करणाऱ्या रूसोचा पेस्टॅलॉझी हा अनुयायी होता. रूसोने शिक्षणक्षेत्रामध्ये जी नवविचारांची भर घातली त्यांचा मागोवा घेत प्रत्यक्ष प्रयोग करण्याचे श्रेय पेस्टॅलॉझी यालाच दिले पाहिजे. रूसोने शिक्षक म्हणून कधीही काम केले नव्हते किंवा आपल्या जीवनात कोठेही प्रत्यक्षपणे शाळा चालविली नव्हती. त्याने जुन्या कुचकामी शिक्षणपद्धतीचे वाभाडे काढून नवीन पुरोगामी शैक्षणिक विचारांची देणगी नव्या पिढीला दिली होती. मात्र हे नवे विचार प्रत्यक्ष परिस्थितीमध्ये कितपत टिकतात, किंवा त्या विचारांना किती प्रमाणामध्ये मुरड घालावी लागते हे पाहण्याचे कार्य पेस्टॅलॉझीने केले आहे. या दृष्टिकोनातून पेस्टॅलॉझीची योग्यता मोठी असून त्याला आधुनिक शिक्षणाचा पितामह म्हणतात, हे अन्वर्थकच आहे. रूसोच्या तत्त्वज्ञानानुसार पेस्टॅलॉझीने अनेक वर्षे व अनेक ठिकाणी शाळा चालविल्या. प्रत्येक वेळी त्याला अपयशच पदरी आले. अपयश येण्याचे कारण म्हणजे ज्या शैक्षणिक तत्त्वानुसार त्या शाळा चालविल्या होत्या, ती तत्त्वे चिरंतन व सत्य नव्हती हे नसून, त्या अपयशाला त्याचा गैरहिशोबीपणा व गैरव्यवहारच कारणीभूत होता. अनेक

शैक्षणिक प्रयोग फसले, तरी पेस्टॅलॉझी नाउमेद झाला नाही. मात्र प्रयोगाच्या अग्निदिव्यातून त्याला चिरंतन शैक्षणिक तत्त्वांचा साक्षात्कार होऊन त्याची त्यांच्यावर निःसीम श्रद्धा बसली. म्हणूनच पेस्टॅलॉझीला 'Champion of the Successful Failures' ("यशस्वी अपयशांचा अध्वर्यू") असे म्हणतात.

जॉन हेन्रिच् पेस्टॅलॉझीचा जन्म १२ जानेवारी १७४६ रोजी स्वित्झर्लंड मध्ये झूरिच या गावी झाला. त्याचे आईवडील इटलीतील निर्वासित म्हणून तेथे काही वर्षे येऊन राहिले होते. वयाच्या पाचव्या वर्षी त्याचे वडील निवर्तले. त्याच्या संगोपनाची सर्व जबाबदारी त्याच्या कर्तृत्ववान व कष्टाळू आईवर पडली. आपल्या तीन मुलांचे संगोपन हेच आपले जीवनसर्वस्व असे तिने मानले व त्यासाठी परिश्रमांची व स्वार्थत्यागाची पराकाष्ठा केली. पेस्टॅलॉझीच्या कुटुंबामध्ये अठराविश्वे दारिद्र्य असल्याकारणाने सर्व चैनीच्या बाबतीत त्यांना काटकसरच करावी लागे. मुलांच्या संगोपनात त्याच्या आईबरोबरच त्याच्या दाईचाही बराच मोठा वाटा आहे. बालपणामध्ये केवळ स्त्रियांच्याच सान्निध्यात राहिल्यामुळे त्याच्या अंगी पौरुषाला योग्य असे गुण वाढीस लागू शकले नाहीत. तो काहीसा हळवार, प्रेमळ, वत्सल व नाजूक प्रवृत्तीचा होता. त्याची आई व दाई यांनी त्याच्या भावनात्मक वाढीकडे अधिक लक्ष दिले होते. त्यामुळे त्याची बौद्धिक वाढीपेक्षा भावनात्मक वाढच अधिक झालेली दिसून येते. या गुणामुळेच त्याच्या जीवनामध्ये दीनदुबळे व गरीब पददलित यांच्याबद्दल त्याला अपार करुणा वाटत असे. बालवयामध्ये बाह्य जीवनाचा त्याला फारच कमी परिचय झाला, त्यामुळे त्याला मित्रांचा सहवास मिळाला नाही. तो शरीराने दुबळा व स्वभावाने लाजरा असा बनला.

## शालेय जीवन

स्त्री-सान्निध्यामुळे पेस्टॅलॉझीच्या जीवनाची झालेली एकतर्फी वाढ शाळेतही सुधारू शकली नाही. आपल्या मित्रमंडळींचे पुढारीपण त्याला कधीच मिळू शकले नाही, की आपली मते त्यांना पटवून देता आली नाहीत. पेस्टॅलॉझीच्या शिक्षणाची सुरुवात एका सामान्य प्राथमिक शाळेत झाली. नंतर त्याने एका लॅटिन शाळेत प्रवेश घेतला. या शैक्षणिक संस्थांतून तो फारसे शिकू शकला नाही. विश्वविद्यालयीन शिक्षणामध्ये तो फारसा चमकू शकला नाही. मात्र भाषा-विषयावर त्याने या वेळी प्रभुत्व मिळविले.

### व्यक्तिमत्त्व

पेस्टॅलॉझीचे व्यक्तिमत्त्व अजिबात आकर्षक नव्हते. तो शरीराने दुबळा व कुरूप होता. शिवाय त्याचे आरोग्यही कधीच चांगले नसे. यातच भर म्हणून की काय तो आपल्या कपड्यांबद्दल अगदी निष्काळजी असे. वागण्याच्या भारदस्त पद्धती त्याला माहीत नव्हत्या. त्यामुळे त्याच्या सान्निध्यात आलेल्या व्यक्तीवर त्याला छाप पाडता येत नसे. मात्र त्याच्या वर्तनामध्ये औपचारिकता अजिबात नव्हती. राजा असो वा रंक असो, दोघांनाही तो आपले तत्त्वज्ञान सारख्याच तळमळीने पटवून देण्याचा प्रयत्न करी.

### शैक्षणिक प्रयोग

पेस्टॅलॉझी शिक्षणक्षेत्राकडे वळला, हा केवळ एक अपघातच होय. पहिल्याने त्याचा हेतू धर्मोपदेशकाचा पेशा पत्करावा असा होता. त्यानुसार त्याने शिक्षण घेतले होते. एका खेड्यामध्ये धर्मोपदेशकाची जागाही त्याला मिळाली होती. परंतु पहिल्याच प्रवचनाच्या वेळी तो इतका भावविवश झाला की, त्याला हे काम आपणांस झेपणार नाही असे वाटू लागले. म्हणून त्याने हा पेशा सोडून दिला. पूर्वायुष्यामध्ये त्याने रूसोचा एमिली हा ग्रंथ वाचला होता व त्याबद्दल त्याला विलक्षण आकर्षण निर्माण झाले होते. अठराव्या शतकात सुरू झालेल्या बऱ्याच वैचारिक चळवळीमुळे त्या वेळच्या लोकांचे लक्ष कृषिशास्त्राकडे खेचले गेले होते. रूसोने नैसर्गिक जीवनाचे व निसर्गप्रेमाचे गोडवे गायले होतेच. निसर्गाशी तादात्म्य पावण्यासाठी शेती हाच एक अत्यंत उदात्त असा व्यवसाय त्या काळी गणला जात होता.

शेतीचे ज्ञान मिळविण्यासाठी पेस्टॅलॉझी एका शेतकऱ्याजवळ एक उमेदवार म्हणून राहिला. त्या वेळी त्याने शेतीविषयी थोडेबहुत उपयुक्त ज्ञान मिळविले व काही प्रत्यक्ष अनुभवही घेतला. याच निष्ठेने त्याने नंतर कर्जाऊ रक्कम उभी करून शंभर एकर जमीन खरेदी केली. या ठिकाणी सर्व सुखसोयींनी युक्त असे एक घर त्याने बांधले. या घराचे रूपांतर त्याने अनाथ मुलांना शिक्षण देणाऱ्या शालागृहामध्ये केले. शालागृहाच्या सभोवती असणाऱ्या शेतीत निरनिराळ्या प्रकारचे अन्नधान्य व भाजीपाला यांची तो पैदास करू लागला. अध्यापनाचे विषय व उद्योग यांचा समवाय साधण्याचा प्रयत्न या ठिकाणी तो करीत होता. मानवजातीचा उद्धार करण्याचे एक महान साधन म्हणजे शिक्षण होय, असे त्याचे मत बनू लागले. आपल्या मुलाला एमिलीप्रमाणे निसर्गाच्या सान्निध्यात व निसर्गाच्या माध्यमातून शिक्षण द्यावे अशी त्याची मूळ कल्पना होती. शेती-

बरोबरच सूतकताई, घरबांधणी याही हस्तोद्योगांची जोड त्याने शिक्षणास दिली होती. शिक्षणाचा हा प्रयोग जवळजवळ तीस वर्षे करूनही त्याला त्यात शेवटी अपयशच पत्करावे लागले. तथापि मागे लिहिल्याप्रमाणे या अपयशातही त्याच्या शिक्षणविषयक तत्त्वांचा विकास झालेला त्याला पहावयास मिळाला. म्हणून प्राणापलीकडे जतन केलेल्या शैक्षणिक तत्त्वांवरील त्याची श्रद्धा थोडीसुद्धा कमी झाली नाही. आपल्या शैक्षणिक तत्त्वांचे ज्ञान सर्व जगाला करून देण्याच्या उद्देशाने तो ग्रंथलेखनाकडे वळला.

## लिओनॉर्ड आणि गर्ट्रूड ( Leonard and Gertrude )

सन १७८२ साली या ग्रंथाचा पहिला भाग प्रसिद्ध झाला. दारिद्र्य, अज्ञान, व्यसनासक्ती, दुःख, पिळवणूक अशा नानाविध आधिव्याधींनी पीडित झालेल्या स्विझ खेड्याचे एक दारुण चित्र रेखाटण्याचा प्रयत्न पेस्टॅलॉझीने या ग्रंथात केला आहे. जर्ट्रूड ही एक कर्तृत्ववान गृहिणी अशा विकट परिस्थितीमध्ये आपल्या व शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या मुलांना हस्तोद्योगामार्फत लेखन, वाचन व गणित या विषयांचे शिक्षण देत आहे असे वर्णन या ग्रंथात त्याने केले आहे. या ग्रंथाच्या प्रकाशनानंतर राजेरजवाडे, अमीरउमराव व पंडित लोकांनी त्याचे विलक्षण उत्साहाने स्वागत केले. परंतु शिक्षणात कार्य करणाऱ्या शिक्षकांनी त्याच्याकडे पाठ फिरविली. प्रत्येक व्यक्तीला आपल्या अस्मितेची आणि शक्तीची हळूहळू जाणीव करून दिल्याखेरीज समाजाचे पुनरुत्थान होणार नाही, या गोष्टीवर पेस्टॅलॉझीची दृढ श्रद्धा होती. या श्रद्धेमुळेच अनाथ व पददलित मुलांच्या शिक्षणाकडे तो आकर्षिला गेला होता.

विद्यार्थ्यांमध्ये आत्मनिष्ठा व स्वावलंबन या गुणांची वाढ केल्याशिवाय समाजाला बळकटी येणार नाही, असे त्याचे मत होते. घर व शाळा येथील वातावरणामध्ये तफावत असता कामा नये; उलट शाळेमध्ये घराप्रमाणेच आनंदी, स्वच्छंदी व प्रेमळ वातावरण असले पाहिजे, यावर त्याचा भर होता. घरामध्येच प्रेमळ वातावरणात मुलांच्या सुप्तशक्ती उत्तम रीतीने वाढीला लागतात, हे त्याने अनुभविले होते व तेच वातावरण शाळेत निर्माण करण्याबद्दल त्याचा आग्रह असे. त्याच्या शाळेत एकदा एक शेतकरी आपल्या मुलांची चौकशी करण्याकरिता आला असता त्याच्या तोंडून "अरे, हे तर घरच आहे" असे उद्‌गार अभावितपणे बाहेर पडले. हे उद्‌गार ऐकून पेस्टॅलॉझीला आपला हेतू साध्य झाल्याचा आनंद मिळाला. पेस्टॅलॉझीच्या शाळेचे वेळापत्रक अत्यंत बारकाईने तयार केले जात असे. विद्यार्थ्यांना आपल्या गुरुजींचा सहवास अधिक प्रमाणात कसा मिळेल

इकडे त्याचे लक्ष असे. केवळ अभ्यासाच्या वेळीच नव्हे तर एरव्ही खेळात, भोजनाच्या वेळी व झोपेच्या खोलीत गुरुजी विद्यार्थ्यांबरोबरच असत. गणित-भाषा यासारखे तास सकाळी शिकविण्यात येत, तर संगीत, चित्रकला, बागकाम यांसारखे सोपे विषय दुपारी घेतले जात असत.

मनोरंजनाला शिक्षणामध्ये मोठे स्थान दिले जात असे. बुधवारी व शनिवारी दुपारी शाळेला सुट्टी असे. त्या वेळी आपल्या मनाप्रमाणे कोठेही जाण्यास विद्यार्थ्यांना पूर्ण स्वातंत्र्य असे. पेस्टॅलॉझीने शाळेत निर्माण केलेल्या या प्रेमळ व सुखद वातावरणाबद्दल आज आपणांस विशेष वाटत नाही. तथापि त्याच्या कालातील शाळेची परिस्थिती समजून घेतल्यास त्याने शाळेमध्ये क्रांतीच घडवून आणली असे म्हणावे लागेल. त्या वेळी शिक्षण हा केवळ उच्च वर्गीयांचाच खेळ होता. कोणत्याही प्रकारचे शिक्षण बहुजन समाजाच्या आवाक्याबाहेरच होते. शालागृहे कोंडवाड्यापेक्षाही वाईट अवस्थेत होती. शिक्षण म्हणजे केवळ ग्रीक-लॅटिनचे पाठांतर अशी समजूत होती. शिक्षेचे स्तोम इतके माजले होते की, सर्व विद्यार्थ्यांमध्ये नेहमी भीतीचे वातावरण असे. पेस्टॅलॉझीच्या शाळेत मात्र अगदी भिन्न परिस्थिती असे. निरीक्षणावर व प्रत्यक्ष अनुभवावर त्याने भर दिला होता. मुलांच्या सुप्त शक्तींचा विकास निसर्गाच्या रमणीय व प्रेमळ वातावरणातच होतो, हे त्याने प्रत्यक्षपणे पटवून दिले होते. विकासासाठी ज्ञानेंद्रियांचा विकास आवश्यक आहे असे तो मानीत असे. शिक्षणासाठी अवधान, निरीक्षण व स्मरण या गोष्टींची अत्यंत आवश्यकता आहे असे त्याने प्रतिपादिले आहे. त्याचबरोबर संख्या ( गणित ), लेखन ( भाषा ), चित्रकला ( कला ) आणि उद्योग यांचा समन्वय जीवनामध्ये हरघडी घालावा लागतो. आपली तत्त्वे जनतेला विशद करण्यासाठी ‘ How Gertrude teaches her children’ असा आणखी एक ग्रंथ त्याने १८०१ साली लिहिला. याच ग्रंथाच्या परिशीलनाने शिक्षण हे एक शास्त्र होऊ शकेल असा अभिप्राय विद्वानांनी दिला.

## शैक्षणिक तत्त्वे

१. कोणताही विषय शिकविण्यापूर्वी त्याचे घटकनियोजन केले पाहिजे.
२. विषयातील निरनिराळ्या घटकांचा चढता क्रम लावला पाहिजे.
३. शक्य तेथे वस्तुपाठ घेण्यात यावेत.
४. शिक्षणामध्ये पुस्तकावर भर देण्यात येऊ नये. ज्ञानेंद्रिये ही ज्ञानग्रहणाची साधने असल्यामुळे अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत त्यांचा अधिकाधिक उपयोग करण्यात यावा.

५. विषयाच्या अध्यापनामध्ये तोंडी कामावर विशेष भर द्यावा. भाषेमध्ये शब्द व वाक्य प्रथम उच्चारावयास शिकवावे. नंतर वाचन व लेखन असा क्रम असावा.

६. कृतियुक्त शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळत असल्यामुळे ते अधिक उपयुक्त व परिणामकारक ठरते.

७. शालेय शिस्त, शिक्षा अथवा बक्षिसे यावर अवलंबून नसते. विद्यार्थ्याला शारीरिक शिक्षा करावी लागणे, हा शिक्षणाचा व शिक्षकाचा पराभव होय.

८. अध्यापनामध्ये खालील सूत्रांचा वापर करावा.

(अ) मूर्ताकडून अमूर्ताकडे
(ब) सुगमाकडून दुर्गमाकडे
(क) ज्ञाताकडून अज्ञाताकडे

९. अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत विद्यार्थ्यांच्या मानसिक शक्तींच्या विकासाकडे लक्ष द्यावे. त्यांच्या अनुषंगानेच शिक्षणाचे विषय व पद्धती ठरविल्या पाहिजेत. अध्यापन केवळ तर्कावर अधिष्ठित न ठेवता ते मानसशास्त्रावरही उभारलेले असावे.

१०. शिक्षण उत्पादनक्षम असावे. समाजातील दीनदुबळ्यांची परिस्थिती सुधारावयाची असल्यास शिक्षण घेतलेल्या प्रत्येक व्यक्तीस काही उत्पादक व्यवसाय करता आला पाहिजे. त्याशिवाय त्याला मानाने जगता येणार नाही.

अध्यापन-तत्त्वे

१. शिक्षणाच्या पद्धतीमध्ये निरीक्षणावर विशेष भर दिला पाहिजे. संख्या शिकविताना प्रथम प्रत्यक्ष वस्तूंचा उपयोग केला पाहिजे. त्याचप्रमाणे अंकगणितातील बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार ही चार कृत्ये शिकविण्यासाठी प्रत्यक्ष वस्तूंचाच उपयोग केला गेला पाहिजे. ज्ञानदानापेक्षा प्रत्यक्ष निरीक्षणाने मिळविलेले ज्ञान अधिक मोलाचे असते.

२. निरीक्षणाप्रमाणेच विद्यार्थ्यांना निरनिराळे शैक्षणिक अनुभव देणे आवश्यक आहे. निरीक्षण व अनुभव यांच्या अनुषंगाने भाषाज्ञान सहज व सुलभपणे देता येईल.

३. विद्यार्थ्यांचे अध्ययन चालू असताना त्याला विघातक अशी टीका करू नये.

४. कोणताही विषय शिकविताना शिक्षकाने प्रथम त्याचे घटक, उपघटक, व संबोध निश्चित करावेत. प्रथम सोपे संबोध शिकविण्यास सुरुवात करावी. त्यांचा क्रम विद्यार्थ्यांच्या विकासानुरूप व मानसशास्त्रीय असावा.

५. एक मुद्दा पूर्णपणे आकलन झाल्याशिवाय दुसरा मुद्दा शिकविण्यास घेऊ नये.

६. निरनिराळ्या विषयांचे ज्ञान मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा व जिज्ञासा निर्माण करावी.

७. शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची बूज राखावी.

८. प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांच्या मानसिक शक्तींचा विकास करणे हे असावे. त्यांच्या डोक्यात भारंभार ज्ञान भरणे हे असू नये.

९. ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सुप्त शक्तींचा व कौशल्यांचा विकास व्हावा.

१०. शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये प्रेमाचे व आपुलकीचे संबंध असावेत.

११. अध्यापन म्हणजे शिक्षणाचे अंतिम ध्येय साधण्याचे एक साधन होय. ते काही शिक्षणाचे साध्य होऊ शकत नाही.

### शिक्षणाचे ध्येय

शिक्षण हे समाजसुधारणेचे एक प्रभावी साधन आहे. सुधारणेची खरी सुरवात व्यक्तीपासूनच होते. ती समाजापासून होऊ शकत नाही. कारण व्यक्ती ही समाजाची मूलघटक आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या अस्मितेची जाणीव आणि स्वतःच स्वतःला मदत करण्याची पात्रता आल्याशिवाय त्याची उन्नती होऊ शकणार नाही. व्यक्तीच्या विकासाची बीजे व्यक्तीतच सुप्तावस्थेत असतात. त्याला अंकुरित होण्यास योग्य वातावरण निर्माण करण्याचे काम शिक्षणाचे आहे. व्यक्तीचा सर्वांगीण विकास होण्यासाठी तिचा विविध दृष्टिकोनांतून विचार करावा. व्यक्ती ही मन व बुद्धी यांची बनलेली असल्याकारणाने तिच्या शारीरिक विकासाबरोबरच तिचा मानसिक विकासही झाला पाहिजे. त्याचप्रमाणे व्यक्ती ही समाजात रहावयाची असल्याकारणाने तिचा सामाजिक, नैतिक व धार्मिक विकास घडवून आणणे अत्यावश्यक आहे. मात्र हा त्रिविध विकास समकालीन व समप्रमाणात व्हावयास हवा. या विकासामध्ये व्यक्तीचे हृदय, मन व हात यांचा समावेश असेल. (Head, heart & hand). "Head, heart and hand are different organs, yet they must function n harmony."

१. शिक्षणामध्ये प्रथम व्यक्तिविकासाला महत्त्व दिले पाहिजे. व्यक्तीच्या विकासावरच समूहाचा व पर्यायाने समाजाचा विकास अवलंबून आहे.

२. व्यक्तिविकासासाठी स्वावलंबन व स्वाभिमानी वृत्ती प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये जोपासली पाहिजे. दुसऱ्यावर अवलंबून राहण्याच्या प्रवृत्तीने व्यक्तीच्या विकासात अडचणी निर्माण होतात.

३. प्रत्येक व्यक्तीमध्ये काहींना काही सुप्तशक्ती वास करीत असतात. त्या विकासक्षम असतात. त्यांच्या योग्य विकासाला सुसंधी प्राप्त करून देणे हेच खऱ्या शिक्षणाचे ध्येय होय. सुप्तशक्तींच्या विकासामुळेच पददलित व दीनदुबळ्यांचा खऱ्या अर्थाने विकास होऊ शकेल.

४. खऱ्या शिक्षणामुळे व्यक्तीचे जीवन चारित्र्यसंपन्न आणि सुखी व्हावयाचे असल्यास त्याच्या मूलभूत प्रवृत्तींचा एकमेकांशी सुसंगत असा विकास घडवून आणणे आवश्यक आहे. शिक्षण हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे. तो त्याला उपलब्ध करून देणे हाच सर्वात मोठा परोपकार होय.

### अध्यापन-पद्धती

शिक्षकाने माळ्याची भूमिका घ्यावी. प्रत्यक्ष शिकविण्याचे काम न करता विद्यार्थ्याला स्वतःच्या अनुभवांतून स्वयंशिक्षण मिळेल असे वातावरण निर्माण करावे. जेथे म्हणून शक्य असेल तेथे प्रत्यक्ष वस्तू दाखवावी. काल्पनिक गूढगुंजनावर व शब्दांच्या जंजाळावर भर देऊ नये. ( वस्तुपाठाचा अतिरेक पुढील दोन शतकांमध्ये काही ठिकाणी झालेला दिसून येतो. घोड्यावर पाठ घेण्यासाठी प्रत्यक्ष वर्गामध्ये घोडा आणल्याची उदाहरणे सर्वश्रुत आहेत.) कोमिनिअसने अध्यापनामध्ये चित्रांची मदत घ्यावी. असे म्हटले होते. पेस्टॅलॉझी मात्र त्याच्या पुढे एक पाऊल जाऊन प्रत्यक्ष वस्तूंचा उपयोग शिक्षणामध्ये करावा असे म्हणत असे. अध्ययनअध्यापनामध्ये ज्ञानेंद्रियांचा व कर्मेंद्रियांचा उपयोग शक्य तितक्या अधिक प्रमाणात करावा.

" Sense impression of nature is the only foundation of the human instruction because it is the only true foundation of human knowledge."

शिक्षणामध्ये वातावरणनिर्मितीला प्राधान्य द्यावे. प्रेमळ व घरगुती वातावरणातून विद्यार्थी नकळत शिकत असतात. अध्यापनामध्ये पाट्या व पेन्सिलींचा उपयोग करावा.

शिक्षणामध्ये मानसशास्त्राच्या उपयोगाला पेस्टॅलॉझीने चालना दिली. विद्यार्थ्यांचा विकास हा त्यांच्या सुप्तशक्तींच्या विकासावरच अवलंबून असतो. प्रत्येक व्यक्तीमध्ये काही मानसिक व शारीरिक व्यक्तिभेद असतात. अनुभवाचे शिक्षण हेच खरे शिक्षण. ज्ञानेंद्रियांचा विकास हा शिक्षणाचा पायाच होय. यासारख्या त्याच्या तत्त्वामुळे त्याने सर्व शिक्षण मानसशास्त्रमय केले असे म्हणतात. " He Psychologised Education. "

## निरीक्षण-पद्धती

अध्यापनामध्ये निरीक्षणात्मक पद्धतींचा प्रामुख्याने वापर करावा असे पेस्टॅलॉझीचे मत होते. या पद्धतीमुळे विद्यार्थ्यांना वस्तुमात्रातील विविध संबंध स्पष्ट होऊन त्यांचे भाषाज्ञानही वाढेल. निरीक्षणकार्य सुकर व्हावे म्हणून विविध विषयासाठी त्या शैक्षणिक साहित्य तयार केले होते. अपूर्णांकाची कल्पना येण्यासाठी अनेक चौरस असलेला व त्यांचे आडवे-उभे भाग केलेला असा एक फळा त्याने तयार केला होता. रूसोप्रमाणेच इतिहास हा विषय बाल्यावस्थेमध्ये शिकविण्याची गरज नाही असे त्याचे मत होते.

## शाळांची स्थिती

पेस्टॅलॉझीच्या काळी शैक्षणिक संस्थांची स्थिती अत्यंत वाईट होती. शाळांचा कारभार चर्चसारख्या धार्मिक संस्थांच्या अधीन होता. शाळांसाठी स्वतंत्र इमारती उपलब्ध नव्हत्या. स्वित्झर्लंडमध्ये झुरिचसारख्या प्रमुख शहरीही फारच थोड्या शाळांना स्वतःच्या इमारती होत्या. बहुसंख्य शाळा खाजगी घरांत भरत असत. जी व्यक्ती शाळेसाठी जागा देईल त्याची शिक्षक म्हणून निवड करण्यात अडचण पडत नसे. शिक्षकवर्गामध्ये लढाईत निकामी झालेले शिपाई, बेकार शिंपी, कुंभार व इतर बलुतेदार यांचाच विशेष भरणा असे. पाठांतर करणे हीच काय ती अध्यापनपद्धती प्रचलित असे. समाजातील श्रीमंत लोकांना शाळांची सुधारणा व्हावी याची जाणीव नसे. बहुजन समाज शहाणा व सुशिक्षित व्हावा असे कित्येक हितसंबंधी लोकांना स्वार्थामुळे वाटत नसे. अशा परिस्थितीमध्ये शिक्षणाकडे जनतेचे लक्ष वेधून घेण्याचे कार्य आपल्या जीवनात अविश्रांत परिश्रम करून पेस्टॅलॉझीने केले.

## पेस्टॅलॉझी व रूसो

रूसोच्या निसर्गवादामध्ये नकारात्मक शिक्षणावर अधिक भर देण्यात आला होता. पेस्टॅलॉझीने रूसोच्या निसर्गवादाचा स्वीकार केला खरा, पण त्याला

योग्य अशी मुरडही घातली. त्याने प्रत्यक्ष रचनात्मक कार्यावर भर दिला. रूसोच्या मताप्रमाणे मुलाचा विकास स्वैरपणे व मनमाने होऊ द्यावयाचा नव्हता. त्याच्या विकासास योग्य दिशा व वळण दिले पाहिजे, असे त्याचे मत होते. ही दिशा मुलाच्या मूलभूत शारीरिक, बौद्धिक व नैतिक शक्तीनुसार मिळाली पाहिजे. मूलभूत शक्तींचा विकास म्हणजेच नैसर्गिक शिक्षण असे त्याचे मत होते. रूसोच्या मताप्रमाणे नैसर्गिक शक्तींचा विकास सामाजिक व सांस्कृतिक परिसरात योग्यरीतीने होत नाही. पेस्टॅलॉझीच्या मताप्रमाणे नैसर्गिक व सांस्कृतिक परिस्थितीचा योग्य तो फायदा शिक्षणाच्या विकासासाठी घेणे आवश्यक आहे. शिक्षण हे सार्वत्रिक असावे कारण त्यामुळे व्यक्तीची सर्वांगीण उन्नती होते असे पेस्टॅलॉझीचे मत होते. दारिद्र्य हे व्यक्तीच्या शिक्षणात आडकाठी आणू शकत नाही. रूसोच्या निसर्गवादाला पेस्टॅलॉझीने विशिष्ट आकार दिला.

## मूल्यमापन

(१) पेस्टॅलॉझीला काही आधुनिक शैक्षणिक तत्त्वांचा साक्षात्कार झाला असला तरी त्यासंबंधीची त्याची मांडणी काटेकोर व शास्त्रीय दिसत नाही. असे असले तरी व्यक्तीच्या व समाजाच्या विकासासाठी शिक्षण हेच अत्यंत प्रभावी साधन आहे, असे जे त्याने प्रतिपादिले ते शिक्षणाच्या इतिहासामध्ये फार महत्त्वाचे आहे. शिक्षणामध्ये विषयापेक्षा विद्यार्थ्यांच्या सुप्त शक्तींचा अधिक विचार केला पाहिजे या त्याच्या आग्रहामुळे शिक्षणाचे पुढील काळामध्ये मानसशास्त्रीयीकरण झाले हे लक्षात ठेवण्याजोगे आहे. शिक्षण हे एकसंघ व अविभाज्य असते, ही मूलमामी कल्पना त्यानेच प्रथम प्रतिपादिली. ज्ञानेंद्रियांच्या साह्याने बौद्धिक विकास घडून येतो हे त्याचे मत आधुनिक शैक्षणिक तत्त्वांशी सुसंगतच आहे. मूर्ताकडून अमूर्ताकडे जावे हा सिद्धान्त त्यानेच प्रथम मांडला. त्यामुळे अंकगणित, भूगोल, निसर्गपरिचय या विषयांचे अध्यापन अधिक सुलभ झाले. धर्माचे शिक्षण प्रवचनापेक्षा अनुकरणावर अवलंबून असावे. वर्गअध्यापनासाठी त्याने काही विशिष्ट तत्त्वे प्रतिपादिली. अशा रीतीने शिक्षणशास्त्रामध्ये त्याने बहुमोल तत्त्वांची भर घातली.

पेस्टॅलॉझी व्हर्डूनमध्ये मातांना व्याख्याने देत असे. मुलांना जन्मापासून शाळेत जाईपर्यंत कसे वागवावे ते त्याने मातांना शिकविले. हर्बार्ट व फ्रोबेल व्हर्डूनमध्ये दोन वर्षे राहिले होते; आणि त्यांनी पेस्टॅलॉझीकडून मिळविलेल्या ज्ञानावर आपापली पुढील कामगिरी केली.

## शिक्षक-प्रशिक्षण

पेस्टॅलॉझी हा शिक्षकप्रशिक्षणाचा आद्य प्रवर्तक होय. यापूर्वीच्या काळात शिक्षकांना प्रशिक्षणाची जरुरी आहे याची फारशी कल्पना नव्हती. परंतु त्याने प्रतिपादिलेल्या तत्त्वांनुसार अध्यापन करावयाचे म्हणजे शिक्षकांचे प्रशिक्षण होणे अत्यावश्यक होते. शिक्षणात सुधारणा म्हणजे शिक्षकांच्या दर्जात सुधारणा आणि तो दर्जा प्रशिक्षणाशिवाय प्राप्त होऊ शकणार नाही. म्हणून पेस्टॅलॉझीने Institution of Education नामक शिक्षक-प्रशिक्षणाची संस्था काढली होती. पुढील काळामध्ये शिक्षक-प्रशिक्षणाचे त्याने सुरू केलेले हे कार्य केवढे मोठे झाले हे सर्वांना विदित आहेच.

पेस्टॅलॉझी हा खराखुरा हाडाचा शिक्षक होता. त्याने केवळ शैक्षणिक तत्त्वे प्रतिपादिली नाहीत, तर त्यांची अंमलबजावणीही करून पाहिली. जीवनाच्या शेवटच्या काळात त्याला भरपूर मानसन्मान व लौकिक मिळाला. निरानिराळे राजेरजवाडे, लोकप्रतिनिधी, सामाजिक व राजकीय नेते त्याच्या भेटीस येत असत. त्याच्या तत्त्वांचा प्रसार युरोप खंडाप्रमाणेच अमेरिकेतही झाला. असा हा शिक्षणातील कर्मयोगी सन १८२७ मध्ये निधन पावला.

• • •

# हर्बार्ट

| | |
|---|---|
| जन्म | १७७६ |
| मृत्यू | १८४१ |

आतापर्यंत आपण रूसो व पेस्टॅलॉझी यांच्या शिक्षणविषयक कार्याचा अभ्यास केला. त्यात आपणांला असे लक्षात आले असेल की, रूसो हा नवीन शिक्षणविषयक तत्त्वे प्रतिपादन करणारा तत्त्वज्ञ होता, तर त्या तत्त्वांची प्रत्यक्ष अम्मलबजावणी करणारा पेस्टॅलॉझी हा खरा शिक्षक होता. दोघांचीही योग्यता आपापल्या परीने मोठी खरीच. प्रचलित परिस्थितीचा अभ्यास करून एखादे चिरंतन सत्य व क्रांतिकारक तत्त्व शोधून काढणे हे असामान्य बुद्धिमत्तेचे द्योतक मानले, तर अशी तत्त्वे प्रत्यक्ष व्यवहाराच्या निकषावर आणि अनंत संकटांच्या व अडीअडचणींच्या अग्नीतून तावूनसुलाखून बाहेर काढून त्यांचा व्यवहारीपणा जगास पटविणे हे कार्य अत्यंत चिकाटीचे व ध्येयनिष्ठतेचे द्योतक समजले पाहिजे. शिक्षणाच्या इतिहासात असे काही तत्त्वज्ञ व काही शिक्षक स्वतंत्रपणे काम करताना आपण पाहतो. समाजाला दोघांचीही अत्यंत गरज असते. केवळ तत्त्वज्ञ समाजाला उपकारक ठरत नाहीत. त्यांची तत्त्वे प्रत्यक्ष व्यवहारात वापरून पाहिली नाहीत, तर ती निरुपयोगी ठरून नाश पावतात. केवळ शिक्षक तत्त्वहीन असला तर त्याच्या अध्यापनाला ध्येयाची व तत्त्वज्ञानाची जोड मिळत नाही. तत्त्वज्ञ व शिक्षक

एकमेकांना पूरक असतात व ह्या दृष्टीने कार्य करण्यातच समाजाचे हित असते. हर्बार्टच्या ठिकाणी तत्त्वज्ञ व शिक्षक या दोहोंचाही सुंदर संगम झालेला आपल्या प्रत्ययास येतो. असे भरघोस व अष्टपैलू व्यक्तिमत्त्व फारच थोड्या व्यक्तींच्या वाट्यास येते.

## बालपण

जॉन फ्रेड्रिक हर्बार्टचा जन्म १७७६ साली जर्मनीमध्ये झाला. त्याची आई अतिशय देखणी व बुद्धिमान होती. त्याचे वडील त्या काळातील उत्तर जर्मनीतील एक नाणावलेले वकील होते. हर्बार्ट पाच वर्षांचा असताना त्याच्या आयुष्यात एक अपघात घडून आला. एकदा खेळत असताना तो उकळत्या पाण्यात पडला व त्यामुळे त्याला बरीच शारीरिक इजा पोहोचली. आयुष्यभर त्याची प्रकृती त्यामुळे नाजूक राहिली. या शारीरिक दुर्बलतेमुळे त्याची आई त्याची फारच काळजी घेऊ लागली. त्याचे खाणे, पिणे, खेळणे, इतकेच नव्हे तर त्याच्या अभ्यासावरही ती अत्यंत बारकाईने लक्ष ठेवी. त्याचे प्राथमिक शिक्षण पास्टर उलझन् या गृहस्थाच्या मार्गदर्शनाखाली झाले. पास्टर उलझन् हा काही जीवनमूल्ये उराशी बाळगणारा व ध्येयवादी शिक्षक होता. त्याची स्वतःची एक अत्यंत सुटसुटीत व निश्चित अशी अध्यापनपद्धती होती. अध्यापनातून आपल्या विचारांना एक प्रकारची स्पष्टता व निश्चितता आली पाहिजे असे त्याचे स्पष्ट मत होते. बालपणी झालेल्या या संस्काराचा परिणाम हार्बार्टच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानावर झाल्याचे आपणांस दिसून येते. त्याचे माध्यमिक शिक्षण ओल्डेनबर्ग येथील शाळेत (जिमनाशिया) येथे झाले. अभ्यासातील त्याची प्रगती फारच चांगली होती. अतिशय नीटनेटका, सभ्य, हुशार व होतकरू विद्यार्थी असा त्याचा लौकिक होता. गणित, भाषा, तत्त्वज्ञान या विषयांच्या जोडीला त्याने संगीत, कला या विषयांचाही अभ्यास केला होता. परिपूर्ण व्यक्तिमत्त्व घडविण्यात त्याला सर्वतोपरी अनुकूल अशीच परिस्थिती मिळाली असे म्हणावयास हरकत नाही. अठराव्या वर्षी जेना येथील विश्वविद्यालयामधील उच्च शिक्षणासाठी तो दाखल झाला. आपल्याप्रमाणेच त्याने कायद्याचा अभ्यास करावा व वकील व्हावे, अशी त्याच्या वडिलांची इच्छा होती. तो विश्वविद्यालयात असताना त्याला पाहण्यासाठी किंवा त्याच्यावर आपली देखरेख रहावी म्हणून त्याची आई नेहमी तेथे जात असे. आपल्या मुलाने कोणाशी मैत्री जोडावी, कोणत्या ग्रंथाचे वाचन करावे यातही ती लक्ष घालीत असे. ती अतिशय बोलकी व सर्वांशी मिळतेजुळते घेणारी असल्यामुळे कॉलेजातील अनेक थोर व विद्वान व्यक्तींचा परिचय तिने हर्बार्टशी करून दिला. अशा रीतीने त्याच्या आईच्या करवी सुप्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञ शीलर याच्याशीही त्याची ओळख

झाली. त्या वेळी शीलर हा आपला सुप्रसिद्ध ग्रंथ "Letters on the Aesthetic Education of Man" लिहिण्यात गढून गेला होता. त्या ग्रंथातील विविध विषयांवर हर्बार्ट शीलरशी चर्चा करीत असे. हर्बार्टला स्वभावतः कायद्याच्या अभ्यासाची गोडी नव्हतीच. शीलरच्या साहचर्यामुळे त्याने कायद्याचा अभ्यास सोडला आणि शिक्षण व तत्त्वज्ञान या विषयांकडे तो वळला. १७९७ साली त्याने आपले उच्च शिक्षण पूर्ण करून जेना येथील विश्वविद्यालय सोडले. आईच्या सूचनेवरून नंतर त्याने इंटरलेकन येथील गव्हर्नराच्या तीन मुलांच्या शिकविण्या पत्करल्या. शिक्षक म्हणून हा त्याचा पहिलाच अनुभव होता.

त्याच्या ताब्यात देण्यात आलेली मुले अनुक्रमे ८, १० व १४ वर्षांची होती. या मुलांना शिकविताना त्याला जे विविध व नाट्यपूर्ण अनुभव आले, त्यांवरून त्याला काही शिक्षणविषयक निष्कर्ष काढता आले. सन १८०० साली त्याची पेस्टॅलॉझीशी भेट झाली. पेस्टॅलॉझीच्या तत्त्वज्ञानाचा फारच मोठा परिणाम त्याच्यावर झाला असे म्हटले जाते. तथापि ही भेट होण्यापूर्वीही शिक्षणविषयक काही तत्त्वे त्याने निश्चित केली होती. त्यामुळे तो पेस्टॅलॉझीचा शिष्य होता हे म्हणणे पूर्णांशाने खरे नाही. दोघांचाही शिक्षणविषयक अनुभव मोठा असल्या-कारणाने त्यांच्यामध्ये विचारांचे आदानप्रदान व अनुभवांची देवाणघेवाण होणे शक्य आहे. हर्बार्टचा सामाजिक व बौद्धिक दर्जा मोठा होता. एक हुशार विद्यार्थी व तत्त्वनिष्ठ शिक्षक म्हणून त्याने लौकिक मिळविला होताच. त्यामुळे १८०९ साली कोनिंग्जबर्ग येथील विश्वविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम मिळण्यास त्याला फारसे प्रयास पडले नाहीत. या ठिकाणी तो तत्त्वज्ञान व शिक्षण या विषयांचे अध्यापन करीत असे. अध्यापन चालू असताना त्याचे स्वतःचे अध्ययन व प्रदीर्घ वाचन चालू असे. त्याने 'On the Study of Philosophy' हा ग्रंथ या वेळी लिहिला. तो त्याच्या सततच्या अभ्यासाचे व वाचनाचे द्योतक आहे. या ग्रंथावरून तो वास्तववादी होता असे वाटू लागते. कारण अध्यात्मवाद्याप्रमाणे तो जगाला असत्य किंवा मिथ्या म्हणत नसे. जग सत्य आहे, मात्र आत्मा अज्ञेय आहे एवढेच त्याचे मत होते.

### शिक्षणविषयक तत्त्वे

शिक्षणाचे ध्येय निश्चित करण्यासाठी मानवाचे जगातील अस्तित्व व त्याचे स्वरूप कळणे अत्यंत आवश्यक आहे असे त्याचे मत होते. मानवाची प्रकृती, प्रवृत्ती, गरजा व उणीवा इत्यादी सर्व गोष्टी समजल्याशिवाय मानवाच्या शिक्षणाचे

ध्येय निश्चित करणे योग्य होणार नाही. मानवाचे खरे स्वरूप समजण्यासाठी आपणांस त्याच्या शरीराच्या अभ्यासाबरोबरच मनाचाही अभ्यास करावयास पाहिजे, या त्याच्या तत्त्वामुळे तो मानसशास्त्राच्या अभ्यासाकडे वळला. मानस-शास्त्राच्या अभ्यासामुळे केवळ शिक्षणाचे ध्येय निश्चित करता येते असे नाही, तर अध्यापनपद्धतीही निश्चित पायावर उभारता येते. अध्यापनपद्धतीला शास्त्रीय बैठक देण्याचे जे काम त्याने केले, ते मानसशास्त्राच्या अभ्यासामुळेच. त्याने मानसशास्त्रामधील आत्मनिरीक्षणवाद ( Introspection ) दूर करण्याचा प्रयत्न केला. कारण त्याच्या वेळी मनाचा अभ्यास आत्मनिरीक्षण, परीक्षण व तुलना या साधनांच्या मदतीने केला जात होता. मन हे अदृश्य असल्यामुळे त्याचा अभ्यास आत्मनिरीक्षणानेच केला पाहिजे असे मत प्रचलित होते. परंतु आत्मनिरीक्षणाने मनाचा अभ्यास करणे व त्यावरून काही मानसशास्त्रीय तत्त्वे निश्चित करणे हे वाटते तितके सोपे काम नाही. एकतर पशुपक्षी व इतर प्राणी यांचा आत्म-निरीक्षणाने अभ्यास करता येणार नाही.

ज्याचा अभ्यास करावयाचा ते मन व ज्या साधनाने म्हणजेच आत्म-निरीक्षणाने ज्याचा अभ्यास करावयाचा ते मन एकच असल्यामुळे निश्चित स्वरूपाचे निर्णय घेणे अवघड आहे. म्हणून हर्बार्टने मानसशास्त्राची तर्काधिष्ठित व आत्मनिरीक्षणवादी बैठक काढून त्याच्या अभ्यासास प्रयोगांची व वास्तववादी अनुभवांची जोड देण्याचा प्रयत्न केला. पूर्वी मन हे विविध शक्तींचे एक गाठोडे आहे, असा समज रूढ होता. या शक्तीमध्ये विचार, स्मरण, कल्पना इत्यादी शक्तींचा समावेश असे. या विचारास धक्का देऊन मन हे संयुक्तपणे काम करते, या नवीन तत्त्वाचा त्याने पाठपुरावा केला. प्रायोगिक मानसशास्त्रात त्याला जरी फारशी प्रगती घडवून आणण्यात यश मिळाले नाही, तरी अशा प्रकारच्या अभ्यासास चालना त्यानेच दिली. शरीर, विशेषतः मेंदू, ग्रंथी, मज्जातंतू यांचा अभ्यास मानसशास्त्रास उपकारक ठरणार आहे हे पटविण्याचा त्याने प्रयत्न केला.

## शिक्षणाचे ध्येय

शिक्षणाचे ध्येय, नीतिसंपन्न व चारित्र्यवान व्यक्ती बनविणे हे आहे असे त्याचे मत होते. पूर्वीच्या शिक्षणामध्ये बुद्धीच्या विकासावर व ज्ञानाच्या खोलीवर भर देण्यात येत असे. भावनांची व नीतीची फारशी कदर केली जात नसे. ज्ञानाच्या बाबतीत हा जो अतिरेक पूर्वीच्या शिक्षणात दिसून येत होता, तो दूर करण्याचा त्याने प्रयत्न केला. अखिल मानवतेचे खरे ध्येय नैतिकता निर्माण करणे व नीतिमत्तेचे अधिराज्य प्रस्थापित करणे हेच आहे, अशी त्याची श्रद्धा

होती. मानवाचे खरे मूल्य त्याच्या प्रवृत्तीवर व त्याच्या इच्छाशक्तीवर ( Will-power ) अवलंबून आहे, बुद्धीवर नाही असे त्याने दाखवून दिले. नैतिकतेचे अधिराज्य निर्माण करण्याचे काम सर्वांचेच आहे. केवळ ते शिक्षकांनीच करावे असे नव्हे. शिक्षकाला काही अध्यापन-कौशल्य असल्यामुळे व त्याच्या ताब्यात विशिष्ट वयाची मुले काही काळ असल्यामुळे त्याला हे काम करणे सुकर आहे एवढेच.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
9293 · 991316

## नीतीचा अर्थ

नीतीच्या कल्पनेमध्ये खालील पाच मुद्द्यांचा समावेश होतो—

( १ ) **स्वातंत्र्य :**—आचारविचारांचे स्वातंत्र्य असल्याशिवाय कोणीही व्यक्ती खऱ्या अर्थाने नीतिमान होऊ शकत नाही. बंधनांच्या शृंखलांनी जखडलेली व्यक्ती आपल्या गुलामगिरीच्या स्थितीमध्ये जरी वरपांगी दुसऱ्यांनी अपेक्षिलेली वागणूक दाखवीत असली, तरी ती स्वेच्छेने व मनापासूनची नसल्यामुळे खऱ्या अर्थाने नैतिक नव्हे. बंधने ही बाहेरून लादावयाची नसून ती आंतरिक असली पाहिजेत. या दृष्टीने स्वयं-शिस्तीचे महत्त्व इतर कोणत्याही शिस्तीपेक्षा अधिक आहे. स्वातंत्र्याचा त्याचा अर्थ स्वेच्छाचार असा कधीच नव्हता. इतरांशी वागताना, इतरांनी आपणांशी कसे वागावे असे आपणांस वाटते, तसे आपण त्यांच्याशी वागावे हे तत्त्व त्याने पुढे ठेवले आहे.

( २ ) **पूर्णत्व :**—हर्बार्टची पूर्णत्वाची कल्पना फारच विशाल आहे. व्यक्ती नीतिमान होण्यासाठी त्याची सर्वांगीण व परिपूर्ण वाढ झाली पाहिजे व अशी वाढ होण्यासाठी त्याला अनुकूल परिस्थिती निर्माण करून दिली पाहिजे. सर्वांगीण विकासाला अनुकूल परिस्थिती निर्माण करणे हे तर शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य होय. व्यक्तीचा सर्वांगीण विकास होण्यासाठी त्याचा शारीरिक, मानसिक व सामाजिक विकास व्हावा असे तो मानतो.

( ३ ) **सदिच्छा :**—प्रत्येकाची इच्छा ही त्याच्या त्याच्या प्रवृत्तीवर अवलंबून असते. प्रवृत्ती या भावनांवर अवलंबून असतात. निरनिराळ्या भावनांचा समतोल राखणे व त्यांच्यातील संघर्ष टाळणे हे अवघड काम प्रत्येक व्यक्तीला करावे लागते. असा समतोल राखण्यात व्यक्तीला जर यश मिळाले नाही तर व्यक्तीच्या मनाचा समतोल ढळून संघर्ष निर्माण होतो. सद्भावनांचा विकास करून असद्भावनांचे उदात्तीकरण करणे सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण त्यावरच समाजाची नीतिमत्ता अवलंबून आहे.

(४) हक्क :—समाजामध्ये व्यक्तिव्यक्तींचे संबंध चांगले रहावयाचे असल्यास व समाजाचे स्थैर्य टिकून राहून समाजाचा विकास व्हावयाचा असल्यास प्रत्येक व्यक्तीने इतर व्यक्तींच्या हक्कांबद्दल आदर बाळगला पाहिजे व त्यांना योग्य वाव देण्यासाठी तत्पर असले पाहिजे. काही हक्क व्यक्तीविषयक असतात, तर काही संपत्तीविषयक असतात. स्वतःच्या हक्कांबरोबरच प्रत्येकाला आपल्या कर्तव्याचीही जाणीव असली पाहिजे. हक्क व कर्तव्य ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

(५) न्याय :—प्रत्येक व्यक्तीला, सामाजिक, राजकीय व आर्थिक बाबतींतही न्याय मिळाला पाहिजे. एखाद्या व्यक्तीच्या बाबतीत सामाजिक वा आर्थिक अन्याय झाला तर तिला समाजाबद्दल व इतर व्यक्तीबद्दल द्वेष व तिरस्कार वाटू लागतो. त्यामुळे योग्य नीतिमत्तेचे परिपालन त्या व्यक्तीच्या हातून होऊ शकत नाही. व्यक्तीला न्याय देण्याचे काम समाजाचे व राज्याचे आहे. व्यक्तिव्यक्तीमध्ये उच्चनीचता, जातिभेद, धर्मभेद इत्यादी अन्यायमूलक भेद असल्यास व्यक्ति-व्यक्तींमध्ये संघर्ष निर्माण होतो. यासाठी सर्व समाज हा सामाजिक व वैयक्तिक न्यायावर म्हणजेच समतेवर अधिष्ठित असला पाहिजे. नीतिमत्तेच्या कल्पनेमध्ये वरील पाच गोष्टींचा समावेश हर्बार्टने केला होता. शिक्षणाच्या ध्येयामध्ये नीतिमत्तेचा, चारित्र्याचा समावेश करणे हे हर्बार्टचे शिक्षणातील एक महत्त्वाचे कार्य होय.

(६) अभिरुची :—हर्बार्टने मांडलेला आणखी एक शिक्षणविषयक सिद्धान्त म्हणजे त्याचे अभिरुचीसंबंधीचे तत्त्वज्ञान. या सिद्धांताचा उपयोग ज्या-प्रमाणे अध्यापनपद्धतीची बैठक शास्त्रीय पायावर उभारण्यात झाली, त्याचप्रमाणे शिक्षणाचे ध्येय निश्चित करण्यासही त्याची मदत झाली, अभिरुची किंवा आवड ही एक आंतरिक प्रेरणा आहे. यामुळे कोणताही विचार जागृत मनामध्ये येऊ शकतो. मनामध्ये अनेक विचारांची खळबळ माजलेली असते, मात्र आपल्या आवडीचा विचार मनामध्ये टिकून राहतो व नावडता विचार अबोधमनाच्या खोलीत जाऊन रहातो. याचे कारण म्हणजे अभिरुची.

अभिरुची निर्माण करण्यासाठी सान्निध्य, पुनरावृत्ती व साहचर्याचा उपयोग होतो. पुन्हा पुन्हा तीच तीच गोष्ट केली असता एखाद्या गोष्टीबद्दल आवड निर्माण होते. या दृष्टीने आवडीमध्ये किंवा अभिरुचीमध्ये सवय बन-विण्याला फार महत्त्व आहे. सवयीमधून सहेतुक क्रियेचे रूपांतर अहेतुक क्रियेत होते. अभिरुची ही मनाची एक गतिमान शक्ती असून कोणत्या विचारांना,

कल्पनांना व अनुभवांना चालना मिळेल हे त्यामुळे ठरविले जाते. ज्या विचारांचे वा कल्पनांचे प्रभुत्व विद्यार्थ्यांच्या मनावर पडावे असे वाटत असेल ते विचार वा कल्पना पुन्हा पुन्हा विद्यार्थ्यांच्या समोर आणण्यातच उत्कृष्ट शिक्षकाचे खरे कौशल्य आहे. त्यामुळे मागे पडलेल्या कल्पना, विचार व अनुभव नेहमी ताजे-तवाने राहून विद्यार्थ्यांमध्ये अभिरुची निर्माण होईल. ( Law of Recency ).

मुलांची अभिरुची काही विशिष्ट संदर्भात असते. त्यातूनच काही कल्पना व सवयी उत्पन्न होत असतात. नवे नवे येणारे अनुभव जुन्या अनुभवांशी जोडल्यास त्यांच्याही बाबतीत अभिरुची निर्माण करता येते. शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या अभिरुचीची व्याप्ती जास्तीत जास्त करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. म्हणजे त्यांना अनेक विषयांच्या बाबतीत अभिरुची निर्माण होईल अशी अनकूल परिस्थिती निर्माण केली पाहिजे. विस्तृत अभिरुची (Range of Interest) असलेली व्यक्ती चारित्र्यसंपन्न असते अशी त्याची श्रद्धा होती. मात्र केवळ अभिरुचीची व्याप्ती वाढवून चालणार नाही, तर काही विषयांच्या बाबतीत तरी तिची तीव्रता वाढविली पाहिजे. अभिरुची ही सर्व जीवनभर कार्य करणारी शक्ती आहे. शालेय शिक्षणात मात्र तिची वाढ मर्यादित स्वरूपात झालेली दिसून येते. समाज व निसर्ग ही तिची दोन केंद्रे आहेत. निसर्गाच्या अभ्यासाने ज्ञानाबरोबरच नीतिमत्तेची जाणीव विकसित होते.

ज्ञानातून जीवनमूल्ये समजतात व जीवनमूल्यांच्या प्रभावाने व्यक्ती नीतिमान होते. नीतिमान व्यक्तीला सत्य, शिव आणि सुंदर यांची कल्पना येते. नीतिमत्तेचे दुसरे केंद्र समाज. समाज व नीती यांचा घनिष्ठ संबंध आहे. समाजाशिवाय नीती नाही व नीतीशिवाय समाज राहू शकत नाही. मानव व मानवनिर्मित संस्था यांचे अधिष्ठान म्हणजे नीती. या दोहोंच्या विकासावरच परमेश्वरप्राप्ती होण्याचा मार्ग सुकर होतो. शालेय जगतामध्ये अभिरुचीचा संबंध शिक्षक व विद्यार्थ्यांशी येतो. अभ्यासक्रम कसा तयार करावा, त्यामध्ये कोणत्या विषयांचा समावेश करावा व कोणती अध्यापनपद्धती अनुसरावी हे अभिरुची ठरविते. शिक्षक केवळ नवीन ज्ञान जुन्या ज्ञानाशी जोडण्याचाच प्रयत्न करीत नाही, तर मिळविलेले ज्ञान कसे टिकून राहील याचाही प्रयत्न करीत असतो. त्यासाठी अभिरुचीचा उपयोग होतो. शिक्षकाचे अध्यापन अधिक गतिमान ( Dynamic ) व्हावयाचे असल्यास त्याला विद्यार्थ्यांच्या अभिरुचीची कदर बाळगावी लागेल. अध्यापनामध्ये शिक्षकांना वर्णन, पृथक्करण व संयोगीकरण करावे लागते. हे सर्व करण्यासाठी अभिरुचीचा उपयोग होतो. अध्यापनाची सुरवात करण्यासाठी

विद्यार्थ्यांमध्ये विषयासंबंधी जिज्ञासा निर्माण करावयाची असल्यास, विद्यार्थ्यांची विकासावस्था व पूर्वानुभव पाहणे जरूर असते. ज्या अनुभवाबद्दल व्यक्तीला अभिरुची असते, तेच अनुभव टिकून राहू शकतात. अशा रीतीने शिक्षणामध्ये अभिरुचींचे महत्त्व हर्बार्टने प्रकर्षाने प्रतिपादिले. हुशार व्यक्तीची अभिरुची अनेकविध असते, तिला अनेक पैलू असतात. असे पैलू पाडणे हे शिक्षणाचे खरे काम आहे.

## शिक्षक

शिक्षक हे विद्यार्थ्यापेक्षा अधिक अनुभवी व ज्ञानी असतात. ते भविष्यकालामध्ये अधिक सूक्ष्मपणे पाहू शकतात. विद्यार्थ्याने आपल्या डोळ्यांपुढे कोणते उद्दिष्ट ठेवावे व ते गाठण्यासाठी कोणत्या मार्गाचा अवलंब करावा, यांचे ते मार्गदर्शन करू शकतात. स्वतः शिक्षकाला जी ध्येये साध्य करता आली नाहीत ती गाठण्याची शक्ती शिक्षक विद्यार्थ्यांना देऊ शकतात व त्या दृष्टीने विविध विषयांचे ज्ञान देऊन त्यांची दृष्टी विशाल बनवू शकतात. या दृष्टिकोनातून शिक्षणामध्ये 'शिक्षका'चे फार मोठे स्थान आहे. मात्र सर्वच व्यक्तींना शिक्षकाचे कार्य यशस्वीपणे करता येईलच असे नाही. हे त्यांच्या अभिरुचीवर जसे अवलंबून आहे तसे प्रशिक्षणावरही आहे. शिक्षकांच्या प्रशिक्षणास व त्याला शास्त्रीय बैठक प्राप्त करून देण्यास खरी सुरुवात हर्बार्टनेच केली. पेस्टॅलॉझीच्या शाळेत शिक्षक अनुकरणाने व निरीक्षणाने काही प्रशिक्षण घेऊ शकत असत. पण हर्बार्टने स्थापन केलेल्या प्रशिक्षण-विद्यालयात निरनिराळ्या देशांतील स्त्री व पुरुष शिक्षक शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेऊ शकत असत. हल्लीप्रमाणे त्याही वेळी हर्बार्टने शिक्षणाचे तात्त्विक व प्रात्यक्षिक असे दोन भाग पाडले होते. तात्त्विक कामात मानसशास्त्र, शिक्षणविषयक तत्त्वे व इतर शालेय विषय यांचा समावेश असे, तर प्रात्यक्षिकामध्ये प्रत्यक्ष अध्यापनावर भर असे.

## अध्यापनपद्धती

हर्बार्टची अध्यापनपद्धती मानसशास्त्रावर आधारलेली होती. त्याने मानसशास्त्राची आत्मनिरीक्षणाच्या जोखडातून मुक्तता करून प्रायोगिक पद्धतीच्या सिंहासनावर त्याची प्रतिष्ठापना केली, हे मागे आपण पाहिलेच आहे. मानसशास्त्राच्या अभ्यासामुळे त्याला शिकण्याची प्रक्रिया कशी होते, शिकणे म्हणजे काय याचे ज्ञान झाले. शिकणे म्हणजे केवळ ज्ञानग्रहण नव्हे हे त्याने ओळखले. शिकण्याची क्रिया ही विकासक्षम व्यक्तीच्या विकासाच्या विशिष्ट अवस्थेवर व त्या अवस्थेतील विशिष्ट शारीरिक व मानसिक वैशिष्ट्यांवर अवलंबून असते, असे त्याने

प्रतिपादिले; म्हणून शिकण्याची क्रिया चांगली व्हावयाची असल्यास विद्यार्थ्यांच्या अभिरुचीशी तिचा संबंध जोडला पाहिजे. अभिरुची ही पूर्वानुभवावर, सवयींवर व भावनावर अवलंबून असते हे मागे आपण पाहिले आहेच. मानसशास्त्राप्रमाणेच समाजशास्त्राचाही शिक्षणाशी संबंध आहे हे पटवून देण्याचा त्याने प्रयत्न केला. त्यामुळे शरीरातील विशिष्ट ग्रंथी व मेंदू यांचे शिक्षणाशी सहकार्य मिळविणे क्रमप्राप्तच होते. त्याच्या वरील तत्त्वज्ञानाचा परिणाम त्याने प्रतिपादिलेल्या अध्यापनपद्धतीवर झालेला दिसून येतो. मात्र हल्ली हर्बार्टच्या म्हणून ज्या अध्यापनाच्या पाच पायऱ्या ( पंचपदी ) सांगण्यात येतात, त्या त्यानेच प्रतिपादिल्या किंवा काय याविषयी शंका वाटते. त्याने आपल्या ' The Science of Education ' या ग्रंथामध्ये खालील चार पायऱ्या दिलेल्या आहेत.

( १ ) स्पष्टता ( Clearness ), ( २ ) साहचर्य ( Association ), ( ३ ) सुसूत्रता ( System ), ( ४ ) पद्धती ( Method ). या पायऱ्यांचे रूपांतर पुढे त्याच्या शिष्यांनी पुढील पायऱ्यांत केल्याचे दिसून येते.

( १ ) पूर्वतयारी ( Preparation )—यामध्ये नवीन ज्ञानाचा संबंध जुन्या ज्ञानाशी व अनुभवाशी जोडावयाचा असतो. त्यामुळे आपणांला कोणता विषय शिकावयाचा आहे याचे विद्यार्थ्यांना ज्ञान होऊन त्यांच्या अवधानाला निश्चित दिशा मिळते. पूर्वानुभवाशी साहचर्य जोडल्यामुळे अभिरुची निर्माण होते.

( २ ) प्रतिपादन ( Presentation )—हे प्रतिपादन निरनिराळ्या पद्धतींनी, विद्यार्थ्यांची विकासावस्था लक्षात घेऊन, त्यांच्या अवधानाच्या व अभिरुचीच्या अनुषंगाने करावयाचे असते.

( ३ ) साहचर्य ( Association )—प्रतिपादनामध्ये दिलेले ज्ञान विद्यार्थ्यांनी जुन्या ज्ञानाशी जोडावयाचे असते. ते जोडण्यासाठी पूर्वानुभव जागृत करणारे सुसंगत प्रश्न शिक्षक विचारतात.

( ४ ) सुसूत्रीकरण ( Systematisation )—नवीन ज्ञान मिळविले, त्याची जुन्याशी सांगडही घातली; पण त्याच्यामध्ये सुसूत्रता निर्माण केली नाही तर त्या ज्ञानाचा व्यक्तीला फारसा उपयोग होणे शक्य नाही. त्यासाठी या पायरीची आवश्यकता आहे.

( ५ ) उपयोजन ( Application )—व्यक्तीला मिळालेले ज्ञान व्यवस्थितपणे मिळाले आहे की नाही हे पाहण्यासाठी उपयोजनाची आवश्यकता आहे.

शिक्षणाचा उपयोग जीवन विकसित करण्यात व्हावयाचा असल्यास ते जीवनामध्ये हरघडी वापरता यावयास पाहिजे. त्या दृष्टीने हर्बार्टने योजलेली ही पायरी शिक्षणात अत्यंत महत्त्वाची आहे.

हर्बार्टचे नाव घेताच त्याच्या या पायऱ्यांची आपणांस आठवण येते. मात्र ज्या काटेकोरपणे व ज्या यांत्रिक पद्धतीने आपण त्याची अंमलबजावणी करतो तशी खुद्द हर्बार्टचीही अपेक्षा असेल असे म्हणण्याचे धाडस करवत नाही. सर्व विषयांच्या बाबतीत सर्व इयत्तांच्या अध्यापनपद्धतीमध्ये याच पायऱ्यांचा उपयोग केलेला दिसून येतो. परंतु त्यांची उपयुक्तता कोठे किती आहे हे पाहण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे. प्राथमिक अवस्थेमध्ये, विशेषतः ज्या वयात क्रीडनपद्धती किंवा कृतियुक्त शिक्षणपद्धती उपयोगी पडते, त्या वेळी हर्बार्टच्या पंचपदीच्या साह्याने अध्यापन करणे सयुक्तिक ठरेल असे वाटत नाही आणि तशी हर्बार्टचीही अपेक्षा नसावी.

हर्बार्टने सुचविलेल्या अध्यापनाच्या पंचपदीवर रस्कने प्रतिकूल टीका केली आहे. या पायऱ्या सर्वच विषयांच्या अध्यापनात उपयोगी पडणार नाहीत असे त्याचे मत आहे. पंचपदीचा उपयोग भाषा, इतिहास, भूगोल यांसारख्या ज्ञान-विषयांच्या अध्यापनासाठी करता येईल. परंतु ज्या विषयांमध्ये विद्यार्थ्यांना कौशल्य प्राप्त करून घ्यावयाचे असते किंवा प्रत्यक्ष कृती करावयाची असते त्या विषयांच्या बाबतीत हर्बार्टच्या पाच पायऱ्या उपयोगी पडणार नाहीत. कृतियुक्त अध्ययनामध्ये विद्यार्थी वैयक्तिकरीत्या काही उद्योग करीत असतात. त्यामुळे या ठिकाणी वर्गपद्धतीचा फारसा उपयोग होऊ शकणार नाही. लहान मुलांच्या बाबतीत, विशेषतः १ ली ते ३ री या वर्गांच्या विद्यार्थ्यांना शिकविताना प्रस्तावना, हेतुकथन इत्यादी पायऱ्यांचा फारसा उपयोग होऊ शकत नाही. रस्कची वरील टीका लक्षात घेऊन हर्बार्टच्या पाच पायऱ्यांच्या उपयुक्ततेच्या मर्यादा शिक्षकांनी लक्षात ठेवल्या पाहिजेत.

एवढे मात्र खरे की हर्बार्टच्या वरील पायऱ्यांमुळे अनेक देशांतील असंख्य शिक्षकांना अध्यापनपद्धतीबद्दल निश्चित स्वरूपाचे मार्गदर्शन झाले. त्यांनी त्यात यांत्रिकता निर्माण केली, हा हर्बार्टचा दोष होऊ शकत नाही. शिक्षणशास्त्रवेत्ता हर्बार्ट हा हाडाचा शिक्षक होता. त्याने दिलेले तत्त्वज्ञान आणि शिक्षणविषयक ज्ञानात व अध्यापन-पद्धतीत घातलेली मोलाची भर यांबद्दल शिक्षणक्षेत्रातील सर्व कार्यकर्ते निश्चितपणे त्याचे ऋणी राहतील.

◆ ◆ ◆

# फ्रोबेल

| | |
|---|---|
| जन्म | १७८२ |
| मृत्यू | १८५२ |

पाश्चिमात्य शिक्षण-तत्त्वज्ञांमध्ये फ्रोबेल हा गूढवादी म्हणून प्रसिद्ध आहे. शिक्षणाचे ध्येय, तत्त्वज्ञान व पद्धती यांचा विचार करताना तो काहीसा रूसोच्या तत्त्वज्ञानाचा अनुयायी असावा असे वाटते; तर पेस्टॅलॉझीने जे शिक्षणविषयक प्रत्यक्ष कार्य केले त्याचाही याच्या शिक्षण-प्रणालीवर बराच परिणाम झाला असावा असे वाटते आणि हे अगदी स्वाभाविकच आहे. त्या वेळच्या परिस्थितीमध्ये जे तत्त्वज्ञान व ज्या पद्धती शिक्षणक्षेत्रामध्ये प्रचलित होत्या, त्यांच्याशी फ्रोबेलसारख्या मूलगामी विचारवंताचा परिचय असणे स्वाभाविकच आहे. रूसो व पेस्टॅलॉझी यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा त्याच्या तत्त्वज्ञानावर परिणाम दिसून येत असला तरी तो रूसो व पेस्टॅलॉझी यांचा शिष्य किंवा अनुयायी होता हे म्हणणे पूर्णांशाने खरे नाही. त्याचे जीवनविषयक तत्त्वज्ञान व शैक्षणिक विचारांची बैठक अनेक दृष्टीने स्वतंत्र आहे. त्या बाबतीत त्याने कोणाचेही अनुयायित्व पत्करणे संभवनीय दिसत नाही. त्याने जगाला दिलेली पूर्वप्राथमिक शिक्षणाबाबतची किंडरगार्टन पद्धती ही शैक्षणिक विश्वामध्ये अभूतपूर्व व अजरामर ठरलेली आहे.

फ्रेड्रिक वुइल्यम ऑगस्टस् फ्रोबेल याचा जन्म दक्षिण जर्मनीमध्ये थुरिंजिया या परगण्यात झाला. त्याचे वडील धर्मोपदेशक होते. ते आपल्या धार्मिक व्यापामध्ये इतके गढलेले असत की, त्याच्या संगोपनाकडे लक्ष देण्यास त्यांना बिलकूल अवसर नव्हता. या प्रतिकूल परिस्थितीत भर म्हणून की काय त्याची आई तो अवघा नऊ महिन्यांचा असतानाच वारली. पहिली काही वर्षे इतर मुलांबरोबर त्याच्या सावत्र आईने त्याचा सांभाळ केला. मात्र तिला स्वत:चा मुलगा झाल्यावर ती फ्रोबेलचा मत्सरच करू लागली. अशा रीतीने आईबाप असूनही मायेला पारखे झालेले हे पोर रानावनात हिंडून पानाफुलांशी आणि कडेकपाऱ्यांशी हितगूज करण्यात आपले हरवलेले सुख शोधण्याचा प्रयत्न करू लागले.

फ्रोबेल हा लहानपणी अत्यंत दु:खी होता. त्याच्या भोवतालची परिस्थिती तर त्याच्या दु:खाला कारणीभूत होतीच; शिवाय बालवयात निसर्गाविषयी त्याला लागलेली आत्यंतिक ओढ आणि आत्मशक्तीची प्रचीती या दोन्ही गोष्टी त्याच्या दु:खाला कारणीभूत झाल्या. आत्मपरीक्षण व चिंतन करण्याच्या त्याच्या आत्यंतिक सवयीमुळे तो आपल्या समवयस्क मुलांचे निरीक्षण करून त्यांच्या मनाच्या व्यापाराचा अर्थ लावू लागला. पुढे त्याला शाळेत जाण्याची संधी मिळाली. ती शाळा त्याचे वडीलच चालवीत असत. परंतु ती शाळा प्रौढ मुलींची होती. दहा ते चौदा वर्षांचा त्याचा काल बराच सुखाचा गेला. कारण या काळात तो आपल्या चुलत्याकडे शिक्षण घेण्यासाठी गेला. त्या ठिकाणी त्याला थोडेबहुत धार्मिक शिक्षण मिळाले. त्यामुळे आध्यात्मिक ज्ञानाबद्दलची त्याची उत्सुकता जागृत झाली. तथापि तेथील एकूण परिस्थिती व अध्यापनपद्धती यामुळे त्याचे अभ्यासाकडे लक्ष लागेना. तो बुद्धीने मंद असावा अशी त्याच्या चुलत्याची समजूत झाल्यामुळे त्याला शाळेतून काढण्यात आले.

पुढे त्याला एका जंगल-अधिकाऱ्याकडे उमेदवाराची नोकरी मिळाली. तीही त्याने लवकरच, म्हणजे वयाच्या सतराव्या वर्षी सोडली. सन १७९९ मध्ये जेना येथील विश्वविद्यालयात आपल्या भावास भेटण्यासाठी तो गेला असता उच्च शिक्षण घेण्याविषयीची त्याची जिज्ञासा जागृत झाली. म्हणून त्याने आपल्यास तेथे प्रवेश मिळेल की, काय याचा अंदाज घेतला. त्याचे पूर्वशिक्षण बेताचेच असल्यामुळे त्याला विश्वविद्यालयात प्रवेश मिळेना. परंतु विश्वविद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठी एक अभ्यासक्रम त्या ठिकाणी होता. त्यासाठी त्याने प्रवेश मिळविला. जेना येथेही त्याचे वास्तव्य फारच थोड्या दिवसांचे झाले. एकदा त्याला काही देणी देण्यासाठी कर्ज काढावे लागले व त्याचा परिणाम म्हणून तुरुंगाचीही वारी करावी लागली. व्यवसायासाठी भ्रमंती चालू असतानाच फ्रँकफुर्ट येथील

एका शाळेमध्ये त्याला चित्रकला-शिक्षकाचे काम मिळाले. हे काम करीत असताना त्याला आत्मसाक्षात्कार झाला. आपले मानवतेच्या सेवेचे स्वप्न या व्यवसायाच्या द्वारे पूर्ण होत आहे असे त्याला वाटू लागले.

तथापि आपल्या अपुऱ्या शैक्षणिक तयारीची त्याला बोचणी सतत लागून राहिली होती. शिक्षणाच्या बाबतीत आपली स्वतःची परिपूर्ण तयारी असल्याशिवाय शिक्षक म्हणून काम करणे व्यर्थ आहे; याची त्याला जाणीव होऊ लागली. स्वतःच्या अज्ञानाच्या ज्ञानातून व उणीवेच्या जाणिवेतून तो शिक्षणाला नवा अर्थ देऊ शकला हे उघडच आहे. या शिक्षणविषयक चिंतनातून अध्ययनाला व अध्यापनाला एक नवा अर्थ आहे; त्याला नवी क्षितिजे आहेत असे त्याला वाटू लागले. हाच त्याच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा अंकुर होता. याच स्फुल्लिंगाला पुढील जीवनात परिश्रमांचा वारा घालून त्याने त्याची शैक्षणिक ज्योत बनविली. अध्यापनपद्धतीविषयी या कोवळ्या वयातच त्याची काही निश्चित मते बनू लागली. कोठल्याही विषयाची अध्यापनपद्धती ही विद्यार्थ्यांच्या मनाच्या विकासाचे नियम व विषयाचे नियम यावर आधारित असली पाहिजे असे त्याने प्रतिपादिले. याचाच अर्थ असा की, योग्य अध्ययनपद्धती ती की ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या विकासाची विशिष्ट स्थिती त्या वेळची शारीरिक व मानसिक वैशिष्ट्ये व विषयातील निवडलेला योग्य व अनुरूप भाग यांची सांगड घालणे होय.

नंतर त्याने व्हरडून येथे पेस्टॅलॉझीच्या तत्त्वज्ञानाचा व शैक्षणिक पद्धतींचा अभ्यास केला. खेळामध्ये गुंतलेल्या मुलावर त्याने काही शैक्षणिक प्रयोगही करून पाहिले. परंतु त्यामुळे त्याच्या मानसिक संघर्षात भरच पडली. याचे कारण असे की, त्याची स्वतःची अशी काही शैक्षणिक मते चिंतनाने व पूर्वानुभवाने बनलेली होती. ती पेस्टॅलॉझीच्या तत्त्वज्ञानाशी व पद्धतीशी पूर्णांशाने मिळती जुळती नसल्यामुळे त्याच्या मनात गोंधळ निर्माण झाला. यासाठी आपल्या मनाचा गोंधळ दूर व्हावा म्हणून व सत्यपरिस्थितीचे ज्ञान व्हावे म्हणून शिक्षणविषयक सखोल अभ्यास करण्यासाठी त्याने १८११ साली गोटिंजेन विश्वविद्यालयात प्रवेश घेतला. त्या ठिकाणी त्याने भरपूर चिंतन, मनन व वाचन करून एक प्रकारे शैक्षणिक तपश्चर्याच केली.

पुढे सन १८१४ साली त्याच्या जीवनास एक विलक्षण कलाटणी मिळाली. नेपोलियनचे सैन्य त्या वेळी एखाद्या प्रचंड लोंढ्याप्रमाणे अनेक देश पादाक्रांत करीत होते. त्याची वक्रदृष्टी रशिया व जर्मनीकडेही वळली होती. त्यामुळे तरुण फ्रोबेलचे रक्त सळसळले व तो सैन्यात भरती झाला. तेथील जीवनातील शिस्त व सांघिक काम यांचा त्याच्या विचारावर फार मोठा परिणाम

घडून आला. तेथे त्याला काही जिवलग मित्रही मिळाले. सैन्यातून सुटून आल्यावर त्याला बर्लिन येथील एका म्युझियममध्ये कारकुनाचे काम मिळाले. हे काम फारच बेताचे होते. वेळही भरपूर होता. त्याचा उपयोग त्याने प्रदीर्घ वाचनाकडे केला व शिक्षक म्हणून आपली पूर्वतयारी भरपूर झाली असे त्याला वाटू लागले. नंतर त्याने एका खेड्यामध्ये दोन वर्षे मुलांच्या अध्यापनात घालविली. त्याची पहिली प्राथमिक शाळा १८१७ साली किलटौ येथे सुरू झाली. प्रथम फक्त १२ विद्यार्थ्यांनी त्यात नावे दाखल केली होती. ती १८३१ पर्यंत चालू होती, नंतर ती आपल्या सहकाऱ्यांच्या ताब्यात देऊन तो अन्यत्र निघून गेला. १८२६ साली 'The Education of Man' हा अत्यंत विद्वत्ताप्रचुर ग्रंथ त्याने लिहिला. सन १८३६ पासून त्याने पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासास सुरुवात केली. किंडरगार्टनची पहिली पूर्वप्राथमिक शाळा सन १८४० मध्ये त्याने स्थापन केली व याच कार्यामध्ये त्याने आपले उर्वरित आयुष्य घालविले.

**तत्त्वज्ञान**

फ्रोबेलचे जीवनविषयक तत्त्वज्ञान काहीसे रूसोच्या व काहीसे पेस्टॅलॉझीच्या तत्त्वज्ञानाशी मिळते-जुळते आहे. म्हणून त्याला आदर्शवादी ( Idealist ) म्हणतात. विश्वात दिसणाऱ्या सर्व चराचर वस्तुमात्रात एक प्रकारची एकता आहे अशी त्याची दृढश्रद्धा होती. निरनिराळ्या वस्तूंत केवळ त्यांच्या नावांत व रूपातच फरक आहे. त्यामागील जे सत्तत्त्व आहे ते एकमेवाद्वितीयच आहे. लाकडाच्या आपण विविध वस्तू पाहतो. त्यांचे आकार, त्यांची नावे भिन्न असतात. कपाट, टेबल, खुर्ची इत्यादी. परंतु त्यातील लाकूडपणा हा एकसारखाच आहे. त्याचप्रमाणे विश्वामध्ये अनेक प्रकारच्या वस्तू या काही निश्चित मूलतत्त्वापासूनच बनलेल्या आहेत. भारतीय तत्त्वज्ञानाप्रमाणे आपण त्यांना पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश अशी पाच मूलतत्त्वे समजतो. या पाच मूलतत्त्वांच्या अंतर्यामात पृथ्वी, आप व तेज अशी तीनच मूलतत्त्वे दिसून येतात. ही तीन तत्त्वेही एकाच अनंत तत्त्वाची निरनिराळी स्वरूपे असून ती शेवटी अनंतातच, परमेश्वरातच किंवा ब्रह्मतत्त्वामध्ये विलीन होणार आहेत. अद्वैत वेदान्ताप्रमाणे चित् व सनातन असे हे एकच तत्त्व आहे.

ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या । जीवो ब्रह्मैव नापरः ।

विश्वामध्ये सत्य जर काही असेल, तर मूलतत्त्व म्हणजेच ब्रह्म हे सनातन, शाश्वत व सत् असे तत्त्व आहे. फ्रोबेलचे तत्त्वज्ञान याचप्रमाणे आदर्शवादी आहे. फरक एवढाच की, जगातील सर्व चराचर वस्तुमात्राला तो मिथ्या म्हणत नाही.

जगामध्ये जी विविधता दिसून येते त्यामध्ये एकता शोधणे हे तत्त्वज्ञानाचे खरे काम होय. मानवाचा विकास हा पशू, पक्षी व वनस्पती यांच्या उत्क्रांतीप्रमाणेच होत असतो. तो आंतरिक असतो. विकासाची क्षमता ही वनस्पतीतील बीजामध्ये व छोट्याशा बालकामध्येही पूर्णत्वाने सामावलेली असते. वटवृक्षाच्या छोट्याशा बीजामध्ये ज्याप्रमाणे त्याचे प्रचंड खोड, असंख्य फांद्या व पाने सुप्तपणे सामावलेली असतात त्याचप्रमाणे मानवाचेही आहे. फरक एवढाच की, पशुपक्ष्यांना व वनस्पतींना निसर्गाने ठरवून दिलेल्या विकासाला आपल्या स्वप्रयत्नाने फारशी मुरड घालता येत नाही किंवा त्यात बदलही करता येत नाही.

मनुष्याला मात्र स्वयंचलित मन असल्याकारणाने आपल्या विकासाच्या प्रक्रियेला हवा तसा आकार देता येतो. व्यक्तीचा विकास हा टप्प्याटप्प्याने किंवा पायरीपायरीने होत असतो. प्रत्येक टप्पा हा स्वयंपूर्ण असतो. प्रत्येक टप्प्यामध्ये विविध वैशिष्ट्ये व अनेक प्रकारच्या अडचणी व समस्या असतात. सर्व टप्प्यांत एक समान सूत्र दिसून येते. ते म्हणजे स्वयंकृती ( Self-activity ) हे होय. परमेश्वर हा सुद्धा स्वयंचलित व स्वयंकृतिप्रधान आहे. या स्वयंकृतीच्या साहाय्याने मानवाने स्वतः पूर्णत्व मिळवून परमेश्वराच्या सान्निध जावयाचे आहे. फ्रोबेलच्या तत्त्वज्ञानातील पूर्णत्वाची कल्पना विशेष प्रकारची आहे. त्याचे म्हणणे असे आहे की, अनेक गोष्टी पूर्ण असूनही त्या दुसऱ्या पूर्ण गोष्टींचा भाग आहेत. आपल्या शरीराचा हात हा त्याच्यापुरता विचार केल्यास पूर्ण असूनही परिपूर्ण शरीराचा एक भाग आहे. सर्व जग पूर्णच आहे. परमेश्वर हा पूर्ण आहे. भारतीय तत्त्वज्ञानाप्रमाणे हे सर्व विश्व पूर्णच आहे. पूर्णातून पूर्ण काढून घेतले तरी शेवटी पूर्णच ठरते. ॐ पूर्णमिदः पूर्णमिदं पूर्णात् पूर्णमुदच्यते । पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

## शैक्षणिक तत्त्वज्ञान

फ्रोबेलचे शिक्षणविषयक तत्त्वज्ञान त्याच्या अध्यात्मवादावर आधारलेले असल्याकारणाने कित्येकांना ते गूढ वाटते. त्याला अभिप्रेत असलेले शिक्षणाचे ध्येय म्हणजे निकोप व प्रबल इच्छाशक्तीचा संपूर्ण विकास साधून व स्वतः पूर्णत्व मिळवून परमेश्वराशी एकरूपता साधणे हे होय. त्याच्या शैक्षणिक ध्येयाला दोन बाजू आहेत. एक नैतिक व दुसरी सामाजिक. ध्येय व साधने यांचा फार निकटचा संबंध आहे. आत्मकृती हा शिक्षणाचा पाया असल्याकारणाने कृतियुक्त शिक्षणपद्धती हीच खऱ्या शिक्षणाची पद्धती होय. व्यक्तिविकासामध्ये काही वैशिष्ट्यपूर्ण व निश्चित स्वरूपाच्या पायऱ्या आहेत. त्यांचा मानसशास्त्रीय अभ्यास करून त्यानुसार विविध प्रकारच्या कृती व अनुभव देऊन विद्यार्थ्यांचे जीवन समृद्ध

केले पाहिजे. खेळ ही एक आंतरिक क्रिया आहे. त्यामुळे व्यक्तीच्या जीवनाचा व वृत्तीचा बाह्य आविष्कार दिसून येतो. खेळांतूनच मुलांचा निसर्गाशी व जगाशी संबंध येतो. खेळांमध्येच तत्परता, विश्रांती, सहेतुकता वा स्वातंत्र्य, शिस्त आणि मोकळीक यांसारख्या परस्परविरोधी वाटणाऱ्या गोष्टी साधता येतात. नैसर्गिक खेळांमुळेच मुलांना पूर्णत्व प्राप्त होते. यामुळेच त्याने आपली शिक्षणपद्धती क्रीडन-पद्धतीवर आधारलेली आहे. रूसोप्रमाणे तो निसर्गाला व निसर्गाच्या अभ्यासाला अतिशय महत्त्व देतो. निसर्गाच्या अभ्यासानेच भाषा, गणित, कला विकसित होतील असे त्याचे म्हणणे आहे. त्याच्या एकतेच्या तत्वज्ञानावरच समाजशिक्षणाबद्दलची त्याची प्रीती आधारलेली आहे. मूल हे समाजाचाच एक घटक आहे. शाळा हा सुद्धा एक छोटेखानी समाजच होय. समाज व शाळा यांत फारसे वैचारिक वा ध्येयात्मक अंतर असता उपयोगी नाही. मानवतेच्या आशा-आकांक्षांशी समरस होणे हे सामाजिक शिक्षणाचे अंतिम ध्येय आहे.

### किंडरगार्टन

किंडरगार्टन किंवा बालोद्यान ही फ्रोबेलने आपल्या पिढीस दिलेली सर्वांत महत्त्वाची देणगी होय. पूर्वी पूर्वप्राथमिक शिक्षणाला फारसे महत्त्व दिले जात नसे. किंबहुना या वयातील मुलामुलींच्या विकासाची उपेक्षाच केली जात असे. परंतु या अवस्थेतील मुलामुलींच्या शिक्षणाकडे योग्य ते लक्ष न दिल्यास भावी शिक्षणाचा त्यांचा पाया पक्का होणार नाही हे फ्रोबेलने जाणले व त्यासाठी तीन ते सात या वर्षांतील बालकांचा व्यक्तिविकास सुयोग्य व्हावा म्हणून जीवनाची शेवटची अनेक वर्षे घालविली. त्याने आपल्या शाळेला किंडरगार्टन म्हणजेच Garden for Children म्हणजेच बालोद्यान असे सार्थ नाव दिले होते. या शाळेतील मुलांना छोटया रोपटयांची व शिक्षकाला माळ्याची उपमा दिली होती. छोटे रोपटे ज्याप्रमाणे स्वतःच्या आंतरिक प्रक्रियेमुळे वाढते, त्याचप्रमाणे मुलांचा विकास आंतरिक प्रक्रियेमुळेच होतो. माळी ज्याप्रमाणे रोपाच्या वाढीला अनुकूल परिस्थिती निर्माण करतो, त्याप्रमाणे शिक्षकांनी मुलांच्या विकासाला अनुकूल वातावरण निर्माण करावयाचे आहे. प्रत्येक व्यक्तीचा विकास त्याच्या आंतरिक शक्तीमध्ये सामावलेला आहेच. आंतरिक विकासाला बाह्य अडथळे येऊ नयेत व तो योग्य मार्गाने स्वतःच्या गतीने व सातत्याने होत राहावा यासाठी शिक्षणाची आवश्यकता असते. मुलांचा विकास हा उत्स्फूर्त असतो. त्यासाठी योग्य ते स्वातंत्र्य शिक्षकाने द्यावयाचे असते. ज्ञान हे शिक्षणाचे साध्य नसून एक साधन आहे. कृतीच्या अनुषंगाने जरूर तेव्हा व जरूर तेवढे ते मिळत असते. उत्स्फूर्त

कृती हा सर्व शिक्षणाचा फ्रोबेलच्या दृष्टीने पाया होय. अशा कृतीमुळे व्यक्तीला आत्मज्ञान होऊन स्वतःचे स्वरूप तर समजतेच त्याचबरोबर सभोवतालच्या जीवनाचे स्वरूपही समजून येते. फ्रोबेलच्या मताप्रमाणे कृतीशिवाय ज्ञान नाही व ज्ञानाशिवाय कृती योग्य होत नाही. कृती व ज्ञान यांमध्ये एक अयुतसिद्ध संबंध आहे. कृतीमुळे मुलांना आनंद, समाधान, स्वातंत्र्य व मानसिक शांती मिळते. किंडरगार्टनच्या तत्त्वज्ञानामध्ये Self-activity किंवा स्वयंकृती याला अतिशय महत्त्व आहे. किंबहुना तोच या पद्धतीचा आत्मा आहे. त्यामुळे किंडरगार्टन-पद्धतीची खालील वैशिष्ट्ये दिसून येतांत.

## १. कृतियुक्त अभिनय-गीते

या शाळेमध्ये मुलांना पुष्कळ कृतियुक्त गीते शिकविली जातात. त्यांतून विद्यार्थ्यांच्या नवनिर्मिती प्रवृत्तीला व स्वयंकृतीला चालना मिळते.

## २. नवनिर्मिती

विद्यार्थी शाळेत असताना आपल्या सहज प्रवृत्तीनुसार काही नवीन वस्तू निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो. मात्र ही त्याची कृती स्वतःच्या प्रेरणेने व स्वतःच्या हेतूने चालू असते. त्यावर शिक्षकाचे फारसे बंधन असत नाही. नव-निर्मिती करणे हा विद्यार्थ्यांचा स्वभावधर्म असल्यामुळे विद्यार्थ्यांना जरूर ते साहित्य उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मन व आत्मा जरी अदृश्य असले तरी त्यांचा आविष्कार विद्यार्थ्यांच्या कृतीत आपणांस पहावयास मिळतो. कर्मेंद्रिये ही सुद्धा विचाराची साधने होत. हात व मन या दोन्हीही गोष्टी स्वतंत्र वाटल्या तरी अविभाज्य असल्यामुळे विचारांतून कृतीच निर्माण झाली पाहिजे. फ्रोबेलच्या शाळेतील गाणी जीवनाच्या उद्दिष्टांवर आधारलेली असतात. प्रत्येक गाण्याला तीन भाग असतात. ( १ ) गाण्यातील ध्येयवाक्य, ( २ ) मुलांना सहजपणे गुणगुणता येईल अशा काही ओळी व ( ३ ) गाण्यातील प्रसंग दर्शविणारे चित्र. अशा तऱ्हेची ५० गाणी फ्रोबेलने निवडून ठेवलेली आहेत. त्यांमध्ये काही बडबड-गीतांचाही समावेश आहे. उदा०

" Jack and Jill went up the hill
To fetch the pale of water.
Jack fell down & broke his crown
And Jill came tumbling after."

## व्यवसायासाठी देणग्या

काही विशिष्ट प्रकारच्या शैक्षणिक साधनांना फ्रोबेलने देणग्या हे नाव दिले आहे. ती मुलांना कार्यप्रवण करणारी व खेळात मदत करणारी खेळणी आहेत. ती केव्हा खेळावयास द्यावयाची, याचा विशिष्ट क्रम ठरविलेला आहे. त्याचप्रमाणे या देणग्या प्रतीकात्मक स्वरूपाच्या आहेत. विश्वातील एकतेचे प्रतीक या देणग्यांतून विद्यार्थ्यांच्या अनुभवास येईल अशी फ्रोबेलची धारणा आहे. काही देणग्यांचे प्रकार खालीलप्रमाणे आहेत —

( १ ) एका लाकडी पेटीमध्ये विविध रंगांचे लोकरी चेंडू ठेवलेले असतात. त्यांच्याशी खेळत असताना विद्यार्थ्यांना रंग, आकार, गती, दिशा, वस्तूतील मूळघटक यांचे ज्ञान होते.

( २ ) दुसऱ्या एका पेटीमध्ये घन, गोल, लंबगोल अशी लाकडी वस्तू ठेवलेल्या असतात. प्रत्येक वस्तूच्या साह्याने खेळ खेळत असताना विद्यार्थ्याला त्यांचा पृष्ठभाग, टणकपणा, आकार, गती यांचे ज्ञान होते. उदा० घन हा स्थिर राहू शकतो. परंतु गोल अस्थिर असल्यामुळे तो गतिमान असतो. लंबगोल काही वेळा विशिष्ट स्थितीत गतिमान असतो तर काही वेळा निराळ्या स्थितीत स्थिर असतो.

( ३ ) एका पेटीमध्ये एक घन असतो. त्याचे आठ भाग केलेले असतात. त्यावरून निरनिराळे भाग व पूर्णवस्तू यांच्या संबंधांचे ज्ञान होते.

( ४ ) आणखी एका पेटीमध्ये काटक्या, बांगड्या, मणी ठेवलेले असतात.

याशिवाय शाळेतील निरनिराळ्या वस्तू, कागद, वाळू, माती, लाकडांचे तुकडे इत्यादींचा उपयोगही शैक्षणिक साहित्यामध्ये करण्यात येतो.

## शैक्षणिक व्यवसाय

विद्यार्थ्यांच्या आंतरिक स्वयंकृतीला प्रेरणा मिळण्यासाठी फ्रोबेलने काही व्यवसाय सुचविले आहेत. त्या व्यवसायांतून त्यांच्या ज्ञानेंद्रियांचा विकास होऊ शकेल अशी त्याची खात्री आहे. त्याने दिलेल्या देणग्या आणि त्याने सुचविलेले व्यवसाय यांच्या पाठीमागे काही निश्चित स्वरूपाचे हेतू आहेत. या व्यवसायांच्या द्वारा वस्तूंचा आकार, रचना, पृष्ठभाग, संख्या, अभिरुची यांचा विकास होऊ शकेल. यांच्या साह्याने भूमिती, त्रिकोणमिती, बीजगणित आणि चित्रकला यांचे अध्ययन सुकर होऊ शकेल. व्यवसायासाठी त्याने काही साहित्य सुचविले आहे.

त्यामध्ये कागद, माती, लाकूड, पुठ्ठा इत्यादी वस्तूंचा समावेश आहे. चटया विणणे, टोपल्या तयार करणे, चित्रे काढणे, भरतकाम करणे, शिवणे; कागद, माती व पुठ्ठा यांच्या वस्तू तयार करणे इत्यादी व्यवसाय सुचविले आहेत. फ्रोबेलच्या देणग्या या प्रतीकात्मक होत्या. त्यातून विश्वाच्या एकात्मतेची जाणीव विद्यार्थ्यांना यावी अशी अपेक्षा होती. त्याचप्रमाणे त्याने सुचविलेले निरनिराळे व्यवसाय सहेतुक, अर्थपूर्ण व शिक्षणक्षम होते. परंतु पुढील कालामध्ये त्यांमध्ये एकप्रकारची यांत्रिकता शिरल्यामुळे फ्रोबेलला अभिप्रेत असलेले हेतू साध्य होऊ शकले नाहीत.

## खेळांतून शिक्षण

यापूर्वीचे शिक्षण हे विषयकेंद्रित होते. परंतु फ्रोबेलने प्रतिपादिलेली शिक्षण-पद्धती खेळाभोवती गुंफलेली आहे. खेळ हे बाल्याचे एक वैशिष्ट्य आहे. तो बाल्याच्या विकासाचा मानबिंदू आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. खेळांच्या द्वारे मुलांच्या गरजेचा, आंतरिक प्रेरणेचा कृतीचा आविष्कार घडतो. खेळांमुळे विद्यार्थ्याला आनंद, स्वातंत्र्य उपभोगता येऊन मानसिक शांती व समाधान मिळते. खेळांच्यामुळे कृती, भावना व विचार यांच्याविषयी जरूर त्या सवयी बनतात. खेळ म्हणजे या वयातील विकासाच्या विशिष्ट अवस्थेतील सर्वांत शुद्ध व पूर्णपणे आध्यात्मिक कृती होय. विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक खेळांमध्ये शिक्षकाने अडथळा आणू नये. मात्र त्यांना योग्य वेळी व योग्य प्रमाणात मार्गदर्शन करावे.

खेळांतून मुलांस शिक्षण मिळावे म्हणून खालील तीन अटी साधल्या पाहिजेत—

(१) खेळाला काहीतरी उद्देश असावा.

(२) खेळाला काही साहित्य पुरवावे.

(३) खेळांत मुलांना मार्गदर्शन मिळावे.

## अभ्यासक्रम

फ्रोबेलच्या अभ्यासक्रमामध्ये आत्मकृती, व्यवसाय किंवा खेळ याशिवाय श्रमानुभव, निसर्गपरिचय, सामान्यशास्त्र, कला, भाषा व धार्मिक शिक्षण या विषयांचाही समावेश आहे. केवळ विषयानुवर्ती शिक्षण दिल्यामुळे विद्यार्थी आळशी व नादान बनतात. श्रमानुभवाची जोड शिक्षणास मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होऊन त्यांच्या स्वत्वाचा फुलोरा फुलतो.

निसर्गाच्या अभ्यासामुळे, निसर्गातील चमत्कृतींचा परिचय घडून येऊन परमेश्वराच्या कृतीबद्दल विद्यार्थ्यांच्या मनामध्ये आदराची भावना निर्माण होते. सामान्यशास्त्रामध्ये गणिताचा अंतर्भाव असल्यामुळे मानवी जीवनव्यवहार समजू शकतात. भाषेमुळे आत्माविष्कारास मदत होते. गाणे, चित्रकला, मृत्तिकाशिल्प, लाकूडकाम, रंगकाम यांमुळे निरनिराळ्या वस्तूंच्या आकारांशी व रचनेशी परिचय घडून येतो. फ्रोबेलच्या मते परमेश्वराची अगाध लीला व विश्वाची एकता जागून घेणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असल्यामुळे धार्मिक शिक्षण हा अभ्यासक्रमाचा पायाच समजला जातो.

## शिक्षकाची भूमिका

मागे सांगितल्याप्रमाणे बालोद्यानशाळेमध्ये शिक्षकाची भूमिका माळ्याची आहे. माळी ज्याप्रमाणे खत-पाणी घालून रोपांच्या वाढीला मदत करतो, उष्णता व योग्य जमिनीचा पुरवठा करून अनुकूल परिस्थिती निर्माण करतो, त्याचप्रमाणे शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या आंतरिक विकासाला मदत केली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीचा विकास हा त्याच्या मूलभूत शक्तीनुसार ठरून गेलेला असतो. त्यांच्या नैसर्गिक विकासाला व नैसर्गिक प्रवृत्तींना व शक्तींना बाह्य अडथळ्यांमुळे विकृत स्वरूप मिळणार नाही याची खबरदारी शिक्षकाने घेतली पाहिजे. फ्रोबेलच्या मताप्रमाणे शिक्षण म्हणजे नियंत्रित विकास होय. बाह्य परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांच्या विकासाला अनुकूल परिस्थिती मिळेलच याची खात्री देता येत नाही. त्यावर कोणाचेही नियंत्रण असू शकत नाही. मात्र शालेय वातावरण पूर्वनियोजित, नियंत्रित व शिक्षणाला पोषक असे करता येते.

## शिस्त

शिस्त म्हणजे केवळ काही नियम व बंधने नव्हेत. शिस्त म्हणजे एक जीवनपद्धती आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची इच्छाशक्ती प्रबळ होऊन त्यांना योग्य व्यवसाय करण्यास प्रेरणा मिळते. शिस्तीचे हेतू विद्यार्थ्यांचे संरक्षण व्हावे, एकमेकांचे स्वातंत्र्य अबाधित रहावे व एकमेकांमध्ये सहकार्याची भावना वाढीस लागावी हे आहेत. खेळ, उत्स्फूर्त कृती, गोष्टी, कला, हस्तोद्योग व्यवसाय यांमुळे शारीरिक व मानसिक शिस्त अंगी येण्यास मदत होते.

## फ्रोबेलचे शैक्षणिक कार्य

शिक्षणक्षेत्रामध्ये फ्रोबेलचे नाव अजरामर झाले याचे कारण त्याने प्रतिपादिलेली किंडरगार्टन पद्धती होय. तिचा प्रसार सर्व जगभर, विशेषतः युरोपात व

अमेरिकेत फार झाला. त्यामुळे वय वर्षे ३ ते ७ या मुलांच्या शिक्षणाकडे पालकांचे व शिक्षकांचे लक्ष वेधून गेले. या वयात ज्ञानेंद्रियांची क्षमता परमोच्च असल्यामुळे या वयातील शिक्षणाला किती महत्त्व आहे हे फ्रोबेलनेच दाखवून दिले. फ्रोबेलने लहान मुलांच्या स्वभावाचा, प्रवृत्तींचा, त्यांच्या आवडीनिवडींचा व त्यांच्या सुप्त शक्तींचा सखोल अभ्यास केला होता. त्यामुळे त्यांनी प्रतिपादिलेली तत्त्वे ही केवळ पूर्वप्राथमिक शिक्षणाचाच पाया बनली नसून, प्राथमिक व माध्यमिक शिक्षणालाही आधार ठरली आहेत.

## शिक्षण व स्वयंकृती

पूर्वीच्या शिक्षण-तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांच्या स्वयंशिक्षणाला महत्त्व दिले होतेच; परंतु फ्रोबेलने सर्व शिक्षण आत्मकृतीतून कसे सुसंघटित करता येईल याचे जे दिग्दर्शन केले ते अत्यंत नावीन्यपूर्ण होते. या वयातील मुले केवळ ज्ञानग्रहण करून थांबत नाहीत, तर ती निरनिराळे उद्योग, खेळ व कृती यांच्या द्वारा आत्माविष्कारही करीत असतात, यासाठी त्यांना उपयुक्त साहित्य वापरण्यासाठी दिले पाहिजे.

## बालकाचे व्यक्तिमत्त्व

बालकाच्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाला फ्रोबेलने मानाचे व आदराचे स्थान दिले.

## कृतिद्वारा शिक्षण

हस्तोद्योगामार्फत व्यक्तिविकासाचे शिक्षण देता येऊ शकते व हात हे सुद्धा बुद्धिविकासास मदत करणारे कर्मेंद्रिय आहे असे त्याने पटवून दिले.

## शिक्षणाचे सामाजिक अंग

शाळा हा एक छोटेखानी समाज आहे आणि त्या समाजात विद्यार्थी विविध व्यवसाय करून वैशिष्ट्यपूर्ण जीवन जगतात. शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होऊन ती समाजामध्ये समरस झाली पाहिजे असे त्याने प्रतिपादिले आहे. त्याच्या शाळेमध्ये कृतिप्रवणता व सहकार्य यांच्यावर भर दिला आहे. निरनिराळ्या व्यवसायांतून विद्यार्थ्यांमध्ये सहानुभूती, सहकार्य, बंधुता, ऐक्य व जबाबदारीची जाणीव या सामाजिक गुणांचा परिपोष होईल अशी त्याची अपेक्षा होती.

### ज्ञानेंद्रिय-शिक्षण

खरे शिक्षण म्हणजे ज्ञानेंद्रियांचे शिक्षण असे तो मानीत असे. ते शिक्षण देणग्या व कृतिद्वारे देता येते.

### क्रीडन-पद्धती

खेळ व काम या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. फरक फक्त दृष्टिकोनाचा आहे. कामामध्येही स्वप्रेरणा, आनंद व स्वातंत्र्य असल्यास ते खेळ होऊ शकते व खेळात बंधने, दडपण असल्यास त्याला कामाचे स्वरूप येऊ शकते.

### निसर्ग-शिक्षण

निसर्ग-शिक्षणाला फ्रोबेलने जी चालना दिली ती आध्यात्मिक, नैतिक व धार्मिक गरजेवरून. परमेश्वराचा खरा आविष्कार व त्याचे सर्वव्यापी स्वरूप निसर्गात पहावयास मिळते.

### शिक्षणाचे ध्येय

( १ ) व्यक्तीला स्वतःचे स्पष्टपणे ज्ञान होणे.
( २ ) निसर्गाशी जवळीक साधणे.
( ३ ) परमेश्वराचे ज्ञान होऊन त्याच्याशी एकरूप होणे.
( ४ ) मानवाचे ज्ञान होणे.
( ५ ) शुद्ध, पवित्र जीवन जगणे.
( ६ ) समाजाशी एकरूप होणे.

फ्रोबेलचे सर्व तत्त्वज्ञान बरेचसे गूढ आहे. त्याने दिलेल्या देणग्या या प्रतीकात्मक असल्यामुळे सामान्य शिक्षकांना काहीशा गूढ वाटतात. त्याने प्रतिपादलेली विश्वाची एकता तीन-चार वर्षे वयाच्या मुलाला समजू शकेल असे वाटत नाही. त्याने विविध कृती व व्यवसाय आपल्या अध्यापन-पद्धतीमध्ये सुचविले आहेत. त्याचप्रमाणे गणित, भाषा, निसर्गपरिचय असे ज्ञानाचे विषयही दिले आहेत. परंतु कृती व ज्ञान यांचा समवाय साधण्याचा त्याने प्रयत्न केला नाही. तथापि त्याने प्रतिपादिलेली आत्मकृती, विधायक प्रवृत्ती, खेळ, उद्योग व गाणी यांचा शिक्षणात केलेला समावेश इत्यादी गोष्टी पूर्वप्राथमिक शिक्षणाची योग्य पद्धती शोधून काढण्यास आधारभूत ठरल्या आहेत.

◆ ◆ ◆

## डयूयी

| | |
|---|---|
| जन्म | १८५९ |
| मृत्यू | १९५२ |

इंग्लंडचा पंतप्रधान डिझरायली याने राज्यशास्त्रासंबंधी एक चांगले तत्त्व प्रतिपादन केले आहे. त्याचे म्हणणे असे आहे की, प्रत्येक देशाला आपल्या योग्यतेनुरूपच शासन मिळत असते. "Every country gets a Government it deserves". लोकांच्या आशाआकांक्षा, त्यांची ज्ञान-विज्ञानातील प्रगती, संस्कृती या सर्वांचे प्रतिबिंब त्या त्या देशांच्या शासन-यंत्रणेमध्ये दिसून येते. जी गोष्ट राज्यशासनासंबंधीची तीच गोष्ट शिक्षणालाही लागू आहे असे म्हणता येईल. देशाची शिक्षणपद्धती ही त्या देशातील जनतेच्या आशाआकांक्षांची, प्रगतीची व सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीची द्योतक समजली पाहिजे. देशाच्या उद्दिष्टाची पूर्ती त्याच्या शिक्षणपद्धतीतूनच होत असते. म्हणूनच देशाचे भवितव्य शाळांच्या वर्गावर्गांतूनच घडविले जाते असे म्हणतात.

या बाबतीत आपणांला अमेरिकेचे उदाहरण घेता येईल. अमेरिकेचा शोध कोलंबसाने लावल्यानंतर १६ व्या व १७ व्या शतकांमध्ये युरोप-इंग्लंडमधील धार्मिक व राजकीय जाचाला कंटाळून अनेक लोकांनी तेथे वसाहती केल्या.

अमेरिकेच्या मूळच्या सुपीक जमिनीत अनेक प्रकारच्या पिकांच्या लागवडी केल्या. निरनिराळे उद्योगधंदे उभारले व अनेक संकटांना व आपत्तींना तोंड देऊन एक नवीन वैभवसंपन्न राष्ट्र निर्माण केले. त्या ठिकाणी वसाहत करण्यास आलेल्या लोकांनी एका नवीन पुरोगामी संस्कृतीला जन्म दिला. त्यांचा सर्व भर मानवी कर्तृत्वावर होता. त्यांच्या विचारसरणीमध्ये जुन्या कल्पनांचा, रूढींचा व धार्मिक आचार-विचारांचा अडसर नसल्याकारणाने प्रगमनशील विचार समजून घेण्यासाठी आपल्या ज्ञानाची कवाडे त्यांनी सतत उघडी ठेवली होती. अमेरिका हे एक नवोदित राष्ट्र होते. त्याला इतिहास फारसा नव्हता. त्यामुळे नवीन प्रयोग व नवीन विचार यांचे बीज या भूमीमध्ये लवकर रुजले.

अमेरिकेच्या शैक्षणिक इतिहासालाही हीच गोष्ट लागू आहे. प्रथम राष्ट्राच्या नवनिर्माणामध्ये गुंतल्याकारणाने त्यांनी शिक्षणाकडे फारसे लक्ष दिल्याचे दिसून येत नाही. युरोपमध्ये व इंग्लंडमध्ये जे अभ्यासक्रम होते व ज्या शैक्षणिक पद्धती प्रचलित होत्या त्यांचेच अनुकरण अमेरिकन शिक्षणतज्ज्ञांनी प्रथम केले. फ्रोबेलच्या किंडरगार्टन पद्धतीनुसार अनेक शाळा १८ व्या शतकाच्या सुरुवातीस अमेरिकेमध्ये सुरू झाल्या. हर्बार्टच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा पगडा अमेरिकन शिक्षणपद्धतीवर फारच मोठ्या प्रमाणावर पडल्याचे दिसून येते. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात अमेरिकेमध्ये नॅशनल हर्बार्ट सोसायटी नावाची एक शैक्षणिक संस्था स्थापन करण्यात आली. त्यांनी अनेक शिक्षणविषयक प्रयोग केले. यानंतर १९०२ मध्ये या संस्थेचे रूपांतर 'नॅशनल सोसायटी फॉर सायंटिफिक स्टडी ऑफ एज्युकेशन' या संस्थेमध्ये झाले.

यावरून असे दिसते की, शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये आपली स्वतंत्र विचारसरणी निर्माण करण्याचा व त्यानुसार आपला शैक्षणिक कार्यक्रम आखण्याचा प्रयत्न अमेरिकन शिक्षणतज्ज्ञांनी सुरू केला. जुन्या विचारांच्या जोखडातून मुक्त होण्याचा हा त्यांचा प्रयत्न पुढील अनेक घटनांमध्ये आपणास दिसून येतो. पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये जे जे शैक्षणिक प्रयोग यशस्वी झाले, ज्या ज्या नवीन विचारांचा व तत्त्वांचा शोध लागला, ती ती सर्व तत्त्वे, विचार व शोध अमेरिकेच्या परिस्थितीनुरूप कसे लागू करता येतील याच खटपटीत तेथील शिक्षणतज्ज्ञ लागले. १८५९ मध्ये चार्लस् डार्विन याने ' ओरिजिन ऑफ द स्पीसीज् ' हा आपला अलौकिक व जीवशास्त्रासंबंधी क्रांतिकारक तत्त्वे प्रतिपादणारा ग्रंथ लिहिला. त्याने मांडलेल्या विचारांचा प्रभाव मानवी जीवनाविषयक सर्व शास्त्रांवर पडला. त्या त्या शास्त्रांतील अनेक कूट प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी त्याच्या सिद्धां-

तांचा आधार घेतला जाऊ लागला. शिक्षणशास्त्रही या विचाराच्या प्रभावातून सुटू शकले नाही. एकपेशी जीवाची उत्क्रांती होत होत कोट्यवधी पेशींनी बनलेला मानव आज उत्क्रांत स्थितीमध्ये आपणांस पहावयास मिळतो असे त्याचे म्हणणे होते.

ही उत्क्रांती दोन प्रमुख तत्त्वांवर अवलंबून असते. एक Struggle for Existence (जीवनासाठी झगडा) व दोन Survival of the Fittest. यांमध्ये निसर्ग जरुरीनुसार प्राण्यांची निवड करतो असे दिसून येते. डार्विनच्या उत्क्रान्तिवादाचा सिद्धान्त मन व आत्मा या बाबतीत कसा लागू करावा असा प्रश्न त्या वेळी सर्वत्र चर्चिला जात होता. या प्रश्नाचे उत्तर शोधण्यात सुप्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ स्टॅन्ले हॉल याने आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले. शरीराच्या उत्क्रांतीबरोबरच मनाचीही उत्क्रांती होत गेली असे त्याने सिद्ध केले. शरीराचा व मनाचा विकास समकालीन व समप्रमाणात होत असून, त्याला दोन समांतर रेषांची उपमा देता येईल. मानवी मन आपल्या सहजप्रवृत्तीनुसार काम करते. भूक भागविण्याची सहजप्रवृत्ती ही सर्वांत महत्त्वाची असते. त्यासाठी प्रत्येक प्राणिमात्राची धडपड चालू असते. अन्नशोधनाकरिता मनामध्ये पहिले विचार येऊ लागले. प्रथम कृती होऊ लागल्या व कृतीतून विचारांचा जन्म झाला. विचार यशस्वी व फलदायी आहे असे वाटल्यावर कृतीमध्ये, उद्योगामध्ये योग्य तो बदल होऊ लागला. एकोणिसाव्या शतकातील सर्व विचारवंतांवर व शिक्षणतज्ज्ञांवर डार्विनच्या उत्क्रांतिवादाचा केवढा प्रभाव पडू लागला याचे स्टॅन्ले हॉलचे तत्त्वज्ञान उदाहरण म्हणून देता येईल.

याच सुमारास शिक्षणामध्ये कोणते ज्ञान विद्यार्थ्यांना द्यावे हाही एक ज्वलंत प्रश्न युरोपखंडामध्ये चर्चिला जात होता. या चर्चेचा पुढाकार हर्बर्ट स्पेन्सर या शिक्षणतज्ज्ञाकडे होता. 'What knowledge is most worth' (कोणते ज्ञान सर्वांत महत्त्वाचे) या प्रश्नाचे उत्तर जीवनाचे संरक्षण करणारे ज्ञान सर्वांत महत्त्वाचे असे त्याने दिले. प्रत्येक जीवमात्राची सर्वांत महत्त्वाची धडपड आत्मसंरक्षणाची असते. नंतर आत्मसंरक्षणासाठी ज्या गोष्टी जरुरीच्या असतात त्या गोष्टी संपादन करण्याकडे जीवमात्राचे प्रयत्न चालू असतात. आत्मसंरक्षणानंतर वंशसातत्य टिकविण्यासाठी जातिरक्षण हे महत्त्वाचे. मुलांचे संरक्षण करणे, त्यांच्या गरजा भागविणे, त्यांना कोणत्याही प्रकारे अपाय होणार नाही याकडे लक्ष पुरविणे यासाठी सर्व जीवमात्रांचे प्रयत्न अखंड चालू असतात. त्यानंतर समाजधारणा व संवर्धन यासाठी व्यक्तीचे प्रयत्न चालू असतात. वरील प्रकारच्या विचारसरणीतून शिक्षणामध्ये शास्त्रीय ज्ञानाचा अंतर्भाव मोठ्या प्रमाणात होऊ लागला. अमेरिकन शाळांतूनही

वाङ्मय-विभागाच्या अभ्यासक्रमामध्ये आमूलाग्र बदल करण्यात आला. या कामी टॉमस हक्स्ले याने केलेले कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. यावरून असे दिसते की इंग्लंड-युरोपमध्ये जे जे क्रांतिकारक शोध लागले, ज्या ज्या प्रगमनशील विचारांचा प्रसार झाला, त्या त्या विचारांचा अंगीकार करून आपल्या देशातील संस्कृतीशी, जीवनपद्धतीशी, आशा-आकांक्षांशी, सामाजिक, राजकीय परिस्थितीशी सुसंगत अशी शैक्षणिक तत्त्वप्रणाली अमेरिकन शिक्षणतज्ज्ञांनी मांडली.

पारंपरिक शैक्षणिक पद्धतीमध्ये पहिले परिवर्तन फ्रँसिस पारकर याने केले. अमेरिकन शाळांमध्ये जी औपचारिकता चालू होती ती घालविण्याचा प्रयत्न त्याने केला. इतर पाश्चिमात्य शाळांप्रमाणेच अमेरिकन शाळांतही या वेळेपर्यंत अभ्यासक्रम म्हणजे निरनिराळ्या विषयांचे एक गाठोडे समजण्यात येत असे. प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या वयानुसार इयत्ता नेमून देण्यात येत असे. त्याची प्रगती, त्याची मानसशास्त्रीय वैशिष्ट्ये, यांचा कोठल्याही तऱ्हेचा विचार केला जात नसे. अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तके लिहिली जात. पाठ्यपुस्तके शिकविणे हाच शिक्षकांचा महत्त्वाचा उद्योग मानला जात असे. यामुळे सर्व शिक्षणाला एक प्रकारचा साचेबंदपणा व औपचारिकता येऊन ते निःसत्त्व व निर्जीव बनले होते. त्यामध्ये प्राण ओतण्याचे काम फ्रँसिस पारकरने केले. त्याच्या शाळेमध्ये शिक्षण हे जीवनाला पूरक व पोषक कसे करता येईल याचा प्रयोग करण्यात आला. ही त्याची पद्धती क्विन्सी शिक्षणपद्धती म्हणून अमेरिकेमध्ये प्रसिद्ध आहे. याच पद्धतीचा पाठपुरावा कार्यवादाचा प्रणेता व शिक्षणपद्धतीमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणणारा क्रांतिकारक शिक्षणशास्त्रज्ञ जॉन ड्यूयी याने केला.

## चरित्र

जॉन ड्यूयीचा जन्म २७ ऑक्टोबर १८५९ रोजी बर्लिंग्टन येथे झाला. हे एक दहा-पंधरा हजार वस्तीचे छोटेसे खेडेगाव होते. त्याचे वडील दुकानदार होते. त्यांची प्रवृत्ती ऐशआरामी व चैनीची होती. त्यांची दुकानदारी फारशी जोरात चालत नव्हती. परंतु मुलांच्या सुदैवाने त्यांची आई मात्र स्वभावाने अतिशय करारी, कर्तव्यदक्ष व महत्त्वाकांक्षी होती. त्यामुळे जॉन ड्यूयी व इतर भावंडांचे योग्य प्रकारे शिक्षण होऊ शकले. त्याचे प्राथमिक शिक्षण बर्लिंग्टन येथील सरकारी शाळेत झाले. शाळेत असताना तो बराच लाजाळू व मितभाषणी होता. हुशार विद्यार्थी म्हणून त्याने कधीच लौकिक मिळविला नाही. विश्वविद्यालयीन शिक्षणासाठी तो व्हर्मौंट येथे गेला. तेथेच त्याने दोन वर्षे शिक्षक म्हणूनही काम केले. विश्वविद्यालयात असताना त्याने पिअर्स, स्टॅन्ले हॉल,

एच्. बी. ॲडॅम्स, टी. एच्. हक्स्ले यांच्या तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला. मिशिगन येथील जॉन हॉपकिन विश्वविद्यालयामध्ये त्याने आपल्या पीएच्. डी. पदवीसाठी प्रबंध सादर केला. त्याचा विषय "Psychology of Immanuel Kant" (कांटचे मानसशास्त्र) असा होता. त्यामुळे प्रथम त्याच्या विचारसरणीवर अध्यात्मवाद व निसर्गवाद यांचा प्रभाव पडल्याचे दिसून येते. काही काळ मिशिगन विश्वविद्यालयामध्ये तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक म्हणून त्याने काम केले. सन १९०४ मध्ये कोलंबिया विश्वविद्यालयात तत्त्वज्ञान-विभागाचा प्रमुख म्हणूनही त्याने काम केले. याच ठिकाणी ३० वर्षे काम केल्यानंतर १ जून १९५२ मध्ये त्याने आपली इहलोकीची यात्रा संपवली.

जॉन ड्यूयीचा लौकिक एक तत्त्वज्ञ व श्रेष्ठ शास्त्रज्ञ म्हणून सर्व जगभर पसरला होता. १९१९ साली जपानमधील टोकियो विश्वविद्यालयातर्फे त्याला तत्त्वज्ञान या विषयावर व्याख्याने देण्यासाठी निमंत्रण आले होते. चीनमधील पेकिंग विश्वविद्यालयातही दोन वर्षे व्याख्याने देऊन त्याने आपल्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा प्रसार केला. तुर्कस्तानच्या सरकारने तर आपल्या शिक्षणपद्धतीची पुनर्रचना करण्यासाठी त्याला पाचारण केले होते. रशिया, मेक्सिको, इटली या देशांतही त्याचा मोठेपणा मान्य झाला होता. त्याच्या इतका लौकिक व जागतिक कीर्ती फारच थोड्या शिक्षण-तज्ज्ञांच्या वाट्यास आली असेल.

## शैक्षणिक प्रयोग

सन १८९६ साली शिकागो विश्वविद्यालयामध्ये तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक असताना ड्यूयीने University Elementary School नावाची एक शैक्षणिक संस्था सुरू केली होती. या संस्थेचे स्वरूप प्रयोगशाळेसारखे होते. नवीन शैक्षणिक तत्त्वे, कल्पना, पद्धती प्रत्यक्षात कितपत टिकू शकतात हे पाहण्याचा त्याचा हेतू होता. येथील शाळेमध्ये १० ते १४ वर्षे वयाच्या मुलांना प्रवेश दिला जात असे. शाळा विशिष्ट तत्त्वानुसार व आदर्श परिस्थितीत चालविण्याचा आटोकाट प्रयत्न केला जात असे. अनेक शिक्षणशास्त्रज्ञांनी प्रतिपादिलेल्या बाल-स्वातंत्र्यास पुरेपूर वाव देण्यात येत असे. कोणत्याही तऱ्हेच्या जाचक व भीति-दायक शिस्तीचा अवलंब केला जात नसे. शिक्षक म्हणून किंडरगार्टन किंवा प्राथमिक शाळेत अनुभव घेतलेल्या व्यक्तींना शिक्षक म्हणून नेमण्यात येत असे. शाळेसाठी कोणताही ठराविक अभ्यासक्रम तयार करण्यात आला नव्हता. परंतु शाळा कोणत्या तत्त्वावर चालवावी यासंबंधी सर्वसाधारण रूपरेषा देण्यात आली होती. शिक्षण-कार्यक्रमाला कोणताही साचेबंदपणा येऊ नये अशी काळजी घेण्यात

आली होती. शाळेमध्ये ज्या शैक्षणिक बाबींसंबंधी प्रयोग करण्यात आले त्या खाली दिल्या आहेत —

( १ ) घर आणि शाळा यांचे संबंध घनिष्ठ करण्यासाठी काय करावे लागेल ? घरामध्ये जे अनुभव विद्यार्थ्यांना येतात व त्यांच्यावर जे पूर्वसंस्कार होतात त्यांचा उपयोग शिक्षणासाठी कसा करून घेता येईल ?

( २ ) इतिहास, शास्त्र व कला हे शालेय विषय शिकविताना त्या विषयांच्या माहितीचा मुलांच्या जीवनास प्रत्यक्षपणे कसा उपयोग करून घेता येईल ? मुलांचे जीवन समृद्ध करण्याच्या दृष्टीने हे विषय कसे शिकवावेत ?

( ३ ) लिहिणे, वाचणे व गणित ही कौशल्ये शिकविण्यासाठी कोणत्या सुधारित पद्धतीचा उपयोग करावा ? ही कौशल्ये कमीत कमी वेळात व सुलभ रीतीने कशी शिकविता येतील ? या कौशल्यांच्या अध्यापनासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा कशी निर्माण होईल ?

वरील विषयांशी संबंधित असे विविध प्रकारचे प्रयोग या शाळेमध्ये करण्यात आले. विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करावे या हेतूने आठ ते दहा मुलांचा एक गट याप्रमाणे अनेक गटांत वर्गातील मुलाची विभागणी करण्यात आली होती. या प्रयोगाचे अनेक फायदे झाले. शिक्षकाच्या प्रक्रियेला आधारभूत असलेली तत्त्वे प्रत्यक्षपणे कशी वापरता येतील याची कल्पना स्पष्ट करण्यास त्यामुळे मदत झाली. शिवाय या शैक्षणिक प्रयोगातून अनेक शिक्षणशास्त्रज्ञांना निरनिराळे प्रयोग करण्याची प्रेरणा मिळाली.

### वाङ्मयीन साहित्य

डयूयीने विविध विषयांवर अनेक ग्रंथ लिहिले. त्याचे शेकडो लेख निरनिराळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले आहेत. आपल्या लेखनामध्ये त्याने अनेक विषय हाताळले. त्याने लिहिलेले ग्रंथ इतके प्रसिद्धीस आले व जगातील थोर विचारवंतांकडून व शिक्षणशास्त्रज्ञांकडून त्यांना एवढी मान्यता मिळाली की त्याच्या ग्रंथांच्या अनेक आवृत्त्या तर निघाल्याच पण त्यांची अनेक भाषांमध्ये भाषांतरेही झाली. त्याने प्रसिद्ध केलेल्या काही ग्रंथांची नावे खाली दिली आहेत.

( १ ) The School and the Society
शाळा आणि समाज ( १८९९ )

( २ ) The Child and the Curricula
बालक आणि अभ्यासक्रम ( १९०२ )

(३) How We Think ?

आपण विचार कसा करतो ? (१९१०)

(४) Interest and Effort in Education

शिक्षणातील आवड व प्रयत्न (१९१३)

(५) Schools of Tomorrow

उद्याच्या शाळा (१९१५)

(६) Democracy and Education

(७) Reconstruction in Philosophy

तत्त्वज्ञानाची पुनर्मांडणी (१९२०)

(८) Sources of the Science of Education

शिक्षणशास्त्राचा आधार (१९२९)

(९) Experience and Education

अनुभव आणि शिक्षण (१९३८)

**तत्त्वज्ञान**

जॉन डयूयीचे तत्त्वज्ञान अमेरिकन जीवनाच्या दृष्टिकोनाशी मिळते-जुळते असेच आहे. अमेरिकन लोकांनी आपल्या अविश्रांत परिश्रमातून फारच अल्पावधीत एक मोठे वैभव-संपन्न राष्ट्र निर्माण केले होते. त्यामुळे त्यांना स्वतःच्या कर्तृत्वाबद्दल व मानवी सामर्थ्याबद्दल विलक्षण अभिमान वाटत होता. अर्थातच आध्यात्मिक व आधिभौतिक विचारापेक्षा भौतिक व शास्त्रीय दृष्टिकोनाचा त्यांच्या विचारावर फार मोठा प्रभाव होता. त्यांनी आपल्या तत्त्वज्ञानातून विशिष्ट प्रकारचे भौतिक व पूर्णपणे व्यावहारिक असे सिद्धांत मांडले. अशा तत्त्वप्रणाली-मध्ये कार्यवाद (Pragmatism) हा प्रमुख समजला जातो. कार्यवादाचा प्रमुख भाष्यकार जॉन डयूयी हा आहे. या विचारसरणीचा प्रभाव त्याच्या शिक्षणविषयक मतांवरही दिसून येतो. कार्यवादाचा विकास डयूयीने करण्यापूर्वी दोघा तत्वज्ञांनी कार्यवादाचे बीजारोपण केले होते. ते म्हणजे चार्लस् पिअर्स (१८३९-१९१४) व विलयम जेम्स (१८४२-१९१०) हे होत. जॉन डयूयीची कार्यवादासंबंधीची भूमिका समजून घेण्यापूर्वी या दोघांचे एतद्‌विषयक विचार समजून घेणे अगत्याचे आहे.

पिअर्स हा एक सुप्रसिद्ध गणिती व तर्कशास्त्रज्ञ होता. 'प्रॅग्मॅटिझम्' हा शब्द त्यानेच प्रथम आपल्या एका निबंधात वापरला. कोणत्याही गोष्टीचे किंवा समस्येचे संशोधन करताना त्यासंबंधी त्याने पाच पायऱ्या मांडल्या होत्या.

१. समस्येसंबंधीचे उपलब्ध ज्ञान एकत्रित करून त्यावर प्रमेय ( Hypotheiss ) तयार करावयाचे.

२. प्रमेयानुसार जे निरनिराळे परिणाम घडून येतील त्यांचा अंदाज घ्यावयाचा.

३. प्रमेयाचा प्रत्यक्ष परिस्थितीमध्ये वापर करावयाचा.

४. नंतर प्रमेयाची सत्यासत्यता शोधून काढावयाची. एखादी समस्या असल्यास त्यावर उपाय शोधावयाचे.

या संबंधात एखाद्या विधानाचा, प्रमेयाचा, विचाराचा किंवा समस्येचा अर्थ काय हे त्याला पहावयाचे होते. विधानाचा अर्थ इंद्रियगोचर, वस्तुनिष्ठ व दृश्य असला पाहिजे हे त्याने ठरविले. तो अर्थ बरोबर की चूक आहे हे ठरविण्यासाठी प्रत्यक्ष अनुभवाच्या निकषावर तो अर्थ तावून-सुलाखून घ्यावयाचा. अनुभव घेण्यासाठी काहीतरी कृतीचा, व्यवसायाचा किंवा उद्योगाचा आधार घ्यावयाचा. थोडक्यात सांगावयाचे तर कोणत्याही विचाराची वा विधानाची सत्यासत्यता ही ते विधान किंवा तो विचार प्रत्यक्ष व्यवहारात वापरूनच ठरविता येते. प्रत्यक्ष व्यवहारात व अनुभवात जर तो विचार फलदायी व यशस्वी ठरू शकला नाही, तर तो विचार खरा किंवा सत्य नाही असे समजावे. विचारांची सत्यता पटविण्यासाठी जे निकष वापरावयाचे ते वस्तुनिष्ठ व सार्वत्रिक स्वरूपाचे असावेत. म्हणजे विधानाची सत्यता एखाददुसऱ्या व्यक्तीला पटवून भागणार नाही. ती सर्व लोकांना पटली पाहिजे. साध्या अनेक विधानांवरून व अनेक प्रकारच्या निरीक्षणातून काही सर्वसामान्य नियम तयार होतात. त्या नियमांची सत्यताही वरील निकषावरच पडताळून पहावयाची असते. अनेक वस्तू जमिनीवर पडल्याचे पाहिल्यानंतर गुरुत्वाकर्षणाचा नियम तयार झाला. अनेक लिंबे पिवळी असतात व ती चवीला आंबटही लागतात; यावरून लिंबू हे फळ पिवळे व आंबट असते हा सर्वसामान्य सिद्धांत तयार झाला. त्याची प्रचीती इंद्रियाला येऊ शकते; ती वस्तुनिष्ठ असून सर्वमान्य आहे.

या विचाराची सत्यता पटल्यानंतर वस्तू अधांतरी राहू शकत नाहीत कारण गुरुत्वाकर्षणाचा नियम सार्वत्रिक असतो. म्हणून नंतर व्यक्ती आपल्या वर्तनात योग्य तो बदल करते. असा योग्य तो बदल सतत करीत राहिल्यास व्यक्तीला त्याची सवय बनते; म्हणजे व्यक्तीच्या मनामध्ये प्रथम एखादा विचार येतो, नंतर त्याची सत्यासत्यता पटते व त्यातूनच व्यक्तीच्या सवयी बनतात; आणि हेच खरे शिक्षण होय असे पिअर्सचे मत होते. पिअर्सने Pragmatism

हा शब्द एका विशिष्ट संदर्भात वापरला होता. हे वरील विवेचनावरून आपणांस दिसून येईल. विधानाचा अर्थ किंवा सत्यता कशी अजमावयाची यासाठी त्याने काही व्यावहारिक निकष तयार केले. ते म्हणजे अनुभव व प्रत्यक्ष कृती हे होत. आपल्या विशिष्ट प्रकारच्या तत्त्वज्ञानाकरिता पिअर्सने Pragmatism हा एक विलक्षण व सहज न समजणारा शब्द वापरला होता आणि तो कदाचित कालाच्या ओघामध्ये नष्टप्रायही झाला असता. परंतु विल्यम जेम्सने इ. स. १८९८ मध्ये आपल्या एका लेखामध्ये याच शब्दाचा पुन्हा एकदा वापर केला. ज्ञानग्रहण कसे होते व विधानाची सत्यता कशी पटविली जाते यासाठी त्याने या शब्दाचा वापर केला. केवळ वापरच करून तो थांबला नाही तर कार्यवादाच्या तत्त्वप्रणालीचा त्याने अधिक विकास केला.

कोणतेही विधान किंवा विचार हा अनुभवाच्या निकषावर घासूनपुसून पाहिल्याशिवाय ग्राह्य मानू नये असे त्याचेही मत होते आणि ही तत्त्वप्रणाली प्रचलित धार्मिक कल्पना व नीतिनियम यांना त्याने लावली. याचमुळे सर्व समाजामध्ये वैचारिक बंडाळी माजली. नीतीच्या व धर्माच्या कल्पना या जशाच्या तशा ग्राह्य मानल्या जात असत. त्याविषयी शंका व्यक्त करणे किंवा प्रश्न विचारणे धर्महीनतेचे लक्षण मानले जात असे. धर्मकल्पनेच्या बाबतीत परमेश्वराची किंवा त्याच्या प्रेषितांची अधिसत्ता मानण्याच्या कल्पनेला त्याने सुरुंग लावला. धर्म व नीतीसंबंधीच्या विल्यम जेम्सच्या विचाराशी जॉन डयूयी समरस होता. सत्यासंबंधी जेम्सचे मत निराळ्या प्रकारचे होते. सत्य हें नेहमी गतिमान असते. स्थल व काल यानुसार त्यात बदल दिसून येतो. एखादी व्यक्ती निरोगी किंवा आरोग्यसंपन्न आहे असे आपण केव्हा म्हणतो ? जेव्हा त्या व्यक्तीला चांगली भूक लागते, झोप येते, ती व्यक्ती निरनिराळ्या प्रकारची कामे कार्यक्षमतेने करू शकते तेव्हाच. व्यक्तीचे आरोग्य हे ज्याप्रमाणे कार्यातून प्रतीत होते त्याचप्रमाणे ते त्याच्या गतिमानतेतूनही दिसून येते. Truth is functional relation between our ideas together with thinking, feeling and action. सत्य जसे गतिमान असते, तसेच ते बदलतही असते. टॉलेमीने खगोलशास्त्रासंबंधी जे विचार मांडले त्यांचा विकास कोपरनिकसच्या सिद्धांतामुळे झाला. न्यूटनने मांडलेल्या सिद्धांतात आइन्स्टाइनच्या सापेक्षतावादाने परिवर्तन घडून आले. याचा अर्थ असा नव्हे की, न्यूटन व टॉलेमीचे सिद्धान्त असत्य होते. वैचारिक विकासाच्या विशिष्ट अवस्थेत ते सत्यच होते.

पूर्वी मलेरिया हा रोग खिडक्या उघड्या ठेवून झोपल्यामुळे होतो असा समज होता. पण नंतर मलेरियाच्या रोगजंतूंनी पछाडलेले डास मलेरिया आणतात

असे सिद्ध झाले. खिडक्या उघड्या ठेवल्यामुळे किंवा मच्छरदाणी न लावल्यामुळे हे डास आपल्याला चावू शकतात. म्हणून मलेरियाचे खिडक्या उघड्या ठेवणे हे जे कारण सांगण्यात येत होते तेही मर्यादित स्वरूपात सत्यच होय. जग हे नदीच्या प्रवाहाप्रमाणे आहे. प्रवाहातील पाण्याचा थेंब ज्याप्रमाणे एकेजागी स्थिर नसतो, त्याप्रमाणे जग व आपले जीवन नेहमी गतिमान असते. बदलत असते. या गतिमान जगामध्ये कोणतीही मूल्ये चिरंतन शाश्वत असूच शकत नाहीत. कार्यवाद्यांनी सत्य कसे ठरवावयाचे याचा जरी पुष्कळ विचार केला असला, तरी सत्याचे स्वरूप काय याचा त्यांनी विचार केलेला दिसत नाही. भौतिकवाद हा अमेरिकन स्वभावाचा एक विशेष आहे. त्यांना सर्व गोष्टी व्यवहारी दृष्टिकोनातून पहावयाच्या असतात. तर्कापेक्षा किंवा आप्तवाक्यापेक्षा ते प्रत्यक्ष प्रामाण्यावरच विशेष भर देतात. त्यांना पूर्वीचा इतिहास, संस्कृती, रूढी नसल्यामुळे ते फक्त वर्तमान व भविष्य एवढेच जाणतात. विल्यम जेम्स व ड्यूयी यांच्या तत्त्वज्ञानामध्ये काही महत्त्वपूर्ण फरक दिसून येतात. जेम्स परमेश्वराचे अस्तित्व मानतो. तर ड्यूयी ते मानीत नाही. इतर तत्त्वज्ञ जगाची उत्पत्ती, स्थिती, लय, आत्मा व परमात्मा यांचा संबंध यावर आपल्या तत्त्वज्ञानाची उभारणी करतात. ड्यूयीच्या तत्त्वज्ञानाचा आधार समाज व समाजातील समस्या हाच आहे. ज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन काहीसा भिन्न आहे. ज्ञान व्यवहारात कसे उपयोगी पडते यांच्या तीन पद्धती जेम्सने मांडल्या आहेत.

( १ ) ज्ञानामुळे पूर्वीच्या समजुतींना बळकटी येते. व्यवहारामध्ये आपण जे निरीक्षण केलेले असते त्याला दुजोरा मिळतो.

( २ ) नैसर्गिक परिस्थितीशी मिळते-जुळते घेण्याकरिता ज्ञान आपणांस उपयोगी पडते. त्यामुळे निसर्गाचे नियम कळतात व त्यानुसार आपल्या वर्तनामध्ये आपल्याला बदल करता येतो.

( ३ ) ज्ञानामुळे आपल्याला भावनेचा समतोल राखता येतो. जेम्सने प्रतिपादिलेल्या या तीन पद्धतींपैकी पहिल्या दोन पद्धती ड्यूयीला मान्य आहेत. तिसऱ्या पद्धतीबद्दल मात्र ड्यूयी साशंक आहे.

वर वर्णन केल्याप्रमाणे पिअर्स व जेम्स यांचे कार्यवादासंबंधीचे विचार काहीसे भिन्न आहेत. मात्र त्याचा जो आत्मा, विधानाची सत्यता पाहणे, यासंबंधीच्या कल्पनांशी सर्वांचीच एकवाक्यता आहे. जे प्रत्यक्ष व्यवहारात उपयोगी पडते, काम देते ते सत्य होय. कार्यानुभवाच्या तत्त्वज्ञानावर ड्यूयीने आपल्या विचारांचा व सिद्धांतांचा जो मुलामा चढविला त्यामुळे मूळच्या कार्य-

वादाशी तो तितकासा समरस होऊ शकत नाही. फार काय आपल्या तत्त्वज्ञानाला कार्यवाद हे नाव देण्याचेही त्याने टाळले. आपल्या तत्त्वज्ञानाला तो साधनवाद, Instrumentalism किंवा Experismentalism, प्रयोगवाद असे नाव देतो.

डयूयीचे शिक्षणविषयक तत्त्वज्ञान समजून घेण्यापूर्वी त्याचे जीवनविषयक विचार आकलन करून घेतल्यास त्याच्या एकूण तत्त्वज्ञाची बैठक काय आहे याची कल्पना येईल. आपल्या तत्त्वज्ञानामध्ये त्याने मनासंबंधी एक विचार मांडला आहे. व्यक्तीच्या शरीराबरोबरच मनाचा व बुद्धीचा नैसर्गिक विकास होतो या स्टॅन्ले हॉलच्या विचाराशी तो सहमत आहे. व्यक्ती आपले सामाजिक व वैयक्तिक जीवन जगत असताना निर्माण होणाऱ्या प्रसंगांतून व समस्यांतून मनाची उत्क्रांती होत असते. अन्न, वस्त्र, निवारा यांसारख्या प्राथमिक गरजा भागविण्यासाठी मानवाची जी शेकडो वर्षे धडपड चालली आहे, त्यातून मनाचा विकास होत गेला आहे. खरे म्हणजे मानवाचे मन हे एक समस्या सोडविण्याचे साधन होय. आपल्या सभोवतालच्या सामाजिक व भौतिक परिस्थितीत हरघडी प्रत्ययास येणाऱ्या घटनांतून दुःख टाळण्यासाठी व सुखप्राप्ती करून घेण्यासाठी मनामध्ये विचारांची प्रक्रिया सुरू होते. त्यामुळे सभोवतालच्या परिसरावर तो ताबा मिळवू शकतो. विचार हे मानवी मनाचे एक वैशिष्ट्य आहे. त्यामुळेच त्याने इतर प्राणिमात्रांपेक्षा अधिक अशी स्वतःची उन्नती करून घेतली आहे. भावना व इच्छाशक्ती यांचा मनामध्येच समावेश केला पाहिजे. त्या अलग किंवा मनापासून वेगळ्या अशा मानता यावयाच्या नाहीत. या त्याच्या विचारसरणीवरून मन हे एक समस्या सोडविण्याचे साधन असल्यामुळे मनासंबंधी त्याचा साधनवाद प्रसिद्धीस आला आहे.

**ज्ञान**

कृती व ज्ञान हे निरनिराळे नाही. मनुष्यप्राणी आपल्या नैसर्गिक प्रवृत्तीनुसार कृती करीत असतो. कृती करीत असताना त्याला विविध अनुभव येत असतात. या अनुभवांचा परिपाक म्हणजेच ज्ञान होय. विस्तवाच्या आकर्षणामुळे मूल स्वाभाविकपणे विस्तवाला हात लावते. विस्तवाला हात लावल्यास तीव्र दुःखाचा अनुभव येत असल्याकारणाने विस्तवास हात लावू नये अशा प्रकारचे ज्ञान त्याला प्राप्त होते, व या ज्ञानानुसारच ते आपल्या वर्तनात बदल करीत असते. कोणती व्यक्ती कसा बदल करील, किती प्रमाणात बदल करील, हे त्या व्यक्तीच्या मानसिक विकासावर अवलंबून असते. याचा अर्थ असा की कृतीपूर्वी किंवा कृती केल्याशिवाय व्यक्तीला ज्ञान प्राप्त होत नाही. आज जे विविध प्रकारचे ज्ञान मानवाने संचित

केले आहे, ते त्याच्या अनेक शतकांच्या अनुभवांतून व उद्योगांतून मिळविले गेले आहे. व्यक्ती आपल्या जीवनासाठी हरतऱ्हेचे प्रयत्न करीत असते. हे प्रयत्न प्रारंभीच्या अवस्थेमध्ये मागे सांगितल्याप्रमाणे, प्राथमिक गरजा भागविण्यासाठी केलेले असतात. मानवेतर प्राण्यांमध्ये नैसर्गिक प्रवृत्ती, प्रेरणा किंवा अभिरुची या मर्यादित स्वरूपांच्या असतात. स्वत्वरक्षण व जातिरक्षण यापुरत्याच त्या मर्यादित असतात. मानवामध्ये मात्र नैसर्गिक प्रवृत्ती इतक्या मर्यादित स्वरूपाच्या नाहीत. अनुभवातूनच ज्याप्रमाणे ज्ञान उदय पावते त्याप्रमाणेच उदय पावलेल्या ज्ञानाच्या साह्याने अनुभवांची किंवा व्यवसायांची पुनर्रचना केली जाते. यामुळे ज्ञान हे एक साधन आहे, साध्य नव्हे. ज्ञानाच्यामुळे आपल्या कृतीला व ज्ञानातील अनुभवांना उजळा मिळतो. या त्याच्या विचारसरणीला ज्ञानातील साधनवाद असे म्हणतात.

## विचारांची प्रक्रिया

ड्यूयीने How We Think या विषयावर एक ग्रंथ लिहिला आहे. त्यात आपल्या विचारांना कशी चालना मिळते याचे विवेचन केले आहे. तो म्हणतो, जोपर्यंत आपली कृती, उद्योग किंवा व्यवसाय सुरळीतपणे चालू असतो तोपर्यंत विचाराला चालना मिळत नाही. कृतीमध्ये काही अडथळा आला किंवा काही समस्या निर्माण झाली, की विचाराला चालना मिळते. अनेक प्रकारचे विचार, उपाय मनामध्ये खळबळ माजवितात. त्यातून नेमका कोणता विचार किंवा उपाय समस्या सोडविण्यासाठी उपयोगी पडतो त्याची निवड केली जाते. त्यासंबंधी त्याने खालील पाच पायऱ्या दिल्या आहेत.

(१) अडचणीची किंवा समस्येची जाणिव होणे.

(२) संबंधित समस्येचा सर्व बाजूने विचार करून समस्येचे निश्चित मूळ कोठे आहे ते ठरविणे.

(३) समस्या सोडविण्यासाठी निरनिराळे उपाय शोधणे.

(४) सर्व उपायांचा तपशीलवार विचार करून संभाव्य उपयुक्त उपाय निश्चित करणे व तो उपाय लागू पडतो की नाही हे पाहणे.

(५) उपायाच्या परिणामावरून उपाय स्वीकारावयाचा की त्याचा त्याग करावयाचा हे ठरविणे.

वरील वैचारिक प्रक्रियेच्या बैठकीवर त्याने आपली प्रयोगपद्धती उभी केली आहे.

### शैक्षणिक तत्त्वज्ञान

मानवी शरीराला ज्याप्रमाणे अन्नाची गरज भासते, त्याचप्रमाणे समाजाच्या धारणेसाठी शिक्षणाची जरुरी असते. शिक्षणाशिवाय समाजाची धारणा होऊ शकत नाही. समाजाची संस्कृती टिकविण्यासाठी व वाढविण्यासाठी शिक्षणाची जरूरी असते. शिक्षण ही एक सामाजिक प्रक्रिया आहे यावर ड्यूयीने पुष्कळच भर दिला आहे. मानवी जीवनासाठी व आपल्या गरजा भागविण्यासाठी मनुष्य-प्राण्याला विविध प्रकारच्या कृती कराव्या लागतात. त्या कृतीतून त्याला विविध प्रकारचे अनुभव येत असतात. विविध समस्या सोडवाव्या लागतात. अनुभवांच्या अनुषंगाने व्यक्तीला ज्ञान प्राप्त होते. त्या ज्ञानाचा उपयोग अनुभवांची पुनर्रचना करण्याकडे किंवा कृतीमध्ये वा उद्योगामध्ये योग्य तो बदल करण्यामध्ये होत असतो. उद्योगात व कृतीमध्ये बदल झाल्यामुळे मानवाची कर्तृत्वाची क्षितिजे बदलतात. नवनवीन व्यवसाय स्वीकारले जातात व त्यांतून नवीन ज्ञानाचा जन्म होतो. नवीन ज्ञानामुळे पुन्हा पूर्वीच्या उद्योगामध्ये योग्य असा बदल केला जातो आणि ही क्रिया अखंडपणे चालूच राहते.

जे मूल कृती करू शकत नाही त्याला शिक्षण मिळत नाही. शिक्षण म्हणजे अनुभव असे ड्यूयीचे मत असल्यामुळे बालकाच्या शिक्षणाची क्रिया जन्मापासूनच सुरू होते व जीवनाच्या अखेरपर्यंत चालूच राहते. घर व समाज यांमध्ये मुले ज्या विविध क्रिया करतात, त्यांना जो विविध प्रकारचा अनुभव येत असतो, त्यामुळे त्यांचे शिक्षण शाळेबाहेरील विश्वामध्ये नेहमी चालूच असते. त्या बाहेरील अनुभवांचा उपयोग शालेय अध्यापनात करून घेतल्यास ते अधिक स्वाभाविक व परिणामकारक होते. पूर्वी असा समज होता की, शिक्षण म्हणजे जीवनाची पूर्वतयारी होय. परंतु ड्यूयीच्या मते शिक्षण ही जीवनाची पूर्वतयारी नसून ते प्रत्यक्ष जीवनच होय. शाळेमध्ये विद्यार्थी एक आदर्श असे जीवन जगत असतो. त्या जीवनात त्याला विविध प्रकारचे अनुभव येत असतात. त्यामुळे त्याला जीवनाला आवश्यक असे ज्ञान, विविध प्रकारची कौशल्ये व उपयुक्त प्रवृत्ती आत्मसात करता येतात. शाळेतील उद्योग हे समाजात चालणाऱ्या प्राथमिक स्वरूपाच्या उद्योगांतून निवडलेले असल्याकारणाने शिक्षणाने विद्यार्थ्यांना आपल्या सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी व आपल्या सुप्त शक्तींचा विकास करण्यासाठी मदत होते.

## शिक्षणाचे ध्येय

पूर्वीच्या शिक्षणतज्ज्ञांचे असे मत होते की, शिक्षणाचे ध्येय म्हणजे व्यक्तीचा सर्वांगीण–शारीरिक, मानसिक व नैतिक–विकास करणे हे होय. त्याचप्रमाणे काही शिक्षण-तज्ज्ञांनी शिक्षणाचे ध्येय म्हणजे जीवनाची पूर्वतयारी करणे असे मानले आहे. या त्यांच्या मताशी ड्यूयी सहमत नाही. त्याचे म्हणणे असे की, शिक्षण ही एक विद्यार्थ्यांनीच करावयाची प्रक्रिया असल्यामुळे त्यांना इतक्या दूरवरची ध्येये समजूच शकणार नाहीत. त्यांना फक्त वर्तमानकालीन व अत्यंत नजीकचे ध्येय समजू शकेल. विद्यार्थी वर्तमानकाळात जगत असतात. चालू जीवन कसे प्रफुल्लित करता येईल, आपल्या नैसर्गिक प्रवृत्तीनुसार निरनिराळे उद्योग सहजतेने व सुलभतेने कसे करता येतील, एवढाच त्यांचा हेतू वा ध्येय असते. उद्योगातून त्यांना ज्ञान मिळते, त्यांचे शिक्षण होते व विकास साधला जातो ही केवळ आनुषंगिक बाब आहे. शिवाय सर्वांगीण विकास किंवा जीवनाची पूर्वतयारी यासारखी ध्येये भविष्यकाळातील, संदिग्ध स्वरूपाची व प्रौढांच्या दृष्टिकोनातून मांडलेली असल्याकारणाने ती विद्यार्थ्यांना त्यांच्या चालू परिस्थितीत मान्य होऊ शकणार नाहीत. आणखी असे की, कृती, अनुभव, ज्ञान, बदल अशा प्रकारे शिक्षण ही एक अखंड चालणारी क्रिया असल्यामुळे शिक्षणाचे ध्येय म्हणजे आणखी शिक्षण हेच होय. त्यामुळे शिक्षणाचे ध्येय अगोदर ठरविता येत नाही.

प्रत्येक क्रियेसाठी विशिष्ट प्रकारची उद्दिष्टे असतातच. शिक्षणाची प्रक्रिया हेच शिक्षणाचे ध्येय. त्यामध्ये आपल्या सर्व शारीरिक, मानसिक शक्तीनिशी भाग घेणे हेच विद्यार्थ्यांचे उद्दिष्ट. ज्याप्रमाणे बी रुजण्याच्या प्रक्रियेमध्ये किंवा घर बांधण्याच्या उद्योगामध्ये एक प्रकारचा आगळा आनंद असतो, त्याचप्रमाणे शिक्षणाची प्रक्रिया चालू असताना विद्यार्थ्यांना एक आगळा आनंद मिळत असतो. त्यांच्यापुढे त्याला न समजणारी भविष्यकालातील ध्येये, उद्दिष्टे ठेवल्यास शिक्षणाच्या प्रक्रियेतील त्याचा उत्साह नाहीसा होऊन जातो. कृतीला किंवा अनुभवाला चालना देण्यास ही बाह्यनिर्मित ध्येये उपयोगी पडत नाहीत. कृतीला प्रेरणा मिळण्याची गोष्ट नैसर्गिक प्रवृत्ती व स्वाभाविक गरजा भागविण्याची निकड यांवर अवलंबून असते. निरनिराळ्या समस्या उत्पन्न झाल्यास त्याला स्वाभाविकपणे तोंड दिले जाते. जरूर तो बदल केला जातो. अनुभवाला व कृतीला मुरड घातली जाते. वर्तनात अपेक्षित बदल होतो. आणि हे शिक्षण नव्हे असे कोण म्हणेल ? शिक्षणाची प्रक्रिया म्हणजे अनुभवांची पुनर्रचना, ज्ञानाची पुनर्मांडणी. हेच ड्यूयीच्या मते शिक्षण होय. सर्व जग

जिंकल्यानंतर अलेक्झांडर दी ग्रेट याला आता काही जिंकावयास राहिले नाही म्हणून उद्विग्नता आली. आपले अवतारकार्य संपले असे वाटू लागले. त्याचप्रमाणे आपले शिक्षण संपले, असे ज्या दिवशी व्यक्तीला वाटेल त्या दिवशी आपले जीवनच संपले असल्याची भावना त्याच्या मनात उत्पन्न होऊन तो उदास व निराश बनेल.

### शिक्षण व व्यक्ती

विद्यार्थी हा शिक्षणाचा आत्मा आहे. त्याच्या भोवती शिक्षणाच्या सर्व क्रिया-प्रक्रिया गुंफल्या पाहिजेत. पूर्वी काही शिक्षणतज्ज्ञांनी शिक्षण हे बालकेंद्रित असले पाहिजे असे जे प्रतिपादिले आहे, त्या मताशी डयूयी पूर्णपणे सहमत आहे. त्यामुळे शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांना, त्यांच्या शारीरिक व मानसिक वैशिष्ट्यांना अधिक महत्त्व दिले पाहिजे. यासाठी शिक्षकाने बालमानसशास्त्राचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. मानसशास्त्राच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक प्रवृत्ती, आवडीनिवडी, स्वाभाविक कल व रुचि यांची जाणीव होऊ शकेल. विद्यार्थ्यांमधील व्यक्तिभेद कसे असतात व त्यानुसार त्यांच्या कृतीमध्ये कोणकोणता बदल केला पाहिजे हेही शिक्षकांना समजून येईल. मात्र या सर्व प्रवृत्तींचा अर्थ सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात केला गेला पाहिजे. मुलांमध्ये ज्या नैसर्गिक प्रवृत्ती असतात, त्यांचे स्वरूप यांत्रिक नसते. त्यांचा विकास ठराविक पद्धतीने व दिशेने होत नाही. त्यांच्या विकासाला सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वाभाविक सामाजिक परिस्थिती होय. विद्यार्थ्यांच्या शिक्षणप्रक्रियेत खालील चार गोष्टी मूलभूत स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे शिक्षणाच्या प्रक्रियेला चालना मिळू शकते.

(१) संभाषणाची आवड.

(२) जिज्ञासा किंवा नवीन शोधण्याची प्रवृत्ती.

(३) नवनिर्मिती–प्रवृत्ती.

(४) कलात्मक आत्माविष्कार.

वरील चार पद्धतींने विद्यार्थ्यांचे शिक्षण होत असते. भाषेद्वारा केलेल्या आविष्काराने त्यांच्या सामाजिक गरजा भागविण्यास मदत होते.

### शिक्षण व समाज

समाज व व्यक्ती यांचा संबंध पुष्कळ वेळा चुकीचा लावला जातो. अनेक व्यक्तींच्या एकत्रित समुदायाला समाज असे संबोधिले जाते. अनेक विटा एक-

### शिक्षणाचे ध्येय

पूर्वीच्या शिक्षणतज्ज्ञांचे असे मत होते की, शिक्षणाचे ध्येय म्हणजे व्यक्तीचा सर्वांगीण–शारीरिक, मानसिक व नैतिक–विकास करणे हे होय. त्याचप्रमाणे काही शिक्षण-तज्ज्ञांनी शिक्षणाचे ध्येय म्हणजे जीवनाची पूर्वतयारी करणे असे मानले आहे. या त्यांच्या मताशी ड्यूयी सहमत नाही. त्याचे म्हणणे असे की, शिक्षण ही एक विद्यार्थ्यांनीच करावयाची प्रक्रिया असल्यामुळे त्यांना इतक्या दूरवरची ध्येये समजूच शकणार नाहीत. त्यांना फक्त वर्तमानकालीन व अत्यंत नजीकचे ध्येय समजू शकेल. विद्यार्थी वर्तमानकाळात जगत असतात. चालू जीवन कसे प्रफुल्लित करता येईल, आपल्या नैसर्गिक प्रवृत्तीनुसार निरनिराळे उद्योग सहजतेने व सुलभतेने कसे करता येतील, एवढाच त्यांचा हेतू वा ध्येय असते. उद्योगातून त्यांना ज्ञान मिळते, त्यांचे शिक्षण होते व विकास साधला जातो ही केवळ आनुषंगिक बाब आहे. शिवाय सर्वांगीण विकास किंवा जीवनाची पूर्वतयारी यासारखी ध्येये भविष्यकाळातील, संदिग्ध स्वरूपाची व प्रौढांच्या दृष्टिकोनातून मांडलेली असल्याकारणाने ती विद्यार्थ्यांना त्यांच्या चालू परिस्थितीत मान्य होऊ शकणार नाहीत. आणखी असे की, कृती, अनुभव, ज्ञान, बदल अशा प्रकारे शिक्षण ही एक अखंड चालणारी क्रिया असल्यामुळे शिक्षणाचे ध्येय म्हणजे आणखी शिक्षण हेच होय. त्यामुळे शिक्षणाचे ध्येय अगोदर ठरविता येत नाही.

प्रत्येक क्रियेसाठी विशिष्ट प्रकारची उद्दिष्टे असतातच. शिक्षणाची प्रक्रिया हेच शिक्षणाचे ध्येय. त्यामध्ये आपल्या सर्व शारीरिक, मानसिक शक्तीनिशी भाग घेणे हेच विद्यार्थ्यांचे उद्दिष्ट. ज्याप्रमाणे बी रुजण्याच्या प्रक्रियेमध्ये किंवा घर बांधण्याच्या उद्योगामध्ये एक प्रकारचा आगळा आनंद असतो, त्याचप्रमाणे शिक्षणाची प्रक्रिया चालू असताना विद्यार्थ्यांना एक आगळा आनंद मिळत असतो. त्यांच्यापुढे त्याला न समजणारी भविष्यकालातील ध्येये, उद्दिष्टे ठेवल्यास शिक्षणाच्या प्रक्रियेतील त्याचा उत्साह नाहीसा होऊन जातो. कृतीला किंवा अनुभवाला चालना देण्यास ही बाह्यनिर्मित ध्येये उपयोगी पडत नाहीत. कृतीला प्रेरणा मिळण्याची गोष्ट नैसर्गिक प्रवृत्ती व स्वाभाविक गरजा भागविण्याची निकड यांवर अवलंबून असते. निरनिराळ्या समस्या उत्पन्न झाल्यास त्याला स्वाभाविकपणे तोंड दिले जाते. जरूर तो बदल केला जातो. अनुभवाला व कृतीला मुरड घातली जाते. वर्तनात अपेक्षित बदल होतो. आणि हे शिक्षण नव्हे असे कोण म्हणेल? शिक्षणाची प्रक्रिया म्हणजे अनुभवांची पुनर्रचना, ज्ञानाची पुनर्मांडणी. हेच ड्यूयीच्या मते शिक्षण होय. सर्व जग

जिंकल्यानंतर अलेक्झांडर दी ग्रेट याला आता काही जिंकावयास राहिले नाही म्हणून उद्विग्नता आली. आपले अवतारकार्य संपले असे वाटू लागले. त्याचप्रमाणे आपले शिक्षण संपले, असे ज्या दिवशी व्यक्तीला वाटेल त्या दिवशी आपले जीवनच संपले असल्याची भावना त्याच्या मनात उत्पन्न होऊन तो उदास व निराश बनेल.

## शिक्षण व व्यक्ती

विद्यार्थी हा शिक्षणाचा आत्मा आहे. त्याच्या भोवती शिक्षणाच्या सर्व क्रिया-प्रक्रिया गुंफल्या पाहिजेत. पूर्वी काही शिक्षणतज्ज्ञांनी शिक्षण हे बालकेंद्रित असले पाहिजे असे जे प्रतिपादिले आहे, त्या मताशी डयूयी पूर्णपणे सहमत आहे. त्यामुळे शिक्षणाच्या प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांना, त्यांच्या शारीरिक व मानसिक वैशिष्टयांना अधिक महत्त्व दिले पाहिजे. यासाठी शिक्षकाने बालमानसशास्त्राचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. मानसशास्त्राच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक प्रवृत्ती, आवडीनिवडी, स्वाभाविक कल व रुचयी यांची जाणीव होऊ शकेल. विद्यार्थ्यांमधील व्यक्तिभेद कसे असतात व त्यानुसार त्यांच्या कृतीमध्ये कोणकोणता बदल केला पाहिजे हेही शिक्षकांना समजून येईल. मात्र या सर्व प्रवृत्तींचा अर्थ सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात केला गेला पाहिजे. मुलांमध्ये ज्या नैसर्गिक प्रवृत्ती असतात, त्यांचे स्वरूप यांत्रिक नसते. त्यांचा विकास ठराविक पद्धतीने व दिशेने होत नाही. त्यांच्या विकासाला सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वाभाविक सामाजिक परिस्थिती होय. विद्यार्थ्यांच्या शिक्षणप्रक्रियेत खालील चार गोष्टी मूलभूत स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे शिक्षणाच्या प्रक्रियेला चालना मिळू शकते.

( १ ) संभाषणाची आवड.

( २ ) जिज्ञासा किंवा नवीन शोधण्याची प्रवृत्ती.

( ३ ) नवनिर्मिती–प्रवृत्ती.

( ४ ) कलात्मक आत्माविष्कार.

वरील चार पद्धतीने विद्यार्थ्यांचे शिक्षण होत असते. भाषेद्वारा केलेल्या आविष्काराने त्यांच्या सामाजिक गरजा भागविण्यास मदत होते.

## शिक्षण व समाज

समाज व व्यक्ती यांचा संबंध पुष्कळ वेळा चुकीचा लावला जातो. अनेक व्यक्तींच्या एकत्रित समुदायाला समाज असे संबोधिले जाते. अनेक विटा एक-

मेकींवर रचून भिंत बनविता येते. मात्र येथे विटांना स्वतंत्र अस्तित्व असू शकते किंवा भिंतीशिवाय विटांना स्वतंत्र अस्तित्व असू शकते असे म्हणता येईल. परंतु व्यक्तींचे तसे नाही. समाजाशिवाय व्यक्तीला स्वतंत्र अस्तित्वच असू शकत नाही असे ड्यूयीचे म्हणणे आहे. समाज म्हणजे अनेक व्यक्तींची गोळाबेरीज नसून ते पदार्थ विज्ञानाच्या भाषेत बोलावयाचे झाल्यास रासायनिक मिश्रण आहे. त्यामुळे व्यक्तीला द्यावयाचे शिक्षणही सामाजिक संदर्भातच देणे आवश्यक आहे. प्रत्येक मूल हे प्रथम स्वतःपुरतेच जगत असते. स्वतःच्या सुखासाठी व सुरक्षिततेसाठी त्याच्या प्रारंभीच्या सर्व क्रिया चालू असतात. तथापि या आत्मकेंद्रित वर्तुळातून त्याला बाहेर पडावयास शिकविणे हे शाळेचे काम आहे. त्यासाठी शाळेमध्ये सामाजिक स्वरूपाचे उद्योग सुरू करणे आवश्यक आहे. असे उद्योग करीत असताना विद्यार्थ्यांमध्ये आज्ञापालन, सहकार्य, श्रमप्रतिष्ठा, बंधुभाव, संयम, शिस्त इत्यादी सामाजिक गुणांचा परिपोष होऊ शकेल.

### शाळा

ड्यूयीच्या मते शाळा हा समाजाचाच एक भाग आहे. ती एक समाजाची छोटेखानी प्रतिकृतीच आहे. समाजाचेच कार्य शाळा करीत असते. समाजामध्ये जे उद्योग चालतात तेच उद्योग शाळेमध्येही चालले पाहिजेत. समाजामध्ये जे जीवन निरनिराळ्या व्यक्ती जगतात, तशाच प्रकारचे पण प्राथमिक स्वरूपाचे जीवन विद्यार्थ्यांनाही शाळेमध्ये जगता आले पाहिजे. शाळा ही समाजाची प्रतिकृती आहे असे म्हटले तरी समाजातील जे दोष व गुंतागुंत दिसून येते, ती शालेय समाजातून घालविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. विद्यार्थ्यांना जेव्हा असे वाटू लागेल की शालेय जीवनामध्ये आपल्याला आपले नैसर्गिक व आवडीचे उद्योग करता येतात व आपले स्वाभाविक जीवन जगता येते त्या वेळी तो अधिक सुखी व अधिक उत्पादनक्षम बनू शकेल. मुलांच्या नैसर्गिक प्रवृत्ती, त्यांच्या प्रेरणा व त्यांना द्यावयाचे मार्गदर्शन व सल्ला यांमध्ये जितक्या प्रमाणात समन्वय साधता येईल, तितक्या प्रमाणात शालेय अध्यापन अधिक स्वाभाविक व परिणामकारक होऊ शकेल. शाळेतील शिक्षकाचे काम आपले व्यक्तिमत्त्व किंवा आपले ज्ञान विद्यार्थ्यांवर लादावयाचे हे नाही. त्याची भूमिका समाजसेवकाची आहे. त्याने विद्यार्थ्यांतील वैयक्तिक फरक जाणून त्यांच्या नैसर्गिक प्रवृत्तींच्या वाढीसाठी योग्य ते वातावरण तयार करावयाचे असते. त्यासाठी निरनिराळे व्यवसाय करण्यासाठी योग्य ती पूर्वतयारी, साधनसामग्रीची जुळवाजुळव वगैरे त्याने करावयाची असते. विद्यार्थी त्याला आपला मित्र समजतील व अडचणींच्या वेळी व प्रसंगोपात्त त्याचा सल्ला घेतील. जरूर तेव्हा त्याचे मार्गदर्शन त्यांना हवेसे वाटेल.

## अभ्यासक्रम

ड्यूयीने पारंपरिक अभ्यासक्रमावर फार कडक टीका केली आहे. या अभ्यासक्रमामध्ये ज्ञानाची विभागणी निरनिराळ्या विषयांमध्ये अत्यंत कृत्रिमरीतीने करण्यात आलेली असते. त्याचप्रमाणे पूर्वीच्या पद्धतीमध्ये शिक्षक निरनिराळ्या विषयांचे ज्ञान ठराविक वेळी देत असतात. हेही ड्यूयीला मान्य नाही. अभ्यासक्रमात ते ज्ञान नमूद केले आहे व ते ज्ञान देण्याची शिक्षकाची तयारी आहे म्हणून ते विद्यार्थ्यांवर लादणे हा एक घोर अन्याय आहे असे तो मानतो. ज्ञानाची जरुरी, उपयुक्तता किंवा गरज विद्यार्थ्यांना वाटली पाहिजे. अशी गरज जेव्हा विद्यार्थी आपल्या स्वयंप्रेरणेने किंवा नैसर्गिक प्रवृत्तीनुसार एखादी कृती करतात तेव्हाच भासते. ज्ञानाचा संबंध हा कृतीशी जोडला पाहिजे. त्याचप्रमाणे निरनिराळ्या विषयांच्या ज्ञानाचाही समवाय साधला पाहिजे. ज्ञान हे प्रत्यक्ष अनुभवांतून व सामाजिक गरजा भागविण्याच्या उद्योगांतून दिले गेले पाहिजे. त्यासाठी शाळेमध्ये घरातील व समाजातील साध्या व सोप्या व्यवसायांची योजना केली पाहिजे. म्हणजे विद्यार्थी आपले नैसर्गिक जीवन जगत असताना त्यांना निरनिराळे अनुभव येतील. त्यांच्या ज्ञानात भर पडेल व त्यांचे शिक्षण स्वाभाविक पद्धतीने होईल. तसे पाहिले तर आपल्या पूर्वजांनी जे ज्ञान मिळविले, ते जीवनावश्यक अशा अनेक कृतीद्वाराच मिळविले. नाईल नदीच्या काठी रहाणाऱ्या इजिप्शिअन लोकांना पुरानंतर आपल्या शेतांची मोजणी करून बांध घालावे लागत असत. याच उद्योगातून त्यांनी जमिनीची मोजणी कशी करावी याचे ज्ञान संपादन केले. विणकामाच्या उद्योगामध्ये कापसाच्या बोंडापासून तंतू निराळे काढण्याचे कार्य फार बिकट असे. प्रथम ते हातानेच करावे लागे. त्यासाठी अनेक मजुरांची गरज पडत असे. वेळ, श्रम व पैसा यांची बचत करण्याच्या हेतूने नवीन तंत्राचा शोध लागला. ड्यूयीच्या अभ्यासक्रमामध्ये पुस्तके, पारंपरिक विषय, शिक्षक, साहित्य या सर्वांना अत्यंत गौण स्थान दिलेले आहे. अभ्यासक्रम हा बालकेंद्रित असला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी, त्यांच्या गरजा, सहजप्रवृत्ती सामाजिक उपयुक्तता यांवर त्याची उभारणी झाली पाहिजे. त्यासाठी विद्यार्थ्यांना योग्य ते अनुभव देण्यात आले पाहिजेत. प्रत्यक्ष अनुभव येण्यासाठी विद्यार्थ्यांच्या आवडीच्या व्यवसायांची गरज आहे. यासाठी त्याने प्राथमिक शाळेमध्ये शिवणकाम, स्वयंपाक, लाकूडकाम व इतर हस्तोद्योग यांचा समावेश करावा असे सुचविले आहे. त्याचा आग्रह अभ्यासक्रमातील सर्व भाग जीवनाशी संबंधित असला पाहिजे यावर आहे. त्याने शिक्षणाचे तीन टप्पे मानले आहेत.

(१) चार ते आठ वर्षे हा खेळाचा काळ होय. या वेळी विद्यार्थी घरातील व्यवसाय शाळेमध्ये जरूरीप्रमाणे करतात. व्यवसायाच्या अनुषंगाने लेखन, वाचन, गणित, सामान्यज्ञान यांचे ज्ञान जरुरीपुरते व जरूर तेव्हांच मिळते.

### (२) वय ८ ते १२—उत्स्फूर्त अवधानाचा काळ

या अवस्थेतील विद्यार्थी जीवनाच्या निरनिराळ्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करतात. समस्या उत्पन्न झाल्यावर तिची उकल कशी करावी यासंबंधी विचार करतात. उपयुक्त साधनसामग्रीची जुळवाजुळव करतात व त्यातून समस्येवर उपाय शोधून काढतात.

### (३) वय १२ ते १८—वैचारिक अवधानाचा काळ

या वयात विद्यार्थी एखादा समाजोपयोगी व्यवसाय करतात. त्यासाठी आनुषंगिक ज्ञान जमा करतात. व्यवसायासाठी उपयुक्त असे कौशल्य संपादन करतात. नवनवीन समस्यांचा अभ्यास करण्यासाठी त्यांच्या विचारशक्तीस चालना देतात. एकंदर विचार करता ड्यूयीने प्रतिपादिलेला अभ्यासक्रम हा निश्चित स्वरूपाचा असू शकत नाही. विद्यार्थ्यांना कोणते ज्ञान मिळावयाचे, कोणती कौशल्ये त्यांनी आत्मसात करावयाची हे त्यांनी निवडलेल्या व्यवसायावर किंवा त्यांना तोंड द्याव्या लागणाऱ्या समस्येवर अवलंबून असते.

### अध्यापन-पद्धती

अध्यापनापेक्षा अध्ययनालाच अधिक महत्त्व आहे असे ड्यूयी मानतो. शिक्षण म्हणजे जीवनाची पूर्वतयारी नसून प्रत्यक्ष जीवनच आहे, या त्याच्या तत्त्वानुसार विद्यार्थ्यांचे अध्ययन हे त्यांच्या प्रत्यक्ष स्वानुभवातूनच व्हावयास हवे. कृतिद्वारा शिक्षण, 'Learning by doing' हे त्याच्या अध्यापनपद्धतीचे बोधवाक्य आहे. नैसर्गिक प्रवृत्तीनुसार ज्या कृती केल्या जातात व ज्यांची विद्यार्थ्यांच्या जीवनाला आवश्यकता असते त्याच कृतीमध्ये विद्यार्थ्यांना गोडी लागते. कृत्रिम तऱ्हेने विद्यार्थ्यांत गोडी निर्माण करता येत नाही. मागे सांगितल्याप्रमाणे Project Method किंवा प्रकल्पपद्धती या अध्यापनपद्धतीचा उगम त्याच्या वरील विचारसरणीतून झाला. कृती निवडताना त्या सामाजिक दृष्ट्या उपयुक्त असण्यावर त्याचा विशेष भर दिसून येतो.

### शिस्त

ड्यूयीच्या कल्पनेप्रमाणे शालेय शिस्त ही बक्षिसे किंवा शिक्षा यावर अवलंबून ठेवू नये. त्याचप्रमाणे कृत्रिम नियमांनी व भीतीच्या वातावरणाने

शाळेमध्ये शिस्त निर्माण करण्याचा प्रयत्न करू नये. बाह्य उपायांनी निर्माण केलेल्या शिस्तीपेक्षा स्वयंशिस्त ही अत्यंत महत्त्वाची आहे. वैयक्तिक समाधानासाठी व सामाजिक उपयुक्ततेसाठी जे विविध उद्योग शाळेमध्ये केले जातात, त्यांत परस्परांना मदत करण्याची इच्छा व सहकार्याची भावना असल्यास शिस्तीचे वातावरण निर्माण करता येते असे डयूयीचे मत होते. शिस्त म्हणजे निष्क्रियता हा अर्थ त्याला मान्य नाही. निरनिराळे व्यवसाय करीत असतांना शांततेचा भंग झाला तरी उद्योगामध्ये विद्यार्थ्यांचे सक्रिय, सहेतुक व संपूर्ण सहकार्य मिळाल्यास शिस्त असू शकते असे डयूयीचे मत आहे. शिस्तीसाठी विद्यार्थ्यांचे समाजीकरण झाले पाहिजे असे डयूयीचे म्हणणे आहे. असे समाजीकरण सामाजिक उपयुक्ततेचे व्यवसाय शाळेमध्ये केल्याने होत असते. व्यवसाय यशस्वीपणे केल्यास त्यांतून सहनशीलता, संयम, श्रमप्रतिष्ठा, सहकार्य, बंधुता व परस्परांबद्दल आदराची भावना या सामाजिक गुणांचा परिपोष होतो व विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनाला योग्य ते वळण किंवा शिस्त लागते.

## नैतिक शिक्षण

नीती ही शिकविता येत नाही. ती केवळ वैचारिक गोष्ट नाही. ती प्रत्यक्ष आचरणात यावी लागते. त्यामुळे नीतीचे पाठ घेऊन, गोष्टी सांगून किंवा श्लोक पाठ करून घेऊन ही अंगी बाणविता येत नाही. ती प्रत्यक्ष आचरणात येण्यासाठी निरनिराळे प्रसंग निर्माण करावे लागतात. हुकूमशाही राष्ट्रांमध्ये केवळ नीतीचे ज्ञान असेल तरी भागते. कारण शिक्षेच्या भीतीमुळे नीतिनियमांचे परिपालन होते. परंतु लोकशाही राष्ट्रांमध्ये नीती ही प्रत्यक्ष आचारणातून अंगी बाणवण्यासाठी योग्य ते व्यवसाय करावे लागतात. नीती केवळ काही व्यक्तींपुरती किंवा ठराविक काळापुरती मर्यादित असून चालत नाही. ती सार्वत्रिक असावी लागते. चोरांच्या संघटनेमध्येही त्यांच्या धंद्यापुरती विशिष्ट नीती असते; किंवा काही लोक शेजाऱ्यांशी वागताना काही नीतिनियमांचे पालन करतात. परंतु हे त्यांचे नीतीचे आचरण सार्वत्रिक असू शकत नाही. अशा प्रकारच्या नीतिमत्तेवर डयूयीने प्रखर टीका केली आहे. त्याच्या मते नीती ही समाजाशी निगडित आहे. लोकशाही समाज हा आदर्श समाज होय. त्यामुळे समाजामध्ये उच्च, नीच, गरीब, श्रीमंत, जात, धर्म, पंथ, वर्ण, लिंग यांवर आधारलेले कृत्रिम भेद असू शकत नाहीत. या कृत्रिम भेदांमुळेच विषमता माजते व विषमतेच्या पोटी सर्व अनैतिकेचा जन्म होतो. ही विषमता काढणे हे शिक्षणाचे कार्य होय.

डयूयीच्या तत्त्वज्ञानाचे विश्लेषण केल्यास आपणास असे दिसून येईल की, त्याने निरनिराळ्या शैक्षणिक कल्पनांतील द्वैत दूर करून त्यांमध्ये अभेद अथवा

अद्वैत प्रस्थापित केले. ( १ ) त्याच्या मते ज्ञान हे कृतीपासून अलग करता येत नाही. त्याचप्रमाणे अध्यापन व अध्ययन यांमध्ये द्वैत नाही. तसेच इंद्रियजन्य ज्ञान ( Sense Knowledge ) आणि वैचारिक ज्ञान (Rational Knowledge) यांतही फरक असू शकत नाही. व्यक्ती व समाज या सुद्धा दोन भिन्न गोष्टी नसून ते एकजीव झालेले घटक आहेत. द्वैताचा उगम हा समाजातील कृत्रिम भेदामुळे निर्माण झालेला आहे. समाज एकसंघ, एकजिनसी व खऱ्या लोकशाहीवर अधिष्ठित असल्यास द्वैताचे मूळ कारण नाहीसे होईल.

डयूयीची कित्येक शैक्षणिक मते क्रांतिकारक वाटतात.

### डयूयी आणि फ्रोबेल

फ्रोबेल हा गूढ अध्यात्मवादी आहे. त्याचे शैक्षणिक विचार डयूयीच्या शैक्षणिक विचारांशी फारसे मिळते जुळते नाहीत. डयूयीच्या मताप्रमाणे शिक्षणाने साधावयाचा विकास अमर्याद व सातत्याने चालणारा आहे. फ्रोबेलच्या मते विकासाला विशिष्ट मर्यादा आहेत. फ्रोबेलची गूढ शैक्षणिक प्रतीके किंवा शैक्षणिक साधने डयूयीला फारशी मान्य नाहीत. फ्रोबेलने व्यवसायांना दिलेल्या गूढ अर्थात डयूयीला फारसे तथ्य दिसत नाही. डयूयीच्या मते शैक्षणिक अनुभव हे प्रत्यक्ष जीवनाशी निगडित असले पाहिजेत. डयूयी हा प्रत्यक्ष व्यवहाराशी नाते जोडणारा तर फ्रोबेल हा अध्यात्माशी गूढगुंजन करणारा. काही बाबतींत मात्र दोघांमध्ये साम्य दिसून येते. दोघांनीही कृतियुक्त शिक्षणावर भर दिला आहे. मात्र त्यांचे दृष्टिकोन निराळे आहेत. दोघांनाही शाळेमध्ये सामाजिक सहकार्य घडवून आणावयाचे आहे. शाळा म्हणजे एक छोटेखानी समाज ही कल्पना दोघानाही मान्य आहे.

### हर्बार्ट व डयूयी

ज्ञानाला स्वतंत्र अस्तित्व आहे व ते औपचारिक पद्धतीने देता येते असे हर्बार्ट मानतो तर ज्ञान हे उद्योगाच्या अनुषंगाने उत्पन्न होते, त्याला स्वतंत्र अस्तित्व नाही असे डयूयी मानतो. अध्यापनासाठी हर्बार्टने पाच पायऱ्या दिल्या आहेत. त्या पायऱ्या डयूयीला कृत्रिम वाटतात. डयूयीच्या मते शिक्षण हे नैसर्गिक गरजेनुसार केलेली कृती, समस्या, अनुभव, ज्ञान, अनुभवांची पुनर्रचना, वर्तनात बदल या क्रमाने येत असते. हर्बार्ट आपल्या शिक्षणपद्धतीने पूर्वनियोजित ध्येयाला मान्यता देतो. डयूयीच्या मते शिक्षणाची प्रक्रिया हेच शिक्षणाचे ध्येय होय. शिक्षणापासून अलग व बाह्य असे ध्येय ठेवल्यास त्याचा काहीही उपयोग होत नाही. हर्बार्टची शिक्षणपद्धती ही शिक्षककेंद्रित

असून डयूची शिक्षणपद्धती ही बालकेंद्रित आहे. या दोघा शिक्षणतज्ज्ञांचे एका बाबतीत साम्य दिसून येते. दोघेही शिक्षणामध्ये आवड किंवा अभिरुची निर्माण करण्यावर अधिक भर देतात. मात्र डयूयीने अपेक्षिलेली आवड ही कृतीच्या किंवा उद्योगाच्या अनुषंगाने होत असते. ही आवड सामाजिक स्वरूपाची असते. हर्बार्टने अपेक्षिलेली आवड मात्र बुद्धिनिष्ठ आहे.

डयूयीच्या शिक्षणपद्धतीमध्ये मूल हे केंद्रस्थानी आहे. मुलानेच सर्व कृती करावयाच्या असतात. त्यामुळे स्वयंशिक्षणाला या पद्धतीमध्ये अतिशय महत्त्व दिले आहे. मात्र हर्बार्टच्या पद्धतीमध्ये शिक्षकाला महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. शिक्षण-प्रक्रियेमध्ये शिक्षकाने पुढाकार घेऊन निरनिराळे प्रश्न सोडवावयाचे असतात. या पद्धतीमध्ये प्रश्नांची उत्तरे स्वतः शिक्षक समजावून देतात. विद्यार्थी स्वप्रयत्नाने उत्तरे शोधण्याचा फारसा प्रयत्न करीत नाहीत. त्यामुळे हर्बार्टच्या पद्धतीमध्ये शिक्षकाच्या कृतीवर विशेष भर देण्यात आला आहे, तर डयूयीच्या शिक्षणपद्धतीमध्ये विद्यार्थ्यांच्या कृतीला प्राधान्य देण्यात आले आहे. प्रो. हॉर्ने याने म्हटल्याप्रमाणे या दोन शिक्षणतज्ज्ञांच्या पद्धती परस्पर विरोधी नसून एकमेकांस पूरक अशाच आहेत. ज्ञानग्रहणाच्या विषयांचे ज्या वेळी अध्ययन करावयाचे असेल त्या वेळी हर्बार्टच्या पद्धतीचा अधिक उपयोग होऊ शकेल. तर कौशल्य संपादन हाच ज्या वेळी अध्ययनाचा हेतू असेल त्या वेळी डयूयीची कृतियुक्त शिक्षणपद्धती उपयुक्त ठरेल. डयूयीची समस्या-पद्धती, ज्ञानविषयातही काही वेळा उपयोगी पडू शकते. त्यामुळे विषयघटकाच्या अध्यापनाची उद्दिष्टे लक्षात घेऊन योग्य त्या अध्यापनपद्धतीचा उपयोग करावा.

## डयूयी आणि वास्तववाद

व्हाइटहेड, बर्ट्रांड रसेल यांसारख्या वास्तववादी तत्त्वज्ञांच्या मताप्रमाणे प्रत्यक्षात जे जग आपणांस अनुभवावयास मिळते त्याचाच अभ्यास करणे हे शिक्षणाचे कार्य होय. निसर्गाचे, समाजाचे मूलभूत नियम व प्रत्यक्ष परिस्थितीचे आकलन करून घेऊन त्यांच्याशी मैत्री प्रस्थापित करणे हे प्रामुख्याने शिक्षणाचे कार्य होय असे वास्तववादी म्हणतात. त्यामुळे ते बुद्धीच्या विकासावर व ज्ञानग्रहणावर विशेष भर देतात. डयूयीच्या मते आहे या जगाचे केवळ ज्ञानग्रहण करून भागणार नाही, तर सामाजिक व नैसर्गिक परिस्थितीत योग्य ते परिवर्तन घडवून आणणे आवश्यक आहे. वास्तववादी विचारवंत अद्‌भुतता, निश्चितता व सामान्य नियम अशा ज्ञानग्रहणाच्या तीन पायऱ्या मानतात; तर डयूयी विचारांचा पुनःप्रत्यय घेण्यावर विशेष भर देतो. कारण केवळ विचार हा निर्जीव असून त्याचा अनुभव घेतल्यानेच तो सजीव होतो. वास्तववादी लोकांच्या मते शिक्षणाच्या

प्रक्रियेमध्ये शिक्षकाला महत्त्वाची भूमिका बजावावयाची असते. त्यामुळे शिक्षकाचा अधिकार, शालेय शिस्त यांवर ते विशेष भर देतात. ड्यूयी हा बौद्धिक शिक्षणापेक्षा व्यावसायिक शिक्षणावर भर देत असल्याकारणाने कृतियुक्त शिक्षणात स्वयंशिस्त राखली जाते असे त्याला वाटते. अध्यापनापेक्षा अध्ययनाला व शिक्षकापेक्षा विद्यार्थ्याला ड्यूयी अधिक महत्त्व देतो.

## ड्यूयी आणि अध्यात्मवाद

अध्यात्मवादी लोकांच्याप्रमाणे काही सत्य, चिरंतन व शाश्वत मूल्ये असतात. ती अपरिवर्तनीय व अनादी असतात. ड्यूयीच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे चिरंतन असे काही नाही. आजचे सत्य हे उद्याचे असत्य ठरते. ड्यूयीच्या मते, जन्म, मरण, सत्य, असत्य, जगाची उत्पत्ती, स्थिती व लय यांचा विचार करण्याच्या फंदात तत्त्वज्ञान्याने पडू नये. तत्त्वज्ञानामध्ये सामाजिक संघर्ष, शास्त्रीय व औद्योगिक प्रगती, लोकशाही, त्यांचे समाजावर होणारे परिणाम यांचाच विचार करावा. ड्यूयीच्या मते शिक्षण म्हणजे विकास होय. अध्यात्मवादी म्हणतात हा विकास परमेश्वरप्राप्तीच्या दिशेनेच व्हावयास पाहिजे. अध्यात्मवादी शिक्षणप्रक्रियेमध्ये शिक्षकाला महत्त्वाची भूमिका देतात. शिक्षणप्रक्रियेला चालना देण्यास शिक्षकाला महत्त्वाची भूमिका बजवावयाची असते असे ते मानतात. शिक्षणामध्ये अनुभवांची पुनर्रचना करणे यास ड्यूयी अधिक महत्त्व देतो तर व्यक्तिमत्त्वास अध्यात्मवादी अधिक महत्त्व देतात. अध्यात्मवादी व्यक्तीला परमेश्वराचा अंश मानून शिक्षणाने परमेश्वराशी एकरूपता, समीपता व सायुज्यता आणण्याचा प्रयत्न करतात. अनंत, अव्यक्त, अचिंत्य या शब्दांपेक्षा ड्यूयीला समाज व समाजाशी होणारी एकरूपता अधिक प्रिय आहे.

## ड्यूयी आणि नवबुद्धिवाद

ड्यूयीच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानावर कडक टीका करणाऱ्यांमध्ये शिकागो विश्वविद्यालयाचे कुलगुरु रॉबर्ट हचिन्स आणि त्याच विश्वविद्यालयातील प्राध्यापक ॲडलर यांचा समावेश प्रामुख्याने करण्यात येतो. त्यांनी मांडलेल्या शैक्षणिक तत्त्वप्रणालीला नवबुद्धिवाद असे संबोधिण्यात येते. ते शिक्षणामध्ये बुद्धीच्या विकासाला अधिक प्राधान्य देतात. ड्यूयीने केलेले शिक्षणाचे व्यवसायीकरण त्यांना पसंत नाही. ज्ञानसाधना आणि बुद्धिविकास यांवर शिक्षणात भर न दिला गेल्यास समाजाची प्रगती रोखली जाईल असे त्यांना वाटते. त्यांच्या मते शिक्षणाचे ध्येय सापेक्ष व सतत बदलणारे ठेवता येणार नाही. केवळ भौतिकतेकडे लक्ष देऊन आपले भागणार नाही. भौतिकतेपलीकडे काही चित्‌शक्ती आहेत व त्यांचाही

विचार आपणांस करावयास हवा. निसर्गाच्या व समाजाच्या अभ्यासाबरोबरच स्वतःचे ज्ञान मिळविणे आवश्यक आहे. केवळ व्यावसायिक शिक्षणावर भर दिल्यास समाजाची नीतिमत्ता व चारित्र्य रसातळास जाईल. औद्योगिक शिक्षणाला बौद्धिक व भावनिक, आध्यात्मिक शिक्षणाची जोड दिली गेली पाहिजे. त्यामुळे शिक्षणामध्ये साहित्य, व्याकरण, तर्कशास्त्र यांचा अंतर्भाव करणे आवश्यक आहे.

## ड्यूयीच्या शिक्षणपद्धतीस पडलेली मुरड

(१) व्यावसायिक शिक्षणाबरोबरच बौद्धिक व भावनिक शिक्षणाचे महत्त्व लोकांना पटू लागले आहे.

(२) शिक्षणामध्ये काही निश्चित स्वरूपाची उद्दिष्टे असली पाहिजेत असे आता विचारवंत म्हणू लागले आहेत.

(३) सामाजिक विचाराबरोबरच व्यक्तीचाही विचार केला पाहिजे असे आता तत्त्वज्ञ म्हणू लागले आहेत. ड्यूयीच्या मताप्रमाणे व्यक्ती ही सामाजिक असली तरी तिला व्यक्ती म्हणून स्वतंत्र जीवन व अस्तित्व आहे. शिक्षणामध्ये आध्यात्मिक व धार्मिक मूल्यांचा विचार करणे भाग आहे असे आता शिक्षणशास्त्रज्ञांना वाटू लागले आहे. कारण भौतिक समृद्धतेमध्ये मनाला शांतता प्राप्त करून देण्यासाठी काही शाश्वत व चिरंतन मूल्यांचा आधार घेणे आवश्यक आहे. ड्यूयीच्या मताप्रमाणे शालेय अभ्यासक्रम हा मुलांच्या गरजांतून निर्माण करावयाचा असतो. तो अत्यंत लवचिक स्वरूपाचा रहातो. हे तत्त्व आता प्रत्यक्ष व्यवहाराच्या निकषावर कमकुवत ठरू लागले आहे. त्यामुळे पूर्वनियोजित अभ्यासक्रम तयार करण्यावर आता विशेष भर अमेरिकेमध्येही देण्यात येत आहे.

# मॉन्टेसोरी

| | |
|---|---|
| जन्म | १८७० |
| मृत्यू | १९५२ |

मादाम मराया मॉन्टेसोरी यांचा जन्म सन १८७० साली इटलीमध्ये एका प्रतिष्ठित कुटुंबात झाला. लहानपणी त्यांना उत्तम शिक्षण देण्याची व्यवस्था केली होती. रोम येथील विश्वविद्यालयातून त्यांनी वैद्यकीय पदवी संपादन केली. मादाम मॉन्टेसोरी अत्यंत करारी, दीर्घोद्योगी व दृढनिश्चयी होत्या. त्यांचा उत्साह व कार्यशक्ती आश्चर्यकारक होती. मानसिकदृष्ट्या मागास असलेल्या मुलांना वैद्यकीय उपचार करण्याचे काम त्यांच्याकडे सोपविण्यात आले. त्या वेळी शारीरिक व मानसिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या लोकांवर एकाच पद्धतीने उपचार केले जात असत. आपल्याकडे सोपविण्यात आलेल्या कामात त्यांनी अत्यंत मनःपूर्वक लक्ष घालून त्या मुलांना सुधारण्याचा शिकस्तीचा प्रयत्न केला. त्यात त्यांना असे दिसून आले की, मानसिकदृष्ट्या मागास असलेल्या मुलांच्या बाबतीत औषधोपचाराचा काहीही उपयोग होऊ शकत नाही. मुले-मुली मानसिकदृष्ट्या मागास राहतात याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांच्या ज्ञानेंद्रियांचा विकास जसा व्हावा तसा झालेला नसतो. अशा प्रकारच्या मुलांच्या ज्ञानेंद्रियांना योग्य ते शिक्षण दिले गेल्यास त्यांचा मंदबुद्धिपणा नाहीसा होतो व ती इतर मुलांच्याप्रमाणे निरनिराळ्या

विषयांचा अभ्यास करू शकतात. ज्ञानेंद्रियशिक्षणाचे तत्त्व इतर मुलांच्या बाबतीत तिने वापरून पाहिले. त्यामुळे त्यांच्या अध्ययनात तिला आश्चर्यकारक प्रगती दिसून आली. यानंतर तिचा ओढा वैद्यकीय पेशापेक्षा शिक्षणाकडेच अधिक लागला.

शारीरिक व मानसिकदृष्टया दुर्बल असलेल्या दुर्दैवी मुलांच्या शिक्षणाची शासनाने योग्य सोय करावी म्हणून तिने लोकमत तयार करण्यासाठी अनेक ठिकाणी व्याख्याने दिली. तिच्या प्रयत्नाला यश येऊन त्यांच्यासाठी काही खास शाळाही काढण्यात आल्या. या शाळांत शिकविण्यासाठी तिने निरनिराळ्या अध्यापनपद्धती शोधून काढल्या. अभ्यासक्रमामध्ये जरूर ते फेरबदल केले व अध्ययन-अध्यापनात उपयोगी पडणाऱ्या साहित्याची निर्मिती केली. सन १९०० साली शिक्षणाचा सखोल अभ्यास करण्यासाठी तिने या शाळांची जबाबदारी सोडली व मानसशास्त्र व मानववंशशास्त्र या विषयांचा अभ्यास करण्यासाठी रोम येथील विश्वविद्यालयात आपले नाव दाखल केले. मागास मुलांच्या बाबतीत वापरलेले अध्यापनतंत्र सामान्य मुलांच्या शिक्षणातही प्रकर्षाने उपयोगी पडते याबद्दल तिची खात्री होती. परंतु या सर्व नवविचारांना निश्चित व निर्णायक स्वरूप देण्यासाठी तिने सात वर्षेपर्यंत या विश्वविद्यालयात संशोधन केले.

सन १९०७ साली तिच्या दृष्टीने एक अनुकूल घटना घडली. एका परोपकारी संघटनेतर्फे रोम शहरात काही चाळी बांधण्यात आल्या. या प्रत्येक चाळीत एक शाळा असावी व त्यामध्ये तीन ते सात वयोमर्यादेतील मुलामुलींचे शिक्षण व्हावे अशी व्यवस्थापकांची मनीषा होती. ही संधी मॉंटेसोरीला उपयुक्त अशीच वाटली. या शाळासंबंधीची एक योजना तिने तयार केली व त्या चालविण्याची जबाबदारी स्वत: स्वीकारली. तिने चालविलेल्या शाळा व त्यात मिळणारे शिक्षण याबद्दल जनतेने बरेच कौतुक केले. परंतु लवकरच सन १९११ साली या शाळांच्या नेतृत्वाचा तिने त्याग केला. जुन्या शिक्षणपद्धतीत बदल करून नव्या समस्या सोडविण्यासाठी नवीन शैक्षणिक तत्त्वांचे संशोधन करावे हा त्यामागील हेतू होता. यासाठी त्या शैक्षणिक ग्रंथांच्या लेखनाकडे वळल्या. निरनिराळ्या देशात जाऊन त्यांनी असंख्य व्याख्याने दिली. आपल्या पद्धतीने शाळा कशा चालवाव्यात याची प्रात्यक्षिके दाखविली. त्यांनी अमेरिका, युरोप, स्वित्झरलंड इत्यादी देशांत मॉंटेसोरी समित्या स्थापन केल्या व शिक्षणाच्या नवीन तत्त्वज्ञानाचा अभ्यास करावा असे आवाहन केले. मुलांबद्दल वाटत असलेल्या नितान्त प्रेमामुळेच व त्यांच्या शिक्षणाची सुयोग्य सोय व्हावी म्हणून त्यानी जगाच्या कोनाकोपऱ्यांत प्रवास केला व ठिकठिकाणी बालकगृहे स्थापन

केली. सन १९४९ ते १९५१ या काळात त्यांनी आपल्या देशात वास्तव्य केले होते. या मुदतीत त्यांनी अनेक प्रशिक्षणसत्रे चालविली. शिक्षक-शिक्षिकांना मार्गदर्शन केले व आपल्या पद्धतीने शिक्षण देणाऱ्या पूर्वप्राथमिक शाळांची स्थापना केली.

## शैक्षणिक तत्त्वज्ञान

डॉ. मॅांटेसोरी या वैद्यक शास्त्राच्या पदवीधर असल्यामुळे त्यांनी आपले शिक्षणविषयक तत्त्वज्ञान प्रत्यक्ष प्रयोगावर व विद्वन्मान्य शास्त्रीय पद्धतीवर आधारलेले आहे. पारंपरिक प्रथेला बाजूला ठेवून शिक्षणाकडे शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहण्याचा आग्रह त्यांनी आपल्या शैक्षणिक प्रतिपादनामध्ये केला आहे. व्यक्तीच्या शिक्षणामध्ये पूर्वप्राथमिक शिक्षणाला अत्यंत महत्त्व आहे हे त्यांनी जाणले. सर्व शिक्षणाचा पाया म्हणजे व्यक्तीचे तीन ते सात या वयोमर्यादेतील शिक्षण आहे अशी त्यांची श्रद्धा होती. म्हणून या वयातील मुलामुलींच्या शिक्षणासाठी त्यांनी एक वैशिष्ट्यपूर्ण व मानसशास्त्रीय पायावर आधारलेली शिक्षणपद्धती प्रतिपादिली. त्यामुळे फ्रोबेलप्रमाणेच त्यांचे नाव शिक्षणाच्या इतिहासामध्ये अजरामर झाले आहे. त्यांच्या शिक्षणविषयक तत्त्वप्रणालीची काही वैशिष्टये खाली दिली आहेत.

### १. शिक्षणाचे उद्दिष्ट

शिक्षणाचे ध्येय व्यक्तीच्या नैसर्गिक विकासास मदत करणे हे होय. व्यक्तीचा विकास हा आंतरिक शक्तीनुसार होत असतो. या विकासाला अनुकूल वातावरण निर्माण करणे हे शिक्षणाचे काम आहे "Education is the active help given to the normal expansion of the life of the child." कोणतीही व्यक्ती ही दुसऱ्या व्यक्तीप्रमाणे नसते. तिच्यामध्ये ज्याप्रमाणे काही शारीरिक फरक दिसून येतात त्याचप्रमाणे मानसिक वैशिष्ट्यांच्या बाबतीत कितीतरी भिन्नता दिसून येते. प्रत्येक मुलाच्या मानसिक शक्ती भिन्न प्रकारच्या व भिन्न विकासाच्या असतात. अशा या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्व असलेल्या विद्यार्थ्याला वैयक्तिकरीत्याच मार्गदर्शन केले पाहिजे. सामुदायिक शिक्षणामुळे व्यक्तिवैचित्र्याच्या विकासाला योग्य वातावरण मिळत नाही. शिक्षणाने ज्याप्रमाणे व्यक्तींच्या सुप्तशक्तींच्या विकासास मार्गदर्शन करावयाचे असते, त्याचप्रमाणे सभोवतालच्या परिसराशी समरस होण्याचे कार्यही शिक्षणाने व्यक्तीला साधावयाचे असते.

"She wanted that each child should develop from within and not from without. Education should guide

the process of unfolding the hidden powers of the child in such a way that he becomes what he is destined to become."

## २. व्यक्तिमत्त्व

प्रत्येक मुलाला आपल्या स्वतःच्या अशा काही वैशिष्ट्यपूर्ण आवडी-निवडी, सहजप्रवृत्ती, सुप्तशक्ती व परमेश्वरी देणग्या असतात. त्यामुळे त्याचे स्वतःचे असे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असते. या व्यक्तिमत्त्वाचा विकास त्याच्या स्वतःच्या गतीने व वैशिष्ट्यांनुसार होऊ दिला पाहिजे. " Thc child is the body which grows and soul which develops. Such a mysterious thing should neither be marred nor stiffled." यासाठी प्रत्येक मुलाच्या विकासासाठी योग्य असे अनुकूल वातावरण निर्माण केले पाहिजे. प्रत्येक मुलाची शारीरिक व मानसिक वैशिष्ट्ये काय आहेत याची शिक्षकाने ओळख करून घेतली पाहिजे.

## ३. ज्ञानेंद्रियांचे शिक्षण

ज्ञानग्रहणाची सर्वांत महत्त्वाची साधने म्हणजे ज्ञानेंद्रिये होत. शिक्षणामध्ये ज्ञानेंद्रियांचा अधिकाधिक उपयोग करून घेतला पाहिजे. ज्ञानेंद्रियांच्या विकासाला योग्य संधी दिली पाहिजे. रूसो व फ्रोबेल यांच्याप्रमाणेच ज्ञानेंद्रिय-शिक्षणावर डॉ. मॉंटेसोरी यांनी विशेष भर दिला. मुले मागासलेली राहतात किंवा मंदबुद्धीची दिसून येतात याचे कारण म्हणजे त्यांच्या ज्ञानेंद्रियांचा योग्य त्या प्रमाणात विकास झालेले नसतो. त्यासाठी त्यांना अनुकूल परिस्थिती किंवा साधने दुर्दैवाने उपलब्ध झालेली नसतात. वयाच्या ३ ते ७ या कालात मुलामुलींची ज्ञानेंद्रिये अत्यंत कार्यक्षम असल्याचे दिसून येते. त्यांचा योग्य दिशेने वापर न केल्यास त्यांची कार्यशक्ती गंजून जाते व कालांतराने शिक्षणाच्या दृष्टीने ती निकामी बनतात. या वयोमानात निरनिराळे टप्पे पाडून ज्ञानेंद्रियांच्या शिक्षणासाठी योग्य अशी साधनसामग्री डॉ. मॉंटेसोरी यांनी तयार केली. प्रत्येक ज्ञानेंद्रियाचा विकास हा व्यक्तीने स्वतःच करावयाचा असल्याने योग्य त्या साधनसामग्रीचा वापर प्रत्येक व्यक्तीने स्वतःच करावयास हवा. मुलांचे पहाण्याचे किंवा ऐकण्याचे कार्य शिक्षक करू शकणार नाहीत. ते त्यांचे त्यांनीच केले पाहिजे. शिक्षकांचे काम त्यांच्या विकासासाठी योग्य अशी साधनसामग्री पुरविणे येवढेच आहे. ज्ञानेंद्रियांच्या विकासामुळे व त्यांची कार्यक्षमता वाढल्यावर इतर विषयांचे शिक्षणही सुलभ होईल असे त्यांचे मत होते.

### ४. स्वयंशिक्षण

अध्ययनामध्ये स्वयंशिक्षण ही एक उत्कृष्ट पद्धती असून त्यामुळे मुले स्वतःच्या गतीप्रमाणे शिकू शकतात. स्वयंशिक्षणात मुलाला निरनिराळ्या विषयांचे ज्ञान जरूर तेव्हा जरूर त्या प्रमाणात मिळते. अशा प्रकारे मिळणाऱ्या ज्ञानाला आगळे महत्त्व असते. ते ज्ञान विद्यार्थ्यांच्या जीवनात उपयोगी पडून चिरकाल टिकणारे असते. स्वतः शिकत असताना मुले काही वेळा चुका करण्याचा संभव असतो. परंतु त्यांना योग्य ते शैक्षणिक साहित्य दिल्यास ती स्वतःच्या चुका स्वतःच सुधारू शकतात. मॉंटेसोरींनी तयार केलेली शैक्षणिक साधने इतकी उपयुक्त आहेत की, त्यांचा विशिष्ट क्रम पाळल्यास मंदबुद्धीची मुलेही स्वप्रयत्नाने शिकू शकतात. ही शैक्षणिक साधने मानसशास्त्रीय तत्त्वांवर आधारलेली आहेत. ज्ञानग्रहणाचा मानसशास्त्रीय क्रम साहचर्य ( Association ), ओळख ( Recognition ) आणि स्मरण ( Recall ) असा आहे.

### ५. बालस्वातंत्र्य

विद्यार्थ्यांचे स्वयंशिक्षण योग्यरीतीने व्हावयाचे असल्यास आणि त्यांच्या सर्व सुप्तशक्तींचा भरपूर प्रमाणात विकास व्हावयाचा असल्यास, त्यांना जास्तीत जास्त स्वातंत्र्य देण्यात आले पाहिजे. दडपलेल्या मनःस्थितीमध्ये, बंधनांच्या व भीतीच्या वातावरणात विद्यार्थ्यांचा विकास होऊ शकणार नाही. म्हणून मॉंटेसोरीशाळेतील शिक्षिका विद्यार्थ्यांना कोटल्याही प्रकारे अमुक एक काम करा अशी आज्ञा करीत नाहीत. या शाळेमध्ये बालस्वातंत्र्याला मर्यादा एकच ती म्हणजे इतरांच्या स्वातंत्र्याची. आपल्याप्रमाणेच इतर मुलांनाही आपल्या मनाप्रमाणेच काम करण्याची, खेळ खेळण्याची मोकळीक असली पाहिजे, याची जाणीव प्रत्येक मुलाच्या मनामध्ये असली म्हणजे खरी शिस्त राहते. शिक्षिकेचे काम प्रत्येक व्यक्तीच्या निरीक्षणाचे व प्रत्येकाचा विकास योग्य मार्गाने होत आहे की नाही हे पाहण्याचे असले, तरी सुद्धा तिने बालस्वातंत्र्याच्या आड येता उपयोगी नाही.

### मॉंटेसोरी शाळा

पूर्वप्राथमिक शिक्षणास अनुलक्षून निर्माण केलेल्या आपल्या शाळेला डॉ. मॉंटेसोरी यांनी ‘ Children's House ’ : ‘ बालगृह ’ असे नाव दिले आहे. या वयातील मुलामुलींच्या शाळेची फ्रोबेलची कल्पना एका सुंदर बागेवर आधारलेली आहे. म्हणून तो आपल्या शाळेला Children's Garden किंवा Kindergarten असे नामाभिधान देतो. मॉंटेसोरी यांच्या कल्पनेप्रमाणे घर व शाळा येथील वातावरणात बिलकूल फरक असता कामा नये. शाळेमध्येसुद्धा

घरातील प्रेमळपणा, आपुलकी, मोकळीक या गोष्टी असल्या पाहिजेत. तेथे कोणत्याही प्रकारे भीतीचे वा परकेपणाचे वातावरण असता उपयोगी नाही. तीन ते सात या वयातील मुले अद्याप बाह्य जगाशी समरस झालेली नसतात. त्यांना सामाजिक नीतिनियमांची जाणीव नसते. त्यांचे सर्व शिक्षण म्हणजे सुप्त शक्तींचा विकास, घरच्या प्रेमळ वातावरणामध्येच झाला पाहिजे हे कोणीही मान्य करील. मॉंटेसोरी शाळेच्या सभोवती एखादी सुंदरशी बाग असावी, त्यामध्ये विविध रंगांची फुले बहरावीत, मुलांच्या स्वच्छंदी क्रियांसाठी व विविध खेळ खेळण्यासाठी त्यांना मोकळी जागा मिळावी. बागेच्या परिसरात मुलांचे मन प्रफुल्लित होऊन त्यांच्या आत्मविकासाला प्रेरणा मिळते. शालागृहात अनेक खोल्या असल्या पाहिजेत. निरनिराळ्या खोल्यांमध्ये विद्यार्थ्यांना विविध उद्योग करण्यासाठी जरूर ते साहित्य असले पाहिजे. एका खोलीचा उपयोग अभ्यासिका म्हणून, तर दुसरीचा उपयोग जेवणघर म्हणून, तिसरीचा उपयोग रंजनाच्या कार्यक्रमासाठी, तर चौथीचा उपयोग श्रमानुभवासाठी करण्यात येतो. विद्यार्थ्यांना विश्रांती घ्यावयाची असल्यास एखादी खोली ठरवून ठेवलेली असते. शाळेला निश्चित असे वेळापत्रक नसते. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसार खेळ किंवा कामे करावयाची असतात. काम पूर्ण झाल्यावर बक्षिसे मिळत नाहीत, की काम अपूर्ण राहिल्यास शिक्षाही होत नाही. एवढे मात्र खरे की, काम झाल्याचा आनंद काम करणाऱ्याला होतोच.

थोडा वेळ सर्व खेळ व व्यवसाय सोडून सर्व मुलांनी अगदी शांत व स्तब्ध बसावे अशी सूचना घंटानादाने मध्यंतरी दिली जाते. तेव्हा संचालिका प्रत्येक मुलाचे नांव वाचते, ते ऐकून ते मूल मुकाट्याने तिच्या समोर बसते. अशी सारी मुले बसली म्हणजे जरूर ती माहिती सांगण्यात येते. पुन्हा घंटा वाजते आणि मुले आपापल्या उद्योगाला जातात. हा शांततेचा काल फार उपयुक्त असतो. त्यामुळे मुलांना विश्रांती मिळते, शिस्त लागते व अध्ययनासंबंधी जरूर त्या सूचना मिळतात.

## अध्यापनपद्धती

मॉंटेसोरींच्या अध्यापन-पद्धतीमध्ये तीन गोष्टींवर विशेष भर देण्यात आला आहे.

१. **जीवनप्रसंगांची अनुभूती**—यामध्ये योग्य वेळी नखे काढणे, हातपाय धुणे, दात घासणे, कपड्यांची काळजी घेणे, बटणे लावणे इत्यादी क्रिया करीत असताना विद्यार्थी जीवनावश्यक ज्ञान मिळवितात. वर्गातील शैक्षणिक साहित्य आवाज न करता घेणे व नीटनेटके ठेवणे या गोष्टींचीही त्यांना सवय होते.

एकमेकांशी वर्गामध्ये कसे वागावे, जिना चढता-उतरताना कोणती काळजी घ्यावी इत्यादी गोष्टी विद्यार्थी प्रत्यक्ष जीवनप्रसंगांतून शिकतात.

२. **शैक्षणिक साहित्याच्या साह्याने ज्ञानेंद्रिय-शिक्षण**— सर्व शिक्षणाचा पाया म्हणजे ज्ञानेंद्रियांचा विकास होय. पंचज्ञानेंद्रियांचा विकास करण्यासाठी काही स्वतंत्र योजना व उपयुक्त साहित्य हवे. प्रत्येक ज्ञानेंद्रियाचा विकास विशिष्ट प्रमाणात व विशिष्ट रीतीने होत असतो. त्यासाठी उपयुक्त साहित्य शिक्षकाजवळ असले पाहिजे. श्रवणेंद्रियाचा विकास शांत वातावरणाप्रमाणे अंधारातही करण्याची योजना असावी.

३. नेत्रेंद्रियाच्या विकासासाठी लाकडी लंबगोल, विविध आकारांचे ठोकळे इत्यादी साहित्याचा उपयोग करावा.

४. आकारमानाची कल्पना येण्यासाठी भूमितीच्या साहित्याचे नमुने विद्यार्थ्यांना द्यावेत. वजनाची कल्पना येण्यासाठी निरनिराळ्या आकारांचे लाकडी तुकडे द्यावेत. स्पर्शेंद्रियाचा विकास होण्यासाठी अत्यंत गुळगुळीत वस्तूपासून अत्यंत खरबरीत असलेल्या नानाविध वस्तू विद्यार्थ्यांना अनुभवावयास द्याव्यात. स्पर्शेंद्रियाच्या साह्यानेच उष्ण व थंड पाण्याची विद्यार्थ्यांना कल्पना यावी. पेटीमध्ये ठेवलेल्या विविध वस्तूंच्या आवाजावरून त्या वस्तूंची कल्पना विद्यार्थ्यांना देता यावी. सूक्ष्म रंगभेद ओळखण्यासाठी विद्यार्थ्यांना चौसष्ट प्रकारच्या रंगांची कार्डे किंवा लोकरीचे नमुने देण्यात यावेत. अशा रीतीने ज्ञानेंद्रियविकासासाठी शिक्षकाने जरूर त्या शैक्षणिक साहित्याचा कल्पकतेने उपयोग करावा. साहित्य वापरताना नावावरून साहित्य शोधता येणे किंवा साहित्यावरून त्याचे नाव निश्चित करणे, त्याचप्रमाणे साहित्याच्या नावाचे वाचन करणे या शैक्षणिक क्रिया करून घ्याव्या.

## मॉंटेसोरी पद्धतीची काही ठळक वैशिष्ट्ये

१. शिक्षणात प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष दिले पाहिजे. कारण शिकणे ही वैयक्तिक क्रिया आहे.

२. बुद्धीपेक्षा ज्ञानेंद्रियांच्या शिक्षणावर विशेष भर दिला पाहिजे.

३. पंचज्ञानेंद्रियांमध्ये स्पर्शेंद्रिय अधिक शिक्षणक्षम आहे. म्हणून शिक्षणाच्या प्राथमिक अवस्थेमध्ये त्याच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. नाहीतर त्याची संवेदनक्षमता कमी होईल.

४. विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक विकासाला सक्रिय व योजनाबद्ध मदत केली पाहिजे.

५. विद्यार्थ्यांना जे शैक्षणिक अनुभव द्यावयाचे ते त्यांच्या शारीरिक व मानसिक विकासानुरूप असले पाहिजेत.

६. विद्यार्थ्यांना द्यावयाच्या ज्ञानाची त्यांना जिज्ञासा व गरज वाटली पाहिजे. प्रत्येक शिक्षकाने अशा मानसशास्त्रीय क्षणाची वाट पाहिली पाहिजे.

७. शाळेसाठी साचेबंद वेळापत्रक नसावे.

८. विद्यार्थ्यांना बक्षिसाची लालूच दाखवू नये. आत्मविकास हेच बक्षीस होय.

९. विद्यार्थ्यांनी आपल्या चुका शैक्षणिक साहित्याच्या साह्याने सुधाराव्यात. त्यासाठी शिक्षकांची मदत घेऊ नये.

१०. अध्यापनापेक्षा अध्ययन महत्त्वाचे आहे.

११. सर्व शिस्तीच्या प्रकारांमध्ये स्वयंशिस्त अधिक महत्त्वाची आहे. अशा शिस्तीमध्ये गैरशिस्तीच्या होणाऱ्या परिणामांची जाणीव विद्यार्थ्यांना असते.

१२. शाळेमध्ये विद्यार्थ्यांना संपूर्ण स्वातंत्र्य असावे. त्यांच्या उत्स्फूर्त क्रियांना भरपूर वाव असावा.

१३. शाळेच्या वेळेमध्ये काही शांतताकाल असावा. अशा वेळी घंटानाद होताच विद्यार्थ्यांनी आपले सर्व कार्यक्रम व खेळ सोडून अगदी शांत व निःशब्द बसावे. पुन्हा घंटानाद होताच विद्यार्थ्यांनी आपापल्या कामाला सुरुवात करावी. या शांततेच्या कालामुळे विद्यार्थ्यांना जरूर ती विश्रांती मिळून शिस्त लागते.

### मॉंटेसोरी शाळेतील काही व्यवसाय

या शिक्षणपद्धतीत विद्यार्थ्यांना जीवनाला उपयोगी पडतील असे व्यवसाय दिले जातात. नखे कापणे, तोंड धुणे, दात घासणे, केस विंचरणे, पॉलिश करणे, कपडे धुणे, बटणे लावणे, खोली झाडणे, लाकडी सामानावरील धुरळा झटकणे, लाकडी सामान व्यवस्थित लावणे इत्यादी व्यवसाय या शाळेत विद्यार्थ्यांना करता येतात. आपली स्वतःची वैयक्तिक कामे स्वतःलाच कशी करता येतील याचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे हा त्यामागील हेतू आहे.

ज्ञानेंद्रियांच्या विकासासाठी निरनिराळ्या प्रकारचे शैक्षणिक साहित्य तयार करण्यात आले आहे. स्पर्शज्ञान वाढीस लागावे म्हणून निरनिराळ्या तपमानांचे पाणी, खरबरीत व गुळगुळीत वस्तू यासारखे साहित्य विद्यार्थ्यांना हाताळावयास दिले जाते. निरनिराळ्या तीव्रतेच्या घास-कागदाचा उपयोगही योग्य त्या वेळी करण्यात येतो. श्रवणेंद्रिय-शिक्षणासाठी निरनिराळ्या प्रकारचे आवाज ऐकू येऊ शकणारे डबे तयार करण्यात येतात. ठोकळे, गोल, लंबवर्तुळाकार वस्तू, नाणी, लोकर, पेट्या, घंटा, सळया इत्यादींचा उपयोग वजन, रंग यांचे ज्ञान करून घेण्याकडे होतो. ज्ञानेंद्रियांच्या विकासात मदत करणाऱ्या या साहित्याचा काही विशिष्ट क्रम लावण्यात येतो. त्या क्रमाने या साहित्याचा वापर व्हावा अशी डॉ. मॉंटेसोरी यांची इच्छा आहे.

शाळेमध्ये लेखन, वाचन व गणित या विषयांचे ज्ञान मिळण्याचीही सोय केलेली असते. ज्ञानेंद्रियांचा विकास योग्य त्या प्रमाणात झाल्यानंतर प्रथम लेखनाच्या अध्ययनास सुरुवात होते. वाचण्याच्या पूर्वी लेखन शिकवावे कारण ते सुलभ असते असे डॉ. मॉंटेसोरी यांचे मत आहे. लेखनासाठी सॅंडपेपरची मुळाक्षरे एका कार्डबोर्डवर चिकटविलेली असतात. या अक्षरांवरून प्रथम मुलांनी बोटे फिरवावयाची. नंतर त्यांना पेन्सिलिने गिरविण्यास सांगण्यात येते. अशा रीतीने बराच सराव झाल्यावर हीच क्रिया मुलांना डोळे मिटून करावयास सांगितली जाते. पेन्सिल धरण्यासाठी काही व्यवसाय सुचविण्यात आले आहेत. आपल्या पाटीवर पट्टीच्या साह्याने एकात एक अशा दोन चौकटी काढावयाच्या व त्या दोन चौकटीमध्ये पेन्सिल न उचलता विद्यार्थ्यांनी उभ्या, आडव्या, तिरक्या, गोल रेषा काढावयाच्या. त्यामुळे पेन्सिल धरण्याचा योग्य तो सराव मुलांना होईल अशी अपेक्षा आहे. लेखनानंतर विद्यार्थ्यांना प्रथम अक्षरांचा व नंतर शब्दांचा उच्चार करावयास सांगावयाचा असतो.

अशा प्रकारे तोंडी काम भरपूर प्रमाणात झाल्यावर वाचनाची सुरुवात होते. भाषिक खुणांचा अर्थबोध होऊन उच्चार करणे म्हणजे खरे वाचन होय. अर्थबोध न होता केले जाणारे वाचन म्हणजे छपाईप्रमाणे भुंकणेच होय. “Reading is the interpretation of an idea from the written signs and not merely barking at the prints.” यासाठी एखाद्या पुठ्ठिपत्राच्या तुकड्यावर मोठ्या अक्षरांत शब्द वा वाक्ये लिहून त्यांचा वापर वाचनासाठी करण्यात येतो. काही कार्डांवर वस्तूंची नावे लिहिली जातात. विद्यार्थ्याने एखादे कार्ड निवडावयाचे व ते कार्ड ज्या वस्तूचे असेल त्या वस्तूजवळ ठेवावयाचे. दुसऱ्या काही कार्डांवर छोटी कामे लिहिलेली असतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ६८४२५. निबंध ९२९३. ९७/३१८



एखाद्या मुलाने अशा प्रकारचे एक कार्ड निवडले व त्यावर ' दार उघड ' असे लिहिले असल्यास त्याने दार उघडण्याची कृती करावयाची. वाचनाचा सराव होण्यासाठी त्याची गती वाढविण्यात येते.

## गणित

लिहिण्यावाचण्याचा सराव झाल्यावर गणिताची प्रमुख चार कृत्ये शिकविण्यात येतात. मात्र या बाबतीत डॉ. मॉंटेसोरी यांनी सुचविलेल्या पद्धतीत काहीही खास वैशिष्ट्ये दिसत नाहीत. रंगीत मणी, रिळे, शंख, शिंपले, गोट्यांची चौकट, पेट्या, सळयांची चौकट इत्यादी साहित्याचा वापर करण्यास सुचविले आहे. वनस्पती व पशुपक्षी यांच्याबद्दल विद्यार्थ्यांच्या मनामध्ये सहानुभूती व जिव्हाळा निर्माण व्हावा म्हणून बागेतील रोपांची निगा कशी राखावी व छोट्या पाळीव प्राण्यांची काळजी कशी घ्यावी याचेही शिक्षण दिले जाते.

## शिक्षकाचे स्थान

मॉंटेसोरी शाळेतील शिक्षिकेची भूमिका केवळ मार्गदर्शिकेची आहे. या शाळेत वर्गपद्धत नसल्यामुळे व प्रत्येक विद्यार्थी आपल्या आवडीप्रमाणे व स्वतःच्या गतीनुसार निरनिराळे व्यवसाय करीत असल्यामुळे, तिने बालस्वातंत्र्याला ज्यामुळे मर्यादा किंवा मुरड घातली जाईल असे काहीही करावयाचे नाही. शिक्षिकेला बालमानसशास्त्राचा अभ्यास करावयास हवा. तिचा अंगचा सद्‌गुण तिच्या भाषणात दिसून न येता तिने पाळलेल्या मुग्धतेत व केलेल्या मुलांच्या निरीक्षणात दिसून आला पाहिजे. डॉक्टर, शास्त्रज्ञ व धर्मगुरू यांची एकत्रित भूमिका तिला वठवावयाची असते. बालविद्यार्थ्यांच्याबद्दल तिच्या मनात आत्यंतिक प्रेम व सहानुभूती असली पाहिजे. प्रत्येक विद्यार्थी विशिष्ट वेळी विशिष्ट क्रिया करतो, कारण त्या क्षणाला ती क्रिया करण्याची त्याला गरज भासते. हा गरजेचा मानसशास्त्रीय क्षण शिक्षिकेला बिनचूकपणे टिपता आला पाहिजे. कारण त्या क्षणाचे मानसशास्त्रीय महत्त्व व्यक्तीविकासाच्या दृष्टीने अतिशय आहे. शाळेमध्ये अध्यापनापेक्षा विद्यार्थ्यांच्या अध्ययनासच अधिक महत्त्व आहे हे तिने जाणले पाहिजे.

## शिक्षणाच्या पायऱ्या

आपल्या पूर्वप्राथमिक शाळेच्या मॉंटेसोरीने चार पायऱ्या किंवा इयत्ता कल्पिल्या आहेत. मात्र याचा अर्थ असा नव्हे की, विद्यार्थ्यांचे चार वेगळे गट करण्यात आलेले असतात. विकासाच्या विशिष्ट अवस्थेनुसार हे गट मानण्यात आले आहेत.

## शिक्षणाच्या अवस्था

**अवस्था १ ली**— या अवस्थेत मूल नुकतेच शाळेत आलेले असल्या-कारणाने त्याला निरनिराळे सोपे व्यवसाय देण्यात येतात. उदा० छोटी बाके लावणे, बटन व हूक बसविणे, ठोकळ्यांच्या पेटीमध्ये निरनिराळ्या भोकांतून लंबगोल बसविणे ( दट्ट्यापेटीचा वापर ). एकाच उंचीचे पण भिन्न व्यासांचे लंबगोल क्रमाने उभे करणे. कमी उंचीचे व कमी व्यासाचे लंबगोल उतरत्या क्रमाने लावणे, केवळ उंचीनुसार चढता क्रम लावणे इ० या सर्वांचा हेतू लहान मुलांचे अवधान केंद्रित करणे, तुलना, अंदाज व निवड करण्यास शिकविणे असा असतो. जीवनातील काही कौशल्ये यामुळे तो आत्मसात करतो. मॅाँटेसोरी बाईंनी सुरुवातीला मंदबुद्धी व मागास मुलांना शिकविण्याचे जे प्रयत्न केले त्यात त्यांना असे दिसून आले की,

( १ ) मंदबुद्धी मुलांना दोन वस्तूंमध्ये डोळ्यात भरण्यासारखा फरक असेल तरच तो लक्षात येतो. मात्र सर्वसामान्य बुद्धीच्या मुलांना दोन वस्तूंतील साधा फरकही जाणवू शकतो.

( २ ) मंदबुद्धी मुलांनी एखादी कृती पूर्ण केल्यास ती पुन्हा करण्यास ही मुले धजत नाहीत. परंतु सर्वसामान्य मुले आपल्या यशस्वी कृतीची पुनरावृत्ती करण्याची इच्छा बाळगतात.

( ३ ) मंदबुद्धी मुले आपल्या चुका स्वतःच सुधारण्याचा प्रयत्न करीत नाहीत. आपल्या चुका सुधारण्यासाठी त्यांना इतरांची किंवा शिक्षकांची मदत लागते. मात्र सर्वसामान्य मुले स्वतःच्या चुका स्वतः दुरुस्त करण्यात आनंद मान-तात. या निष्कर्षावरून मॅाँटेसोरीने असे ठरविले की, मंदबुद्धी मुलांना शिक्षण देण्यासाठी उपयुक्त शैक्षणिक साहित्याची आवश्यकता आहे.

**अवस्था २ री**— या वेळी मुलांना लांबीरुंदीची कल्पना येण्यासाठी काही लाकडी ठोकळे देण्यात येतात. रंगांतील सूक्ष्म भेद लक्षात येण्यासाठी लोकरीचे निरनिराळ्या रंगांचे चौसष्ट चेंडू देण्यात येतात. वस्तूंच्या नामरूपाशी विद्यार्थ्यांचा परिचय झाल्यावर नावावरून वस्तू शोधून काढणे किंवा वस्तू मिळा-ल्यास तिचे नाव सांगणे यासारखे शैक्षणिक उपक्रम घेण्यात येतात. मॅाँटेसोरीच्या मताप्रमाणे भाषाशिक्षणातील लेखनाची क्रिया यांत्रिक असल्यामुळे सर्वात सोपी आहे. म्हणून या अवस्थेतील मुलांना प्रथम जाड अक्षरांच्या साह्याने लेखन शिक-विण्यात येते. उभे राहणे, बसणे, एका ओळीत चालणे, रंगाप्रमाणे वस्तूंच्या

जोड्या लावणे व निरनिराळ्या साहित्याचा उपयोग करणे हे या वयातील मुलांना शिकता येते.

**अवस्था ३ री**— अक्षरांचा आकार, त्यांची उंची, रुंदी इत्यादी सूक्ष्म भेद या अवस्थेत शिकविले जातात. याच वेळी विद्यार्थ्यांना वाचन शिकविले जाते. वाचणे म्हणजे केवळ विशिष्ट प्रकारचे आवाज काढणे नव्हे. अर्थबोधाशिवाय वाचणे म्हणजे लिखित गोष्टीकडे पाहून भुंकणेच होय असे त्याना वाटे. म्हणून वाचन हे नेहमी सार्थ असले पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता. या अवस्थेमध्ये विद्यार्थ्यांनी आपली वैयक्तिक कामे करावयास शिकावयाची असतात. हात-तोंड धुणे, दात घासणे, कपडे घालणे व काढणे, सफाई करणे इत्यादी व्यवसाय विद्यार्थ्यांना निवडता येतात. निरानिराळ्या ज्ञानेंद्रियांच्या विकासासाठी मागे वर्णिलेले विविध साहित्य देण्यात येते.

**अवस्था ४ थी**— या वेळी विद्यार्थी भोजनासाठी जरूर त्या साहित्याची मांडामांड करतात. आपली खोली नीटनेटकी लावतात. आपल्या कपड्यांची, केसांची, शरीराची योग्य ती निगा त्यांना राखता येते. स्वतःच्या स्नायूंवर पुरेपूर ताबा मिळविता येतो. ज्ञानेंद्रियांचे शिक्षण अधिक परिपूर्ण करण्यासाठी प्रयत्न केला जातो. संगीताची आवड वाढीस लागावी व निरनिराळ्या स्वरांतील भेद कळावेत म्हणून विविध आवाजांच्या घंटांचा वापर करण्यात येतो.

### मॉंटेसोरी शिक्षणपद्धतील काही उणीवा

मॉंटेसोरी पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांच्या विकासाच्या दृष्टीने अनेक गोष्टी सुचविल्या आहेत. बालस्वातंत्र्य, ज्ञानेंद्रियांचे शिक्षण, व्यक्तिभेद, स्वयंशिक्षण ही तत्त्वे पूर्वप्राथमिक शिक्षणात अत्यंत मार्गदर्शक व उपकारक ठरलेली आहेत. त्यामुळे मॉंटेसोरीचा लौकिक अनेक देशांमध्ये वाढीला लागला. परंतु वरील चांगल्या तत्त्वांबरोबरच तिच्या शिक्षणपद्धतीमध्ये काही उणीवा व दोष दिसून येतात.

( १ ) तिने आपल्या शिक्षणपद्धतीत खेळांना अजिबात स्थान दिले नाही. फ्रोबेलने म्हटल्याप्रमाणे खेळ ही मुलांच्या जीवनातील सहजसुलभ, आनंददायी व आत्माविष्कार दर्शविणारी उत्स्फूर्त कृती आहे. तिला या शिक्षणपद्धतीमध्ये योग्य ते स्थान दिले गेले असते तर सुवर्णास सुगंध आल्याप्रमाणे फारच बहारीचे झाले असते.

( २ ) या पद्धतीतील दुसरा दोष म्हणजे तिने मुलांच्या सामाजिकतेला बिलकूल वाव दिला नाही हा होय. प्रत्येक मूल हे समाजातूनच आलेले असते व

त्याला आपले जीवन समाजातच व्यतीत करावयाचे असते. केवळ वैयक्तिक मार्गदर्शनाच्या अतिरेकामुळे तिने मुलांच्या सामाजिक विकासाकडे केलेले दुर्लक्ष उपेक्षणीय नाही. त्यामुळे सामाजिक गुणांचा परिपोष विद्यार्थ्यांमध्ये होण्याची शक्यता कमी.

( ३ ) काहींच्या मते तिने ज्ञानेंद्रियांच्या शिक्षणाला अवास्तव महत्त्व दिले आहे. मनाचा विकास म्हणजे केवळ ज्ञानेंद्रियांचा विकास हे तिचे समीकरण शिक्षणतज्ज्ञांना मान्य होऊ शकत नाही. मनाच्या विकासामध्ये विचारशक्ती, भावना यांनाही योग्य ते स्थान द्यावयास हवे होते.

( ४ ) तिने तयार केलेल्या शैक्षणिक साहित्याच्या वापरावर फारच भर दिला आहे. त्या साहित्याच्या स्वतःच्या काही मर्यादा आहेत. त्यांच्या वापराने सर्व अपेक्षित शिक्षण मिळू शकेल अशी खात्री देता येत नाही.

( ५ ) तिचे वाङ्मय वाचल्यास असे दिसून येते की, तिने प्रतिपादिलेली तत्त्वे व त्यानुसार सुचविलेली प्रात्यक्षिक कामे यात फारच तफावत आहे. "It seems she has acquired her theory out of books and her practice from the observation of human beings." तिने प्रतिपादिलेले व्यवसाय वा कृती आणि तिने सांगितलेले तत्त्वज्ञान यात बऱ्याच वेळा सुसंगती दिसून येत नाही. काही योग्य गोष्टीकरिता तिने दिलेली कारणे अयोग्य वाटतात. तिची सर्व पद्धती शास्त्रीय रूक्षतेकडे झुकलेली आहे.

( ६ ) तिने आपल्या अभ्यासक्रमाची उभारणी मुलांच्या नैसर्गिक प्रवृत्तीवर केली आहे. परंतु विद्यार्थ्यांना उपयुक्त असणारे सर्व प्रकारचे ज्ञान, प्रवृत्ती, कौशल्य विद्यार्थ्यांच्या सहजप्रवृत्तीच्या अनुषंगाने शिकविता येणे शक्य नाही. त्यामुळे अभ्यासक्रम एकतर संकुचित स्वरूपाचा होईल, किंवा विद्यार्थ्यांच्या कृती, व्यवसाय व निरनिराळे विषय यांत एकसूत्रता राहणार नाही.

( ७ ) तिची शिक्षणपद्धती फारच खर्चीक आहे. भारतीय परिस्थितीमध्ये ती आपणांला झेपण्यासारखी नाही. तिची शाळेची कल्पना, तिचे विविध प्रकारचे साहित्य आपल्या खेडयापाड्यांतील शाळांना पुरविता येईल असे वाटत नाही.

### मॉंटसोरी आणि फ्रोबेल

शिक्षण ही एक अखंड चालणारी प्रक्रिया आहे. तिची सुरुवात जन्माबरोबरच होत असून तिचा शेवट व्यक्तीच्या निधनाने होत असतो. व्यक्तीला त्याच्या जीवनामध्ये जे बरेवाईट अनुभव येत असतात त्यामुळे त्याच्या वागणुकीमध्ये बदल

घडून येत असतो. विस्तवाला हात लावल्यास मूल पुन्हा विस्तवाकडे जात नाही. ते आपल्या वर्तनात योग्य तो बदल घडवून आणीत असते. अशा रीतीने शिक्षणाची प्रक्रिया जन्मभर चालू असते. व्यक्तीला येणारे अनुभव किंवा त्याच्यावर होणारे संस्कार सामाजिक व नैसर्गिक परिसरामध्ये होत असतात. त्यांना सुसंघटित व निश्चित स्वरूप देण्यासाठी शाळा या संस्थेची स्थापना झाली. शाळेच्या द्वारा विशिष्ट क्रमाने पूर्वनियोजनाने व विशिष्ट ठिकाणी विद्यार्थ्यांना अनुभव देण्याची व त्यांच्यावर संस्कार घडवून आणण्याची सोय उपलब्ध झाली. प्रथम ही सोय काही विशिष्ट वयोमर्यादेनंतरच्या मुलांमुलींच्या बाबतीत करण्यात आली. अशा रीतीने प्राथमिक शिक्षणाची सुरुवात सात वर्षांनंतरच्या मुलांसाठी होऊ लागली. त्यापूर्वीच्या वयाच्या मुलांच्या शिक्षणाचे काय ? सात वर्षांखालील मुलांमुलींना सुसंघटित व पूर्वनियोजित शिक्षणाची अवश्यकता नाही काय ? असा प्रश्न काही विचारवंतांना वाटू लागला. या प्रश्नाचे उत्तर फ्रोबेल व मॉटेसोरी यांनी ठामपणे दिले. ते म्हणजे शिक्षणाची सुरवात मुलाच्या तिसऱ्या वर्षापासूनच झाली पाहिजे. तीन ते सात हे वय अत्यंत संस्कारक्षम असते. या वयात जिज्ञासेची ज्योत अत्यंत प्रज्वलितपणे तेवत असते. ज्ञानेंद्रियांची कार्यक्षमता मोठ्या प्रमाणावर दिसून येते. या वयात विद्यार्थ्यांचा जो शैक्षणिक विकास होईल त्यावरच त्यांच्या भावी जीवनाचे यशापयश अवलंबून आहे. बाल्यावस्था ही व्यक्तिविकासाच्या अवस्थेतील शैक्षणिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची अवस्था आहे. या अवस्थेचा शैक्षणिक व मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून फ्रोबेल व मॉटेसोरी यांनी सूक्ष्म अभ्यास केला. त्यातून काही शैक्षणिक तत्त्वे निर्धारित केली. काही अध्यापनपद्धती प्रसृत केल्या. काही उपयुक्त शैक्षणिक साहित्य निर्माण केले. बाल्यावस्थेतील बालकांच्या शिक्षणाला जगामध्ये प्रचंड प्रमाणात चालना दिली. फ्रोबेलने किंडरगार्टन पद्धती शोधून काढली, तर मॉटेसोरीने बालगृहाची ( Children's home ) कल्पना पुढे मांडली. दोन्हीही व्यक्ती आपापल्या कार्याच्या दृष्टीने फार मोठ्या आहेत. समाजाला त्यांनी नवीन विचार दिला व शिक्षणाला नवी दिशा दाखविली. नवीन विचाराचा शोध हा अणूच्या शोधाइतकाच स्फोटक व क्रांतिकारक समजला पाहिजे. या दोन्ही थोर शिक्षणतज्ज्ञांची त्यांच्या तत्त्वप्रणालीच्या अनुषंगाने तुलना करणे जितके मनोरंजक तितकेच उद्‌बोधक ठरेल.

### साम्य

१. दोघांनीही बाल्यावस्थेतील मुलांसाठी शैक्षणिक प्रयोग केले. योजना तयार केल्या. रोप ज्याप्रमाणे आंतरिक प्रक्रियेनुसार वाढते किंवा फूल ज्याप्रमाणे आपल्या मूलभूत शक्तीनुसार उमलते, त्याचप्रमाणे बालकाचे व्यक्तिमत्त्व प्रस्फुरित होत असते.

२. बालस्वातंत्र्याची कल्पना दोघांनाही मान्य होती व तिचा पाठपुरावा त्यांनी आपल्या शिक्षणपद्धतीतून केला. स्वतःच्या आवडीप्रमाणे मुलांना कृती करण्याची संधी द्यावी याबद्दल उभयतांत एकमत होते. खेळ किंवा क्रीडा हे अध्यापनाचे माध्यम असावे असे दोघांनाही वाटत होते.

## मूल्यमापन

डॉ. मॉंटेसोरी यांनी बालकांच्या शिक्षणामध्ये ज्ञानेंद्रिय-शिक्षणावर जो भर दिला आहे तो योग्य व सर्वमान्य असाच आहे. ज्ञानेंद्रिये ही अध्ययनाची प्रभावी साधने आहेत हे जितक्या प्रमाणात शिक्षक समजू शकतील तितक्या प्रमाणात त्यांचे शिक्षणकार्य अधिक यशस्वी होऊ शकेल. त्यांनी आपल्या शिक्षणपद्धतीमध्ये वैयक्तिक शिक्षणावर जो विशेष भर दिला आहे तो आजच्या परिस्थितीमध्ये कितपत समर्थनीय ठरेल, याची शंका वाटते. डॉ. मॉंटेसोरी यांनी शिक्षणाचे जे प्रयोग केले ते प्रथम मागास व मंदबुद्धी मुलांसाठी व नंतर समाजातील गरीब वर्गातील मुलांसाठी होते. त्यामुळे तिच्या शिक्षणपद्धतीमध्ये लेखन, वाचन, गणित व विषयज्ञान यांवर त्यांनी विशेष भर दिला नाही. गरीब वर्गातील विद्यार्थ्यांना अशा ज्ञानाची फारशी आवश्यकता भासत नसे. परंतु समाजातील सर्व वर्गातील विद्यार्थ्यांसाठी जेव्हा आपण मॉंटेसोरी पद्धतीचा उपयोग करू लागतो, तेव्हा त्या वर्गातील बालविद्यार्थ्यांसाठी केवळ ज्ञानेंद्रिय-विकासाचे शिक्षण देणे अपुरे वाटू लागते. त्यांना भाषाज्ञान व इतर विषयज्ञान देण्याचीही आवश्यकता असते.

• • •

## टॉलस्टॉय

| | |
|---|---|
| जन्म | १८२८ |
| मृत्यू | १९१० |

फ्रेंच राज्यक्रांतीचा द्रष्टा जसा रूसो तसाच रशियन राज्यक्रांतीचा अग्रदूत काउंट लिओ निकोलविच टॉलस्टॉय हाच होय. ज्या वेळी सामान्य शेतकऱ्याला अत्यंत क्रूर वागणूक दिली जात असे, त्या झारशाहीच्या काळात म्हणजेच १८९४ च्या सुमारास जमीन ही ईश्वराची देणगी असून ती सर्वांच्या उपयोगाकरिता आहे असे प्रत्यक्ष झारला बजावण्यासही त्याने मागेपुढे पाहिले नाही. स्वातंत्र्याच्या आणि समतेच्या प्रचंड लाटा निर्माण करून झारशाहीच्या चिरेबंदी राजवटीला भगदाडे पाडण्याचे काम त्याच्या विचारांनी आणि कार्याने केले यांत काही शंका नाही.

### चरित्र

लिओचा जन्म रशियातील यास्नाया पोल्याना येथे ता. २९ ऑगस्ट १८२८ रोजी झाला. निसर्गसौंदर्याने नटलेले हे खेडे म्हणजे लिओचे आजोळ. स्वतंत्र आणि निसर्गसुंदर वातावरणात मनसोक्त हुंदडण्यात त्याचे बालपण गेले. लिओची आई मेरी म्हणजे प्रेम व पावित्र्य यांची मूर्तिमंत प्रतिमाच. असत्य वचन व परनिंदा यांचे तिला फार वावडे. दुर्दैवाने लिओला मातृसुख फारसे लाभले नाही. वयाच्या दुसऱ्या वर्षीच त्याची आई त्याला सोडून परलोकी गेली. मात्र त्याच्या

आत्याने त्याच्या आईची बरीचशी उणीव भरून काढली. त्याची आत्या अत्यंत दयाळू अंतःकरणाची होती. तिने लिओच्या व त्याच्या भावंडांचा पोटच्या पोराप्रमाणे अत्यंत वात्सल्याने सांभाळ केला. छोट्या लिओला आपल्या आत्याबद्दल मोठा आदर वाटे. प्रेम आणि सहानुभूती या दोन गुणांचा अंकुर प्रेमळ आत्याच्या सहवासात लिओच्या अंतःकरणात मूळ धरून वाढू लागला. लिओचे वडीलही अत्यंत दयाळू प्रवृत्तीचे एक जमीनदार होते. तो काळ जुलमी झारशाहीचा होता. कुळांना गुराढोरांपेक्षाही क्रूर आणि हीन वागणूक देण्याची वहिवाट सर्रास रूढ होती. लिओचे वडील मात्र याला अपवाद होते. कुळांची विचारपूस करून त्यांना मदत करण्यात त्यांना फार आनंद होत असे. दुर्दैवाने तेही फार काळ जगले नाहीत. वयाच्या ८ व्या वर्षीच लिओ पोरका झाला.

वडिलांच्या मृत्यूनंतर त्याची सर्व मिळकत कोर्टाच्या ताब्यात गेली. कोर्टाकडून मिळणाऱ्या ठराविक रकमेत सर्व मुलांचे भागवितांना त्याच्या आत्याची फार ओढाताण होऊ लागली. सर्व मुलांना चांगले शिक्षण मिळावे या हेतूने तिने त्यांना मॉस्कोत ठेवण्याचा निर्णय घेतला.

लिओचा मोठा भाऊ फार विचारी होता. सभोवतालचा दुःखाचा समुद्र पाहून त्याचा जीव कळवळे. 'मानवाच्या मनातून द्वेष व हिंसा हे विकार नष्ट झाले तरच सर्व जग सुखी होईल', अशी त्याची धारणा होती. सर्व भावंडांमध्ये खेळीमेळीचे व समजुतीचे वातावरण रहावे म्हणून त्याने एक भ्रातृमंडळ स्थापन केले होते. या मंडळात गाढ प्रेमभावना होती. लिओ सर्वांवर प्रेम करायला येथेच शिकला.

कोमल भावनांच्या पोषणाबरोबरच लिओची बुद्धीही सातत्याने विकसित होत गेली. बायबलमधील गोष्टी, अरेबियन भाषेतील सुरस कथा 'अलीबाबा चाळीस चोर', रशियन भाषेतील लोकगीते व लोककथा आणि पुष्किनच्या कविता यांचे वाचन लिओने आपल्या वयाच्या ८ ते १३ या वयातच पूर्ण केले होते.

अगदी बालवयापासून लिओचे विचार आध्यात्मिक विषयांवर केंद्रित होऊ लागले. जीवनाचा अर्थ शोधण्यात त्याची तंद्री लागे. चिंतनशील अवस्थेत लिओचे बाल्य सरकत होते. पण त्याबरोबरच त्याचे पुस्तकी ज्ञान वाढत नव्हते. शालेय अभ्यासक्रम व अध्ययनपद्धती यांची त्याला विलक्षण चीड येई. त्याला शिकवायला फ्रेंच शिक्षक असत. त्यांचे उच्चार, शाळेत दिल्या जाणाऱ्या क्रूर शिक्षा, कोंदट, भयग्रस्त वातावरण, पाठांतर, शिस्तीची अवास्तव बंधने यामुळे त्याचे बालमन उबगून जाई. अभ्यासावर लक्ष केंद्रित न करता आल्यामुळे त्याला

मॅट्रिकच्या परीक्षेत एकदा अपयश पत्करावे लागले. पण कॉलेज-जीवनाच्या आत्यंतिक ओढीमुळे घोकंपट्टी करून तो कसातरी पास झाला व त्याने कॉलेजमध्ये प्रवेश मिळविला.

कॉलेज-जीवनाबद्दल त्याने रंगविलेली स्वप्ने हळूहळू विरू लागली. कॉलेज-मध्ये वर्ग चुकविण्यावरच त्याचे अधिक लक्ष असे. धूम्रपान व इतर व्यसनांच्या जाळ्यातही तो अधिकाधिक अडकू लागला. त्या वेळी रशियातील जीवनच तसे होते.

लिओने कायद्याचा अभ्यास सुरू केला. तेथील बहुतेक प्राध्यापक जर्मन होते. ते आपला विषय इतक्या कंटाळवाण्या पद्धतीने शिकवीत की, त्यामुळे मुलांची जिज्ञासाबुद्धी व जीवनातील गूढ रहस्ये उकलणारी संशोधक शक्ती अकालीच मारून टाकली जाई. लिओच्या जीवनाला कलाटणी देणारा एक प्रसंग त्याच्या कॉलेज-जीवनात त्याला अनुभवावा लागला. एकदा इतिहासाच्या तासाला येण्यास त्याला उशीर झाला. त्यामुळे त्याला लष्करी पद्धतीची शिक्षा देण्यात आली. रात्रभर वर्गात डांबून ठेवण्याचा हुकूम सुटला. लहानपणी फ्रेंच शिक्षकांनीही त्याला एकदा वर्गात डांबून ठेवले होते. इतिहास विषयाची तीव्र घृणा तर त्याच्या मनात निर्माण झालीच, शिवाय विवेकशक्ती गुदमरून टाकणारे हे शिक्षणच नको असे त्याच्या मनाने घेतले.

कॉलेजच्या दुसऱ्या वर्गात शिकत असताना त्याच्या वडिलोपार्जित संपत्तीची वाटणी झाली. त्याच्या वाट्याला ५००० एकर जमीन व ३५० गुलाम-कुटुंबे आली. शेतीवाडीची जबाबदारी घेण्याच्या निमित्ताने त्याने कॉलेजला रामराम ठोकला.

कॉलेजजीवन सुटले तरी त्याची वाचनाची गोडी सुटली नाही. फ्रेंच ग्रंथकार रूसो याची त्याच्यावर सर्वात अधिक छाप पडली. खिस्ती लोक आपल्या गळ्यात ज्याप्रमाणे क्रॉसचे चिन्ह अडकवीत, त्याप्रमाणे रूसोची छोटी प्रतिमा लियो आपल्या कंठात भक्तीने बाळगी.

‘ निसर्गाकडे परत चला ’ हा रूसोचा संदेश लिओच्या चित्तावर चांगलाच ठसला. त्याने तऱ्हेतऱ्हेचे उंची पोशाख फेकून दिले आणि तरटाचा जाडाभरडा झैल झगा घालून तो हिंडू लागला.

टॉलस्टॉयचे घराणे हे एक नामवंत लष्करी घराणे होते. त्याच्या पूर्वजांनी पराक्रमाच्या बळावरच मानसन्मान व धनदौलत मिळवली होती. वयाच्या पंच-विसाव्या वर्षी लष्करातील ठराविक परीक्षा देऊन लियो एक सैनिक म्हणून दाखल झाला. पुढे अनेक वेळा पराक्रम व शौर्य गाजवून त्याने मानाची पदके मिळविली.

क्रिमियन युद्धात दीड वर्ष आणि त्यापूर्वी कॉकेशसमध्ये दोन वर्षे अशी एकूण साडेतीन वर्षे टॉलस्टॉयने प्रत्यक्ष लष्करी जीवनाचा अनुभव घेतला. त्यामुळे युद्धाबद्दलची तीव्र घृणा त्याच्या मनात निर्माण झाली.

### लेखन

टॉलस्टॉयच्या वाङ्मयाने टॉलस्टॉयला चिरंजीव केले आहे. त्याने लिहिलेले खालील ग्रंथ विशेष प्रसिद्ध व लोकप्रिय आहेत.

' बालपण ', ' कौमार्य ' व ' तारुण्य ' या तीन कादंबरीमय ग्रंथांतून त्याने स्वतःचे समृद्ध अनुभव अत्यंत समर्थपणे मांडले आहे. त्याची लेखनशैली, विषयांची निवड आणि मांडणी सर्वस्वी नवी होती. तरीही सुरवातीसच सामान्य वाचकांकडून तसेच मान्यवर टीकाकारांकडूनही या नवोदित लेखकाचे कमालीचे स्वागत झाले.

### युद्ध व शांतता ( War and Peace )

हजार पानांच्या या पुस्तकामध्ये त्याने तत्कालीन सामाजिक, राजकीय व आर्थिक जीवनाचा परामर्श घेतला आहे.

त्याला जे युद्धविषयक अनुभव आले व त्यांतून त्याने जी अनुमाने व तत्त्वज्ञान काढले, त्याला चिरंतन करण्याचे महान कार्य या कादंबरीद्वारा साध्य झाले. ही कादंबरी तत्कालीन रशियाच्या संपूर्ण मानवी जीवनाचे यथायोग्य दर्शन घडविते.

### ॲना कॅरेनिना

त्या वेळच्या रशियातील सामाजिक स्थितीचे यथार्थ प्रतिबिंब उमटविणारी ही टॉलस्टॉयची आणखी एक कादंबरी साऱ्या जगभर गाजली. ॲना ही एक अधःपतित स्त्री पण तिच्याहीबद्दल सहानुभूती वाटावी, असे चित्रण करून सामाजिक विचाराला एक वेगळीच दिशा त्याने दिली.

'The kingdom of God is within you' ( परमेश्वराचे अधिराज्य तुमच्या हृदयात ) या ग्रंथामध्ये त्याने आपल्या आध्यात्मिक विचारांचे संकलन केल्याचे दिसून येते.

### शैक्षणिक पुस्तके

लहान मुलांना वाचता येण्यासाठी किती तरी छोटी छोटी पुस्तके त्याने लिहिली आहेत.

### तत्त्वज्ञान

१. मानवी जीवनाचे ध्येय प्रेम आहे. या निर्व्याज प्रेमाचा आविष्कार अखिल मानव जातीच्या निरपेक्ष सेवेतून दिसून आला पाहिजे.

२. समाजाची उभारणी दया, क्षमा, शांती, प्रेम व सेवा या उच्च तत्त्वांवर करावी.

३. आत्मभोगात किंवा केवळ उदात्त कल्पनेत खरे सुख नसते; दुसऱ्यांना सुखी करण्यासाठी प्रत्यक्ष कार्य करण्यातच खरे सुख आहे.

४. हिंसेवर आधारलेल्या शासनाशी प्रत्येक नागरिकाने असहकार करावा. लोकमताशिवाय अन्य कोणत्याही शक्तींची गरज शासनास लागू नये.

५. जमीन ही ईश्वराची देणगी आहे. तिच्यावर कोणा एकाची मालकी नाही. हवा, प्रकाश यांच्याइतकीच तिची मानवाला आवश्यकता आहे. तिचा वापर सर्वांना मोफत करता आला पाहिजे.

६. सर्वांना सामाजिक, राजकीय, आर्थिक समान न्याय मिळाला पाहिजे.

७. सर्वांना आपला विकास करून घेण्यासाठी शिक्षणाची संधी व स्वातंत्र्य असले पाहिजे.

८. प्रत्येकाला आपल्या धर्माप्रमाणे आचारविचार करण्यास मोकळीक असावी.

### शैक्षणिक कार्य

आपल्या शिक्षणविषयक कल्पनांना प्रत्यक्ष रूप देण्याच्या दृष्टिकोनातून १८५९ साली त्यांनी यास्नाया पोल्याना या आपल्या जन्मगावी एक शाळा सुरू केली. या शाळेचे स्वरूप अभिनव होते. ७ ते १० वर्षांच्या ४० मुलांना या शाळेमध्ये प्रवेश दिला होता. येथील अध्यापनपद्धतीचे स्वरूप सर्वांना कळावे या दृष्टीने यास्नाया पोल्याना या नावाचे एक मासिक, तोटा सहन करूनही, त्यांनी चालविले.

रशियाच्या ग्रामीण भागातील व जर्मनी, फ्रान्स व स्वित्झर्लंड येथील शाळांचा त्यांनी फार बारकाईने अभ्यास केला होता. शाळेची आणि जीवनाची

पूर्णपणे फारकत झाली असल्याचे त्यांना स्पष्ट दिसून आले. घोकंपट्टी, कडक शिक्षा यांमुळे मुलांची बुद्धी खुरटून जाते, असे त्यांना वाटे. त्यांनी काढलेली शाळा म्हणजे एक कुटुंबच होते. त्यांच्या शाळेत मुलांना कोणत्याही प्रकारची शारीरिक शिक्षा दिली जात नसे. मुलांना गोष्टी सांगून त्यांची दृष्टी विशाल बनविण्याचा प्रयत्न केला जाई. ही शाळा १८६३ पर्यंत टिकली. पुन्हा १८७० मध्ये त्यांनी दुसरी शाळा काढली. या वेळी त्यांनी लिहिणे, वाचणे व अंकगणित या विषयांची तयारी करून घेण्यावर विशेष भर दिला. लहान मुलांसाठी त्यांनी कित्येक मनोवेधक कथा लिहिल्या.

## शिक्षणाचे ध्येय

ज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती करण्याची अखंड इच्छा निर्माण करणे हेच शिक्षणाचे ध्येय आहे. शिक्षणाचा पाया समतेची भावना हाच असला पाहिजे.

प्रत्येक विद्यार्थ्याचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असते व त्या व्यक्तिमत्त्वाला विकसित करणे हेच शिक्षकाचे कार्य आहे. “ शिक्षक व शिष्य यांचे नाते माळी–कळी यांसारखे आहे. ”

## अध्यापनपद्धती

शिक्षणात सक्ती नको, भीती नको तर समता व ममता हवी. या चतुः-सूत्रीवर त्यांची अध्यापनपद्धती आधारलेली होती. त्यांच्या शाळेत परीक्षांना स्थान नव्हते. वेळापत्रक, पाठांतर असली बंधनेही मुलांवर नव्हती. मुले आपल्याबरोबर पुस्तके आणीत नसत व जाताना गृहपाठही नेत नसत. संस्कारक्षम मन व ग्रहणशील बुद्धी बरोबर घेऊन आले की झाले. शेतावरील खेळ आणि शाळेतील अध्ययन यात मुलांना फरकच वाटत नसे.

उशीर झाल्याबद्दल विद्यार्थ्यांना कधीच कोणी रागवत नसे. मुले मनास येईल त्याप्रमाणे घसरगुंडीचा खेळ, लेखन, वाचन इत्यादी गोष्टी करीत असत. वर्गातसुद्धा अमुक ठिकाणी अमुक पद्धतीने बसले पाहिजे असे बंधन नसे. कोणी खिडकीत, तर कोणी आरामखुर्चीत, तर कोणी जमिनीवर बसत असत.

स्वतः टॉलस्टॉय बायबल, युद्ध व शांतता यांतील चित्तवेधक कथा मुलांना सांगत. मुले चित्राप्रमाणे ऐकत असत. शिस्त, बंधने, याला सरावलेली पालकांची मने स्वैर, स्वतंत्र वृत्तीच्या शाळेत मुलांना पाठवायला सुरुवातीला काकू करीत. पण अनुभवाने मात्र त्यांना असे कळले की, या शाळेत सर्व विषयांचे ज्ञान हसत-

खेळत दिले जाते. गुरुदेव टागोरांच्या 'शांतिनिकेतना'ची बीजे या शाळेतच दिसतात.

## प्रौढ शिक्षणाचे प्रयोग

लहान मुलांना ज्याप्रमाणे शिक्षण देण्याचे प्रयत्न होतात, त्याप्रमाणेच प्रौढांना शिक्षण मिळण्याची आवश्यकता आहे, असे टॉलस्टॉय यांना वाटे. प्रौढांसाठी एक स्वतंत्र संस्था स्थापन करून त्याद्वारा प्रौढांना शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात यावी असा विचार त्यांनी १८६० साली मांडला. त्या काळाचा विचार करता टॉलस्टॉय यांचा हा विचार अत्यंत क्रांतिकारक वाटणे स्वाभाविकच होते. कारण त्या वेळी रशियामध्ये शिक्षणाचे दरवाजे फक्त लक्ष्मीपुत्रांसाठीच उघडे होते. पण १८६० सालची स्थिती कायम टिकली नाही. स्वातंत्र्य व समतेचा जोरदार लढा सरंजामशाहीविरुद्ध सुरू झाला. त्याचा परिणाम म्हणूनच १८६१ साली प्रौढांसाठी शाळा काढण्यास प्रोत्साहन स्वतः सरकारच देऊ लागले.

१८६२ साली यास्नाया पोल्याना या गावच्या परिसरात १३ शाळा सुरू झाल्या. या शाळांची संपूर्ण उभारणी टॉलस्टॉय यांच्या कल्पनेनुसार करण्यात आली होती. नेमलेले शिक्षकसुद्धा त्यांच्या संमतीनेच नेमलेले होते. सकाळी ८ वाजल्यापासून रात्रीपर्यंत टॉलस्टॉय या शाळांमध्ये काम करीत असत. इतर शिक्षकही आपोआप त्यांचे अनुकरण करीत असत.

भारताची उच्च संस्कृती, धीरोदात्त इतिहास व वैभवशाली वाङ्मय यांच्याबद्दल टॉलस्टॉयना नितान्त आदर वाटत असे. लहानपणीच भारताबद्दलची माहिती त्यांना एका बौद्धलामाकडून मिळाली होती. गौतमबुद्ध, शंकराचार्य, रामकृष्ण-परमहंस, स्वामी विवेकानंद यांच्या तत्त्वज्ञानाचा त्यांनी सखोल अभ्यास केल्याचे दिसून येते. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, पंचतंत्र, हितोपदेश व महाकाव्ये यांच्या परिशीलनाचा त्यांच्या जीवनावर व वाङ्मयावर परिणाम झाला असावा. भारतीय तत्त्वज्ञानाचा ठसा त्यांच्या कार्यावर दिसून येतो.

म. गांधी व टॉलस्टॉय यांच्या विचारांत विलक्षण साम्य दिसून येते. टॉलस्टॉय यांचेच तत्त्वज्ञान गांधीजींनी प्रत्यक्ष आचरणात आणले, असे वाटण्याइतकी समानता दोघांच्या विचारात दिसून येते. १९०८ साली त्यांनी लिहिलेल्या 'एका हिंदूस पत्र' या लेखात भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाचा जणू काही कार्यक्रम दिला आहे. ते लिहितात, "हिंदी लोकांनी अहिंसेचा व प्रेमाचा प्रभाव ओळखावा. हिंसेवर अधिष्ठित असलेल्या शासनाशी कोणत्याही प्रकारे सहकार्य करू नये. त्यांच्या

न्यायदानात भाग घेऊ नये, कोणतेही कर त्यांना देऊ नयेत, त्यांच्या लष्करात भरती होऊ नये. म्हणजे इंग्रजांना राज्य करणे अशक्य होईल. हिंसेला अहिंसेने, द्वेषाला प्रेमाने व सत्तेला सेवेनेच जिंकता येते."

याच सुमारास म. गांधी द. आफ्रिकेत, तेथील अन्यायाविरुद्ध सत्याग्रहाचा लढा देत होते. त्यांना हा लेख वाचून एक जिवलग सखा भेटल्याप्रमाणे झाले. त्यानंतर म. गांधी व टॉलस्टॉय यांच्यात पत्रव्यवहार व विचारांचे आदानप्रदान सुरू झाले. दोघांनाही एकमेकांच्या कार्याबद्दल व तत्त्वज्ञानाबद्दल नितान्त आदर वाटत होता. २० ऑक्टोबर १९०९ रोजी म. गांधींना पाठविलेल्या पत्रात टॉलस्टॉय लिहितात, "ट्रान्सव्हालमधील तुमचे कार्य भूगोलाच्या दुसऱ्या टोकास होत असले तरी ते आमच्या विचाराचे केंद्र आहे. अहिंसेच्या तत्त्वज्ञानास तुमच्या प्रयोगाने पुष्टी मिळत आहे. आपला परिचय झाल्याने मला अतिशय आनंद होत आहे. माझा एक भाऊ म्हणून मी आपणांस प्रणाम करतो." म. गांधी स्वतःला टॉलस्टॉयचे एक नम्र अनुयायी मानीत असत; म्हणूनच द. आफ्रिकेत स्थापन केलेल्या सत्याग्रहाश्रमास 'टॉलस्टॉय फार्म' हे नाव त्यांनी दिले होते.

दि. २० नोव्हेंबर १९१० रोजी या महान् तत्त्ववेत्त्याचे देहावसान झाले. ही शोकवार्ता समजताच म. गांधींना मनस्वी दुःख झाले. त्या प्रसंगी लिहिलेल्या मृत्युलेखात ते म्हणतात, "टॉलस्टॉय या युगातील एक महान विभूती होत. त्यांच्या शिकवणीप्रमाणे वागण्याचा आम्ही जास्तीत जास्त प्रयत्न केला. ते मरण पावले नसून आपल्या असंख्य अनुयायांच्या रूपाने चिरंजीव झाले आहेत. मानवी जीवनाच्या सर्व अंगोपांगांमध्ये हिंसाचाराऐवजी प्रेम व बंधुता पूर्ण भरून राहिली तरच आपणांस खरी मानवता प्राप्त करून घेता येईल."

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम 68824 क्रि. निबंधा
9293 9913(4)
दा. क्र. 90434

REFBK-0017735

चिरंजीव
ग्रंथ प्रकाशन

शैक्षणिक सुग्रंथांसाठी प्रसिद्ध--

प्रकाशन-संस्थेची नवी योजना

## पदविका पूरक-वाचनमाला

| | |
|---|---|
| ♦ शालेय विज्ञान | प्रा. चिवटे |
| ♦ भारतीय घटनेचा परिचय | प्रा. पतके |
| ♦ संयुक्त राष्ट्रसंघटनांचा परिचय | प्रा. पतके |
| ♦ शैक्षणिक संदर्भ कोष | प्रा. हरोलीकर<br>प्रा. पानसे |
| ♦ शालेय शारीरिक शिक्षण | प्रा. दुसे<br>प्रा. करंदीकर |
| ♦ भारतीय शिक्षण | प्रा. बोकील |
| ♦ प्राथमिक शिक्षणातील समस्या | प्रा. कामतकर |

चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पुणे ३०.